राष्ट्रीय सेवा योजना ही सक्तीच्या राष्ट्रीय छात्रसेना योजनेचा पर्याय म्हणुन सुरू झाली. राष्ट्रीय छात्रसेना दलात न जाणाऱ्या विद्यार्थ्यांने राष्ट्रीय सेवा योजनेत भाग घ्यावा अशी अपेक्षा होती. या योजनेतील आर्थिक जबाबदारी लक्षात घेऊन प्रत्येक राज्यातील काही निवडक महाविद्यालयापुरतीच ही योजना लागु करण्यात आली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून त्यांच्यात सामाजिक कार्याची आवड निर्माण व्हावी हा या योजनेमागील उद्देश असतांनाच महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करणे, ग्रामीण विभागातील रस्ते बांधणे, प्रौढ शिक्षण, गलिच्छ वस्त्यांची सफाई, प्रथमोपचार नागरी संरक्षण इ. कार्यक्रमांचा या योजनेत समावेश आहे. 1976–77 पासून ग्रामीण विभागाची सुधारणा तसेच आर्थिक व सामाजिकदृष्टया कमजोर असलेल्या लोकांच्या विकासाची कामे यावर भर देण्यात आला.

म. गांधीचा खेडयाकडे चला हा विचार घेऊन गावांमध्ये विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीरामार्फत ग्रामस्वच्छता, सर्वांगीण व शास्वत विकास, रस्त्यांची कामे, बंधारा बांधणे, वृक्षारोपन, रक्तदान, आदी कार्य श्रमदान, पथनाटय, रॅली, परिसंवाद, गावकऱ्याशी चर्चा व सवांद या माध्यमातुन समाजाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतीक व शैक्षणीक क्षेत्रात युवाशक्ती व ऊर्जास्त्रोत पुरविण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातुन चालत असते. स्वंयशिस्त समाजसेवा, लोकशाही, मुल्यशिक्षण हे सर्व स्वंयसेवकामध्ये रूजविण्यात राष्ट्रीय सेवा योजना यशस्वी झाली आहे. समाजात जाणीव जागृती घडविणे व सकारात्मक विचाराची पेरणी करतांनाच राष्ट्र व समाजाप्रती जबाबदारीचे कार्य करणारा राष्ट्रीय सेवा योजना हा भारत सरकारचा अभीनव उपक्रम आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थी व रा□ट्रीय सेवा योजना स्वावलंबन, चारित्र्य संर्वधन, सामाजिक बांधीलकी या मुल्यांचा समन्वय नविन षिक्षण पध्दतीत घडवुन आणण्यासाठी 1969 या म. गांधीच्या जन्मषताब्दी वर्शापासून महाविद्यालयीन विद्यार्थ्यासाठी राश्ट्रीय सेवा योजना ही भारत सरकारच्या युवा कल्याण व क्रिडा मंत्रालयातर्गत राबविली जाते. आजच्या गतीमान समाजात तारूण्याच्या उंबरठयावर असलेला महाविद्यालयीन विद्यार्थी कुठेतरी भरकटत जाऊ नये म्हणुन राश्ट्रीय सेवा योजना या उपक्रमातुन समाज परिवर्तन करण्याचे कार्य आज राश्ट्रीय सेवा योजनेचा तरूण करीत आहे. महाविद्यालयीन षिक्षण घेत असतांनाच समाज सेवा करणे, आपल्या जवळपासच्या परिसरामध्ये व त्या परिसरातील लोकांमध्ये मिसळुन त्यांना समजावून घेऊन रचनात्मक कार्य करणे, समाजसेवेच्या माध्यमातून स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे या उदात्त हेतुने ही राश्ट्रीय सेवा योजना सुरू करण्यात आली आहे.

समाजात सामाजिक जाण देणारा, जनजागष्ती करणारा तसेच राश्ट्र व समाजाप्रती जबाबदारीचे कार्य करणारा राश्ट्रीय सेवा योजना हा भारत सरकारचा अभिनव उपक्रम आहे. या उपक्रमामध्ये साक्षरता संबधी कार्य, पर्यावरण सुरक्षा, आरोग्य व स्वच्छता, आपातकालीन परिस्थितीतील कार्य, गरजु तसेच पीडीत लोकांना सहकार्य इ. समाज उपयोगी अथवा समाजाच्या हितासाठी अनिवार्य असे कार्य करण्याची प्रेरणा ही या उपक्रमातुन मिळत असते. त्यामुळे समाजसेवा करीत असतांनाच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांत राश्ट्रसेवाच्या गुणांचा विकास होतो. या उपक्रमासोबतच गावाची उभारणी करणे, लोकांमध्ये आत्मविष्वास जागष्त करणे षारिरिक मदत करणे यासारखे उपक्रम राश्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातुन हाती घेतले जातात.

राश्ट्रीय सेवा योजनेचे बोधवाक्य हे 'माझ्यासाठी नव्हे तर तूमच्यासाठी' (Not Me But You) असे आहे. ते आपणाला लोकषाही सामाजिक बांधीलकीची जाणीव करून देते. त्या सोबतच निःस्वार्थ सेवेची गरज दाखवून देते. या बोधवाक्यात दुसऱ्या व्यक्तिचा दष्टीकोन विचारात घेतला पाहिजे हे यावरून सूचित होते. परोपकाराची भावना ठेऊन निस्वार्थ सेवा करण्याचा मार्ग दाखविणे, दुसऱ्यांच्याही विचारांचा आदर राखणे व समाजावून घेणे, त्यांना प्रत्येक कार्यात आवष्यक ते सहकार्य करणे, दुसऱ्या बद्दल सहानुभुती दर्षविणे इ. बांबीचे प्रतिनिधीत्व हे राश्ट्रीय सेवा योजनेचे बोधवाक्य करते. व्यक्तिचा विकास झाला तरच समाजाचा विकास होईल. सामाजिक भान ठेऊन आपण नेहमी समाजाच्या उपयोगी पडावे. समाजाचे अनुकरण आपल्या दैंनदीन व्यवहारात करून समाजोपयोगी विकास घडविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे हे बोधवाक्य प्रेरीत करते.

महाविद्यालयात अभ्यासविषयक माहितीची उपलब्धता करून देत असतांनाच युवकांचे प्रभावी व्यक्तिमत्व घडविण्याचे काम या स्तरावर होत असते. तर हे प्रभावी व्यकिमत्व घडवित असतांना तरूणामध्ये सामाजिक बांधीलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे काम महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना युवा चळवळीतुन होत असते. या कारणामुळेच उच्च शिक्षण क्षेत्रातील राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमाची व्याप्ती वाढत आहे. तसेच या चळवळीला युवा पीढीचा सकारात्मक प्रतिसादही लाभत आहे. म्हणूनच राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयीन विश्वातील मोठी विधायक युवा चळवळ म्हणून समोर येतांना दिसत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेची ही युवा चळवळ अखंड सुरू राहावी याकरिता केंद्र व राज्यसरकार मूलभूत योजनांचा सतत प्रचार व प्रसार या युवा चळवळीच्या माध्यमातुन करीत आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्टये:–विद्यार्थी महाविद्यालयात शिकत असतांना व अभ्यासाचे धडे घेत असतांनाच शैक्षणिक परिसर व जवळपासच्या परिसरातील समुदायामध्ये मिसळुन त्याचबरोबर त्यांना समजुन घेवून रचनात्मक कार्य करणे समाजसेवेच्या माध्यमातुन मिळलेल्या संधीद्वारे स्वतःचा विकास करणे या उद्देशाने ही योजना सुरू झाली. या योजनेची प्रमुख उद्दीष्टे पूढीलप्रमाणे आहेत.

1) सामाजिक ऋणाची जाणीव ठेऊन समाजातील समस्या निट समजून त्या समाजाशी समरूप होणे.
2) विधायक आणि सर्जनशील प्रतिभेद्वारा विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधीलकीची भावणा निर्माण करणे.

3) समाजाच्या अडचणी लक्षात घेवून समाजाच्या गरजांची माहिती करून त्यांच्या पुर्ततेसाठी प्रयत्न चालविणे.
4) आपल्या शिक्षणाचा व ज्ञानाचा उपयोग हा समाजाच्या हितासाठी करणे.
5) समाजात मिसळयासाठी व त्यांच्यांशी एकरूप होण्याकरिता आवश्यक गुणांचा विकास करणे.
6) समाजातील अज्ञान दुर करण्यासाठी साक्षर व निरक्षर यांच्यातील भेद नाहीसा करणे व सर्वांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे.
7) लोकशाहीला पोशक अशा वातावरणाच्या निर्मितीसाठी नेहमी प्रयत्नशिल राहणे व त्यासाठी नेतृत्व गुणांचा विकास करणे.
8) सामाजिक समस्याचे निवारण करण्यासाठी आपल्या अंगभुत कौशल्याचा अवलंब करणे.
9) आपत्ती व्यवस्थापनाचा एक घटक म्हणून मानवनिर्मित व नैसर्गिक संकटाचा सामना करण्यास सदैव तत्पर असणे.
10) राष्ट्रीय एकता व अखंडतेसाठी निरतंर प्रयास करणे व विकास करणे.

राश्ट्रीय सेवा योजनेचे महत्व :– चार भिंतीच्या आत मिळणाऱ्या पुस्तकी ज्ञानातून विद्यार्थ्यांची बौध्दीक, मानसीक व वैचारीक जडण – घडण तर होतेच मात्र यासोबतच कृतिशील वा व्यावहारीक अनुभवही तीतकाच गरजेचा आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमातंर्गत नियमित होणाऱ्या कार्यक्रम व शिबीराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगी ही कृतीशिलता विकसीत होण्यास निश्चितच साहयभूत ठरते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिने उपयुक्त अशा राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व पुढिलप्रमाणे विषद करता येईल.

1) राष्ट्रीय सेवा योजनेतील उपक्रमातंर्गत व होणाऱ्या विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून मानवी अधिकार व लोकाधिकाराची माहिती समाजातील तळागाळापर्यंत पोहचत असते.
2) या उपक्रमातर्गंत होणाऱ्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग असल्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होत असते.
3) समाजाच्या प्रत्यक्ष स्थितीची जाण होत असल्यामुळे विद्यार्थी हा स्वप्नाळु विश्वातून बाहेर पडुन वास्तवाला सामोरे जाण्यास तयार होत असतो.
4) विद्यार्थी वा स्वंयसेवकाला या उपक्रमातुन विविध सामाजिक समस्यांची जाणीव होते व त्याचे निराकरण करण्याचे कौशल्य प्राप्त होत असते.
5) या उपक्रमात विविध सामाजिक संस्थाचा सहभाग करून घेण्यात येत असल्यामुळे विद्यार्थी हा अशा संस्थाशी जवळुन परिचीत होत असते.
6) राष्ट्रीय सेवा योजनेत व त्यातील होणाऱ्या कार्यक्रमात नावीण्यपुर्ण उपक्रम राबविले जात असल्यामुळे विद्यार्थ्यांना स्वंयरोजगाराची दिशा मिळत असते.
7) या उपक्रमातून समाजप्रबोधन, लोकजागृती करण्याच्या अनुशंगाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्यामुळे मंनोरंजनासोबतच परीवर्तन होण्यासाठी चालना मिळते.
8) रस्त्यांची कामे, बंधारे बांधणे, ग्राम स्वच्छता, वृक्षारोपण जल संर्वधन इ. रचनात्मक कार्यक्रम विद्यार्थी वा स्वंयसेवक या माध्यमातुन करून समाजाच्या विकासास हातभार लावतात.
9) विद्यार्थी वा स्वंयसेवक होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभागी होऊन श्रमविषयक कार्यात योगदान देत असल्यामुळे त्यांच्यात श्रमाचे महत्त्व कळते.
10) आजच्या गतीमान जीवनात निर्माण होणाऱ्या वैयक्तिक व सामाजिक समस्या सोडविण्यात स्वंयसेवकाचा वा विद्यार्थ्यांचा मोठया प्रमाणावर हातभार लागतो.
11) ग्रामीण भागात होणाऱ्या श्रम संस्कार शिवीराच्या माध्यमातून व त्यातील कार्यक्रमातंर्गत ग्रामवासीयांना विविध योजनांची माहिती मीळत असते व त्या योजनांचा लाभ कसा घ्यावा याविषयकही मार्गदर्शन मिळत असते.
12) राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमात सहभागी होणाऱ्या स्वंयसेवकाला वा विद्यार्थ्यांस सहभागी झाल्यामुळे त्यांना अतिरिक्त गुण व प्रमाणपत्रही मिळत असते. ज्यामूळे त्यांच्या शालेय प्रगतीस हातभार लागत असते.

निष्कर्श :– महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांनाच विद्यार्थ्यांने सामाजिक जबाबदारी लक्षात घेऊन समाजसेवा करणे, आपल्या परिसरातील लोकांमध्ये समरस होऊन त्यांच्याशी संवाद साधुन किंबहुना त्यांना समजावून घेऊन विधायक व रचनात्मक कार्य करणे आणि समाजसेवेच्या माध्यमातुन स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे या उदात्त हेतूने सुरू झालेली राष्ट्रीय सेवा योजनेचे अणण्य साधारण महत्व आहे. या विशयक तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदीरा गांधी यांनी केलेले कथन लक्षवेधक ठरते ते म्हणतात. ''राष्ट्रीय सेवा योजनेमुळे महाविद्यालयीन, विद्यापीठीय युवकांना राष्ट्रीय छात्र सेनेप्रमाणे समाजसेवा आणि राष्ट्रसेवा करण्याची नवी संधी मिळत आहे.'' त्यामुळे राष्ट्रीय सेवा योजना हा केवळ अभ्यासपुरक वा अभ्यासेत्तर उपक्रम नाही तर तो एक लोक जीवनाचा सक्रिय अभ्यास करण्याचा कार्यक्रम आहे. हे खरे.

संदर्भ ग्रंथ सुची :–

1 *प्रा. घाटोळे रा. ना., 1983, भारतीय समाज व्यवस्था, श्री. मंगेश प्रकाशन, रामदास पेठ, नागपूर.*
2 *प्रा. भांडारकर पु. ल., 1976, सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर.*
3 *डॉ. वेळुकर राजन, 1999, आम्ही यशस्वी होणार, रा. से. यो. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्रराज्य.*
4 *प्रा. देशमुख दिवाकर, 1983, श्रमाचे अर्थशास्त्र, विद्या प्रकाषन, नागपूर.*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

"महाराष्ट्रातील रामोशी–बेरड भटक्या विमुक्त जमातींच्या सामाजिक चळवळीचा अभ्यास"

प्रा. डॉ. सुषमा अ. जाधव
समाजशास्त्र विभागप्रमुख, देवचंद कॉलेज ,अर्जुननगर
ता.कागल, जि.कोल्हापूर

★★★

गोषवारा – महाराष्ट्र शासन 26 सप्टेंबर 2008 नुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या परिपत्रकानुसार समाविष्ट करण्यात आलेल्या भटक्या विमुक्त जमाती मध्ये बेरड, बेस्तर ,भामटा,कैकाडी, कंजारभाट ,बंजारा, पारधी, राज पारधी, राजपूत बामटा, रामोशी–बेरड, वडार, वाघरी आणि छप्परबंद अशा चौदा जमातींचा समावेश करण्यात आलेला आहे. मुक्त जमातीत झालेली दुरावस्था बघून त्यांच्यात सुधारणा होण्याकरता या जमातीतील काही सुशिक्षित आणि काही भटके तर सुधारणावादी लोकांनी चळवळी सुरू केल्या त्यात एक करता संशोधकाने स्नोबॉल नमुना निवड पद्धतीचा वापर करून मुलाखत अनुसूची या तथ्य संकलन ना वापर करण्यात आला आहे

रामोशी–बेरड जमातीच्या अनेक चळवळी, अधिवेशन ,मोर्चे ,निवेदने, पत्रके, या अनेक मार्गाने शासनापर्यंत त्यांच्या समस्या पोहोचण्याचा प्रयत्न केला.परंतु या जमातीचा मूळ प्रश्न सुटला नाही. आजही या जमातीं नागरिक हक्कापासून वंचित असलेल्या दिसून येतात.

महत्वपूर्ण शब्द भटक्या विमुक्त, तीन तारेचे कुंपण, गुन्हेगारी जमाती कायदा इत्यादी प्रस्तावना – कोणत्याही समाजाचा विकास हा केवळ विशिष्ट समाजाच्या विकासावर अवलंबून नसून तो सर्व समुदायाच्या सर्वांगीण प्रगती वर समाजाच्या विकासाचे मोजमाप केले जाते. परंतु भारत स्वातंत्र्याच्या 68 वर्षानंतरही भारतात असे काही समुदाय आहेत कि ते आजही स्थिर नाही त्यांच्याकडे उदरनिर्वाहाची साधने नाही, ज्यांना स्वताची ओळख ,गाव ,शिवार नाही असा हा मागासलेला व प्रचंड दारिद्र्य, उपेक्षित व दुर्लक्षित अस्थिर समुदाय म्हणजे भटक्या विमुक्त जमाती होय. ब्रिटिशांच्या धोरणामुळे जंगल संपत्ती व इतर उपजीविकेच्या साधनांवर हक्क गेलेल्या जमाती तसेच ब्रिटिशांच्या धोरणांना कडाडून विरोध केला , ज्या जमातीने बंड केल्या अशा जमातींना इंग्रजांनी "1871 च्या गुन्हेगार जमाती कायदा" ने गुन्हेगार ठरवले ,व हा कायदा जवळजवळ 80 वर्षांनी म्हणजे 31 ऑगस्ट 1952 ला रद्द करण्यात आला. परंतु या कायद्याची अंमलबजावणी ही 11 एप्रिल 1960 रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहर नेहरू यांच्या हस्ते सोलापूर येथील सेटलमेंट च्या तारा तोडून या वसाहतींमधील भटक्या विमुक्त जमातींना मुक्त करण्यात आले. त्यावेळी " पंडित नेहरू संसदेतील आपल्या भाशणात म्हणाले होते की, आम्ही सर्वजण भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मुक्त आहोत. पण या गुन्हेगारी जमातीचे सारे लोक स्वातंत्र्याचा लढा लढणारे असल्याने ते आजपासून विशेष मुक्त आहेत".तेव्हापासून या जमातींना विमुक्त म्हणजेच विशेष मुक्त असे नाव देण्यात आले. सेटलमेंट(तीन तारेचे कुंपण– वसाहत) मधून बाहेर पडलेल्या आणि विस्थापित झालेल्या या भटक्या विमुक्त जमातींच्या पुनर्वसनाचे करिता प्रस्थापित शासनाने कोणत्याही उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. त्यांच्या निवास, शिक्षण ,आरोग्य, उपजीविका या विषयी सरकारने कोणतेही धोरण ठरवले नाही. म्हणून भटक्या विमुक्त जमातीच्या लोकांनी आपल्या हक्कासाठी,अस्तित्वासाठी च्या अनेक चळवळी, मोर्चे, आंदोलने निवेदने करण्यात आले आणि या मार्फत सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

महाराष्ट्र शासन 26 सप्टेंबर 2008 नुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या परिपत्रकानुसार समाविष्ट करण्यात आलेल्या भटक्या विमुक्त जमाती मध्ये बेरड, बेस्तर ,भामटा,कैकाडी, कंजारभाट ,बंजारा, पारधी, राज पारधी, राजपूत बामटा, रामोशी–बेरड, वडार, वाघरी आणि छप्परबंद अशा चौदा जमातींचा समावेश करण्यात आलेला आहे. मुक्त जमातीत झालेली दुरावस्था बघून त्यांच्यात सुधारणा होण्याकरता या जमातीतील काही सुशिक्षित आणि काही भटके तर सुधारणावादी लोकांनी चळवळी सुरू केल्या त्यात एक त्यामध्ये भीमराव जाधव गुरुजी ,बोधन नगरकर, अथर दौलतराव भोसले, लक्ष्मण माने, बाळकृष्ण रेणके, मोतीराज राठोड, भीमराव गस्ती लक्ष्मण गायकवाड, सनातन भोसले, सुधीर अनवले इत्यादी.

शोधनिबंधामध्ये महाराष्ट्रातील रामोशी बेरड या भटक्या विमुक्त जमातींच्या सामाजिक चळवळींचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे :– 1. रामोशी बेरड या भटक्या विमुक्त जमातींच्या चळवळीची उद्दिष्टे जाणून घेणे.

2. रामोशी बेरड या भटक्या विमुक्त जमातींच्या चळवळीचा अध्ययन करणे.

समस्या सूत्रण :– संशोधकाने सदर शोधनिबंधात मध्ये "महाराष्ट्रातील रामोशी बेरड भटक्या विमुक्त जमातींच्या सामाजिक चळवळीचा अभ्यास "या विशयावर शोधनिबंध सादर केला आहे.

अभ्यास पद्धती :– **1. अभ्यास क्षेत्र** –कोल्हापूर, सांगली ,कराड,

सातारा ,सोलापूर

2. संशोधन आराखडा – प्रस्तुत शोधनिबंधात करिता संशोधकाने अन्वेशण आत्मक परिचयात्मक संशोधन आराखडा चा उपयोग केला आहे.

3. नमुना निवड तंत्रे – सदर शोधनिबंधात करिता संशोधकाने स्नोबॉल नमुना निवड पद्धतीच्या माध्यमातून भटक्या–विमुक्तांच्या चळवळीमध्ये कार्यरत असणाऱ्या नेतृत्वाची निवड करून रामोशी बेरड या भटक्या विमुक्त जमातींच्या चळवळी संदर्भातील माहिती मिळवलेली आहे.

4. तथ्य संकलन – सदरील शोधनिबंधा करिता संशोधकाने प्राथमिक आणि दुय्यम माहिती स्त्रोत चा वापर केला आहे.प्राथमिक तथ्य संकलन मध्ये मुलाखत अनुसूची आणि टेप रेकॉर्डिंग या स्त्रोत वापर करण्यात आला आहे .तसेच दुय्यम माहिती संकलना करिता आत्मचरित्रे, गौरव ग्रंथ, वर्तमानपत्रातील लेख , शासकीय दस्तऐवज, इंटरनेट इत्यादी माहिती स्त्रोतचा वापर करण्यात आला आहे.

5. रामोशी–बेरड समाज संघटना आणि चळवळी :– महाराष्ट्रातील रामोशी बेरड या भटक्या विमुक्त जमाती यांच्या काही संघटना महाराष्ट्रात स्थापन करण्यात आल्या. यामधील "नरवीर उमाजी नाईक समाज मंडळमहाराष्ट्र राज्य "या संघटनेचे अध्यक्ष वसंतराव चव्हाण व " बेरड समाज " अध्यक्ष डॉ भीमराव गस्ती यांनी या संघटनेच्या माध्यमातून रामोशी बेरड या भटक्या विमुक्त जमातीच्या समस्या प्रश्न यासाठी 1980 पासून सातत्याने चळवळी केल्या. या संघटनेच्या माध्यमातून रामोशी–बेरड समाजातील समस्या संबंधी,त्यांच्या प्रश्नांसंबंधी काही मागणी, काही उद्दिष्टे मांडण्यात आले. हे उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1) क्रांतिकारी रामोशी–बेरड समाजात अनुसूचीत जमातीमध्ये समावेश करावे .
2) रामोशी–बेरड समाजात गुन्हेगारीच्या नजरेतुन पाहण्यात येऊ नये.
3) जगण्याचे साधन नसलेल्या या जमातीला सरकारी हक्कातील पडीक जमिनी कसण्यासाठी वनीकरण हा करिता देण्यात याव्यात.
4) भारतीय सैन्यदलात बाबा उमाजी नाईक बटालियन सुरू करावी.
5) आद्य क्रांतिवीर उमाजी नाईक यांच्या नावे आर्थिक विकास महामंडळ सुरू करावे व या समाजाचे उत्थान करावे.
6) आद्य क्रांतिवीर उमाजी नाईक ट्रान्सलेट मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा.
7) आद्य क्रांतिवीर उमाजी नाईकांना नाईक यांच्या चित्रपटासाठी अर्थ असा याबाबतचा बिरबल 2008 पासून प्रलंबित असणारा प्रस्ताव तात्काळ मंजूर करावा.
8) विमुक्त भटक्या जमातींच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठीची शिक्षण फी नियमित मिळत नाही, ती तात्काळ मिळावी.
9) पक्ष पातळीवर रामोशी समाजाच्या कार्यकर्त्यांना पक्षाच्या तालुका शहर जिल्हा पातळीवरील कमी त्यामध्ये नेमणुका देण्याबाबत अनुशंगाने तालुका जिल्हा युवक अध्यक्ष यांना तसे कळविण्यात यावे.
10) समाजातील युवकांना विषेश कार्यकारी दंडाधिकारी पदावर पक्षाच्यावतीने नियुक्ती करणे.

वरील मागण्यांच्या संदर्भात या संघटनेच्या माध्यमातून अनेक आंदोलने, मोर्चे, परिशदा ,मेळावे यांचे आयोजन करून या जमातींच्या समस्या कमी होण्यासाठी किंवा त्यांचे निर्मूलन होण्यासाठी सातत्याने प्रयत्न केलेल्या दिसून येतो. या संघटनेच्या माध्यमातून झालेले चळवळी येथे मांडण्याचा प्रयत्नस शोधकाने सदर शोधनिबंधामध्ये केला आहे.

महाराष्ट्रातील रामोशी बेरड भटक्या विमुक्त जमातींच्या चळवळी आढावा पुढील प्रमाणे घेण्यात आला आहे

1) कर्नाटक महाराष्ट्र सीमा भागातील बेरड रामोशी समाजाची परिषद (8,9 मे 1983)
2) बेरड रामोशी परिषद
3) इंग्रजांविरुद्ध लढणारा रामोशी समाज उपेक्षित गीत
4) तहसील कचेरीवर समाजाचा मोर्चा 12 जून 1984 चंदगड कोल्हापूर
5) लोकसंख्येच्या प्रमाणावर आर्थिक तरतूद करावी
6) पेठ वडगाव येथील रामोशी समाजाच्या जमिनीचा प्रश्न कोल्हापूर
7) रामोशी समाजाचा मोर्चा 3 एप्रिल 1995 गडिंग्लज कोल्हापूर
8) पेठवडगाव येथील रामोशी जमिनीची परिषद 4 जून 1995 कोल्हापूर
9) बेरड रामोशी समाजाचा मेळावा 16 व 17 ऑगस्ट 1987 बेळगाव
10) बेरड रामोशी समाजाचे आंदोलनाचे दुसरे पर्व
11) सांगली ते मुंबई पदयात्रा
12) पोलिसांचा महा त्रास थांबवावा याकरिता निवेदन 4 जून 1900 90
13) दलित महासंघ बेरड रामोशी मेळावा 1992 नेसरी कोल्हापूर
14) लक्षवेध मीधरणे आंदोलन दिनांक 20 मे 1996 पुणे
15) रामोशी समाजाचे राज्यव्यापी अधिवेशन दिनांक 25 ऑक्टोंबर 1998 पंढरपूर सोलापूर
16) आद्य क्रांतिकारक म्हणून ' नरवीर उमाजी नाईक ' यांना घोषित करावे 2003
17) आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक अभियान 3 फेब्रुवारी 2009
18) रास्तारोको 13 जानेवारी 2012 वाघवाडी फाटा पुणे
19) हल्ला बोल आंदोलन दिनांक 22 जुलै 2013 मुंबई

रामोशी बेरड समाजाची चळवळ ही महाराष्ट्र सीमाभाग आणि महाराष्ट्र मध्ये प्रामुख्याने डॉ .भीमराव गस्ती विठ्ठल बन्ने आणि वसंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाच्या माध्यमातून सुरुवात झाली .रामोशी बेरड समाजाच्या चळवळी पूर्वी या चळवळीचे नेतृत्व हे भटक्या विमुक्त जमातीच्या अंतर्गत असणाऱ्या नेतृत्वाने केले होते परंतु 1980 च्या नंतर रामोशी समाजाची व बेरड समाजाची स्वतंत्र चळवळ उभी

राहिली. त्यामागील कारणांचा शोध घेत असताना असे आढळून आले की, भटक्या विमुक्त जमातीच्या चळवळी अंतर्गत वर्चस्ववाद यासाठी अनेक गट निर्माण झाली.याचा परिणाम असा दिसून येतो की भटक्या विमुक्त मधील जाती जमातींना असे वाटू लागले, कि या वर्चस्ववादात आपल्या जमातीचे प्रश्न मागे पडतील आणि आपल्या समाजाच्या समस्या जशा आहेत तशाच राहतील. म्हणून आपल्या जमातीच्या प्रश्नांसाठी एक आपली स्वातंत्र चळवळ उभी करण्यात यावी. यातून नरवीर उमाजी नाईक समाज सुधारक मंडळ आणि बेरड समाज संघटनेची निर्मिती झाली. या संघटनेचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की, या संघटना स्थिरस्थावर होत असताना संघटनेचे पुनर्वसन होण्यासाठी महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त नेतृत्वाच्या प्रसिद्धीस आलेल्या चेहऱ्यांचा त्यांनी उपयोग करून घेतला आहे .यामध्ये लक्ष्मण माने यांचे अग्रक्रमाने नाव घेता येईल. अनेक प्रश्नांसाठी व आपल्या समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी आणि आपण संघटित झालो. तर आपल्या जमातीचे प्रश्न मार्गी लागतील या भावनेतून संघटक समाजाला एकत्र बांधत होता. समाजाची उन्नती ही रामोशी समाज ही अनुसूचित जमातीत गेल्याशिवाय होणार नाही. यासाठी संघटनेने प्रयत्नशील राहिलेली दिसून येते. त्याचबरोबर या जमातीवर पडलेल्या गुन्हेगारीचा शिक्का मिटवण्यासाठी या चळवळींना खूप प्रयत्न करावे लागले.कारण एक तर हा समाज उपेक्षित, उदरनिर्वाहाचे साधन नाही ,त्यात गुन्हेगार म्हणून पोलीस छळ करीत, पुरुषांना डांबून ठेवतात. त्यामुळे कुटुंबातील इतर सदस्यांचे उपासमार होत होती रामोशी–बेरड जमातीचे लोक धाडसी व शरीर दणकट त्यामुळे गावकरी त्यांना राखणदार म्हणून ठेवत त्याच बरोबर कसण्यासाठी थोडीबहुत जमीन दिली जात असे. परंतु या जमातीच्या अज्ञानाचा फायदा घेऊन प्रस्थापित समाजाने त्यांच्या जमिनी बळकावल्या. त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. त्यातून रामोशी–बेरड समाजाने या मागण्यांसाठी या चळवळी केल्या त्यामध्ये गुन्हेगारी शिक्का नष्ट व्हावा , समाजाची उन्नतीसाठी जमातींना अनुसूचित जाती जमातींच्या यादीत त्यांचा समावेश करण्यात यावा व त्यांना वतन दिलेल्या जमिनी त्यांना परत मिळाव्यात राहण्यासाठी गायरान जमिनी व कसंण्यासाठी पदीक जमिनी प्राप्त व्हावा, या विविध मागणीसाठी अनेक चळवळी रामोशी–बेरड जमातीने केलेल्या दिसून येतात. नेतृत्वाने जमातीमध्ये एक अस्मिता निर्माण करण्याचा प्रयत्न केला, याकरिता "नरवीर उमाजी नाईक" हा आपला आद्य क्रांतिकारक आहे. तो आपला देव व प्रेरणास्थान आहे. हे लोकांमध्ये रुजविण्यासाठी प्रयत्न चळवळीने केल्या. तसेच शासनाकडे पाठपुरावा करून नरवीर उमाजी नाईक यांना आद्यक्रांतिकारक घोषित करा. "नरवीर उमाजी नाईक" पुण्यतिथी दिवषी लोकांना एकत्र करण्याचे प्रयत्न सुरू झाले. या प्रयत्नाचा यश म्हणून जेजुरी, जि. पुणे येथे नरवीर उमाजी नाईक यांचा पुतळा बसविण्यात आला

निष्कर्श :– रामोशी–बेरड जमातीच्या अनेक चळवळी, अधिवेषन ,मोर्चे ,निवेदने, पत्रके, या अनेक मार्गाने शासनापर्यंत त्यांच्या समस्या पोहोचण्याचा प्रयत्न केला.परंतु या जमातीचा मूळ प्रश्न सुटला नाही. प्रस्थापित संघटना या विशिष्ट पक्षाच्या राज्यआश्रयाला जाऊन बसल्या. संस्थापक अध्यक्ष हा अध्यक्ष पद सोडावयास तयार नाही. तरुण पिढीला प्रस्थापित संघटना, नेतृत्वावर आणि राजकीय पक्षावर विश्वास नव्हता. तरुणांचे असे म्हणणे होते की प्रस्थापित राजकीय पक्ष आपले प्रश्न सोडविणार नाही. आपण इतर पक्षांना आपले प्रश्न समजावून सांगू.परंतु त्यांचे हे म्हणणे संस्थापक अध्यक्ष यांना मान्य नव्हते. याचा परिणाम असा झाला की महाराष्ट्रात आज रामोशी जमातीच्या अनेक संघटना निर्माण झाले आहे. या संघटना वेगवेगळ्या राजकीय पक्षाच्या प्रभावाने प्रभावित होऊन कार्य करीत आहे. उदा– राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस ,भाजपा, शिवसेना अशा विविध पक्षांशी संबंधित या संघटना राहिले आहेत. त्यामुळे समाजाचे विभाजन पर्यायाने या संघटित शक्तीचे ताकतीचे विभाजन झाले आहे . शासन हे दबावाचे ऐकते, राजकीय पक्ष डोक्यांची संख्या मोजते. मात्र या संघटनेची ताकद कमी झाली. कारण समाजाचे विभाजन झाले आणि त्यामुळे संघटनात्मक दबाव कमी झालेला दिसून येतो.आणि त्यामुळे या जमातीचे प्रश्न आज देखील सुटलेली नाहीत. एक गोष्ट मात्र येथे निश्चित सांगता येईल. नेते मात्र मोठी झाले पण त्याच जमातीतील सर्वसामान्य जनता काल होती, तेथेच आज आहे

संदर्भ साहित्य :–

1. *माने लक्ष्मण (1997) विमुक्तायन, प्रकाशन– यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई*
2. *राठोड मोतीराज (1989) भटक्या–विमुक्तांची लढे,संपादित पुस्तक, महाराष्ट्रातील समाज परिवर्तनाच्या दिशा*
3. *महाराष्ट्र शासन पत्र क्र. काय करताय संकीर्ण 2008 यादी प्र .क्र. 553 % मावक–5, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई 400032, दि .26 सप्टेंबर 2008 चे परिपत्रक*
4. *नरवीर उमाजी नाईक समाज मन समाज सुधारक मंडळ महाराष्ट्र राज्य या संघटनेचे अध्यक्ष वसंतराव चव्हाण आणि बेरड समाज अध्यक्ष भीमराव गस्ती यांनी संघटनेच्या माध्यमातून रामोशी–बेरड समाजाच्या समस्या चे परिपत्रक.*
5. *दैनिक सकाळ दि. 08–05–1983*
6. *दैनिक पुढारी दि .12– 05 -1983*
13. *दैनिक सकाळ दि 24–6 - 989*
14. *संघटनेचे निवेदन 04–06 –1990*
15. *दैनिक पुढारी दि. 25–10–1998*
16. *उमाजी नाईक सुधारक मंडळ प्रसिद्धीपत्रक (20 –05 –1996)*
17. *वसंतराव चव्हाण मुलाखत*
18. *भीमराव गस्ती मुलाखत*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

"वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांची सामाजिक स्थिती"

डॉ. राजेंद्र बगाटे,
आयसीएसएसआर, पोस्ट डॉक्टोरल फेलो, समाजशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, तथा
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

★★★

प्रस्तावना :– वृध्दत्व ही मानवी जीवनातील अंतिम, अटळ आणि सार्वत्रिक स्वरुपाची घटना आहे. सातत्याने वाढत जाणारी वृध्दांची लोकसंख्या हे जागतिक लोकसंख्येचे वौशिष्ट्यो आहे. म्हणजेच लोकसंख्या वाढत जात आहे तसतशी वृध्दांच्या लोकसंख्येतही वाढ होत आहे. घटता जन्मदर व मृत्यूदर यामुळे वृध्दांचे प्रमाण वाढत आहे. या वाढत्या वृध्दांच्या लोकसंख्येमुळे वृध्द ही समस्या निर्माण झाली आहे. "एकविसाव्या शतकाची सगळ्यात मोठी खूण म्हणजे हे शतक वयोवर्धनाचे आहे."[1] म्हणजेच या शतकात वृध्दांच्या लोकसंख्येत मोठ्याा प्रमाणात वाढ होणार आहे. "संयुक्त राष्ट्र संघाने केलेल्या पाहणीनुसार भारतात इ.स. 2025 साली ज्येष्ठ लोकांची संख्या 17 कोटी 74 लाख होईल. ही संख्या जगातील ज्येष्ठ लोकांच्या 15 टक्के इतकी असेल. आता जगातील 60 टक्के ज्येष्ठ नागरिक विकसनशील देशात राहतात." लोकसंख्या संक्रमणामुळे देशाला जसा लोकसांख्यिकी लाभांशाचा फायदा होतो, अगदी तसेच कालांतराने नवीन आव्हानांना देखिल सामोरे जावे लागते. या अनेक आव्हानांपैकी लोकसंख्येतील वृध्दांचे वाढते प्रमाण हे एक महत्वाचे आव्हान आहे.

"जगात इ. स. 2019 मध्ये एकूण 70 कोटी वृद्ध लोक राहत आहेत . याचाच अर्थ म्हणजे आज वृध्दांची संख्या 10 टक्के आहे. इ. स. 2050 मध्ये जगात एकूण 150 कोटी वृद्ध असतील." "2011 च्या जनगणनेनुसार भारतामध्ये 10 कोटी ज्येष्ठ–वृध्द (60 वर्शावरील) जनता आहे, तर सध्या देशामध्ये 12 कोटी वृध्द असून पुढील 15 वर्शात म्हणजेच 2030 मध्ये ही संख्या 30 कोटीच्या घरात जाणार आहे." आज आरोग्याच्या दृष्टीने विज्ञानाने अनेक रोगावर मात केलेली आहे. त्याचाच परिणाम म्हणजे आज मनुष्याचे आयुर्मान वाढलेले आढळते. एकीकडे ही जरी चांगली बाब असली तरी आज नव्याने वृध्दत्व ही समस्या निर्माण झाली आहे. कारण वृध्दापकाळी या वृध्दांची सुश्रुशा कोण करणार? त्यांची काळजी कोण घेणार? हा मोठा प्रश्न आज कुटुंबासमोर निर्माण झाला आहे. यामुळे कुटुंबामध्ये सतत वाद होऊन वृध्दांना वाईट वागणूकीला सामोरे जावे लागत आहे. त्यांच बरोबर वृध्दत्वातून वृध्दांच्या समस्याही निर्माण झाल्या आहेत. यातूनच त्यांना एकलकोंडे जिवन जगावे लागत आहे किंवा घरदार सोडून त्यांना वृध्दाश्रमात राहावे लागत आहे. "इ. स. 1950 मध्ये भारतात मनुष्याचे आयुर्मान हे 41 वर्श होते. 1990 मध्ये ते 62 वर्षापर्यत वाढलेले असून इ.स. 2021 मध्ये 70 वर्षापर्यत जाईल. सध्या जगातील एकूण 20 देशातील मनुष्याचे आयुर्मान हे 72 वर्ष आहे. आजच काही प्रगत राष्ट्रांतील वृध्दांची संख्या ही एकूण लोकसंख्येच्या 20 टक्क्यांपर्यत वाढलेली आहे." त्यामुळे वृध्दांचा प्रश्न, त्यांच्या समस्या गंभीर होत आहेत. त्या सोडविण्याकडे लक्ष जावे आणि वृध्दांचे आयुश्य आनंदमय चौतन्यमय व्हावे यासाठी प्रत्येक राष्ट्राने, त्या दिशेने कार्य करण्याची गरज आहे. वयोवर्धन (Aging) ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. जन्माला येणारा प्रत्येक माणूस जन्मल्यापासून वार्धक्याच्या दिशेने वाटचाल करतच असतो. परंतु "ज्यावेळी जगातील लोकसंख्येमध्ये ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण वाढू लागले त्यावेळेला या प्रश्नाची दखल राज्यकत्यांनी विषेशतः नियोजन मंडळाने आणि सामाजिक कार्यकत्यांनी घेतली. वयोवर्धन हा काही केवळ सामाजिक प्रश्न नाही, तर आजच्या राज्यकत्यांपुढे असणारे ते एक मोठेच आव्हान आहे. "म्हणून आज वृध्दांकडे लक्ष देण्याची गरज आहे. "वयोवर्धन हा केवळ संख्याशास्त्राचा विशय नाही, तो आपल्या संस्कृतीशी संबंधित आहे. इतकेच नव्हे तर हा विषय भारताच्या विकासाचीही प्रत्यक्षपणे जोडलेला आहे. प्रत्येक समाजामध्ये त्या समाजातील ज्येष्ठांना कसे वागविले जाते, हे त्या त्या समाजाची सांस्कृतिक पातळी दाखविणारे महत्वाचे गमक आहे." एकूण विचार करता असे दिसते की, "कोणताही ज्येष्ठ माणूस त्याला जर आर्थिक संरक्षण नसेल किंवा त्याला समाजात सामावून घेतले जात नसेल तर अशी ज्येष्ठ माणसे एकटी पडतात आणि त्यांचे आयुष्य म्हणजे केवळ एक हेतुहीन अस्तित्व, केवळ वनस्पतीसम जीवन किंवा एक प्रकारे ते त्यांचे सामाजिक मरणच होते. जशी वर्षे जातात, तसतसे आपले सहकारी, सहयोगी काळाच्या पडद्याआड जातात. सामाजिक संबंध तुटत जातात, आपल्या सुखदुःखाची वाटणी करायला किंवा सुखदुःखाच्या चार गोष्टी बोलायला कोणी उरत नाही. आणि अशा वेळी ही ज्येष्ठ माणसे स्वतःला घरावरचा किंवा समाजावरचा आपण बोजा आहोत असे मानू लागतात. त्यांना वाटते की, आपला समाजाला कुठलाच उपयोग नाही, आपण मरत नाही म्हणून जगतो आहोत, एक प्रकारचे परावलंबी, घरावरचे व समाजावरचे ओझे होऊन जीवन जगतो आहोत." याच्या उलट आज वाढते आयुर्मान किंवा दीर्घायुपणा ही मानव जातीच्या दृटीने एक प्रचंड महत्वाच्या विजयाची निशाणी आहे. "वाढते तंत्रज्ञान, वौद्यकीय संशोधनाने घेतलेली झेप, नवनव्या औशधांचे शोध, त्यामुळे वयोवर्धन आणि दीर्घायुपणा ही या नव्या युगाची एक नांदीच आहे. पण वाढलेल्या या वयाचा उपयोग समाजाला होतो का? या दृष्टीने ज्येष्ठांच्या प्रश्नांकडे सारे जग आता बघत

आहे. या मनुष्यबळाचा समाजविकासाच्या दृष्टीने कसा उपयोग करता येईल किंवा अनुभवाच्या या प्रचंड खजिन्याचा समाजाच्या सुखासाठी कसा उपयोग करून घेता येईल? आपण आपल्या जीवनात केवळ वर्षे वाढवतो, का त्या वाढलेल्या वर्षाना जीवनाची चेतना देतो ? असा विचार आज जगभर सुरू झाला आहे" या दृष्टीने वयोवर्धनाचे आव्हान समाजाला कसे स्विकारता येईल, ज्येष्ठांचा सामाजिक सहभाग कसा वाढेल आणि त्यांचे आयुष्य सुखद कसे होईल याचा विचार केला जात आहे.

आधुनिक भारतातील 'वृध्दांची समस्या' ही एक ज्वलंत समस्या आहे. "भारतीय समाजात संयुक्त कुटुंबाचा होत आलेला ऱ्हास आणि अर्थव्यवस्थेतील परिवर्तनातून ही एक नविन समस्या निर्माण झाली. या समस्येची तिव्रता भारतासोबतच चिनसारख्या देशालाही जाणवत आहे. नवीन नवीन उपाययोजना वृध्दांसाठी योजण्याचा कार्यक्रम सुरूवात झालेला आहे. वृध्दांचा प्रश्न प्राचीन काळात नव्हता, कारण वृध्द हे वय कुटुंबाचे संरक्षण करीत होते. भारतात एकोणीसाव्या शतकापर्यंत वृध्दांसंबधी कोणताही प्रश्न नव्हता परंतु 21व्या शतकात मात्र वृध्दांच्या समस्येसंबंधी, वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, नियतकालीके, त्रौमासिके इत्यादीत वृध्दांच्या समस्या मांडल्या जात आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर या प्रश्नाचे विवेचन होत आहे. अमेरिका, इंग्लड, फ्रान्स, डेन्मार्क, रशिया इत्यादी देशात वृध्दांची समस्या अनेक शतकांपासून आजतागायत अस्तित्वात आहे. म्हणून त्या देशात वृध्दाश्रम, वृध्दत्व वेतन, वृध्द सहाय्यता इत्यादी कार्यक्रम घेण्यात येतात. वृध्दांची समस्या आता केवळ एकाच देशाची नसून ही एक जागतिक समस्या निर्माण झालेली आहे." म्हणूनच या समस्येकडे लक्ष देण्याची गरज आहे.

वृध्दांच्या समस्येचे जागतिक स्वरूप लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्र संघाने 1999 हे आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ लोकांचे वर्ष म्हणून घोषित केले होते. लोकांचे लक्ष ह्या समस्येकडे वेधले जाऊन त्या संदर्भात निश्चित योजनांची आखणी व कार्यान्विकारण व्हावे असा उद्देश त्यामागे होता. "भारतात ज्येष्ठ लोकांचा प्रश्न शहर महानगरात प्रकर्शाने दिसतो. परंतु आता ग्रामीण समुदायातही ह्या समस्येचे गांभीर्य वाढलेले आहे. एकट्याा ज्येष्ठ व्यक्तींचा प्रश्न ग्रामीण क्षेत्रात प्रत्ययास येत नाही. मात्र शहरी समुदायात एकट्याा वृध्दांचा प्रश्न जटिल झाला आहे." यामुळे वृध्दांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.

प्राचीन भारतीय समाजात संयुक्त कुटुंब व्यवस्था अस्तित्वात होती. तरुण व्यक्तीला प्रसंगानुरुप उपदेश व मार्गदर्शन वृध्द व्यक्तीलाच करावे लागत असे. त्यामुळेच कुटुंबाला वृध्दांचा आणि वृध्दांना कुटुंबाचा आधार होता. तरुण पिढी अर्थार्जनाचे काम करत असल्यामुळे वृध्दांच्या मार्गदर्शनाचा, अनुभवाचा, उपदेशाचा उपयोग या तरुण पिढीला होत असे. परंतु आज जागतिकीकरण, आधुनिकीकरण, औद्योगिकरण व तसेच नागरीकरणामुळे संयुक्त कुटुंबपध्दतीत अमुलाग्र बदल होऊन विभक्त कुटुंब व्यवस्था अस्तित्वात आली. विभक्त कुटुंबात पती–पत्नी व त्यांची अविवाहित मुले राहत असल्याने वृध्दांची त्यांना अडचण वाटु लागली आहे. शिक्षणाच्या प्रसारामुळे वय किंवा वृध्द या घटकांपेक्षा गुणवत्ता पात्रता आणि प्राविण्यता यांना महत्व प्राप्त झाले त्यामुळे वृध्दांचे महत्व, कमी होऊन त्यांच्यावर वृध्दाश्रमात राहण्याची वेळ येत आहे.

वृध्दाश्रम म्हणजे काय :–"वृध्दाश्रम हे अशा प्रकारचे रहिवाशी केंद्र असते की ज्यामध्ये 60 वर्षापेक्षा अधिक वय असणाऱ्या किमान 25 व्यक्तींची सोय केली जाते. निवाऱ्याची गरज असणाऱ्या अल्प व मध्यम उत्पन्न गटातील वृध्द व्यक्तींनाही वृध्दाश्रमात प्रवेश दिला जातो."

संशोधनाची उद्दिष्टे : 1. वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांच्या वौयक्तिक स्थितीचा अभ्यास करणे. 2. वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांची सामाजिक स्थिती जाणून घेणे.

गृहितकृत्ये:– 1. वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांची सामाजिक स्थिती वाईट आहे. 2. वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांना सामाजिक समस्या भेडसावतात.

संशोधनाचे अध्ययन क्षेत्र : प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र हे महाराष्ट्रातील मराठवाडा विभाग एवढेच मर्यादीत करण्यात आलेले आहे.

संशोधन आराखडा : प्रस्तुत संशोधनामध्ये **'वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा'** अवलंब करण्यात आला आहे.

नमुना निवड पध्दती : मराठवाडा विभागात सद्यास्थितीत सुरू असलेल्या एकूण दहा वृध्दाश्रामांमध्ये राहणाऱ्या एकूण 400 वृध्दांपौकी 50 टक्के म्हणजेच 200 उत्तरदात्यांची **'सहेतुक नमुना निवड पध्दतीचा'** वापर करून संशोधनासाठी नमुना म्हणून निवड केलेली असून हे तथ्य संकलन ऑक्टोबर ते डिसेंबर 2014 मध्ये करण्यात आलेले आहे.

तथ्य संकलनाच्या पध्दती

1) प्राथमिक स्त्रोत : प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासकार्यासाठी तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्त्रोतामध्ये **'मुलाखत अनुसूची'** या साधनांचा उपयोग केला आहे.

2) दुय्यम स्त्रोत : दुय्यम स्त्रोतांमध्ये संशोधन विशयाच्या अनुशंगाने प्रकाशित व अप्रकाशित लिखान, वर्तमानपत्रे, साप्ताहीके, मासिके, वेगवेगळे अहवाल, इंटरनेट इत्यादी उपलब्ध स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांची वयौक्तिक व सामाजिक स्थिती कशी आहे हे शोधण्याचा प्रयत्न केलेला असून हे पुढील माहितीवरून अधिक स्पष्ट होईल.

तक्ता क्र. 1. वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्द उत्तरदात्यांची वैयक्तिक माहिती

(एकूण 200 उत्तरदाते, मराठवाडा विभाग, ऑक्टोबर – डिसेंबर 2014.)

तक्त्यांचे क्र.	तक्त्यांचे	पर्याय	वृध्दांची	टक्केवारी
1.1	वृध्द उत्तरदात्यांचा वयोगट	60–69 वर्ष	51	25.50
		70–79 वर्ष		7939.50
		80–89 वर्ष	58	29.00
		90 पेक्षा जास्त वर्ष	12	06.00
1.2	वृध्द उत्तरदात्यांचे लिंग	स्त्री	111	55.50
		पुरुष	89	44.50
1.3	वृध्द उत्तरदात्यांचे शिक्षण	अशिक्षित	94	47.00
		प्राथमिक	51	25.50
		माध्यमिक	37	18.50
		उच्च माध्यमिक	06	03.00
		पदवी	06	03.00
		पदव्यूत्तर	04	02.00
		प्रौढ शिक्षित	02	01.00
1.4	वृध्द उत्तरदात्यांचा वैवाहिक दर्जा	अविवाहित	08	04.00
		विवाहित	50	25.00
		विधवा	94	47.00
		विधुर	47	23.50
		घटस्फोटित	01	00.50
1.5	वृध्द उत्तरदात्यांचा जात प्रवर्ग	खुला	119	59.50
		अनुसूचित जाती	21	10.50
		इतर मागास प्रवर्ग	36	18.00
		भटक्याविमुक्त जाती/जमाती	22	11.00
		विषेश मागास प्रवर्ग	02	01.00
1.6	वृध्द उत्तरदात्यांचा धर्म	हिन्दु	169	84.50
		बौध्द	13	06.50
		जौन	09	04.50
		षिख	08	04.00
		ख्रिष्चन	01	00.50
		एकूण	**200**	**100.00**

सदरील तक्ता क्र. 1.1 वरुन असे दिसते की, '60 ते 69 वर्षे' या 'तरुण वृध्द' (Young Old) वयोगटातील 25.50 टक्के वृध्द उत्तरदाते आहेत. तर '70 ते 79 वर्ष' या 'मध्यम वृध्द' (Middel Old) वयोगटातील 39.50 टक्के वृध्द उत्तरदाते आहेत. तर '80 ते 89 वर्षे' या 'वृध्द–वृध्द' (Old & Old) वयोगटातील 29 टक्के वृध्द उत्तरदाते आहेत. तर 90 व त्यापेक्षा जास्त वर्षे' या 'अतिशय वृध्द' (Oldest Old) वयोगटातील 06 टक्के वृध्द उत्तरदाते असलेले दिसून येतात. यावरून आपणास असे म्हणता येईल की वैद्यकीय क्षेत्रातील नवनवीन संशोधने, शासनाची कल्याणकारी राज्याची संकल्पना यामुळे आज जन्मदरात व मृत्युदरात घट होत असल्यामुळे आज व्यक्तीची आयुर्मयादा दिवसेंदिवस वाढतांना दिसत आहे आणि ती येत्या काळात सतत वाढतच राहणार आहे हे आपल्याला वरीलप्रमाणे दिसून येते. तसेच तक्ता क्र. 1.2 चा विचार करता असे दिसते की, 55.50 टक्के 'स्त्री' उत्तरदात्या असून 44.50 टक्के उत्तरदाते 'पुरुष' असलेले दिसून येतात. म्हणजेच वृध्दाश्रमात राहणाऱ्या एकूण वृध्दांमध्ये पुरूषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. तर तक्ता क्र. 1.3 चा विचार करता असे स्पष्ट होते की, अशिक्षित 47 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण प्राथमिक 25.50 टक्के, माध्यमिक 18. 50 टक्के, उच्च माध्यमिक व पदवी अनुक्रमे 3 टक्के, पदव्यूत्तर 2 टक्के आणि प्रौढ शिक्षित 1 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात सर्वाधिक आहे. यावरून असे म्हणता येते की, जसजसा शिक्षणाचा स्तर उंचावत जातो तसतसे वृध्दामधील शिक्षणाचे प्रमाण कमी असलेले दिसून येते. तर तक्ता क्र. 1.4 वरून असे दिसते की, 'अविवाहित' वृध्द उत्तरदात्यांचे शेकडा प्रमाण 04 टक्के एवढे आहे. तर 'विवाहित' वृध्द उत्तरदात्यांचे शेकडा प्रमाण 25 टक्के एवढे आहे, तर 70.50 टक्के वृध्द उत्तरदात्यांच्या जोडीदारांचा मृत्यू झालेला असून त्यामध्ये 47 टक्के 'विधवा' असून 23.50 टक्के विधुर असलेले दिसतात, तर 1 वृध्द उत्तरदाता घटस्फोटित आढळला असून त्याचे एकूण उत्तरदात्यांशी शेकडा प्रमाण 0.50 टक्के इतके आहे. वरील तक्त्याचा विचार करता असे दिसते की, 'विवाहित' वृध्द उत्तरदाते 96 टक्के असून हे प्रमाण 'अविवाहित' 04 टक्के उत्तरदात्यापेक्षा अधिक आहे. यावरून आपणास असे दिसते की, भारतीय समाजामध्ये विवाह करणे अनिवार्य मानलेले आहे. यावरून आपणास विवाहाची अनिवार्यता हे भारतीय समाजाचे वौशिष्टय स्पष्ट होते. तसेच तक्ता क्र. 1.5 वरून असे दिसते की, 'खुल्या' प्रवर्गातील वृध्द उत्तरदात्यांचे प्रमाण 59.50 टक्के आहे, तर 'अनुसूचित जाती' प्रवर्गातील वृध्द उत्तरदात्यांचे प्रमाण 10.50 टक्के आहे, तर 'इतर मागास' प्रवर्गातील वृध्द उत्तरदात्यांचे प्रमाण 18 टक्के एवढे आहे, तर 'भटक्या विमुक्त जाती जमाती' या प्रवर्गातील वृध्द उत्तरदात्यांचे प्रमाण 11 टक्के एवढे आहे तर 'विषेश मागास' प्रवर्गातील वृध्द उत्तरदात्यांचे प्रमाण 01 टक्का एवढे असून 'अनुसूचित जमाती' या प्रवर्गातील एकही उत्तरदाता वृध्दाश्रमात राहत असलेला आढळला नाही. तसेच तक्ता क्र. 1.6 चा विचार करता असे दिसते की, 'हिंदू' या धर्मातील सर्वाधिक म्हणजेच 84.50 टक्के वृध्द उत्तरदाते असून हे प्रमाण 'बौध्द' 06.50 टक्के, जैन 04.50 टक्के, सिख 04.00 टक्के व ख्रिश्चन 0.50 टक्के या सर्व धर्मातील उत्तरदात्यांच्या प्रमाणात सर्वाधिक आहे. हे प्रमाण जास्त असण्याचे कारण म्हणजे मराठवाड्याात 'हिंदू' धर्मीयांची लोकसंख्या सर्वाधिक असल्यामुळे वृध्दाश्रमात राहण्याचे प्रमाणही 'हिंदू' धर्मीयांमध्ये अधिक असणे साहजिकच आहे.

तक्ता क्र. 2 वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्द उत्तरदात्यांची सामाजिक स्थिती

(एकूण 200 उत्तरदाते, मराठवाडा विभाग, ऑक्टोबर – डिसेंबर 2014.)

तक्त्यांचे क्र.	तक्त्यांचे शिर्शक	पर्याय	वृध्दांची संख्या	टक्केवारी
2.1	**वृध्द उत्तरदात्यांची मित्रमंडळी कोण आहेत.**	समान आवड असणारे	127	63.50
		एकाच खोलीत राहणारे	59	29.50
		सम व्यावसायिक	07	3.50
		कोणीच नाही	07	3.50
2.2	**वृध्द उत्तरदात्यांना मित्रमंडळीकडून काय अपेक्षित आहे.**	सुख दुःखात सहभागी व्हाव	59	29.5
		आपले दुःख यातना,	90	45.00
		समस्या जाणून घ्याव्यात	90	45.00
		वेळोवेळी मदत	43	21.50

		सुख दुःखात सहभागी व्हावं + आपले दुःख यातना, समस्या जाणून घ्याव्यात	100.	50
		कोणीच मित्रमंडळी नसल्यामुळे लागू नाही	7	3.50
2.3	वृध्दाश्रमामध्ये अपमानास्पद वागणूक मिळते असे वाटते का.	होय	155	77.50
		नाही	45	22.50
2.4	वृध्दाश्रमातील मित्र सुख दु. सहभागी होतात का	होय	133	66.50
		नाही	67	33.50
2.5	वृध्दाश्रमात तब्बेतीची कोण काळजी घेते	जोडीदार	19	09.50
		कर्मचारी	20	10.00
		मित्र	63	31.50
		मुलगी	1	00.50
		कोणीच नाही	97	48.50
2.6	वृध्दाश्रमातील वृध्दांसोबत डॉक्टर योग्य पध्दतीने	होय	98	49.00
		नाही	102	51.00
	डॉक्टर योग्य पध्दतीने	होय	98	49.00
		नाही	102	51.00
2.7	प्रकृती चांगली रहावी यासाठी योग्य ती काळजी घेतली जाते का.	होय	40	20.00
		नाही	160	80.00
2.8	आवडीचे व पाचक अन्न दिले जाते का.	होय	12	06.00
		नाही	188	94.00
2.9	कुटुंबातील सदस्य उत्तरदा कोण कोणत्या सण समालग्न घरी घेउन जातात.	दिवाळी	8	04.00
		समारंभ	13	06.50
		वाढदिवस	4	02.00
		दिवाळी + लग्न समारंभ5	02.	50
		घेउन जात नाहीत	119	59.50
		कुटुंबच नसल्यामुळे लागू नाही	51	25.50
2.10	वृध्दांना कोणकोणत्या सामाजिक समस्या भेडसावत आहेत	समाजिक मानसन्मान कमी झाला असे वाटते	67	33.50
		एकाकीपणात वाढ	80	40.00
		मनात सामाजिक असुरक्षिततेची भावना निर्माण होते.	32	16.00

		कर्जबाजारीपणात वाढ	2	01.00
		न्यूनगंडाची भावना प्रबळ बनणे	10	05.00
		मनात सामाजिक असुरक्षिततेची भावना निर्माण होते + न्यूनगंडाची भावना प्रबळ बनणे	1	00.50
		एकाकीपणातवाढ + न्यूनगंडाची भावना प्रबळ बनणे	3 01.50	
		समाजिक मानसन्मान कमी झाला असे वाटते + एकाकीपणात वाढ	3	01.50
		कोणतीच नाही	2	01.00
2.11	**वृध्दाश्रमात असलेल्या करमणूकीच्या साधनांचा वापर करण्याची वृध्दांना परवानगी आहे का.**	होय	70	35.00
		नाही	75	37.50
		लागु नाही	55	27.50
2.12	**वृध्दाश्रमातीलकर्मचाऱ्यांसोबत वृध्दांचे संबंध कसे आहेत.**	प्रेम	15	07.50
		तिरस्कार	135	67.50
2.13	**कर्मचारी वृध्दांबरोबर उपकार केल्यासारखे वागतात का.**	होय	187	93.50
		नाही	13	6.50
2.14	**वृध्दाश्रमात वृध्दांच्या सर्व गरजा भागविल्या जातात का.**	होय	23	11.50
		नाही	177	88.50
2.15	**वृध्दाश्रमातील व्यवस्थापना कडून वृध्दांच्या तकारीचे निवारण केले जाते का**	होय	20	10.00
		नाही	180	90.00
	एकूण		**200**	**100.00**

वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांची सामाजिक स्थिती अभ्यासत असतांना सदरील तक्ता क्र. 2.1 वरून असे दिसते की, समान आवड असणारे आमचे मित्र आहेत असे उत्तर देणारे 63.50 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण एकाच खोलीत राहणारे 29.50 टक्के, समव्यावसायिक 3.50 टक्के आणि आमचे कोणीच मित्र नाहीत असे उत्तर देणाऱ्या 3.50 टक्के उत्तरदात्यांपेक्षा आधिक आहे. तसेच वरील तक्ता क्र. 2.2 वरून असे स्पश्ट होते की, आमच्या मित्रांनी आमच्या दुःख यातना, समस्या जाणून घ्याव्यात असे अपेक्षित आहे असे उत्तर देणारे 45 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण मित्रांनी आमच्या सुख दुःखात सहभागी व्हावं 29.50 टक्के, वेळोवेळी मदत करावी 21.50 टक्के, सुख दुःखात सहभागी व्हावं + आपले दुःख यातना, समस्या जाणून घ्याव्यात 0.50 टक्के उत्तरदात्यांपेक्षा अधिक आहे. तसेच तक्ता क्र. 2.3 वरून असे स्पष्ट होते की, आम्हाला वृध्दाश्रमात राहत असतांना अपमानास्पद वागणूक मिळत आहे असे वाटते असे उत्तर देणारे 77. 50 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आम्हाला वृध्दाश्रमात अपमानास्पद वागणूक मिळत नाही असे उत्तर देणाऱ्या 22.50 टक्के उत्तरदात्यांपेक्षा अधिक आहे. वरून असे स्पष्ट होते की वृध्दाश्रमात सुध्दा वृध्दांना कुटुंबाप्रमाणेच अपमानास्पद वागणूकीला सामोरे जावे लागत आहे. तसेच तक्ता क्र. 2.4 वरून असे दिसते की, वृध्दाश्रमातील मित्र आमच्या सुख दुःखात सहभागी होतात असे उत्तर देणारे 66.50 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण वृध्दाश्रमातील मित्र आमच्या सुख दुःखात सहभागी होत नाहीत असे उत्तर देणाऱ्या 33.50 टक्के

उत्तरदात्यांच्या प्रमाणात आधिक आहे. वरून असे दिसते की वृध्दाश्रमातील सर्व वृध्दांचे सुख दुःखात जवळपास सारखेच असल्यामुळे ते एकमेकांच्या सुख दुःखात सहभागी होतात. तसेच तक्ता क्र. 2.5 वरून असे दिसते की, वृध्दाश्रमात राहत असतांना आमच्या तब्बेतीची कोणीच काळजी घेत नाही असे उत्तर देणारे 48.50 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आमच्या तब्बेतीची काळजी आमचा जोडीदार घेतो असे उत्तर देणाऱ्या 9.50 टक्के, तब्बेतीची काळजी कर्मचारी घेतात असे उत्तर देणाऱ्या 10 टक्के, मित्र काळजी घेतात असे उत्तर देणाऱ्या 31.50 टक्के आणि मुलगी काळजी घेते असे उत्तर देणाऱ्या 0.50 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. तसेच तक्ता क्र. 2.6 वरून असे दिसते की, आमच्या सोबत डॉक्टर योग्य पध्दतीने बोलत नाहीत असे उत्तर देणारे 51 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आमच्या सोबत डॉक्टर योग्य पध्दतीने बोलतात असे उत्तर देणाऱ्या 49 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. वरून असे स्पश्ट होते की वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांसोबत डॉक्टरसुध्दा योग्य पध्दतीने बोलत नाहीत. तसेच तक्ता क्र. 2.7 वरून असे दिसते की, आमची प्रकृती चांगली राहावी यासाठी वृध्दाश्रमात योग्य ती काळजी घेतली जात नाही असे उत्तर देणारे 80 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आमची प्रकृती चांगली राहावी यासाठी वृध्दाश्रमात योग्य ती काळजी घेतली जाते असे उत्तर देणाऱ्या 20 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. या वरून आपणास असे म्हणता येईल की वृध्दाश्रमात वृध्दांच्या प्रकृतीची योग्य ती काळजी घेतली जात नाही. तसेच तक्ता क्र. 2.8 वरून असे दिसते की, वृध्दाश्रमात आम्हाला आमच्या आवडीचे व पाचक अन्न दिले जात नाही असे उत्तर देणारे 94 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण वृध्दाश्रमात आम्हाला आमच्या आवडीचे व पाचक अन्न दिले जाते असे उत्तर देणाऱ्या 6 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. यावरुन असा निष्कर्श निघतो की, वृध्दाश्रमात वृध्दांना त्यांच्या आवडीचे व पाचक अन्न दिले जात नाही. तसेच तक्ता क्र. 2.9 वरून असे दिसते की, आमच्या कुटुंबातील सदस्य आम्हाला कोणत्याच सण समारंभाला घरी घेवून जात नाहीत असे उत्तर देणारे 59.50 उत्तरदाते असून हे प्रमाण आम्हाला आमचे कुटुंबिय दिवाळीला घरी घवून जातात असे उत्तर देणारे 4 टक्के, लग्न समारंभाला घेवून जातात असे उत्तर देणारे 6.50 टक्के, वाढदिवसाला घेवून जातात असे उत्तर देणारे 2 टक्के, दिवाळी व लग्न समारंभाला घरी घेवून जातात असे उत्तर देणाऱ्या 2.50 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. यावरुन असे स्पष्ट होते की वृध्दाश्रमात राहत असणाऱ्या वृध्दांना सण समारंभाला सुध्दा घरी नेले जात नाही. तसेच तक्ता क्र. 2.10 यावरुन असे स्पष्ट होते की, वृध्दत्वामुळे एकाकीपणात वाढ झाली आहे असे आम्हाला वाटते असे उत्तर देणारे 40 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण सामाजिक मानसन्मान कमी झाला असे वाटते असे उत्तर देणारे 33.50 टक्के, मनात सामाजिक असुरक्षिततेची भावना निर्माण होते असे उत्तर देणारे 16 टक्के, कर्जबाजारीपणात वाढ होत आहे असे उत्तर देणारे 1 टक्का, न्यूनगंडाची भावना प्रबळ बनत आहे असे उत्तर देणारे 5 टक्के, मनात सामाजिक असुरक्षिततेची भावना निर्माण होते व न्यूनगंडाची भावना प्रबळ बनत आहे असे उत्तर देणारे 0.50 टक्के, एकाकीपणात वाढ व न्यूनगंडाची भावना प्रबळ बनणे आणि समाजिक मानसन्मान कमी झााला असे वाटते व एकाकीपणात वाढ या सामाजिक समस्या भेडसावत आहेत असे म्हणणारे प्रत्येकी 1.50 टक्के तर आम्हाला कोणतीच सामाजिक समस्या भेडसावत नाही असे उत्तर देणाऱ्या 1 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात सर्वाधिक आहे. यावरुन आपणास असे म्हणता येते की वार्धक्यात व्यक्तीला कोणत्याना कोणत्या सामाजिक समस्या भेडसावत असतात आणि धावपळीच्या जीवनामुळे त्यांच्यामध्ये एकाकीपणात वाढ होत आहे. तसेच तक्ता क्र. 2.11 वरुन असे स्पष्ट होते की, वृध्दाश्रमामध्ये असलेल्या करमणूकीच्या साधनांचा आम्हाला वापर करण्याची परवानगी नाही असे उत्तर देणारे 37.50 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आम्हाला परवानगी आहे असे उत्तर देणाऱ्या 35 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. तसेच तक्ता क्र. 2.12 वरुन असे स्पष्ट होते की, वृध्दाश्रमातील कर्मचाऱ्यांसोबत आमचे तिरस्काराचे संबंध आहेत असे उत्तर देणारे 67.50 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण वृध्दाश्रमातील कर्मचाऱ्यांसोबत आमचे प्रेमाचे संबंध आहेत असे उत्तर देणारे 7.50 टक्के, आपुलकीचे संबंध आहेत असे उत्तर देणारे 8 टक्के, रागाचे संबंध आहेत असे उत्तर देणाऱ्या 17 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. तसेच तक्ता क्र. 2.13 वरुन असे स्पष्ट होते की, वृध्दाश्रमातील कर्मचारी आमच्याबरोबर उपकार केल्यासारखे वागतात असे उत्तर देणारे 93.50 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण कर्मचारी उपकार केल्यासारखे वागत नाहीत असे उत्तर देणाऱ्या 6.50 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. यावरुन असे म्हणता येते की वृध्दाश्रमामध्ये सुध्दा वृध्दांना कर्मचाऱ्यांकडून दुय्यम वागणूक मिळत असलेली दिसते. तसेच तक्ता क्र. 2.14 वरुन असे स्पष्ट होते की, वृध्दाश्रमामध्ये आमच्या सर्व गरजा भागविल्या जात नाहीत असे उत्तर देणारे 88.50 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आमच्या सर्व गरजा भागविल्या जातात असे उत्तर देणाऱ्या 11.50 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. यावरुन असे स्पष्ट होते की वृध्दाश्रमामध्ये सुध्दा वृध्दांच्या सर्व गरजांची पुर्तता होत नसलेली दिसते. तसेच तक्ता क्र. 2.15 वरुन असे स्पष्ट होते की, वृध्दाश्रम व्यवस्थापनाकडून आमच्या तक्रारींचे निवारण केले जात नाही असे उत्तर देणारे 90 टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आमच्या तक्रारींचे निवारण केले जाते असे उत्तर देणाऱ्या 10 टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. यावरुन असे स्पष्ट होते की वृध्दांच्या तक्रारींची वृध्दाश्रमांमध्ये सुध्दा दखल घेतली जात नसून त्यांना कुटुंबाप्रमाणेच दुय्यम वागणूक दिली जाते.

निष्कर्ष:–

1. वृध्दाश्रमात राहणाऱ्यावृध्दांमध्ये 70–79 वर्षे या मध्यम वृध्द (Middle Age) वयोगटातील उत्तरदाते सर्वाधिक म्हणजेच 39. 50 टक्के आहेत.
2. वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांमध्ये स्त्री वृध्दांचे प्रमाण अधिक म्हणजेच 55.50 टक्के एवढे आहे.
3. वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांमध्ये हिंदू धर्मियांचे व खुल्या प्रवर्गातील उत्तरदात्यांचे प्रमाण अधिक आहे.
4. वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांमध्ये विवाहित उत्तरदात्यांचे प्रमाण 96 टक्के असून त्यामध्ये विधवांचे प्रमाण अधिक (47 टक्के) आहे.
5. वृध्दाश्रमात राहणाऱ्यावृध्दांमध्ये अशिक्षित वृध्दांचे प्रमाण अधिक आहे.
6. समान आवड असणारे आमचे मित्र आहेत असे उत्तर देणारे सर्वाधिक 63.50 टक्के उत्तरदाते आहेत.
7. आमच्या मित्रांनी आमच्या दुःख यातना, समस्या जाणून घ्याव्यात असे अपेक्षित आहे असे उत्तर देणारे सर्वाधिक उत्तरदाते आहेत.
8. आम्हाला वृध्दाश्रमात राहत असतांना अपमानास्पद वागणूक मिळत आहे असे वाटते असे उत्तर देणारे सर्वाधिक 77.50 टक्के उत्तरदाते आहेत.
9. वृध्दाश्रमातील मित्र आमच्या सुख दुःखात सहभागी होतात असे उत्तर देणारे सर्वाधिक 66.50 टक्के उत्तरदाते आहेत.
10. वृध्दाश्रमात राहत असतांना आमच्या तब्बेतीची कोणीच काळजी घेत नाही असे उत्तर देणारे सर्वाधिक उत्तरदाते आहेत.
11. आमच्या सोबत डॉक्टर योग्य पध्दतीने बोलत नाहीत असे उत्तर देणारे सर्वाधिक 51 टक्के उत्तरदाते आहेत.
12. आमची प्रकृती चांगली राहावी यासाठी वृध्दाश्रमात योग्य ती काळजी घेतली जात नाही असे उत्तर देणारे सर्वाधिक 80 टक्के उत्तरदाते आहेत.
13. वृध्दाश्रमात आम्हाला आमच्या आवडीचे व पाचक अन्न दिले जात नाही असे उत्तर देणारे सर्वाधिक 94 टक्के उत्तरदाते आहेत.
14. आमच्या कुटुंबातील सदस्य आम्हाला कोणत्याच सण समारंभाला घरी घेवून जात नाहीत असे उत्तर देणारे सर्वाधिक 59.50 उत्तरदाते आहेत.
15. वार्धक्यात व्यक्तीला कोणत्याना कोणत्या सामाजिक समस्या भेडसावत असतात आणि धावपळीच्या जीवनामुळे त्यांच्या एकाकीपणात वाढ होत आहे असे उत्तर देणारे सर्वाधिक उत्तरदाते आहेत.
16. वृध्दाश्रमामध्ये असलेल्या करमणूकीच्या साधनांचा आम्हाला वापर करण्याची परवानगी नाही असे उत्तर देणारे सर्वाधिक उत्तरदाते आहेत.
17. वृध्दाश्रमातील कर्मचाऱ्यांसोबत आमचे तिरस्काराचे संबंध आहेत असे उत्तर देणारे सर्वाधिक 67.50 टक्के उत्तरदाते आहेत.
18. वृध्दाश्रमातील कर्मचारी आमच्याबरोबर उपकार केल्यासारखे वागतात असे उत्तर देणारे 93.50 टक्के उत्तरदाते आहेत.
19. वृध्दाश्रमामध्ये आमच्या सर्व गरजा भागविल्या जात नाहीत असे उत्तर देणारे 88.50 टक्के उत्तरदाते आहेत.
20. वृध्दाश्रम व्यवस्थापनाकडून आमच्या तक्रारींचे निवारण केले जात नाही असे उत्तर देणारे 90 टक्के उत्तरदाते आहेत.

अशा प्रकारे प्रस्तुत शोधनिबंधातून वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांची सामाजिक स्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

संदर्भग्रंथ सूची :

1. *गोखले शरच्चंद्र, (2012), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशैली, पुणे, उत्कर्श प्रकाशन, पृ. क्र. 45.*
2. *खडसे भा. कि., (2004), भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, मुंबई, हिमालया पब्लिशिंग हाऊस, पृ क्र. 146.*
3. *United Nations, Department of Economic and Social Affairs Population Division, (2019), 'World Population Ageing 2019 Highlights', New York, United Nations, i`- Ø-05-*
4. *महराष्ट्र टाइम्स, औरंगाबाद, सोमवार, दिनांक, 13 जुलौ 2015, पृ क्र. 05.*
5. *लिमकर सुधाकर, (2005), 'आरोग्य संवाद', औरंगाबाद, संवाद प्रकाषन, पृ क्र. 61.*
6. *गोखले शरच्चंद्र, (2012), समाधानी वार्धक्य, पुणे, उत्कर्श प्रकाशन, पृ. क्र. 05.*
7. *गोखले शरच्चंद्र, (2012), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशैली, पुणे, उत्कर्श प्रकाशन, पृ. क्र. 04.*
8. *गोखले शरच्चंद्र, (2012), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशैली, पुणे, उत्कर्श प्रकाशन, पृ. क्र. 04–05.*
9. *गोखले शरच्चंद्र, (2012), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशैली, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, पृ. क्र. 05–06.*
10. *गंदेवार एस.एन., (2004), भारतीय समाजः वादातीत विषय आणि समस्या, लातूर, विद्याभारती प्रकाशन, पृ क्र. 133.*
11. *खडसे भा. कि., (2004), भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, मुंबई, हिमालया पब्लिशिंग हाऊस, पृ क्र. 144.*
12. *सांगोलकर दत्ता (2014), 'मानवी हक्क', पुणे, जिज्ञासा प्रकाशन. पृ क्र. 157.*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

महात्मा गांधी आणि स्त्रीवाद

डॉ. भारती नवथर
कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
राहुरी, जिल्हा अहमदनगर

★★★

सारांश – स्त्रियांचा सामाजिक दर्जा व स्थान उंचावण्यासाठी गांधीजींचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. २० व्या शतकात स्त्रीहक्क व स्त्री स्वातंत्र्यासाठी अनेक आंदोलने झाली. स्त्रीवादी चळवळी अनेकदा पुरुषांच्या पुढाकाराने विकसित झालेल्या दिसतात. प्रस्तुत शोधनिबंधात स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी महात्मा गांधींनी बजावलेल्या भूमिकेचे स्वरूप, त्याची फलश्रुती यावर अल्पसा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. गांधीजींनी केवळ राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली असे नाही तर समाजकारणातील त्यांचे योगदानही महत्त्वपूर्ण आहे . तत्कालीन समाज व्यवस्थेमध्ये स्त्रियांना अनेक बंधनांमध्ये बंदिस्त केले होते. स्त्रियांचे हक्क नाकारले होते. बालविवाह, हुंडा, पडदा पद्धती, सती, विधवा पुनर्विवाहावर बंदी, स्त्री – पुरुष असमानता यामुळे स्त्रियांमध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत महात्मा गांधींनी लेखनाद्वारे , भाषणाद्वारे बालविवाह विधवा पुनर्विवाहबंदी, पडदा पद्धती, सती, हुंडा या विरोधी जागृती करुन , स्त्री शिक्षण, स्त्री–पुरुष समानतेचा पुरस्कार करुन स्त्रियांना मोठ्या प्रमाणात स्वातंत्र आंदोलनात सहभागी करून घेऊन राष्ट्रीय आंदोलन खऱ्या अर्थाने व्यापक बनविले.

बीजशब्द :– बालविवाह, विधवा पुनर्विवाह,पडदा पद्धती, हुंडा,सती, स्त्रीशिक्षण, स्त्रीवाद, स्वातंत्र चळवळ.

उद्दिष्टे :– १) स्त्रिवादाचा अर्थ जाणून घेणे. २) विसाव्या शतकातील अनिष्ठ रूढी परंपरांवर विषयी महात्मा गांधीजींचे विचार जाणून घेणे ३) महात्मा गांधीजींच्या स्त्रीवादी भूमिकेवर प्रकाश टाकणे. ४) महात्मा गांधीजींच्या स्त्री–पुरुष समानतेच्या पुरस्कारावर प्रकाश टाकणे.

गृहितके– १) स्त्रियांच्या उन्नतीत महात्मा गांधीजींची भूमिका उल्लेखनीय आहे. २) स्त्रियांवर होणारा अन्याय कमी होऊ लागला. ३) महात्मा गांधींच्या स्त्रीवादी भूमिकेमुळे भारतीय स्वातंत्र लढ्यात स्त्रिया मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्याचे दिसून येते ४) महात्मा गांधीजींचा महिला विषयी दृष्टिकोन मानवतावादी आहे.

५) महात्मा गांधींची स्त्री–पुरुष समानतेची भुमिका महत्त्वपूर्ण आहे.

संशोधन पद्धती– प्रस्तुत शोध निबंध साठी माहिती संकलन, वर्णनात्मक, विष्लेशणात्मक व ऐतिहासिक पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

व्याप्ती व मर्यादा– महात्मा गांधीजींचे भारतीय स्वातंर्त्य आंदोलनातील योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे येथे महात्मा गांधीजींच्या स्त्रीवादी भूमिकेचाच विचार केला आहे.

विषयज्ञान – स्वतःच्या हक्कासाठी, मुक्तीसाठी झालेल्या स्त्रियांच्या चळवळीला स्त्रिवाद असे संबोधले जाते. स्त्रिवाद म्हणजे स्त्रीला स्वतःच्या शक्तीचे आलेले भान होय. एका बाजूने अन्याय, अत्याचार शोषण याखाली दडपण्याचे भान आहे. दुसऱ्या बाजूला मानव जातीच्या प्रगतीमध्ये सहभागाचे भान, स्वतःची किंमत, स्वतःची अस्मिता यांचे भान म्हणजेच स्त्रीवाद जगाकडे नव्या चष्म्यातून पहाण्यास शिकणे म्हणजेच स्त्रीवाद अशा प्रकारे स्त्रीयांमधिल सुप्तशक्ती ओळखून तिला आवाहन करणारे अनेक महात्मे होऊन गेले. त्यापैकी महात्मा गांधींची स्त्रीवादी भूमिका महत्त्वपूर्ण आहे. महात्मा गांधीजींच्या कार्याचा परिणाम पुरुषा इतकाच स्त्रियांवरही झाला. गांधीजींच्या तत्वज्ञानात शारीरिक बळापेक्षा आत्मिक शक्तीला अधिक महत्त्व होते. स्त्रियांना हे मानण्यासारखे असल्याने गांधीजींच्या कार्यात स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या दिसून येतात. गांधीजींचे स्त्रीविषयक विचार हे अत्यंत जागृत होते. तत्कालीन समाजातील स्त्री ही असह्या आहे. याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच रुढी परंपरेने चालत आलेली स्त्रीची प्रतिमा बदलण्यासाठी अनिष्ट रूढी परंपरेत सुधारणा करावी याविषयी आपले विचार लेखनाद्वारे व भाषणाद्वारे स्पष्ट केले. प्रस्तुत शोधनिबंधात महात्मा गांधीजींच्या स्त्रीवादी भूमिकेवर अल्पसा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

बालविवाह – महात्मा गांधींनी यंग इंडिया आणि हरिजन या वृत्तपत्रांद्वारे तसेच भाषणाद्वारे बालविवाह, सती पद्धत, पडदा पद्धत ,देवदासी प्रथेला विरोध केलेला दिसून येतो. बालविवाहामुळे बाल विधवांचे प्रमाण वाढलेले दिसून येतात. बालविवाहाचा परीणाम स्त्रियांच्या शिक्षणावर होताना दिसून येतो. म्हणूनच महात्मा गांधींनी त्या विरोधी जागृती घडवून आणलेली दिसून येते.

विधवाविवाह – बालविवाहामुळे बालविधवांचे प्रमान वाढत होते. महात्मा गांधी आपल्या भाषणाद्वारे व लेखनाद्वारे सत्तीच्या वैधव्यापेक्षा विधवा विवाहाचा पुरस्कार करतात. सर्व व्यापक आणि उदार अशा हिंदू संस्कृतीने स्त्रियांना एवढा कनिष्ठ दर्जा द्यावा हे या संस्कृतीला शोभत नाही .ते म्हणतात सत्तीचे वैधव्य हा स्त्रीवर केलेला मोठा अन्याय आहे. या वैधव्याने इतर अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होतात. समाजाची नीतीमत्ता घसरते. विधवा विवाहाला संमती न देणे आपल्या मनाच्या संकुचितपणाचे लक्षण आहे. भारतीय संस्कृ

ती उदात्त आहे. त्यात हा संकुचितपणा बसत नाही. म्हणूनच महात्मा गांधींचा विधवांना असा सल्ला होता की हिंदू लोकमताला न भिता त्यांनी पुनर्विवाह करावा.

सती – महात्मा गांधींनी मानवतावादी भूमिकेतून सती पद्धतीला विरोध केलेला दिसून येतो. ते म्हणतात सतीत्वाची भावना उच्च आहे. पवित्र आहे. पण त्यात विवेक नाही. स्त्रियांना ते म्हणतात तुम्हाला जर यथार्थ सहगमन करावयाचे असेल तर तुम्ही आपले उर्वरित जीवन पतीच्या अपूर्ण राहिलेल्या कार्याला अर्पण करा. तरच त्याची सहचारिणी होण्याचे श्रेय तुम्हाला मिळेल. सुखोपभोगाच्या सर्व साधनांचा त्याग करून अपरिग्रही होऊन प्रसादमय संन्याशाचा नवा आदर्श निर्माण करण्याचा संदेश ते भगिनींना करताना दिसून येतात. 3 महात्मा गांधींनी अहिंसा, ब्रह्मचर्याच्या शिकवणीने स्त्रियांना अभयदान दिले. गांधीजींना स्त्रियांना अबला समजणे हे मनापासून मान्य नव्हते म्हणूनच अबला म्हणवून घेणाऱ्या स्त्रीला पुरुशार्थाचा संदेश देतात. स्त्रीचे जीवन नव्या स्फूर्तीने आशा–आकांक्षांनी सजीव करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. म्हणूनच विधवाविवाह बद्दलची त्यांची मते स्त्रियांबद्दलच्या सुधारकी दृष्टिकोनाचे म्हणजेच स्त्रीवादी प्रवाहाचेच प्रतीक आहे.

हुंडा– महात्मा गांधी हुंडापद्धती विरोधी होते. त्यांच्यामते हुंडा पद्धती ही स्त्रीचा अपमान करणारी तिला गौण ठरवणारी पद्धत आहे. माणूस म्हणून स्त्रीचे मूल्य कमी करणारी अशी पद्धत आहे हुंड्याची पद्धत बंद व्हायला हवी. हुंडा प्रथेचा व जात बंदिस्तीचा संबंध स्पष्ट करुन त्यासाठी आंतरजातीय विवाह हाच उपाय असल्याचे मत गांधीजी सांगतात. जोपर्यंत एका विशिष्ट जाती समूहातील तरुण–तरुणी मध्ूनच निवड करायची आहे तोवर हुंडा पद्धतीला आधार राहील असे ते म्हणतात. विवाह वैयक्तिक बाब असली तरी आंतरराष्ट्रीय विवाहांना बंदी करता कामा नये ज्या विवाहातील एक पक्ष हरिजन नसेल त्या लग्नाला हजर राहायचे नाही किंवा आशीर्वाद द्यायचा नाही हेही यापूर्वीच ठरवले आहे आणि तसा नियम केला आहे असे ते नमूद करतात. म्हणूनच हुंडापद्धती नष्ट करण्यासंबंधी ते लिहितात मुला–मुलीचे निवडीचे क्षेत्र जोवर जातींनी मर्यादित राहील तोवर कितीही विरोध केला तरी हुंड्याची प्रथा टिकणारच. ती बंद व्हायची असेल तर मुला–मुलींना आणि त्यांच्या माता–पित्यांना ही जाति बंधने झुगारून द्यावी लागतील. मुलांना त्यांची पारंपरिक मनोरचना आमूलाग्र बदलेल असे शिक्षण दिले तरच हुंडाविरोधी आंदोलन यशस्वी होईल. जो तरुण हुंड्याच्या पापमय पैशाचा स्वीकार करेल त्यावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन समाजाला ते करतात. मुलीच्या माता पित्यांना संदेश देताना ते म्हणतात तुम्ही इंग्रजी पदव्यांचा मोह सोडलात तर ही प्रथा नष्ट होणारी आहे.

स्त्रीशिक्षण – स्त्री शिक्षणा बाबत गांधीजींचे विचार महत्त्वपूर्ण आहेत. महात्मा गांधीजींच्या मते आत्मविष्काराचे साधन असणारे शिक्षण पुरुषांबरोबर स्त्रियांनाही मिळाले पाहिजे. स्त्री शिक्षणामुळे हुंडा, बालविवाह, पडदा पद्धती यासारख्या अनिष्ट प्रथा संपुष्टात येतील. स्त्रियांची पारतंत्र्यातून मुक्तता झाल्याशिवाय भारताला नैतिक ,भौतिक किंवा आत्मिक क्षेत्रात प्रगती करता येणार नाही. म्हणून गांधींनी शेवटी असा निष्कर्श काढला की स्त्रियांच्या पुनरुज्जीवनाचे शिक्षण हे सर्वात प्रभावी साधन आहे. स्त्रियांच्या संदर्भातील रूढी परंपरांवर टीका करताना पुरुष प्रधानतेवरही ते हल्ला करतात गांधीजी म्हणतात स्त्रीयांकरता जे नियम निव्वळ पुरुषांनी बनवले आहेत त्यामुळे निर्माण झालेल्या रूढी आणि नियम यांनी स्त्रियांवर जुलूमच चालविला आहे आणि हा जुलूम स्त्रिया केवळ अज्ञानामुळे सहन करताना दिसत आहे. स्त्रियांच्या शिक्षणाच्या अभावामुळे त्यांच्या मागासलेपणा मुळे आपल्या अनेक चळवळी असफल झालेल्या दिसतात अथवा त्यांना यश मिळत नसल्याचे दिसते. त्यामुळे स्त्रीला शिक्षण देऊन सुविद्य केले पाहिजे यासाठी स्त्री शिक्षणाचा आग्रह धरतात. पुरातन काळापासून चालत आलेल्या रूढीने स्त्रियांवर अन्यायाने हिनत्वाचा शिक्का मारला आहे. स्त्रीला आपली सखी, अर्धांगिनी, सहचारिणी मानण्याऐवजी पुरुषांनी तिला आपली भोगदासी बनविले आहे. स्त्रियांवर आजवर जो आन्याय झाला त्याची भरपाई करण्याकरता त्यांना शिकविणे हे आपले कर्तव्य आहे. स्त्रियांना शिक्षण देताना जे त्यांना उपयोगी पडणारे स्वछतेचे, आहार शास्त्र, कुटुंबीय जीवनाचे, अपत्य संगोपनाचे, सेवेचे ,नर्सचे शिक्षण त्यांना प्राधान्याने द्यावे. पण इंग्रजी शिक्षण त्यांना अगदी देऊच नये या मताचे गांधीजी नव्हते. स्त्रियांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग समाज कार्यासाठी करावा. समाजातील गरीबांची सेवा करण्यासाठी त्यांनी वाहून घ्यावे असे ते म्हणत. शिक्षण घेऊन स्त्रियांनी शोभेच्या बाहुल्या बनू नये. लग्न, संसार कुटुंबसंस्था यातच अडकून न पडता सार्वजनिक कार्यात स्त्रियांचा सहभाग कमी अधिक प्रमाणात असावा असे त्यांना वाटत असावे. शिक्षण घेऊन स्त्रियांनी पोटासाठी नोकरी करू नये किंवा व्यापार व्यवसायही करू नये. तर स्त्रियांसाठी असलेल्या क्षेत्रातच उत्तम कार्य करावे. स्त्रियांना व्यापक शिक्षण द्यावे. या मताचे ते होते पण जगाच्या प्रगतीला जर त्यांचे सहाय्य व्हायचे असेल तर ते पुरुषांची नक्कल करून जमणार नाही. त्यांनी स्पर्धा करावी पण नक्कल करून स्वतःची सर्वोच्च उंची बनणार नाही असे ते म्हणत. महात्मा गांधींनी भारतात आश्रम शाळा सुरू केलेल्या या आश्रमांमध्ये स्त्रियांच्या शिक्षणासाठी त्यांनी खास वर्ग सुरू केले कस्तुरबा गांधी आश्रमातील शाळांवर विषेश लक्ष देत असत.विकेंद्रित अर्थव्यवस्थेत स्त्रियांचा मोठा सहभाग राहील हे ओळखून त्यांनी सुतकताई सारखे कार्यक्रम ग्रामीण भागातील महिलांना सुचविले आश्रमातही सूतकताई चे शिक्षण त्यांना देण्याची व्यवस्था करण्यात आली. आश्रम परिवारात दाखल झालेल्या स्त्रिया कस्तुरबा प्रमाणेच त्याग व सेवा समर्पित करण्यास कटिबद्ध झालेल्या असत गांधीजींच्या प्रेरणेने स्वदेशी चळवळ सूतकताई, खादी उद्योग, ग्रामोद्यो, दारूच्या गुत्त्यावर पिकेटिंग, राष्ट्रीय शिक्षण, आश्रमशाळा, सत्याग्रह यासर्व चळवळीत स्त्रिया अग्रभागी राहिल्या. म्हणूनच स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने शिक्षणाचा अधिकार असावा यासंदर्भात महात्मा गांधी म्हणतात

पूर्ण अर्थाने स्वराज्य हवे असेल तर स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान देणे आवश्यक आहे. अशा प्रकारे स्त्री शिक्षणामुळे कुटुंबाचा , समाजाचा व राष्ट्राचा विकास होईल. यावर म. गांधीजींचा विश्वास होता.

स्त्री–पुरुष समानता – स्त्रियांच्या समाजातील हीन आणि दुय्यम स्थानाच्या बाबतीत महात्मा गांधीजी म्हणतात की रूढी आणि कायदे बघता स्त्रियांचा दर्जा सर्वत्र हीन आहे आणि तो आमूलाग्र बदलण्याची गरज आहे. परंपरेविशयी ते म्हणतात कोणतीही गोष्ट प्राचीन आहे म्हणून ती चांगली आहे, असे मी म्हणत नाही. पुराण परंपरेपायी आपण आपली ईश्वरदत्त तर्कशक्ती गहाण टाकावी, असा मी आग्रह धरत नाही. कोणतीही रुढी कितीही जुनी पुराणी असली तरी नितीतत्वाशी तिचा विरोध असेल तर भूतलावरुन उच्चाटन होण्यास ती पात्र आहे. अशी परखड आणि निसंदिग्ध भूमिका गांधीजी घेतात. म्हणूनच महात्मा गांधींनी स्त्री स्वातंत्र्याचा आवर्जून पुरस्कार केला. महात्मा गांधी स्त्री आणि पुरुष या दोघांमध्ये समानता हवी या विचाराचे समर्थन करताना दिसतात. समाजातील स्त्रीच्या पारंपरिक कल्पनांचा ते धिक्कार करतात. स्त्रीला स्वतःचे व्यक्तिमत्व आहे. तिला पुरुषान इतकीच मानसिक शक्तीची देणगी निसर्गाकडून मिळालेली आहे. त्याग, सोशिकता, कष्टाळूपणा या बाबतीत ती पुरुषांपेक्षा काकणभर श्रेष्ठच आहे. तिलाही पुरुषांइतकेच अधिकार असले पाहिजेत. स्त्री ही पुरुषांच्या मालकीची भोगवस्तू नाही. आपण पुरुषांचे खेळणे आहोत, असे समजणे ही तिची मोठी चूक आहे. पुरुषांना संतुष्ट करण्यासाठी स्वतःचे शरीर भूशविणे तिला कमीपणा आणणारे आहे ,म्हणून स्वतः विषयीची न्यूनगंडाची भावना सोडून देऊन कुटुंबातील व समाजातील आपले स्थान मिळविण्यासाठी स्त्रियांनी पुढे आले पाहिजे.

स्त्रीच्या पारंपरिक दासी कल्पनेला विरोध करताना गांधीजी म्हणतात एखादी बाहुली अगर उपभोग साधन या ऐवजी नवग्रानी आपल्या पत्नीला समाजकार्यातील सन्मान्य सहचारिणी म्हणून वागवावे. शास्त्रांमधील स्त्रीप्रतिमेवर ते टीका करतात. महात्मा गांधीजींच्या पुढे सीता, दमयंती, द्रोपदी अशा स्त्रियांचा आदर्ष होता. त्यांच्यासारखे सामर्थ्य आणि आत्मसंचयन ज्या स्त्री जवळ असेल तिला समाजाकडून या स्त्रियांसारखाच मान मिळेल. स्त्रियांच्या उन्नतीतच समाजाची उन्नती आहे या मताचे गांधीजी होते. स्त्रियांना आवश्यक असेल तेथे सवलती मिळाव्यात असे आग्रही प्रतिपादन ते करतात. प्राचीन भारतीय समाजात मध्ययुगीन काळा सारखी स्त्रियांची परिस्थिती वाईट नव्हती. त्याकाळात खर्या अर्थाने स्त्रीला सामाजिक प्रतिष्ठा होती. आजच्या काळात स्त्री व पुरुषांचा दर्जा समान असावा असे महात्मा गांधींना वाटे. म्हणूनच ते म्हणतात ,भारतीय समाजाने विनाकारण स्त्रियांना हीनत्व दिले आहे. वास्तविक पाहता बुद्धी ,चातुर्य, कर्तव्य या बाबतीत स्त्री ही पुरुषांपेक्षा कमी नाही . तो जोपासला गेलेला एक न्यूनगंड प्रस्थापित झालेला आहे . तिची सामाजिक गुलामगिरी ही तिच्या मानसिक गुलामगिरीतून निर्माण झाली आहे. स्त्रियांनी जर गुलामगिरीतून मुक्त होण्याचे ठरवले तर त्यांना कोणीही रोखू शकणार नाही असे ते म्हणत. स्त्री स्वातंत्र्याचा विचार महात्मा गांधींनी समग्र परिवर्तनाची जोडलेला दिसून येतो. त्यासाठी सुशिक्षित भारतीय महिलांनी या विषमतेच्या कारणांचा विचार केला पाहिजे असे ते सुचवतात. तर दुसरीकडे पुरुषांमध्ये असलेली स्त्रीविषयी प्रभुत्वाची, स्वामित्वाची असलेली भावना नाहीशी होऊन स्त्रिया या आपल्या मित्र आणि सहकारी आहेत ही भावना वाढीस लागली पाहिजे . पुरुषाने स्त्रीवर जे अन्याय केले आहेत ते बघून महात्मा गांधींना वाईट वाटत असे. स्त्री आणि पुरुष एकच आहेत, म्हणून त्यांचे प्रश्न वेगवेगळे असता कामा नये, तेही एकच असले पाहिजे. हा स्त्री–पुरुष समतेकडे नेणारा मार्ग ते सांगतात. स्त्रियांची मानसिकता गांधीजी पूर्ण जाणून होते, तिच्या अंगभूत गुणांचा तिने अधिक विकास करावा. गरजा कमी करणे शारीरिक कष्टावर भर देवून पैशाची बचत करावी. असे अनेक गुण तिने कुटुंबात जोपासावेत ते तिचे कर्तव्यच आहे. एकदा तिने घराला वळन लावले की राष्ट्राला वळन लावणे अवघड जाणार नाही असे त्यांचे मत होते. अर्थात यावरून कोणी गांधीजी स्त्री स्वातंत्र्य विरोधी होते असा अन्वयार्थ लावू नये. कारण गांधीजी म्हणत सध्याचे युग हे स्त्री पुरुष समतेचे आहे. निसर्गाने स्त्री पुरुषांना परस्परांना पूरक केले आहे. अशा काळात स्त्री वर्गाला अपमानास्पद होणारा भेदभाव करणे हे काळाशी सुसंगत नाही. मुलगा जन्मला म्हणजे हर्षाने बेहोष व्हावे आणि मुलगी जन्मली म्हणजे शोक करीत बसावे याचे कारण काही माझ्या ध्यानात येत नाही दोन्ही ईश्वराची देणगी होय दोघांनाही जगण्याचा सारखा हक्क आहे आणि जगाची रहाटी चालू ठेवण्यासाठी दोघांचीही सारखीच गरज आहे, पुत्रा इतकाच वारसाहक्क कन्येला मिळावा , पतीची कमाई पती–पत्नीची समाईक जिंदगी होय. कारण घर काम करून पत्नी पतीला द्रव्यार्जनास मदत करीत असते . स्त्री–पुरुषांच्या वेतनात विषमता असू नये. पुरुषांचे स्त्रीवरील प्रभुत्व संपुष्टात आले पाहिजे. वरील वाक्य वाचताना हा स्त्रीमुक्तीवादी संघटनेने धरलेला आग्रह आहे वा युनो या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या जाहीरनाम्यातील घोषणा आहे असे वाटेल परंतु वरील सर्व विधाने महात्मा गांधीजी ची आहेत आणि जाहीरनाम्यामध्ये नंतरच्या काळात आली आहेत. वरील वाक्यावरून स्त्रियांच्या समाजातील हीन आणि दुय्यम स्थानाच्या बाबतीत गांधीजींचे विचार किती सुधारित आहे हे आपल्या सहज लक्षात येते. स्त्री–पुरुष समानतेचा विचार महात्मा गांधींनी केलेला दिसून येतो . शिक्षणात स्त्री–पुरुष समानतेचा विचार येणे गांधीजींना महत्त्वाचे वाटत होते. गांधीजींनी प्राथमिक शिक्षणासाठी एक बालपोथी तयार केली होती , जी आज अडगळीत पडलेली असेल पण स्त्री–पुरुष समानतेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहे. आई आणि मुलाचा संवाद रुपात असलेल्या या बालपोथीतील एक पाठ घरकाम या विषयावर आहे .जितकी गरज घर काम शिकण्याची ताईला आहे, तितकीच तुलाही आहे असा आशय असलेली बालबोधा पोथी 1922 मध्ये महात्मा गांधींनी लिहून ठेवलेली आहे. थोडक्यात गांधीजींना शिक्षणात असा बदल अपेक्षित होता की अभ्यासक्रमातून

स्त्री पुरुष समानतेचे धडे असावेत जेणे करून स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेल. तत्कालीन शारदा बिलाला होणाऱ्या विरोधा बाबत गांधीजी म्हणतात मी स्त्री वर्गाच्या हक्काच्या बाबतीत कसलीही तडजोड करायला केंव्हाही तयार नाही. अशी स्पष्ट भूमिका घेतली यावरून महात्मा गांधीजींची स्त्रीवादी भूमिका अधिक स्पष्ट होते. थोडक्यात स्त्री आणि पुरुष एकच आहेत, म्हणून त्यांचे प्रश्न वेगवेगळे असता कामा नये. तेही एकच असले पाहिजेत. हा स्त्री पुरुष समतेकडे नेणारा मार्ग महत्त्वपूर्ण असल्याचेच दिसून येते.

आर्थिक स्वावलंबन – आर्थिक बाबतीत स्त्रिया स्वावलंबी व्हायला हव्यात असे म. गांधींचे मत होते. महात्मा गांधीजींनी स्वदेशीचा पुरस्कार केल्याने हे स्वदेशी आंदोलन अधिकाधिक गतिमान करण्यासाठी आणि जनतेमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करण्यासाठी खादी आंदोलन सुरू केले. सूतकताई, खादी उद्योग याकडे महिलांना वळविले . महिलांना काही प्रमाणात काम धंदा मिळेल आणि पतीच्या अर्थार्जनात त्यांना काही वाटा उचलता येईल. तसेच काही प्रमाणात आर्थिक दृष्ट्या त्या स्वावलंबी होतील. स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांचा सहभाग दक्षिण आफ्रिकेतील लढ्यात स्त्रियांच्या निर्भय सहभागाचा मोठाच प्रभाव महात्मा गांधीजींवर पडला त्यानंतर भारतात परतल्यावर भारताच्या स्वातंत्र चळवळीत महिला मोठ्या प्रमाणावर सहभागी होण्यासाठी महात्मा गांधीजींनी लेखन व भाषणाद्वारे स्त्रियांना आवाहन केले. महात्मा गांधींनी स्त्रियांच्या संदर्भात असा विश्वास व्यक्त केला होता कि स्त्री त्याग आणि शांती ची मूर्ती आहे आणि युद्धसंस्था नष्ट करून जगात शांतता निर्माण करण्याचे सामर्थ्य तिच्या अंगी आहे. गांधीजींनी केलेल्या सत्याग्रहात स्त्रियांच्या सहभागातून त्यांचा हा विश्वास दृढ झाला होता आणि त्यांचा हा विश्वास अनाठायी नव्हता याचे अलीकडचे उदाहरण पुलावामा येथील दहशतवादी आत्मघाती कृत्याच्या पार्श्वभूमीवर काही वर्तमानपत्रात मध्ये काही वीरमाता, वीरपत्नींनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या अंतमुर्ख करणाऱ्या आहेत. युद्ध नको शांतता हवी दोन राष्ट्रातील प्रश्न संवादाने सुटावेत. शहीद बबलू संतराच्या पत्नीचे हे वाक्य तर तिकडे पाकिस्तानातही युद्ध विरोधात शांततेसाठी मोर्चे, सभा यामध्ये तेथील स्त्रिया सहभाग घेताना दिसत आहेत. शांततेची वैष्विक भूमिका या स्त्रिया मांडत आहेत शांततेच्या या त्या प्रतिनिधी आहे एका अर्थाने गांधीजी स्त्रियांवर दाखवलेला विश्वास सार्थ होता असेच दिसत आहेगांधीजींच्या विचारांचे जागरण किती अपरिहार्य आहे याची जाणीव होणे महत्त्वाचे आहे. महात्मा गांधींनी स्त्री स्वातंत्र्याचाही आवर्जून पुरस्कार केला स्त्री–पुरुष समान आहे स्त्रियांना मानसिक शक्ती निसर्गाकडून मिळालेली आहे तरीही अहिंसक लढा देण्यासाठी अधिक सक्षम आहे अशी त्यांची धारणा होती हिंदू धर्मात देवीच्या मंदिरांची संख्या खूप आहे पण महिलांवर अत्याचार करण्यात हिंदूधर्मीय पुरूशही आघाडीवर आहे .म्हणूनच हे मान्य नसणाऱ्या गांधीजींनी स्त्रियांना निर्भय करून त्यांना प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी त्यांचा स्वातंत्र्य चळवळीत समावेश केलेला दिसून येतो. महात्मा गांधींच्या प्रेरणेने स्वदेशी चळवळ, सूतकताई, खादी उद्योग, ग्रामोद्योग, दारूच्या गुत्त्यावर पिकेटिंग, राष्ट्रीय शिक्षण, आश्रमशाळा, सत्याग्रह या सर्व चळवळीत अग्रभागी राहिल्या. स्वातंत्र चळवळीच्या काळात कमलादेवी चटोपाध्याय, हंसाबेन मेहता, अवंतिकाबाई गोखले, स्वरूपाराणी नेहरू, प्रेमाताई कंटक, ताराबाई लिमये, दुर्गाबाई जोग यांनी असहकार सत्याग्रह चळवळीत हिरीरीने भाग घेतला. स्त्रियांमध्ये जन्मजात असलेल्या सहनशक्ती, सोशिक वृत्तीने हजारो स्त्रियांनी स्वातंत्र्य लढ्यातील हाल–अपेष्टा सहन केलेल्या दिसून येतात . 1942 चळवळीत अरुणा असफअली, उशा मेहता, सुशीला नायर, लक्ष्मीबाई पाश्रीकर, कमलाबाई देसाई, पार्वतीबाई परांजपे यांचे योगदान महत्वाचे आहे. संपूर्ण सत्याग्रह पर्वात डॉ. सरोजनी नायडू यांचे कर्तृत्व तर पहाडा प्रमाणे उंच आहे गांधीजींच्या आवाहनाला स्त्रियांनी खेडोपाडी शहरा शहरातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिलेला दिसून येतो चरखा चलाचला के लेंगे स्वराज्य हे त्यांचे घोषवाक्य होते. भारतीय स्त्रीच्या जीवनातील हे परिवर्तन पाहून पाश्चात्त्य जगाची जनताही प्रभावित झाली. स्त्रियांच्या सहभागाने पुरुषांनाही मोठा उत्साह निर्माण झाला. महात्मा गांधीजींच्या प्रभावामुळेच 1926 च्या निवडणुकीत स्त्रियांनी मतदान केले. मद्रासच्या सर्वप्रथम महिला डॉक्टर मुथुलक्ष्मी रेड्डी कौन्सिल मध्ये गेल्यावर महिलाविषयक अनेक कायद्यांसाठी त्या प्रयत्नशील राहिल्या. मुंबईच्या मिठूबेन पेटीट व भानुबेन देसाई यांनी मुंबईच्या सत्याग्रह चळवळीत भाग घेतला बारडोली सत्याग्रहातर स्त्रियांच्या शक्तीचे अद्भुत दर्शन झाले. महाराष्ट्रीय स्त्रियांबद्दल गांधीजींनी काढलेले उदगार अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत ते म्हणतात मनमोकळेपणा आचार गौरव, वर्तन स्वातंत्र्य हे गुण नम्रतेसह महाराष्ट्रीय महिलांमध्ये असतात. महात्मा गांधींनी स्त्रियांमध्ये धैर्य, यातना सहन करण्याची शक्ती, निर्भयता, सर्वस्व झोकून देण्याची वृत्ती निर्माण केली. परिणामी प्रचंड संख्येने स्त्रिया स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झालेल्या दिसतात. गांधीयुग खऱ्या अर्थाने स्त्रीयांच्या मुक्तीचे युग होते. स्त्रिमुक्तिची ती सुरुवात होती. त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढताना म्हणूनच सरोजनी नायडू म्हणतात चमत्काराचे युग संपले आहे असे कोण म्हणतो? या माणसाच्या रुपाने प्रत्यक्ष चमत्कार आपल्यात वावरत आहे ते आम्हा स्त्रियांचे पुढारी, मित्र आहेत. तसेच पिताश्रीही आहेत. सार्वजनिक, राजकीय जीवनात स्त्रियांचा सहभाग असणे आवश्यक आहे. महात्मा गांधीजींच्या या भूमिकेमुळे स्वातंत्र चळवळीतील सरोजिनी नायडू, अरुणा असफ आली, कस्तूरबा गांधी विजयालक्ष्मीपंडीत, अवंतिकाबाई गोखले, दुर्गाबाई देशमुख राजकुमार अमृत कौर, बिबि अमतुस्सलाम कमला नेहरू यांच्यासह हजारो महिला आघाडीवर होत्या विदेशी कापडाची होळी करता नाही स्त्रिया मोठ्या प्रमाणात आघाडीवर असलेल्या दिसून येतात. महात्मा गांधीजींच्या स्त्रीवादी भूमिकेचे उत्तम उदाहरण म्हणजे ते केवळ बोलूनच दाखवत नव्हते तर स्त्रीसमर्थ, नेतृत्वावर त्यांचा विश्वास होता. त्याचेच प्रतीक म्हणजे त्यांनी कॉंग्रेस मध्ये महिला नेतृत्वाला संधी दिली. वेगवेगळ्या आंदोलनात त्यांना

मोठ्या प्रमाणात सहभागी करून घेतले. तसेच सामाजिक शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात स्त्रियांना मोठ्या प्रमाणात सहभागी होता आलेले दिसून येते. महत्त्वाचे म्हणजे संविधान समितीतही महिलांचा समावेश होता. या सर्व महिला देशाच्या स्वातंत्र्य चळवळीशी जोडलेल्या होत्या. आज स्त्रियांच्या हक्कासाठी अनेक स्त्री संघटना कार्यरत आहे. गांधीजींच्या विचारांचे विष्लेशण स्त्रीद्यांकडून केले जात आहे. काही प्रमाणात ते गांधीजींच्या स्त्रीवादी भूमिकेवर टीका करताना दिसतात. स्त्रीमुक्तीवादाच्या मते गांधीजींच्या विचारसरणीत स्त्रीस्वातंत्र्याला आणि स्त्री–पुरुष समानतेला खऱ्या अर्थाने स्थान नव्हते. ते शेवटी पितृसत्ताक मूल्याचे पुरस्कर्ते होते. गांधीजींच्या चळवळीत भाग घेणाऱ्या स्त्रिया केवळ उच्चवर्णीय, सुशिक्षित होत्या. दलित किंवा इतर मागास स्त्रियांचा त्यात कमी सहभाग दिसतो. तसेच गांधींच्या काळातील स्त्रीयांना स्वतःची आपल्या हक्काची फारशी जाणीव नव्हती. त्याग व समाजसेवा हेच तिचे ध्येय होते. गांधीजींनी स्त्रिया बाबत मांडलेले विचार हे तत्त्व मूल्यांची चौकट मोडून प्रत्यक्ष कृतीद्वारे स्त्रियांच्या मुक्ती चळवळीची प्रयत्न करणारा विचार त्यात दिसत नाही. अशा प्रकारची टिका गांधीजींच्या स्त्रीवादी भूमिकेवर केली जाते. पण याबाबत असे म्हणता येईल की ज्या काळात गांधीजींनी स्त्रीवादी विचार मांडला त्या काळात स्वराज्य मिळवणे हे स्वातंत्र आंदोलनाचे मुख्य उद्दिष्ट होते. स्वातंत्र्य चळवळ अंतिम टप्प्यात येऊन पोहोचली होती. त्यामुळेच स्त्रीच्या व्यक्ती स्वातंत्र्यपेक्षा गांधीजींना पुरुषांना पूरक होईल असेच सुधारणावादी विचार मांडताना दिसतात. कदाचित स्वातंत्र्य व समता या बाबतच्या अतिरेकी कल्पनामुळे ही टीका होत असावी. गांधीजींना हरिजन स्त्रियांबद्दल अपार सहानुभूती होती. म्हणूनच त्यांच्या उद्धारासाठी ते कटिबद्ध झालेले दिसतात. अनेक अस्पृश्य स्त्रियाही आंदोलनात सहभागी होत्या. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान कोणाला करावे? याविषयी आपले वैयक्तिक मत नोंदविताना म्हणूनच ते म्हणतात स्वतंत्र भारताची पहिली पंतप्रधान एक हरिजन स्त्री असावी या त्यांच्या उद्‌गगारातच त्यांची दलित वर्गाबद्दलची भूमिका दिसून येते. थोडक्यात स्त्रियांमध्ये आत्मविश्वास जागृत करणे त्यांना धैर्यशील बनवणे सर्व समस्या निवारणासाठी संघर्षशील बनवणे यासाठी महात्मा गांधी प्रयत्नशील होते . स्त्रियांच्या सर्वांगीण शोषणाविरुद्ध लढ्याला स्त्रीला सिद्ध करणे हाच गांधीजींचा स्त्रीमुक्तीचा मार्ग होता.

निष्कर्श – महात्मा गांधींच्या स्त्रीवादी भूमिकांमुळे स्त्रियांमध्ये आत्मसन्मानाची भावना निर्माण झाली. स्त्री शिक्षणाला गती प्राप्त झाली. महात्मा गांधीजींची स्त्रीवादी भूमिका स्पष्ट व महत्त्वपूर्ण होती. स्त्री–पुरुष समानता प्रस्थापित होण्यास मदत झाली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्त्री सहभागामुळे राष्ट्रीय चळवळ खऱ्या अर्थाने राष्ट्रीय व व्यापक बनली.

संदर्भ

1. *धर्माधिकारी (संपादक),गांधी विचार दर्शन, खंड 6, पृ क्रमांक 173, नवजीवन ट्रस्ट, अहमदाबाद.*
2. *नवलगुंदकर षं.ना., आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, पृश्ठ क्रमांक 43 ,नरेंद्र प्रकाषन, पुणे.*
3. *धर्माधिकारी तारा (संपादक), स्वातंत्रलढ्यातील स्त्री पृ क्रमांक 87, ऑगस्ट क्रांती महोत्सव समिती,मुंबई. 1992.*
4. *हरिजन साप्ताहिक, 23 मे 1936,पृष्ठ क्रमांक,117.*
5. *गांधीजीमहात्मा,माझ्या स्वप्नाचाभारत ,पृष्ठ क्रमांक81*
6. *हरिजन सप्ताहिक 23मे 1936 पष्ठ क्रमांक 117*
7. *धर्माधिकारी दादा,(संपादक),गांधी विचार दर्शन, शिक्षण खंड 6, पृष्ठ क्रमांक 173 नवजीवन ट्रस्ट अहमदाबाद*
8. *गांधी मोहनदास करमचंद ,माझ्या स्वप्नांचा भारत, पृष्ठ क्रमांक 84 85*
9. *पाटील डी .आर., (संपादक) महात्मा गांधी विचार व समकालीन समाज, पृष्ठ क्रमांक 105*
10. *पंडित नलिनी ,गांधी ,पृष्ठ क्रमांक 221*
11. *गांधी मोहनदास करमचंद, माझ्या स्वप्नांचा भारत, पृष्ट क्रमांक 82*
12. *हरिजन साप्ताहिक ,17 ऑक्टोबर 1929, पृष्ट क्रमांक 343*
13. *हरिजन साप्ताहिक, 2 डिसेंबर 1939, पृष्ठ क्रमांक 359*
14. *लोकसत्ता 2019 लेख रजिया पटेल*
15. *सुरजीत कौर जौली, गांधी एक अध्ययन, पृष्ठ क्रमांक 293 संपूर्ण गांधी वांड़मय खंड 21 पृष्ठ क्रमांक 130*
16. *दैनिक केसरी, पुणे, 15 सप्टेंबर 1942, पृष्ट क्रमांक 6*
17. *धर्माधिकारी तारा,संपादक, आगस्ट क्रांती महोत्सव, समिती, मुंबई 1992 वातंत्र लढ्यातील सरली, पृष्ठ क्रमांक 34 35*
18. *शिखरे दा.न., (संपादक) महाराष्ट्र व महात्मा गांधी, पृष्ठ क्रमांक 108*
19. *किराणे बापू ,असे होते बापू ,पृष्ठ क्रमांक 88*
20. *शरद पाटील,(संपादक), स्त्री मुक्ती विषेशांक, पावडे कुमुद, स्वातंत्र्य पूर्व दलित चळवळ व स्त्री मुक्ती चळवळ, धुळे 1985, पृष्ठ क्रमांक 38.*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताच्या सॉफ्ट पॉवरची भूमिका

डॉ. गणेश गिरी

सहाय्यक प्राध्यापक (राज्यशास्त्र विभाग)

एच.पी.टी. आर्ट्स अँड आर.वाय.के. सायन्स कॉलेज, नाशिक.

★★★

गोषवारा– आंतरराष्ट्रीय राजकारणात जगातील प्रत्येक राष्ट्र आपली प्रतिमा उंचावण्याचा प्रयत्न करताना दिसते आहे. याचे दोन मार्ग आहे, एक म्हणजे स्वतःचे लष्करी व आर्थिक सामर्थ्य व दुसरे म्हणजे स्वतःकडील सकारात्मक संसाधने. यापैकी कोणत्या मार्गाचा अवलंब करून आपले जागतिक वर्चस्व प्रस्थापित करावयाचे हे राष्ट्र निश्चित करते. पहिल्या मार्गाचा अवलंब वेगवान असतो व त्याचे परिणाम तात्काळ दिसायला लागतात परंतु हा मार्ग फार काळ आंतरराष्ट्रीय राजकारणात टिकून राहिलेला नाही हा आजवरचा अनुभव आहे. तथापि दुसरा मार्ग हा संथ असला तरी त्याचा परिणाम दीर्घकाळ टिकून शाश्वत विकासास साह्यभूत ठरतो. भारताने अहिंसा, पंचशील तत्वे व अलिप्ततावाद यांचा स्वातंत्र्यानंतर व जागतिकीकरणाचा भारतात प्रवेश होईपर्यंत या साधनांचा उपयोग सॉफ्ट पॉवर म्हणून जागतिक राजकारणात वापरात आणला. जागतिकीकरणाने भारतावर दूरगामी परिणाम केल्याने वेगळ्या साधनांचा ज्यामध्ये चित्रपट, पर्यटन, आरोग्य, संस्कृती, योगा अशा अनेक आधुनिक साधनांद्वारे जागतिक स्तरावर उत्तम प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु केला. यामध्ये यश–अपयशाचा खेळ सुरु असला तरी भारताने आपले प्रयत्न सुरु ठेवलेले दिसतात, म्हणून प्रस्तुत शोधनिबंधामध्ये सद्यास्थितीमध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताच्या सॉफ्ट पॉवरची भूमिका या विशयावर विविध अंगांनी चर्चा करण्याचे प्रयोजन आहे.

प्रस्तावना – अनेक दशकांपासून अभ्यासक व विष्लेशकांनी भारताच्या शक्तिशाली राष्ट्र होण्याच्या बाबत आपले मत मांडले आहे. भौतिक विकासाच्या अनुशंगाने प्रयत्न होत असताना आर्थिक, लष्करी वाढ व लोकसंख्येचा विस्तार या घटकांकडे कटाक्षाने लक्ष देण्याचे उदिष्ट निश्चित करण्यात आले. म्हणजेच भारताची ही भौतिक शक्ती (हार्ड पॉवर) वाढविण्याचे लक्ष निर्धारित झाले होते. आंतरराष्ट्रीय राजकारणात भौतिक शक्ती वाढविण्याचे प्रयत्न होणे आवश्यकच असते. परंतु याच शक्तीत वाढ करावी का? असा प्रश्न निर्माण होतो. केवळ एकल मार्गाने विचार व कृती करता दुसरा मार्ग मात्र दुर्लक्षित राहतो व त्याचे परिणाम किंवा इतर राष्ट्रांची आपल्याकडे बघण्याच्या भूमिकेत निष्चितपणे कुठेतरी नकारात्मकता येते. मग हा दुसरा मार्ग कोणता ज्याने आंतरराष्ट्रीय राजकारणात आपली अजून स्वच्छ प्रतिमा निर्माण होईल, असे नाही की भारताची आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रतिमा मलीन आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अनेक प्रमुख प्रश्नांमध्ये मध्यस्थ म्हणून भूमिका पार पडली आहे. पण भारताला एवढीच भूमिका घेऊन थांबणे हिताचे नाही. आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करताना आपले हितसंबंध जोपासत आपल्या सॉफ्ट पॉवरचा उपयोग करून भारताकडे विष्वाचे नेतृत्व यायला निश्चितच अनुकूल वातावरण निर्माण होईल. परंतु भारताने या सॉफ्ट पॉवरचा उपयोग फारसा प्रभावीपणे केलेला दिसत नाही. व्यापार व राजकारण यापलीकडे जावून धर्म, संस्कृती, विविधता, खेळ, आरोग्य, तंत्रज्ञान, चित्रपट अशा अनेक सॉफ्ट पॉवर संसाधनांचा उपयोग भारताने मोठ्या प्रमाणात करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणातील मोठा स्पर्धक व शेजारी असणारे चीन सारखे राष्ट्र याच्या बरोबरीने उभे रहावयाचे असल्यास व त्याला शह देण्यासाठी भारताला मानवतावादी सॉफ्ट पॉवरचा उपयोग अतिशय योग्यपणे करता येईल जो कि चीनच्या विस्तारवादी धोरणांना खीळ बसविण्यास सहाय्यभूत ठरेल.

संशोधन विषय– आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताच्या सॉफ्ट पॉवरच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

गृहीतके – आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताच्या सॉफ्ट पॉवरची भूमिका मर्यादित स्वरुपाची असलेली दिसते.

निष्कर्श शब्द– आंतरराष्ट्रीय राजकारण, सॉफ्ट पॉवर, भारत, योगा, संस्कृती, चित्रपट

संशोधन पद्धती– प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासाकरीता पुस्तके, मासिके, वेबसाईट, वर्तमानपत्रे अष्या दुय्यम साधनांचा आधार घेऊन ऐतिहासिक विष्लेशणात्मक पद्धतीने तथ्य विष्लेशण करण्याचा प्रयत्न केला आहे. सदर शोधनिबंधाचा अभ्यासविषय राज्यशास्त्राच्या आंतरराष्ट्रीय राजकारण या विद्याशाखेच्या परीघामध्ये येतो.

सॉफ्ट पॉवरचा अथ–जोसेफ नै यांच्या मते,"तुमचे राष्ट्र स्वतःच्या इच्छा–आकांक्षा दुसऱ्या राष्ट्रांवर लादून स्वतःचे उदिष्ट साध्य करण्याचे माध्यम म्हणजे सॉफ्ट पॉवर होय. यामध्ये उदिष्ट साध्य करण्यासाठी सैनिकी, आर्थिक अश्या कोणत्याही शक्तींचा उपयोग करण्याची आवश्यकता नसते, परराष्ट्र धोरण, राजकीय व्यवस्था–मूल्य व संस्कृती हे तीन मुख्य आधार सॉफ्ट पॉवरचे आहेत. " परराष्ट्र धोरणाची उदिष्टे साध्य करण्यासाठी व देशाच्या सर्वांगीण प्रगतीला प्राथमिकता देण्यासाठी आधुनिक काळातील आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्वाची भूमिका पार पाडणारे व राष्ट्राची क्षमता निश्चित करणारे साधन म्हणून सॉफ्ट पॉवरचा अर्थ लावता येतो.

द्विपक्षीय किंवा बहुपक्षीय राजनयामध्ये व्यापक अर्थाने राष्ट्राच्या क्षमतेला प्रदर्शित करणारे एक महत्वाचे साधन म्हणून परराष्ट्र धोरणामध्ये याची भूमिका केंद्रस्थानी येताना दिसते. याचे कारण असे की, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा, आरोग्य, मनोरंजन, तंत्रज्ञान यासारखे त्याचे अनेक आधार आहेत जे की मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास करून सुरक्षितता प्रदान करण्यास सहाय्यभूत ठरतात. यांचा उपयोग इलेक्ट्रॉनिक माध्यमे, समाज माध्यमे व प्रत्यक्ष भेटीच्या माध्यमातून अशा अनेक सार्वजनिक व्यासपीठांवरून करता येतो.

देशाच्या मुत्सद्देगिरीला महत्व प्राप्त करून देण्यासाठी वेगवेगळ्या मार्गांनी देशाच्या कल्पनांचा प्रसार–प्रचार (ब्रॅण्डिंग) केल्या जातात. शासन प्रकार, संस्कृती, शिक्षण, विविध नवनिर्मिती अशा स्वतःच्या उत्तम वैशिष्ट्यावर जोर देऊन सॉफ्ट पॉवर निर्माण केली जाते. यामध्ये राष्ट्रीय उदिष्ट साध्य करण्यासाठी सार्वजनिक व खाजगी स्त्रोतांचा नाविन्यपूर्ण वापर केला जातो. एकंदरीत आंतरराष्ट्रीय राजकारणात निर्णय प्रक्रिया आपल्या दृष्टीने अनुकूल, तसेच स्वराष्ट्राची प्रतिमा उंचावण्याचा देखील प्रयत्न केला जातो.

परराष्ट्र धोरणामध्ये भारताच्या सॉफ्ट पॉवरची साधने

१) संस्कृती भारताची संस्कृती हि अतिशय प्राचीन व विविधतेने नटलेली सर्वात लोकप्रिय अशी संस्कृती आहे. भारताचे हेच साधन भारताची सकारात्मक प्रतिमा तयार करण्यास महत्वाची भूमिका पार पाडते. विषेशतः शास्त्रीय संगीत, भारतीय नृत्य, भाशिक विविधता, खाद्यसंस्कृती व विविधपूर्ण पोशाख हे सर्व घटक परराष्ट्रधोरण निश्चित करताना प्रभावी ठरतात. हिंदू, जैन, बौध्द व शीख या भारतातील धर्मांचा प्रभाव शेजारी राष्ट्रांवर पडला आहे. विषेश म्हणजे कोणत्याही लष्करी हल्याशिवाय या धर्मांचा प्रसार इतर राष्ट्रांमध्ये सहजपणे झालेला दिसतो. तसेच इस्लाम, ख्रिश्चन व यहुदी या धर्मियांचे देखील अनुयायी मोठ्या प्रमाणात भारतात आढळतात.

२) चित्रपट भारतीय चित्रपट सृष्टी इतर कोणत्याही चित्रपट सृष्टीपेक्षा अधिक वैशिष्टपूर्ण आहे, कारण भारतीय समाज, संस्कृती, धर्म अशा विविध विषयानुसार चित्रपटांची निर्मिती केली जाते. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची प्रतिमा उंचावण्यामध्ये भारतीय चित्रपट सृष्टीची भूमिका महत्वपूर्ण राहिलेली दिसते. विविध भारतीय भाषांमध्ये चित्रपट निर्मिती होते. मध्य व पश्चिम आशिया राष्ट्रांमध्ये भारतीय चित्रपटांना पसंती दिली जाते. पाश्चिमात्य देशांमध्ये देखील भारतीय चित्रपट स्वःताची ओळख निर्माण करत आहेत. भारताचे माहिती व प्रसारण मंत्री श्री. प्रकाश जावडेकर यांनी राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार कार्यक्रमप्रसंगी म्हटले होते की, कोणत्या देशाची संस्कृती व कला या त्याच्या शक्ती असतात व या शक्ती जगासमोर सादर करण्याचे प्रभावी साधन म्हणजे चित्रपट आहेत, यासाठी चित्रपट सृष्टीने सतत प्रयत्नशील असले पाहिजे. जगभरात भारतीय चित्रपटांना पसंती दिली जाते. लॅटिन अमेरिकेतही भारतीय चित्रपटांना मोठी मागणी असल्याचे त्यांनी सांगितले.

३) योगा योगा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे, याचा उल्लेख करणे आवष्यक आहे कारण हा घटक भारतीय परराष्ट्र धोरणाचा सॉफ्ट पॉवर म्हणून त्याचा प्रत्यक्षपणे वापर सुरु झाला आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सभेमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योगा हे भारतीय संस्कृतीने जगाला दिलेली मोठी देणगी आहे असे स्पष्ट केले. ब्रिक्सच्या पहिल्या बैठकीमध्ये भाग घेण्यासाठी गेलेले परराष्ट्रमंत्री श्री. सिंग यांनी नरेंद्र मोदी यांच्या भाषणाचा संदर्भ देत अधोरेखित केले की, योगामुळे शरीर व मन यांच्यावर सकारात्मक परिणाम होताना दिसतो. म्हणूनच २१ जून हा जागतिक योगा दिवस म्हणून जगभर साजरा केला जातो. आज जवळपास १७७ राष्ट्रांनी योगाला मान्यता दिली आहे. त्यामुळेच हे एक नवीन साधन परराष्ट्र धोरणामध्ये सॉफ्ट पॉवरची भूमिका पार पडताना दिसते.

४) पर्यटन भारतीय संस्कृती व पर्यटन परस्परसंबंधीत आहेत. प्राचीनकाळापासून विविध धर्मियांच्या कला व संस्कृतीमधून पर्यटन क्षेत्र आकाराला आहे. याच्याशी संबंधित हॉटेल व टुर्स–ट्रॅव्हल हे व्यवसाय देखील भरभराटीला आले आहेत. सन २०३० पर्यंत भारत पहिल्या पाच स्थानामध्ये येईल व जागतिक पातळीवर पहिल्या पाच व्यावसायिक ट्रॅव्हल मार्केटमध्ये स्थान मिळवेल अशी अपेक्षा आहे.

५) लोकशाही भारतीय लोकशाही जगातील मोठी लोकशाही व्यवस्था म्हणून नावापास आली आहे. तिसऱ्या जगातील बहुतांशी राष्ट्रांमध्ये राजकीय व्यवस्थांचे उच्चाटन होत असताना याच जगातील भारताने मात्र आपली लोकशाही व्यवस्था व मूल्ये टिकवून तिला सशक्त करण्याच्या मार्गाने वाटचाल चालू ठेवली आहे. सर्वांना मतदानाचा हक्क, विशिष्ट कालावधीनंतर नियमित निवडणुका, शासनाच्या निर्णय व धोरणांचे समर्थन व टीका करण्याचा हक्क, स्वातंर्त्य, समता, न्याय या लोकशाही मूल्यांची कमी–अधिक प्रमाणात जोपासना व अंमलबजावणी. तसेच महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अश्या महान तत्ववेत्ता यांचे तत्वज्ञान जगमान्य झाले आहे.

वरील महत्वपूर्ण साधनांबरोबरच क्रिकेट, आयुर्वेद, इस्त्रो, आरोग्य व शिक्षण यासारखी अनेक साधने भारताची सॉफ्ट पॉवर सक्षम आणि तिचा प्रसार–प्रचार करण्यास महत्वाची भूमिका पार पडत असून आंतरराष्ट्रीय राजकारणातील सकारात्मक प्रतिमा उंचावण्यास नक्कीच हातभार लावत आहेत.

सध्याच्या कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर देखील भारताने आपली आंतरराष्ट्रीय पातळीवरील भूमिका मानवतावादी दृष्टीकोनातून प्रकाशझोतात आणली आहे ती अशी की, भारताने ८० पेक्षा अधिक देशांना करोना लशी व वैद्यकीय साहित्य पुरविले आहे. भारताने 'व्हॅक्सिन मैत्री' नावाने पुढाकार घेत लशींचा व साहित्याचा पुरवठा केला आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची सॉफ्ट पॉवर उपयोगात आणण्याच्या मर्यादा भारताकडे सॉफ्ट पॉवरची अनेक साधने उपलब्ध आहेत,

तथापि या साधनांचा योग्य तसा उपयोग भारत अजूनही मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय राजकारणात करत नाही. वर्तमान परिस्थितीमध्ये भारत एक शक्तिशाली राष्ट्र निर्मितीमध्ये प्रयत्नशील असताना षेजारी राष्ट्रे व विकसित राष्ट्रे यांच्याशी संबंध प्रस्थापित करताना भारताची भूमिका संवेदनशील वातावरणातून जाताना दिसते. जागतिक बदलाच्या दिशेने भारताच्या परराष्ट्र धोरणाचे स्वरूप देखील बदलत चालले आहे. सॉफ्ट पॉवर म्हणजे केवळ प्रतिमा स्वच्छ करणे ऐवढाच मर्यादित अर्थ नाही त्याहीपुढे जाऊन स्वतःचा सर्वांगीन विकास व जगाच्या दृष्टीकोनात सकारात्मकता, विश्वास निर्माण करणे असा व याहीपेक्षा व्यापक अर्थ यामध्ये अभिप्रेत आहे. सुरवातीला चर्चा केलेल्या साधनांचा पुनर्विचार करताना त्या साधनांचा मर्यादित वापर आपणाकडून कसा होतो हे स्पष्ट होते जसे की, संस्कृती बाबतीत आपण त्याचा व्यापक अर्थाने प्रसार–प्रचार करण्यास कमी पडलो. ज्या पद्धतीने आपण पाश्चिमात्य संस्कृतीचा स्वीकार कोणताही विचार न करता करतो तेच मात्र आपली संस्कृती आपल्याला मागास वाटते. जगातील बहुतेक सर्व धर्मांचा वावर भारतात आहे. बौध्द धर्माची निर्मिती भारतात झाली असली तरी चीन सारखा शेजारी व बलाढ्य राष्ट्र त्याचा सॉफ्ट पॉवर म्हणून वेगाने करताना दिसतो. भारतीय चित्रपटांच्या बाबतीत देखील प्रश्न निर्माण होतो. हॉलीवूड चित्रपटांइतका खर्च, प्रसार–प्रचार इत्यादी बाबत जगातील लोकांना आकर्शित करण्याची क्षमता अशा अनेक बाबतीत भारतीय चित्रपट मागे राहिलेले दिसतात. जागतिक पातळीचा ऑक्सर पुरस्कार फार तर एखाद्या संगीतकारापुरता मर्यादित राहिला आहे. अजुनही मोठी बाजारपेठ मिळविण्यासाठी भारतीय चित्रपटांना वेळ लागेल असे वाटते. पर्यटनाच्या बाबत तर आणखीच चिंता वाटण्याचे कारण आहे, परदेशी पर्यटकांसाठी भारत सुरक्षित देश नाही असे एकंदरीत वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः परदेशी महिलांबाबत ही समस्या जास्त गांभीर्याने घेतली जाते. अतुल्य भारत सारखी मोहीम पण त्याचा फारसा सकारात्मक परिणाम होतांना दिसत नाही.

भारतीय संस्कृती–मूल्य याच्याशी निगडीत असणारी पर्यटन स्थळे यांना जागतिक पातळीवर प्रसिद्धी देताना भारतामध्येच अनेक प्रश्न उपस्थित केले जातात व या अंतर्गत वादाचे प्रसारण वेगाने होताना दिसते. भारतीय पुरातत्व विभाग अजूनही एका पारंपारिक चौकटीत काम करताना दिसतो. धार्मिक, भाशिक, प्रादेशिक, खान–पान यासारखी मोठी विविधता असणारा भारतासारखा देश दुर्मीळच असावा पण याच विविधतेच्या पडद्याआड असुरक्षित वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न भारतात सतत होताना दिसतो. भारतीय लोकशाहीच्या मॉडेलमध्ये धर्म, जात, प्रादेशिकता या मुद्यांवर आजही निवडणुका होतात, आणीबाणीचे गालबोट आधीच लागलेले असताना प्रखर राष्ट्रवादाच्या दिशेने वाटचाल होताना दिसते. २०२१ च्या जागतिक सॉफ्ट पॉवर इंडेक्सनुसार भारत ३६ व्या स्थानावर आहे. या अहवालामध्ये भारताच्या स्थानासंदर्भात स्पष्टीकरण देताना म्हटले आहे की. भारत जवळपास नऊ (९) ठिकाणी खाली आला आहे याचे मुख्य कारण म्हणजे देशातील निशेधाचे वातावरण, नागरी अशांतता किंवा असंतोष, साथीच्या रोगाने (कोविड–१९) आर्थिक नुकसान होण्याबरोबरच आरोग्यविशयक समस्यांना भारताला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे भारताच्या सॉफ्ट पॉवरच्या वाढीमध्ये व वापरामध्ये घसरण झाली आहे. सुरवातीला मांडलेल्या गृहितकाची पडताळणी वरील तथ्य विष्लेशणावरून केल्यास असे स्पष्ट होते की, गृहितकामध्ये बऱ्याच अंशी सत्यता आहे. निष्कर्श रूपाने म्हणता येईल की, यातील सर्वच साधने परिपूर्ण आहेत असे नाही प्रत्येक साधना मध्ये काहीतरी उणीव असणार परंतु भारताने या उणीवांचा फारसा विचार न करता त्यांच्या वापरावर वा अमंलबजावणीवर जास्त लक्ष द्यावे लागणार आहे. प्रथमतः भारताला आपल्या सॉफ्ट पॉवर बद्दल भारतीयांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. आपल्याकडे इतर राष्ट्रांचे लक्ष्य वेधण्यासाठी सुरक्षित वातावरणाची निर्मिती करावी लागेल ज्यामध्ये व्यापक लोकसहभाग असणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील व्यासपीठावरून भारतीय प्रतिमा उंचावण्याचा व सकारात्मक भूमिका मांडण्याचा सतत प्रयत्न केला जावा. तसेच या साधनांचा उपयोग जसा आंतरराष्ट्रीय स्तरावर केला जाणार आहे त्याचप्रमाणे भारतातील दारिद्रय, बेकारी, कुपोषण यासारख्या गंभीर समस्या सोडविण्यासाठी केला जावा. शांती संदेशाचा वाहक म्हणून आपल्या भूमिकेला व्यापक बनवावे. या सर्व साधनांच्या मदतीने भारताने स्वतःचा व जगाचा भविष्यकाळ सुखदायी करण्याचा प्रयत्न कटाक्षाने करावा.

संदर्भ–

१) *Blarel Nicolas .May&2012.] India: The neÛt Superpower\ India*s Soft Power: From Potential to Reality\ LSE Research online] London] UK] Page no- 28-*

२) *Nye Joseph .Feb- 2017.] Soft Power: The origins & Political Progress of a concept] www-nature-com] Palgrave Communication-*

३) *Yogendra Kumar] India*s Soft power as a Pillar of Foreign Policy] eoi-gov-in-*

४) *Rahman Hafijur.Feb-2018.] Soft Power in Indian Foreign Policy] Contemporary World: Policy] Politics & International Politics] Ullah Rahmat .ed-. & Hasan Sabbir .co- ed-.] Center for Research & Policy Studies] IKSAD Publishing House-*

५) *Cinema Soft Power of a Strong India: Prakash Javdekar] www-deccanherald-com-*

६) *Aneja Atul] India*s Soft Power gets Yoga boost] The Hindu] 20 June 2017] www-thehindu-com-*

७) *The Soft Power of Culture & Tourism: Report& www-PCW-in-*

८) *बातमी, महाराष्ट्र टाईम्स, ३० एप्रिल २०२१, फ्रंट पेज–०२.*

९) *www-jagranjosh-com]List of countries with the maÛimum soft power in the World&Global Soft Power IndeÛ 2021-*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

"महाराष्ट्र शासनाचे आरक्षण धोरण आणि अंमलबजावणी"

रवि जाधव
संशोधक विद्यार्थी राज्यशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

★★★

सारांश – भारतातील बहुतांश राज्यांमध्ये ''सामाजिक आरक्षण" हा मुद्दा मागील काही वर्षात खूप वादग्रस्त बनत चालल्याचे दिसून आले आहे. विषेशतः शासकीय भरती व शैक्षणिक संस्थांमध्ये मोजक्या जाती समुदायांना असलेल्या आरक्षणांचा पुर्नमांडणी केली पाहिजे, सवलती कमी केल्या पाहिजेत, संपल्या पाहिजेत अथवा नवीन जाती समुहांना आरक्षण देण्यात यावे. अशा प्रकारची मागणी सध्या भारतीय जनमाणसात पुढे येतांना दिसून येते आहे.

प्रस्तावना – भारत हा प्राचीन एक खंडप्राय देश असून प्राचीन काळापासूनच सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्याा वैविध्यपूर्ण असा देश म्हणून जगभर भारताची ओळख राहिलेली आहे. अर्थात येथील समाज व्यवस्था ही खूप जुनी आणि वैशिष्ट्यापूर्ण राहिलेली आहे. भारतात मागील हजारो वर्षापासून वर्णभेद, उच्च, निच अस्पृष्यता इत्यादी प्रथा समाज व्यवस्थेच्या अभिन्न अंगाच्या स्वरुपात कायम होत्या. या अनुशंगाने तत्कालीन समाज व्यवस्थेत ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र असे चार प्रमुख वर्ण अस्तित्वात होते. यातील शुद्र वर्णातच बहुतांश मागासवर्गीय जाती, जमातींचा समावेश होतो. अशाप्रकारे जाती समुदायांना भारत स्वातंत्र्य होण्याच्या हजारों वर्षापुर्वी पासून त्यांचे शोषण आपल्या समाजातील उच्चवर्णीय समाजाने केल्याचा इतिहास आहे. अर्थातच तत्कालीन समाजाने त्यांना सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक सोयी–सुविधांपासून नेहमी वंचितच ठेवण्याचा प्रयत्न केलेला असल्याचे आजवरच्या ऐतिहासिक पुराव्यावरुन अनेकवेळा सिद्ध झाल्याचे पाहावयास मिळते.

महाराष्ट्रातील आरक्षणाची सुरुवात – ऐतिहासिकदृष्ट्या अनेक वर्षापासून तत्कालीन समाज व्यवस्थेने शुद्र, अस्पृष्य आदिवासी, मागासवर्गीयांनी त्यांचे मुलभूत हक्क नाकारले होते. त्यांना कोणतीही मदत मिळू न देता, गुलाम बनवून ठेवण्याचा प्रयत्न केला जात असे. अशा प्रकारच्या सामाजिक व्यवस्थेत महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात प्रथमच 1882 रोजी ''हंटर शिक्षण आयोगाला" दिलेल्या निवेदनात महात्मा फुले यांनी म्हटले होते की, प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, पदे ही समाजातील विशिष्ट समुदायाची मक्तेदारी, असून सरकारी नोकऱ्यांच्या क्षेत्रात मागासवर्गीयांना वाव (जागा) उपलब्ध करुन द्याव्यात अशी विनंती केली होती. शिवाय तत्त्कालीन ''शिक्षण व्यवस्था" ही काही मुठभर लोकांची मक्तेदारी बनलेली असल्याने मागासर्गीयांना बहुतांश क्षेत्रात प्रतिनिधित्व मिळत नसल्याचे ही स्पष्ट केले होते.

तद्नंतर कोल्हापूर संस्थानचे राजे छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानातील प्रशासनात 50 टक्के जागा मागासलेल्या जातींसाठी राखून ठेवण्याचा क्रांतीकारी निर्णय घेतला. त्या काळच्या संदर्भात हा निर्णय मागासवर्गीयांसाठी ऐतिहासिक स्वरुपाचा ठरला. याशिवाय संबंधित निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना म्हणून मागासलेल्या समाजात शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी शिक्षणाचा खेडोपाडी प्रचार केला. तसेच उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रत्येक जातींसाठी स्वतंत्र वसतिगृहाची निर्मिती केली. अर्थातच संस्थानातील बहुजनांसाठी खास सवलती जाहीर करुन त्यांना इतर विकसित उच्चवर्णीय जातींच्या बरोबर आणण्यासाठी आरक्षणाची व्यवस्था स्वातंत्र्यपूर्व काळातील आरक्षणाचा वारसा भारताच्या स्वातंत्र्यानंतरही चालू रहावा यासाठी अहोरात्र कष्ट घेणारे तिसरे व्यक्ती म्हणजे राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतले जाते. ज्या समाजाला शतकानुशतके सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले होते. अशा मागासवर्गीय जात समुहाला केंद्र शासनाच्या आरक्षण धोरणाद्वारे प्राधान्यक्रम मिळवून दिला. शिवाय भारतीय राज्यघटनेत अशा मागास जातींसाठी विशेष तरतूद करुन शिक्षण व नोकऱ्यांत राखीव जागा ठेवणे शासनाला बंधनकारक ठरवले.

आरक्षण म्हणजे काय – किमान प्रतीनिधीत्वाची संधी मिळणे म्हणजे आरक्षण होय (Minimum opportunity for representation) अशा लोकांचे प्रतिनिधीत्व ज्यांना तत्कालीन समाजव्यवस्थेने हजारो वर्ष, अनेक पिढ्याांना त्यांच्या मुलभूत हक्कापासून, विकासापासून वंचित ठेवले होते. त्यांच्या उत्कर्षाची कल्याणाची जी संधी नाकारत होती. अषा समाजाला राजकारणात, शिक्षणात व सरकारी नोकऱ्यांत किमान प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी राज्यघटनेतील कलमान्वये आरक्षणाची व्यवस्था शासनाला बाध्य करण्यात आलेली आहे.

आरक्षणाचे प्रकार – शासनाच्या आरक्षण धोरणातील तरतूदीनुसार महाराष्ट्रात तीन प्रकारचे आरक्षण लागू आहे ते खालीलप्रमाणे –

1. राजकीय आरक्षण (निवडणूकीतील जागा आरक्षित ठेवणे.
2. शैक्षणिक आरक्षण (शैक्षणिक संस्थामध्ये जागा राखीव ठेवणे)
3. नोकरीतील आरक्षण (शासकीय भरतीत आरक्षित प्रवर्गासाठी जागा रिक्त ठेवणे.)

वरील प्रकारचे आरक्षण महाराष्ट्र शासनाच्या धोरणात उल्लेखित केलेले आहे. यातील शैक्षणिक व शासकीय नोकऱ्यांमधील आरक्षणाला कोणतीही कालमर्यादा ठरवण्यात आलेली नाही. मात्र भारतीय राज्यघटनेच्या कलम 334 अन्वये राजकीय आरक्षणाला फक्त 10 वर्षाची मुदत घातलेली आहे.

भारतीय राज्यघटना : आरक्षणाच्या तरतुदी – भारतीय राज्यघटना, वैधानिक कायदे व प्रशासकीय नियमांद्वारे भारतात आरक्षण व्यवस्था लागू करण्यात आलेली आहे. त्यातील प्रमुख तरतुदी खालीलप्रमाणे सांगता येतील.

1 कलम 15 (4) अन्वये सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्याा मागासलेल्या वर्गाच्या नागरिकांच्या उन्नतीकरीता विशेष तरतुद करण्यात राज्याला प्रतिबंध असणार नाही.

2 कलम 16 (4) अन्वये राज्य शासनाच्या सेवांमध्ये मागासवर्गीय नागरीकांना पर्याप्त प्रतिनिधीत्व मिळालेले नसल्यास, अशा वर्गाकरिता प्रशासकीय पदे राखून ठेवण्यास कोणतीही तरतुद करण्यास राज्याला प्रतिबंध असणार नाही.

3 कलम 36 ते 51 मध्ये तरतुद केलेल्या सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आर्थिक दृष्ट्याा मागास वर्गाकरीता विशेष तरतुदी आहेत.

4 कलम 330 ते 342 अन्वये भारतातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्याा मागासलेल्या आदिवासी प्रवर्गाची स्थिती सुधारण्यासाठी विशेष तरतुदी केल्या आहेत. उपरोक्त हक्कांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आणि मागासलेल्या जाती–जमातींच्या लोकांना समप्रवाहात आणण्याकरीता तसेच त्यांना समाजातील विविध क्षेत्रात समान संधी देण्याकरीता शासनाने आरक्षण धोरणात तरतूदी करणे अत्यावश्यक असते.

महाराष्ट्रातील आरक्षण : आरंभी आरक्षण धोरणाचा निकष कमी जासत फरकाने ''जात'' या घटकावर आधारित होता. विषेश म्हणजे समाजातील षोशीत, पिढीत, अस्पृष्य अशा कनिष्ट जाती हाच आरक्षण धोरणाचा मुलभूत पाया होता. मात्र कालांतराने हा निकष बदलत जाऊन शैक्षणिक दृष्ट्याा मागासलेल्या जातींनाही आरक्षण बहाल करण्यात आल्याने आता जवळपास पाऊन शतकाजवळ आरक्षणाचा कोटा येऊन पोहोचला आहे. महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्था आणि नोकऱ्यांमध्ये विद्यामान आरक्षण धोरणानुसार सर्व प्रवर्गांना मिळून 75 टक्के आरक्षण कोटा निश्चित करण्यता आलेला आहे.

महाराष्ट्रातील प्रवर्गनिहाय आरक्षण :

अ. क्र.	प्रवर्ग	सं. नाव	आरक्षण	जाती	टक्केवारी
1	अनुसूचित जाती	एसी.सी.	13%	59	11.81%
2	अनुसूचित जमाती	एस.टी.	07%	47	9.35%
3	इतर मागास प्रवर्ग	ओ.बी.सी.	19%	346	–
4	विषेश मागास	एस.बी.सी.	02%	07	–
5	विमुक्त जाती (अ)	व्ही.जे. (अ)	03%	14	–
6	भटक्या जमाती (ब)	एन.टी. (ब)	2.5%	37	–
7	भटक्या जाती (क)	एन.टी. (सी)	3.5%	01	–
8	भटक्या जाती (ड)	एन.टी. (डी)	02%	01	9%
9	सामाजिक व शै. मा.	एस.ई.बी.सी.	13%	01	–
10	आर्थिक दृष्ट्याा मागास वर्ग	ई.डब्ल्यू.एस.	10%	01	32%

2018 मध्ये महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाला 13 टक्के आरक्षण दिले. शिवाय महाराष्ट्र शासनाने राज्यातील शासकीय नोकऱ्यात अनाथ व्यक्तीसाठी 3.7 टक्के आरक्षण लागू केलेले आहे.

समारोप : महाराष्ट्र राज्य निर्मितीला जवळपास 60 वर्षे पूर्ण होत आली आहेत. या दरम्यानच्या काळात अनेक सरकारांनी आरक्षण धोरणाला ज्या पद्धतीने हाताळले अथवा त्याची अंमलबजावणी केली. ते पाहता अजून बरीच वर्षे आरक्षणाचा प्रश्न कायम राहणार आहे असे दिसते. शिवाय आज घडीलाही विषेशतः शासकीय नोकऱ्यांमध्ये ज्या प्रमाणात आरक्षित वर्गाला प्रतिनिधित्व मिळायला हवे होते. ते अजूनपर्यंत मिळालेले दिसत नाही. परिणामी अनेकविध षासकीय विभागात

मागासवर्गीयांचा बॅकलॉग भरणे शासनाला जमलेले नाही. त्यामुळे आरक्षित वर्गाचा अनुशेष अजुन वाढतच आहे. अशातच एकीकडे समाजातील काही नवीन समाजघटकांनी आरक्षणाची मागणी सुरु केली आहे. जसे की, प्रामुख्याने महाराष्ट्रात "मराठा आरक्षण" आंदोलनाने तर संपूर्ण समाजमन ढवळून निघालेला पहावयास मिळतो शिवाय ध नगर समाज, ओबीसी समाजानेही अनेकवेळा आरक्षणाच्या मुद्द्यांवरुन महाराष्ट्रात तीव्र आंदोलने केलेली आहेत. अर्थातच कमी–अधिक प्रमाणात राज्यात आरक्षणासाठी सातत्याने काही समाज घटकांनी महाराष्ट्र शासनाने आरक्षण धोरण व अंमलबजावणी संदर्भात काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात.

तर काहींना मागील आरक्षण बंद करायला पाहिजे अथवा कमी केले पाहिजे यासाठी महाराष्ट्र शासनावर दबाव आणत आहेत. एकूणच आरक्षण धोरणांच्या मुद्द्यांवरुन बिघडत चालली. महाराष्ट्रातील सामाजिक स्थिती पाहता लवकरच हा आरक्षणाचा मुद्दा सोडवणे आवश्यक आहे. शिवाय काळानुरुप आरक्षण धोरण आखूण त्याची अंमलबजावणी करणे महत्त्वाचे बनले आहे.

शासन धोरणाची चर्चा आपणास शासनाच्या वर्गीय व जातीय चारित्र्याचा शोध घेण्यास भाग पाडतो. विद्यमान महाराष्ट्र शासन लोकशाही पद्धतीने कार्य करत आहे. यात वरचढ जातींचे उच्चभू केंद्रस्थानी असतात तर इतर जातीतील उच्चभू सत्तांतर रचनेमध्ये निम्नस्तरवर असतात. अशा शासनाचा आधार जातीवर उभ्या हित संबंधाचा सौदा हा असतो त्या विरोधात राजकीय लढा उभारणे आवश्यक ठरते.

संदर्भग्रंथ :

1. *फडके य. दि. (2006), राखी जागाचे शंभर वर्षे, सुगावा प्रकाशन, पूणे.*
2. *कराडे जगन्नाथ, (2005), आरक्षण धोरण आणि वास्तव, सुगावा प्रकाशन, पूणे.*
3. *सिंह श्यामनंदन, (2007), भारत में आरक्षण निमि, प्रिन्टवेल प्रकाशन, जयपूर.*
4. *मोरे सुबोध, (1999), आरक्षण, भ्रम आणि वास्तव, निर्माण प्रकाशन, नवी मुंबई.*
5. *महासंचालक, (2016), आरक्षण धोरण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, बार्टी, पूणे.*
6. *सुमंत यशवंत, दत्तात्रय पुंडे, (2006), महाराष्ट्रातील जातीसंस्था विषयक विचार, प्रतिभा प्रकाशन, पूणे.*
7. *आगलावे प्रदिप, (2010), सामाजिक संषोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.*
8. *Pai Pandiker, The Politics of backwardness : Reservation Policy in India, Kanark Publishers, New Delhi.*
9- *www.esakal.com/saptarang-pro-prakashpawar.*
10- *www.prabodhan-blogspot.com vkj{k.k vkf.k N«kirh 'kkgw egkjkt] foosd ?kVfoYkdj-*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

वर्ण व्यवस्था आणि आश्रम व्यवस्था यांचे चिकित्सक विवेचन

डॉ. अतुल म. महाजन
सहयोगी प्राध्यापक, तत्वज्ञान विभाग,
रेणुका कॉलेज, नागपूर.

★★★

सारांश : प्राचीन काळापासून समाज सुव्यवस्थित आणि सुसंघटीत राहवा या करीता भारत देषामध्ये अनेक व्यवस्था कार्यरत होत्या. या व्यवस्थापैकी वर्ण व्यवस्था आणि आश्रम व्यवस्था अषा व्यवस्था आहेत की ज्यांचा मुख्य उद्देष समाजाला सुसंघटीत आणि सुव्यवस्थित ठेवणे हा होता. परंतु वर्तमान काळात आधुनिकिकरण, विज्ञान, शहरीकरण, औद्योगीकिरण आणि पाष्चिमात्यकरण यामुळे वर्ण व्यवस्था आणि आश्रम व्यवस्था यानुसार जीवन जगणे शक्य नाही. त्याचप्रमाणे प्राचिन काळातील या व्यवस्थांमुळे अनेक समाजीक प्रष्न आणि समस्या निमार्ण झाल्या आहेत. ज्यामुळे या व्यवस्था वर्तमान काळात स्वीकार करणे योग्य नाही. प्रस्तुत लेखात आपण मनुच्या काळातील वर्ण व्यवस्था आणि आश्रम व्यवस्थेचे स्वरूप आणि त्यांचे चिकित्सक अध्ययन''वर्ण व्यवस्था आणि आश्रम व्यवस्था यांचे चिकित्सक विवेचन'' या षिक्षीका अंतर्गत करणार आहोत.

प्रस्तावना : प्राचीन भारतीय आणि नैतिकते संबंधित विविध ग्रंथात वर्ण आणि आश्रम व्यवस्थेबाबत विविध विवेचन दिसून येते. वेद, ब्राह्मण ग्रंथ, धर्मसूत्र, स्मृति इत्यांदीमध्ये वर्णाश्रम धर्माची विस्तृत चर्चा केलेली दिसून येते. 'धर्म' शब्दाचे अनेक अर्थ आहेत. यापैकी सुप्रसिद्ध व रूढ अर्थ म्हणजे 'हिंदू धर्म', 'मुस्लिम धर्म', 'ख्रिस्ती धर्म' अषा शब्द प्रयोगातून प्रतीत होणारा अर्थ होय. या अर्थाचा 'मानव आणि विष्व यावर नियंत्रण ठेवणारी एक अतिमानवीय शक्ती आहे याचे स्मरण ठेवून तीची आज्ञा म्हणून जीवनातील कर्म करीत राहणे' असे सांगता येईल. 'धर्म' शब्दाचा आणि त्याचा अर्थाचा इतिहास फार प्राचीन काळापासून आढळून येतो. 'धर्म' हा शब्द 'धृ' या ध ातूपासून निर्माण झाला असून त्याचा अर्थ धारण किंवा पोषण करणारे, टिकून धरणारे तत्व असा सामान्यतः दिसून येतो. मनु ने मुख्यतः धर्म शब्दाचा प्रयोग कर्तव्याच्या अर्थानेच केलेला आहे असे म्हणता येईल. प्रत्येक व्यक्तीला तीची कर्तव्य सहज प्राप्त असतात. व्यक्ती अंतराळात जन्मास येत नाही, तिच्याभोवती सामाजिक परिसर असतोच. त्या परिसरात समाजाच्या निती नियमांना काही स्थान प्राप्त झालेले असते. त्या स्थानाला अनुलक्षून व्यक्तीची कर्तव्य आपोआपच नियत झालेली असतात. प्राचीन काळातील वर्णाश्रमव्यवस्था एक सामाजिक आदर्ष होता. व्यक्तींच्या कर्माची त्यानुसार विभागणी होत असे. वर्ण आणि आश्रम व्यवस्थेचे स्वरूप आपण खालील प्रमाणे थोडक्यात बघणार आहोत. त्याआधी हे संषोधन कार्य करीत असतांना कोणत्या पध्दतीचा आपण अवलंब केला याचे संक्षिप्त विवेचन करू.

संशोधन पध्दती : प्रस्तुत शोध निबंधात आपण मनुच्या काळातील वर्ण व्यवस्था आणि आश्रम व्यवस्थेचे स्वरूप आणि त्यांचे चिकित्सक अध्ययन करणार आहोत. त्यामुळे हे संषोधन करतांना आपण विष्लेशणाच्या पध्दतीचा अवलंब करणार आहोत.

स्वधर्म : स्वधर्म म्हणजे स्वतःचा धर्म म्हणजेच वर्णाश्रम धर्म. मनुच्या मते विभिन्न सामाजिक वर्ग आणि आश्रमांनुसार जे कर्तव्य किंवा कर्म केले जाते त्याला वर्णाश्रम धर्म म्हणतात. प्रत्येक वर्ण आणि आश्रम हे विषिष्ट कर्तव्य करण्याकरीता सांगतात आणि ही कर्तव्य म्हणजेच त्या वर्णातील किंवा आश्रमातील सदस्यांचा स्वधर्म होय. स्वधर्मांमध्ये वर्णव्यवस्था आणि आश्रम व्यवस्थेचा विचार करण्यात आलेला आहे.

वर्ण व्यवस्था : हिंदू समाजाच्या नैतिक नियमानुसार आणि मनूच्या काळात समाज सुव्यवस्थित आणि सुरळीत रहावा यासाठी समाज चार वर्णात विभागला गेला होता. वर्णव्यवस्थेत कर्माला महत्त्वपूर्ण स्थान आहे. प्रत्येक वर्णाचे आपले विषिष्ट कर्तव्य आहेत. 'वर्ण' शब्दाची भिन्न भिन्न अर्थ सांगण्यात आलेले आहे. 'वर्ण' शब्द संस्कृ तातील 'वृत्तवरण' या शब्दापासून निर्माण झाला असून त्याचा अर्थ निवड करणे असा आहे. ऋग्वेदात वर्णाचा उपयोग रंगासाठी केलेला दिसून येतो. वर्ण एकूण चार आहे ते म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैष्य आणि शुद्ध. भारतीय वर्णव्यवस्थेचा मुख्य उद्देष श्रम विभाजन हा होता. त्याचे विभाजन पुढीलप्रमाणे आहे. विद्योउपजीवि वर्ग, शासक वर्ग, व्यापारी वर्ग आणि श्रमिक वर्ग. प्रत्येक वर्णाचे आपापले विषिष्ट कर्तव्य होते. ती कर्तव्य पुढील प्रमाणे –

1. ब्राह्मण वर्णाची कर्तव्य :– अंतकरणावर नियंत्रण ठेवणे, इंद्रियांवर संयम ठेवणे, क्षमा, साधना, स्वाध्याय, श्रद्धा, अध्ययन, अध्यापन आणि ईष्वराचे ज्ञान प्राप्त करणे हे ब्राह्मण वर्णाची कर्तव्य आहेत. तसेच वेदांचे अध्ययन करणे, यज्ञ करणे, दान देणे व दान घेणे हे ब्राह्मण वर्णाची कर्तव्य आहे.

2. क्षत्रिय वर्णाची कर्तव्य :– क्षत्रियांचा संबंध शासक वर्गाषी आहे. त्यांचे मुख्य कर्तव्य तिनही वर्णांना सुरक्षा देणे आणि राज्यावर शासन करणे होय. तसेच प्रजेचे रक्षण करणे, ब्राह्मणांना दान देणे, वेदांचा अभ्यास करणे आणि भोगविलास यापासून दूर राहणे हे क्षत्रियांचे कर्तव्य आहे. गीतेनुसार शूरता, वीरता, सामर्थ्य, धैर्य, चातुर्य, युद्धापासून परावृत्त न होणे हे क्षत्रिय वर्णाची स्वाभाविक कर्तव्य आहे.

3. वैश्य वर्णाची कर्तव्य :– पषुपालन करणे, व्यापार करणे, शेती करणे, दान देणे ही वैष्याची कर्तव्य आहेत. सामाजिक रचनेला आर्थिक दृष्टीने सदृढ बनविणे, आयात–निर्यात करणे, सत्य व्यवहार करणे ही वैष्यांची प्रमुख कर्तव्य आहेत.

4. शूद्र वर्णाची कर्तव्ये :– वरील तीनही वर्णातील लोकांची सेवा करणे हे शूद्र वर्णाची कर्तव्य आहे. तिन्ही वर्णाचे सेवक म्हणून त्यांना

ओळखण्यात येते. अषाप्रकारे समाजाच्या सुव्यवस्थेसाठी तसेच विभिन्न प्रकारच्या मनुष्याच्या क्षमतेनुसार कार्याचे वाटप वर्णव्यवस्थे मागील उद्देष होता. ज्यामुळे समाजात स्थिरता सुदृढता आणि संतुलन टिकून राहत होते.

5. आश्रम व्यवस्था :– त्याचप्रमाणे या काळात प्रत्येक वर्णाच्या व्यक्तीच्या जीवनाच्या सर्वांगीन विकासाकरीता विभिन्न आश्रम आणि त्यांच्या संबंधीत कतर्व्याचे पालन करण्यावर भर दिला आहे, ज्याला आश्रम धर्म असे म्हटल्या जाते. प्राचीन भारतीय समाजामध्ये आश्रम व्यवस्था प्रचलित होती. मनुष्य जीवन सुसंस्कृत आणि सुव्यवस्थित बनविण्यासाठी आश्रम व्यवस्था सारख्या संस्थेची कल्पना करण्यात आलेली होती. Encyclopaedia of Religion and Ethic मध्ये जर्मन विद्वान पॉल डायसन यांनी 'आश्रम' या शब्दाचे दोन अर्थ सांगीतले आहेत.

1. 'आश्रम' म्हणजे असे स्थान जीथे श्रम किंवा प्रयत्न केले जावू शकत असे.

2. श्रम किंवा प्रयत्न करणे. मानवी जीवनाचे अंतिम ध्येय साधण्याकरीता आश्रम धर्माचे पालन करणे हे एक साधन म्हणून मानले गेले असे. आश्रम एकुण चार आहेत. या चारही आश्रमांच्या कर्तव्यांचा

थेडक्यात विचार आपण येथे करू.

1. ब्रह्मचर्य आश्रम :– हिन्दू समाजात बौध्दिक आणि षिक्षित जीवन जगण्यासाठी ब्रह्मचर्य आश्रमाची व्यवस्था करण्यात आलेली होती. या आश्रमाचे पालन केल्याने विद्या आणि षिक्षा यांची प्राप्ती होत असे. मनुष्याच्या नैतिक जीवनाच्या पहील्या अवस्थेला ब्रह्मचर्य आश्रम असे म्हणतात. या आश्रमात मनुष्य 25व्या वर्षापर्यंत गुरू जवळ राहून वेदांचा अभ्यास करीत असे व संयमी जीवन जगत असे. आत्मनिरिक्षण, संतोष, विभिन्न कला आणि विज्ञानाचे अध्ययन करीत असे. ब्रह्मचर्यावस्थेतील षिक्षण आणि षिस्त व्यक्तीला भविष्यकाळातील जीवन जगण्यासाठी उपयोगी पडत असे.

2. गृहस्थ आश्रम :– 25 वर्षे बंहम्चर्य आश्रमाचे पालन केल्यानंतर षिक्षण पूर्ण करून व्यक्ती विवाह करून गष्हस्थ आश्रमात प्रवेष करीत असे. गृहस्थ आश्रम मानवी नैतिक जीवनाची दुसरी अवस्था आहे. हा आश्रम सर्व आश्रमाचे आधार स्थान आहे. ज्याप्रमाणे सर्व नद्या सागरात विलिन होतात त्याचप्रमाणे उर्वरीत तीनही आश्रम कुठल्या ना कुठल्या प्रकारे गृहस्थ आश्रमावर अवलंबून असतात. या आश्रमात पती–पत्नी एक–दुसऱ्याषी सहयुक्त होवून धर्मानुसार व्यवहार करतात. गृहस्थ आश्रमामध्ये देवऋृशी, पित आणि अतिथी ऋणाकरीता प्रयोजन करण्यात आलेली आहे. तसेच धर्म, अर्थ आणि काम या पुरू प्रार्थांची प्राप्ती सुध्दा याच आश्रमात होत असते. गष्हस्थ आश्रमाचा मुख्य उद्देष संतानोत्पत्ती करणे, धन मिळविणे, दान करणे, पत्नी आणि मुलांचे पालन–पोषण करणे, त्यांना षिक्षण देणे, समाज आणि समाजातील अन्य लोकांची सेवा करणे, इतरांना मदत करणे हा आहे. या आश्रमात व्यक्ती त्याग, प्रेम, दया आणि सहानुभूती यांचे षिक्षण घेवून आपल्या सर्व इच्छांची पूर्ति करीत असतो.

3. वानप्रस्थ आश्रम :– वानप्रस्थ आश्रम मनुश्याच्या नैतिक जीवनाची तीसरी अवस्था आहे. गृहस्थाश्रमाची सर्व कर्तव्ये पूर्ण केल्यानंतर मनुष्य या आश्रमात प्रवेश करतो. या अवस्थेत सर्व सांसारीक जीवनाचा त्याग करून जगलात एकांतवासात राहून मनुष्य पारलौकिक जीवनाविषयी विचार करून मोक्ष प्राप्तीसाठी प्रयत्नषील राहतो. तपष्चर्या, समता, दानषीलता, अपरिग्रह आणि सर्व प्राणीमात्रांविषयी दयाबुध्दी ठेवणे हा या आश्रमाचा मुख्य उद्देष आहे. जीवनाच्या या अवस्थेमध्ये मनुष्याला चिंतन, उपवास आणि आपल्या वाईट कर्माकरीता प्रायष्चित करायला पाहीजे. वानप्रस्थ आश्रम मोक्षमार्गाचे दिग्दर्षन करतो.

4. संन्यास आश्रम :– मनुष्याच्या नैतिक जीवनाची चौथी अवस्था म्हणजे संन्यास आश्रम होय. वानप्रस्थ आश्रमानंतर मनुष्य सन्यास आश्रमात प्रवेष करतो. ही पूर्णपणे त्यागाची अवस्था आहे. यात मनुष्य सर्व सांसारीक सुखाचा त्याग करून ईष्वर चितनात मग्न राहतो. या आश्रमात कुटुंबाविषयी, धनाविषयी, लोकांविषयी व्यक्तीला अनासक्त राहून त्याचा पूर्णपणे त्याग करावयाचा असतो. तसेच सर्व प्राणीमात्रांवर प्रेम करणे, सर्व स्वार्थांचा त्याग करणे, परोपकाराच्या भावनेने जगात मानव जीवनाच्या कल्याणकरीता प्रयत्नषील राहत असतो. या आश्रमात सन्यासी भिक्षा मागून भोजन करणे, झाडाखाली राहणे, कुणाची वस्तू न घेणे, कुणालाही विरोध न करणे, आंतरीक व बाह्य शुध्दता पाळणे, वाणीवर नियंत्रण ठेवणे, ब्रह्मचर्य व्रताचे पालन करणे आणि ज्ञानाचा अभ्यास करणे हे सर्व संन्यास आश्रमातील मनुष्याचे धर्म आहे. अशाप्रकारे मनुच्या वर्णाश्रम धर्माचे त्या काळात अनन्य साधारण महत्व होते. प्राचिन भारतीय समाजाला सुव्यवस्थित ठेवण्याकरीता वर्ण व्यवस्था आणि आश्रम व्यवस्था फलदायी आणि उपयुक्त ठरली आहे. जर्मन विद्वान पॉल डायसन यांनी Encyclopaedia of Religion and Ethics मध्ये आश्रम व्यवस्थेबाबत म्हटले आहे की, ''मानवी जीवनाच्या इतिहास ऐवढी उदात्त कल्पना कुठेच दिसून येत नाही.''

समिक्षा :

1. प्राचिन काळात वर्णाश्रम व्यवस्था समाजालासुसंघटित आणि सुव्यवस्थित ठेवण्याचे कार्य करीत असली तरी बदलत्या परिस्थितीमुळे आणि त्यामुळे निर्माण झालेल्या संमस्यांमुळे ही व्यवस्था वर्तमान काळात उपयुक्त ठरू शकत नाही.
2. वर्तमान काळात लोकषाहीची भावना विकसित झाल्यामुळे जीवनयापन करण्याकरीता कोणता व्यवसाय करावा यावर बंधन राहीले नाही. त्यामुळे केवळ जन्मच्या आधारावर वर्ण व्यवस्थेचा स्वीकार करण लोकशाही आणि मानवी समान तेच्या भावनेच्या विरूध्द आहे
3. डॉ. आंबेडकरांनी वर्ण व्यवस्थेची कट्टर आलोचना केलेली आहे. त्यांच्या मते–
4. वर्ण व्यवस्था अवैज्ञानिक, अमानवीय, अलोकतांत्रिक, अनैतिक, अन्यायपूर्ण आणि शोणकारी सामाजिक व्यवस्था आहे.

5. समाजात दिसून येणारी असष्ष्यता वर्ण यवस्थेचा अनिवार्य परिणाम आहे. त्यामुळे वर्ण व्यवस्थेला समुळ नट केल्याषिवाय समाजात दिसून येणाऱ्या अस्पष्यतेच्या भावनेला दूर करता येणार नाही.
6. चतुर्वर्ण प्रणाली वैज्ञानिक नाही. कारण गुणवत्तेच्या आधारे समाजाचे वर्गीकरण करता येत नाही. वस्तूस्थिती ही आहे की व्यक्तीचे स्वरूप नेहमीच बदलते, म्हणून वर्णन केलेल्या गुणांची संबंधित स्थिती देखील नेहमीच बदलत राहाते. या व्यतिरिक्त, चातुर्वर्ण प्रणाली व्यक्तीमध्ये परावलंबन प्रोत्साहित करते.
7. एखाद्या व्यक्तीच्या नैसर्गिक गुणांकडे दुर्लक्ष करणे आणि त्याला वर्णांच्या क्रियाकलापांमध्ये सामील करणे म्हणजे व्यक्तीच्या नैसर्गिक आणि सर्वांगीण विकासाला कुंठीत करणे होय.
8. या व्यतिरिक्त वर्ण प्रणालीतून सामाजिक भेदभाव उद्‌भवू शकतो आणि समाज व्यवस्थेमध्ये समान कार्यासाठी वेगवेगळे उपक्रम आणि नियम वेगवेगळ्या वर्गासमवेत लागू करणे मानवतावादाला कलंकित करणारे आहे. अषी वाईट सामाजिक व्यवस्था भारतीय समाज वगळता इतर कोणत्याही समाजात अस्तित्त्वात असलेली दिसून येत नाही.
9. वर्ण व्यवस्थेमुळे व्यक्ती विषयी द्वेषाची भावना निर्माण होते.
10. वर्ण व्यवस्थेप्रमाणेच आश्रम व्यवस्था सुध्दा वर्तमान काळात उपयुक्त ठरू शकत नाही.
11. आश्रमांची जागा आज शैक्षणिक संस्था आणि विष्वविद्यालय यांनी घेतली आहे. तीथे सर्व वर्गातील लोकांना, मुले–मुलिंना समान वागणूक दिली जाते. त्यामुळे प्राचीन काळातील आश्रम व्यवस्था उपयुक्त ठरत नाही.
12. वर्तमान काळात ब्रह्मचर्य, वानप्रस्थ आणि सन्यास आश्रमाचे जीवनशक्य नाही. या काळात मनुष्य आधुनिक सुखसोयींची अपेक्षा करतो. आधुनिक संन्यासी देखील सुखमय जीवन जगणे पसंत करतात. आध्यात्माची जागा विज्ञानाने घेतली आहे. अषा परिस्थितीत आश्रमाची संकल्पना निशफळ ठरते.

निकर्ष : चातुर्वर्ण व्यवस्था केवळ मानवी समाजासाठी अव्यवहार्यच नाही तर ती हानिकारक देखील आहे. म्हणजे काही मुठभर लोकांच्या वर्चस्वासाठी बऱ्याच लोकांना सर्वहारा बनविण्यात आले. काही लोकांच्या जीवनाच्या विकासासाठी आणि प्रकाषासाठी बऱ्याच लोकांना उदासीन, निराधार आणि गडद करण्यात आले. हे सर्व भारतातच घडले आहे. या राक्षसी व्यवस्थेमुळे इथले बहुसंख्य लोक निर्जीव व अपंग बनले आहे. हेच कारण आहे की इतर समृद्ध देषांप्रमाणे आपल्या देषात सामाजिक क्रांती कधीही झाली नाही. येथील लोकांमध्ये गुलामगिरीतून मुक्त होण्याचे कोणतेही साधन नव्हते. त्यांना सांगण्यात आले की ईष्वरानेच तुमच्या नषिबात गुलामगिरी लिहिली आहे. याचा परिणाम म्हणजे ज्या लोकांना शूद्र बनविले गेले त्यांना ढोबळ गुलामगिरीचे दुःख भोगावे लागले.

आज आपल्याला वर्ण व्यवस्थारहीत एका आदर्ष समाजाची आवष्यकता आहे. अर्थात ज्या समाजात न्याय, बंधुता, समता आणि स्वातंत्र्य आहे तोच खऱ्या अर्थाने आदर्ष समाज आहे. बंधुत्वाचा अर्थ असा आहे की देषात जन्मलेले सर्व लोक बंधू आहेत आणि देषाच्या मालमत्तेवर वडिलांच्या मालमत्तेप्रमाणेच समान अधिकार आहेत. आयुष्यासाठी आवष्यक असलेले अन्न, निवास, औषध आणि षिक्षणावर सर्वांचा समान हक्क आहे. समता म्हणजे सर्वांना समानतेची वागणूक. ही वास्तविकता आहे की सर्व व्यक्ती एकसमान नसतात. प्रत्येक व्यक्ती हा विषेष आणि प्राकृतिक रूपाने दुसऱ्या व्यक्ती पासून भिन्न असतो. परंतु या विषेष आणि प्राकृतिक असमानतेमुळे त्या व्यक्तींमध्ये व्यवहारातसुध्दा असमानता आणने न्याययुक्त नाही. प्रत्येक व्यक्तिला त्याच्यात असलेल्या शक्तीच्या पूर्ण विकासाकरीता समान भावनेने प्रोत्साहन आणि सुविधा उपलब्ध व्हायला पाहीजे. त्याचप्रमाणे मनुष्य हा स्वतंत्र असून प्रत्येक व्यक्तीने त्याच्या स्वातंत्र्याचा सम्मान कायला पहिजे. स्वातंत्र्याचे तत्व असे सांगते की, प्रत्येक व्यक्तीला त्याच्या इच्छेनुसार व्यवसाय आणि आचरण करण्याचे स्वातंत्र आहे. वर्ण व्यवस्थेनुसार कर्म करण्याची व्यवस्था ही एक केवळ कायदेषीर गुलामगीरीची प्रथा आहे.

आश्रम व्यवस्थेबद्दल आपण असे म्हणू की, प्राचीन काळातील आश्रम व्यवस्था वर्तमान काळात जषीच्या तषी स्वीकार करता येत नाही. परंतु चार आश्रमापैकी ब्रह्मचर्य आश्रमातील विचार पध्दती एक संयम पध्दती म्हणून आपण स्वीकारू ाकतो. वर्तमान काळात ब्रह्मचर्य व्रताचे काटेकोरपणे पालन करणे शक्य नसले तरी समाजामध्ये राहण्याकरीता आत्मसंयमाची नितांत आवष्यकता आहे. जेंव्हा समाजातील संयम नष्ट होतो तेंव्ही समाजाचे अधपतन होते. असंयमित जीवन हे प्राण्यांच्या जीवनाप्रमाणे असते आणि म्हणून निरोगी समाजाची रचना संयमाषिवाय ाक्य नाही. तसेच जीवनात शांती आणि समाधान मिळविण्याकरीता गृहस्थ जीवनातून वेळ काढून परोपकार आणि आध्यात्मिक चिंतन करणे गरजेचे आहे.

संदर्भ ग्रंथ सूची

1. *पाठक, दिवाकर .2000. भारतीय नीतिशास्त्र, बिहारः बिहार हिंदी ग्रंथ अकादमी.*
2. *वर्मा, अशोक कुमार .2005. नीतिशास्त्र की रूपरेखा (पाश्च्यात्य और भारतीय), वाराणसीः मोतीलाल बनारसीदास*
3. *मिश्र, हदय नारायण, अवस्थी, जमना प्रसाद .1988. नीतिशास्त्र की भूमिका, चण्डीगढः हरियााणा साहित्य अकादमी*
4. *कुलकर्णी, डॉ. वैशाली .2016. भारतीय नीतिषास्त्र, नागपूरः विश्व पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्यूटर्स*
5. *जोशी प्रा. विद्या. 2004. भारतीय व पाश्च्यात्य नीतिशास्त्र, नागपूरः विद्या प्रकाशन*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

आदिवासी समाजातील सार्वजनिक आरोग्याची स्थिती (समस्या, परिणाम व उपाययोजना)

डॉ.दिलीप पांडुरंग महाजन
प्रोफेसर तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख, एस.पी.एम. तात्यासाहेब महाजन
कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली,
जि. बुलडाणा (म.रा.) 443201

★★★

प्रस्तावना :– चांगले आरोग्य असणे हे एक सामाजिक ध्येय आहे. आपल्या घटनेनेही सार्वजनिक आरोग्यात सुधारणा करणे, लोकांचे राहणीमान सुधारणे, त्यांच्या पोषणाचा स्तर वाढविणे या बाबी सरकार आपल्या प्राथमिक कर्तव्यांपेक्षा भारतीय संविधानाचे कलम 47 नुसार एक मानले तर घटनेच्या 21 व्या कलमात जगण्याचा हक्क येतो. त्यानुसार आरोग्य हा मुलभूत हक्क आहे. घटनेने मुलभूत हक्क म्हणून आरोग्य हक्काची हमी दिली असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने रतलाम नगर पालिकेशी संबंधीत प्रकरणात 1980 साली स्पष्ट केले आहे. सार्वजनिक आरोग्य व औशधीय सुविधेवर गंभीर विचार करुन सामान्य माणसाला खात्रीशिर गुणवत्तापुर्ण औशधीय सुविधा मिळण्याची तजवीज केली आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी सरकार देखील आरोग्य सुविधा व लोकांना दिर्घकालीन गुणवत्तापुर्ण आरोग्याच्या सुविधांची तजवीज करुन कार्यक्षमता, सुलभता, सामर्थ्य, यादृष्टिने विस्तीर्ण मापन करुन लोकसंख्येला पौष्टीक आहार, गुणकारी व प्रतिबंधक औशधांची उपलब्धता करणे, हे शासनासमोर मोठे आव्हान आहे. एड्स, मधुमेह, टी.बी., कॅन्सर, चिकनगुणीया, H_1H_1b- रोगांच्या औशधीय सुवीधांचा साठा वाढविण्याची गरज आहे. तसेच डोंगराळ व आदिवासी भागात औशधीय सुविधांची उपलब्धता करणे निकडीचे आहे. आजही बालमृत्यू, माता मृत्यू प्रमाण कमी करणे गरजेचे आहे. वाढती लोकसंख्या नियंत्रीत करुन आरोग्याची प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी सरकारला आरोग्याच्या हक्काने धोरणात्मक कारवाई करणे अत्यंत आवश्यक आहे. कूपोषणामुळे जुन 2020 मध्ये 2459 तीव्र व मध्यम कुपोषणाची प्रकरणे समोर आली. एकटया बुलडाणा जिल्ह्यात 2019 मध्ये 177, 2020 मध्ये 320, 2021 मध्ये 104 तीव्र कुपोषित बालके आढळली. मानवी जीवन सुदृष्ढ राहण्यासाठी आरोग्याचे वेगळेच महत्व आहे. निरामयी आरोग्य अबाधीत राखण्यासाठी रुग्णालयातुन मिळणारी आरोग्य सेवा त्यासाठी आवश्यक मानली जाते. रुग्णवाहीकांची संख्या महाराष्ट्रात 14974 एवढीच आहे. एक लाख लोकसंख्येमागे फक्त 12 च रुग्णवाहिका असल्याचे निदर्शनास आले. 1979 मध्ये हे प्रमाण फक्त 0.9 इतकेच होते म्हणून या अनुशंगाने ह्या संशोधनावर शोधनिबंधात आदिवासी समाजातील सार्वजनीक आरोग्याची स्थिती (समस्या, परिणाम व उपाययोजना) या विषयावर प्रकाशझोत टाकण्याचा थोडक्यात प्रयत्न करण्याचा आटापिटा संशोधकाने केला आहे.

विषयाचा परिचय : सर्वांसाठी आरोग्य ही जागतिक आरोग्य संघटनेचे दुरदृष्टीमुळे 7 एप्रिल 1948 पासुन यावर भर देण्यात येत आहे. त्यासाठी 1957 मध्ये बळवंतराव मेहता समिती स्थापन करुन या समितीने त्रीस्तरीय पंचायतराज पध्दतीची शिफारस केली. ग्रामिण भागात प्रोत्साहनात्मक प्रतिबंधात्मक व उपचारात्मक सेवा देण्यासाठी प्रत्येक आरोग्य केंद्राच्या अंतर्गत 3 आरोग्य उपकेंद्र अशी रचना केली गेली. लोकांना वैद्यकीय सेवा पुरविणे, संसर्गजन्य आजारांपासून त्यांचे संरक्षण करणे, माता व बाल आरोग्य कार्यक्रम, कुटूंब कल्याण, शालेय आरोग्य, आरोग्य शिक्षण, पोषाहार कार्यक्रम राबविणे, या जबाबदाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रावर सोपविण्यात आल्या, सामान्य क्षेत्रात दर 5000 लोकसंख्येसाठी एक आरोग्य उपकेंद्र तर दुर्गम व डोंगराळ भागासाठी दर 3000 लोकसंख्येसाठी एक उपकेंद्र असा निकश ठरवला गेला. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बाबतही सामान्य क्षेत्रात दर 30,000 लोकसंख्येसाठी एक प्राथमिक आरोग्य केंद्र तर दुर्गम व डोंगराळ भागात दर 20000 लोकसंख्येसाठी एक प्राथमिक आरोग्य केंद्र असा निकश ठरविण्यात आला. आजही याच निकशानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे स्थापन करण्यात येतात.

लोकांना विविध तज्ञ डॉक्टरांच्या सेवा उपलब्ध व्हाव्यात, शस्त्रक्रिया सुविधा, तपासण्या व अन्य उपचा प्राप्त व्हावेत म्हणून दर 4 प्राथमिक आरोग्य केंद्रामागे एक ग्रामीण रुग्णालय अथवा कम्युनिटी हेल्थ सेंटर व प्रत्येक जिल्ह्यासाठी एक सामान्य रुग्णालय अशा पध्दतीने सरकारी आरोग्य संस्थांची स्थापना करण्यात आली.1911 ते 21 या दशकात प्लेगने 30 लाख लोकांचा बळी घेतला. 1918 मध्ये इन्फयुएंझाने 1 कोटी 80 लाख बळी घेतले. आजही कोवीड–19 च्या साथीने 2020 मध्ये लाखो लोक मृत्युला बळी पडत आहेत.

मागील 6 वर्षात पालघर जिल्ह्यात कुपोषणामुळे 3003 बालमृत्यु झाले तर एप्रील ते ऑगस्ट 2020 पर्यंत 140 बालमृत्यु झाले. हेच आकडे मागील 2019 मध्ये 131 बालमृत्यु झाले. 2014–2015 मध्ये 626 बालमृत्यु झालेत या दृष्टीने आदिवासींच्या आरोग्याची स्थिती विचारात घेता यावी म्हणूनच या विशयाचा अभ्यास संशोधन निबंधासाठी निवडण्यात आला आहे.

विषयाचे महत्व :– 1921 नंतरच्या काळात व विशेषतः स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील आरोग्य विशयक सेवा सुविधात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. खेडोपाडी सरकारी दवाखाने सुरु करण्यात आले. त्याचबरोबर खाजगी आरोग्य सेवेचा प्रचार व प्रसार शहरांबरोबरच ग्रामीण भागातही झाला. त्यामुळे प्लेग, देवी, कॉलरा यांसारख्या रोगांमुळे अनेक लोक मृत्युमुखी पडत परंतु स्वातंत्र्योत्तर काळात अनेक रोगांवर प्रभावी औशधे निर्माण झाल्याने साथीच्या रोगांवर नियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे. देवी सारख्या रोगांवर पुर्ण नियंत्रण मिळविणे शक्य झाले आहे. लोकांचे चांगले आरोग्य आर्थिक वृध्दीस हातभार लावते. लोकसंख्येच्या आरोग्यविषयक गरजा भागविण्यासाठी दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध झाल्या पाहिजेत. आदिवासींच्या आरोग्याची काळजी घेणारी व्यवस्था भक्कम करण्यावर भर असावा. आरोग्यसेवा पुरविण्याच्या बाबत सरकारांकडे मोठ्या प्रमाणावर साधन सामुग्री आहे. आदिवासी स्त्रियांच्या आरोग्याबाबत विशेष लक्ष दयावे. बालमृत्युदर कमी करण्यासाठी प्रयत्न व्हावे. देशात आदिवासींच्या कुपोशणाची समस्या गंभीर स्वरुपाची आहे. जगातील आरोग्य संघटनेने केलेल्या आरोग्यसेवेचे सर्वेक्षणात भारताचा 112 वा क्रमांक लागतो. स्वातंत्र्यानंतरच्या 74 वर्षानंतरही देशाच्या एकुण लोकसंख्येच्या 80 टक्के ग्रामीण भागात राहणाऱ्या भारतीयांना आजही आरोग्यासारख्या प्राथमिक सुविधां करिता आधुनिक उपचार पध्दतीपासुन वंचित राहावे लागते ही बाब चिंतेचीच आहे. म्हणून यावर प्रकाशझोत टाकण्यासाठी आदिवासी समाजातील सार्वजनिक आरोग्याची स्थिती समस्या, परिणाम व उपाय हा अभ्यास विषय निवडला आहे.

अभ्यासाची गृहितके

1. डोंगराळ आदिवासी भागात आरोग्य सुविधांचा तुटवडा आहे
2. आदिवासी समाजात अंधश्रध्दांचा पगडा आहे
3. लाभार्थी आदिवासी भागातील आहे
4. आरोग्य असुविधांमुळे कार्यक्षमतेवर व आरोग्यावर परिणाम होतो

संशोधनाची उद्दिष्टे

1. आदीवासी आरोग्य कार्यक्रमांचा अभ्यास करणे
2. आरोग्यावर होणाऱ्या खर्चाचा अभ्यास करणे.
3. आदीवासी क्षेत्रांतील समस्यांचा अभ्यास करणे.
4. आदीवासी क्षेत्रातील आरोग्य समस्यांवर उपाय सुचविणे.

अभ्यासाची संशोधन पध्दती :– सदरचा संशोधन पर शोध निबंध लेखासाठी दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. दुय्यम माहितीसाठी विविध पुस्तके, ग्रंथ, वार्शिकांक, अहवाल, मासिके, साप्ताहिके व विविध दैनिक वर्तमान पत्रे इ. चा उपयोग करण्यात आला आहे. ही साधने आरोग्याषी संबंधीत विषयाशी निगडीत आहेत.

भारतातील व महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण
भारतात आदिवासी लोकसंख्येचे एकुण लोकसंख्येशी असणारे राष्ट्रीय पातळीवरील प्रमाण 8.01 टक्के तर महाराष्ट्रात हेच प्रमाण 9.27 टक्के एवढे आहे.

महाराष्ट्राची एकुण व आदिवासी लोकसंख्या

तपशील	1961	1971	1981	1991	2001
एकुण लोकसंख्या	395.54	504.12	627.84	789.37	968.79
एकुण आदिवासी लोकसंख्या	23.07	38.41	57.72	73.18	85.77
आदिवासी लोकसंख्येची एकुण लोकसंख्येशी टक्केवारी	5.83	7.62	9.19	9.27	8.85

भारतातील आरोग्य सुविधा

अ.क्र.	तपशील	1951	1981	2001
1	प्राथमिक व दुययम आरोग्य केंद्र संख्या 725	57000	164000	
2	डिस्पेन्सरी व दवाखान्यांची संख्या	9200	23000	43000
3	डॉक्टर व वैद्यांची संख्या	62000	270000	500000
4	परिचारिकांची संख्या	18000	144000	737000
5	खाटांची संख्या	117000	570000	870000

महाराष्ट्रातील आरोग्यविषयक स्थिती 2010/आरोग्य निर्देशक

आरोग्य निर्देशक	2010 मधील स्थिती	केंद्राने ठरवुन दिलेले
जन्मदर हजारी	17.9	16
मृत्युदर हजारी	6.6	5
बालमृत्यु दरहजारी	33	17
माता मृत्युदर हजारी	1.3	1.1
नवजात मृत्युदर हजारी	25	15
जन्मदर	2	2.1

महाराष्ट्राची आरोग्यसेवा स्थिती (2013)

राज्यातील डॉक्टरांची एकुण संख्या	:–	218000	एकुण प्राथमिक आरोग्य केंद्रे	:–	1809
ॲलोपॅथी	:–	78000	आदिवासी भाग	:– 315	
होमीओपॅथी	:–	60000	बगर आदिवासी भाग	:–	1494
इंटिग्रेटेड (आयुर्वेद, युनानी)	:–	80000	एकुण उपकेंद्रे	:– 10580	
एकुण परिचारिका	:–	59000	आदिवासी भाग	:– 2076	
(सरकारी 30000 व खासगी सेवेतील 29000)					
बिगर आदिवासी भाग	:–	8504			
एकुण रुग्णालये व दवाखाने	:–	50000	एकुण ग्रामीण रुग्णालये	:–	363
उपजिल्हा रुग्णालये (100 खाटांची) :	–	27	आदिवासी रुग्णालये	:–	67
उपजिल्हा रुग्णालये (50 खाटांची)	:–	56			
बिगर आदिवासी रुग्णालये	:–	4			
महिला रुग्णालये	:–	11			
सुपर स्पेशालीटी रुग्णालये	:–	02			

भारतात महाराष्ट्राचे आरोग्य सुविधांमधील स्थान

सुविधा	:–	स्थान
लसिकरण	:–	9
बालमृत्यु	:–	10
जन्मदर	:–	10
मृत्युदर	:–	10
पुरुषांचे पोषण	:–	11
रुग्णालयातील प्रसुती	:–	14
गरोदर पणातील तपासणी	:–	17
दरडोई आरोग्याचा खर्च	:–	20

राहाणीमानाचा दर्जा	:–	20
स्वच्छतागृहे व शुध्द पाण्याची व्यवस्था	:–	26

महाराष्ट्राची आरोग्यासाठी अर्थसंकल्पीय तरतुद

आरोग्य व अर्थसंकल्पीय तरतुद	(कोटी रुपयात)
2009–10	4474
2011–12	5307
2012–13	6169
2013–14 (अर्थसंकल्पाच्या 3 टक्के)	7400

भारतात दरवर्शी 1.4 दशलक्ष मुले वयाची 5 वर्षे पुर्ण होण्या आधीच मृत्यु पावतात. दरवर्षी अंदाजे 56 हजार माता आपल्या बाळाला जन्म दिल्यादिल्याच जगाचा निरोप घेतात. भारतात दरवर्षी आरोग्यावर होणाऱ्या खर्चामुळे 40 दशलक्ष कुटूंबे दिवाळखोर होतात. योजना आयोगानुसार शहरातील प्रतिव्यक्ती प्रतिदिन 32 रु. व ग्रामीण प्रतिव्यक्ती प्रतिदिन 26 रुपये खर्च करणारा व्यक्ती दारिद्रय रेषेच्यावर मुरला जातो. महाराष्टात आरोग्य खर्च ग्रामीण व शहरी भागासाठी 275 रु. होता. सध्या केंद्र सरकार आरोग्यावर दरवर्षी दरडोई सरासरी 600 रुपये तर राज्य सरकारने सरासरी 1200 रु खर्च करतात. दोन्ही मिळून 1800 रु होतात. जनता आपल्या खिश्यातुन त्याच्या अडीचपटीहुन जास्त म्हणजे दरवर्षी दरडोई 4500 रु खर्च करते.

वर्ष	दरडोई आरोग्यावर खर्च (रुपयात)
2013–14	913
2014–15	973
2015–16	1112
2016–17	1397
2017–18	1657
2018–19	1800

दर / वर्ष	1971	1994	2009	2011	2013	2017	महाराष्ट्र 2011
जन्मदर (दर हजारी)	32.2	–	17.6	21.8	16.7	20.2	16.7
मृत्युदर (दर हजारी)	12.3	–	6.7	7.1	6.3	6.3	6.3
अर्भक मृत्युदर (दर हजारी)	105	74	31	44	25	33	25
माता मृत्युदर (दर हजारी)	–	600	–	–	104	122	104
जनन दर	–	–	–	–	1.9	2.3	1.9

महाराष्ट्राचा विकास झपाट्याने झाला, मात्र सामाजिक विकासाची गती कासवचालीचीच राहिली आहे.

जागतिक पातळीचा विचार केल्यास भुकेच्या निर्देशांकाच्या (हंगर इंडेक्स) क्रमवारीत रवांडा, कंम्बोडीया बुकींना फारसे या देशांच्या भारत मागे आहे. हे देष कमी उत्पन्न देशात मोडतात. पोषण कमतरतेमुळे अर्भक मष्त्यु व बालमृत्यु आजाराच्या प्रमाणात वाढ होते. स्त्रीयांमध्ये पोषणामुळे ॲनिमिया (रक्ताची कमतरता) सुक्ष्म पोषण द्रव्याची कमी, बॉडी मॉस इंडेक्स कमी दिसुन येतो. आरोग्यदायी जीवन जगण्याच्या संधीची कमी व कमी पोषणाचे परिणाम हे स्त्रीयांचे आजार वाढून त्यातुन माता मृत्यूचे प्रमाण व कमी वजनाच्या बाळांचे जन्माचे 250 ग्रॅम वजनापेक्षा कमी वनज जन्माचे वेळी प्रमाण वाढते.

वर्ष	कॅलरिज प्रतिव्यक्ती प्रति दिवस
1993	2432
2004–05	2261

गरीबी, कमी उत्पन्न, अन्नसुरक्षिततेतील कमी, अन्नसुरक्षा व आरोग्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीतील शासकीय विभागाचे अपयश, यांचा एकात्मिक परिणाम मृत्युचे कमी पोषणाचा प्रश्न होय.

भारतातील प्रतिव्यक्ती उत्पन्नात महाराष्ट्रात 33 टक्के लोक स्त्री व पुरुष कमी वजनाचे आहेत. त्यातील 15 टक्के लोकसंख्या तिव्र कमी वजनातील आहेत. 3 वर्षाखालील मुलांमध्ये 40 टक्के मुले कमी वजनाची तर 38 टक्के कमी उंचीची आहेत. महाराष्ट्रात 50 टक्के महिलांचा ॲनिमिक अंगात रक्ताची कमतरता आहेत. 2/3 बालके

ही ॲनिमिक आहेत त्यापैकी 40 टक्के बालके मध्यम व तिव्र ॲनिमिक आहेत. प्रति व्यक्ती प्रति दिवस आवश्यक कॅलरिजची गरज व प्रथिने खाण्याचे प्रमाण शहरी विभागात कमी झाले आहे.

आदिवासी भागातील सार्वजनिक आरोग्य विषयक सुविधा

आदिवासी भागात भुप्रदेश दुर्गम असतो. दळणवळणाची साधने कमी असतात. वेळी अवेळी पुरेशा प्रमाणात आरोग्यसेवा उपलब्ध करुन देता येत नाही. आदिवासी भागातील जनतेच्या राहणीमानाचा दर्जा कमी असुन त्यांचे अज्ञान, मागासलेपणा, कुपोषण, निरक्षरता, जंतुसंसर्ग इ. मुळे आदीवासी भागात वेगवेगळया रोगांचे प्रमाण आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासन आदिवासी भागात विकासाबरोबरच आरोग्यसेवा वेळेवर प्रभावीपणे पुरविण्यासाठी प्रयत्न करीत आहे. आदिवासी उपयोजन क्षेत्रात तातडीने आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी भारत सरकारने आदिवासी भागातील आरोग्य संस्था स्थापन करण्याचे नियम शिथील केले आहेत.

अ.क.	संख्या	लोकसंख्या निकष	
		बिगर आदिवासी क्षेत्र	आदिवासी उपयोजन क्षेत्र
1	प्राथमिक आरोग्य केंद्र	30000	20000
2	उपकेंद्र	5000	3000
3	सामुहीक आरोग्य केंद्र भारत सरकार	120000	80000
	महाराष्ट्र शासन	150000	100000

याव्यतिरीक्त स्थानिक भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता विखुरलेली लोकवस्ती असणाऱ्या डोंगराळ व दुर्गम प्रदेशात प्राथमिक आरोग्य पथके (छोटी प्राथमिक आरोग्य केंद्रे) व फिरती आरोग्य पथके ही स्थापन केली आहेत.

महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्रातील शासनाच्या आरोग्य सुविधा 2008–09

अ.क्र.	आरोग्य सुविधा	संख्या
1	प्राथमिक आरोग्य केंद्रे	321
2	उपकेंद्रे	2037
3	प्राथमिक आरोग्य पथके समिती (मिनी पीएचसी)	100
4	ग्रामीण रुग्णालये	67
5	फिरती आरोग्य पथके	56

आदिवासी क्षेत्रातील आरोग्यविषयक विविध योजना

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान राज्य आरोग्य संस्थाना सहायक अनुदान देण्यात येतात. जीवनदायी आरोग्य योजना, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लोकांना वैद्यकीय मदत करण्यात येते. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु केली आहे. हिवताप निर्मुलन कार्यक्रम राबविण्यात येतो. पल्सपोलीओ प्रतिक्षम कार्यक्रम राबविण्यात येतो.

ग्रामीण रुग्णालयातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील आंतर रुग्णांना आहार सुविधा पुरविणे – आदिवासी भागात प्राथमिक आरोग्य केंद्रात व ग्रामीण रुग्णालयात रुग्ण एकही दिवस राहात नाही कारण येथे आहार सुविधा उपलब्ध नसते. असे रुग्ण वैद्यकिय सल्ल्याशिवाय निघुन जातात. अति संवेदनशील क्षेत्रासाठी आदिवासी प्रकल्पांतर्गत रेस्वयु कॅम्प, मेळघाट पॅटर्न योजना राबविण्यात येतात.

दृष्टीदान योजना – यात मोतीबिंदु शस्त्रक्रिया केलेल्या रुग्णांना चष्मे वाटप केले जाते.

प्राथमिक आरोग्य केंद्र (पी.एच.सी.) – सामुहिक आरोग्य केंद्रे संदर्भ सेवा देणारी संस्था त्यांच्या कार्यक्षेत्रातील रुग्ण प्राथमिक आरोग्य केंद्रे व सामुहिक आरोग्य केंद्रांच्या कामाचे स्वरुप वेगवेगळे आहे. सामुहीक आरोग्य केंद्रात उपचारात्मक सेवा पुरविल्या जातात. प्राथमिक आरोग्य केंद्रात त्यांच्या कार्यक्षेत्रातील गावांसाठी प्रतिबंधात्मक सेवा पुरविल्या जातात.

आदिवासी उपयोजन क्षेत्रात 2023 उपकेंद्रे असून भारत सरकारच्या मार्गदर्शकतत्वानुसार भाडेपट्टयावर उभारण्यात येतात.

प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, ग्रामीण रुग्णालये यांच्या बळकटीकरण व बांधकामासाठी आदिवासी उपयोजनेतुन नियतखर्च उपलब्ध करुन देण्यात येते.

आरोग्य संस्थांना औषधी अनुदाने :– सध्या औषधांच्या किंमती आदिवासी क्षेत्रात मोठया प्रमाणात वाढल्याने तसेच आदिवासी क्षेत्रात तालुका मुख्यालयातील औषधांच्या दुकानात उपलब्ध असतात. आदिवासींची

क्रयशक्ती कमी असल्याने अशा संस्थांना औषधांचा पुरवठा करण्यासाठी पुरवठा दर वाढविले.

जननी सुरक्षा योजना
सुयोजन कार्यक्रम

जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम
एकात्मीक बालविकास कार्यक्रम

शालेय आरोग्य कार्यक्रम
पुरक पोषण आहार कार्यक्रम

प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम
मधल्या वेळेच्या आहाराचा राष्ट्रीय कार्यक्रम

नवसंजिवनी योजना
स्वच्छता राष्ट्रीय रोग नियंत्रण कार्यक्रम
ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम
राष्ट्रीय किटकजन्य रोगनियंत्रण कार्यक्रम
निर्मलग्राम पुरस्कार योजना
कुष्ठरोग निर्मुलन
कुटूंब कल्याण कार्यक्रम
क्षयरोग निर्मुलन
सर्वाजनिक लसीकरण कार्यक्रम
आंत्व नियंत्रण
राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रम
एड्स नियंत्रण
मातृत्व अनुदान योजना
कर्क रोग नियंत्रण
राष्ट्रीय आयेडिन न्युनता विकार नियंत्रण कार्यक्रम
साथरोग नियंत्रण कार्यक्रम
कॉलरा नियंत्रण कार्यक्रम
फ्लोरोसिस प्रतिबंधक नियंत्रण कार्यक्रम
तंबाखू नियंत्रण कार्यक्रम
यॉज निर्मुलन कार्यक्रम इ. योजना राबविल्या जातात.

भारतातील मलेरिया रुग्ण मृत्यू

वर्ष	मलेरिया रुग्ण	मृत्यू
2013	8.86 लाख	440
2014	11 लाख	566
2015	11.6 लाख	381
2016	10.08 लाख	330
2017	6.71 लाख	84

एकट्या मिझोराम मध्ये प्रत्येक एक लाख लोकांमागे 6916 मलेरियाचे रुग्ण आढळतात.

अमरावती विभागात 3 वर्शात अर्भक मृत्यु

जिल्हा	अर्भक मृत्यू
अमरावती	706
अकोला	687
बुलडाणा	547
यवतमाळ	268
वाशिम	208
एकुण	**2416**

1 एप्रिल 2014 ते 31 मार्च 2017 या 3 वर्षात विदर्भात 5243 अर्भक मृत्यु झालेत. त्यापैकी 2416 मृत्यु अमरावती विभागातील पाच जिल्ह्यात झालेत. अमरावती जिल्ह्यातील मेळघाटासह इतर जिल्ह्यातील आदिवासी दुर्गम क्षेत्रात अर्भक मृत्यूचे प्रमाण जास्त आहे. या दरम्यान 260 बाल मृत्युची झाल्याची नोंद आहे. त्यातही अमरावती जिल्ह्यात 151 व बुलडाणा 109 बालमृत्यु झालेत.

मेळघाटाच्या धारणी व चिखलदरा तालुक्यात ऑक्टो.2018 एप्रील ते सप्टे. 2018 या सहा महिन्यात 8 मातांसह 364 बालकांचा विविध आजाराने मृत्यु झाला.

भारताचा व महाराष्ट्राचा आरोग्य व्यवस्थेचे मोजमाप सुचकांक/निर्देशांक :– महाराष्ट्रात आरोग्य व्यवस्थेच्या स्थितीचे मोजमाप जगात सुचकांकाच्या आधारावर मोजले जाते. त्यात त्या राज्यातील प्रतिव्यक्ती पोशण आहाराचे प्रमाण (न्युट्रीशनल इंडेक्स) नवजात मृत्युदर, अर्भक मृत्युदर, माता मृत्युदर, 6 वर्षां पर्यंतच्या बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण, स्त्रियांमधील व किशोर मुलींमधील ॲनॉमिया प्रमाण यानुसार केले जाते.

अमरावती जिल्ह्यातील मेळघाटात 1/4 ते 31/12/2018 या नऊ महिन्यात 500 पेक्षा अधिक बालकांचा कुपोषणाने मृत्यु झाला आहे. तर 150 महिलांचा गर्भपात करण्यात आला आहे. मेळघाटासह इतर आदिवासी बहूल भागातील कुपोशणावर योग्य उपाययोजना कराव्यात असे सुचविल्यावरही सरकारने ठोस कारवाई केली नाही. गेल्या 10 वर्षांपासून कुपोषण दुर करण्यासाठी राजय सरकारवर कडक ताशेरे ओढुनही पाषणहृदयी व असंवेदनशील सरकारवर त्याचा काहीही उपयोग होत नाही. महाराष्ट्रात कुपोषीत बालक ही फार मोठी समस्या आहे. दारिद्र्य, अज्ञान, अशिक्षीत मातेला बाल संगोपनाविषयी च्या ज्ञानाचा अभाव वेळेवर वैद्यकीय मदत व वेळेत न मिळणारा सल्ला यामुळे कुपोषण समस्या गहन होत आहे. कुपोषीत बालकांची

बौध्दीक वाढही पुर्ण होत नाही. त्यामुळे त्यांच्या आकलन क्षमतेवर परिणाम होउन शिक्षणातील त्यांची प्रगती खुंटते. नविन कौशल्ये आत्मसात करण्याची त्यांची क्षमताही कमी असते. परिणामी त्याचा संबंध देशाच्या आर्थिक प्रगतीवर होत आहे. अशी मुले त्यांना लाभलेल्या संधीचा फायदा घेऊ शकत नाही. द्रारीद्रयातुन बाहेर पडु शकत नाही. देशात लहान मुलांमधील कुपोषणाचे प्रमाण गंभीर आहे. शरीराला योग्य व संतुलीत आहार उपलब्ध झाला नाही तर कुपोषण होते. गरोदर स्त्री योग्य आहार घेत नसेल तर तीच्या होणाऱ्या बाळाला देखील पोषण मिळत नाही. परिणामी कुपोषीत बालक व बालमुत्युचे प्रमाण वाढते आहे. मणिपूर, सिक्कीम, मेघालय व अन्य राज्यांची अवस्था महाराष्ट्रापेक्षा वेगळी नाही. आदिवासी समाजात कुपोषणाचे प्रमाण अधिक आहे. महाराष्ट्रातील 36 पैकी 12 जिल्हे आदिवासी बहुल आहेत. पालघर, नंदुरबार, अमरावती, गडचिरोली जिल्हयात कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे. अशाप्रसंगी कुपोषण निर्मुलनाशी संबंधीत योजनांची सांगड घालणे, माहिती मिळविणे, जनजागृतीसाठी माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करणे अर्भक बालकांच्या पोषण आहाराकडे लक्ष देणे आवश्यक आहे. या व्यवस्थांचे नियंत्रण संचालन प्रमाणिकपणे करणे अपेक्षीत आहे. ते होत नसल्याने असे प्रकार घडतीलच हे ही तीतकेच खरे.

आजही गडचिरोली, मेळघाट, नंदुरबार, नाशिकच्या आदिवासी भागात अर्भक मृत्युदर जास्त आहे. गडचिरोली जिल्हयातील कोरचि भागात अर्भक मृत्युदर 92 प्रति हजार जिवंत जन्मप्रमाणे होतात. शासकीय माहितीनुसार आदिवासी दलीत व इतर मागासवर्गीय लोकांमध्ये कॅलरीजची कमतरता, महिलांमधील रक्ताच्या कमतरतेचे प्रमाण जास्त आहे ग्रामीण भागाप्रमाणेच महाराष्टाच्या इतर भागातही कॅलरिजच्या कमतरतेचे प्रमाण 45 टक्के व महिलांमधील रक्ताच्या कमतरतेचे प्रमाण 48 टक्के आहे. महाराष्ट्रातील 30.7 टक्के कुटूंब दारिद्रयरेशेखाली येतात. परंतु प्रतिव्यक्ती प्रतिदिवस कॅलरिज गरजेप्रमाणे ग्रामीण भागासाठी 2400 व शहरी भागासाठी 2900 कॅलरीज ग्रामीण भागात 54.1 टक्के व शहरात 39.5 टक्के आहे. डॉ. अभयबंग यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र बालमृत्यु अभ्यास गटाच्या अहवालानुसार 80 टक्के बालमृत्युची नोंदच होत नाही. आजही आरोग्य विभागाकडे जिल्हावार बालमृत्युंची नोंद नियमित व पुर्णपणे होत नाही.

आता विकासाची व्याख्या बदलवुनच मानव विकास निर्देशांक नुसार राज्यांच्या क्रमांक रॅकिंग देण्यात यायला लागल्याने महाराष्ट्राचा हा मानव विकास निर्देशांक काढतांना जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण, शाळेत प्रवेश घेणाऱ्या मुलांची मुलींचे सरासरी वय प्रतिव्यक्ती उत्पन्न अर्भक मृत्युदर शिक्षणाचा निर्देशांक इ. चा विचार केला जातो. विदर्भातल्या पाहणीनुसार आरोग्य व्यवस्था, आजारपण होवू नये म्हणून प्रतिबंधात्मक योजना, पोषण विषयक योजना, आरोग्य सेवांची हमी आरोग्यविनाव्दारे यांच्या अंमलबजाणी मधील इच्छाशक्ती, मिशन म्हणून काम करण्याची प्रेरणा या सर्वांची कमतरता हेच मुख्य कारण आहे. आजही शासकीय आरोग्य व्यवस्थेत डॉक्टरांची कमी, प्राथमिकस्वास्थ्य केंद्र, ग्रमीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालयांच्या नविन मुख्य इमारती उभ्या असुन त्यात आरोग्य सेवा देणारी पुरेशी यंत्रणा नाही.

मेळघाटात 1993 पासून आजपर्यंत 10 हजारांच्यावर बालमृत्यु झाले आहेत. 2016–17 मध्ये 6 वर्षे वर्यापर्यंतच्या 407 बालकांचा मृत्यु झाला आहे. उपजत मृत्यूंची संख्या 180 इतकी आहे. 22 मातामृत्यु झाले होते. आरोग्य विभागाकडुन मिळालेल्या माहितीनुसार 2017–18 या वर्षात मे 2017 अखेर 36 बालमृत्यु झाले होते. मेळघाटात प्रत्येक महिन्यात 20 ते 30 लहान मुले विविध आजारांनी दगावतात. मेळघाटातील या 36 बालमृत्युपैकी 26 बालमृत्यु हे घरी/रस्त्याने उपचाराआधीच झाले होते. त्याां रुग्णालय सेवा ही मिळू शकली नाही. 20 पैकी 10 बाल मृत्यु हे ग्रामीण रुग्णालय/खासगी रुग्णालयात झाले होते. एका बालकाचा मृत्यु हा शेतात झाला होता. मेळघाटात दरवर्षी 15 ते 20 माता बाळंतपणात दगावतात. हे प्रमाण शहराच्या तुलनेत चिंताजनक आहे. गेल्या वर्षभरात 22 माता मृत्यु झाले होते. संस्था अंतर्गत प्रसुतींचे प्रमाण वाढवण्याचे प्रयत्न फारसे यशस्वी ठरु शकले नाहीत. मेळघाटातील कुपोशण व बालमृत्यु रोखणे अजुनही शक्य होत नाही. ही मोठी शोकांतीका आहे. स्वातंत्रयानंतरच्या 70 वर्षांनंतरही आपण आपले सरकार, प्रशासन हे मृत्यु रोखण्याच्या योग्यतेचे बनू शकलो नाही. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देण्याची गरज असून हा प्रश्न अत्यंत संवेदनशीलतेने हाताळला पाहिजे. असे डॉ. अभयबंग यांनी आपल्या अहवालात म्हटले आहे. जागतीक आरोग्य संघटनेच्या मानांकनाप्रमाणे 250 रुग्णांच्या मागे 1 डॉक्टर असावा. महाराष्ट्रातील प्रमाण 1191 रुग्णांमागे एक डॉक्टर तर गडचिरोली जिल्हयात आदिवासी भागात हे प्रमाण 1100 रुग्णांमागे 1 डॉक्टर असे आहे.मेळघाटात 1997 ते 2018 या 25 वर्षात 14255 बालमृत्यु झालेत. दरदिवर्षी सरासरी एका बालकाचा मृत्यु होतो. मार्च 2018 पर्यंत मेळघाटात 369 बालमृत्यु झालेत. 1997 ते मार्च 2018 पर्यंत 3843 उपजत मृत्यु झालेत तर 2000 ते 2018 पर्यंत 226 माता मृत्युंची नोंद झाली आहे. महाराष्ट्रात दरवर्षी सुमारे 50000 बालमृत्यु होवून प्रत्यक्ष केंद्र शासनाच्या सॅम्पल रजिस्टेशन सिस्टिम अहवाला नुसार स्पष्ट होते. एप्रील 2017 ते फेब्रु. 2018 या काळात 13541 बालमृत्यु झालेत.

विदर्भातील जिल्हयांची मानवविकास निर्देशांकानुसार क्रमवारी 1999–2001 माहिती नुसार

अ.क.	जिल्हा	साक्षरता प्रमाण	शाळेत प्रवेशाचे वय	प्रतिव्यक्ती उत्पन्न सरासरी (93.94) किंमत	अर्भक मृत्युदर प्रमाण	शक्षणाचा निर्देशांक 2001	प्रति व्यक्ती उत्पन्न निर्द.	अर्भक मृत्यु निर्द.	मनव विकास निर्द.	मानव विकास निर्देशांक प्रमाण क्रमांक
1	नागपूर	84.2	6.3	16880	56	0.06	0.58	0.69	0.56	9
2	वर्धा	80.5	6.3	11850	43	0.15	0.79	0.43	0.54	10
3	वाशिम	74	5.4	10435	35	0.37	0.85	0.27	0.50	12
4	अमरावती	83	5.6	10867	50	0.16	0.83	0.57	0.48	15
5	अकोला	81.8	5.4	9682	46	0.21	0.88	0.49	0.47	16
6	भंडारा	78.7	6.1	10234	48	0.20	0.86	0.53	0.47	17
7	गोंदीया	78.7	6.1	9279	48	0.20	0.90	0.53	0.46	18
8	चंद्रपूर	73.1	3.8	12507	47	0.54	0.76	0.51	0.40	22
9	बुलडाणा	76.1	4.3	8709	53	0.43	0.92	0.63	0.34	25
10	गडचिरोली	60.3	4.9	68	29	59	0.70	1.00	0.75	0.18
11	महाराष्ट्र	77.3	5	150	70	48	0.34	0.65	0.53	0.49

आदिवासीं वरील परिणाम :– मेळघाटातील आदिवासी गावांचा संपर्क आधिच बाहेरच्या जगाशी सिमीत ठेवणाऱ्या आदिवासींचे विश्व यामुळे अधिकच समिती होते. पावसाळ्यात नदिनाल्यांचे दुषित पाणी यामुळे आधीच पोट खपाटी गेलेली लेकर आजारी पडू लागतात. हगवण, उलटया, न्युमोनिया यांनी त्यांच्यावर राक्षसी झडप घातल्याने ती पटापट पावसाळ्यात पटापट मरु लागतात. धारणी तालुक्यात ऑगस्ट महिन्यात एका महिन्याच्या काळात 120 बालके मरण पावली. चिखदरा तालुक्यात 40 बालके दगावल्याने मेळघाटाने घेतलेले सोनाळीयाचे रुग्ण पाहून प्रषासन हादरले. आदिवासींचे जीवन प्रकाशमान करण्यास असमर्थ ठरलेल्या शासनाने तात्पुरती मलमपटटी करण्यासाठी मेळघाटात धाव घेतात. शिक्षणापासुन आरोग्यापर्यंतच्या बाबी आदिवासींच्या विकासाचे ढोलबाहेर वाजले तरी प्रत्यक्षात त्यांच्यापर्यंत विकास पोहचलाच नाही. लोकसंख्या वाढ, अंगारवची कातडी हाडांना चिकटलेली बालके, षेतीचे थोडके उत्पन्न, अल्पवयात आदिवासींचे लग्ने, प्रसुती, 2 प्रसुतीतील कमी अंतर या त कुटूंब कल्याण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात षासनपुर्णत अपयषी ठरले. कुपोशणामुळे या भागात दरवर्शी 1500 बालके मरण पावतात. आदिवासी बालकांच्या मृत्युचे नेमके कारण कुपोशण असुन जी षासनाची किव करायला लावणारी आहे. कमी वयात आदिवासी मुलींची लग्ने व दोन भुपत्यांतील कमी अंतरामुळे मोजला असणारे कुपोशण व त्याचा दुध पिणाऱ्या बालकांवर होणारा परिणाम, त्यांच्यातील अज्ञान, षिक्षणाचा अभाव, अंधश्रध्दा, आरोग्य विशयक षिक्षणाचा अभाव, अस्वच्छता आदी आदिवासींमुळे कुपोशीत होण्याची कारणे सांगीतली जातात. मात्र एकात्मीक बालविकास प्रकल्पांतर्गत सुकडीचे वाटप झालेच नाही हे शासनाच्या चुकांवर पांघरुण घालण्यासाठी पुढे केलेल्या सारखे वाटते. तसेच येथील अधिकारी बेजजबाबदारपणे वागतात. गर्भवती मातांची तपासणी नाही, पैसा नसल्याने आदिवासी धान्य उचलत नव्हते कुपोषणासाठी प्रशासनालाच जबाबदार धरले पाहिजे. मेळघाटातील आदिवासी क्षेत्रातील मागासलेपणाचे जीवन जगत असल्याने त्यांचे राहणीमान सुधारण्यासाठी, आर्थिक विकासासाठी विविध योजना राबविणे हे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे काम आहे. त्यासाठी शासकीय आश्रमशाळा, मुलींचे वसतीगृह, आदिवासी शेतकऱ्यांना अनुदानावर वीजपंप, तेलपंप पुरविणे, न्यक्लियर बजेट योजना, पोलीस, सैन्य भरती पूर्ण प्रशिक्षण व विविध प्रकारचे प्रशिक्षण आदिवासी योजना प्रभाविपणे राबविण्यात याव्यात.

भारतातील व महाराष्ट्रातील आदिवासींच्या आरोग्यविषयक समस्या :– आदिवासी क्षेत्र हे डोंगराळ व दुर्गमजंगल भागात असल्याने तिथे विविध सोईंचा अभाव असुन या क्षेत्रात बालकांच्या कुपोषणाचे स्वरुप भयावह आहे. कुपाषणाची कारणे गरिबी, दारिद्रय, पुरक अन्नाची कमतरता, लहान वयात मुलींची लग्ने, एकापाठोपाठ होणारी बाळंतपणे, कुटूंबाचा मोठा आकार, दुषीत पाणी, योग्य वैद्यकीय उपचारांपूर्वी अन्य उपायांचा केला जाणारा वापर, अंधश्रध्दा, अज्ञान, व्यसनाधिनता, आरोग्याची काळजी घेण्याबाबत सर्वसाधारण अनास्था, दळणवळण सोईची कमतरता, सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील दोश इ. सांगता येतील. रक्तात रक्तपेशींचे प्रमाण कमी असेल तर त्याला रक्त अल्पता म्हणतात. सुखवस्तु व मध्यमवर्गीय कुटूंबातही स्त्रीयांमध्ये व बालकांमध्ये रक्त अल्पता दिसुन

येते. सार्वजनिक आरोग्याची मृत्युदर, बालक मृत्युदर, जन्मदर, सरासरी, आर्युमान ही परिमापके महाराष्ट्राच्या सरसरीशी तुलना करता बरीच माघारलेली दिसतात. प्राथमिक आरोग्यकेंद्रे, ग्रामीण रुग्णालयात औशधांचा तुटवडा असतो. रोग्यांना औशधे सहजतेने व नियमीतपणे प्राप्त होत नाही. दवाखान्यातील यंत्र सामुग्री अनेकवेळा बंद पडलेली असते. डॉक्टर्स केंद्रात राहण्यास तयार नसतात. हॉस्पीटलच्या क्षमतेपेक्षा रुग्णांची भरती जास्त असल्याने चांगल्या दर्जाच्या सोई पूरविण्यात अडचणी येतात त्यामुळे रुग्णांमध्ये असंतोश निर्माण होतो. औशध गोळयांच्या व इंजेक्षनच्या किंमतीत वाढ झाल्याने सामान्य रुग्णांना हा खर्च परवडत नाही. यामूळे आरोग्य विशयक सुविधांची मागणी मर्यादित झाली आहे. त्याचा प्रतिकुल परिणाम सार्वजनिक आरोग्यावर होत आहे. दिवसेंदिवस बोगस डॉक्टरांची संख्याही वाढत आहे त्याच्या वरही नियंत्रणे असावीत.

राज्याची आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी डॉक्टरांना ताकद देण्या ऐवजी यंत्रणेत बाबू लोकांना घुसवून डॉक्टरांचे खच्चीकरण केले जात आहे. बालमष्त्यु, कुपोशण, साथीचे आजार, मधुमेह, उच्चरक्त दाब वाढणाऱ्या हष्दयविकार, मज्जा संस्थांचे विकार हे प्रष्न आहे. बालमष्त्यु व कुपोशणामुळे 13 हजाराहून अधिक बालकांचा मष्त्यु महाराश्टात होतात. असे डॉ. अभयबंग यांची आकडेवारी सांगते. बालमष्त्युचे प्रमाण साठ हजार आहे. महाराश्टातील षेतकऱ्यांच्या आत्महत्त्याग्रस्त जिल्हयात मानसिक आजारावर मात करण्यासाठी आरोग्य विभागाने मानसोपचार तज्ञ व मनोविकार तज्ञांची 40 टक्के पदे रिक्त असतांना हा उपक्रम राबविणे अषक्य आहे. आरोग्य विभागाच्या कार्यक्रमांची अंमलबजावणीसाठी पुरेसे डॉक्टरच नाहीत.

आदिवासी बहुल क्षेत्रातील सार्वजनिक आरोग्य सेवेसाठी उपाययोजना :—सार्वजनिक/सरकारी धोरणात सुधारणा घडवून आणणे आवष्यक आहे. सार्वजनिक आरोग्याबाबतचे कायदे कडक करावयाला हवेत. औशधी उद्योगाला चालना देणारे धोरण हवे.

डॉक्टर्स, परिचारिका व इतर सहायकांच्या सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील रिक्त पदे त्वरीत भरण्यात यावित. तसेच वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात डॉक्टरांच्या जादा जागा मंजुर करण्यात याव्यात. सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील रुग्णांना पायाभूत सुविधा पुरविण्यात याव्यात तसेच विषेशज्ञ डॉक्टरांच्या नियुक्त्या कराव्यात. डॉक्टर व रुग्णालयांवरील हल्ल्यांच्या रोखण्याच्या बाबत डॉक्टरांच्या संरक्षणाच्या कडक कायदयाची काटेकोर कडक अंमलबजावणी व्हावी व बोगस डॉक्टरांवर कडक कारवाई व्हावी. वितरण व्यवस्थेसाठी संगणक प्रणाली विकसीत करावी. रुग्णालयांना कर व अन्य सवलती आवश्यक त्या प्रमाणात देण्यात याव्यात. औशधी व अन्न भेसळी विरोधातील कायदयाची कठोर अंमलबजावणी व्हावी. ग्रामीण भागातील सार्वजनिक भेसळ विरोधातील आरोग्य सेवा सुदृष्ढ करण्यात याव्यात. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मुबलक सेवांचे बळकटीकरण करावे.

दुर्गम आदिवासी बहुल भागातील सार्वजनिक आरोग्य सेवांचे बळकटीकरण करावे. स्त्रीभृणहत्त्या रोखणे व त्याबाबतचे कायदण्याची कडक अंमल बजावणी व्हावी. कट प्रॅक्टीस नियंत्रणासाठी कडक कायदा करावा. डॉक्टर व रुग्णांमधील संवाद वाढण्यासाठी विविध उपक्रम आखले जावेत. होमीओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथीच्या प्रॅक्टीसला मान्यता देणे परिचारिकांना अद्ययावत माहिती देण्यासाठी प्रशिक्षण द्यावे तसेच त्यांच्या संरक्षणासाठी कडक कायदा करावा. स्वच्छतेसाठी आधुनिक साधनांचा वापर करावा. परिचारिकांसाठी स्वतंत्र संचालनालय असावे. विमाकंपन्या व रुग्णालयांबाबतचे धोरण निश्चित असावे. वैद्यकीय खर्चात एकसमानता असावी. रुग्णालयांना स्थानिक करातुन सवलत मिळावी, सार्वजनिक रुग्णालयातील वैद्यकीय उपकरणे ठरावीक कालावधीनंतर बदलण्यात यावेत. सर्व सामान्य नागरिकांच्या सुदृढ आरोग्यासाठी भारतातील सर्व नागरिकांना स्वच्छ व शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व्हावा. भारतातील सर्व नागरिकांचे रोग प्रतिबंधक लसीकरण व्हावे. भारतातील असंसर्गजन्य रोगांवर नियंत्रण असावे.सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये मोफत उपचार सर्व नागरिकांना द्यावे. सामान्य नागरिकांसाठी आपातकालीन वैद्यकीय सेवेची सुविधा मोफत उपलब्ध करुन द्यावी.

निष्कर्श :— महाराष्ट्रात आरोग्य व्यवस्थेत मनुष्यबळाचा मोठा तुटवडा असुन एक लाख लोकसंख्येमागे 6 डॉक्टर्स आहेत. तामीळनाडूत हे प्रमाण महाराष्ट्राच्या अडीचपट आहे. आदिवासी क्षेत्रात सेवा देण्यासाठी डॉक्टर्स तयार नाहीत.

महाराष्ट्राच्या आरोग्य व्यवस्थेत मनुष्यबळाचा तुटवडा असण्याची कारणे दरडोई आरोग्य व्यवस्थेवर केला जाणारा खर्च व कामाचा दर्जा व स्वरुप यात असलेल्या तष्टी, औषधांचा उपचारासाठी आवश्यक साधनांचा अपुरा साठा, राहण्यासह कामाच्या ठिकाणी अपुऱ्या सोई सुविधा, वैद्यकीय शिक्षण व सार्वजनिक आरोग्य विभागात असलेला समन्वयाचा अभाव. औषधी वितरणातील भ्रष्टाचार या कारणांमुळे डॉक्टर्स सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत काम करण्यास तयार नाहीत.

प्रगत समजल्या जाणाऱ्या महाराष्टाची आरोग्य सेवा अशक्त असल्याचे निदान आता जनतेनेच केले आहे. त्यामुळे आदिवासी क्षेत्राकडे तज्ञ डॉक्टरांनी सरकारी सेवेकडे पाठ फिरवली आहे. लालफितीचा कारभार, पारंपारिक उपकरणे, राजकीय हस्तक्षेप प्राथमिक आरोग्य केंद्राकडे मधील औषधांचा खडखडाट, अधिकारी, डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागांमुळे आरोग्य विभाग व्याधिंनी जर्जर झाल्याचे आजचे चित्र आहे. सर्वांना दर्जेदार मोफत व नियमित अद्ययावत आरोग्य सुविधा देण्याची गरज सरकारची जबाबदारी आहे. भारताने कल्याणकारी राज्यव्यवस्थेचा स्विकार केल्याने लोकांना योग्यवेळी आरोग्याचा हक्क आहे. मात्र आरोग्याच्या हक्कासाठी नागरिकांना संघर्ष करावा लागत असल्याचे सद्याचे चित्त आहे.

135 कोटी लोकसंख्येच्या भारतात आवश्यकतेपेक्षा केवळ 1/3 डॉक्टर्स रुग्णसेवेकरिता उपलब्ध आहेत. शहरी, झोपडपट्टी, व देशाच्या ग्रामीण व आदिवासी भागात राहणारे 60 ते 70 टक्के भारतीय अजुनही सामान्य पातळीच्या डॉक्टरकडे असलेले आधुनिक वैद्यकीय सेवेपासुन वंचित आहे. ही स्वातंत्रयोत्तर सुमारे 74 वर्षानंतर ही पुर्ण सत्य असलेली एक अत्यंत लाजीरवाणी बाब आहे आजही भारताचा सार्वजनिक आरोग्यावरील खर्च केवळ 1.1 ते 1.3 टक्के च आहे. देशाचा आरोग्यावरील खर्च 5 ते 6 टक्के अपेक्षीत आहे.

सारांश :– चांगले आरोग्य असणे हे एक सामाजिक ध्येय आहे. आपल्या घटनेनेही सार्वजनिक आरोग्यात सुधारणा करणे, लोकांचे राहणीमान सुधारणे, त्यांच्या पोशणाचा स्तर वाढविणे या बाबी सरकार आपल्या प्राथमिक कर्तव्यांपेक्षा भारतीय संविधानाचे कलम 47 नुसार एक मानले तर घटनेच्या 21 व्या कलमात जगण्याचा हक्क येतो. त्यानुसार आरोग्य हा मुलभूत हक्क आहे. घटनेने मुलभूत हक्क म्हणून आरोग्य हक्काची हमी दिली असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने रतलाम नगर पालिकेशी संबंधीत प्रकरणात 1980 साली स्पष्ट केले आहे. सार्वजनिक आरोग्य व औषधीय सुविधेवर गंभीर विचार करुन सामान्य माणसाला खात्रीशिर गुणवत्तापुर्ण औषधीय सुविधा मिळण्याची तजवीज केली आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी सरकार देखील आरोग्य सुविधा व लोकांना दिर्घकालीन गुणवत्तापुर्ण आरोग्याच्या सुविधांची तजवीज करुन कार्यक्षमता, सुलभता, सामर्थ्य, यादृष्टिने विस्तीर्ण मापन करुन लोकसंख्येला पौष्टीक आहार, गुणकारी व प्रतिबंधक औषधांची उपलब्धता करणे, हे शासनासमोर मोठे आव्हान आहे. एड्स, मधुमेह, टी.बी., कॅन्सर, चिकनगुणीया, H_1H_1b- रोगांच्या औषधीय सुवीधांचा साठा वाढविण्याची गरज आहे. तसेच डोंगराळ व आदिवासी भागात औषधीय सुविधांची उपलब्धता करणे निकडीचे आहे. आजही बालमृत्यू, माता मृत्यू प्रमाण कमी करणे गरजेचे आहे. वाढती लोकसंख्या नियंत्रीत करुन आरोग्याची प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी सरकारला आरोग्याच्या हक्काने धोरणात्मक कारवाई करणे अत्यंत आवष्यक आहे. कूपोषणामुळे जुन 2020 मध्ये 2459 तीव्र व मध्यम कुपोषणाची प्रकरणे समोर आली. एकटया बुलडाणा जिल्ह्यात 2019 मध्ये 177, 2020 मध्ये 320, 2021 मध्ये 104 तीव्र कुपोशित बालके आढळली. मानवी जीवन सुदृढ राहण्यासाठी आरोग्याचे वेगळेच महत्व आहे. निरामयी आरोग्य अबाधीत राखण्यासाठी रुग्णालयातुन मिळणारी आरोग्य सेवा त्यासाठी आवश्यक मानली जाते. रुग्णवाहीकांची संख्या महाराष्ट्रात 14974 एवढीच आहे. एक लाख लोकसंख्येमागे फक्त 12 च रुग्णवाहिका असल्याचे निदर्शनास आले. 1979 मध्ये हे प्रमाण फक्त 0.9 इतकेच होते. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान राज्य आरोग्य संस्थाना सहायक अनुदान देण्यात येतात. जीवनदायी आरोग्य योजना, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लोकांना वैद्यकीय मदत करण्यात येते. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु केली आहे. हिवताप निर्मुलन कार्यक्रम राबविण्यात येतो. पल्सपोलीओ प्रतिक्षम कार्यक्रम राबविण्यात येतो.

ग्रामीण रुग्णालयातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील आंतर रुग्णांना आहार सुविधा पुरविणे – आदिवासी भागात प्राथमिक आरोग्य केंद्रात व ग्रामीण रुग्णालयात रुग्ण एकही दिवस राहात नाही कारण येथे आहार सुविधा उपलब्ध नसते. असे रुग्ण वैद्यकिय सल्ल्याशिवाय निघुन जातात. अति संवेदनशील क्षेत्रासाठी आदिवासी प्रकल्पांतर्गत रेस्वयु कॅम्प, मेळघाट पॅटर्न योजना राबविण्यात येतात.

दृष्टीदान योजना – यात मोतीबिंदु शस्त्रक्रिया केलेल्या रुग्णांना चष्मे वाटप केले जाते.

प्राथमिक आरोग्य केंद्र (पी.एच.सी.) – सामुहिक आरोग्य केंद्रे संदर्भ सेवा देणारी संस्था त्यांच्या कार्यक्षेत्रातील रुग्ण प्राथमिक आरोग्य केंद्रे व सामुहिक आरोग्य केंद्रांच्या कामाचे स्वरुप वेगवेगळे आहे. सामुहीक आरोग्य केंद्रात उपचारात्मक सेवा पुरविल्या जातात. प्राथमिक आरोग्य केंद्रात त्यांच्या कार्यक्षेत्रातील गावांसाठी प्रतिबंधात्मक सेवा पुरविल्या जातात. आदिवासी उपयोजन क्षेत्रात 2023 उपकेंद्रे असून भारत सरकारच्या मार्गदर्शकतत्वानुसार भाडेपट्टयावर उभारण्यात येतात. प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, ग्रामीण रुग्णालये यांच्या बळकटीकरण व बांधकामासाठी आदिवासी उपयोजनेतुन नियतखर्च उपलब्ध करुन देण्यात येते.

आरोग्य संस्थांना औषधी अनुदाने :– सध्या औषधांच्या किंमती आदिवासी क्षेत्रात मोठया प्रमाणात वाढल्याने तसेच आदिवासी क्षेत्रात तालुका मुख्यालयातील औषधांच्या दुकानात उपलब्ध असतात. आदिवासींची क्रयशक्ती कमी असल्याने अशा संस्थांना औषधांचा पुरवठा करण्यासाठी पुरवठा दर वाढविले. महाराष्ट्रातील 30.7 टक्के कुटूंब दारिद्रयरेशेखाली येतात. परंतु प्रतिव्यक्ती प्रतिदिवस कॅलरिज गरजेप्रमाणे ग्रामीण भागासाठी 2400 व शहरी भागासाठी 2900 कॅलरीज ग्रामीण भागात 54.1 टक्के व शहरात 39.5 टक्के आहे. डॉ. अभयबंग यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र बालमृत्यु अभ्यास गटाच्या अहवालानुसार 80 टक्के बालमृत्युची नोंदच होत नाही. आजही आरोग्य विभागाकडे जिल्हावार बालमृत्युंची नोंद नियमित व पुर्णपणे होत नाही. आता विकासाची व्याख्या बदलवुनच मानव विकास निर्देशांक नुसार राज्यांच्या क्रमांक रॅकिंग देण्यात यायला लागल्याने महाराष्ट्राचा हा मानव विकास निर्देशांक काढतांना जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण, शाळेत प्रवेश घेणाऱ्या मुलांची मुलींचे सरासरी वय प्रतिव्यक्ती उत्पन्न अर्भक मृत्युदर शिक्षणाचा निर्देशांक इ. चा विचार केला जातो.

विदर्भातल्या पाहणीनुसार आरोग्य व्यवस्था, आजारपण होवू नये म्हणून प्रतिबंधात्मक योजना, पोषण विशयक योजना, आरोग्य सेवांची हमी आरोग्यविनाव्दारे यांच्या अंमलबजाणी मधील इच्छाशक्ती, मिशन म्हणून काम करण्याची प्रेरणा या सर्वांची कमतरता हेच मुख्य कारण

आहे. आजही शासकीय आरोग्य व्यवस्थेत डॉक्टरांची कमी, प्राथमिकस्वास्थ्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालयांच्या नविन मुख्य इमारती उभ्या असुन त्यात आरोग्य सेवा देणारी पुरेशी यंत्रणा नाही. मेळघाटात 1993 पासून आजपर्यंत 10 हजारांच्यावर बालमृत्यु झाले आहेत. 2016–17 मध्ये 6 वर्षे वर्यापर्यंतच्या 407 बालकांचा मृत्यु झाला आहे. उपजत मृत्यूंची संख्या 180 इतकी आहे. 22 मातामृत्यु झाले होते. आरोग्य विभागाकडुन मिळालेल्या माहितीनुसार 2017–18 या वर्षात मे 2017 अखेर 36 बालमृत्यु झाले होते. मेळघाटात प्रत्येक महिन्यात 20 ते 30 लहान मुले विविध आजारांनी दगावतात. मेळघाटातील या 36 बालमृत्युंपैकी 26 बालमृत्यु हे घरी/रस्त्याने उपचाराआधीच झाले होते. त्यां रुग्णालय सेवा ही मिळू शकली नाही. 20 पैकी 10 बाल मृत्यु हे ग्रामीण रुग्णालय/खासगी रुग्णालयात झाले होते. एका बालकाचा मृत्यु हा शेतात झाला होता. मेळघाटात दरवर्शी 15 ते 20 माता बाळंतपणात दगावतात. हे प्रमाण षहराच्या तुलनेत चिंताजनक आहे. गेल्या वर्षभरात 22 माता मष्त्यु झाले होते. संस्था अंतर्गत प्रसुतींचे प्रमाण वाढवण्याचे प्रयत्न फारसे यशस्वी ठरु शकले नाहीत. मेळघाटातील कुपोषण व बालमृत्यु रोखणे अजुनही शक्य होत नाही. ही मोठी षोकांतीका आहे. स्वातंत्रयानंतरच्या 70 वर्शांनंतरही आपण आपले सरकार, प्रषासन हे मष्त्यु रोखण्याच्या योग्यतेचे बनू षकलो नाही. या गंभीर प्रष्नाकडे लक्ष देण्याची गरज असून हा प्रष्न अत्यंत संवेदनषीलतेने हाताळला पाहिजे. असे डॉ. अभयबंग यांनी आपल्या अहवालात म्हटले आहे. जागतीक आरोग्य संघटनेच्या मानांकनाप्रमाणे 250 रुग्णांच्या मागे 1 डॉक्टर असावा. महाराश्टातील प्रमाण 1191 रुग्णांमागे एक डॉक्टर तर गडचिरोली जिल्हयात आदिवासी भागात हे प्रमाण 1100 रुग्णांमागे 1 डॉक्टर असे आहे.

मेळघाटात 1997 ते 2018 या 25 वर्शात 14255 बालमृत्यु झालेत. दरदिवशी सरासरी एका बालकाचा मृत्यु होतो. मार्च 2018 पर्यंत मेळघाटात 369 बालमृत्यु झालेत. 1997 ते मार्च 2018 पर्यंत 3843 उपजत मृत्यु झालेत तर 2000 ते 2018 पर्यंत 226 माता मृत्युंची नोंद झाली आहे. महाराष्ट्रात दरवर्शी सुमारे 50000 बालमृत्यु होवून प्रत्यक्ष केंद्र शासनाच्या सॅम्पल रजिस्टेशन सिस्टिम अहवाला नुसार स्पष्ट होते. एप्रील 2017 ते फेब्रु. 2018 या काळात 13541 बालमृत्यु झालेत.महाराष्ट्रात आरोग्य व्यवस्थेत मनुष्यबळाचा मोठा तुटवडा असुन एक लाख लोकसंख्येमागे 6 डॉक्टर्स आहेत. तामीळनाडूत हे प्रमाण महाराष्ट्राच्या अडीचपट आहे. आदिवासी क्षेत्रात सेवा देण्यासाठी डॉक्टर्स तयार नाहीत. महाराष्ट्राच्या आरोग्य व्यवस्थेत मनुष्यबळाचा तुटवडा असण्याची कारणे दरडोई आरोग्य व्यवस्थेवर केला जाणारा खर्च व कामाचा दर्जा व स्वरुप यात असलेल्या तष्टी, औषधांचा उपचारासाठी आवष्यक साधनांचा अपुरा साठा, राहण्यासह कामाच्या ठिकाणी अपुऱ्या सोई सुविधा, वैद्यकीय शिक्षण व सार्वजनिक आरोग्य विभागात असलेला समन्वयाचा अभाव. औषधी वितरणातील भ्रष्टाचार या कारणांमुळे डॉक्टर्स सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत काम करण्यास तयार नाहीत. प्रगत समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्राची आरोग्य सेवा अशक्त असल्याचे निदान आता जनतेनेच केले आहे. त्यामुळे आदिवासी क्षेत्राकडे तज्ञ डॉक्टरांनी सरकारी सेवेकडे पाठ फिरवली आहे. लालफितीचा कारभार, पारंपारिक उपकरणे, राजकीय हस्तक्षेप प्राथमिक आरोग्य केंद्राकडे मधील औषधांचा खडखडाट, अधिकारी, डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागांमुळे आरोग्य विभाग व्याधिंनी जर्जर झाल्याचे आजचे चित्र आहे. सर्वांना दर्जेदार मोफत व नियमित अद्ययावत आरोग्य सुविधा देण्याची गरज सरकारची जबाबदारी आहे. भारताने कल्याणकारी राज्यव्यवस्थेचा स्विकार केल्याने लोकांना योग्यवेळी आरोग्याचा हक्क आहे. मात्र आरोग्याच्या हक्कासाठी नागरिकांना संघर्श करावा लागत असल्याचे सद्याचे चित्त आहे. 135 कोटी लोकसंख्येच्या भारतात आवश्यकतेपेक्षा केवळ 1/3 डॉक्टर्स रुग्णसेवेकरिता उपलब्ध आहेत. शहरी, झोपडपट्टी, व देशाच्या ग्रामीण व आदिवासी भागात राहणारे 60 ते 70 टक्के भारतीय अजुनही सामान्य पातळीच्या डॉक्टरकडे असलेले आधुनिक वैद्यकीय सेवेपासुन वंचित आहे. ही स्वातंत्र्यत्तर सुमारे 74 वर्षानंतर ही पुर्ण सत्य असलेली एक अत्यंत लाजीरवाणी बाब आहे आजही भारताचा सार्वजनिक आरोग्यावरील खर्च केवळ 1.1 ते 1.3 टक्के च आहे. देशाचा आरोग्यावरील खर्च 5 ते 6 टक्के अपेक्षीत आहे.

संदर्भ सुचि :–

1. *आरोग्याचे अर्थशास्त्र (2019) – प्रा.डॉ.राजेंद्र आर.गव्हाळे, प्रा.डॉ. दिलीप पी.महाजन, ज्योतीचंद्र पब्लीकेशन, लातुर*
2. *Health & Health Care In Maharashtra – A Status Report (www.pdffactory.com)*
3. *Buletin Unique academy – Aug. 2017*
4. *स्पर्धा परिक्षा अर्थशास्त्र 2 (2017) आर्थिक व सामाजिक विकास – डॉ.किरण जी.देसले दिपस्तंभ प्रकाशन, जळगांव*
5. *SRS सांख्यिकीय रिपोर्ट – 2013*
6. *अस्सा हा महाराष्ट्र (2014) के.सागर के सागर पब्लिकेशन्स पुणे*
7. *भारतीय अर्थव्यवस्था (2009) – प्रा.एन.एल.चव्हाण प्रशांत पब्लिकेशन जळगांव*
8. *Interlink Reasearch Analysis – Dr.Balaji Kamble, LoLFk – डॉ. दि.पां.महाजन, डॉ.रा.रा.गव्हाळे*
9. *भारत 2013 – प्रा.डॉ.राजेंद्र रसाळ – Success Publications Pune-30*
10. *अर्थमंथन 2010 – मराठी अर्थशास्त्र परिशद – प्रगती मुद्रण, कुळगांव बदलापूर*
11. *अर्थविश्व 2011 – मराठी अर्थशास्त्र परिशद – क्रिएटीव्ह पब्लिकेशन, नांदेड*
12. *महाराष्ट्र : 50 वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा – दि.व्य. जहागिरदार सेंटर फॉर एकॉनॉमिक ॲण्ड सोशल स्टडीज, अमरावती*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

ग्रामीण दारिद्रय, रोजगार व आर्थिक विकास

प्रा. गिराम मनोज बाबुराव
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
एच. पी. टी. आर्ट्स ॲण्ड कॉलेज रोड, नाशिक

★★★

गोशवारा – स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय अर्थव्यवस्थेचा नियोजनबद्ध आर्थिक विकास करणे हे एक महत्त्वाचे धोरण ठरविण्यात आले व पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून विकासाची उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न होताना दिसून येत आहे. यामध्ये विशेषत बेकारी कमी करून रोजगाराच्या अधिकाधिक संधी निर्माण करणे यावर भर दिला जात आहे. भारतात बेरोजगारी ही समस्या स्वातंत्र्यानंतर आणखी मोठ्या प्रमाणावर उभी राहीली असेही म्हणता येईल, म्हणून भारतातील दारिद्रय व बेरोजगारीची समस्या कमी करण्यासाठी तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून खऱ्या अर्थाने प्रयत्न करण्यात येते

बीजशब्द – ग्रामीण, रोजगार, राहणीमान, बेकारी, पंचवार्षिक योजना, दारिद्रय.

प्रस्तावना – भारत हा कृशीप्रधान देश असल्याने भारतात ग्रामीण भागात श्रमिक हा महत्वाचा घटक आहे. त्या श्रमिकांस शेतीमध्ये पूर्णवेळ काम मिळत नाही, तर केवळ हंगामामध्ये काम मिळते. इतर वेळी काम करण्याची इच्छा असून देखील काम मिळत नाही म्हणून हंगामी बेकारी निर्माण होते. देशातील बेकारी नष्ट करणे किंवा ती कमी करणे हे सरकारचे उदिष्ट आहे. म्हणूनच काम करण्याची इच्छा असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस काम देण्याची जबाबदारी सरकारची असते. यातून दारिद्रय निर्मूलनही झपाट्याने कसे करता येईल हेही पाहणे तितकेच महत्वाचे आहे. प्रभावी दारिद्रय निर्मूलनासाठी शाश्वत आर्थिक विकास अत्यंत आवश्यक आहे, असे अनेक अर्थतज्ञांचे मत आहे. १९९० साली जागतिक बँकेने केलेल्या सर्वेक्षणानंतर हाच निष्कर्श काढण्यात आला. "विकास किंवा वृद्धी गरिबांसाठी चांगली आहे" या सूत्रावर आधारीत विकासाच्या प्रवाहात वंचित आणि दुर्लक्षित घटकांचेही उत्थान होते, हा निष्कर्श या सर्वेक्षणातून काढण्यात आला.

भारतीय अर्थव्यवस्था ही मिश्र स्वरूपाची अर्थव्यवस्था असून भारतीय राज्यघटनेमध्ये वेगवेगळी मार्गदर्शन तत्वे आहेत. या तत्त्वांच्या सूचीमध्ये प्रत्येकास रोजगाराची संधी प्राप्त करून देण्याचा प्रयत्न सरकारने करावा असा उल्लेख आहे. सरकारने बेरोजगारी निर्मूलनासाठी पहिल्या तीन पंचवार्षिक योजनांमध्ये अनेक रोजगारपूरक कार्यक्रम राबविले, परंतु बेकारी कमी झाली नाही. भारतात महाराष्ट्र सरकारने रोजगार हमी योजनेची सुरुवात १९६९ मध्ये करून ग्रामीण भागातील नागरीकास काम काही अंशी रोजगाराचा हक्क प्राप्त करून दिला आहे. महाराष्ट्रातील योजनेची यशस्वीता पाहून भारत सरकारने २००५ मध्ये राष्ट्रीय पातळीवर रोजगार हमी योजना सुरू केली, म्हणून ग्रामीण भागाच्या दृष्टीने या योजनेला अधिक महत्व असल्याचे दिसून येते.

विकास, रोजगार आणि दारिद्रय यांच्यातील आंतरसंबंध अर्थतज्ञांसाठी एक चर्चा आणि वादाचा मुद्दा राहिला आहे. विकासाचा दारिद्रयावर कितपत परिणाम होईल हे त्याच्या रोजगार निर्मितीच्या क्षमतेवर अवलंबून असते. भारतात एकंदर विकासाचा दर चांगला राहूनही रोजगार निर्मितीचा परिणाम आणि दर्जा खालावलेला राहिला आहे. प्रामुख्याने रोजगार निर्मिती अल्प उत्पादकता असलेल्या अनौपचारीक क्षेत्रात झालेली आहे. दारिद्रय व बेरोजगारी या संपूर्ण अर्थव्यवस्थेलाच भेडसावणाऱ्या दोन गंभीर समस्या आहेत. 'बेरोजगारी व दारिद्रय या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहे.' रोजगार निर्मिती हा आर्थिक विकास आणि दारिद्रय निर्मूलन, रोजगार निर्मिती, उत्पन्नाचे सामाजिक वर्ग आणि क्षेत्रनिहाय समान वाटप भारतातील आर्थिक धोरणांची प्रमुख उद्दिष्टये राहिली आहेत.

संशोधन विषयाची निवड – भारतासारख्या विकसनशील देशाने बेरोजगारीचा वाढलेला भस्मासुर कमी करण्यासाठी आणि ग्रामीण भागात रोजगाराच्या संधीत वाढ करण्यासाठी, शासन स्तरावर विविध पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून नियोजनबद्ध आर्थिक विकासाची सुरुवात १९५१ पासूनच केली खरी परंतु त्यातून म्हणावा तसा आर्थिक विकासही झाला नाही व बेकारीची समस्या सुद्धा सुटलेली नाही. म्हणूनच ग्रामीण भागाच्या दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या रोजगार योजना व त्यातून आर्थिक विकास कसा साध्य करता येईल या उद्देशाने संशोधकाने संशोधन करण्याचे ठरविले आहे. त्या अनुशंगाने वरील विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

संशोधन विषयाची उद्दिष्टये – प्रस्तुत संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी पुढील संशोधन उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहे.

१) पंचवार्षिक योजनांच्या आढाव्यातून आर्थिक विकासाचे महत्व काय ? ते पाहणे.

२) पंचवार्षिक योजनांमधील ग्रामीण विकासाचे कार्यक्रम शोधून त्यांचा अभ्यास करणे.

३) ग्रामीण विकास योजनांची यशस्विता तपासणे.

४) ग्रामीण रोजगार व आर्थिक विकास साध्य करण्यासाठी महत्वपूर्ण षिफारषी सुचविणे.

संशोधन विषयाची गृहीतकृत्य – प्रस्तुत संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी पुढील संषोधन गृहीतके निश्चित करण्यात आलेली आहे.

१) शासनाच्या नियोजनबद्ध धोरणामुळे बेकारीचा प्रश्न सुटला आहे.

२) ग्रामीण रोजगार योजनांमुळे ग्रामीण भागातील मजुरांची राहणीमान पातळी सुधारली आहे.

३) ग्रामीण रोजगार योजना यशस्वी झाल्या आहे.

संशोधन पद्धती – प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी द्वितीयक साधनसामुग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे. या दृष्टिकोनातून वरील विषयाच्या संशोधनासाठी विशेषत वर्णनात्मक व विष्लेशणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला गेला आहे. व्दितीयक साधनसामग्रीमध्ये संदर्भग्रंथ, नियतकालिके, मासिके, वर्तमानपत्रे इत्यादी लिखीत साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

मुख्य विषय – भारत सरकारने योजना काळात बेरोजगारी दूर करणे व दारिद्रय निर्मूलन करणे, या दुहेरी हेतूने पुढील महत्त्वाचे कार्यक्रम सुरू केले. यातील सामुदायिक विकास कार्यक्रम १९५२, राष्ट्रीय विकास सेवा १९५५, अवर्शणप्रवण कार्यक्रम १९७०, किमान गरजा कार्यक्रम १९७२, कामासाठी धान्य कार्यक्रम १९७७, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम १९७९, ट्रायसेम १९७९, जवाहर रोजगार योजना १९८९, रोजगार अष्वासक योजना १९९३, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना २००५ इत्यादी कार्यक्रम केंद्र सरकार व राज्य सरकारने राबविले आहेत. या आर्थिक विकास योजनांच्या माध्यमातून लोकांच्या जीवनमानात असलेली दरी कमी करण्यासाठी केंद्र सरकारद्वारा सतत प्रयत्न केले जात आहे.

याचबरोबर ग्रामीण विकास मंत्रालयाने ग्रामीण भागाच्या विकासाच्या अनेक योजना राबविल्या आहेत. त्यांचा मुख्य हेतू दारिद्रय निर्मूलनविशयक कार्यक्रमांना बळकटी आणणे हा होता. परंतु आतापर्यंत सुद्धा देषात मोठ्या प्रमाणावर दारिद्रय कमी झाले नाही व त्यामुळे देशातील गरिबीचे प्रमाण सुद्धा फारसे कमी झाले नाही. भारतातील दारिद्रय प्रमाण काढण्यासाठी विविध संघटना व अर्थतज्ञांनी खालील आकडेवारीचा आधार घेतलेला दिसून येतो.

१) नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑर्गनायझेशन NSSO ची आकडेवारी.

२) नॅशनल अकाउटन्स स्टॅटेस्टिक्स (NA)

३) सेंट्रल स्टॅटिस्टिक्स ऑर्गनायझेषन (CSO)ची आकडेवारी

वरील आकडेवारीचे विश्लेषण करत असतांना वेगवेगळे दृष्टिकोन वापरल्या–मुळे भारतातील दारिद्रयरेशेबाबत काढलेल्या निष्कर्शात नेहमीच तफावत आढळते. मार्फत मिळालेल्या आकडेवारी मध्येही संभाव्य त्रुटी आढळून येतात.

जागतिक बँक संबंधित अर्थतज्ञांच्या मते, "आर्थिक वृद्धी हा दारिद्रय कमी करण्याबाबतचा सर्वात महत्वाचा निर्धारक घटक आहे. आर्थिक वृद्धी झाल्याने सरासरी उपभोगात वाढ होते. त्यामुळे दारिद्रयात घट होते, असे या अर्थतज्ञांचे मत आहे.

प्रा. डी. टी. लकडवाला समितीने १९७३–७४ च्या किंमतीनुसार दारिद्रयरेशा ठरवितांना पुढील निकश वापरले.

१) ग्रामीण भागांसाठी दरमहा खर्च करण्याची क्षमता रु. ४९.०९
२) शहरी भागांसाठी दरमहा खर्च करण्याची क्षमता रु. ५६.६४

वरील राकामेव्दारे ग्रामीण भागांमध्ये २,४०० कॅलरीज तर शहरी भागांमध्ये २,१०० कॅलरीज यांचा पुरवठा करू शकणारे अन्नधान्य दरडोई प्रतिदिन मिळण्याची तरतूद मान्य करण्यात आली.

ग्रामीण दारिद्रयाविषयीचे विविध अभ्यास – दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनंतर ग्रामीण भागाच्या विकासाकडे खऱ्या अर्थाने लक्ष देण्यास सुरुवात झाली. मोठ्या प्रमाणावर विचारमंथन झाले व बऱ्याच अर्थतज्ज्ञांनी त्यासाठी अभ्यास करून काही निकश मांडले, पुढील प्रमाणे.

अ} दांडेकर आणि रथ यांचा अभ्यास– या अभ्यासानुसार १९५०–६१, १९६७–६८ आणि १९६८–६९ या वर्शात दारिद्रयरेशेखालील कुटुंबांच्या संख्येचे प्रमाण ग्रामीण भारतासाठी ४० : वर्तवण्यात आले असून ते इतर वर्षासाठी सारखेच आहे.

ब} मॉंटेकसिंग अहलुवालिया यांचा अभ्यास – मॉंटेकसिंग अहलुवालिया यांच्या अभ्यासाप्रमाणे १९५६–५७ मध्ये ५४.१ : असलेले दारिद्रयाचे प्रमाण कमी होऊन १९६०–६१ मध्ये ३८.९ : झाले. त्यानंतर त्यात वाढ होऊन १९६७–६८ मध्ये ५६.८ : झाले आणि त्यानंतर परत हे प्रमाण कमी होऊन १९७३–७४ मध्ये ४६.

क} ओझा यांचा अभ्यास – ओझा यांच्या अभ्यासाप्रमाणे १९६०–६१ मध्ये दारिद्रयाचे प्रमाण ५१.८ तर १९६७–६८ मध्ये हे प्रमाण ७० : असे होते.

ड} नियोजन मंडळ व जागतिक बँकेचा अभ्यास नियोजन मंडळ व जागतिक बँक यांच्याकडून १९७० नंतर दारिद्रयाचा अभ्यास करण्यात आला. यामध्ये जागतिक बँकेच्या अभ्यासाप्रमाणे ग्रामीण भागातील दारिद्रय–रेशेखालील कुटुंबांच्या संख्येचे प्रमाण १९७० मध्ये ५३ :, १९८३ मध्ये ४४.६ : आणि १९७८ मध्ये ४१.७ : होते. नियोजन मंडळाच्या अभ्यासानुसार १९८३ मध्ये ४०.४ : आणि १९८७–८८ मध्ये ५२.७ : असे हे प्रमाण होते.

तक्ता क्र. १ भारतातील निवडक राज्यातील दारिद्रयाचे प्रमाण २००६–०७

अ.क्र.	राज्य	ग्रामीण	नागरी	एकूण
०१	बिहार	४४.८	३२.७	३८.७५
०२	ओरिसा	४१.७	३७.५	३९.६
०३	मध्यप्रदेश	२८.७	३१.८	३०.२५
०४	उत्तर प्रदेश	२४.२	२६.२	२५.२
०५	पश्चिम बंगाल	२१.६	६.०	१५.४५
०६	महाराष्ट्र	१७.६	१५.२	१६.५५
०७	राजस्थान	११.१	१५.४	१३.२५
०८	आंध्रप्रदेश	४.६	१६.०	११.८
०९	कर्नाटक	७.८	८.०	७.९
१०	तामिळनाडू	३.७	९.६	६.६५
११	भारत	२०.६४	२०.४४	२०.५४

संदर्भ – दहावी पंचवार्शिक योजना महाराश्ट्राची आर्थिक पाहणी वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, बिहार या राज्यांमध्ये दारिद्रयाचे प्रमाण ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागात अधिक आहे. तसेच ओरिसा, मध्यप्रदेष, उत्तरप्रदेष या राज्यांमध्ये सुद्धा दारिद्रयाचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते तर महाराष्ट्र मध्ये ग्रामीण दारिद्रय १७.६ : तर नागरी दारिद्रयाचे प्रमाण १५.४ : आढळून येते. याचबरोबर कर्नाटक व तामिळनाडू राज्यांचा विचार केला तर तेथे दारिद्रयाचे प्रमाण बरेच कमी असल्याचे दिसते.

भारतातील महत्वाच्या पंचवार्षिक योजना व रोजगार निर्मिती कार्यक्रम रू – १९५१ पासून नियोजनाची सुरुवात होऊन ग्रामीण भागाच्या लोकांची राहणीमान पातळी सुधारायची असेल तर ग्रामीण भागात रोजगार संधी मध्ये वाढ करणे गरजेचे आहे, असा मतप्रवाह पुढे आला व सरकारने ग्रामीण विकास करण्यास सुरुवात केली. त्याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे.

१} पहिली पंचवार्षिक योजना – १ एप्रिल १९५१ ला सुरू झालेल्या या योजनेत सार्वजनिक क्षेत्रात २,०६९ कोटी रु. खर्च करण्याचे सुरुवातीला ठरविण्यात आले, परंतु प्रत्यक्षात या क्षेत्रात १,९६० कोटी रू. खर्च करण्यात आले.

२} दुसरी पंचवार्षिक योजना – दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात प्रत्यक्षात ४,६०० कोटी रु. सरकार–कडून खर्च करण्यात आले. दुसरी पंचवार्षिक योजना आधिक महत्वाकांक्षी होती. या योजनेत ग्रामीण भागाच्या विकासासाठी ग्रामीण उद्योग कार्यक्रम १९५७, ग्रामीण आवासी परियोजना १९५७, विशेष पॅकेज कार्यक्रम १९६० इत्यादी ग्रामीण विकासाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात आली.

३} तिसरी पंचवार्षिक योजना – या योजनेच्या सुरुवातीला मोठ्या प्रमाणावर बेकारी वाढली. त्यामुळे रोजगार निर्मिती करणे महत्वाचे होते. तसेच उत्पन्न व संपत्तीतील विषमता कमी करण्यासाठी काही योजनांची अंमलबजावणी करण्यात आली. त्यामध्ये ग्रामीण उद्योग परियोजना १९६२, कृशी क्षेत्र विकास कार्यक्रम १९६४, शेतकरी प्रशिक्षण किंवा शिक्षा कार्यक्रम १९६६, विहीर निर्माण कार्यक्रम इत्यादी योजनांची अंमलबजावणी करण्यात आली.

४} चौथी पंचवार्षिक योजना – या योजनेमधून ग्रामीण विकास कार्यक्रम १९६९, ग्रामीण लोकषक्ती कार्यक्रम १९६९, ग्रामीण रोजगार साख कार्यक्रम १९७१, अवर्शणप्रवण क्षेत्र कार्यक्रम १९७० व क्षेत्र विकास कार्यक्रम १९७२ या योजना राबविल्या गेल्या.

वरील योजनांबरोबरच इतर सर्व पंचवार्षिक योजनेतून रोजगार हमी योजना, रोजगार अश्वासक योजना, पंतप्रधान ग्रामसडक योजना, इंदिरा आवास योजना, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, २० कलमी कार्यक्रम असे अनेक योजनांच्या माध्यमातून आतापर्यंत मोठ्या प्रमाणावर रोजगार देण्याचे काम सरकारने केलेले आहे. आपण असेही म्हणू शकतो की, या योजनांमुळे ग्रामीण राहणीमान पातळीत प्रचंड सुधारणा झाली आहे.

निष्कर्श – 'ग्रामीण दारिद्रय, रोजगार व आर्थिक विकास' या विषयाचा अभ्यास करत असतांना ग्रामीण भागातील लोकांच्या आयुष्यात काय बदल झाले, याचाही अभ्यास करण्यात आला. त्याचे निष्कर्ष खालीलप्रमाणे.

१) नियोजनाच्या सुरुवातीला ७० : पेक्षा अधिक असलेले दारिद्रयाचे प्रमाण आज २६ : पर्यंत केली झालेले आहे.

२) वेगवेगळ्या अभ्यासगटांकडून दारिद्रयाचा अभ्यास जरी झाला असला तरी त्यांचे निष्कर्ष जवळपास सारखेच आहेत.

३) विविध पंचवार्षिक योजना काळात देशाचा आर्थिक विकास वेगाने झालेला दिसून येतो.

४) रोजगार हमी योजना व रोजगार अश्वासक योजना यांच्या माध्यमातून ग्रामीण जनतेला रोजगाराची हमी जप्त झाली आहे.

५) सरकारने आर्थिक विकासाच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर खर्च केलेला दिसून येत असल्या तरी त्याची अंमलबजावणी योग्य रीतीने न झाल्यामुळे व पारदर्शकतेच्या अभावामुळे भ्रष्टाचाराचे प्रमाणही वाढलेले दिसून येते.

शिफारसी – १) वेगवेगळ्या ग्रामीण रोजगार योजनांच्या कायद्यातील तरतुदींची योग्य अंमलबजावणी तसेच लहान शेतकरी व दारिद्रयरेषेखालील लोक यांच्या विकासासाठी देशातील ग्रामीण रोजगार योजनांनी कार्य करावे.

२) सरकारच्या नियोजनबद्ध विकासामुळे बेरोजगारीचा प्रश्न म्हणावा तसा सुटलेला नाही. त्यामुळे योजना कार्यान्वित करत असतांना त्यामध्ये एकवाक्यता असावी व ती पूर्णत्वाकडे कृषी जाईल यासाठी प्रयत्न व्हावेत.

३) मजुरांच्या राहणीमान पातळीत वाढ करण्यासाठी ग्रामीण विकास योजना प्रत्येकापर्यंत पोहोचवाव्यात.

४) इंदिरा आवास योजना, पंतप्रधान आवास योजना (ग्रामीण), शबरी आवास योजना अशा योजनांमधून अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींना अधिक घरकुले देऊन त्यांनाही विकासाच्या मुख्य प्रवाहात आणावे.

५) बेरोजगारी कमी करण्यासाठी विविध ग्रामीण रोजगार योजनांचा रोख शहरांकडेही वळवला पाहिजे. यामुळे शहरी बेरोजगारी कमी होण्यास मदत होईल.

समारोप – वरील शिफारशींचा अवलंब करून सरकारने योग्य ती पाऊले उचलली तर निश्चित ग्रामीण दारिद्र्य कमी होऊन देशात रोजगार वाढून आर्थिक विकास जलद गतीने होण्यास मदत होऊ शकते.

संदर्भ सूची –

1) *Rudra Datta and Sundaram Indian Economy] since Independence Ed- Uma Kapila] Academic Foundation] New Delhi-*

2) *कविमंडल विजय (२००६), 'ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टिकोन रू नीती, कार्यक्रम आणि व्यवरचना', मंगेश प्रकाशन, नागपूर.*

3) *देसाई संदीप (२००४), भारतापुढे सध्या प्रश्न आहे तरी कोणते ? योजना मासिक, अंक एप्रिल २००४.*

4) *कै. डॉ. श्री. मु. देसाई, डॉ. सौ. निर्मला भालेराव (२०११), 'भारतीय अर्थव्यवस्था', निराली प्रकाशन, पुणे.*

5) *जगताप डी. आर., वाणी नीता, जंगले मंगला, पाटील डी. जी. (२०१३), 'भारतीय अर्थव्यवस्थाय एक दृष्टिक्षेप', प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

स्त्रिवादी दृष्टिकोनातून महात्मा ज्योतिबा फूले

डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे,
विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग, वसंतराव नाईक शासकीय कला
व समाजविज्ञान संस्था, नागपूर.

★★★

प्रस्तावना : जग एकविसाव्या शताकडेच नाही तर ज्ञानयुगाकडे वाटचाल करीत आहे. भारताने ही विज्ञान, तंत्रज्ञान, आकाशगंगा क्षेत्रात प्रगती केली असली तरी ही स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन फारसा सकारात्मक झालेला आढळत नाही. जागतिकीकरण, पश्चिमात्यीकरण, उत्तर आधुनिकीकरण प्रवाहात शिक्षणाच्या धर्तीवर पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांनी सर्वक्षेत्रात पदार्पण केले आहे. समाजात मध्यकाळात प्रबोधन चळवळ जी सुरू झाली त्यातून स्त्रीला प्रतिष्ठा सन्मानाची वागणूक दिली पाहिजे ही विचारसरणी रूजू होऊ लागली. ज्या समाज सुधारकांनी स्त्रीयांना सन्मानाने वागावे, व्यवस्थित आयुष्य जगता यावे, याकरीता संपूर्ण आयुष्यभर श्रम घेतले, त्यातून स्त्री शिक्षणाची, स्त्री दृष्टिकोनाची चळवळ सुरू झाली. समाजातील सामाजिक सुधारणेच्या कार्याला नवी दिशा प्राप्त झाली. त्यातूनच एकविसाव्या शतकात महिला सक्षमीकरणाला बळ प्राप्त झाले. प्रस्तुत शतकातील आव्हानांना, विवचनांना, रूढीवादी दास्यातून तोंड देण्यासाठी 'स्त्रीशक्ति' उभी झाली. स्त्रिया या कमजोर, दुर्बल, निर्णयरहीत, अबला नसून सक्षम आहे. ही प्रेरणा स्त्री पुर्नस्थापना, पुनरूत्थानासाठी कार्य करणाऱ्या समाजसुधारकांनी समाजाला करून दिले. स्त्री शिक्षणाने, कतृत्वाने कुठेही कमी नाही, तरी स्त्रियांमध्ये तत्वज्ञ, समाजचिंतक, राज्यकर्त्या, साहित्यीक, मंचावर विराजमान स्थितीचे अवलोकन केले असल्यास तिचे प्रमाण कमी आहे. असे असून ही समाजाच्या मार्गदर्शनासाठी स्त्रियांनी विचार प्रस्तुत केला आणि समाजाने मान्य केला हा अनुभव कमी येतो. यासाठी पुरूषप्रधान संस्कृतीची मानसिकता, व्यवस्था, सामाजी करणाच्या प्रक्रियेत क्रांतीकारी परिवर्तन अपेक्षित आहे. कुटुंबाला, समाजाला नैतिक वळण लावण्याचे कार्य चांगल्या संस्कारातून स्त्री करू शकते. पण त्यासाठी स्त्रीचे जीवनमान, स्तर, दर्जा सुधारणे गरजेचे आहे.

हे शिक्षणाशिवाय शक्य नाही. म्हणून स्त्रियांना समानता, शिक्षण देणे गरजेचे समजून विश्वज्ञान प्रतीक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे गुरू क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फूले यांनी स्त्रि जीवनाला, कार्याला, अधिकाराला, दृष्टिकोनाला नवी दिशा दिली. ज्याप्रमाणे डॉ. आंबेडकरांनी मतदानाचा हक्क स्त्रीला प्रदान केले, कायद्याद्वारे स्त्रीला समानतेचा अधिकार संविधानाच्या माध्यमातून प्रदान केला त्याप्रमाणे ज्योतिबा फूले यांनी स्त्री–पुरूष विशमतेला तिलांजली देऊन समानतेचे जे बीज समाजात रूजविण्याचे कार्य केले. स्त्रीला स्वतःचे कर्तृत्व, राजकीय, सामाजिक, तांत्रिक, आर्थिक, शैक्षणिक, साहित्यीक, सांस्कृतीक क्षेत्रात अतिशय संघर्ष करावा लागतो. विसाव्या शतकात जगत असतांनाही स्त्रियांवर होणरे अत्याचारात उत्तरोत्तर वाढतच आहे, रूढीवादी विचार, परंपरा, सामाजिक, निर्बंध, यातून स्त्रीला मुक्त करण्यासाठी प्रस्थापित समाज व्यवस्थेविरूध्द महात्मा ज्योतिबा फूले यांनी समाज सुधारणेचे जे कार्य हाती घेतले, त्याचा परिणाम होय. स्त्रिला दुर्बल, कमजोर, अबला मानून तिचा षारीरीक, मानसिक, शाब्दिक, आर्थिक, सांस्कृतिक रित्या तिला प्रताडित केले जायचे, जिथे स्त्रिशक्तीचा अपमान वारंवार होताना दिसायचा, स्त्री–पुरूष विशमतेचा विचार ठान मांडून होते, अशा समाजात स्त्रीच्या अस्तित्वासाठी लढा देणाऱ्या महात्मा ज्योतिबा फूले यांनी स्त्रियांच्या उत्थान, प्रगती, विकास, पुर्नरूत्थापन, पुर्नसमाजमांडणी, शिक्षणाची व्यवस्था केली. हुंडा, बालविवाह, विधवा केशवपन, बहुपत्नीक यासारख्या अनिष्ठ प्रथावर लेखणी, कृती, बंड द्वारा हल्ला चढविला. स्त्रिरक्षण, सन्मान, सक्षमीकरण व्यवस्था व सुधारण केली.

महात्मा ज्योतिबा फूले यांनी भारतातील प्रथम स्त्री शिक्षण, शिक्षण तज्ञ, स्त्री मुक्ती चळवळीची नेता, पददलितांची कैवारी, प्रौढ शिक्षणाच्या पुरस्कर्ता, विधवांचा आधारस्तंभ क्रांतिज्योती सावित्रीबाई फूले यांना घडविले. त्यांचे स्त्रीविषयक कार्य स्त्रीकल्याणाच्या दृष्टिने महान आहे. सावित्रीबाई फूले च्या स्वरूपाने स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात संधी प्राप्त करून देण्याचे दालन खऱ्या अर्थाने महात्मा फूले यांनी खुले केले. महात्मा फूले केवळ स्त्री नेतृत्व व महिलांच्या कल्याणासाठी झटले नव्हे तर, स्त्रियांच्या हक्कासाठी, स्त्री शिक्षणासाठी, स्त्री–पुरूष समतेचा विचार रूजविण्यासाठी विचार व कृतीच्या आधारे स्त्री पुर्नरूत्थानाचे महान कार्य केले.

ज्याप्रमाणे दक्षिणेत पेरियार रामास्वामी यांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी शाळा, प्रशिक्षण केंद्र, महाविद्यालयांची स्थापना करून स्त्री शिक्षणाची गरज आहे असा दक्षिणेत प्रचार केला. एवढेच नव्हे तर त्या काळात स्त्रियांना तांत्रिक शिक्षण प्राप्त व्हावे यासाठी स्वतंत्र अभियांत्रिकी महाविद्यालय ही स्थापन केले. स्त्रीला शिक्षण, संधी दिल्यास ती पुरूशांपेक्षा कधीही मागे राहत नाही असे सूचविले तसेच महात्मा ज्योतिबा फूले यांनी पूरोगामी महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रवाह प्रवाहित केला. स्त्रियांनी सामाजिक क्रांतीत, प्रत्यक्ष परिवर्तनात, चळवळीत सहभाग केला नाही तर ती अपूर्ण राहू शकते. हे सत्य महाराष्ट्रातील कर्ता समाजसुधारकांना पटले, त्यांनी ते ओळखले. पुरूषसत्ताक, धर्मधिष्टित व्यवस्था, समाजसंरचनेच्या व्यवस्थेत भारतीय समाजात स्त्री–पुरूष विषमतेच्या व पारतांत्र्यांच्या बधिस्थः पिढयान्पिढयात

स्त्री बंदिस्तच राहिली. तिचा दर्जा, स्थान, स्थिती गौण राहिली. तिच्या वेदना, अपमान, दुःख, विवंचनाकरीता समाजात न्याय मिळत नव्हता. स्वतःच शोषित असूनही धर्मशास्त्राच्या मंजुरीने प्रगट झालेल्या शोषणाला प्रगट करता येत नव्हते. स्त्री सर्व दुःखाकरीता नियतीमुळेच, दैवीप्रकोप, समजण्यातच आयुष्याची इतिकर्तव्यता आहे हे ती गृहित धरू लागली. परंतु या मुळाशी काही स्वार्थपरायण, अनिष्ट,सर्वला न्यायसंगत मानणारे, लोभी, धर्मपाखंडी आहेत ज्यांनी स्त्रीला तिचे हक्क, अधिकार, चेतना, मिमांसा प्रगट होण्याची संधीच निर्माण होऊ दिली नाही म्हणून तिच्या विद्याग्रहणाला प्रतिबंध घातला या शब्दात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्पष्ट केले.

ज्योतिबांची लेखनातील स्त्रीवादी परिप्रेक्ष्य :– ज्योतीराव फूलेंची भाषाशैली अनेक दृष्टिने उद्‌बोधक होती. लेखन प्रपंचावर उच्चवर्णीयांची तेव्हा मिरासदारी असूनही ज्योतिरावांनी विपुल लेखन केले. समाजातील निरक्षर, अज्ञानी, कष्टोपजीवी अशा समस्त स्त्रीया, शुद्रातिशुद्र समाज, आपला श्रोतावाचक चिंतनाविषयी समजून विविध संदर्भाने लेखन कार्य केले. शोषितांच्या मनात स्वतःच्या गुलामीची जाणीव जागवून तिच्याबद्‌दलची चिड त्यांच्या मनात पेरायची आणि स्त्रीयांचा अन्याय, सामाजिक अनादर स्त्रीयांचे विविध प्रश्न, स्त्रीयांवरील अत्याचार, स्त्री शिक्षण व उपदेशपर नाटके इत्यादी विषयांवर ज्योतीरावांनी विपुल लेखन कार्य केली.

समाजिक समस्यांना हात घालणारे, सामाजिक बांधिलकी सांगणारे, सर्वार्याने आधुनिक असणारे पहिले मराठी नाटक तसेच तष्तीय रत्न या नाटकाचे विष्लेशण करावे लागले. स्त्री –शुद्रातिशुद्रांना धर्माच्या नावाखाली कसे लुबाडले जाते आणि ख्रिस्ती धर्मोपदेशक कसे त्याला ज्ञानाचा मार्ग दाखवितात हे शोषित समाजाच्या लक्षात आणून देणे हा या नाटकाचा मुख्य उद्‌देष्ट होता.

शिवाजीचे कर्तृव्य स्त्री–पुरूषांच्या हिताचे करणारा छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा 1869 मध्ये गावोगावी जावून मौखिक संवादात्मक लेखनशैलीचा अवलंब करून लिहिला. उच्चवर्णीयांचे स्त्री शोषणाचे प्रकार, धर्माच्या नावे उच्चवर्णीयांची भूलथाप 1869 मध्ये 'ब्राम्हणांचे कसब' या पुस्तकात प्रसिद्‌ध केले.

युनाइटेड स्टेट्स मधील सदाचारी लोकांना गुलामीच्या दास्यातून मुक्त करण्याच्या उद्‌देशाने त्यांना औहार्य, निरपेक्षता व परोपकारी दृष्टि दाखविली. उच्चवर्णीयांच्या दास्यातून मुक्त करणारा हा ग्रंथ होता. प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे असे 1882 मध्ये हंटर आयोगासमोर त्यांनी निवेदन केले. शिक्षण खालच्या वर्गापासून झिरपत जावे असे शैक्षणिक धोरण आखण्याचे त्यांनी इंग्रजांना आव्हान केले. शेतकऱ्यांच्या खालावलेल्या परिस्थितीचे प्रत्यक्ष अवलोकन 1883 मध्ये 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात केले. शेतकरी वर्गाचा जीवनक्रम आणि शेतीविषयक प्रश्न यांचे इतके समग्र, सखोल आणि आस्थेवाईक चित्रण ज्योतीराव फूल्यांपूर्वी बहुतेक कोणीच केले नसावे. त्यांनी समाजाचे सामर्थ आरोग्य, लोकांच्या अन्नवस्त्राची प्राथमिक गरजांच्या परिपूर्तीवर अवलंबून असल्यामुळे आधुनिक औद्योगिक समाजाचा खरा पणा अन्नउत्पादक शेतकरी वर्गच असतो अशी समाज शास्त्रीय भूमिका मांडली. अस्पृश्यंच्या दयनीय स्थितीचे चित्र 1883 मध्ये 'अस्पृश्यांची कैफियत' या ग्रंथात केली. 1885 मध्ये 'इशारा' हा ग्रंथ लिहिला. तर नवयुगाला अनुरूप अषा नव्या धर्माची उभारणी करणे त्यांना आवष्यक वाटते. म्हणून त्यांना अभिप्रेत असलेल्या मानव कल्याण धर्माची रूपरेशा मांडली. हा ग्रंथ 'विश्व कुटुंबशहाचा सार्वजनिक सत्यधर्म' हा जाहीरनामा आहे. 1991– काव्यरचना, 1885–सत्य शोधक समाजीकता मंगललाष्टकसह पूजाविधी, 1891 सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट 1977 दुष्काळाविषयी विनंतीपत्र कसे समाजहिताचे लेखन कार्य केले.

एकोणिसावे शतक हे पुरूषसत्ताक पद्‌धतीसाठी सुवर्ण युग होते. कारण त्या काळात कालविसंगत परंपरा व प्रधानाच्या प्रभावातून समाज हा मुक्त झाला नव्हता. आधुनिक शिक्षणाचा थोडाफार प्रमाणत प्रारंभ झालेला असला तरी स्त्रियांच्या यातना बंद झाल्या नव्हत्या. शिक्षणावर उच्चवर्णीय जातींची मक्तेदारी (मिरासदारी) जवळपास कायम होती. नवविचाराचे वारे थोपविण्यामध्ये परंपरावादी सशक्त होते. जनतेचा रोष होईल व आपल्या राजकारणात अडचणी निर्माण होतील. या स्वार्थी हितसंबंधासाठी शासनकर्ते, राजकर्ते, सामाजिक सुधारण घडवून आणण्यासाठी पुढाकार घेण्यात तयार नव्हते. परंपरावादी आणि सुधारणावादी यांच्यात परस्पर संघर्ष सुरू होता. अष्या प्रतिकुल परिस्थितीत महात्मा फुले यांनी स्त्री अधिकारविषयक विचार मांडले आणि ते विचार प्रत्यक्षात साकार करण्यासाठी प्रत्यक्ष कार्यही केले.

तात्कालीन समाजातील स्त्रियांची स्थिती :– महात्मा फूलें ज्या चळवळीच्या कालखंडात स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती. समाज संरचनेत त्यांना हिन दर्जा होता. स्त्री ही सुखाची व उपभोगाची वस्तू आहे अषी समजूत त्या काळात समाजात रूढ होती. स्त्री ही पुरूषांपेक्षा कनिष्ठ आहे. तिचे कार्य चुल आणि मूल एवढयापुरतेच मर्यादित आहे असे मानले जात होते. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता.त्यांनी शिक्षण घेतल्यास त्या आणि शिक्षण सुध्दा भ्रष्ट होते. अशी कल्पना समाजात रूढ होती. हे सर्व बदलले पाहिजे अशी भूमिका महात्मा फूलेंनी घेतली. त्याकाळात जरठ विवाह प्रचलित होता त्यामुळे बालविधवांची संख्या वाढत होती. विधवांनी केशवपन केले पाहिजे अशी सक्ती होती. त्यांना अशुभ मानले जात असे. समारंभात सहभागी होण्यावर त्यांच्यावर बंधने लादण्यात आली होती. यामुळे त्यांच्यावर अंधारात बसुन जीवन जगण्याची पाळी आली होती. विधवा स्त्रीला कोणी फसविले, तिच्या असहाय्यतेचा फायदा घेतला किंवा एखादयावेळेस तिचे पाऊल वाकडे पडले तर त्यासाठी ती व्यक्ती जबाबदार आहे असे समजून तिला कठोर शिक्षा दिली जात असे. विधवा स्त्रियांना फसविणारे पुरूष सही सलामत सुटून जात असत. समाजातील स्त्रियांच्या दुःखाचे निवारण करण्याचे कार्य केले. हे कार्य करीत असतांना त्यांनी सर्व जातीतील सर्व स्त्रियांचा विचार केला.

महात्मा फूलेंच्या टिकात्मक परिक्षणात स्त्री समस्या महत्वाचा मुद्दा होता. कुप्रथांना शह देण्यासाठी फूल्यांनी स्त्रिया व तळागाळातील लोकांच्या शिक्षणावर भर दिला. ऑमवेट यांच्या मते स्त्री–पुरूष विशमता जातीच्या उत्तरंडीशी जोडून स्त्रियांचा प्रश्न एकूण परिवर्तनाचा अंगभूत मानण्याचे होय. महात्मा फूले यांचे मत आहे. पुनर्विवाहाची परवानगी नसलेल्या, फसवणुकीतून होणाऱ्या संततीच्या हत्या रोखण्यासाठी 'बालहत्या प्रतिबंधक गृहाची' स्थापना करून स्वतः अनौरस मुलगा दत्तक घेऊन फूल्यांनी हा प्रश्न स्त्रियांच्या अनैतिकतेचा नसून लैंगिकतेवरील संरचनात्मक नियंत्रणाचा आहे हे स्पष्ट केले. विधुत भागवत यांच्या मते स्त्रियांचे दास्यत्व भारतीय समाजातील दारिद्रय व अवनीती याकडे फूले यांनी समग्र दृष्टिकोनातून पाहिले.

महात्मा ज्योतिबा फूले म्हणतात की, माझ्याकरीता नेहमी दुःखाचे

कारण म्हणजेच स्त्री समाज राहिला आहे कारण समाजाने त्यांना समाजाचे पृथ्थक एकक मानले. तिला केवळ कुटुंबाचे घटक मानले. अनादिकाळापासून शोशण, अत्याचार, उत्पीडा स्त्रिलाच कां? आज महिला अत्याचार हिंसेचे प्रमाण वाढतच आहे. स्त्रिशी जुडलेला कुप्रथा, तत्वज्ञ, चिंतक, समाज सुधारकांकरीता आव्हान आहे. परंपरावादी समाज, रूढीबंधता, धार्मिक कट्टरता, समाजातील कुप्रथा दुर करण्यास पहाडाची भूमिका केली आहे. उच्च समजल्या जाणाऱ्या समाजांनी नेहमीच स्त्रीसुधार कार्यात अडथळे निर्माण केले. त्यांची इच्छा समाजातून सतीप्रथा, विधवा पुनर्विवाह, स्त्री शिक्षणाचा प्रसार, बालविवाह बंद झाल्या पाहिजे या बद्दल ते सहमत नव्हते. वेळ आणि परिस्थिती यांनी चिंतक, समाज सुधारक,तत्वज्ञ, तत्ववेत्ता निर्माण केले. पुर्नजागरण कालखंडात समाज सुधारकांनी स्त्री समस्या निराकरण करण्यास बहुमूल्य योगदान दिले. भारतीय जाती व्यवस्था, वर्णव्यवस्था, धार्मिक रूढीवादीता यामुळे वर्ण, जाती व्यवस्थेतून व्यक्तिंमध्ये विशमतेची लक्ष्मण रेषा ओढली. इतकेच नाही तर राजनितिक व्यवस्था, सत्तानिती यामुळे ते अजुन मजबूत झाले. सामंतवादी व्यवस्थानी निम्न जातींतील लोकांचे शोषण केले. तत्कालिन समाजात भारतीय नवजागरण आणि स्त्री सशक्तीकरण एक चळवळीच्या स्वरूपात उदयास आली. धर्माच्या नावावर धार्मिक शिक्षणाचे उपदेश, कर्मकांडाच्या बंधनात स्त्रीला पुरूषांच्या अधीन ठेवले गेले. त्यांच्या सोबत अमानवीय व्यवहार केले गेले. सामंतवादी, पितृसत्ताक व्यवस्थेच्या विरोधात महात्मा ज्योतिबा फूले यांनी चळवळ उभारली. त्यामुळे स्त्री चेतना जागष्त होऊन स्त्री सक्षमीकरण आणि स्वावलंबी बनविली तर नवजागरण चळवळीने स्त्री जगतातील विविध समस्यांचे निराकरण करून नव ऊर्जा निर्माण केली, प्रगती केली, प्रेरणा दिली. नवजागरण चळवळीतील महत्वपूर्ण तथ्य म्हणजे सर्व कालखंडातील नवजागृत चळवळीचे माध्यम धर्म होते. धर्म समाजाला संघटित, नियंत्रीत करण्याचे साधन होते. यालाही साधन मानून स्त्रीला घराच्या चार भिंतीत बंदिस्त बनवून ठेवले गेले. संपूर्ण कौटुंबिक उत्तरदायित्व धर्माच्या, आदर्शाच्या आधारे लादले गेले. सती जाण्यासारखे अपराध धर्माच्या नावावर केले जायचे. आपल्या युगाच्या आव्हानांना स्विकारून परिणामतः निर्मित होत म्हणून त्या संपूर्ण युगाच्या संघर्षाची अभिव्यक्ति बघायला मिळते. मूल्यांची अभिव्यक्ति मानवाच्या व्यवहार, विचारातून प्रदर्शित होते. स्त्री जागृकता ही चळवळ, संघर्ष हा आंतर आणि बाहय होता. देशांतर्गत आणि विदेशातही हया संघर्षांनी खऱ्या विकासाची प्रक्रिया निवडली. या नवनिर्मिती जागरणात भारतीयांचा ऐतिहासिक पैलू आहे. त्या दोन प्रक्रिया सामन्त संस्कृती आणि भारतीयकरण–सामन्ती संस्कृती शोषण–अत्याचार–उत्पीडांचा समावेश होता. निष्ठा आणि मूल्य शून्यात त्यांची चेतना समाविष्ट विकासाची श्रृंखला प्रगतीच्या दिशेत निरंतर गतिशील होती. समानता, सामाजिक न्याय आणि संविधानात दिले गेलेले स्त्री अधिकार, नारी जगतात स्त्रीला सशक्त बनविण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. महात्मा ज्योतिबा फूले यांनी स्त्री चेतना, स्त्री अस्मितांचा बोध करवित स्त्रीला तिची ओळख बनविण्याची प्रेरणा दिली. स्त्रीचे अस्तित्व बनविण्यात कठोर संघर्ष करावा लागत होता. स्त्री आपल्या अहिताकरीता स्वतः चेतनाशील होऊ लागली. आधुनिक, शिक्षीत, प्रगतीशील स्त्री, धार्मिक अंधविश्वास, परंपरा, रूढीचे खंडन करत आहे. भारतीय संस्कृतीत धर्म, परंपरा, नैतिकता, आदर्श, मान्यतांचे आपले वेगळे महत्व आहे ही संस्कृतीची ओळख आहे. जेव्हा संस्कृतीचे तत्व रूढी बनतात तेव्हा ते समाजाकरीता नाहीतर स्त्री करीताही घातक बनतात. धर्माच्या अंधविश्वास मूल्य आणि मान्यतांनी स्त्रीला कधी पुढे येऊ दिले नाही. नवचेतनेच्या विविध परिप्रेक्ष्य, आयामातून स्त्रीचेतनेला शक्ती प्राप्त झाली. यामुळे धार्मिक, सामाजिक कुप्रथां विरूध्द आवाजच काढला नाही तर विरोध ही दर्शविला. निश्चितच विसाव्या शतकात स्त्रीचेतना जुन्या धार्मिक–सामाजिक मान्यतांची उपेक्षा करायला सुरूवात केली. अंधविश्वासाच्या बंधनातून मूक्त होत आहे.

कन्हैय्यालाल चंचरीक लिहितात की, महात्मा ज्योतिबा फूल्यांनी शिक्षण कालखंडात स्त्रीशिक्षणाच्या कमतरतेची जाणीव झाली. त्यांना माहित होते की, छत्रपती शिवाजी महाराजांना योध्दा, आधुनिक भारताचे महान साम्राज्याचा निर्माता बनविण्यात त्यांच्या आईची अहम भूमिका होती. त्यांनी समजून घेतले की, भावी पिढीच्या निर्माणाकरीता स्त्री शिक्षण महत्वपूर्ण आहे. दलित स्त्रीला शिक्षणाचा अभिनव प्रयोग स्वतःमध्ये एक विस्मयकारी, क्रांतिकारी विचार होता.

भाऊसाहेब यांनी 17 फेब्रुवारी 1852 मध्ये स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रातील केलेल्या कार्याची प्रशंसा केली. 5 डिसेंबर 1853 ला 'ज्ञान प्रकाश' मराठी पत्रात आपल्या शुद्र बांधवांना अज्ञानतेच्या सागरातून बाहेर काढुन ज्ञानरूपी अमृताचे पान करविण्याचे प्रयत्न ज्योतिबांनी केले. त्यामुळे त्यांच्यावर अनेक संकट आले. त्यांनी आपदांचा सामना केला. दलितांमध्ये 'ज्ञानचेतना चळवळ' त्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत असे सांगितले. शिक्षण विकासात लोकांना साक्षर बनविण्यात, ज्ञान ज्योति देण्यात ते जे कार्य करित होते ते कार्य पुढे निरंतर वाढत गेले.

स्त्रीवादी लेखिका डॉ. पदमा पाटील लिहितात की, इंग्रजी शिक्षण घेऊन जितके प्रगल्भ झाले की, विद्रोही, तात्कालीन प्रस्थापित, सनातन, पाखंडी, पुरोहितवादींच्या कट्टर विरोधीच्या नावाने प्रसिध्द झाले. हाथ टाइम्स, पेनकृत, 'राईट ऑफ मन' ग्रंथाच्या वाचन, चिंतन, मनन, केल्यानंतर अन्तःबाह्दय विचारक, चिंतकाच्या स्वरूपात परिवर्तीत झाले. सवर्णांनी निम्न जातीचा केलेला अपमान, अस्पृश्यता पालन, निर्दयतापूर्ण आचरण, विद्वान, उच्चवर्णीयांचे अभिमान अधिकाधिक सक्रिय आणि सतर्क बनवित गेले. कुटुंबातील एक स्त्री शिकली तर एक कारागृह बंद होणार असे म्हणून त्यांनी स्त्रीशिक्षणाचा जोर धरला. महात्मा फूले यांनीही एक असा संकल्प केला.

ज्योतिबा फूले यांनी नेहमीच संकीर्णतेतून उत्पन्न धार्मिक अंधविश्वासाचे खंण्डन केले. त्यांनी स्त्री शिक्षण, समानता, विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले तर बालविवाहाचा विरोध दर्शविला. याप्रयत्नातून स्त्रीमुक्ती इतिहासाचा एक नवीन इतिहास रचित केला गेला. ज्यांचा स्पष्ट उद्देश्य सुधारणावादी प्रगतीशील होता. त्यांच्याद्वारा कार्यान्वीत आश्रम, स्त्रीआत्मसन्मान आणि स्त्री कार्याच्या प्रती निष्ठेचे द्योतक आहे. त्यांच्या कार्यातून परंपरागत रूढीवादीता शिथिल होत गेल्या. नवनवीन जीवनदर्शन निर्माण झाले. राजकीय, धार्मिक, बौध्दिक, कलात्मक राष्ट्रीयता याप्रमाणे तो बौध्दिक नवजागरणाचा कालखंण्ड झाला.

15 ऑगष्ट 1947 नंतर एक नवीन सुर्य भारतीय स्त्रीयांकरीता जीवनात एक नवीन प्रकाश घेऊन आला. स्वातंत्र्यानंतर महानगर, नगरात,स्त्रीयांनी प्रत्येक क्षेत्रात पदार्पण केले. उच्च व तांत्रिक शिक्षण प्राप्त करून मोठया पदाधिकारी झाल्या आहेत. स्त्री मध्ये स्वावलंबी आणि नवऊर्जासह चेतना जागृत झाली आहे. स्त्री सैन्यातही अधिकारी आहेत. यासर्व वास्तविक चित्रणानंतर स्त्री यशस्वीतेच्या शिडया चढत जात आहे, हे अतिशय प्रशंसनीय आहे.

मानवाची 'जययात्रा' प्रगतीच्या दिशेने निरन्तर गतीशील आहे. निश्चितच एकविसव्या शतकात स्त्रीसबलीकरण चळवळ महत्वपूर्ण बाजु आहे. आज स्त्रीचे वाढते पाऊल आकाशापर्यंत पोहचले. नाहीतर विश्वात अत्याधिक लोकसंख्या असलेला देश भारताची राष्ट्रपती एक महिला झाली. समानता, सामाजिक न्याय आणि संविधानानी दिलेले स्त्रीला अधिकार स्त्रीविश्वाला साक्त बनविते तर ही प्रक्रिया देशात सुरू झाली आहे.

1. ज्याप्रमाणे रेडिकल स्त्रीवादी पितृसत्ताक वर्चस्वाच्या विरोधात विरोध दर्शवितात. लिंगभेदावरील आधारीत स्त्री–पुरूष भेदभाव यांना मान्य नाही त्याप्रमाणे तत्कालीन समाजात महात्मा ज्योतिबा फूले यांनी ताराबाई शिंदे यांच्या विचारसरणीला दुजोरा देत ''स्त्री–पुरूष समानता'' चे बीज समाजात रूजविले होते.

2 उदारवादी विचारधारेंचा विज्ञान सत्याला सिध्द करते. मानवतावादी दृष्टीने विचार करण्यास प्रारंभ झाला. चेतनेचे नवीन पर्व सुरू झाले. स्वतंत्रता, समानता, बंधुता यातून मानवतावादी चेतना निर्माण झाली. या तत्वप्रणालीनुसार समाजात स्त्रीला सन्मानपूर्वक दर्जा देण्यास सुरूवात झाली. महात्मा ज्योतिबा फूलेंनी ही स्त्री आणि दलित स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात अविस्मरणीय कार्य केले. आज एकेविसाव्या शतकात पुरूषांचे स्त्रीवरचे वर्चस्व कमी झाले आहे. स्त्रीवर पितृसत्ताक दबावतंत्र, प्रताडित केले जात होते. आज नगर, महानगरात शिक्षित कुटुंबातही हे प्रमाण कमी होतांना दिसत आहे. पत्नी करीता पतीचे विचार,मानसिकतेत परिवर्तन आले आहे. हे उदारवादी दृष्टिकोनासह महात्मा ज्योतिबा फूलेंच्या कार्याचा परिपाक आहे.

3 आधुनिक समाजात लिंग भेदाभावाची संकल्पना समाप्त होतांना दिसत आहे. आधुनिक स्त्री आज दुसऱ्या ग्रहांवर जाऊन पोहोचली आहे. विमानात पायलट, सैन्यात अधिकारी, राज्यव्यवस्थेत प्रधानमंत्री, मुख्यमंत्री, राष्ट्रपती झाली आहे. आजपण तीच पितृसत्ताक समाज संरचना आहे. ज्यात स्त्रीयांना पुरूषांच्या अधीन राहावे लागत होते. आज शिक्षण, विज्ञान, प्रौद्योगिकी या क्षेत्रात प्रगती झाल्याने संरचनेचा प्रकार्यात्मक आराखडाच बदलला आहे. स्पष्ट आहे की, लिंगभेदभावपूर्ण संकल्पना मागे पडली आहे. तत्कालीन समाजात पितृसत्ताक लिंगभेदभावपूर्ण वातावरण होते, यावर प्रघात करत महात्मा ज्योतिबा फूले यांनी पितृसत्ताक संरचनेत परिवर्तन करण्याचा प्रयास केला होता. त्याचीच ही परिणीती होय.

4 मार्क्सवादी स्त्रीवादात उत्पादनाच्या साधनात जसे–जसे व्यक्तिंचा एकाधिकार वाढतो तसे–तसे श्रमिक वर्गाचे शोषण वाढत जाते. या शोषणात स्त्री ही संम्मीलीत होती. वैयक्तिक संपत्ती मध्ये वृध्दीबरोबरच स्त्री ही पुरूषांची संपत्ती झाली. स्वतंत्रता, अधिकार तिच्याकडे नव्हते. स्त्रीशोषणाची पकड आर्थिक संरचनेवर मानवाच्या एकाधिकाराला जन्म देते. औद्योगिकरणा बरोबरच स्त्री समस्यांची तीव्रता वाढत गेली. महात्मा ज्योतिबा फूले यांनीही स्त्री गृहाची शोभा नसून एक समाजातील महत्वपूर्ण घटक आहे असे सांगितले. आज आर्थिक शक्ति पूंजीवादी व्यवस्थेतून मूक्त होऊ पाहते. स्त्रीच्या आर्थिक, सामाजिक स्थितीमध्ये सकारात्मक परिवर्तन आले आहे. आर्थिक निर्णयवाद सिध्दांताला अनुकूल वैज्ञानिक विश्लेषण हे ज्योतिबांच्या कार्याचे प्रतिफळ आहे. स्त्री एकविसाव्या शतकात आधुनिक, अत्याधुनिक, प्रगतिशील समाजातील व्यक्तिंना काही प्रश्नांचे उत्तर महात्मा फूलेंच्या पुरोगामी महाराष्ट्रातील प्रगतीशील, तर्कनिष्ठ दृष्टिकोन ठेवणाऱ्या मानवी समाजाला स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून प्रगट करू इच्छिते.

अ) स्त्रीचे अपहरण कां केले जाते? ब) हुंडयाच्या नावावर आजही स्त्रीला कां जाळले जाते? क) स्त्रीसोबत बलात्कार आणि सामुहिक बलात्कार कां केले जातात? ड) स्त्रीला संवेंगात्मक प्रताडित कां केले जाते? इ) कुटुंबात संवेदना अधिकाराचे कां हनन केले जाते? ई) कुटुंबातील लोक आजही स्त्रीला Unpaid ervant म्हणून कां वागणूक देतात? उ) कन्या भ्रूणहत्या का केली जाते?

निष्कर्श :–

एकविसाव्या शतकात स्त्रीशोषण, प्रताडनेचे परिदृश्य, पुरूषी मानसिकता ठेवणाऱ्या समाजात सामाजिक न्याय आणि समानतेची मागणी करते. सत्य तर हे आहे की, निम्न वर्गापासून उच्चभ्रू समाजात आजही विविध स्वरूपाने स्त्रीचे शोषण होत आहे. संवैधानिक आणि कायदयांन्वये ती पुरूषांच्या समकक्ष जरी उभी दिसत असली तरी चित्र वेगळेच आहे. गरज आहे व्यक्तिच्या विचार आणि मानसिकतेत बदल करण्याची. स्त्रीला सहयोगी, स्त्रीशक्तिच्या स्वरूपात स्विकार करण्याची तेव्हाच खऱ्या अर्थाने क्रांतिसुर्य महात्मा ज्योतिबा फूलेंच्या कार्याला, कष्टाला, परिश्रमाला, समाजसुधारणेच्या चळवळीला मानवंदना होईल.

संदर्भग्रंथ :–

1) *नारीवाद :– वी.एन.सिंह, जयमेजय सिंह, रावत पब्लिकेशन, नवी दिल्ली.*
2) *Key Concepts in Feminist Theory and Research, Christina Hughe, Sage Publications, New Delhi.*
3) *Menol, Nivedita 2012, seeing like a feminist New Delhi.*
4) *Feminism is for everybody, passionate politics bell hooks, South End Press, Cambridge.*
5) *https://archive.org/details/woolf_aroom/page/112/mode/2up.*
6) *https://93, 17495.29/_ads/F2FEC 17274BuDDB 72599A2DBEBCBA977*
7) *स्त्रीवादी पध्दतीशास्त्र – विद्युत भागवत.*
8) *कायदयाचा भूप्रदेश स्त्रीवादी भिंगातून.*
9) *स्त्री प्रश्नांची वाटचाल – विद्युत भागवत, 2004, प्रतिमा प्रकाशन, पूणे.*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

B.R.G.F प्रशिक्षणातून मागासवर्गीय (ग्रा.प.) लोकप्रतिनिधी च्या भूमिकेत कार्यक्षमतेत झालेला बदल

सुनिल मोतीराम सोनवणे
कनकवली कॉलेज, कनकवली

★★★

संशोधन सारांशः (Research Abstract) : भारतीय सविधानाने ७३ व्या घटना दुरुस्तीद्वारे पंचायतीराज संस्थांना घटनात्मक दर्जा प्रदान केला आहे. त्यामूळे पंचायतराज संस्थातील पदाधिकारी यांचे अधिकार व कर्तव्य यामध्ये लक्षणीय वाढझालेली आहे. तसेच केंद्र व राज्य शासनाने अनेक विकास योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी ग्रामपंचायतीवर सोपवलेली आहे. ग्रामपंचायतीला विविध विकास योजनांतर्गत वेळोवेळी निधी मिळत असून त्याचा सुयोग्य विनियोग होणे आवश्यक आहे. ग्रामसभेच्या माध्यमातून लोकसहभागाद्वारे ग्रामपंचायतीनी केलेल्या विकासकृती आराखडयानुसार गावाचा विकास करणे ही ग्रामपंचायतीची मूलभूत जबाबदारी आहे.

ग्रामपंचायत लोकप्रतिनिधींना त्यांच्या अधिकाराचा वापर, कर्तव्ये व जप्राप्रदारी सक्षमपणे व अचूकरित्या पार पाडता यावी म्हणून त्यांना पायाभूत प्रशिक्षण, मागास क्षेत्र अनुदान निधी योजनेतर्गत देण्यात आले. मागासवर्गीय लोकप्रतिनिधीचा निर्णय प्रक्रियेतील वाढत्या सहभागाचा अभ्यास करणे, B. R. G. F. प्रशिक्षणातून मागासवर्गीय लोक-प्रतिनिधीच्या भूमिकेत झालेल्या प्रदलाचा अभ्यास करणे. B. R. G. F. प्रशिक्षणातून झालेल्या क्षमता वृद्धीचा अभ्यास करणे इ. हा शोधनिप्रबंधाचा प्रामाणिक उद्देश आहे.

मुख्य शप्रद्द (KeyWords): ग्रामपंचायत, प्रीआरजीएफ, ग्रामीण विकास, पंचायत राज

प्रस्तावना :- समाजजीवनाच्या विविध क्षेत्रात आरक्षणाच्या माध्यमातून विविध पदावर मागासवर्गीयाना संधी मिळाली विशेषतः राजकीय क्षेत्रात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या राजकारणात आणि निर्णय प्रक्रियेमध्ये लोकप्रतिनिधी व पदाधिकारी म्हणून मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. राजकीय पदाप्ररोप्रर त्या पदाची सत्ता देखील त्या व्यक्तीकडे येते. सत्तेबरोबर अधिकार आणि नियंत्रण करण्याची शक्ती येते. अधिकाराप्ररोप्रर कर्तव्य ही येतात. कर्तव्यात नियोजनाचा समावेश होतो नियंत्रणात अमंलप्रजावणी पडताळणी आणि कार्यपुर्ततेचे विश्लेषण येते. ड्युप्रनच्या मते सत्ता म्हणजे निर्णय घेण्याची व कार्याला मान्यता देण्याची क्षमता तर लॉसवेल व काम्लान यांच्या मते, आकृतीप्रबंध शक्ती म्हणजे सत्ता होय शक्तीला आकृतीप्रबंध निर्णय घेण्याची सत्ता पदामूळे प्राप्त होते. म्हणून सत्ता असणारे पद म्हणजे आकृतीप्रबंध होय. अशी सत्ता मागासवर्गीयांना आरक्षण धोरणामुळे पंचायतराज आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून प्राप्त झाली आहे. तेव्हा त्याचा निर्णय प्रक्रियेत सहभाग असतो का? हे जाणून घेण्यासाठी व ग्रामपंचायतीमध्ये प्रतिनिधीत्व करण्याची संधी तर मिळाली परंतू समाज व्यवस्थेत आजही प्रभावशाली जातीचे वर्चस्व ग्रामपंचायतीमध्ये आहे का मागासवर्गीय लोकप्रतिनिधीमध्ये B.R.G.F प्रशिक्षणातून त्याच्या भूमिकेत प्रदल झाला काय हे जाणण्याचा प्रयत्न या शोध निप्रबंधात करण्यात आला.

१. संशोधन पद्धती :- B.R.G.F प्रशिक्षणातून मागासवर्गीय (ग्रा.प.) लोकप्रतिनिधीच्या भूमिकेत प्रदल हा शोधनिप्रबंध लिहण्यासाठी विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आत्मा.

२. तथ्य संकलन - प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्राथमिक व दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक साधनामध्ये मुलाखत अनुसुची, निरिक्षणाचा अवलंप्र करण्यात आला आहे, तर दुय्यम साधन सामग्रीमध्ये संदर्भ ग्रंथ, मासिक, वृत्तपत्र, व इंटरनेटचा आधार घेण्यात आला.

३. नमुना निवड - प्रस्तुत शोधनिबंधासाठी औरंगाप्रबाद तालुक्यातील दहा (१०) ग्रामपंचायत मधील ३० वर्गीय लोकप्रतिनिधीची गैरसंभाव्यता नमुना निवड अंतर्गत सहेतूक नमुना निवड पद्धतीने नमुना म्हणून निवड करण्यात आली.

४. संशोधनाची उद्दिष्टचेः- १. मागासवर्गीय लोकप्रतिनिधीचा निर्णय प्रक्रियेतील वाढत्या सहभागाचा अभ्यास करण

2. B.R.G.F प्रशिक्षणातून मागासवर्गीय लोकप्रतिनिधीच्या भूमिकेत झालेल्या प्रदलाचा अभ्यास करणे.

3. B.R.G.F प्रशिक्षणातून झालेल्या क्षमता वृद्धीचा अभ्यास करणे.

५. गृहितके : १. मागासवर्गीय लोकप्रतिनिधीचा निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढला आहे.

२. मागासवर्गीय लोकप्रतिनिधीना आपल्या अधिकाराच ओळख झाली आहे.

3. B. R. G. F प्रशिक्षणातून मागासवर्गीय लोकप्रतिनिधीच्या ज्ञान, कौशल्य आणि क्षमताचा विकास झाला आहे.

मागास क्षेत्र अनुदाननिधी (B. R. G. F.) (Backward Regions Grant Fund Programme) या योजनेच्या माध्यमातून केंद्रशासनाच्या पंचायतराज

मंत्रालयाच्या व राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या सक्रीय सहभागातून ग्रामपंचायत लोकप्रतिनिधीना पायाभूत प्रशिक्षण देण्यात आले. यातून क्षमतावृद्धी करुन त्यांना त्याच्या अधिकाराची व कर्तव्ये याची माहिती करुन देण्यात आली लोकसहभागी ग्रामविकास आराखडा व त्याला अनुसरुन ग्रामपंचायत अंतर्गत सर्व अधिकाराची माहिती व्हावी हा हेतू या प्रशिक्षणाचा होता या अनुषंगाने प्रशिक्षणानंतर मागासवर्गीय लोकप्रतिनिधीच्या भूमिकेत काय फ्रदल झाला हे जाणून घेण्यासाठी त्यांना काही प्रश्न विचारण्यात आले.

१. आपण B.R.G.F चे प्रशिक्षण पूर्ण केले का?

१.	होय	२७	९० टक्के
२.	नाही	०३	१० टक्के
	एकूण	३०	१०० टक्के

जेव्हा उत्तरदात्याना हा प्रश्न विचारण्यात आला तेव्हा ९० टक्के लोकप्रतिनिधीनी सांगितले प्रशिक्षण पूर्ण केले तर १० टक्के लोकप्रतिनिधीनी प्रशिक्षण पूर्ण केलेले नव्हते. कोणी दोन दिवस कोणी फक्त एक दिवसच पूर्ण केले होते. परंतू ९० टक्के लोकप्रतिनिधी B.R.G.F चे प्रशिक्षण पूर्ण केले होते.

निरिक्षणाअंती असे लक्षात आले की प्रत्येक मागासवर्गीय लोकप्रतिनिधीनी प्रशिक्षणातून कोण-कोणती माहिती मिळते. शासनामार्फत प्रशिक्षण आहे तेव्हा आपण हजर राहणे आवश्यक आहे. आपणाला ग्रामपंचायतीच्या कारभाराची माहिती मिळावी व आपणाला पूर्ण माहिती असावी या हेतूने प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणाचा लाभार्थींना कोणता फायदा झाला याविषयी खालील प्रमाणे माहिती संकलित करण्यात आली.

१.	प्रशिक्षणाचाआपणाला काय फायदा झाला.	२७	९०	टक्के
२.	अधिकार समजले	१८	६०	टक्के
३	कामकाजाची पद्धत समजली	०७	२३.५	टक्के
४	योजनाची माहिती मिळाली	०५	१६.५	टक्के
	एकूण	**३०**	**१००**	**टक्के**

प्रशिक्षणाचा आपणाला काय फायदा झाला असा प्रश्न ३० उत्तरदात्यांना विचारण्यात आला तेव्हा १८ (६० टक्के) म्हणाले आम्हाला आमचे अधिकार समजले ७ (२३.५ टक्के) म्हणाले योजनाची माहिती मिळाली ६० टक्के लोकप्रतिनिधी म्हणाले आम्हाला ग्रामपंचायतीमध्ये काम करतांना आमचे अधिकार काय आहेत. हे माहित नव्हते परंतू प्रशिक्षणास आम्हाला आमचे अधिकार समजते. ग्रामपंचायतीचा कारभार कसा चालतो याची पूर्ण माहिती मिळाली.

३. आपण दर महिन्याच्या मासिक सभेना हजर असता काय?
ग्रामपंचायतीच्या सर्व आर्थिक व्यवहारांना मासिक क्षेत्रात मान्यता मिळत असते. ग्रामपंचायतीच्या सर्व लोकप्रतीनीधीनी मासिक सभेला हजर राहणे फ्रंधनकारक आहे तो प्रत्येकाच्या अधिकार आहे. जेव्हा प्रश्न विचारण्यात आला तेव्हा

१.	होय	१३	४३.५	टक्के
२.	नाही	०६	२०.०	टक्के
३.	कधी कधी	११	३६.५	टक्के
	एकूण	३०	१००	टक्के

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की, ३० उत्तरदात्यापैकी १३ (४३.५ टक्के) म्हणाले आम्ही दर महिन्याच्या मासिक सभेला हजर असतो तर ०६ (२०.० टक्के) म्हणाले आम्ही हजर राहात नाही ११ (३६.५ टक्के) म्हणाले आम्ही कधी-कधी हजर असतो.

मासिक सभेना हजर राहाणे प्रत्येक लोकप्रतिनिधीचे कर्तव्यच आहे. परंतू फक्त ४३.५ टक्के मागासवर्गीय लोकप्रतिनिधी हजर असतात कधी-कधी हजर असणा-याचे प्रमाणही ३६.५ टक्के इतके आहे. २०.० लोकप्रतिनिधी हजर राहत नाही निरिक्षणाअंती असे लक्षात आले की, सतत असणा-या पॅनलचे सदस्य हजर असतात ते पॅनल विरोधी गटाचे असते त्या पॅनलचे सदस्य ग्रामपंचायतीच्या मासिक सभांना हजर राहत नाही.

४. ग्रामसभेतील ठरावावर चर्चा होते का - केंद्रात लोकसभा राज्यात विधानसभा गामपातळीवर गामसभा इतके महत्व ग्रामसभेला आहे. ग्रामविकासाच्या महत्वाच्या योजनाची वैयक्तिक लाभार्थी योजनेच्या लाभार्थ्याची निवड ग्रामसभेत केली जाते. इतके महत्व ग्रामसभेला आहे. या मार्फत ३० उत्तरदात्यांना विचारण्यात आले. कि ग्रामसभेतील ठरावावर चर्चा होते का?

१.	होय	१५	५०	टक्के
२.	नाही	०७	२३.५	टक्के
३.	सांगता येत नाही	०८	२६.५	टक्के
	एकूण	३०	१००	टक्के

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, ५० टक्के लोकप्रतिनिधी म्हणतात चर्चा होते तर २३.५ टक्के नाही म्हणतात २६.५ टक्के उत्तरदात्याना सांगता येत निरिक्षणाअंती असे तसात आले की ग्रामसभेत विषयपत्रके नुसार चर्चा होत नाही कारण २६.५ टक्के लोकप्रतिनिधीना सागताच आले नाही की, रावावर चर्चा होते की नाही ५० टक्के उत्तरदाते म्हणाले चर्चा चर्चा होते.

जोपर्यत ग्रामसभा सक्षम होणार नाही. लोकशाही प्रळकटीकरणाची ही प्रक्रिया आहे. तेव्हा प्रत्येक लोकप्रतिनिधीला ग्रामसभेचे महत्व कळणे गरजेचे आहे.

५. ग्रामपंचायतीच्या एकूण उत्पन्नातून मागासवर्गीयाच्या कल्याणासा□ी किती टक्के निधी खर्च करतात.

ग्रामपंचायतीचे लोकप्रतिनिधी हे त्या -त्या वार्डाचे नेतृत्व करत असतात. त्याच्या वार्डातील समस्या त्याच प्ररोप्रर येणारा केंद्र व राज्याचा निधी याची माहिती प्रत्येक लोकप्रतिनिधीला असणे आवश्यक आहे. तेव्हा मागासवर्गीयाच्या कल्याणासा□ी ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाच्या किती टक्के निधी खर्च करतात हा प्रश्न विचारण्यात आला तेव्हा

१.	२० टक्के निधी खर्च	२७	९०	टक्के
२.	१५ टक्के निधी खर्च	०३	१०	टक्के
३.	३० टक्के निधी खर्च	०५	१६.५	टक्के
	एकूण	३०	१००	टक्के

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, जेव्हा मागासवर्गीय लोकप्रतिनिधी ना हा प्रश्न विचारण्यात आला तेव्हा ०९ (३० टक्के) म्हणाले मागासवर्गीयासा□ी २० टक्के निधी खर्च करतात तर १६ (५३.५ टक्के) म्हणाले ३० टक्के निधि खर्च करतात.

ख--या अर्थाने ग्रामपंचायतीच्या एकूण उत्पन्नातून मागासवर्गीयाच्या कल्याणासा□ी १५ टक्के निधि खर्च करतात याप्राप्रात एकूण उत्तरदात्यापैकी ५३०५ टक्के उत्तरदात्यानी योग्य उत्तर दिले तर ३० टक्के म्हणाले २० टक्के तर ३० म्हणणा-याचे प्रमाण १६.५ टक्के होते.

7. ग्रामविकासाच्या निर्णय प्रक्रियेत आपली भूमिका कशी असते

आजही ग्रामपंचायतीच्या राजकारणात विशिष्ट जातीचा प्रभाव पहावयास मिळते तेव्हा ग्रामविकासाच्या निर्णय प्रक्रियेत मागासवर्गीय लोकप्रतिनिधीची काय भूमिका असते हे जान्स घेण्यासाठी हा प्रश्न विचारण्यात आला.

१.	निर्णायक	०७	२३.५	टक्के
२.	सहयोगाची	१७	५६.५	टक्के
३.	सांगता येत नाही	०६	२०.०	टक्के
	एकूण	३०	१००	टक्के

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, जेव्हा ३० उत्तरदात्याना हा प्रश्न विचारण्यात आज तेव्हा १७ (५६.५) टक्के लोकप्रतिनिधी म्हणाला आमची भूमिका ग्रामविकासासाठी सहयोगाची असते तर ७ (२३.५टक्के) म्हणाले आमची भूमिका निर्णायक असते. ०६ (२०.० टक्के) म्हणाला सागता येत नाही. ग्रामविकासाच्या निर्णय प्रक्रियेत मागासवर्गीय लोकप्रतिनिधीची भूमिका ही ५६.५२ टक्के म्हणाले सहयोगाची असते २३.५ टक्के म्हणाले निर्णायक असते. ग्रामविकासाच्या निर्णय प्रक्रियेत गावातील हेवे दावे सोडून ग्रामविकासाचे ध्येय साध्य करणे आवश्यक असते.

७. ग्रामपंचायतीच्या कारभाराप्राप्रात आपण समाधानी आहात काय ?:-

आजही ग्रामपंचायत स्तरावर उच्च जातीचे प्रभूत्व पाहावयास मिळते. ७३ व्या घटनादुरुस्तीने मागासवर्गीयाची संधी मिळाली परंतू ग्रामपंचायतीच्या प्रत्येक कार्यक्रमात याचा सहभाग असते असेनाही तेव्हा त्यांना हा प्रश्न विचारण्यात आला.

१.	निर्णायक	२३	७६.५	टक्के
२.	सहयोगाची	०४	१३.५	टक्के
३.	सांगता येत नाही	०३	१०.०	टक्के
	एकूण	३०	१००	टक्के

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, ३० उत्तरदात्यांपैकी २३ (७६.५ टक्के) म्हणाले समाधानी आहोत तर ४ (१०.० टक्के) म्हणाले काही प्रमाणात समाधानी आहोत.

जेव्हा मागासवर्गीय लोकप्रतिनिधींना असा प्रश्न विचारण्यात आला की, ग्रामपंचायतीच्या कारभाराप्राप्रात आपण समाधानी आहात का तेव्हा ७६.५ टक्के लोकप्रतिनिधी म्हणाले समाधानी आहोत तर १३.५ टक्के म्हणाले आम्ही समाधानी नाहीत तर १०.० टक्के म्हणाले काही प्रमाणात समाधानी आहोत ग्रामपंचायतीच्या कारभारात मागासवर्गीय लोकप्रतिनिधीचा सहभाग वाढत आहे. असे निरिक्षणा अंती लक्षात आले.

निष्कर्षः-

1. B.R.G.F प्रशिक्षणाप्राप्रात प्रश्न विचारला असता असे लक्षात आले. ९० टक्के लोकप्रतिनिधीनी प्रशिक्षण पूर्ण केले होते. ग्रामपंचायतीच्या कारभाराप्राप्रात व आपल्या अधिकाराप्राप्रात जाणून घेण्याची उत्सुकता असल्या कारणाने प्रशिक्षण पूर्ण केले

२. ६० टक्के लोकप्रतिनिधीना प्रशिक्षणातून आपले अधिकार व जप्राप्रादारीची ओळख झाली ग्रामसभा, मासिक सभा, यांची पूर्ण माहिती त्याना मिळाली होती.

३. मासिक सभेच्या उपस्थिती मार्फत४३.५ टक्के लोकप्रतिनिधीची दर महिन्याच्या मासिक सभेला होती तर ३६.५ टक्के कधी-कधी उपस्थित राहात होते. प्रशिक्षणातून त्यांना मासिक सभेचे महत्व कळाले होते.

४. ग्रामविकासाच्या निर्णय प्रक्रियेत ५६.५ टक्के लोकप्रतिनिधीची भूमिका ही सहयोगाची होती तर २३.५ टक्के निर्णायक होती राजकीय अभिसरणाची

प्रक्रिया ग्रामपातळीवर दोन आहे असे म्हणावे लागेल.

५. ७६.५ टक्के लोकप्रतिनिधी ग्रामपंचायतीच्या कारभाराप्राप्रत समाधानी होत ही जमेची प्राप्रा होती तर १३.५ टक्के आजही ग्रामपंचायतीच्या कारभाराप्राप्रत समाधानी नव्हते हा प्रदल होणे गरजेचे आहे.

B.R.G.F प्रशिक्षणातून मागासवर्गीय लोकप्रतिनिधीनच्या क्षमता वृद्धीचा विकास झाला त्याच प्ररोप्रर त्यांना ग्रामपंचायतीची व्यवस्था समजली व आपले अधिकार आणि कर्तव्य याची ओळख झाली त्यांच्या भूमिकेत प्रदल झाला जोपर्यंत आपल्या भूमिकेचे अधिकार समजत नाही तोपर्यत प्रत्येक लोकप्रतिनिधीला आपली भुमिका कशी प्राजवावी हे कळत नही.

संदर्भ सुची :-

१) *पंचायतराज क्षमतावृध्दी - श्रृंखला नवनिर्माण प्रकाशन खोकडपूरा*
२) *मागासक्षेत्र अनुदाननिधी कार्यक्रम मार्गदर्शिका - पंचायतराज मंत्रालय भारत सरकार*
३) *मागासक्षेत्र अनुदाननिधी वाचन साहित्य - यशदा पुणे, राजभवन आवार वाणेर रस्ता पूणे*
४) *मुलभूत कार्यात्मक प्रशिक्षण वाचनसाहित्य - जलसंधारण विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय*
५) *भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, सिरसाट शाम व प्रौनाडे भगवानसिंग - विद्या पब्लिशर्स औरंगाप्राद*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

प्रादेशीकतावाद : राष्ट्रीय एकात्मतेपुढील प्रमुख अडथळा

प्रा. विठ्ठल सदाशिव चौधरी
सहा. प्राध्या. राज्यशास्त्र विभाग
चिंतामणी महाविद्यालय पोंभुर्णा जि. चंद्रपूर

★★★

सारांश :–धर्म, वंश, भाशा, चालीरीती, रूढी, प्रथा, पंरपरा इत्यादी बाबतीत भारतीय समाजात विविधता दिसून येते. असे असतांनाही स्वातंत्र्यपुर्व काळात व स्वातंत्र्यानंतरही देशात उद्‌भवलेल्या संकट काळात भारतीय जनतेने राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडवीलेले आहे. विविधतेने नटलेल्या या देशात राष्ट्र म्हणून आपण सर्वजण एक आहोत अशी भावनाही वेळोवेळी व्यक्त होतांना दिसते. ही भावना निश्चितच राष्ट्रिय एकात्मतेला बळकटी प्राप्त करून देणारी आहे. असे असतांनाही काही संकुचीत वृत्तीमुळे राष्ट्रिय एकात्मतेच्या मार्गात आज अनेक अडथळे निर्माण होत आहेत. त्यातच प्रादेशीक निष्ठेला अवास्तव महत्त्व देवून जन्मास आलेल्या प्रादेशीकतावादाने राष्ट्रिय एकात्मतेसमोर अनेक प्रश्न निर्माण केले आहे. हा प्रादेशीकतावाद आज भाशीक व सांस्कृतीक अस्मिता, मागासलेपणाची भावना, भौगोलीकता, प्रादेशीक संघटना, विघटनवाद, अषा विविध स्वरूपात अविकृश्त होतांना दिसते. या प्रादेशीकतावादाच्या अतिरेकामुळेच फुटिरतावादी व विघटनवादी शक्ती प्रबळ होऊन त्यातुन घटक राज्याची मागणी पुढे येते व राष्ट्रिय एकात्मतेला हादरा बसते.

बिजशब्द :– प्रादेशीकता, संस्कृती, संकुचीत वृत्ती, राष्ट्रवाद, एकात्मता, विविधता, राष्ट्रिय ऐक्य, प्रादेशीक निष्ठा, नेतृत्व, विघटनवाद, मागासलेपणा, स्वायतता, प्रादेकशिक पक्ष, संघटन.

प्रस्तावना :– विशाल असा भौगोलीक आकार, प्रचंड जनसमूदाय त्यासोबतच विविध भाषा, धर्म, पंथ, संस्कृती, चालीरीती, सण – उत्सव इ. बाबतीत विविधता ही विविधता जतन करून त्यांच्या संरक्षण व विकास साधण्याच्या प्रगभ हेतूने भारतीय घटनाकारांनी संघराज्यात्मक शासन पध्दतीचा स्विकार केला. संघात्मक राज्यव्यवस्था हा स्वातंत्र्यनंतरच्या काळातील भारतीयांसाठी खऱ्या अर्थाने नवीन प्रयोग होता. हा प्रयोग यशस्वी होण्याकरिता व केंद्र आणि राज्य सरकारे यांच्यात सांमजस्य निर्माण होण्याच्या दृष्टिने घटनाकांरांनी राज्यघटनेत केंद्र– राज्य संबधाबाबत स्पष्ट तरतूदी केलेल्या आहेत. भारतीय संघराज्य हे केंद्रोत्सारी पध्दतीने निर्माण झाले असल्यामुळे भारतातील घटक राज्यांना या संघातून फुटुन बाहेर पडण्याचा अधिकार प्राप्त झालेला नाही.

अर्थातच राष्ट्रीय ऐक्य आणि सामर्थ्य यांचा घटनाकारांच्या हक्काशी समन्वय साधण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

आज देशाला स्वातंत्र्य मिळुन 73 वर्ष पूर्ण होऊन भारतीय प्रजासत्ताकलाही 71 वर्ष पुर्ण झालेली आहेत. तरीही राष्ट्रीय ऐक्य व एकात्मतेची वृध्दी करणाऱ्या शक्तींना बळकटी आणने ही भारतीय संघराज्यापूढील आज सर्वात महत्त्वाची आवश्यकता आहे. कोणत्याही सार्वभौम देशाच्या शासनाची सर्वात महत्त्वाची व प्राधाण्यक्रमाची जबाबदारी आपल्या देशाच्या एकात्मतेचे रक्षण करणे हीच असते. या अनुशगांनेच भारतीय राज्यधटनेमध्ये सुध्दा घटनेच्या उद्देशपत्रिकेचे व्यक्तिची प्रतिष्ठा आणि राष्ट्राचे ऐक्य व एकात्मता यांची हमी देणारी बंधूता यासंबधीची शाश्वती सर्व भारतीय नागरीकांना देण्यासांबधीचा उल्लेख आहे. त्यातच राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिकोनातून अनेक तरतुदी करतांना देशाच्या संकटकाळात किंवा विघटनकारी शक्ती प्रबळ होतांना केंद्रशासन अधिक मजबुत व्हावे व राष्ट्राचे ऐक्य आणि एकात्मता यांना कोणतीही हानी पोहचु नये यासाठी घटनाकर्त्यांनी राष्ट्रपतीच्या आणि बाणीविषयक अधिकारांची तरतूद केलेली आहे.

देश विकासाची विविध क्षेत्र काबीज करीत लोकशाहीला बळकटी देत सर्वाथाने सक्षम होत असतांना राष्ट्रीय ऐक्य आणि एकात्मतेच्या रक्षणाविषयी आपण पुर्णपणे शाश्वत बनलो आहेत असे छातीठोकपणे म्हणता येत नाही. याऊलट भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेपुढे अनेक आव्हाने आज उभी असल्याचे चित्र दिसत आहे. धार्मिकता, भाशिक अभिमान, जातीयता, प्रादेशीकता यासंबधीचे प्रश्न स्वांतत्र्यपुर्व काळातही अस्तित्वात होते. मात्र स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात राष्ट्रवादाच्या सर्वसमावेशक विचारसरणीच्या प्रभावाखाली ते प्रश्न काहीसे मागे पडलेले होते. मात्र स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या काळात देशातील विविध घटना – घडामोडीवरून या विघटनकारी शक्ती डोके वर उंचावतांना दिसतात. वांशिक, भाषिक, आर्थिक, जातीय भेद व धार्मिक भेद हे राष्ट्राच्या ऐक्याला बाधक असतात त्यामुळे हे घटक जेव्हा – केव्हा प्रबळ झालेले आहेत तेव्हा राष्ट्राच्या ऐक्य व एकात्मतेसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत.

संशोधन पद्‌धती :– प्रस्तूत शोध निबंधामध्ये वर्णनात्मक, विष्लेशणात्मक व ऐतिहासिक पद्‌धतीचा अवंलब करण्यात आलेला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात इग्रजांषी संघर्ष करतांना सर्वसामान्य भारतीयांनी जी राष्ट्रीय वृत्ती प्रकट केली होती तीचा प्रत्यय हा स्वातंत्र्यानंतर भारत व चिन या दोन देशात झालेल्या वेगवेगळया काळातील युध्द परिस्थितीत निश्चीतच दिसून आलेला आहे. मात्र सामान्य जनतेत ही राष्ट्रीयत्वाची भावना पूर्वीइतकी प्रखरतेने दिसून

येत नाही. देशाच्या विविध भागात धर्म, जात, भाषा, प्रादेशिकता इ. कारणावरून जनतेमध्ये संघर्ष होतांना दिसते राष्ट्रीय एकात्मतेला मारक ठरणाऱ्या घटना देशात घडत आहेत. राष्ट्रीयत्वाची भावना देशात बळकट करण्याऐवजी संकुचीत वृत्ती जोपासल्या जाऊ लागल्या आहेत. त्यातच प्रादेशीकतावाद हया प्रश्नाने गंभीर रूप धारण केलेले दिसून येते. प्रादेशीकतावादात राष्ट्र संघटना ऐवजी राष्ट्र विघटनाची प्रवृत्ती अधिक असल्याने प्रादेशिकतावाद हा भारतीय राष्ट्रीय एकात्मतेतील प्रमुख अडथळा बनु पाहत आहे.

राष्ट्रीय ऐक्य व एकात्मता :– भारतात इग्रंजी सत्तेच्या स्थापनेनंतर खऱ्या अर्थाने राष्ट्रवादाचा उदय झालेला आहे. भारतामध्ये सांस्कृतीक पातळी वरील ऐक्याचे दर्शन फार पुर्वीपासुन घडत असले तरी इंग्रजी सत्तेच्या स्थापने नंतरच त्या ऐक्याला राजकीय अविष्काराचे परिणाम लाभले आहे. इग्रंजी सत्तेविरूध्द लढतांना अर्थात भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या काळात सर्व भारतीय जनतेने परस्परातील भेद विसरून राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडविले होते. भारतीय समाज विविधतेने नटलेला आहे.धर्म, वंश , संस्कृती, भाशा, चालीरीती , रूढी, प्रथा – पंरपंरा इ. बाबतीत भारतीय समाजात मोठया प्रमाणात विविधता दिसून येत असली तरी राष्ट्र म्हणून आपण सर्वजन एकच आहोत. अशी प्रत्येक भारत वासीयांची भावना असणे ऐक्याच्या दृष्टिने गरजेचे असते. अशा प्रकारच्या भावनात्मक ऐक्यातुनच राष्ट्रीय एकात्मतेला बळकटी प्राप्त होत असते.

राष्ट्रीय एकात्मता ही एक प्रकारची भावना आहे. ही भावना एखाद्या देशातील वा राष्ट्रातील लोकामध्ये देशाबद्दलचे प्रेम, आपुलकी तसेच बंधुत्व दर्शविते. त्याच प्रकारे ही भावना विविध धर्म, पंथ, जाती आणि संस्कृतीच्या लोकांना एकाच धाग्यातबांधुन ठेवते. त्यामुळे अशी विविधता असली तरी तीला विसरून सर्व लोक एकत्र राहतात. याप्रकारे राष्ट्रीय एकात्मता देशाला मजबुत आणि संघटीत करते. म्हणजेच भारतीय संघराज्यात वास्तव्य करीत असलेल्या विविध धर्माच्या, जातीच्या तसेय विविध संस्कृतीच्या सर्व नागरिकांचे राष्ट्रीय भावनेतुन मनोमीलन घडवून आणने आणि त्यांच्यात भावनात्मक ऐक्य निर्माण करणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता होय. प्रत्येक राष्ट्राला स्वतंत्र असा भुभाग असतो. त्या राष्ट्राला भौगोलीक सिमा असतात. त्याचबरोबर त्या राष्ट्राच्या पंरपरा असतात. एक इतिहास असतो व ही सर्व त्या राष्ट्राची वैशिष्टये असतात. या सर्वांचा समन्वय म्हणजेच एकात्मता होय.

राष्ट्रीय ऐक्य व एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न हा दररोज म्हटल्या जात असलेल्या शाळेतील प्रतीज्ञा मधुनही केला गेला आहे. त्यातील भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझो बांधव आहेत. अशी ही प्रतिज्ञा सर्व भारतीयांना एकसुत्रात बांधणारी आहे. त्यातच राष्ट्रीय एकात्मतेला पोषक वातावरण तयार करण्यासाठी भारतीय संविधानात एकूण सहा मूलभूत अधिकाराची तरतूद करण्यात आली. यासोबतच संविधानातील मूलभूत कर्तव्ये व मार्गदर्शक तत्वे भारतीय नागरीकात जबाबदारीची भावना वृध्दिगंत करतांनाच परस्परात सलोखा राखण्यास मदत करतात. मात्र या राष्ट्रीय ऐक्य टिकविण्यासही साहयभुत ठरतात. मात्र या राष्ट्रीय ऐक्याचा व एकात्मतेचा प्रत्यय हा स्वातंत्र्यपुर्व काळात आला तसा तो स्वातंत्र्यानंतर देशातील काही घटना व प्रसंग वगळता दिसून येत नाही. याचे उदाहरण म्हणजे जेव्हा केव्हा देशासमोर परकीय आक्रमनाची संकटे उभी राहीली फक्त त्याच काळात राष्ट्रवादाच्या भावनिक आव्हानाला भारतीय जनतेकडुन प्रतिसाद मीळाला. मात्र त्यापलिकडे जाऊन देशाचे राजकीय आणि समाजिक एकात्मीकरण घडवुन आणण्यासाठी लागणारा सकारात्मक राष्ट्रवाद इथे विकसीत झाला नाही. राष्ट्रीय एकात्मता ही राष्ट्रातील व्यक्तिची भावनीक मने जोडण्याची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत राष्ट्रातील समाज घटकांचा सुख दुखाचे वाटेकरी म्हणुन सहभाग असने आवश्यक आहे. मात्र असे न होता राष्ट्रीयत्वाची भावना बळकट करण्याऐवजी संकुचीत वुत्ती जोपाासल्या जाऊ लागल्या आहेत. परिणामी राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गात आज अनेक अडथळे निर्माण झाले आहेत त्यातील एक प्रमुख अडथळा म्हणून प्रादेशिकतावादाचा विचार –विमर्श हा पूढील प्रमाणे घेतला आहे.

प्रादेशीकतावाद :– राष्ट्रीय एकात्मतेमधील एक प्रमुख व तितकाच गंभीर असा अडथळा म्हणुन अलिकडच्या काळातील प्रादेशिकतावादाचा विशेष उल्लेख करता येईल. भारतीय जनतेमध्ये विविध कारणांमुळे राष्ट्रावरील निष्ठेपेक्षा प्रबळ झाल्यावर आपला विशिष्ठ प्रादेशीक विभाग किवा आपला प्रांत याविषयी अधिक आत्मीयता वाटु लागली की, देशात प्रादेशीकता वादाचे मुळ जोर धरू लागते. यात प्रादेशीक हितसंबधासाठी हितसंबधाच्या रक्षणासाठी राष्ट्रहिताला तिलाजंली दिली जाते. प्रादेषीक निष्ठा हया राष्ट्रीय निष्ठेपेक्षा प्रखर बनतात व त्यातुनच राष्ट्रहिताला धोका निर्माण होत असतो.

देशातील लोकांना आपण त्या प्रातांत वा प्रदेशात राहत असतो त्याविषयी आत्मीयता व अभिमान वाटणे हे साहजीकच आहे. विशिष्ट प्रदेशात कायमचे वास्तव्य केल्यामुळे त्या प्रदेशा विषयी जवळीकतेची भावना निर्माण होणे हे स्वाभाविक असते. प्रत्येक व्यक्तीच्या भावना त्या – त्या प्रादेशीक घटकांशी निगडीत झालेल्या असतात. मात्र जेव्हा काही लोकांना आपल्या राष्ट्रापेक्षाही प्रांताविषयी किवा घटक राज्याविषयी अधिक जवळीक वाटु लागते तेव्हा मात्र त्या राष्ट्राच्या दृष्टिने गंभीर बाब निर्माण होत असते. जेव्हा एखाद्या प्रांतातील लोकांना इतर कोणत्याही निष्ठेपेक्षा आपल्या प्रांताविषयीची किंवा विशिष्ट प्रादेशीक विभागा विषयीची निष्ठा जास्त महत्त्वाची वाटते तेव्हा प्रादेषीकतावाद जन्म घेत असतो. प्रादेशीकता वादाला सहसा एखादाच घटक कारणीभूत ठरत नाही. धर्म, जात, भाषा, सांस्कृतीक विविधता, भौगोलीक परिस्थीती, आर्थिक शोषण, एखाद्या प्रादेशीक विभागाची शासनाकडुन दिर्घकाळ झालेली उपेक्षा, फुटीरतावादी संघटनाकडुन लोकांची करण्यात येणारी दिशाभूल आणि त्यातच आपल्याच प्रदेशात आपल्यावर अन्याय होत असल्याची स्थानिक

लोकांची भावना असे विविध घटक हे आपल्या देशातील प्रादेशीकता वादाला कारणीभूत ठरले आहेत. एखाद्या प्रदेषात विशिष्ट धर्माचे किवा जातीचे तसेच भाषेचे लोक मोठया संख्येने एकवटले असतील तर त्या आधारे त्यांच्यात प्रादेशीक अस्मिता ही जागृत केली जाऊ शकते.

देशात एकीकडे स्वातंत्र्यांची चळवळ व दुसरीकडे घटना निर्मितीची प्रक्रिया सुरू असतांना देशातील प्रांतरचनेचा आधार हा भाषा ठेवण्यात यावा ही मागणी जोरकसपणे पूढे आली. इथपासून सुरू झालेला प्रादेशिकतेचा प्रश्न आजही न सुटता वेगवेगळया स्वरूपात तो सातत्याने आवाहने उभी करीत आहे. यात प्रादेशिकतेच्या प्रश्ना सोबतच येणारे गैरप्रादेशीक घटक ही महत्त्वाची भुमिका बजावत असल्याने या समस्येची उकल करणे हे भारतीय राष्ट्रीय एकात्मतेपुढील एक महत्त्वाचे आवाहन होऊन बसले आहे. स्वातंत्र्य प्राप्ती होत असंतानाच देशाला फाळणीच्या समस्येला समोरे जावे लागल्यामुळे तत्कालीन राष्ट्रीय नेतृत्वाने देशाचे सार्वभौमत्व व एकता यांना प्राध ाान्य देणे क्रमप्राप्त होते. संघराज्य तत्वांचा अंमल करीत असतांना भाषीक आधारावर घटक राज्य निर्मितीची मागणी पुढे आली. याबाबत केंद्र सरकारने नेमलेल्या दार आयोगानेही 1948 मध्ये सादर केलेल्या अहवालात भाषेच्या आधारावर राज्याची निर्मिती न करता ती प्रशासकीय सोयीच्या दृष्टिने करावी जेणेकरून अन्य भाषीक अल्पसंख्याकांचे प्रश्न निर्माण होणार नाही असे स्पष्ट होते.

भारतातील प्रादेशिकतावादाचे स्वरूप :– देशात प्रादेशीकता वाद निर्माण होण्यास वा या विकृतीला बढावा मिळण्यास केवळ भाषा हा एकच आधार नाही तर तो वेगवेगळया स्वरूपात अविष्कृत होत असतो.

सांस्कृतीक अस्मिता :– वेगवेगळया सांस्कृतीक अस्मिता व त्यातून केली जाणारी वेगळया राज्याची मागणी याचा उल्लेख यात करता येर्दल. उदा. तामीळनाडुतील द्रमुकने चालविलेली विघटनाची चळवळ. या चळवळीचे असे म्हणने होते की, इतर भारतापेक्षा दक्षिण भारताची संस्कृती भीन्न आहे त्यामूळे मद्रास, केरळ, म्हैसूर मिळुन एक द्रविडीस्थान निर्माण करण्यात यावे.

भाषीक अस्मिता :– मातृभाषेविषयी अभिमान ही चिंतेची बाब नसली तरी भाषीक दुराभीमान हा निश्चितच चर्चेचा विषय बनतो. भाशेच्या आधारावरूनच भाशावर प्रांतरचनेची मागणी पूढे आलेली होती. भाषेच्या तत्वावर प्रांताची पुनर्रचना झाल्यावर देशात संकुचीत प्रवुत्ती मोठया प्रमाणावर वाढीस लागल्या देशातील निरनिराळया प्रांतामध्ये सिमा प्रश्नासारखे वादग्रस्त प्रश्न निर्माण झाले. त्यातून विविध भाषीकांत कटुता निर्मान झाली. याचाच दुसरा एक परिणाम म्हणजे विविध राज्यात भाषीक दुराभीमान बाळगणाऱ्या संघटना उदयास आल्या.

मागासले पणाची भावना :– देशातील विविध घटक राज्यांची प्रगती एकसारखी दिसत नाही. त्याच्या विकासात व आर्थिक परिस्थितीमध्ये पराकोटीची विशमता आढळते. सरकारच्या नव्या आर्थिक धोरणांमुळे काही राज्यांचा विकास झाला तर काही कायमचे मागासलेले राहीले. तसेच राज्यातील काही प्रदेशाचाही व सर्व भागांचा विकास समतोलरीत्या झालेला नाही. उदा. महाराष्ट्रातुन ज्यात विदर्भ व मराठवाडा या भागावर नेहमीच अन्याय होतो अशी या भागातील जनतेची तक्रार नेहमीच असते.

भौगोलीक परिस्थती :– विशाल असा भारताचा भूप्रदेश हा एकसंघ असला तरी त्यातील विविध प्रदेशात मोठया प्रमाणात विविधता आढळते. भारतात आजच्या स्थितीला 28 राज्ये व 9 केंद्रशासीत प्रदेश आहेत. या सर्व भागातील भौगोलीक परिस्थीती एकसारखी नसून त्यात भीन्नता आहे. त्यातील एक भाग हा दुसऱ्या भागापेक्षा स्वतःला वेगळा समजतो. त्यामुळे संघर्षाची स्थिती उद्भवुन प्रांतवादाला खतपाणी मिळत असते.

प्रादेशीक संघटनाचे नेतृत्व :– भारताच्या राष्ट्रीय राजकारणावर आज प्रादेशीक पंक्षाचे वर्चस्व निर्माण होतांना दिसते. या प्रादेशीक पक्ष व संघटनामुळे प्रादेशीकता वाढण्यास मदत झाली आहे. अषा प्रादेशीक संघटनानी व पक्षांनी घटक राज्यांना अधिक स्वायत्तता देण्याची मागणी वांरवार केलेली दिसते. उदा. तामिळनाडु, तसेच पुर्वी जम्मु व काश्मीर येथील प्रादेशीक पक्षांनी घटक राज्यांना अधिक स्वायत्ता देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

अन्य प्रांतीयांना विरोध :– आपले घटक राज्य वा त्यातील विशिष्ट भागाविषयी अती अभिमानातुन निर्माण होणाऱ्या भूमिपुत्रवादाच्या संकल्पनेमुळे दुसऱ्या राज्यातील लोकांविषयी तिरस्काराच्या भावनेला मोकळीकता मिळाली आहे. या भुमिपुत्रवादाच्या संकल्पनेतूनच महाराष्ट्रात शिवसेना, मनसे, याची बिहार व उत्तर प्रदेषातील स्थलांतराचा विरोध, आसामध्ये उल्फा संघटनेची बंगाली व बिहारी नागरीकांच्या स्थलातंराला विरोध करणारी आंदोलने झालीत.

विघटनवाद :– विघटनवाद हे प्रादेशीकतावादाचे उग्र असे स्वरूप आहे. प्रादेशीकतेचा अतिरेक होऊन भारतातून फुटून बाहेर निघण्याचा प्रयत्न काही घटक राज्यांनी केला होता. उदा. औद्योगीक विकासाच्या बाबतीत दाक्षिणात्य राज्याकडे केंद्राने पुरेसे लक्ष दिलेले नाही असा आरोप करीत तामिळनाडुतील द्रमुकने विघटनवादी व फुटीरतावादी भूमिका घेतली होती. अशी विघटनवादाच्या भुमिकेचे समर्थन करणाऱ्या पंक्तीत पंजाबमधील खलीस्तान व ईशान्य भारतातील त्रिपुरा, आसाम, मनिपूर, नागालॅड, मिझोरम, मेघालय या प्रदेशाचा उल्लेख करता येईल.

निष्कर्श :– संविधानातील संघराज्य रचना हा राष्ट्रीय व प्रादेशीक निष्ठांचा त्यांच्या परिने मेळ घालण्याचा प्रयत्न होता मात्र प्रादेशीकतेची

भावना आणि राष्ट्रीय एकात्मता यांचा नीट समन्वय निर्माण करणे भारतीय राज्यव्यवस्थेला जमले नाही त्यातूनच प्रादेशीकता वाद या नकारात्मक निष्ठेची जोपासणाऱ्या संकल्पनेला पोषक वातावरणाची निर्मिती झाली. या प्रदेशीकवादाचा अतिरेक झाला की, त्याची परिणीती त्या प्रदेशात विघटनवादी किंवा फुटीरतावादी शक्ती प्रबळ होण्यात होते. प्रादेशीकतावादामूळे निरनिराळया प्रातांतील विशिष्ट प्रादेशीक विभागात वेगवेगळया घटक राज्यांची मागणी पूढे येते. अनेक घटक राज्याकडुन करण्यात येत असलेल्या वाढत्या स्वायत्ततेच्या मागण्या, भाषा किवा संस्कृतीच्या आधारे पोसला जात असलेला संकुचितपणा या सर्वाचे मुळ प्रादेशीकतावादातच आहे. यातूनच राष्ट्रीय एकात्मतेला मोठा धोका आहे.

संदर्भ ग्रंथ सुची

- *व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास (संपादित), 2010, भारतीय लोकशाही – अर्थ आणि व्यवहार, डायमंड पब्लीकेशन्स, पुणे.*
- *लोटे रा. ज., 2009, भारतीय शसन आणि राजकारण, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लीशर्स, नागपूर.*
- *सांबळे आर. डी., 2004, भारतीय शसन आणि राजकारण, हिमालया पब्लीकशींग हाऊस, नागपूर.*
- *फाडिया बी. एल., 2006, राजनीती विज्ञान, प्रतियोगीता साहित्य सिरिज, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आग्रा.*
- *पळशीकर सुहास, 2004, समकालीन भारतीय राजकारण प्रतिमा प्रकाशन, पुणे.*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

'युमकाल' मधील आदिवासी चळवळ : एक अभ्यास

डॉ. बी. आर.भोसले
सहयोगी प्राध्यापक
समाजशास्त्र विभाग, यशवंत महाविद्यालय, नांदेड

★★★

Abstract – आदिवासी चळवळ ही भारतातील सामाजिक चळवळीपैकी एक महत्वपुर्ण असलेली चळवळ आहे. 'मागासलेले हिंदु' या नावाने डॉ.घुर्ये यांनी या समुदायातील लोकांचे वर्णन केले आहे. जो एका निश्चित भुप्रदेशावर वास्तव्य करतो. ज्यांचे स्वायत्त शासन असते, बाहच्या संस्कृतीपासुन अलिप्त असतो, अशी वैशिष्ट्यो धारण केलेला हा समुदाय असुन या समुदयापैकी अनेक समुदायांनी सामाजिक चळवळी घडवून आणल्या आहेत. स्वतंत्र भारताच्या राज्य घटनेत 'अनुसुचित जमाती' म्हणून यांचा उल्लेख केला जातो.

बस्तर जिल्हच्याातील आदिवासी समुदायांनी घडवून आणलेले आंदोलन आणि त्या आंदोलनाचे स्वरुप या विषीचे लिखाण ज्या ग्रंथात करण्यात आले आहे तो ग्रंथ डॉ.सुधीर सक्सेना यांनी लिहिलेला असून 'युमकाल' असे या ग्रंथाचे नाव आहे. या ग्रंथात बस्तर या प्रदेशातील ज्या आदिवासी जनजातीनी आंदोलन केले आहे त्याचे विवेचन या ग्रंथात आहे. सदरील शोधनिबंध दुय्यम तथ्य संकलनाच्या साधनाचा वापर करुन आदिवासी चळवळी विषयीचे तथ्य प्रस्तुत करण्यासाठी सादर करण्यात आला आहे. या शोधनिबंधात बस्तरमधील कोणत्या आदिवासी जनजातीनी चळवळ केली होती आणि त्याची कारणे कोणती होती या विषयीचे विवेचन आहे. सदरील अध्ययनासाठी 'युमकाल' या ग्रंथाचे निश्चित उद्देष ठेवून वाचन करण्यात आलेले असून यात या चळवळीची पार्श्वभुमी विषद करण्यात आली आहे.

Key Words – बस्तरांचल, अरण्यकसंस्कृती, उपनिवेशवाद, महाविपल्व, बेगाड, कबाडी, स्वदेशी सामंत, साम्राज्यवाद, साम्राज्यवादी शक्ती, विद्रोह, सशस्त्र प्रतिकार.

आदिवासी चळवळीचा इतिहास भारतातील सामाजिक चळवळीच्या वैभवामध्ये विशेष महत्व असलेला आहे. भारतातील आदिवासी चळवळींचा इतिहास बघत असताना 'युमकाल' या ग्रंथामध्ये आदिवासी लोकांनी केलेल्या चळवळीचे वर्णन आहे. त्याची नोंद घेतल्याशिवाय पुढे जाता येत नाही. कारण या ग्रंथात ज्या आदिवासी चळवळी विषयी विवेचन करण्यात आले आहे, ते

विवेचन आणि त्या विवेचनाचा विषय अतिशय महत्वाचा आहे. सुधीर सक्सेना यांनी लिहिलेले 'युमकाल' या नावाचे पुस्तक आदिवासी चळवळीचा जिवंत इतिहास वर्तमान भारतासमोर ठेवतो. भारतामध्ये ज्या वेगवेगळ्या चळवळी घडून आलेल्या आहेत. त्यात आदिवासी चळवळीचा महत्वाचा वाटा राहिलेला आहे. बस्तर या छोट्याशा गावापासुन प्रारंभ झालेल्या या चळवळीत अनेक आदिम समुदाय सहभागी झालेले होते. 'बस्तर इतिहास आणि संस्कृती' या ग्रंथात बस्तरची स्थिती संशोधकाने उपस्थित केली आहे. सदरील शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन साधनाचा वापर करण्यात आला असून लेखी साहित्य, संदर्भ पुस्तके, ग्रंथ आणि अन्य लिखित साहित्याचा वापर करण्यात आला आहे.

बस्तरमधील ज्या आदिवासी जनजाती आहेत. त्यांचा अभ्यास लाला जगदलपुरी या लेखकाने केलेला आहे. बस्तर जिल्हा हा चार संस्कृतीच्या प्रभावा खालील जिल्हा आहे. या जिल्हच्याच्या अवती भोवती छत्तीसगड, आंध्र प्रदेश, ओरीसा आणि महाराष्ट्र या प्रदेशाच्या सिमा आहेत. सिमा आणि संस्कृतीची विविधता असून सुध्दा हा प्रदेश स्वतःची अरण्य संस्कृतीमुळे या जनजातीनी 'बस्तर' आंदोलन घडवून आणले होते. त्याच आंदोलनाचा आढावा या शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

आदिवासी जनतेसाठी वेगवेगळे शब्द वापरले जातात मानवशास्त्रज्ञानी आदिम जनजातीसाठी, जनजाती, आदिवासी, वनवासी, आदिम जाती अशा संज्ञांचा वापर केलेला आहे. हच्या संज्ञा समान अर्थाने वापरल्या जातात. विशिष्ट सांस्कृतिक विशेषता असल्यामुळे आदिवासीची स्वतंत्र ओळख असलेली दिसते. भारतात आदिवासी चळवळीमध्ये संथाल चळवळ, कोल चळवळ, छोटा नागपुर मधील आदिवासी चळवळ, बस्तरची चळवळ, झारखंड आंदोलन बिरसा मुंडा चळवळ, भिल्ल आंदोलन, ताना भगत आंदोलन, बोडो आंदोलन आदि चळवळी महत्वपूर्ण आहेत. या चळवळीनी आदिवासींना एकत्र आणून त्यांच्यामध्ये आत्मभानाची भावना निर्माण केली. या चळवळी स्वातंत्र्य पुर्व कालखंडात घडून आल्या. स्वातंत्र्यानंतर या चळवळीनी नक्षलवादाकडे प्रवास केलेला दिसतो. या चळवळीपैकी महत्वाची मानली जाणारी बस्तर चळवळ आणितिची पार्श्वभुमी अभ्यासणे हा मुख्य हेतु असून आदिवासी चळवळींना जवळून बघणे हा शोधनिबंधाचा हेतु आहे.

'युमकाल' हा ग्रंथ बस्तरमध्ये घडून आलेल्या चळवळीचे वस्तुनिष्ठपणे विवेचन करतो. या ग्रंथात बस्तर मधील आदिवासी आणि त्यांनी घडवून आणलेला विद्रोह याचे विश्लेषण करण्यात आले आहे.

बस्तरमधील गदबा, भतरा, राजमुरिया, मुरिया, दंडामी, माडिया, अबूझा माडिया, दोला और हलवा या जनजातीनी बस्तर आंदोलनात सहभाग घेतला होता. याच बरोबर अल्पसंख्याक समुदायातील महारा, धाकड, पनका, सुंडी, कलार, बजारा, क्षत्रिय, ब्राम्हण आणि कायस्थ यांनी सुध्दा या आंदोलनात सहभाग नोंदवला होता. जमिनदार, जहागीरदार

आणि श्रीमंत माणसे मात्र या आंदोलनापासुन अलिप्त राहिली. तत्कालिन बस्तरमधील 46 परगने सहभागी झाली होती. ब्रिटिश शासनाचे या समुदायावर केलेल्या अन्याय, अत्याचारामुळे हे आंदोलन उभे राहिले. ब्रिटिशांना धडा शिकवणे हा या आंदोलनाचा हेतु होता. या आंदोलनात मोठ्या प्रमाणात परंपरागत अवजारांचा वापर करण्यात आला. सामान्य माणुस आणि मागास वर्ग यांनी सुध्दा या चळवळीत सहभाग नोंदवला मात्र या प्रदेषातील संरजामदारानी इंग्रजाना सहकार्य केले. या लोकांनी ब्रिटिशाना सहकार्य करुन साम्राज्यवादाचा भारतात विस्तार केला.

बस्तरमधील जनजातीची एक अरण्य संस्कृती होती. जंगलाविषयी त्यांना आपुलकी होती आणि या संस्कृतीत ब्रिटिशांनी केलेला हस्तक्षेप या जनजातीतील लोकांना मान्य नव्हता. बस्तर मधील आंदोलन 1990 मध्ये घडून आले. ब्रिटिशांनी साम्राज्य विस्ताराबरोबर भारतातील या जनजातीवर नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक कायदे केले.

असाच कायदा 1908 मध्ये ब्रिटिशांनी निर्माण केला. या कायद्यामुळे बस्तर राज्यामधील सर्व जंगले आरक्षित करण्यात आली. जंगल या लोकांचा आत्मा होता आणि त्यांच्या जीवनाचा महत्वपुर्ण आधार होता. या कायद्यामुळे आरक्षित जंगलामध्ये या प्रदेशातील लोकांना प्रवेश सुध्दा नाकारण्यात आला. वनसंपत्ती पासुन त्यांना दुर करण्यात आले. जंगलामध्ये स्वतंत्र नविन जगण्याचा त्यांचा नैसर्गिक अधिकार त्यांच्यापासुन हिरावून घेण्यात आला. यामध्ये राज्यामध्ये शिक्षण अनिवार्य करण्यात आले. लोकांना जबरदस्ती शिक्षण घेण्यासाठी बाध्यकरण्यात आले. शिक्षक हा हुकुमशहा सारखा वागत असे. शिक्षणाचा आंतक या लोकांना सहन झाला नाही. शिक्षणात सहभागी न झालेल्या मुलांना व आई वडीलांना झाडांना उलटे लटकवण्याची शिक्षा दिली जात असे. याच बरोबर अनेक अन्याय, अत्याचार या लोकांवर केले गेले. याचा परिणाम म्हणून इ. स.1910 मध्ये बस्तर आंदोलन घडून आले. हे आंदोलन उलनाद, जगदलपूर तहसील अंतर्गत पुर्व बस्तर मधील एका भागात घडून आले.

या संदर्भात लाला जगदलपुरी यांनी केलेले वर्णन या आदिवासी आंदोलनाचे स्वरुप स्पष्ट करते ते असे म्हणतात की 2 फेब्रुवारी 1910 मध्ये पुसवाल बाजारात लुटपाट करण्यात आली. इंग्रजांनी हे आंदोलन मोडून काढण्यासाठी मोठे प्रयत्न केले. आंदोलकावर गोळीबार करण्यात आले. नेत्यांना अटक करण्यात आली. तीर, कमान, भाले यांचा वापर करुन हिंसक आंदोलन घडवून आणले. ब्रिटिशांनी 25 मार्च 1910 रोजी मोठा प्रतिकार करुन या आंदोलनाची त्रिवता समाप्त केली.

समारोप : 'युमकाल' या ग्रंथात सुधीर सक्सेना यांनी बस्तरमधील आदिवासी चळवळीचे विवेचन केले आहे. बस्तर चळवळ अन्य आदिवासी चळवळीपेक्षा वेगळी होती. ब्रिटिश अत्याचार, शोषण या विरुध्द ही चळवळी होती. ही चळवळ संघटीत होती आणि ब्रिटिशांना धडा शिकवणे हा या चळवळीचा उद्देश होता. अरण्यसंस्कृतीचे जतन करणे, उपनिवेशवादाला विरोध करणे, साम्राज्यवादी शक्तीला विरोध करणे हे उद्देष बस्तरमधील आदिवासी चळवळीचे होते. मात्र ब्रिटिशांच्या महाशक्तीपुढे ही चळवळ तग धरु शकली नाही.

संदर्भसूची :

1. *Devi Uma, (2001) Economic and Political Weekly, Sameeksha Trust, Mumbai.*
2. *श्रीलता स्वामीनाथन, ;2001, आधी जमीन, समकालीन प्रकाषन, पाटणा.*
3. *Sinha Surjeet, (2002) Social Movements and the State, Social Movement in India (Ed.) M.S. Rao, Manohar Publication, New Delhi.*
4. *Thapar Romesh (Ed), 2010 Tribe caste and Religion in India, Macmillan, New Delhi.*
5. *बी.आर.नंदा, ;2010द्ध आझादी आंदोलन और आदिवासी आंदोलन oxford University Press, New Delhi.*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

भारतीय अर्थव्यवस्थेत लघू व कुठीर उद्योगांचे महत्त्व

प्रा. जगदीश रामभाऊजी वाटमोडे
सहा. प्रा. अर्थशास्त्र विभाग
संताजी महाविद्यालय नागपूर

★★★

सारांश :– जगातील सर्वात वेगवान वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेपैकी एक असणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप हे मिश्र अर्थव्यवस्थेचे आहे. यात खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही क्षेत्रांना महत्त्व दिले जाते. अर्थ व्यवस्थेला स्थिरता व राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करण्यासाठी औद्योगीकरणासोबतच लघु व कुटीर उद्योगाचाही विचार करणे किंबहूना त्यास प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे. भारतात प्राचीन काळापासुनच लघु व कुटीर उद्योगाचे विशेष स्थान आहे. रोजगार निर्मिती, आर्थिक विषमता कमी करणे, मोठया उद्योगास पूरक व मदतगार ठरून शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करून देशाचा संतूलित विकास साध्य करण्यास लघु व कुटीर उद्योग हे महत्त्वपुर्ण भूमिका पार पाडत असतात. या उद्योगाच्या महत्त्वामुळेच स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून लघु व कुटीर उद्योगाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातच या उद्योगांचा पर्याप्त प्रमाणात विकास करण्याकरीता अनेक उपाय आज भारत सरकारच्यावतीने योजले जात आहे.

बिजशब्द :– अर्थव्यवस्था, लघु व कुटीर उद्योग, कृशी, सेवाक्षेत्र, राष्ट्रीय उत्पन्न, बाजारपेठ, रोजगार, भांडवल, लोकसंख्या, पांरपारीक कला, आर्थिक विषमता, आर्थिक विकास.

प्रस्तवणा :– देशाची प्रगती व आर्थिक विकास हया दोन्ही बाबी परस्पर पुरक अषाच आहेत. देशात आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरळीत असेल तर त्या देशातील लोकांना उच्च प्रकारचे जीवनमान प्रदान होत असते. आर्थिक विकास हा संबधीत देशाने स्वीाकारलेल्या आर्थिक व्यवस्थेवर अवलंबुन असतो. देशात निर्माण होणाऱ्या वस्तू व सेवांचे उत्पादन, अपभोग आणि वितरण इ. आर्थिक व्यवहाराचे नियमण व नियंत्रण करण्यासाठी स्वीकारलेल्या व्यवस्थेला अर्थव्यवस्था असे संबोधले जाते. अर्थव्यवस्थेची व्याख्या करतांना प्रा. ग्रेगरी ग्रॉसमन असे म्हणतात की, ''देशातील व्यक्ति, कुंटूबे, उद्योग संस्था, व्यवसाय संस्था यांच्या मार्फत उत्पादन, विभाजन, विनिमय व उपयोग या आर्थिक क्रिया पार पाडल्या जातात. हे देशातील विविध घटक व संस्थाना वळण लावण्यासाठी ज्या यंत्रणेचा वापर केला जातो, तिला अर्थव्यवस्था म्हणतात.''उत्पादन साधनांचे स्वामीत्व व व्यवस्थापन यांच्या आधारावर भांडवलशाही, समाजवादी व मिश्र अर्थव्यवस्था असे अर्थव्यवस्थेचे सर्वसाधारणतः तीन प्रकारात विभाजन केले जाते. त्यातच आर्थिक विकासाच्या दृष्टिने जगातील विविध अर्थव्यवस्थेचे वर्गिकरण हे अल्पविकसीत अर्थव्यवस्था व विकसनशील अर्थव्यवस्था आणि विकसीत अर्थव्यवस्था या प्रकारात करता येते. सार्वजनिक आणि खाजगी या दोन्ही क्षेत्राचे सहअस्तीत्व असणारी भारतीय अर्थव्यवस्था ही मीश्र स्वरूपाची असून ती विकसनशील अर्थव्यवस्था आहे. दरडोई उत्पान्नाची निम्न पातळी, शेती क्षेत्रावर अधिकाधिक भर, शेती उत्पादनाची निम्न पातळी, मूलभुत व जड उद्योगांचा मर्यादीत विकास, वेगाने वाढणारी लोकसंख्या, वाढती बेकारी, अत्याधीक दारीद्रयता, आर्थिक विषमता, नैसर्गिक सांधनाचा अपुर्ण वापर उपयुक्त सामाजिक वातावरण व प्रेरणेचा अभाव इ. अषी भारतीय अर्थव्यवस्थेची मूलभूत वैशिष्टये आहेत.

संशोधन पद्धती :– प्रस्तूत शोध निबंधामध्ये वर्णनात्मक, विश्लेषणात्मक व ऐतिहासिक पद्धतीचा अवंलब करण्यात आलेला आहे.

भारतीय अर्थव्यवस्था :– भारतीय अर्थव्यवस्थेत भांडवलशाही व समाजवादी अर्थव्यवस्थेच्या वैशिष्टयांचा समन्वय साधला गेलेला आहे. म्हणजेच भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप हे मिश्र अर्थव्यवस्थेचे आहे यात खाजगी व सार्वजनीक अशा दोन्ही क्षेत्रांना महत्त्व दिले जाते. खाजगी क्षेत्रांना यात स्वांतत्र्य देण्यात आले असले तरी त्यांना सरकारी नियमांच्या चौकटीतच कार्य करावे लागते. अर्थातच खाजगी व सार्वजनिक ही दोन्ही क्षेत्रे परस्पर पुरक कार्य करतात. भारताने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली असल्यामुळे यात खाजगी व सार्वजनिक या दोन्ही क्षेत्रांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. यात समाजहिताची जाणीव ठेऊन जलद गतीने विकास साधण्याकरीता लोकांच्या सहभागीतेवर व स्वंयपूर्ततेवर भर देण्यात आलेला आहे. यासोबतच आत्याधिक आर्थिक विशमता निर्माण होऊ नये म्हणून आर्थिक केंद्रीकरणावर नियंत्रण प्रस्थापीत करण्याकरीता आर्थिक परवाना धोरणाचा अवलंब करण्यात आला आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील सर्वात वेगात वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेपैकी एक असून यात भारताचा चीननंतर दुसरा क्रमांक लागतो. वैविध्यपूर्ण असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेत शेती, हस्तव्यवसाय, कापडगीरण्या, उद्योगधंदे, उत्पादन आणि विविध प्रकारच्या सेवा अशा अनेक बांबीचा त्यात समावेश होतो. शेती व त्यासंबधीत उद्योग व्यवसायावर अधिकाधीक आधारीत असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेत आज सेवा क्षेत्राचाही झपाटयाने विकास व विस्तार होतांना दिसून येतो. उपलब्ध कुशल व अकुशल मनुष्यबळाद्वारे जगाला बाहयस्त्रोताच्या सेवा पुरविणारा देश म्हणून आज भारत देश व भारतीय अर्थव्यवस्थेचा नाव समोर येत आहे. भारतीय अर्थव्यवस्था अधिक गतीमान व विकसीत करण्याच्या कार्यात औषध निर्माण, जैव तंत्रज्ञान, दुरसंचार जहाज निर्माण विमान निर्माण तसेच पर्यटन इ. अशी महत्त्वपुर्ण क्षेत्रे आपली क्षमता सिध्द करीत आहेत.

जलद औद्योगीकरण म्हणजे जलद आर्थिक विकास ही संकल्पना रूढ होत असतांनाच भारतानेही समतोल व जलद आथिक विकास घडवून आणण्याकरीता कृशी क्षेत्राच्या विकासाबरोबरच औद्योगीक क्षेत्राच्या विकासावरही भर दिलेला आहे. भारतातील एकून उद्योगाची वर्गवारी संघटित उद्योग आणि असंघटीत उद्योग याप्राकरे केली जाते. लोखंड व पोलाद, सिमेंट पेट्रोलीयम, कापड, ताग, चहा, साखर अभीयांत्रीकी इ. उद्योगांचा संघटीत उद्योगामध्ये तर कुटीर उद्योग, लघु उद्योग, खादी व ग्रामउद्योग इ. चा असंघटित उद्योगामध्ये समावेश होतो. प्रचंड लोकसंख्या, मोठया प्रमाणात असणारी बेकारी तसेच गरीबी यावर मात करण्यासाठी संघटीत व असंघटीत उद्योगाच्या विकासावर भर देत असतांनाच भारताने जलद आर्थिक विकास साध्य करण्याकरिता औद्योगीकरणासही प्राधान्य दिले आहे.वाढत्या मागणीची पुर्तता षेती व इतर विषयांची प्रगती, भांडवल निर्मितीच्या वेगात वाढ करण्यासाठी तसेच अर्थव्यवस्थेला स्थिरता व एकूणच राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करण्यासाठी औद्योगीकरणाची कास धरणे महत्त्वाचे असले तरी लघू आणि कुटिर उद्योग हे भारतीय अर्थव्यवस्थेचे एक महत्त्वाचे अंग आहे. त्या अनूशंगानेच मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती, आर्थिक विषमता कमी करणे, मोठया उद्योगास साहचाक ठरून शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करून देशाचा संतूलीत विकास साधण्याकरिता लघू व कुटीर उद्योगाचे स्थानही तेवढेच महत्त्वपुर्ण आहे. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने या उद्योगांचा पर्याप्त विकास करण्याकरिता अनेक उपाय योजलेले दिसतात.

लघु व कुटीर उद्योग :– स्वातंत्र्यपुर्व काळात भारतात ग्रामीण आणि लघु उद्योगांचा एक संयुक्त वर्ग होता. यात शेती ते हातमाग चंदनाच्या लाकडापासून वस्तू तयार करणारे कारखाने इ. चा समावेश यामध्ये केला जात होता. यापैकी बरेच उद्योग हे ग्रामीण होते. त्यातच ते भारतीय संस्कृतीचा व पंरपरेचा एक महत्त्वाचे अंग होते. स्वातंत्र्याप्राप्तीनंतर पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी जी राष्ट्रीय नियोजन समिती नेमली होती त्या उपसमितीचे सचिव के. टी. शहा यांनी लघु उद्योग किंवा कुटीर उद्योगाची व्याख्या करतांना असे म्हटले आहे की, ''अशा उपक्रमाला किंवा प्रक्रियेच्या मालिकेला लघू उद्योग किंवा कूटीर उद्योग म्हणण्यात यावे की, जे एका कुशल कामगाराद्वारे स्वताच्या जबाबदारीवर संचालीत केले जातात आणि तो स्वतःच उत्पादीत मालाचे विपनन करतो आणि स्वतःच्या घरात काम करतो, आपल्या कुंटूंबातील सदस्याची मदत घेतो. अत्याधूनिक यंत्र सामुग्रीचा वापर करीत नाही हे लद्यु उद्योजक आपल्या शेजारील बाजार पेठेतच आपल्या वस्तूची विक्री करतात''

भारतामध्ये प्राचीन काळापासून लद्यु व कुटीर उद्योगांचे महत्त्वपुर्ण स्थान आहे. बऱ्याच वेळा लघु उद्योग, मृदा उद्योग, कुटिर उद्योग आणि खेडयात चालणारे उद्योग या सर्व संज्ञा एकाच अर्थाने वापरल्या जात असल्या तरी मात्र लघु उद्योग आणि कुटिर उद्योग यामध्ये फरक आहे. 1955 मध्ये भारत सरकारने लघु–उद्योगाची व्याख्या करतांना म्हटले आहे. की, ''ज्या उद्योग संस्थेत 50 पेक्षा कमी कामगार नोकरीवर असुन 100 पर्यंत कामगार नोकरीवर ठेवण्याची क्षमता असते आणि जेथे विद्युत शक्तीचा वापर केला जात नाही. अशा उद्योग संस्था म्हणजे लघू उद्योग होत. तर ''ज्या उद्योग घटकात बहूसंख्य श्रमिक हे मालकाचे कुंटुबीयच असतात. ज्याच्या मालाला बहूशः स्थानिय वा मर्यादीतच बाजारपेठ असते व ज्यामध्ये भांडवल गुतंवणूक फारच कमी प्रमाणावर केली असते अशा उद्योगांना कुटीर उद्योग असे म्हणतात. कुटीर उद्योग व लघू उद्योग यांचे आर्थिक प्रश्न सारखेच असल्याने त्यांचा विचार बहूदा एकत्रच केला जातो.

कुटीर उद्योग हे लहान प्रमाणावर सामाण्यतः घराघरातून चालविले जाणारे उद्योग आहेत. लघूउद्योग हे कुटीरोद्योगापेक्षा थोडे मोठे असतात. भारतात शेती क्षेत्रानतंर रोजगार निर्माण करण्याच्या बाबतीत लघु उद्योगाचा क्रमांक लागतो. कुटीर उद्योग हे प्रामुख्याने शेतीशी सबंधीत असतात. कारागीर आपल्या हे प्रामुख्याने शेतीशी सबंधीत असतात. कारागीर आपल्या घर बसल्या हया उद्योगामध्ये हातभार लावू शकतात आणि याद्वारे अंशकालीन किंवा पुर्णकालीन रोजगार मिळविण्याचा प्रयत्न करतात. कुटीर उद्योग हे कुंटूबातील व्यक्तिच्या मदतीने केले जातात. यात लागणाऱ्या कामगारांची संख्या 10 पेक्षा जास्त नसते आणि भांडवल सुध्दा 5000 रूपयापेक्षा अधिक नसते. भारतीय कुटीर उद्योगात हातमाग, विडया वळणे, धोंगळया विणणे, गुळ तयार करणे, बांबु काम, कुंभार काम, चर्मोद्योग तेलघाण्या, नक्षीकाम, रेशमी वस्त्रे, रंगकाम सुतारकाम, मधमाशापालन इ. चा समावेश होत असतो. या उद्योगात स्थानिक कच्चा माल व कुशलतेचा वापर केला जातो.

लघू उद्योगाची व्याख्या ही त्यामध्ये गुंतविलेले भांडवल व निर्माण होणारी रोजदांरी यावरून केली जाते. तसेच भारतातील लघु उद्योगातील गुंतवणूकीची कमाल रक्कम ही प्राप्त परिस्थीतीनुसार वाढविण्यात येत असते. 1966 मध्ये उद्योगात 7.5 लाखापर्यंतची गुंतवणूक करणाऱ्या उद्योगाला लघू उद्योग ठरविण्यात आले तर 1997 मध्ये ही गुतंवणुकीची मर्यादा 3 कोटीपर्यंत वाढविण्यात आली. अर्थात लघु उद्योग सुरू करण्याकरिता मोठया प्रमाणावर भांडवलाची गरज असते. हयात स्थानिक व बाहय कच्चा माल तसेच आधुनिक यंत्रे व कुषलतेचा वापर केला जातो. लघु उद्योगात तयार होणाऱ्या वस्तूमध्ये कपडे तयार करणे, वाहणाचे सुटे भाग तयार करणे, प्लॅस्टीकच्या वस्तू तयार करणे, लहान अभियांत्रीकी वस्तू निर्माण करणे, लहान अभीयांत्रीकी वस्तू निर्माण करणे इ. चा समावेश होतो. लघू उद्योगाची बाजारपेठ ही विस्तारीत असल्यामुळे या उद्योगातील वस्तू निर्यात केल्या जातात. कुटीर उद्योग व लघु उद्योग यामधील फरक करतांना राज्य वित आयोगाने असे म्हटले आहे की, कुटीर उद्योग हे शेतीशी संलग्नीत असतात आणि ते ग्रामीण भागात अर्धवेळ व शहरात पुर्णवेळ काम पूरवितात. लघु उद्योगांचा विस्तार हा बहुतांश प्रमाणात शहराच्या ठिकाणी झालेला दिसतो. तसेच ते पुर्णपणे रोजगार उपलब्धा करून देतात. असे असले तरीही कच्च्या मालाचा तुटवडा, पर्याप्त भांडवल उपलब्ध नसणे, तांत्रिक सुधारणांचा अभाव तयार होणाऱ्या

वस्तुच्या विक्रीची समस्या, उत्पादनास येणारा अधिकचा खर्च इ. अषा समस्यांचा सामना हा लघु उद्योग व कुटिर उद्योग या दोहोंनाही करावा लागतो. त्या दृष्टिने भारत सरकारकडुनही हया उद्योगांच्या विकासा करीता नियोजणाच्या माध्यमातून बरेच प्रयत्न करण्यात येत असतात.

भारतीय अर्थव्यवस्थेतील लघु व कुटीर उद्योगाचे महत्त्व भारतीय अर्थव्यवस्थेत कुटीर व लघु उद्योगांना अंत्यत महत्त्वाचे स्थान आहे. भारताच्या आर्थिक, सामाजिक व औद्योगीक विकासात कुटीर उद्योग व लघु उद्योग यांनी महत्त्वपुर्ण वाटा उचलेला आहे. 18 व्या शतकाच्या मध्यापर्यंत लघु व कुटीर उद्योगाचे स्वरूप हे भारतामध्ये भरभराटीस आलेले होते. जगाच्या बाजारात भारतात निर्माण होणाऱ्या अनेक वस्तुंना, विषेशताः सुती व रेशीम कापड, शाली, गालीचे, जरी काम इत्यादिना विषेश मागणी होती. राष्ट्रपीता म. गांधी व दादाभाई नौरोजी यांनी भारतातील दारिद्रय दुर करण्यासाठी कुटीर उद्योगावरच भर दिला. आजही या उद्योगांचे भारताच्या आर्थिक विकासात तेवढेच महत्त्वाचे स्थान आहे हे पुढील प्रमाणे विशद करता येईल.

1) कभी विकासास सहायक :– केवळ शेती या व्यवसायावर अवलंबून असणारी कुंटुबे शेतीतून मिळणाऱ्या अल्प उत्पन्नामुळे कुटूबांची प्रगती तसेच शेतीतील सूधारणा करण्यास असमर्थ ठरतात. मात्र कुटीर व लघु उद्योग हे शेती सांभाळतानांच करता येत असल्यामूळे भारतीय षेतकऱ्याचे उत्पन्न वाढुन शेतीचा विकासही होण्यास मदत झाली आहे.

2) पांरपारीक कला – कौशल्याचे जतण :– स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात निर्माण होणाऱ्या वस्तु देशातच नव्हे तर विदेशातही ग्राहकांच्या पसंतीस उतरलेल्या होत्या. देशातील हे पांरपारीक कौशल्य हे या उद्योगामुळे सुरक्षित राहून याचा वारसा हा पुढेही चालविला जाणे शक्य होते. त्यामुळे अशा उद्योगामुळे पांरपारीक कला–कौशल्याचे एक प्रकारे जतन होते.

3) रोजगार निर्मितीस मदत :– देशातील वाढती बेरोजगारी दुर करण्यास लघु व कुटीर उद्योग हे मदतगार साबीत होत असतात. या उद्योगाद्वारे श्रमाचा अधिकाधीक वापर होत असल्यामूळे रोजगाराची पुर्तता ही या उद्योगातून साधता येते. त्यामूळे बेकारीची वाढती समस्या या उद्योगातून दुर होते.

4) आर्थिक विषमता कमी होण्यास सहायक :– आज भारतात एकीकडे श्रीमंतीचा थाट वाढतच असतांना दुसरीकडे आज गरिबी सुध्दा वाढत आहे. गरीब श्रीमंतातील ही आर्थिक दरी कमी करण्यास कुटीर उद्योग हे सहायक ठरतात. हया उद्योगाची सुरूवात ही कमी भांडवलात करता येणे शक्य असल्यामूळे गरीबांना अशा उद्योगाच्या माध्यमातून आपले उत्पन्न वाढण्यास प्रोत्साहन मिळू शकते.

5) शेतीवरील लोकसंख्येचा ताण कमी होण्यास सहायक :– देशातील अनेक भागात कुटुबांतील सर्वच्या सर्वच सदस्य हे शेतातच काम करीत असल्यामूळे एकूणच शेतीवर लोकसंख्येचा ताण पडणे हे साहजिकच आहे. त्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीत पाहीजे त्या प्रमाणात सुधारणा झालेली दिसत नाही. मात्र कुटीर उद्योगाच्या साहायाने ही परिस्थिती दुर केली जाऊ शकते. कारण असे उद्योग हे श्रमप्रधान व शेतीस सहायक तसेच हंगामी स्वरूपाचे असतात. याचाच परिणाम म्हणजे शेतीवरीत लोकसंख्येचा ताणही दुर करता येते.

6) संतूलीत विकासास मदत :– आर्थिक विकास साधत असंतांना तो जसा जलद असने गरजेचे असते तसेच तो संतुलीतही असने महत्त्वाचे आहे. या आर्थिक विकासात एखाद्या उद्योगाचा सोयी सवलतीमुळे अधिक विकास होऊन दुसऱ्या उद्योगांच्या सवलतीच्या अभावामुळे मागास असणे हे विकासाचे असंतुल निर्माण करते. याचा परिणाम हा आर्थिक विकासावर होत असते. मात्र लघु व कुटीर उद्योग हे सोयी सवलती न घेता सुरू करता येणे शक्य असल्यामूळे असे असंतूलन निर्माण होत नाही.

7) मोठया उद्योगाच्या विकासाला गती :– देशाचा जलद आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी निर्मित मोठया उद्योगासाठी आवश्यक असलेल्या कच्चा माल, यंत्रे अवजारे, इ. वस्तू हया लघु व कुटीर उद्योगातून निर्माण केले जाऊ शकते. अर्थात मोठया उद्योगाच्या गरजेची पुर्तता हे लघु व कुटीर उद्योग करीत असल्यामुळे असे उद्योग हे त्यांच्या विकासाला एक प्रकारची गती प्रदान करतात.

निष्कर्श :– आजच्या औद्योगीकरणच्या विज्ञान व तंत्रज्ञनाच्या युगातही लघू व कुटीर उद्योग हे रोजगार संधी निर्माण करण्यात आघाडीवर आहेत. या उद्योगातून उत्पादीत वस्तु व मालाच्या निर्यातीपासून बरेच परकीय चलन भारताला मिळले आहे. या उद्योगाच्या महत्त्वामुळेच स्वांतत्र्योत्तर काळात भारत सरकारने पंचवार्षीक योजनेच्या माध्यमातून कुटीर व लघू उद्योगांचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या उद्योगांची संख्याही वाढतांना दिसते. देशाच्या सतुंलीत आर्थिक विकास या उद्योगाच्या मदतीने साधला जात असल्यामुळे भारत सरकारकडून या उद्योगांच्या विकासाकरीता नियोजनाच्या माध्यमातुन प्रयत्न चालविले जातात. त्यामुळे लघू व कूटीर उद्योगांच्या महत्त्वाची सार्वत्रिकता दिसून येते.

संदर्भ ग्रंथ सुची :–

1) *माहोरे रामदास, 2016, अर्थशास्त्राचे सिध्दांत, साई ज्योती पब्लीकेशन्स, नागपूर*
2) *डॉ. मुळे डी. व्ही., (प्रकाशक), सुक्ष्म लक्षी आर्थिक विश्लेषण, दुर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.*
3) *डॉ. झामरे जी. एन., 2016, सुक्ष्म अर्थशास्त्रः भाग 2, पिंपळापूरे ॲड पब्लीशर्स, नागपूर,*
4) *डॉ. मंडल, कृशी विकासाचे अर्थशास्त्र, पिंपळापुरे पब्लिशर्स नागपूर.*
5) *राणा के. सी. आणि वर्मा विशाल, समष्टी आर्थिक विश्लेषण, पब्लीशिंग कं. जालंदर, दिल्ली.*
6) *डॉ. काकडे जे. एम., डॉ. कावळे एस. एस., डॉ. कायरकर मनिश, 2019, भारतीय अर्थव्यवस्था, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर.*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

भारत – अमेरिका नागरी अणु सहकार्य कराराचे भारतीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून मुल्यमापन

प्रा. डॉ. जितेंद्र आनंदा माळी.
विभागप्रमुख – संरक्षण आणि सामरिक अभ्यास विभाग,
कै. न्हानाभाऊ म. तु. पाटील कला महाविद्यालय, मारवड,
ता. अमळनेर. जि. जळगांव.

★★★

प्रस्तावना – सर्व जगाला ज्ञात असलेली प्रचंड शक्ती म्हणजे, "अणु शक्ती" होय. दुसऱ्या महायुध्दाची समाप्ती करणाऱ्या या शक्तीने जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या दोन शहरांना पुर्णतः उध्वस्त करुन, अणुंच्या विध्वंसक क्षमतेची जगाला ओळख करुन दिली. या अणुबॉम्बच्या वापरामुळे अमेरिका जगात "महाशक्ती राष्ट्र" (Super Power) झाले. सुरुवातीच्या काळात अमेरिका आपल्या जवळील तंत्रज्ञान कोणासही देण्यास तयार नव्हता. परंतु कालांतराने 1949 मध्ये सो. रशियाने अणुचाचणी घडवून अणुशक्ती संपन्न जगातील दुसरे राष्ट्र बनले.*(पाल विनोदकुमार, ब150,2010)* त्यानंतर 1952 मध्ये ब्रिटनने, 1960 मध्ये फ्रान्सने, तर 1964 मध्ये चीनने अण्विक तंत्रज्ञान हस्तगत करुन अमेरिकेची अन्नवस्त्रांतील मक्तेदारी संपुष्टात आणली. जगात सुरु असलेली अण्वस्त्र स्पर्धा भविष्यात ही अशीच सुरु राहील्यास, अल्पावधीतच जगाचा विनाश अटळ आहे. हे ओळखून अमेरिकेने आपल्या अण्विक धोरणात बदल केला. यासाठी अमेरिकेने अन्नवस्त्र संपन्न पाच राष्ट्रांची अन्नवस्त्रांवरील मक्तेदारी कायम ठेवून व इतर राष्ट्रांनी ही क्षमता प्राप्त करु नये म्हणून संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेत 19 नोव्हेंबर 1968 रोजी अन्नवस्त्रांच्या उच्चाटनासाठी "अन्नवस्त्र प्रसार बंदी करार" (Nuclear Non Proliferation Treaty) मांडला. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर अहिंसेच्या तत्वावर अधिष्ठित भारतवासीयांनी जगाला अन्नवस्त्रांपासून दूर राहण्याचा सल्ला देवून, अणु तंत्रज्ञानाचा वापर केवळ शांततामय विकास कार्यासाठी करण्यावा निर्धार जाहीर केला होता. भारताचे प्रथम पंतप्रधान पंडीत नेहरुंच्या नेतृत्वाखाली भारताचे अण्विक धोरण दोन मुलभुत पायांवर आधारलेले होते. त्यानुसार –

1) अणु विज्ञानाचा शांततामय कार्यासाठी वापर आणि अणु कार्यक्रमांबाबत स्वावलंबन.

2) अणु बॉम्बची निर्मिती न करण्याचा निर्धार आणि जागतिक निःशस्त्रीकरणाला सक्रीय पाठींबा.

भारतीय अणुशास्त्रज्ञ डॉ. होमी भाभा व डॉ. मेघनाद सहा यांनी भारतात अणु संशोधनाचा पाया रचून अणु इंधनापासून वीज निर्मीती करणे हे सर्वात महत्वाचे कार्य मानले होते. 1954 मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आयसेन हॉवर यांनी "शांततेसाठी अणू" या धोरणाच आधारे अणुतंत्रज्ञानाच्या प्रसारावर असलेली गुप्ततेची पकड काढून टाकली. त्यामुळे असंख्य भारतीय शास्त्रज्ञ अमेरिकेत जावुन अणु तंत्रज्ञानाचा अभ्यास करु लागले. पुढे 1956 मध्ये कॅनडा आणि अमेरिकेच्या मदतीने भारताने सायरस हा अणु संशोधन प्रकल्प सुरु केला. या प्रकल्पात अणुंचा वापर केवळ शांततामय कार्यासाठीच करण्याची हमी भारताने दिली होती. कारण यापुर्वीच भारताच्या अण्विक धोरणाबाबत 2 एप्रील 1954 रोजी पं. नेहरुंनी लोकसभेत सांगितले होते की, भारत अण्विक शक्तीचा वापर रासायनिक, जैविक, अण्वस्त्रे आणि विनाशक अस्त्रांच्या निर्मितीसाठी कदापी करणार नाही. *(Swhney Pravin, 410, 2002)*

अमेरिकेने मांडलेल्या "अण्वस्त्र प्रसार बंदी करार" हा अमेरिकेची पाठराखण करणारा व पक्षपाती असल्याच्या कारणावरुन विरोध करीत भारताने त्यावर साक्षरी केली नाही, असे परस्पर विरोधी अण्विक धोरण असणाऱ्या भारत–अमेरिके दरम्यान शीतयुध्दोत्तर काळात नागरी अणु सहकार्य करार घडून आला. ही एक ऐतिहासिक बाब मानली जाते. त्याअनुशंगाने प्रस्तृत शोध निबंधात, भारत–अमेरिके दरम्यान 2008 मध्ये झालेल्या नागरी अणु सहकार्य करारासंबंधीत महत्वपुर्ण बाबींचा आढावा घेवून सदर कराराचे भारतीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून मुल्यमापन करण्यासाठी सामान्याकडून विशेषीकरणाच्या विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे.

अमेरिकेने भारतासोबत अणु करार करण्यामागील कारणे – पुढीलप्रमाणे *(गजराज, 40–42, 2014)*

1) अमेरिका या अणुकराराला आपल्या अण्विक प्रसार बंदी उद्देशांच्या पुर्ततेचे एक साधन मानते.

2) अमेरिकेच्या दृष्टीकोनातून 50 वर्षानंतर भारत या करारामुळे आंतरराष्ट्रीय अणु उर्जा आयोगाच्या सुरक्षा उपाय आणि बंधनांमध्ये आला आहे.

3) अमेरिकेच्या दृष्टीने या करारामुळे अणु निर्यात कायदयाला अधिक कठोर करण्यात तसेच अणु चाचण्यांवर बंदी घालणे सहज शक्य होणार आहे.

4) अमेरिकेच्या उर्जा बाजारात शिथीलता आली आहे, तर भारत हा जगातील सर्वात मोठा उर्जेचा ग्राहक असल्याने भारताला अणु इंधन व तंत्रज्ञान उपलब्ध केल्याबद्दल अमरिकेला मोठा आर्थिक फायदा होणार आहे. *(रितू सिंग,67,2005)*

5) भारताचा अण्विक कार्यक्रम तसेच अण्विक केंद्रे यांचा शोध घेण्यात अमेरिका आजपर्यंत अयशस्वी ठरलाहोता. परंतु या करारामुळे भारतीय अणुभट्टया व अणु कार्यक्रम अमेरिकेच्या देखरेखी खाली येतील.

6) अमेरिकेला आर्थिक, सामरिक तसेच राजनैतिक दृष्टीकोनातून आशिया खंडात भारताच्या रुपाने एक महत्वपुर्ण सहकारी व भागीदार मिळणार होता.

7) आंतरराष्ट्रीय मंचावर आपली धेय्यधोरणे लागू करण्यात तसेच त्यांचा विस्तार करण्यात भारतावर अमरिकेचे समर्थन करण्याचा मानसिक दबाव राहील.

8) अमेरिकेच्या वाढत्या सामर्थ्यात प्रवासी भारतीय व्यावसायिकांचे महत्वपुर्ण योगदान आहे. सद्यास्थितीत अमेरिकेतील बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या उच्चपदस्थ अधिकारी ते सामान्य नोकरदार वर्गात भारतीयांचीच संख्या अधिक आहे. विषेशतः माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात तर भारतीयांशिवाय कोणासही पर्याय नाही. त्यामुळे अमेरिका या कराराद्वारे अमेरिकेतील अनिवासी भारतीयांना प्रसन्न करु इच्छित आहे.

9) सदयस्थितीत आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत चीन आणि सो. रशियाची सामरिक भागीदारी झाल्याने त्यांची शक्ती प्रचंड वाढली आहे. अशा या वातावरणात अमेरिका दक्षिण आशियातील सामर्थ्यशाली भारताबरोबर सामरिक संबंध प्रस्थापित करुन भारताच्या शक्तीचा वापर चीन व रशिया यांच्यावर अंकूश ठेवण्यासाठी करु इच्छितो.

10) भारतीय बाजारपेठ ही जगातील दुसऱ्या क्रमांकाची विकसित बाजारपेठ आहे. त्यामुळे अमेरिका भारताबरोबर आर्थिक, व्यापारी आणि सेवा क्षेत्रात संबंध विकसित करु इच्छितो.

11) शीतयुध्दोत्तर काळात आपले जागतिक महासत्ता स्थान कायम टिकवून,आपल्या शक्तीत वाढ करण्यासाठी अमेरिका दक्षिण आशियातील शक्तीशाली भारताला आपल्या बाजुन ठेवू इच्छितो. अशा विविध कारणांमुळे अमेरिका भारताबरोबर नागरी अणु करार करु इच्छित आहे.

भारत अमेरिका नागरी अणु करार – 10 ऑक्टोबर 2008 या ऐतिहासिक दिवशी युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका आणि रिपब्लिक ऑफ इंडिया (भारत) यांच्यात बहुप्रतिक्षीत असा "भारत–अमेरिका नागरी अणु सहकार्य करार" (U.S. – India Civil Nuclear Agreement) किंवा "भारत–अमेरिका अणु करार" (Indo-US Nuclear Deal) झाला.*(Sultan, Maria, 1,2011)* त्यापुर्वी, अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू. बुश यांनी प्रस्तशत करारावर 8 ऑक्टोंबर 2008 रोजी स्वाक्षरी केली होती. त्यांनतर अमेरिकन परराष्ट्र मंत्री कोंडोलिजा राईस व भारतीय परराष्ट्र मंत्री श्री. प्रणब मुखर्जी यांनी 10 ऑक्टोंबर 2008 रोजी वॉशिंग्टन डी.सी. येथे सदर अणु सहकार्य करारावर अधिकृतरित्या स्वाक्षरी करुन त्यास कायदेशिर स्वरुप दिले. भारत अमेरिका अणु करार हा अमेरिकेत 123 करार (परिशिष्ठ–2) (123 Agreement Annerxure-2) या नावानेही ओळखला जातो. *(Parnami K,1,2009)* प्रस्तृत अणुकरार अमेरिकेतील अणुउर्जा कायदा 1954 या हाईड कायदयाच्या आध ाारावर केलेला आहे. या कायदयातील कलम 123 मधील तरतुदींमध ये आवश्यकते नुसार बदल करुन भारताला अणु सहकार्याची परवानगी देण्यात आली आहे. *(Wikipedia, Initiative, 2008)* यावेळी भारतीय पंतप्रधान मनमोहन सिंग आणि अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू. बुश यांनी एक संयुक्त निवेदनाद्वारे भारत आपले नागरी आणि लष्करी अणुप्रकल्प वेगवेगळे करुन नागरी अण्विक प्रकल्प आंतरराष्ट्रीय अणुउर्जा संस्थेच्या (International Atomic Energy Agency - IAEA) देखरेखीखाली आणेल, तसेच सुरक्षा उपाय व बंधने मान्य करेल. त्या मोबदल्यात अमेरिकेने भारताला शांततामय विकास कार्यासाइी पूर्ण नागरी अणु सहकार्य करण्याची तयारी दर्षविली होती. *(US Press Secretary, July 2008)*

करारातील तरतुदी व कलमे – जुलै 2005 मध्ये अमेरिकेने भारताच्या "शांततामय विकास" (Atom for Peace) या अण्विक धोरणाला तत्वतः पाठींबा देवून भारताच्या नागरी अणु प्रकल्पांना संशोधन, शांततामय विकास कार्य व अणुउर्जा निर्मितीसाठी सहकार्य करण्याचे मान्य केले.या अणु सहकार्य करारात एकुण सतरा (17) कलमे व तरतुदी आहेत. *(US embassy.gov, July 2008)* त्यानुसार अमेरिकेने भारताला पुढील सात क्षेत्रात अण्विक सहकार्य करण्याचे मान्य केले आहे. **1)** थर्मल पॉवर रिॲक्टरर्स **2)** फास्ट ब्रिडर रिॲक्टरर्स **3)** फ्युचर रिॲक्टरर्स **4)** रिसर्च रिॲक्टरर्स **5)** प्रतिवाह सुविधा (Upstream Facilities) **6)** अनुवाह सुविधा (Downstream Facilities) **7)** संषोधन सुविधा (Research Facilities) इत्यादी.

करारातील अटी – अमेरिकेने भारतासमोर पुढील काही अटी ठेवल्या होत्या,*(Bhonsle Rahul, 85, 2007)* त्यानुसार –

1) भारताने आपल्या अणुप्रकल्पांचे लष्करी आणि बिनलष्करी असे वर्गीकरण करावे.

2) भारताने बिनलश्करी प्रकल्प स्वच्छेने आंतरराश्ट्रीय परीक्षणाच्या कक्षेत आणावेत.

3) बिनलष्करी प्रकल्पांसंदर्भात आंतरराष्ट्रीय अणुउर्जा आयोगाबरोबर अतिरिक्त करार करावा.

4) विघटक पदार्थ उत्पादन मर्यादासंबंधी करार करावा. इ. अमेरिकेने घातलेल्या या अटी भारताने मान्य करुन आंतरराष्ट्रीय अणुउर्जा आयोगाच्या देखरेखीखाली येणाऱ्या नागरी उपयोगाच्या व देखरेखीखाली न येणाऱ्या लष्करी उपयोगाच्या अणुभट्टयांचे वर्गीकरण केले. तदनंतर सदर कराराला 6 सप्टेंबर 2008 रोजी काही अटींच्या अधीन राहून अणु पुरवठादार गटाची (Nuclear Suppliers Group) मान्यता मिळाली. त्यामुळे गेल्या 34 वर्षांपासून भारतावर लादलेली बंधने समाप्त झाली आणि भारत NSG च्या 45 सदस्य राष्ट्रांपैकी कोणत्याही

राष्ट्रांबरोबर अणु करार करण्यास मोकळा झाला. *(चेंगप्पा राज, 23,2008)*

भारताच्या दृष्टिकोनातून अणुकराराचे फायदे– पुढीलप्रमाणे *(गजराज, 40,2014)*

1) भारताच्या अण्विक कार्यक्रमाला आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त होईल.

2) भविष्यात भारताला युरेनियम अणु इंधनाचा पुरवठा अखंडीत व सुरळीतपणे सुरु राहील.

3)या करारामुळे, भारतात सक्रीय असलेल्या अणुभट्टयांपैकी 14 नागरी उपयोगी तर 8 लश्करी उपयोगाच्या श्रेणीत वर्गीकृत केल्या, त्यास अमेरिकेने मान्यता दिली.

4) त्यानुसार, भारताच्या फास्ट ब्रीडर रिएक्टर अणुभट्टया नागरी उपयोगाच्या श्रेणीतून वगळण्यात आल्या.

5) कोणती अण्विक सुविधा नागरी व लष्करी सूचीत समाविष्ठ करावी याचे निर्णय स्वातंत्र्य भारताला आहे.

6) आंतरराष्ट्रीय अणुउर्जा संस्था भारताशी सुरक्षा उपायांबाबत चर्चा करुन अणु इंधन पुरवठयाचा निर्णय घेईल

7) फ्रान्सचे राष्ट्रपती शिरॉक यांच्या भारत भेटी दरम्यान त्यांनी स्पष्ट केले की, अमेरिकेसोबतच्या प्रस्तावित करारामुळे भारताचे युरोपीयन राष्ट्रांबरोबर विशेषतः फ्रान्स बरोबरचे संबंध अधिक भक्कम व मजबूत होतील.

8) या कराराने अण्विक क्षेत्रात भारताची स्थिती विषशतः चीन आणि पाकिस्तानच्या विरुध्द शक्तीशाली होईल.

9) प्रस्तावित करारामुळे, भारताच्या उर्जा सुरक्षेला सशक्तीकरण प्राप्त होईल. वगैरे.

भारतीय सुरक्षेसंदर्भात अणु कराराचे मुल्यमापन

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर भारताने अणुउर्जेचा सतत शांततामय मार्गाने विकासकार्यासाठी वापर करण्यावर भर दिलेला दिसून येतो. त्या अनुशंगाने भारत–अमेरिका दरम्यानचा नागरी अणु सहकार्य करार हा ऐतिहासिक करार मानला जातो. कारण, जगात आज पर्यंत पुढील तीन प्रकारचेच अणु करार झालेले दिसून येतात. त्यानुसार

1) अण्विक शक्ती संपन्न राष्ट्रांनी अण्विक शक्ती संपन्न राष्ट्रांबरोबर केलेले करार. **2)** अण्विक शक्ती संपन्न राष्ट्रांनी अणु प्रसारबंदी करार (NPT) व बहुव्याप्त चाचणी बंदी करार (CTBT) यावर स्वाक्षरी केलेल्या राष्ट्रांबरोबर केलेले करार होय. **3)** अण्विक शक्ती संपन्न राष्ट्रांनी, अणु प्रसारबंदी करार (NPT) व बहुव्याप्त चाचणी बंदी करार(CTBT)यावर स्वाक्षरी न केलेले परंतु अणुशक्ती संपन्न असलेल्या राष्ट्रांबरोबर केलेले करार. यापैकी भारत–अमेरिका अणु करार हा तिसऱ्या प्रकारात मोडणारा करार आहे. या करारामुळे जगातील सर्वात मोठे लोकशाहीप्रधान राष्ट्र आणि सर्वात शक्तीषाली राष्ट्र यांच्या दरम्यानचा राजकीय अडथळा दूर झाला. यात अमेरिकेचा व्यापारी दृष्टीकोन ही आहे. या कराराचा आधार असलेले सर हेन्री हाईड यांच्या मते, भारत अमेरिका नागरी अणु सहकार्य करारामुळे अमेरिकेचे भारताबरोबर सामरिक संबंध विकसित होवून भविष्यात चीनच्या वाढत्या सामर्थ्याला आळा बसू शकतो. या करारातील खरा अंतस्थः हेतू म्हणजे अमेरिकेला येणाऱ्या नविन शतकात नवनविन संसाधनांची उपलब्धता करुन देणे हा ही आहे. ज्यांच्या सहाय्याने अमेरिका विविध आव्हाने पेलून आपले जागतिक महासत्ता स्थान आबाधित राखू शकेल, असे असले तरी संबंधीत अणुकराराचे भारतीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन सकारात्मक व नकारात्मक मुल्यमापन पुढील प्रमाणे करता येते.

अ) अणु कराराचा भारताच्या सुरक्षेवरील सकारात्मक परिणाम – पुढीलप्रमाणे *(गजराज, 98, 2014)*

1) या अणु करारामुळे भारताला अत्यंत स्वस्त व सोप्यामार्गाने उर्जा निर्मिती करता येणार आहे. कारण अणुउर्जा ही अन्य पारंपारीक उर्जा निर्मिती साधनांपेक्षा स्वस्त व अधिक क्षमतेची आहे.

2) भारताने 1974 मध्ये केलेल्या पहिल्या अणुचाचणी नंतर भारतावर लावण्यात आलेली तांत्रिक बंधने या करारामुळे नष्ट होतील.

3) प्रस्तावित करार करुन अमेरिका आंतरराष्ट्रीय पटावर भारताला एक शक्तीशाली, लोकशाही प्रधान आणि अणुशक्ती संपन्न जबाबदार राष्ट्राचा दर्जा देत आहे. कारण आतापर्यंत अमेरिकेने जागतिक पातळीवर अशा स्वरुपाचा करार अद्यापी कोणत्याही राष्ट्रासोबत केलेला नाही.

4) भारताने सुरुवातीपासुनच अण्वस्त्र प्रसार बंदी करार व बहुव्याप्त चाचणी बंदी करार यांचा उघडपणविरोध करुन त्यावर स्वाक्षरी केलेली नाही. तरीही अमेरिकेने भारताबरोबर अणु करार करणे म्हणजे जागतिक पातळीवरील भारताचा विरोध योग्य असल्याच्या मताला मान्यता देणे होय.

5) या करारानुसार प्राप्त झालेल्या अण्विक तंत्रज्ञान व इंधनाच्या मदतीने भारत अल्पावधीत आपली लक्षणीय प्रगती करुन, भविष्यात अमेरिकेबरोबरचा करार रद्द करु शकतो.

6) या करारामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताला अणुशक्ती संपन्न राष्ट्राची मान्यता मिळून, आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताचे लष्करी व सामरिक महत्व वाढेल.

7) अमेरिकेतील भारतीय प्रतिनिधी अरुंधती घोष या आऊट लूक मासिकात लिहीतात की, हा करार एक तांत्रिक स्वरुपाचा करार असुन हा भारताला फायदेशिर सिध्द होईल. यामुळे भारताला उर्जेची वैकल्पिक साधने प्राप्त होवून,भारत लष्करीदृष्टया शक्तीशाली राष्ट्रांच्या यादीत जावून बसेल.*(नियाज,1343, 2008)*

8) भारताला युनोमध्ये सुरक्षा परिशदेचा स्थायी सदस्य होण्यासाठी

हा करार मदत करु शकतो. कारण अमेरिकेबरोबर हा करार केल्यामुळे भारताच्या प्रयत्नांना अमेरिकेचे पाठबळ मिळेल.

9) सद्यास्थितीत भारतात उर्जेची कमकरता असून 3 टक्के उर्जा तूट आहे, या करारामुळे ती भरुन निघेल.

10) या करारामुळे तारापुर अणुउर्जा केंद्राला पुरेसा अणुइंधन पुरवठा होवून तो बंद होण्यापासून वाचेल.

11) या करारामुळे भारत जागातील 45 अणु पुरवठादार गटाकडून अणु इंधन खरेदी करु शकतो.

12) अमेरिकन परराष्ट्र मंत्री कोडोंलिना राईस यांच्यामते, हा अणु करार करुन अमेरिका भारताच्या विकास कार्यात सहाय्यक बनु इच्छित आहे.

13) भारताकडे असलेली पारंपारीक औष्णिक व खनिज तेल उर्जा साधने कायम टिकणारी नाहीत. त्यामुळे स्वस्तदराने, कमीतकमी किंमतीत व श्रमात प्रचंड उर्जा निर्मिती करणारी अणुउर्जा हा उत्तम पर्याय आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था प्रगती पथावर जाणार आहे.*(संजय कुमार, 2194, 2007)*

ब) अणु कराराचा भारताच्या सुरक्षेवरील नकारात्मक परिणाम – पुढीलप्रमाणे (पाठक, 1343,2007)

1) आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अभ्यासकांच्या मते, अमेरिका अणु कराराच्या माध्यमातुन आपल्या राजनैतिक व सामरिक महत्वकांक्षांच्या पुर्ततेसाठी आशिया खंडातील शक्तीशाली भारताचा वापर करु इच्छित आहे.

2) 1974 मधील भारताच्या प्रथम अणु चाचणी नंतर अमेरिकेने भारतविरोधी भुमिका घेत, भारतावर विविध बंधने लादली होती. अशा प्रसंगी अमेरिका भारतासोबत अणु करार करुन खरोखरच भारताचे हित कितपत साधणार आहे का? हा मोठा प्रश्न आहे.

3) प्रस्तावित अणु करार हा सर हेन्री हाईड कायदयाला प्रमाणभुत मानुन केलेला आहे. त्या कायदयानुसार भविष्यात भारताने अण्विक परीक्षण केल्यास अमेरिका हा करार संपुष्टात आणु शकतो. परिणामी भारतीय अणुभट्टया इंधना अभावी बंद पडू शकतील.

4) या करारानुसार भारताने आपली अणुशक्ती केंद्रे आंतरराष्ट्रीय निरीक्षणासाठी खुली केल्यामुळे भारताची सुरक्षा धोक्यात येवू शकते.

5) या कराराच्या माध्यमातुन अमेरिका आशिया खंडातील चीन व जपानच्या वाढत्या सामर्थ्यांला भारताच्या माध्यमातुन शह देवू इच्छितो. त्याकरीता अमेरिका भारताचा वापर आपल्या कुटनैतिक डापेचांनुसार करेल.

6) या करारानंतर अमेरिका आंतरर्राष्ट्रीय सामरिक मुद्दांबाबत भारतावर दबाव टाकू शकतो.

7) अमेरिका भारताला देत असलेल्या अणु तंत्रज्ञानात युरेनियमचेच इंधन लागणार आहे. तर भारताकडे युरेनियमचा साठी अत्यल्प असल्याने भारताला उर्जा निर्मितीसाठी पुढी 40 वर्षांपर्यत अणु पुरवठादार गटाकडून युरेनियमची खरेदी करावी लागणार आहे, त्याचा विपरीत परीणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होईल.

8) भारताजवळ जगातील एकूण थोरियमच्या साठयांपैकी 65 टक्के साठा आहे. त्यापासुनही अणुउर्जा निर्मिती होवू षकते. त्यासाठीचे तंत्रज्ञान भारताजवळ नाही. परंतु अमेरिका थोरियम पासुन उर्जा निर्मिती तंत्रज्ञान पुरविण्याविशयी काहीही वक्तव्य करीत नाही.

9) या करारामुळे अमेरिकेतील इंधन पुरविणाऱ्या कंपन्यांना फक्त सहा वर्शात भारताकडून 20 अब्ज डॉलर्सचा फायदा होणार आहे. त्यामुळे अमेरिकेतील इंधन पुरवठादार कंपन्या व इंध्न बाजारातील मंदी नश्ट होवून त्यांनी उलाढाल वाढणार आहे.

10) अमेरिकेबरोबर प्रस्तावित करार केल्यामुळे भारतीय महत्वाकांक्षी "आंतरखंडीय क्षेपणास्त्र विकास योजनेला" पूर्ण विराम मिळेल. त्याचा भारताच्या राश्ट्रीय सुरक्षेवर विपरीत परीणाम होईल.

11) अमेरिकेने प्रस्तावित करारानुसार अणु इंधन पुरविणे मान्य केले असले तरी, काही काळानंतर इंधन पुरवठा

थांबवुन भारताची अडवणुक करु इच्छितो. प्रसंगी इंधन पुरवठयाच्या बदल्यात NPT व CTBT करारांवर स्वाक्षरी करण्याची अट ही लादू शकतो.

12) या करारामुळे भारताच्या भावी अंतराळ संशोधन आणि अण्विक कार्यक्रमाला खीळ बसू शकते. त्यामुळे भारताची प्रगती थांबून भारतीय अणु संशोधक व संरक्षण क्षेत्रावर त्याचा विपरीत प्रभाव पडेल. वगैरे विपरीत परिणाम भारताच्या सुरक्षेवर प्रस्ताविक करारामुळे घडून येतील.

सारांश – भारत अमेरिका अणु कराराकडे पाहतांना महत्वाची बाब लक्षात घ्यावी लागेल की, भारत हाजगातील असा पहिला देश ठरला आहे की ज्याने अण्वस्त्र प्रसार बंदी करार (NPT) व बहुव्याप्त चाचणी बंदी करार (CTBT) यावर सही केलेली नाही. तरी देखील जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिकेने भारताबरोबर अण्विक करार केलेला आहे. त्याचबरोबर अण्विक पुरवठादार राष्ट्रांनी सुध्दा त्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे आज फ्रान्स, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया हे अणु पुरवठादार गटातील राष्ट्रे भारतासोबत अणु करार करण्यास उत्सुक आहेत.(निकुंभ, 101,2010) यावरुन दक्षिण आशियातील भारताचे महत्वपुर्ण स्थान सिध्द होते.

प्रस्तावित अणु करारामुळे भारतीय अणुभट्टयांना अणु इंधनाचा पुरवठा सुरळीत होवून भारतातील वीज टंचाईची समस्या तसेच नागरी समस्या सोडविण्यास मदत होईल. आंतरराष्ट्रीय पटावर भारताला एकशक्तीशाली, लोकशाही प्रधान आणि अणुशक्ती संपन्न जबाबदार राष्ट्राचा दर्जाही प्राप्त होईल. त्याचबरोबर अमेरिकेने भारतासोबत अणु करार केल्यामुळे, दक्षिण आशियाई क्षेत्रात भारताच्या लष्करी व सामरिक सामर्थ्यात वाढ झालेली दिसून येते. एकंदरीत या अणु

करारामुळे भारत–अमेरिका यांच्या विकसित झालेल्या सामरिक संबंधांचा भारताच सुरक्षेवर साधक बाधक परीणाम झालेला दिसून येतो.

संदर्भग्रंथ सूची –

1) *Swhney Pravin, TheDefence make over 10 myths that shape India's Image. Sage Publication, New Delhi. 2002 P.410.*

2) *Sultan, Maria; Mian Behzad Adi, "The Henry J. Hyde Act and 123 Agreement: an Assessment" (PDF), South Asian Strategic Stability Institute, London, Sept.2008, (Retrieved Aug. 21, 2011)*

3) *K. K. Parnami, Indo-US Nuclear Deal, Rawat Publications. Jaipur, 2009.*

4) *Office of the Press Secretary (July,18.2005), "Joint Statement Between President George W. Bush and Prime Minister Manmohan Singh", W.W.W. dae.gov.in/ Press/sepplan.pdf.*

5) *Bhonsle Rahul, Ved Prakash & Gupta K. R. (Ed.), Indo-U.S. Civil Nuclear Deal, Atlantic Publisher and Distributors (P) Ltd. New Delhi, 2007. P. 85-86.*

6) *http://en.wikipedia.org/wiki/U.S.-India-Civil-Nuclear-Cooperation-Initiative.*

7) *http:WWW.Usembassy.gov.nucleardeal.*

8) *गजराज पद्मसिंह, भारत–अमेरिका संबंध .– 123 समझौता, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली. 2014*

9) *पाल विनोद कुमार, परमाणु सम्पन्न भारत, डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली. 2010.*

10) *चेंगप्पा राज, नये परमाणु युग का आगाज, इंडिया टुडे, 22 ऑक्टोबर 2008.*

11) *पाठक रामानुज, नाभिकीय समाझौता और भारत की स्वतंत्र विदेश नीती एवं सम्प्रभुता, प्रतियोगिता दर्पण, फरवरी 2007.*

12) *रितू सिंग, समझौते का यथार्थ, सिव्हिल सर्विस टाईम्स, जुलाई – 2005.*

13) नियाज अन्सारी, भारत अमेरिका समझौता, प्रतियोगिता दर्पण, फरवरी 2008.

14) *संजय कुमार, परमाणु समझौते की उपयोगिता, प्रतियोगिता दर्पण, जुलाई 2007.*

15) *निकुंभ जी. एच., पाकिस्तानच्या अणु धोरणाचा आणि सियाचीन संदर्भात भारताच्या सुरक्षेचा चिकित्सक अभ्यास, (अप्रकाशित शोध प्रबंध) उ.म.विद्यापीठ, जळगांव. 2010.*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार

प्रा.डॉ. कालिदास दिनकर फड
लोक प्रशासन विभाग राजीव गांधी महाविद्यालय,
करमाड, ता.जि. औरंगाबाद.

★★★

महात्मा जोतीराव फुले हे भारतीय समाज व शिक्षण क्रांतीचे जनक म्हणून संबोधले जातात. त्यांच्या शिक्षण विषयक विचारसरणीचा व कार्याचा प्रभाव भारतीय दलित, पीडित, शोषित, जनसामान्यांच्या जीवनावर व भारतीय समाजजीवनावर मोठया प्रमाणात पडलेला दिसुन येतो. त्यांचे जीवन व कार्य हे प्रस्थापित विरूध्द विस्थापीत, प्रतिष्ठित विरूध्द अप्रतिष्ठित, शोषक विरूध्द शोषित यांच्या न्याय हक्काच्या जपणुकीस्तव सामाजिक संघर्षाचे होते. कोणत्याही शासनसत्तेचा व पुरेशा प्रमाणातील आर्थिक पाठबळाचा आधार नसताना ते जे करू शकले त्याला भारतीय समाजक्रांतीच्या इतिहासात तोड नाही. त्यांचे हे सामाजिक ऋण सर्वमान्य आहे.

'विद्येविना मति गेली, मतिविना नीती गेली नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले वत्तविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले'हा जोतिबा फुले यांचा शिक्षणविशयक तात्विक विचार होता. विद्या नसली की मती कुंठित होते. नीतिमत्ता ढासळते, नीतिमत्तेच्या अभावाने समाजाची गती किंवा प्रगती यात अडथळे निर्माण होतात. संपत्ती मिळविण्याची साधने केंद्रीभूत होतात व सताजातील मागासवर्गीय बहुजन समाज आपले मनोधैर्य गमावून बसतो. समाजाच्या अधोगतीची ही तर्कनिष्ठ विचारसरणी हा जोतिबा फुले यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा गाभा होय.

जोतीबांचा हा उद्‌गार अलंकारिक भाषेत तर नाहीच किंवा तो निर्जीव सुभाषितासारखाही नाही अथवा जड व पांडित्यपूर्णतेचा दबाव निर्माण करणाराही नाही. तत्कालीन महाराष्ट्राची ही जशी सामाजिक चिकित्सा आहे, त्याचप्रमाणे शिक्षणाचे प्रयोजन सांगणारा हा एका समाजषिक्षकाचा सार्थ उद्‌गारही आहे. या उद्‌गारात मति, नीतीचा जसा विचार आहे. तसाच गति, वित्ताचाही विचार आहे. शिक्षणापासुन वंचित झालेला आणि म्हणूनच अज्ञान अंधःकारात पिचत पडलेला व त्याला प्रगतीच्या पाऊलवाटाही अद्याप दृष्टीस पडू दिल्या नाहीत अशा तळागाळाच्या माणसाबाबतची व्याख्या फारच बोलकी आहे. आपण जेव्हा शिक्षण ही समाजविकासाची अखंड प्रक्रिया आहे असे म्हणत असतो तेव्हा विव्दान लोकांना कोणता समाज अभिप्रेत आहे असा प्रश्न विचारण्याची आपल्यावर वेळ येते. म्हणूनच जोतीरावांचा वरील उद्‌गार शिक्षणाचा सामाजिक बांधिलकी व्यक्त करणाराही आहे. समाज–जीवनाच्या गरजा, आशाआकांक्षा व उद्दिष्टे यांच्याशी खऱ्या अर्थाने शिक्षणाचा जेव्हा अतूट संबंध तयार होते तेव्हाच शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे परिणामकारक हत्यार बनते. जोतीरावांचे शिक्षण विषयक कार्य, शिक्षणाबद्दलचे त्यांचे व तत्वज्ञान, त्यांनी व सावित्रीबाईंनी शिक्षणविषयक केलेले प्रयोग, इत्यादींचा विचार केला म्हणजे जोतिरावांनी समाजबदलासाठी शिक्षणाचे हत्यार कसे वापरले हे स्पष्ट होते.

कालपरत्वे बदलती शिक्षणपध्दती बदलत्या सामाजिक परिस्थिती बरोबर शिक्षण पध्दतीही बदलत असते. बदलणारी शिक्षणपध्दती समाजाच्या धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनावरही परिणाम करीत असते. अर्थात आजच्याप्रमाणे सार्वत्रिक शिक्षणाची संकल्पनाही प्राचीन कालखंडात नव्हती. त्या काळात शिक्षणापासूनच्या अपेक्षाही आजच्यापेक्षा वेगळ्याा होत्या. ही स्थिती फार दूरवरच्या प्राचीन काळातच होती असे नव्हे तर अगदी इंग्रजांचे राज्य या देशात स्थिर होईपर्यंत येथील शिक्षणपध्दती जुनाट स्वरूपाचीच राहिली. धर्मग्रंथ व इतर अभिजात वाङ्‌मयाचा अभ्यास हाच शिक्षणाचा हेतू होता अर्थात यासाठी संस्कृत, पाली, फारसी, अशा, ज्या ज्या भाशा धर्म व्यवहारासाठी वापरल्या जात होत्या त्याच भाषा शिक्षणाचे माध्यम बनत. दुसरे असे की, देशी भाशेचे लेखन, वाचन, हिशेब इ. सामान्य स्वरूपाचे शिक्षण दिले जाई. पहिल्या स्तरावरील शिक्षण समाजातील उच्चवर्णियांसाठी होते तर दुसऱ्या पातळीवर उच्च जातीबरोबर समाजातील मध्यम जातीतील काहीजणांना प्रवेश दिला जात असे.

शिक्षण ही एक शाक्ती आहे. मानव इतर सजीवापेक्षा वेगळा व वैशिष्ठ्यापूर्ण ठरला तो त्याच्या ज्ञानसाधनेमुळेच. शिक्षण हे समाज बदलण्याचे प्रभावी साधन आहे. बदलत्या समाजाबरोबर मानवी इतिहासात शिक्षणाचा मूळ झरा अधिक व्यापक बनला. त्याने अनेक देशात नवजीवनाची उभारणी केली. रूढी, परंपरा, दैववाद, गरिबी, यामध्ये खचून गेलेल्या कष्टकरी जनतेला स्वत्वाची जाणीव करून दिली.

बदलत्या समाजाबरोबर शिक्षणपध्दतीत, तिच्या आशयात बदत होत आले असले, ती अधिक व्यापक व विकसनशील होत आली असली तरी हे बदल सुखासुखी झाले नाहीत. धर्ममार्तंडांच्या, पुराणमतवाद्यांच्या, पुरोहितशाहीच्या हिताचे रक्षण करणारी समाजव्यवस्था व तिच्या अनुशंगाने शिक्षणव्यवस्था बदलत असताना या प्रस्थापित वर्गाने कडवा विरोध केला. या संघर्शातुनच जीवनाच्या सर्व क्षेत्रांत एका क्रांतीकारी पर्वाला आरंभ झाला. त्यातूनच अनेक क्रांत्यांनी व

क्रांतिकारकांनी जन्म घेतला. शिक्षण व शिक्षण पध्दतीत अधिक प्रगत स्वरूपाचा घडून येणारा बदल बहुजनांच्या हिताचा असतो. येथेही संघर्ष अटळ असतो. ते एक प्रकारचे क्रांतीकार्य असते. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात महात्मा जोतीराव फुल्यांनी अषीच शैक्षणिक क्रांतीची मशाल पेटविली.

शैक्षणिक कार्याची प्रेरणा व सुरूवात जोतिबा फुल्यांनी आपल्या शिक्षणकार्याची सुरवात इ.स. 1848 मध्ये शूद्रातिशूद्रांसाठी मुलींची पहिली शाळा पुणे शहरात स्थापन करून केली. हा काही योगायोग अथवा चमत्कार नव्हता. महात्मा फुल्यांच्या चिंतनशील मनाने शिक्षणप्रसाराच्या कार्याला आरंभ करताना तो कोठे करावा हे नेमके हेरले. ज्यांच्या जीवनात शेकडो वर्षात अज्ञानाचा प्रचंड पाशाणवत पहाड निर्माण झाला होता, तो दलित, बहुजन समाज व स्त्रिया हेच राष्ट्रपरिवर्तनाचे मुख्य संख्याबळ आहे याची अचूक जाणीव जोतीबांना झाली. म्हणून अज्ञाना विरूध्दचा पहिला सुरूंग त्यांनी या क्षेत्राच पेरला. या कामात त्यांना सुरवातीपासुन सदाशिवराव गोवंडे या मित्राचे सहकार्य लाभले.

जोतीबांच्या मनात जे शिक्षणविषयक विचार येत होते त्यांना निश्चित दिशा मिळाली ती मिस फॅरार यांच्या शाळा पाहून. जोतीबांनी त्यावेळी पुढील उद्‌गार काढले, ''माझ्या देश बांधवांपैकी महार, मांग, चांभार या कनिष्ठ जातीतील बंधू हे दुःख आणि अज्ञान यात साफ बुडालेले आहेत. त्यांची स्थिती सुधारण्यासाठी दयाळू देवाने मला प्रेरणा दिली. स्त्रियांच्या शाळेने माझ प्रथम लक्ष वेधले. पूर्ण विचारांनी माझे असे मत झाले की पुरूशांच्या शाळेपेक्षा स्त्रियांच्या शाळेची अधिक आवश्यकता आहे. स्त्रिया आपल्या मुलांना त्यांच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षात जे वळण लावतात त्यातच त्यांच्या शिक्षणाची बीजे असतात. अशा विचारात मी असताना अहमदनगर येथील अमेरिकन मिषनमधील मिस फॅरार या बाईंनी चालविलेल्या शाळा मी एका मित्रासमवेत पाहिल्या. ज्या पध्दतीने त्या मुलांना शिक्षण देण्यात येत होते ती पध्दत पाहून मी फार खूश झालो.

विविध शैक्षणिक उपक्रम – 3 जुलै 1851 रोजी बुधवार पेठ येथे तसेच सप्टेंबर 1851 व मार्च 1852 ला अनुक्रमे रास्तापेठ व वेताळपेठ या ठिकाणी नव्या शाळा सुरू केल्या. कामाचा व्याप व उत्साह वाढत होता तरीही अडचणी काही संपत नव्हत्या. जोतीबांच्या शाळेत मुले आणि मुली एकत्र शिक्षण घेतात याबद्दल नापसंती व्यक्त केली जात होती. प्रतिगाम्यांना कोणतेही निमित्त देण्याची जोतीरावांची तयारी नव्हती. त्यांनी 21 ऑगस्ट 1852 मध्ये मुला–मुलींची स्वतंत्र शाळांतून शिक्षणाची सोय केली. सावित्रीबाई मुलींच्या शाळेत तर जोतीबा दोन्हीही शााळांत शिकविण्याचे काम करीत. आता या कामात त्यांना काही ब्राम्हण शिक्षकांचेही सहकार्य मिळू लागले. जोतीबांच्या या शाळेत शिक्षण घेणारी सर्वच मुले–मुली गरीब घरातील होती. त्यांच्या घरात केवळ शिक्षणाची परंपराच नव्हती तर त्या घरांची ग्रंथ, वर्तमानपत्रे विकत घेण्याची कुवतही नव्हती. अशा सर्वांचा विकास घडवून आणावयाचा होता. हे काम पोटार्थी उद्योग करणाऱ्या शिक्षकांच्या हातून घडणे अवघड होते. जोतीबांना मात्र आपल्या विद्यार्थ्यांना ठराविक विषयांच्या शालेय शिक्षणाबरोबरच नव्या विचारांची ओळख व्हावी, आपल्या सभोवतालचे जग परिचयाचे व्हावे, आपला मागसपणा त्यांनी झटकून टाकावा यासाठी विविध विषयांचे ज्ञान देणाऱ्या ग्रंथांचे–वृत्तपत्रांचे वाचनालय आवश्यक वाटू लागले. त्यासाठी त्यांनी आपले तनमनधन वेचले आणि थोड्याच दिवसात गरजवंतांसाठी पहिली शाळा काढणाऱ्या ज्योतीबांनी त्या समाजातील मुला–मुलींसाठी पहिले वाचनालय काढले याची इतिहासाला नोंद घ्यावी लागली. आपल्या मुलांचा सर्वांगीण व्यक्तिविकास घडून आला पाहिजे यासाठी शक्य त्या उपक्रमांचा प्रारंभ आपल्या शिक्षण प्रयोगात त्यांनी केला.

स्त्री शिक्षणाचे आद्य प्रवर्तक – स्त्री शिक्षण म्हणजे कुटुंबाचे व पर्यायाने राष्ट्राचे शिक्षण होय. शिवरायाला घडविणारी जिजाबाई ज्या महाराष्ट्राचे पाहिली, त्या महाराष्ट्रात परंपरेच्या वरवंट्याखाली कित्येक स्त्रियांच्या आयुष्याचा चुराडाही झाला. केवळ ही अवस्था महाराष्ट्राचीच नव्हती तर आपल्या पुरातन संस्कृतीचे गोडवे गाणाऱ्या उभ्या भारतवर्षाची अशीच अवस्था होती. इंग्रजी शिक्षण म्हणजे वाघिणीचे दूध आहे असे शिक्षण घेणारा एक वर्ग जोतिबांच्या काळात महाराष्ट्रात उदयाला येऊ लागला होता. पुढे या वर्गातून महाराष्ट्राच्या व देशाच्या विविध क्षेत्रांत नावलैकिक संपादन करणारी अनेक मोठी माणसं झाली. परंतु या वर्गाने स्त्री–स्वातंत्र्याची खरी शक्ती ज्या शिक्षणात आहे अशा शिक्षणाचा जोतीबांसारखा ध्यास घेतला होता असे दिसून येत नाही. जोतीबांनी ज्या सामर्थ्याने आपल्या कार्यास सावित्रीबाईंना घडविले, उभे केले व आपली सुधारक पुढील काळात विधवाविवाह, बालविवाह, योग्य कि अयोग्य याची चर्चा करीत राहिले. या जाहीर वादविवादात स्त्रियांची व समाजसुधारणेची बाजू घेणारे प्रत्यक्ष कृतीच्या वेळी उणे पडले असेही दिसून येते. केवळ त्या काळातच अशा घटना घडत होत्या असे नव्हे तर परकियांची सत्ता संपली, स्वातंत्र्याच्या कालखंड सुरू झाला. वर्षामागून वर्षे उलटत आहेत, विज्ञानाचा प्रसार होतो आहे. तरी आज आपल्या देशात स्त्रियांच्या निरक्षरतेचे प्रमाण मोठे आहे. केवळ या एका गोष्टीचा विचार केला तरी किती प्रतिकूल परिस्थितीत मूलगामी शिक्षणकार्याला महाराष्ट्रात जोतीबा फुल्यांनी प्रारंभ केला हे दिसून येते.

शुद्रांसाठी शिक्षण – शुद्र हा आपल्या देशातील गुलामांचा एक मोठा वर्ग अशाच तऱ्हेने समाजव्यवस्था करण्यात आली होती. स्त्रियांप्रमाणे अस्पृष्यांना–शूद्रातिशूद्रांना कोणत्याही प्रकारच्या शिक्षणचा अधिकार नाही असा कायदा येथील धर्ममार्तंडांनी मोहरबंद केला होता. जोतीबांनी आईच्या अंतःकरणाने या मुलांकडे धाव घेतली. त्यांच्या शिक्षणासाठी, शक्य तेथे कपडे, राहण्या–जेवण्याची सोय, पाटी–पेन्सिलची तरतूद त्यांनी जीवापाड धडपड करून केली. अनेक अडचणींचे डोंगर पार करावे लागले तरी केवळ अक्षर ओळखी पुरतेच शिक्षण अस्पृश्यांना देण्यावर जोतीबांनी कधीच समाधान मानले

नाही. अन्यायाचा प्रतिकार करण्याचे व अस्मिता जागृत करण्याचे उद्दिष्ट त्यांनी आपल्या शिक्षण पध्दतीत स्वीकारले. पिढ्यान्पिढ्या आपल्याच बांधवांना पायदळी तुडविणारी उच्चवर्णीय मंडळी इंग्रजांच्या ताब्यातून देश स्वतंत्र केल्यानंतर येथील दलित समाजाला समानतेने वागवतील अशी स्थिती जोतीबांना दिसत नव्हती व ती पुढे कमीअधिक प्रमाणात वस्तुस्थितीही ठरली.

जोतीबांनी या तळाच्या समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण देताना, त्यांच्याच समाजातील निश्ठावान सहकाऱ्यांना आपल्याबरोबर सहभागी करून घेतले. 'गुलामगिरी', ब्राम्हणांचे कसब' यासारख्या आपल्या ग्रंथांतून त्यांनी अस्पृश्यांच्या अज्ञानाला येथील प्रस्थापित वर्ग कसा जबाबदार आहे, हे स्पष्ट केले. आपल्या दैनंदिन जीवनात अस्पृश्यांच्या हक्कांसाठी ते नेहमी लढत राहणारे समाजशिक्षक होते. त्यांनी अस्पृश्यांच्या उध्दारकर्त्याची भूमिका घेतली नाही. तर एका क्रांतिकारकाच्या जिद्दीने त्यांना उठविण्याची, पेटविण्याची व माणूसकी जागविण्याची त्यांची धडपड होती. म्हणूनच अस्पृश्यांच्या शिक्षणाचा इतिहास महात्मा फुल्यांच्या

प्रयत्नांपासून सुरु होतो, हे कोणालाही नाकारता येणार नाही.**सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची मागणी** आजही आपल्या

स्वतंत्र भारताच्या शिक्षणमंदिरात वय 6 ते 14 या वयोगटातील मुलांना सक्तीने प्राथमिक शिक्षण कायद्यानुसार बंधनकारक करूनही लक्षावधी मुलांना दाखल होता येत नाही. आपणच केलेला आपला हा कायदा आपणच मोडतो. शिक्षण घेण्याचे वय असलेली लक्षावधी लहान मुले कायद्याने बंधन घालूनही बालकामगारांचे अत्यंत कष्टप्रद जीवन आपल्या देशात जगत आहेत. जोतीबांच्या काळात तर प्राथमिक शिक्षणाची सरकारकडून होत असलेली आबाळ, हितसंबंधी लोकांनी शिक्षणाबद्दल पसरविलेला गैरसमज, जातिभेदांनी नाकारलेली संधी, गरीब आईवडिलांचे अज्ञान, शेतकऱ्यांची डबघाईला आलेली आर्थिक स्थिती, यासारख्या गोष्टी आपल्या शिक्षणप्रसारात कशा आडव्या येतात याची पुरेपूर जाणीव जोतीबांना झालेली होती. जोतीबांनी तर कष्टकऱ्यांच्या प्रचंड मोठ्या मानवी समूहाला शिक्षणाची गरज आहे व त्यासाठी आपण शक्य ते सर्व प्रयत्न केले पाहिजेत, असा ध्यास घेतला होता. म्हणूनच सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सरकारने कायदेशीररीत्या स्वीकारली पाहिजे, अशी मागणी करणारा पहिला शिक्षणप्रेमी म्हणून जोतीबांचा उल्लेख करावा लागेल.

जोतिबा म्हणतात शेतकऱ्यांच्या मुलास अन्नवस्त्र, पुस्तके वगैरे पुरवून त्यांच्या मुलाकरिता बोर्डिंग शाळा तयार कराव्यात व त्या शाळांमध्ये त्या मुलांपैकी शाळागुरू तयार केल्यानंतर फक्त त्यांच्या शाळांत शूद्र शेतकऱ्यांनी आपली मुले अमुक वर्षाचे वयाची होईपावेतो अभ्यास करण्याकरिता पाठवावीत, असा कायदा करावा'' जोतीबांनी मुलांच्या शिक्षणाची वयोमर्यादा एके ठिकाणी 12 ते 14 वर्षांची असावी, त्याचप्रमाणे इंग्रजी आणि मराठी या भाषा बऱ्याच मुसलमान मुलांना अवगत नाहीत, त्यामुळे ही मुले शाळेपासून दूर राहतात याचाही विचार करावा असे मत व्यक्त केले आहे.

सक्तीच्या शिक्षणाचे तर्कनिष्ठतेवर आधारित तत्वज्ञान जोतिबा आपल्या विशिष्ठ शैलितून स्पष्ठपणे व्यक्त करतात. सक्तीच्या शिक्षणाबाबत सरकारने काय करावे याबाबत ते म्हणतात, '' सरकारी सत्यपालाकडून त्या सर्व लोकांस (शेतकरी–कामकरी यांना) असा बोध करावा की तुम्ही आपली मुले तर शाळेत पाठविली नाहीत तर ती आळसामुळे उनाड होतील आणि आपली पोटे जाळण्याकरिता ती चोऱ्या करू लागतील, त्यामुळे त्यास सक्तमजुरीची षिक्षा देऊन पायात बेड्या घालून त्यांच्या संरक्षणासाठी सरकार खबरदारी ठेवावी लागेल. तशीच तुमची मुले आळसामुळे निसंग, बंडखोर होऊन प्रांतातील गावे लुटताना तेथील काही घरे जाळून लोकांची खूनखराबी करतील. त्यांच्या चीजवस्तूसह द्रव्याची नुकसानी करून त्यांच्या बायकापोरास तळतळावयास लावतील आणि तेथील एकंदर सर्व व्यापारधंद्यांची अव्यवस्था जर करतील तर सरकारात त्यातील कित्येक बंडखोरास तोफेच्या तोंडी देतील. त्या सर्वाप्रित्यर्थ सरकारास जेव्हा पोलीस ठेवण्याचा प्रसंग येईल, तेव्हा त्या सर्व खर्चाचा बोजा तुम्हा सर्व शेतकऱ्यांसह कारागिरास सोसावा लागेल.

अविद्येचे अनर्थ किती होऊ शकतात व सर्वांना विद्या देण्याचा सरकारने विचार केला नाही, तर समाजस्वास्थ्य कसे बिघडते, पोलिसयंत्रणेवर कसा ताण येतो, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीमुळे सरकारला कसा खर्च करावा लागतो व हा सर्व पैसा जनतेकडूनच कर रूपाने सरकार कसा वसूल करते याचे अतिशय वस्तुनिष्ठ चित्रण जोतिबांनी केले आहे. म्हणून सर्वांना सक्तीचे शिक्षण देण्याची आवश्यकता जोतिबा प्रतिपादन करतात.

शिक्षण म्हणजे केवळ बुध्दिविकास नव्हे तर सर्वांगिण विकास केवळ बुध्दिविकास म्हणजे संपूर्ण विकास नव्हे हे लोकांच्या गळी उतरवण्याची जोतीबांना आवश्यकता वाटली. म्हणून त्यांनी – शूद्र मुलीमुलां शाळेत घालावे । सुशील करावे सर्व कामी ।' अशी शिकवण दिली. त्यांच्या शिक्षणविषयक प्रतिपादनात त्यांनी सत्यनिष्ठा, शीलसंवर्धन, नीतिमत्ता, सौजन्य प्रगतिपर विचार व व्यवहारज्ञान इ. गोष्टींवर खास भर दिला आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या शिक्षणामधून प्रगतिवर विचारांचे बाळकडू मिळाले पाहिजे, त्याच्या मनावर नैतिकतेचे संस्कार झाले पाहिजेत, अशा प्रकारची शिक्षणपध्दती त्यांना अपेक्षित होती. जोतिबा हे मानवतावादाचे उपासक होते. त्यांच्या शिक्षणविशयक दृष्टीकोणही त्यांच्या जीवननिष्ठेशी सुसंगत असा होता.

शिक्षणतज्ञ महात्मा फुले मूल्यांकन – भारतीय सामाजिक क्रांतीचे अग्रदूत महात्मा फुले यांच्या सामाजिक क्रांतीच्या तत्वज्ञानाचे प्रत्यक्ष रूप त्यांचे शिक्षणविशयक तत्वज्ञान व शिक्षणप्रसाराचे कार्य हेच होते. आधी शिक्षणाव्दारे जागृती म्हणजे पायाभरणी व नंतर या भरभक्कम पायावर आधारित सामाजिक सुधारणेची इमारत असे जोतिबांच्या कार्याचे स्वरूप होते. शिक्षण हे सामाजिक मूल्यपरिवर्तनाचे साधन म्हणूनच त्यांनी मानले होते. तत्कालीन शिक्षणाचा मूलगामी व सर्वांगीण

विचार जोतिबा फुलेंइतका स्पष्ट व प्रखर ध्येयनिष्ठ पध्दतीने कोणालाच मांडता आला नाही.

जोतीबा फुले यांचे शैक्षणिक तत्वाज्ञान म्हणजे अध्यात्मवाद, कार्यावाद व वास्तववाद यांचा सुरेख त्रिवेणी संगम होय. त्यांच्या अध्यात्मवादात 'एकेश्वरवाद' हा प्रधान आहे. सामाजिक ऐक्याच्या दृष्टीने त्यांना एक ईश्वर मानणे अधिक योग्य वाटतो. पूजाअर्चेचे स्तोम, देवदेवतांच्या नावाने पुरोहितशाही व्दारे होणारी पिळवणूक या विरोधातच त्यांनी आपले तत्वज्ञान उभे केले. अध्यात्म वादातील उच्च जीवनमूल्यांचे व नैतिक मूल्यांचे अधिष्ठान त्यांनी शिक्षणात संक्रमित केले. चातुर्वर्ण्यावर आधारित परंपरागत समाजरचनेत परिवर्तनशीलता आणण्याची जबाबदारी शिक्षणाचीच आहे हा त्यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन होता. स्वामी विवेकानंद यांना अभिप्रेत असलेला विश्वधर्म, मानवताधर्म व सर्वधर्मसमभाव जोतिबा फुले यांनाही शिक्षणात माणुसकी निर्माण करण्याच्या दृष्टीने आवश्यक वाटत होता.

जोतिबांच्या त्रेसष्ट वर्षाच्या आयुष्यात त्यांचे शिक्षणविषयक विचार त्यांच्या वागण्यातून, बोलण्यातून, व्याख्यानातून, लिखाणातून व्यक्त झालेले आहेत. त्यांचा वास्तवाद हा निसर्गाशी जवळीक साधणारा वास्तववाद नसून बावनकशी सामाजिक वास्तववाद social realism आहे. समाजातील उपेक्षित दलित पीडित व शोषित सर्वसामान्य जनतेचे शोषण जोपर्यंत शिक्षणातून थांबत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने वास्तवाद प्रस्थापित होऊ शकत नाही असा त्यांचा सार्थ दृष्टीकोण होता. शिक्षणातील झिरपण्याच्या सिध्दान्त हे शिक्षणातील वास्तव नसून शिक्षणाचे सार्वत्रिकरण हे त्यातील वास्तव होय. शिक्षणातील त्यांना गवसलेले वास्तव जनसामन्यांना समाजवून देताना त्यांनी ब्राम्हण या जातीतील विशिष्ट प्रवृत्तीला जसे धारेवर धरले होते असे इंग्रज शासनावरही भीडमुर्वत न ठेवता टीका केली होती. हे सर्व त्यांनी भारतीय नवसमाजाच्या निर्मितीच्या दृष्टीने विचारात घेतले होते व त्यात सर्वस्पर्शित्व ओतले होते म्हणून ते एक श्रेष्ठ भारतीय शिक्षणतज्ञ ठरतात.

संदर्भ

1. *नरके हरि (संपा), आम्ही पाहिलेले फुल, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, 1993*
2. *नरके हरि (संपा), महात्मा फुले साहित्य आणि विचार, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाषन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, 1993*
3. *देसाई वसंत, महात्मा ज्योतिराव फुले, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 1969*
4. *कीर धनंजय, महात्मा ज्योतिराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1973*
5. *देशमुख मा.म., महात्मा फुले यांचे समाज प्रबोधन, शिवभारती प्रकाशन, नागपूर, 1997*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

भारतीय लोकशाही पुढील आव्हाने

प्रा. प्रविन अजबराव उपरे
सहा. प्रा. राज्यशास्त्र विभाग
कर्मवीर महाविद्यालय मुल, जि. चंद्रपूर

★★★

सारांश :– आज जगात सर्वात लोकप्रीय शासन प्रकार म्हणून लोकशाही शासनपद्धतीकडे पाहिले जाते. त्यातच भारतीय घटनाकारांनी लोकशाही हा शासन व्यवस्थेचा एक प्रकार म्हणुन विचार न करता एक जिवन प्रणाली म्हणून लोकशाहीला अग्रक्रम दिले होते. या अनुशंगानेच भारतातील लोकशाही राज्यव्यवस्था टिकुन राहावी व तीला अधिक बळकटी प्राप्त होऊन सक्षम होण्याच्या हेतुने भारतीय घटनेत लोकशाहीच्या आधारभूत सरचंनाही निर्माण केल्या गेल्या. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या काळात इथल्या लोकशाहीला वेळोवेळी वेगवेगळया संकटांना सामोरे जावे लागले आहे. या संकटाचा सामना करतांना भारतीय जनता किंवा देशातील अन्य कोणत्याही घटकांच्या लोकशाही राजकीय व्यवस्थेवरील विश्वासाला आजवर तडा गेला नाही. हे खरे असे असले तरी प्रादेशीकतावाद, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, धर्म व जातीचे प्राबल्य, भ्रष्टाचार, व दहशतवाद अशा अनेक प्रश्नांनी भारतीय लोकशाहीच्या यशस्वी वाटचालीत आव्हानांची निर्मिती केली आहे. त्यामुळे या आव्हानांना सामोरे जातांना दिर्घकालीन उपाय योजना करूनच लोकशाहीच्या यशस्वीतेची वाटचाल सुकर करता येईल.

बिजशब्द :– लोकशाही, सामाजीक बांधीलकी, संविधान, संसदिय शासन पद्धती, केंद्रीकरण, प्रादेशीकतावाद, नैतीकता, असमानता, भ्रष्टाचार, दहशतवाद, प्रजासत्ताक.

प्रस्तावना :– जगात सर्वात लोकप्रीय शासनाचा प्रकार म्हणून लोकशाही शासन प्रकाराकडे पाहिले जाते. काही राजकीय विचारवंतानी तर लोकशाही ही केवळ राज्यकारभार चालविण्यापूरती मर्यादीत नाही तर त्यांनी लोक त्यांनी लोकशाहीला जीवन पध्दती म्हणुन संबोधले आहे. न्याय स्वातंत्र्य, समता, व बंधुता ही लोकशाही जीवनपध्दतीची आधारभूत तत्वे मानली जातात. लोकशाही जीवनपध्दतीत प्रत्येक व्यक्तीला तीच्या स्वतःच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास घडवुन आणण्याची संधी मिळवून देण्याची हमी असते. अर्थातच या जीवनपध्द मानले जातात प्रत्येकाला स्वतःसाठी सुखाची धडपड करतांना इतर कोणत्याही व्यक्तीला साधन बनवीता येत नाही असा लोकशाही जीवन पध्दतीचा सर्वसाधाणतः गृहीत धरला जातो. त्यामुळेच लोकशाही हा प्रकार केवळ राजकीय क्षेत्रापुरताच मर्यादीत राहत नाही तर सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीक इ. अशा सर्व क्षेत्रात लोकशाहीला स्थान प्राप्त झाले आहे.

संशोधन पद्धती :– प्रस्तूत शोध निबंधामध्ये वर्णनात्मक, विष्लेशणात्मक व ऐतिहासिक पद्धतीचा अवंलब करण्यात आलेला आहे.

भारतीय घटनाकांराचाही लोकशाही शासनपध्दतीवर पुर्ण विष्वास होता. तरी मात्र त्यांनी शासनव्यवस्थेचा एक प्रकार म्हणून लोकशाहीचा विचार केला नाही तर समाजाच्या निरनिराळया घटकामध्ये सहिष्णूवृत्ती निर्माण होण्यास चालणा देणारी, परस्पराविषयी विश्वास निर्माण करणारी, गरीब – श्रीमंत, सबल – दुर्बल अशा समाज घटकांच्या परस्पर सहकार्याने व सांमजस्याने विकास घडवून आणण्यास साहयभूत ठरणारी, प्रत्येकाला आर्थिक व सामाजिक दृष्टिने विकासाच्या समान संधी मिळवून व त्यातून सुरळीत व निश्चित पध्दतीने जीवन जगण्याची हमी देणारी एक आदर्श व्यवस्था व एक जीवन प्रणाली म्हणून लोकशाहीकडे पाहीले होते. त्यामुळे घटनाकारांनी लोकशाहीच्या सिध्दांत व मुल्यावर विश्वास ठेवूनच त्यांनी या शासन पध्दतीचा भारताच्या उज्वल भवितव्यासाठी स्वीकार केला.

भारतीय लोकशाही :– स्वातंत्र्य आंदोलनातील चळवळ व त्या चळवळीतील सर्वच सक्रिय नेते व कार्यकर्त्यांनी आपली सामाजिक बांधीलकी स्पष्ट केली होती. भारतीय घटना समितीतील सदस्यांना सुध्दा स्वातंत्र्य चळवळीची पार्श्वभूमी लाभल्या कारणात्सव त्यांचीही भूमिका काही वेगळया स्वरूपाची नव्हती. त्यामुळे त्या सर्वांनी लोकशाही शासनव्यवस्थेला मान्यता दिली होती. व्यक्तीचे स्वातंत्र्य व मूलभूत हक्काचे संरक्षण करावयाचे असेल तर लोकशाही ही व्यवस्थेला पर्याय नाही अशी ठाम भूमिका यावेळी त्यांनी घेतली. अर्थातच देशातील सामान्य जनतेला त्याची प्रतिष्ठा जोपासतांनाच उचीत न्याय मिळवून देण्याचे कार्य हे लोकशाही व्यवस्थेत चांगल्याप्रकारे करतांनाच समाजातील तळागाळातील लोकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणन्याच्या उदात्त हेतुनेच आपल्या घटनाकारांनी लोकशाही पर्यायाची निवड केली.

भारतीय राज्यघटनेच्या उद्देश पत्रीकेमध्ये स्पष्ट करण्यात आलेली उद्दीष्टे केवळ लोकशाहीच्याच मार्गाने साध्य करता येईल या विश्वासानेही घटनाकारांनी लोकशाहीला महत्त्व दिलेले आहे. त्याच बरोबर देशात स्थिर शासन निर्माण करण्यासाठी व जनतेद्वारा निवडुन दिलेले प्रतिनिधी हे बेजबाबदारी पध्दतीने वागणार नाही म्हणून केंद्र व घटकराज्य अषा दोन्ही स्तरावर संसदीय शासन पध्दतीचा भारतीय संविधानाने अंगीकार केला. संसदीय शासन पध्दतीमध्ये कायद्याची अमंलबजावणी करणारे कार्यकारी मंडळ हे जनतेने प्रत्यक्ष निवडुन दिलेल्या प्रतिनिधिच्या सभागृहास म्हणजे कायदेमंडळाला उत्तरदायी आणि अंतिमरीत्या जनतेस जबाबदार असते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शासनस्तरावरून देशातील अनेक ज्वलंत प्रश्नाबरोबरच देशातील गरीबी दुर करणे, अस्पृश्यता नष्ट करणे, यासारखे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील अनेक प्रश्न सोडविण्यास प्राथमिकता देणे गरजेचे होते. हे प्रश्न सोडविण्याकरीता कार्यकारी मंडळ व कायदेमंडळाने परस्पर सलोख्याने व सहकार्याने काम करण्याची निकड ही वर्तमान काळाची आवश्यकता होती. स्थिर

शासनाद्वारे नवजात लोकशाही राष्ट्र टिकविण्याकरिताच देशात संसदीय शासन पध्दतीच्या अनोख्या अशा प्रयोगाला सुरूवात झाली. भारतीय संसदेने संमत केलेले कायदे घटनाविरोधी म्हणजेच घटनेतील तरतूदीचा भंग करणारे असल्यास अवैध ठरविण्याचा अधिकार देशातील सर्वोच्च न्यायालयास आहे. यातूनच स्थिर लोकशाही ही अधिक बळकट करण्याचा प्रयत्न हा या संसदीय शासन पध्दतीच्या होण्यात मदत झाली आहे. संसदीय शासनपध्दती बरोबरच भारतातील लोकशाही राज्यव्यवस्था टिकुन राहावी व तीला अधिक बळकटी प्राप्त होऊन सक्षम होण्याच्या हेतूने भारतीय घटनेत लोकशाहीच्या आधारभूत संरचनाही निर्माण केल्या गेल्या. यात देशातील निवडणूका हया मुक्त वातावरणात व निःपक्षपाती होण्याकरीता घटनेत संवैधानिक तरतूदी करून स्वतंत्र निवडणूक आयोग निर्माण केला. लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून मानल्या गेलेल्या वृत्तपत्रे व प्रसार माध्यमे यांनी आपली कार्य निर्भयपणे करण्यासाठी स्वतंत्र संवैधानिक तरतूदी करण्यात आल्या. त्याचप्रकारे केंद्र राज्य संबध, नागरीकांचे मूलभूत अधिकार, राज्यनितीची मार्गदर्शक तत्वे इ. विशयकही तरतूदी करण्यात आल्या. देषाला लोकषाहीच्या दिर्घकालीन पंरपरा नसल्यामूळे या सर्व गोष्टी संविधानात सविस्तर नमूद करणे घटना समितीला गरजेचे वाटले. अशा प्रकारे लोकशाही व्यवस्थेच्या आधारभुत रचना निर्माण करणाऱ्या संविधानिक तरतूदीमूळे भारतातील लोकशाही राज्यव्यवस्था टिकून राहण्यास मदत झाली आहे. भारतीय संविधानाद्वारे इथल्या लोकशाहीला अधिक सक्षम, बळकट करण्यासाठी संविधानिक तरतूदिच्या माध्यमातून व्यवस्था करतांनाच 73 व्या व 74 व्या घटना दुरूस्तीद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थाना मिळालेला घटनात्मक दर्जा हे लोकशाहीच्या रक्षणासाठी उचलण्यात आलेले महत्त्वपूर्ण पाऊल म्हणता येईल. अत्याधीक सत्तेच्या केंद्रीकरणामुळे राज्यकर्त्यांच्या अंगी हूकूमषाही प्रवष्त्ती एकवटत असते. ते लोकशाहीच्या दृष्टिने धोक्याची घंटा असते. व त्यातूनच एकाधीकारशाहीकडे वळण्याचा धोका संभवतो. त्यामुळे लोकशाही सूध्दा धोक्यात येण्याची भीती असते. त्यातुनच लोकशाहीच्या सुरक्षिततेसाठी राज्यकर्त्यावर काही प्रमाणात बंधने म्हणून ज्या मार्गाचा अवलंब केला जातो त्यात प्रभावी मार्ग म्हणजे सत्तेचे विकेंद्रीकरण होय. स्थानिक स्वराज्य संस्थांना मर्यादीत प्रमाणात का असेना मात्र अधिकार देऊन सत्तेचे विकेंद्रीकरण घडवुन आणणे म्हणजेच लोकशाही विकेंद्रीकरण होय. या विकेंद्रीकरणामुळे एकप्रकारे भारतीय लोकशाही व्यवस्थेच्या रक्षणासाठी आवश्यक असलेली अनुकुल परिस्थिती तयार होण्यास मदत झाली आहे. लोकशाही हा एक शासनाचा प्रकार म्हणून भारतीय लोकशाहीचा विचार केला तर भारतात या शासन प्रणालीचा अंमल झाल्यापासुन तर आजच्या स्थितीलाही ती स्थिरावल्याचे दिसते. आज देशाला स्वातंत्र्य मिळुन 73 वर्षापेक्षा अधिकचा व संविधान अंमलात आल्यापासून 71 वर्षाचा कालावधी लोटला आहे. देशाचा प्रंचड आकार, विशाल जनसमूदाय व देशातील एकूण परिस्थितीचा आढावा घेतला तर असे निदर्शनास येते की, एवढया वर्षात भारतीय प्रजासत्ताकांची वाटचाल एका ठराविक व योग्य दिशेनेच चालू आहे. या कालावधीतही भारतीय प्रजासत्ताकाला अनेक कसोटीच्या क्षणाचा अनुभव घ्यावा लागलेला आहे. मात्र भारतीय मतदार, राजकीय संस्था, राजकीय पक्ष व राजकीय नेतृत्व या सर्वांनिच या कसोटीवर खरे उतरत वेळोवेळी आपली क्षमता सिध्द करून भारतीय लोकशाहीला अधिक मजबुती प्रदान करण्याचे कार्य केले आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या काळातही भारतीय लोकशाहीला इथल्या वेळोवेळी व वेगवेगळया संकटाला सामोरे जावे लागले आहे. मात्र या संकटाला धैर्याने समोर जाऊन व त्या संकटांचा यशस्वी सामना करून भारतीय लोकशाहीने आपल्या बळकटीचे, सक्षमतेचे व पर्यायाने सामर्थ्याचे दर्शन घडवून एका परिपक्व लोकशाहीचे दर्शन जगाला घडवून दिलेले आहे. यात चीन व पाकीस्तान या दोन देशाबरोबर झालेली युध्दे असोत वा देशातंर्गत लादण्यात आलेली आणीबाणी असो मात्र या दोन्ही संकटात भारतीय लोकशाहीला कोणत्याही प्रकारचा धक्का लागला नाही. इ. स. 1962 च्या चीनी आक्रमनाच्या वेळी तर आपल्या प्रजासत्ताकाची एक प्रकारे कसोटीच लागली होती. इ. स. 1975 ते 1977 या काळातील आणीबाणीने राजकीय सत्ता आपल्या हाती एकवटण्याचा प्रयत्नच झालेला होता. त्यामुळे नागरीकांचे लोकशाही हक्क सुध्दा धोक्यात आले होते. मात्र 1977 मध्ये झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रीक निवडणुकीमध्ये एकहाती सत्ता एकवटणाऱ्या व लोकशाही धोक्यात आणण्याऱ्या कॉग्रेस पक्षाला इथल्या जनतेने मतदानाद्वारे पायउतार होण्यास भाग पाडले

भारतीय लोकशाहीपूढील आवाहने :– या प्रकारे देशातील वेगवेगळया घटना प्रंसगामुळे भारतीय लोकशाहीला अनेक संकटाला तोंड द्यावे लागले आहे तरी भारतीय जनता किंवा देशातील अण्य कोणत्याही घटकाच्या लोकशाही राजकीय व्यवस्थेवरील लोकशाहीपूढे विविध प्रकारची आवाहने उभी टाकली आहेत त्याचा विमर्श पुढीलप्रमाणे घेण्यात आलेला आहे.

राजकारणाचे गुन्हेगारीकरण :– नियमित व ठरावीक कालावधीमध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूका हे लोकशाहीचे एक महत्वाचे वैशीष्टये मानले जाते. शांततामय मार्गाने सत्तांतर घडवुन आणण्याचे मार्ग असे लोकशाहीतील मुक्त व निर्भय वातावरणात पार पडणाऱ्या निवडणुकांचे वर्णन केले जाते. मात्र भारतात अलिकडच्या काळात निवडणुका हया अती खर्चीक होऊन यात काळया पैशाचे प्रश्न वाढत आहे. निवडणूक जिंकण्या करिता पक्षामध्ये व उमेदवारामध्ये स्पर्धा निर्माण होऊन सत्तेचे राजकारण खेळणारे नेते विरोधकाला संपविण्यासाठी भाडोत्री गुंडाना हाताशी धरतात. अशातच निवडणुकीच्या काळात मतदारांना धाक दाखविणे, उमेदवार पळविणे. कोंडुन ठेवणे, मतदान केंद्रे बळकाविणे, मतपेटया पळविणे यासारख्या गैरप्रकाराचा अवंलब होत असल्यामूळे राजकारणात गुन्हेगारीचे प्रमाण वाढुन ते लोकशाहीला आवाहन ठरत आहे.

प्रादेशीकतावाद :– राज्यघटना निर्मितीची प्रकीया सुरू झाल्यापासून भाषेच्या आधारावर इथल्या घटक राज्याची निर्मिती झाल्यानंतर सुध्दा प्रादेशीकतेचा प्रश्न अजुनही सुटलेला नाही. देशातील विविध घटक राज्यांना व त्यातील भागांना स्वतःचे वेगळेपण हवे असतांनाच सामाजिक, सांस्कृतीक वेगळेपणाची जगाला ओळख करून देण्याच्या चळवळी

सुरु आहेत. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा विविध आधारावर काही राज्यांना आपल्यावर अन्याय होत आहे. या भावनेतून स्वतंत्र सार्वभौम राज्याची मागणी पूढे येत आहे. प्रादेशीक पक्षातील प्रांताभीमान तसेच धर्मातील प्रखरता अशा अनेक कारंणामुळे राज्यातून फुटून निघण्याची भाषा वापरली जाते. वांषिक अस्मिता, विकासाचा प्रादेशीक असमतोल, अन्य प्रांतीयाना विरोध करणारी भूमिपुत्रवादाची भाशा यातून प्रादेशिकतावादाचा उदय झाला असून या प्रादेशिकतावादाने लोकशाहीसमोर अनेक प्रश्न निर्माण केली आहेत.

राजकारणातील धर्म व जातीचे प्रस्थ :– देशात विविध जाती, धर्म, संस्कृती, भाषा इ. बाबतीत असलेल्या विविधतेचा विचार करून या घटकाला अखंडता निर्माण करण्यासाठी व भारतीय समाजात एकात्मता वाढीसाठी धर्मनिरपेक्षता तत्वाचा स्वीकार करण्यात आला तर अस्पृश्यता निर्मुलनाकरिता अस्पृश्यता पालनावर कायद्याने बंदी घालण्यात आली आहे. असे असतांनाही अनेक राजकीय पक्ष व संघटना या विविधतेचा संधी म्हणून वापर करून स्वतःचे मतलबी राजकारण करतात. सत्ताप्राप्तीचा एक भाग समजुन ते धार्मिक व जातीय शक्तींना खतपाणी घालून मानवी जीवनाशी क्रुर खेळ करीत आहेत. वास्तविक पाहता एकजीन्सी व एकात्म समाजावर लोकशाहीचे भवीतव्य अवंलबून असते. मात्र दुदैवाने भारतीय समाजात हेतूपुरस्सर जातीय व धार्मीक फुटीरता निर्माण करण्याचा प्रयत्न शासकीय मंडळी किंवा स्वतःला समाजसुधारक म्हनणाऱ्याकडुन होतांना दिसतो. यामूळे अल्पसंख्याक वर्गातील लोकांच्या मनात असुरक्षीततेची भावना निर्माण होऊन लोकषाही व्यवस्थेवर आघात होत असतो.

राजकारणातील नैतीकतेचा ऱ्हास :– म. गांधी यांनी साध्याप्रमाणे साधनांच्या पवित्र्यावरही जोर देत राजकारणातील नैतीक अधिष्टापनांचे महत्त्व प्रतिपादन केले होते. मात्र सध्याच्या राजकारणात सत्ता प्राप्तीसमोर नैतीक अधिष्ठानाला गौण स्थान प्राप्त झालेले दिसते. प्रामाणीकपणा, त्याग, वैचारिक निष्ठा, सामाजिक बांधीलकी, शुध्द चारित्र्य इ. महत्त्वपुर्ण बांबीना राजकारणात जागा उरलेली नाही. जनतेचे प्रश्न सोडविण्यात येत असलेल्या प्रातीनिधीक सभागुहाचे पावित्र्य राखणाऱ्या ऐवजी सभागुहात गोंधळ घालणाऱ्या उमेदवारालाच राजकीय पक्ष अधीक प्राधान्य देतात. सदस्यांचे बेषिस्त वर्तन ही एक प्रकारे लोकशाहीला लागलेली कीड आहे.

स्त्री – पुरूष असमानता :– भारतीय समाजातील पुरूषी वर्चस्वाच्या मानसिकतेमुळे सुरूवाती पासुनच स्त्रीयांना नेहमीच प्रत्येक क्षेत्रात दुय्यम स्थान देण्यात आले आहे. ही पुरूषी मानसीकता आधुनिक युगातही पुर्णपणे संपलेली दिसत नाही. भारतीय घटनेने सामाजिक, आर्थिक, राजकीय इ. क्षेत्रामध्ये दर्जा आणि संधीच्या दृष्टिने स्त्री – पुरूश यांच्यात समानता प्रस्थापित करून धर्म, वंश, जात, भाषा, संस्कृती इ. च्या आधारावर भेदभाव करण्यास कायद्याने बंदी घातलेली आहे. त्यातच शासनानेही महिला सबली करणावर विशेष भर दिलेला आहे. मात्र असे असतांनाही अनेक क्षेत्रात स्त्रीयांच्या हक्कांना डावलेले जाऊन त्यांच्या संधीला नाकारले जाते. त्यामुळे लोकशाहीच्या दृष्टिने समाजाचा निम्मा हिस्सा असलेल्या स्त्री घटकावर अण्याय होत असतो. याचा परिणाम हा न्याय स्वातंत्र्य समता या तत्वावर उभी असलेली लोकशाही व्यवस्थेला तडा जात असतांना दिसते.

भ्रष्टाचार व दहशतवाद :– देशातील राजकारणी व नोकरशाही यांच्यातील अभद्र यूती हे देषातील भ्रष्टाचाराचे मुख्य उगमस्थान आहे. एकीकडे सत्ताप्राप्तीसाठी निवडणुकीत अमाप पैसा खर्च करायचा व दूसरीकडे निवडुन आल्यावर तो विविध मार्गानी वसूल करायचा ही बाब आता नवीन राहीलेली नाही. मात्र याचा परिणाम हा सरसकट तळागाळातील लोकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रमावर होऊन सामान्य मानसाला विकासापासून वंचीत ठेवण्यावर होत असतो. त्यातच मुठभर दहशतवादी हे मताचा राजकारण करणाऱ्याच्या पाठीब्यांवर देशात घातपातीत हिसंक कारवाया करून अराजकतेचे वातावरण निर्माण करीत असतात. या कार्यामूळेच देशाची अंतर्गत सुरक्षा धोक्यात येत असते. अर्थातच भ्रष्टाचार हा देशाला आतून खिळखीळे करीत असतांना दहशतवाद हा बाहेरून हादरे देत असतो. त्यामुळे लोकशाही व्यवस्थेलाही जबर धक्के पोहचत असतात.

मूल्यमापन :– देशात निर्माण झालेल्या अस्मानी व सुलतानी संकटाला यशस्वीरीत्या प्रत्युत्तर देत भारतीय लोकशाही आपल्या समर्थपणाचे दर्शन जगाला नेहमीच दिलेले आहे. देशातील अलीकडील काही वर्षाच्या काळातील काही घडामोडी पाहता आपल्या प्रजासत्ताकाला व येथील लोकशाहीला यापुढेही अनेक आवाहनाचा सामना करावा लागणार हे निश्चित आहे. देशातील सामान्याचे हित जोपासतांनाच त्यांच्या मूलभूत गरजांची पुर्तता करणे, कुपोषण व भुकबळीची आकडेवारी कमी करणे किंबहुना त्यावर मात करणे, देशातील दारिद्रय, बेरोजगारी, आर्थिक विषमतेची दरी कमी करणे व त्यातच जगभरातील तांत्रिक व आर्थिक दृष्टया समध्द असलेल्या देशांशी स्पर्धा करून आपले स्थान निर्माण करण्याचे आवाहन भारतीय लोकशाहीला पेलावे लागणार आहे. ही आवाहने यशस्वीरीत्या पेलल्यास देशात लोकशाही स्थीरावतांनाच ती अधिक बळकट व सक्षम होऊन जगातील इतर लोकशाही देशानांही मार्गदर्शनाचे कार्य करील हे निश्चित.

संदर्भ :–

- *व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास (संपादित), 2010, भारतीय लोकशाही – अर्थ आणि व्यवहार, डायमंड पब्लीकेशन्स, पुणे.*
- *लोटे रा. ज., 2009, भारतीय शासन आणि राजकारण, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लीशर्स, नागपूर.*
- *सांबळे आर. डी., 2004, भारतीय शासन आणि राजकारण, हिमालया पब्लीकशींग हाऊस, नागपूर.*
- *फाडिया बी. एल., 2006, राजनीती विज्ञान, प्रतियोगीता साहित्य सिरिज, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आग्रा.*
- *पळशीकर सुहास, 2004, समकालीन भारतीय राजकारण प्रतिमा प्रकाशन, पुणे.*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

''मराठी लोकसाहित्यातील निवडक लोककला''

प्रा.डॉ.राजीव वैजनाथराव यशवंते
मराठी विभाग प्रमुख
श्री गुरू बुध्दीस्वामी महाविद्यालय,वर्धा (जं) परभणी

★★★

सारांश :– प्राचीन लोकजीवनाचा अभ्यास करताना लोक साहित्याचे अध्ययन उपयुक्त ठरते. लोकसाहित्याचा व लोकसंस्कृतीचा अभ्यास अनेक अगनी झाला पाहिजे. कारण आजच्या समाजजीवनात इहवाद, दैववाद व यातूप्रधान श्रध्दा या सर्वांचे समिश्र स्वरूप दिसते. मौखिक परंपरेव्यतिरिक्तही लोकसाहित्याची साधनसाम्रगी मोठया प्रमाणात असते. जसजसा काळ बदलला तस तसे सादरीकरणाचे स्वरूपही बदलले. काही विधी धर्मिक प्रेरणेतुन केले जात असले, तरी त्यामाची मनोरंजनाची प्रेरणाही प्रबळ होत आहे. धर्मश्रेतून साकार होणा–या विधीनाटयांचे परिरवर्तन पुढे लोकनाटयात झाले आहे. आधुनिकतेच्या रेटयामुळे लोकनाटयांत बदल घडून येत आहेत. कीर्तन,भारूडासारखे काही पारंपारिक नाटयात्म प्रकार मा. लोकरंजनाबरोबर लोकप्रिय प्रभावी माध्यम ठरत आहेत.

पाश्चिमात्य संस्कृतीच्या अतिक्रमणामुळे लोककला लोप पावत चालली आहे. आजची परिस्थिती पाहता, मनोरंजनाची गरज भागवण्यासाठी मल्टिप्लेक्स, दुर त्याचबरोबर कम्प्युटर, मोबाईल आदि साधने उपलब्ध आहेत. हे सगळं सोडून रस्त्यावरच्या किंवा मंदिरातल्या लोककला पहाण्यासाठी कोणीही तयार नाही त्यामुळे लोककला जपल्या जात नाहीत आणि याच कारणाने लोककलावंतांना मिळेल ते काम करून पोट भराव लागतं. वृध्दपकाळात लोककलावंतांचे खूप हाल होतात. त्यामुळे लोककलावंत आता संपत चालले आहेत.

लोककला जगवायची असेल तर लोककलावंतांना जगवायला हवं, त्यांच्या कलेचे सादरीकरण आकाराची, दुरदर्शनवर व्हायला हवे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत लोककलावंतांसाठी व्यासपीठ निर्माण केले आहे. लोककलेचा अभ्यास, संशोधन आणि त्यांचे कल्याण अशा तीन पातळीवर विद्यापीठ काम करत आहे. अशा प्रकारे सर्वच विद्यापीठात हा प्रयोग होणे गरजेचे आहे. लोककलाकार जगलेतरच लोककला टिकेल उपाशी राहून कोणीही कलेचा अविश्कार करू शकत नाही. खेडोपाडी लोककलावंतांचे जाळे आहे. यचआयव्ही, ,ड्स जनजागृती', 'स्वच्छ भारत', अंधश्रध्दा निर्मुलन, भ्रष्टाचार, आरोग्य, भ्रुणहत्या, अत्याचार यावर आळा घालण्यासाठी स्थानिक लोककलाकराची ब्रॅड ॲबेस्डर म्हणून नियुक्ती करावी. यामुळे जनतेच्या कल्याणाची माहिती अधिक तळागाळापर्यंत पोहोचवली जाईल, तसेच या आधारे लोककलांचे जतन आणि प्रसारही होईल.

बिजशब्द :– मराठी लोककसाहित्यात अनेक लोककला आहेत लावणी, तमाशा, कीर्तन, गोंधळ, लळित, पोतराज, दशावतार, वासुदेव, भारूड, बहूरूपी, वाघ्या .मुरळी, पिंगळा या लोककलांचा अभ्यास करणार आहे.

प्रास्ताविक :– लोकसाहित्याला फार प्राचीन परंपरा आहे. प्राचीन साहित्यात, धर्मग्रथातही लोकसाहित्याचे संदर्भ आढळतात. ब्रिटिश कन्या मिस मेरी फ्रियरने शसक कमबवंद कंलेश हा संकलित पहिला लोककथासंग्रह प्रकाशित केला. त्याचे अनुवाद जर्मन, डॅनिश, हंगेरियन अशा यूरोपीय मेरीचे पुस्तक अनुवादीत केल्यामुळे मराठी लोककथा जगभर गाजल्या.राजाराम शामची भागवत हे महाराष्ट्रातील लोकसाहित्यासंबंधी दृष्टीने लिहिणारे पहिले लेखक आहेत.

लोकसाहित्याच्या व्याख्या . जोनास बॅलिस : जोनास बॅलिस या अभ्यासकाच्या मते, ''लोकसाहित्य हे आदिमानव निर्मित असून ते परंपरा प्राप्त असते. तसेच ते सुसंस्कृत मानवाने देखील निर्मिलेले असते. ही निर्मिती ध्वनी आणि शब्द यांच्या व्दारे पद्य किंवा गद्य स्वरूपात केली जाते. लोकसाहित्यात लोकविश्वास, लोकभ्रम, रूढी, लोककला प्रकार त्याच प्रमाणे नृत्ये–नाटय इत्यादींचा अंतर्भाव होतो. लोक साहित्य हे लोक समूहाच्या परंपरागत चालत आलेल्या जीवनाच्या आविष्काराचे आहे. लोकसाहित्य हे आदिमानवाची परंपरेने चालत आलेली निर्मिती आहे व ध्वनी आणि शब्द यांच्या रूपातून पद्य स्वरूप धारण करते ही महत्त्वाची गोष्ट त्यांनी सांगितली आहे.

मारियस बार्डो : त्यांच्या मते ''विविध व्यवसायाचे ज्ञान, अनुभूती, शहाणपण, कौशल्य, सवयी, रूढी आणि व्यवहार या संबंधीचे ज्ञान शब्दाने किंवा कृतीने का पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत येते. त्या सर्वास लोकसाहित्य म्हणावे'', असे म्हटले आहे''

बी बॉटकिन : ''आधुनिक समाजातील असे ज्ञान ज्यात परंपरेने ,का पिढीपासून दुस–या पिढीपर्यंत आलेल्या विधेशांचे आधिकत्व असते त्याला लोकसाहित्य म्हणता येईल.

जॉर्ज म–फॉस्टर : ''लोकसाहित्य हा शब्द लवचीक असून त्यात लोकसमूहाच्या अलिखित किंवा मौखिक स्वरूपाच्या भावाविशकारांचा समावेश होतो''.

फॉस्टर यांनी लोकसाहित्याचे स्वरूप हे त्याच्या वाङ्यीन विधेशांवरून निश्चित न करता लोकांच्या अविष्कारा पतीच्या विविध पती आणि रूपबंधांचा समावेश लोकसाहित्यात होतो. ही व्यापक व्याख्या स्वीकारल्यामुळे लोकसाहित्याच्या संचिताच्या माध

यमातून मानववंाचा इतिहास उलगडण्याची संधी अभ्यासकांना प्राप्त करून देते. डॉ. नागे– नांदापूरकर : लोकवाङ्मय म्हणजे लोकांनी निर्माण केलेले आणि मौखिक परंपरेने प्राप्त झालेले जे वाङ्मय–''लोकसाहित्य हे मौखिक परंपरेने चालत आलेले असते त्याचबरोबर त्याचा कर्ता कोणीही नसतो.

डॉ. प्रभाकर मांडे : लोकांमध्ये प्रचलित असलेल्या मौखिकपरंपरा म्हणजे लोक साहित्य लोकसाहित्य लोकांचे असते. व्यक्तिचे कधीही नसते. ''परंपरागत आलेल्या मौखिकपरंपरा मग त्यात सर्वच ? घटक ग्रहय धरून लोकसाहित्याची व्याख्या केलेली आहे.

डॉ. सरोजिनी बाबर : ''विविध प्रकारांच्या जातिवंत स्वरविलासांनी शिरलेले व आणि कित्येक वर्धमार्ग रचले असताना पाठांतराच्या बळावर पिढयान् पिढया आपल्या नव नवोनमे शालिनी तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित कर.ारे ते लोकसाहित्य लोकसाहित्य हे स्वरविलासांनी नटलेले आहे– तसेच पाठांतराच्या बळावर ,का पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आलेले असते–

डॉ. गिरी धर मोरजे : ''लोकसाहित्य हे केवळ मौखिक स्वरूपात परंपरेने चालत आलेला वाङ्मय प्रकार नाही उलट मौखिक आश्रय विधिसंबंधित कृती व अभिनय यांच्या केलेला प्रयोग असतो. म्हणजेच ही प्रयोग कला आहे.

समाजातील धार्मिक, सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक या सर्वच महत्त्वाच्या घटकाचे दर्शन लोकसाहित्यातून होत असते असे म्हटले आहे आणि हाच खरा लोकसमूहाच्या मनाचा आविष्कार असतो.

डॉ.रा.चिं.ढेरे : ''लोकसाहित्ये हे लोकसंस्कृतीच्या अध्ययनाचे प्राथमिक आणि प्रमुख साधन आहे. हे खरेच परंतु लोकसाहित्येत्तर वाङ्मयीन सामुग्रीतून लोकसंस्कृतीच्या प्रदीर्घ प्रवाहाचे समग्र दर्णन घेता येते. विद्यमान लोकसाहित्य कालौशात नाहीसे झालेले असते. अनेक लोकाचाराचे प्रचलन थांबलेले असते. अनेकात बरीच परिवर्तन घडलेली असतात. मराठी लोकसाहित्यातील लोककला ''लोककलांची निर्मिती ही समूहमानसामधून होते– ईश्वरविषयक श्रध्दाभावना, धर्मकल्पना व सर्जक जाणिवा कलाविकारांस प्रवृत्त करीत असतात– व्यक्तित्व भावभावनांचे सामूहिकीकरण होत असते– लोककलाविकार हे मौखिक परंपरेनने चालत आलेली लोकसाहित्याची आहेत– लोककला या सामूहिक भावनांचे आविष्कार असल्या तरी प्रत्येक काळातील व्यक्ती त्यात भर घालीत असतात.

कलाविष्कार हा समूहमनाला आवाहन करणाराच असतो. लोककलांचे संक्रमण ,का पिढीकडून दुस–या पिढीकडे प्रवाहित होत असते. त्यामुळे लोककला परंपरा आणि परिवर्तन यांचा सुयोग्य मेळ साध ातात– म्हणून लोककलांचे स्वरूप जितके पुरातन तितकेच नित्यनूतन राहते– लोककला आदि आणि प्राचीन परंपरेतून आल्या असल्या तरी त्यांच्या सद्याःकालीन आविष्कार हा ताजा, जिवंत आणि काळाचे भान राखणारा असतो.

निवडक लोककला कीर्तन – देवाची आराधना करण्याचे, भक्तीचे सुलभ साधन म्हणून प्राचीनकाळापासून कीर्तन प्रचलित आहे. परमेश्वर आणि थोर विभूतींचे तसेच पराक्रमाचे वर्णन करणारा लोककला प्रकार आहे. काव्य संगीत, अभिनय आणि काहीवेळा नृत्य यांच्या संगमातून सादर झालेले कथारूप ,कपाशी निवेदन म्हणजे कीर्तन कीर्तनामध्ये संगीत, नृत्य आणि नाटय या तिन्ही गोष्टींचा समावेश असतो. कीर्तन जणू ,कपाशी नाटयप्रयोग असतो. कीर्तनकार म्हणजे हरदासीबुवा बहुश्रुती, व्यासंगी रसिक असतो. उत्तम पाठांतर, संगीताचे ज्ञान त्याला असते.

लळित – लळित ही मराठमोळी लोककला आहे. कोकणात नारदीय कीर्तन परंपरेत लळिताचे महत्त्वाचे स्थान आहे. लळिताचा हेतू सोंगाच्या माध्यमातून तत्त्वज्ञान प्रेक्षकांच्या मनावर बिंबवणे हा असतो. या सोंगाच्या माध्यमातून करमणूक केली जाते. उत्सावाच्या शेवटी उत्सवदेवता सिंहासनावर बसली आहे, असे मानून तिच्या दरबारात विविध सोंगे आणली जातात. याला लळित म्हटले जाते. या सोंगांमध ये भालदार, जोपदार,वासुदेव,गोंधळी, वाघ्या, मुरळी यांसारखी पात्रे असतात.

तमाशा – मराठी लोकसाहित्यातील अत्यंत महत्त्वाचा लोककला प्रकार म्हणजे तमाशा– तमाशातील फार्स आणि व नाटयातून प्रबोध ानाचे, मनोरंजनाचे काम केले जाते. आज तमाशाचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. पारंपारिकते बरोबरच नवस्वीकृती होत आहे. समाजाची अभिरूची बदलली आहे. तमाशाला रंजनमाध्यमांशी प्रकारची स्पर्धा करावी लागते आहे. त्यामूळे काळाच्या ओघात काही अपरिहार्य असले, तरी तमाशा हा मराठी लोकरंग भूमीवरचा रांगडा, अस्सल देशी आविष्कार आहे. या पुढील काळात तो किती तरी धरेल यांची चिंता वाटावी अशी परिस्थिती नक्कीच आहे. तमाशा आणि कलावंत यांच्यासाठी सरकारकडून प्रयत्न झालेले दिसतात. तमाशा कलावंतांसाठी पेन्शन योजना सुरू झालेली आहे. मात्र, अद्याप सर्वापर्यंत ही योजना पोहेचू शकलेली नाही. आज अनेक तमाशाचे फड बंद पडले आहेत. आणखी बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.

गोंधळ – महाराष्ट्रात गोंधळाला मोठी परंपरा आहे. लग्न समारंभ किंवा शुभ कार्यामध्ये गोंधळाचा कार्यक्रम केला जातो. कुलदेवतेला प्रसन्न करणा–यासाठी गोंधळ घालण्याची परंपरा सध्यातरी टिकून आहे. अंगत तेलकट झबला, गळयात देवींची प्रतिमा, कपाळावर कुंकू व भंडारा आणि गळयात कवडयांची माळ अशी वेशभूभा असलेली व्यक्ती म्हणजे गोंधळी संबळ आणि या वाद्य नृत्यही करणारा गोंधळी काकडे पेटवून देवीचे करत गोंधळ घालतो. शहरीकरणाचे दुष्परिणाम या परंपरेवर होत आहेत.

लावणी – गीत, नृत्य आणि अदाकारी यांचा संगम असलेली लावणी हा लोकप्रिय कलाप्रकार आहे. तामाशाचा भाग म्हणूनही लावणी सादर केली जाते, आधारलेल्या लावणीचे मूळ संतांच्या विराण्या, गौळणी, बालक्रीडेचे अभंगात आढळून येते. शाहिरांनी या लावण्याची

लज्जत वाढवली. नव्हे, तर भक्तीरस, वीररस, वात्सल्यरस असलेल्या लावण्याही जाहिरांनी रचल्या आहेत. लावणी शिवाय मनोरंजनाच्या कार्यक्रमाला शोभा येत नाही. मात्र सध्याची लावणी आणि लावणीकलावंत यांची स्थिती दयनीय झाली आहे.

दवतार – कोकाणातील प्रामुख्याने सिंधुदुर्ग जिल्हयात असलेली दशावतार ही एक लोककला आहे. विणूने दहा आवतार धारा केल होते. तयामध्ये मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, पर'ुराम, राम, कृष्ण, कलंकी आणि बु) यांचा समावेश आहे. यातील पहिली चार प्राणीरूपे आहेत. कलंकी आणि हे दान आवतार दशावरतारात दाखवण्यात येत नाहीत. तुळशीच्या लग्नाासून जत्रांमध्ये दशावतारी खेळ सुरु होतात. मे महिन्यापर्यंत हे खेळ चालतात.

पोतराज – पोतराज हा ग्रामीण भागात मंगळवारी व शुक्रवारी फेरी मारतो. हालगीच्या ताावर तो देवीची गाणी म्हणतो. कमरेला वेगवेगळया चोळी खाची रंगीत घागरा घातलेला असतो. ही लोककला फार पारंपारिक आहे. स्त्रींया ते जेव्हा गाणी म्हणत आापल्या दारी येतो तेव्हा त्याला घरातील धान्य देतात. त्याच्यावर तो आपला उदनिर्वाह करत असतो. काळाच्या ओघात ही कला सुध्दा बंद पडण्याच्या मार्गावर आहे.

वासुदेव – सकाळच्या वेळी घरोघर हिंडून पांडुरंग आणि श्रीकृष्ण यांचे अभंग–गवळणी गात दान मागणारा लोक कलाकार आहे. पंढरपूर सारख्या ठिकाणी वासूदेव हा तीर्थयात्रात स्नान करायला आलेल्या मंडळींनी नाना तीथयात्रांची आणि तिथल्या देवतांची नावे सांगतो. त्या अर्थाने वासुदेव तीर्थांचा चालता बोलता कोशाच आहे. वासुदेवाला पैसे दिले तो सगळया दैवतांच्या नावाने पावती देतो, आणि मग अलगुज वाजवतो. वासुदेव सहसा कुणालाही आपणहून पैसे मागत नाही.

वासुदेव विशेषात्वाने कृशण कथा सादर करतो. डोक्यावर शंकुकार मोरपिसाची टोपी, पायात घुंगरू, हातात टाळ, अंगात घोळदार अंगरखा, कमरेला शेला, शेल्यात बासरी, काखेत झोळी असे सुंदर ध यान सुरेल आवाजात गिरकी घेत नाचत भल्या पहाटे दारात नामघोश करत दान मागतो. ज्याच्या दारात भिक्षा मागायची असते तोच प्रेक्षक असतो. देवदेवतांच्या आख्याना बरोबर लौकिक आख्याने डाऊन,कशा प्रकारे तो त्या कुळूचा दान देणाराचा उच्चार करतो.

भारूड – भारूडातील विषय हे सर्वसामान्यांच्या परिचयाचे व नित्याच्या व्यवहारात वावरणारे व आढळणारे असतात. व्यवसाय, नाती, गोती, सामाजिक वृत्तिदर्शन, गाव, दैवी भूमिका, भुत, संत साहित्याच्या अभ्यासक काळुबाई जाधव, लक्ष्मीबाई गिरम आणि चंदाबाई तिवाडी या स्त्री भारूडकर्त्या भारूडे सादर करीत असता. चंदाबाई तिवाडी यांना तर संगीत नाटक अकादमीचा पुरस्कारही मिळाला आहे. आकाशवाणीवर आणि दुरचित्रवणीवर कार्यक्रम करण्यास त्यांना आमंत्रित केले जाते. विचू चावला,' 'दादला नको ग बाई,' 'सुया घे दाबन घे, असे अनेक भारूडे जनमानसात लोकप्रिय आहेत.

बहुरूपी – विविध प्रकारची सोंगे बेमालूपणे धारण करणार्याला बहुरूपी म्हणतात. रूढार्थाने ही एक अनेक रूपे घेऊन उपजीवीका करणारी डावरी जात आहे. लोककलांकारापैकी पूर्वीच्या काळी जेव्हा गांवो गांव करमणूकीचे पर्याय मर्यादित होते. तेव्हा हे कलाकार कुणाची तरी हुबेहुब नकक्ल करून लोकांना हसवत पोलीस,फौजदार,सोंग बहुरूपी वठवतो. प्रत्येक घरी जाऊन विनोद करून पैसे किंवा धान्य मागतो.

परंतू आता चित्रपट आणि करमणुकीची साधने वाढल्याने आणि नविन पिढीला या शेतीची माहिती नसल्याने, या लोकांवर उपासमारीची वेळ आली आहे. मी लहान असताना बहुरूपी आमच्या गावात आल्यावर आम्ही मुले खेळत असताना त्याला पाहिल्या पाहिल्या आहे तो खेळ जाग्यावर आहे आसा सोडून पळ काढत असे. जर, खादे काम जर नाही केले तर आई म्हणत असे पोलीसाला पकडून नेण्यास सांगेन. त्याकाळी त्यांचा चांगलाच दरारा होता. पिंगळा पिंगळा किंवा पांगूळ ही, एक भिक्षीकर्याची जात आहे. सुर्यदेवाचा शरीराने पांगळा असलेला सारथी 'अरूण' याचे प्रतिनिधी म्हणून हे पिंगळे ओळखले जातात. अरूणाचे प्रतिनिधी म्हणून ते अरूणादयाच्या आधीच दारात येतात आणि 'धर्म जागो' अशी शुभकामना व्यक्त करून दान मागतात. शक्यतो हे पांगुळ पहाटेच्या वेळी झाडावर किंवा भिंतीवर बसून येणार्या जाणार्याकडून दान मागतात. खांदयावर घोंगडी, धोतर, डोक्यावर रंगीबेरंगी गोधडयापासून बनवलेली टोपी, काखेला झोळी, हातात घुंगराची काठी आणि कंदिल असा त्यांचा पोशाख असतो.

वाघ्या – मुरळी – जेजुरीचा खंडोबा ही महाराष्ट्राची लोकप्रिय लोकदेवता या लोकदेवतेचे उपासक वाघ्या मुरळीयांना लोकसंस्कृतीत, आगळे वेगळे स्थान प्राप्त झाले आहे. खंडेरायाचे हे भक्त देवापूढे जागरण करून खंडोबाची लीला वर्णन करण्याचे काम करतात. मुरळी कपाळावर भंडारा,पदराला बांधलेली घंटी वाजवत मुरळी नाचते आणि हातात दिमडी घाटी घेवून मुठीने भंडारा उधळतात. टाळ घाटी यांचा नाद घुमतो– जागरण मोडलं जात– देवदेवतांना जागरणाला आवर्तन दिल्यावर खंडोबाची लीला वर्णन करणारी गाणी म्हटली जातात–बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे वाघ्या–मुरळी कार्यक्रमात बदल होत आहे. मुलं खंडोबाला अर्पण करण्याची प्रथा आता बंद करण्यात आलेली आहे.

निष्कर्श :–'लोकाची कला ती लोककला असा अर्थ स्पष्ट होतो. लोक या शब्दात पूर्ण मानवजात सामाविष्ट झाली आहे. लोककला या सामर्थ्यवान आहेत या कला समाजामध्ये प्रबोधन करू शकतात. मानवी जीवनाचा बहुतांशी भाग व्यवहारसापेक्ष कलाविशकारांनी व्यावलेला आहे. धर्म निगडीत लोककला रंजन प्रधानतेकडे झुकल्याचे लक्षात येते. लोकनृत्य, लोकवाद्य, लोकनाटय व विधिनाटय सर्वांचे प्रत्यक्ष प्रयोगातून सादरीकरण होते म्हणून त्यांना प्रयोग लोककला असे म्हणतो.

आज धर्म निगडित लोककलांचे सादरीकरण होत असले तरी भाषांप्रमाणेच या लोककलांही परिवर्तनशील असतात. स्थळ काळानुसार त्या प्रवाही असतात. खेडयापाडयातून प्रचलित असणाऱ्या पारंपारिक विधीनाटय लोककला, प्रकारांचे जतन असणाऱ्या लोकसंस्कृतीच्या उपासकांनी केले आहे.

शिफारणी 1. लोककलांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी शासनानेकाह योजना राबवल्या पाहिजेत. 2. कलेचे संवर्धन कर.यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ कलावंतांन होण्यासाठी, त्यांचा सहभाग वाढविण्याचा प्रयत्न शासनाकडून करायला हवा. 3. विद्यापीठांमध्ये लोककला आणि ललितकला अध्यासन निर्माण करावे 4. कलाकारांना शासनाकडून मानधन दिले जाते. ते कमी असून वाढवाव.

संदर्भ :–

1. *डॉ–विश्वनाथ शिंदे, 'लोकसाहित्य मीमांसा', भाग पान 221*
2. *तत्रैव पान 221*
3. *तत्रैव पान 221व222*
4. *डॉ–सुरेश पाटील, सुनदा पाटील, लोकसाहित्य, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक,पान 2,*
5. *डॉ–विश्वनाथ शिंदे, 'लोकसाहित्य मीमांसा', भाग – 1 पान 225*
6. *तत्रैव, पृष्ठ 225*
7. *तत्रैव, पृष्ठ 225*
8. *डॉ. श्रीधर मोरजे, लोकसाहित्य ,क स्वतंत्र अभ्यात्रे पान 6*
9. *डॉ.रा.चिं.ढेरे,लोकसंस्कृतीची क्षितिजे, प्रास्ताविक विश्वकर्मा साहित्यालय, पुणे–*
10. *डॉ. ,कनाथ पगार, लोकसाहित्य व आधुनिक साहित्य यच ममुवि नाशिक पान 124*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

जलप्रदूषण एक समस्या

प्रा. डॉ. गावंडे एस.एम.
चंद्राबाई–शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी
ता. हातकणंगले जि. कोल्हापूर

★★★

प्रस्तावना : मानव आणि पर्यावरण याचा खूप जवळचा संबध आहे. परंतु अलिकडे पर्यावरणात मोठया प्रमाणात प्रदूषण होत आहे . प्रदूषणामुळे विविध प्रकारच्या सामाजिक समस्या निर्माण होतात. सद्या मानवासमोरील सर्वात चिंतेचा आणि चिंतनाचा मुद्दा प्रदूषण हाच आहे. त्यामुळे वेळीच प्रदूषण समस्या समजावून घेऊन त्याचा मानवावर व संपूर्ण जीवसृष्टीवर काय परिणाम होतो. प्रदूषण कशामुळे होते. ते कसे कमी करता येईल या सर्वाचा गांभिर्याने विचार करणे गरजेचे आहे . परंतु प्रदूषण हा विषय तसा व्यापक आहे. कारण या प्रदूशणामध्ये वायू प्रदूषण, जलप्रदूषण, ध्वनिप्रदूषण व मृदाप्रदूशण असे अनेक प्रकार येतात. या सर्वाचा सविस्तर अभ्यास करणे येथे शक्य नाही. त्यामुळे अभ्यासकाने येथे केवळ जलप्रदूषण म्हणजे काय? जलप्रदूषणाची कारणे कोणती? दुष्परिणाम काय होतात? त्याच्यावर काय उपाययोजना करता येतील? याचा अभ्यास करण्याचे निश्चीत करून शोधनिबंधासाठी 'जलप्रदूषण एक समस्या' असा अभ्यास विषय घेतला आहे.

- **उद्देश :**

1. जलप्रदूषणाचा अर्थ समजावून घेणे
2. जलप्रदूषणाची कारणे अभ्यासणे
3. जलप्रदूषणाचे परिणाम अभ्यासणे
4. जलप्रदूषणावर उपाययोजना सुचविणे

- **गृहितके**:

1. जलप्रदूषण हे नैसर्गिक कारणापेक्षा मानवनिर्मित कारणामुळे जास्त होते.
2. जलप्रदूषणाचा जलचर प्राण्याबरोबरच मानव्री आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहे.

• **अभ्यासपध्दती** : प्रस्तुत शोधनिबंधाच्या लिखाणाकरिता दुय्यम स्त्रोतांचा अवलंब केला असून यामध्ये संदर्भ ग्रंथाचा वापर केला आहे.

• **जलप्रदूषण म्हणजे काय** – संपूर्ण जीवसृष्टीची एक आधारभूत गरज म्हणजे जल किंवा पाणी आहे. प्रत्येक सजीवाच्या अस्तित्वासाठी पाण्याची नितांत गरज आहे. पृथ्वीवरील 71टक्के भाग पाण्याने व्यापलेला आहे. पण त्यापैकी 97 टक्के पाणी समुद्राच्यारूपाने क्षारयुक्त आहे. 2.1 टक्के पाणी हे बर्फाच्या स्वरूपात आहे. तर केवळ 0.9 टक्के पाणी पिण्यासाठी उपलब्ध आहे. यावरून पिण्याच्या पाण्याची दुर्मिळता आपलया लक्षात येते. परंतु तरीही स्वतःला ज्ञानी हुषार म्हणनारा मानव याबाबत जागृत आहे असे दिसत नाही. कारण अलिकडच्या काळात पाण्याची गुणवत्ता मोठया प्रमाणात कमी होत असून याला बहुतांशी मानवच कारणीभूत आहे. मानवी सुखाच्या नादात कारखान्यामधील कचरास्वरूपी विशारी व घातक द्रव्ये, सांडपाणी, जहाजातून होणारी तेलगळती इ. बाबीमुळे होणा–या जलसाठयाच्या हाणीलाच जलप्रदूषण म्हणतात किंवा पाण्यात दूषीत पदार्थ मिसळून त्याच्या नैसर्गिक गुणवत्तेत बदल होणे व त्यामुळे पिण्यास व वापरण्यास अयोगय बनणे म्हणजे जलप्रदूषण होय. जलप्रदूषणाचा अर्थ समजावून घेतल्यानंतर जलप्रदूषण कशाकशामुळे होते. या जलप्रदूषणाला निसर्ग किती जबाबदार आहे. मानव किती जबाबदार आहे हे पाहणे आवश्यक आहे. त्यासाठी जलप्रदूषणाची कारणे समजावून घेऊ.

• **जलप्रदूषणाची कारणे** : जलप्रदूषण हे प्रमुख दोन कारणामुळे होते

अ. नैसर्गिक कारणे : वादळी वारे , जमिनीची धुप ,सेंद्रिय पदार्थांचे विघटन इ. नैसर्गिक घडामोडी मुळेही जलप्रदूषण होत असते परंतु याचे प्रमाण खुपच कमी आहे.तसेच यामुळे पाण्याच्या गुणवत्ते मध्ये खुप फरक पडत नाही.

ब. मानवनिर्मित कारणे : विवीध तज्ञाच्या मते मानवाने पाण्याचा केलेला दुरुपयोग व त्याच्या निसर्गाविरुध्दच्या कृतीमूळे जलप्रदूषण मोठया प्रमाणात होते. ती कारणे खालील प्रमाणे

सांडपाणी :– स्वयंपाकगृहे, हॉटेल्स, कपडे धुणे, स्नानगृहे व शौचालये इ.मधील सांडपाणी. त्यापैकी कांही सांडपाण्यात साबण, डिटर्जंट पावडर मिसळलेली असतात. असे सर्व प्रदूषित पाणी गटारीच्या माध्यमातून ओढे, तलाव, नदी, समुद्र यात मिसळूण जलप्रदूषण होते.

उद्योगधंदे– विविध प्रकारची उत्पादने करणा–या कारखान्या मध्ये वापरलेल्या पाण्याचा अनेक बाबींसाठी वापर केला जातो. कारखान्यामध्ये वापरलेल्या पाण्यात विवीध प्रकारची रसायने, वंगणे, शिसे, ॲल्युमिनीयम लोखंड इ. धातूंचे सुक्ष्म कण मिसळतात. तसेच साखर कागद उत्पादन प्रक्रियेनंतरचे टाकाऊ पदार्थ मिसळलेले पाणी नाले,नदी,तलाव यामध्ये मिसळून जलसाठे दूषित बनतात.

3. किटकनाशके, जंतुनाशके व रासायनिक खते यापासून जलप्रदूषण : अलिकडे शेतीमधून भरमसाठ उत्पादन काढण्यासाठी

शेतकरी मोठया प्रमाणात किटकनाशके, जंतुनाशके व रासायनिक खतांचा वापर करीत आहे. या सर्वामुळे हवा, मृदा व जलप्रदूषण होते.

4. खनिजतेलामुळे जलप्रदूषण : खनिजतेल शुद्धीकरण प्रक्रियेच्या माध्यमातून क्षारयुक्त पाणी, आल्कली,आम्ल, सायनाइडसृ, हायड्राकार्बन्स, फिनॉल्स इ. घातक पदार्थ तयार होऊन ते पाण्यात मिसळतात. तसेच गळतीमुळे खनिजतेल पाण्यात मिसळून जलप्रदूषण होते.

5. उष्णता : कारखान्यातील शीतकरण प्रक्रियेतून आणि ऊर्जा निर्मिती केंद्रातून निर्माण होणारी उष्णता नदी व तलावाचे पाणी प्रदूषित करते.

6. घनकचरा : जमिनीवरील कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून रसायने धातू, इ. घातक पदार्थ वाहत्या पाण्यात मिसळतात तसेच ते जमिनीत पाझरतात समुद्रकिनारी व नदयांच्या काठी आलेले पर्यटक प्लॅस्टिक कागद व अन्य कचरा पाण्यात टाकतात त्यामुळे जलप्रदूशण होते.

7. आण्विक कचरा : आण्विक कचरा डब्यात सीलबंद करुन ते डबे समुद्रात खोलवर सोडतात. तथापि त्यात गळती होऊन किरणोत्सर्जनामुळे सागरी प्रदूषण होते.

8. जलसाठयामध्ये टाकण्यात येणा–या वस्तुमुळे प्रदूशण: नद्या, ओढयामध्ये मृतप्राणी, अर्धवट जळालेली प्रेते, उत्सवातील मूर्ती, निर्माल्य,मलमूत्र विसर्जन यासारख्या अनेक प्रकारच्या गोष्टी टाकल्या जातात. त्यामुळे जलसाठे प्रदूषित होतात. अशाप्रकारे मानवी चुकामुळे जलप्रदूषण मोठया प्रमाणात होत असल्याचे दिसून येते. परंतु या जलपदुषणामुळे मानवी जीवनावर व जीवसृष्टीवर कोणकोणते दुष्परिणाम होतात याचाही अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यामुळे आपणास जलप्रदूषणाचे दुष्परिणाम खालीलप्रमाणे सांगता येतील.

• जलप्रदूषणाचे दुष्परिणाम

1. ऑक्सिजनची कमतरता– पाण्यात विविध वस्तु टाकल्यामुळे पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊन पाण्यातील पाणी व वनस्पतीचा नाश होतो. तसेच तेल व ग्रीसच्या तवंगामुळे पाण्यातील तळापर्यंत प्रकाशकिरणे पोहचत नाहीत. त्यामुळे वनस्पतींच्या प्रकाश संश्लेषणात अडथळे येतात. त्यामुळे ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊन वनस्पतींचा नाश होतो.

2. तापमानात वाढ – प्रदूषणामुळे पाण्याचे तापमान वाढते. त्यामुळे जलचरांच्या स्वाभाविक जीवनचक्रात बाधा निर्माण होऊन त्यांना हानी पोहचते.

3. जलचरांचे आजार – प्रदूषित पाण्यातील अमोनियामुळे माशांना कर्करोग व कल्लयांचे आजार होतात. खनिज तेलातील कर्करोगजन्य रसायनामुळे प्राण्यांचा मृत्यू होतो. कीटकनाशकांमुळे जलचरांची व पक्ष्यांची अंडी फुटतात व त्यामधील पिल्ले मरतात.

4. मानवी आरोग्यास धोका – प्रदूषीत पाण्याचे मानवी आरोग्यावर अत्यंत गंभीर परिणाम होतात. प्रदूषित पाण्यामुळे मानवाला हगवन, कावीळ,पितज्वर,डोकेदुखी,रक्तक्षय त्वचारोग, अस्लर, कर्करोग,यासारखे रोग होतात.तसेच ल्पोराईड पान्यावाटे सातत्याने मानसाच्या पोटात गेल्यामुळे त्याला वनज घटते ,सांधे, दूखी, हाडे वाखडी होणे,दंतरोग यांसारखे आजार होतात.

5. परिसंस्थेचा विनाश – एखादया नदीच्या किंवा तळयाच्या पाण्यात कीटकनाशके व अन्य प्रदूषके मिसळल्यामुळे परिसंस्थेचा विनाश होतो.उदा पाण्यात मिसळलेली किटकनाशके जलवंनस्पती शोषून घेतात.लहान मासे वनस्पती खातात, मोठे मासे लहान माशांना खातात तर पक्षी मोठया माशांना खातात अशाप्रकारे अन्नसाखळीतील प्रत्येक घटकात किटकनाशके साठतात.

6. भुमिगत पाण्यावरही परिणाम – ज्या ठिकाणी भुपृष्ठावरील पाण्याची पातळी अत्यंत वर आहे अशा ठिकाणी सेप्टी टॅंकमधील पाणी, किटकनाशक,रासायनिक द्रव्ये ,डिटर्जंट या सर्वांचा निचरा होऊन भूमिगत पाण्यावर परिणाम होतो व पाणी दूशीत होते.अशा पाण्यातून व्यक्तिला अनेक आजार होतात.

वरीलप्रमाणे जलपदुषणाचे दुष्परीणाम जलचर प्राणी , वनस्पती व मानवी अरोग्यावर मोठया प्रमानात होत असल्याचे दिसून येते.त्यामुळे वेळीच आपण सावध होवून, पाण्याचे महत्व ओळखुन जर जलप्रदूषन करणे थांबविले नाही तर त्याचे दुरोगामी परिणाम मानवाला भोगावे लागतील.त्यासाठी जलप्रदूषण होण्यापासून वाचविन्यासाठी किंवा किमान नियंत्रित ठेवन्यासाठी खालील उपाय योजना करणे आवश्यक आहे.

• जलप्रदूषण नियंत्रणाचे उपाय .

1. ग्रामीण भागातील धरातील अंघोळी,कपडे धुणे, शौचालय व इतर प्रकारचे सांडपाणी गटारीत न सोडता ते जास्तीजास्त शोषखड्डे काढून जमिनीत मुरविले पाहिजे

2. शहरातील सांडपाणी, मलमूत्र वगैरे सरळ नदीनाल्यात किंवा समुद्रात सोडण्यापूर्वी ते सर्व पाणी शहराबाहेर एकत्र करुन त्याच्यावर प्रक्रिया करुन ते पुनर्वापरासाठी घ्यावे किंवा नदीनाल्यात सोडावे.

3. कोणते पाणी किती प्रदुषीत झाले आहे हे पहाण्यासाठी गावात व शहरामध्ये पाणी परिक्षणाची सोय असावी तसेच प्रदूषीत पाण्याच्या प्रमाणावरून त्याचा कशासाठी उपयोग करावा हे प्रशासनाने ठरवावे

4. उत्सवाच्या मुर्ती , निर्माल्य किंवा मश्त जनावरे वैगरे गोष्टी तलाव व नदीमंध्ये न सोडता त्याचे काय करावे याबाबत जनजाकृती मोठया प्रमाणात केली पाहिजे.

5. कारखाण्यातील सांडपाणी नदी नाल्यात न सोडता त्याच्यावर प्रक्रिया करून ते पुनर्वापर करण्याची सक्ती उदयोजकांवर करावी.

6. ग्रामीण भागात व शहरातही नदी तलावांमध्ये लोक अंघोळ करणे ,कपडे धुणे ,गाडया धुणे इ. प्रकार करून जलस्त्रोत दूषीत करतात त्यांच्यावर प्रशासनाने नियंत्रण ठेवावे.

7. प्राथमिक शाळेपासून विद्यार्थ्याना पाण्याचे महत्व पटवून देवून जलप्रदूषण कसे रोखता येते याबाबत त्यांच्यामध्ये जागृती करावी. वरीलप्रमाणे प्रशासनापासून ते समाजातील प्रत्येक घटकाने जबाबदारीने वागून जलप्रदूषण टाळता येईल.

• निष्कर्ष

1. जलप्रदूषण हे वादळी वारे, जमिनीची धूप व सेंद्रिय पदार्थांचे पाण्यामध्ये विघटन हया नैसर्गिक कारणापेक्षा मानवनिर्मित कारणामुळे जास्त होत असल्याचे दिसून येते.

2. जलप्रदूषणामुळे जलचर प्राणी व मानवाचे आरोग्य धोक्यात येत असल्याचे दिसून येते.

3. समाजातील प्रत्येक घटकाने जागृत व जबाबदार नागरिक म्हणून काम केले तर जलप्रदूषण नियंत्रित ठेवता येते असे दिसून येते.

• *संदर्भ*

1. *लोटे रा.ज. : भारतीय समाज आव्हाने आणि समस्या , पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर 2011*
2. *कऱ्हाडे बी. एम. : भारतीय समाज प्रश्ने आणि समस्या , पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर 2009*
3. *खंडागळे चंद्रकांत : ग्रामीन समाजशास्त्र , सौ. मायादेवी खंडागळे प्रकाशन सांगली 2005*
4. *मायी सुनिल भारतीय समाज प्रश्ने आणि समस्या ,डायमंड प्रकाशन,पुणे 2009*
5. *जगदाळे अनिलराज : पेटणारे पाणी, सुमेरु प्रकाशन, डोंबिवली, 2004*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

भारतातील ग्रामीण विकासातील समस्या

प्रा. डॉ. आर. बी. शेटे
राज्यषास्त्र विभाग प्रमुख
शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर,जि.नांदेड – ४३१७०४

★★★

प्रस्तावना – भारत हा खेड्यांचा देश आहे. आजही भारतात एकूण लोकसंख्येच्या दोन तृतीयांश लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. स्वातंत्र्यानंतर भारताचा जो विकास होत राहिला यात औद्योगीकरण आणि शहरीकरण यावर जास्त भर राहिला आहे. या तुलनेत ग्रामीण भागातील विकास झालेला दिसून येत नाही. म्हणूनच भारताची विभागणी दोन भागात केली जाते, एक इंडिया आणि दुसरा भारत, इंडिया हा शहरी भागाचा किंवा शहरी भारताचं प्रतिनिधित्व करणारा तर भारत हा ग्रामीण भागाचा प्रतिनिधित्व करणारा म्हणून ओळखला जातो. ग्रामीण भारताच्या विकासा पुढील अनेक समस्या आहेत. लोकसंख्या, भ्रष्टाचार, बेरोजगारी, भाषावाद,जातिवाद, दारिर्द्य, कर्जबाजारीपणा, विकासातील विशमता, व्यसनाधीनता, मानवी संसाधनाचा निकृष्ट दर्जा, यासारख्य समस्या दिसून येतात. देशाच्या सर्वांगीण विकासात सर्वात मोठी समस्या ग्रामीण भागाचा असमतोल विकास होय. ग्रामीण विकासाशिवाय भारताचा विकास होणार नाही असे आपणास म्हणता येईल. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी ग्रामीण विकास होणे आवश्यक आहे. म्हणून आपणास ग्रामीण विकासाचा व त्या पुढील समस्यांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. प्रस्तुत शोधनिबंधात ग्रामीण विकासाच्या समस्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रस्तुत शोधनिबंधा साठी पुढीलप्रमाणे उद्दिष्टे निश्चित करण्यात आली.

1.ग्रामीण विकासातील समस्यांचा शोध घेणे.
2.ग्रामीण विकासाची संकल्पना समजून घेणे.

गृहीतक– 1. ग्रामीण विकासात समस्या दिसून येतात. प्रस्तुत शोधनिबंधासाठी गृहीतक निश्चित करून.संशोधन पद्धती प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी वर्णनात्मक, विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.संदर्भ साहित्याचा आधार घेऊन प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यात आला आहे. तथ्य संकलनसाठी दुय्यम साधनाचा वापर करण्यात आला आहे.

ग्रामीण विकासाची संकल्पना – ग्रामीण विकास ही एक लवचिक संकल्पना आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांसाठी ग्रामीण विकास कार्यक्रमांना प्राधान्य देणे म्हणजे ग्रामीण विकास होय. या मध्ये कृशी विकास, ग्रामीण आरोग्य, शिक्षण, दळणवळण या साधनात सुधारणा, ग्रामीण गृहनिर्माण, राहणीमानाचा दर्जा उंचावणे, विविध ग्रामीण विकासाच्या योजनांची अंमलबजावणी करणे व ग्रामीण लोकांच्या सामाजिक आर्थिक राजकीय व प्रशासकीय स्थितीत सुधारणा घडवून आणणे म्हणजे ग्रामीण विकास होय.1

ग्रामीण विकास हा शब्द ग्रामीण आणि विकास या दोन शब्दांपासून बनलेला आहे. त्याचा आशय गावाच्या समग्र विकासाशी संबंधित आहे. असा 'एक समुदाय जो निश्चित संख्येने ग्रामीण क्षेत्रात राहतो, त्यास गाव असे म्हणतात. त्या गावचा सर्वांगीण विकास म्हणजे ग्रामीण विकास होय. ग्रामीण विकासाच्या निरनीराळ्या व्याख्या केलेले आहेत. यामध्ये काही व्याख्या आपणास पुढील प्रमाणे सांगता येतील .

1. जागतिक बँकेच्या विकासनीती 1975 नुसार, 'ग्रामीण विकास एक अशी रणनीती आहे की जी ग्रामीण भागातील गरीब, निर्धन, अल्पभूधारक,सीमांत शेतकरी,भूमिहीन, शेतमजूर यांच्या सामाजिक आर्थिक जीवनात सुधारणा घडवून आणतो'.

2. उमा लैली यांनी केलेली व्याख्या रू 'ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण क्षेत्रात राहणाऱ्या अनेकानेक कमी उत्पन्न गटातील लोकांच्या जीवनस्तरात किंवा राहणीमानात सुधारणा घडवून आणणे तसेच त्यांच्या विकासक्रमाला आत्मनिर्भर बनवणे होय'. वरील व्याख्यान वरून ग्रामीण विकासाच्या संकल्पनेविषयी काही निश्कर्ष आपणास सांगता येतील. ग्रामीण विकास म्हणजे 'ज्यांचा व्यवसाय, सामाजिक संघटन आणि राहणीमानाची शैली व गैरशहरी आहे व मुख्य व्यवसाय शेती व शेतीवर आधारित आहे'. सामाजिक, आर्थिक, राजकीय व भौतिक विकासाच्या उद्देशाने नियोजित पद्धतीने परिवर्तन घडवून आणणे, ही ग्रामीण विकास प्रशासनाची रणनीती आहे. अशाप्रकारे आपणास ग्रामीण विकासाचा अर्थ लक्षात घेता येतो.

ग्रामीण विकासाच्या समस्या – विकास हा शब्द प्रगती किंवा उन्नती सुचित करणार आहे. ग्रामीण विकासाच्या बाबत असे म्हणता येईल की, ग्रामीण भागातील लोकांचा भौतिक,सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि प्रशासकीय स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणणे म्हणजे विकास. वरील क्षेत्रात सुधारणा घडवून आणून ग्रामीण भागाला विकसित किंवा प्रगत भागाबरोबर नेणे महत्त्वाचे ठरते. तेव्हाच देशाचा सर्वांगीण विकास होऊ शकेल. परंतु ग्रामीण विकासाच्या मार्गात अनेक समस्या किंवा अडथळे निर्माण झाले आहे. त्यामुळे ग्रामीण विकास झालेला दिसून येत नाही. ग्रामीण विकासाच्या समस्या जाणून घेतल्यास आपणास ग्रामीण विकास घडवून आणता येईल. ग्रामीण विकासाची एकूणच प्रक्रिया ही अतिशय गुंतागुंतीचे असून तिच्या संबंधीत घटकांची संलग्नता न विसरता एकात्म दृष्टीकोनातुन विचार करून ग्रामीण विकासातील ज्या समस्या आहेत त्या पुढील प्रमाणे आपणास अभ्यासता येतील.

1. दारिद्य– 'भारतातील दारिर्द्य''Poverty in India" प्रा. वि. म. दांडेकर व प्रा. नीळकंठ यांनी लिहिलेल्या या पुस्तकात दारिद्र्याचे दरडोई खर्चाच्या आधारावर निकष ठरवून दिले आहे. त्यानुसार भारतातील 40 टक्के लोक दरिद्री आहेत. दारिर्द्यरेषेच्या आसपास हे लोक जीवन

जगताना दिसून येतात.त्यांना मानवी मूलभूत गरजा सुद्धा मिळत नाहीत. उदाहरनार्थ अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, रोजगार या गरजांची पूर्तता ग्रामीण भागातून दिसून येत नाही. ही देशाच्या विकासासाठी अतिशय गंभीर बाब आहे असे म्हणता येईल.

2. बेकारी – दारिद्र्याचे मुख्य कारण बेकारी हे ठरते. ग्रामीण भागात बेकारी निर्माण होण्याची कारणे अनेक दिसतात. यामध्ये शेतीचे मागासलेपण,भारतातील शेती ही इतर प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत अप्रगत समजली जाते. विशेषतः निसर्गावर मोठ्या प्रमाणामध्ये भारतीय शेती अवलंबून आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव येथील शेती मध्ये दिसून येतो. शेतीमाल बाजारपेठांची समस्या, हंगामी स्वरूपाची शेती, भांडवल व पाण्याची कमतरता. अशा कारणांमुळे शेतीचा विकास झालेला नाही. याबरोबरच बेकारी चे व दारिद्र्याचे एक मुख्य कारण लोकसंख्या वाढ हे सांगता येईल. संत तुकाराम महाराज वाढत्या लोकसंख्ये बाबत आपल्या अभंगामध्ये मध्ये सांगतात 'लेकुरे उदंड जाहली, बापुडे भीकेस लागली.म्हणजेच संत तुकाराम महाराजांनी वाढत्या लोकसंख्येवर आळा घालण्यासाठी निर्देश देऊन दारिद्र्याचे व बेकारीचे मुख्य कारण वाढती लोकसंख्या हे निदर्शनास आणून दिले आहे. ग्रामीण भागात दैववाद, परंपरावादी वश्ती, अज्ञान, अंधश्रद्धा, निरक्षरता, यामुळेसुद्धा लोकसंख्या वाढ झपाट्याने होत राहीली, वाढत्या लोकसंख्येला हाताला काम मिळणे महत्त्वाचे असते परंतु ग्रामीण भागामध्ये शेतीशिवाय इतर दुसरा उद्योग नाही. त्यामुळे अनेक लोक बेकार झालेले दिसतात.

3. व्यसनाधीनता– ग्रामीण भागामध्ये आज मोठ्या प्रमाणामध्ये व्यसनाधीनता आढळून येत आहे. वाईट बाबीचे अनुकरण करून दारू, बीडी,सिगारेट,जुगार यासारख्या व्यसनामध्ये वाढ होताना दिसून येते. अज्ञान हे व्यसनाधीनचे मुख्य कारण मानले जाते. व्यसनीप्रवर्ती वाढल्यामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या खर्चात वाढ होताना दिसते, यातून बेफिकीर वस्ती निर्माण होऊन अधिकच व्यसनाधिनता वाढायला लागते. याचा परिणाम विकासावर होताना दिसतो. ग्रामीण भागाचा विकास न होण्याचे कारण किंवा एक समस्या व्यसनाधिनता हे सांगता येईल

4. कर्जबाजारीपणा – ग्रामीण विकासाला सर्वात महत्वाचा अडथळा ठरणारा घटक म्हणजे कर्जबाजारीपणा होय. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणामध्ये कर्ज काढून सण–उत्सव, लग्न समारंभ, तेरवी, यासारखे कार्यक्रम साजरे करताना दिसून येतात. यातून लोक कर्जबाजारी होऊन या समस्येमध्ये अडकतात. शेती हेच एकमेव उत्पादनाचे साधन असल्यामुळे तिच्या उत्पादनाची निश्चितता असत नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये कर्ज फेडण्यास विलंब लागतो. सततच्या कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांच्या मध्ये होणाऱ्या आत्महत्यांचे प्रमाण वाढलेले आपणास दिसते. याचे कारण कर्जबाजारीपणा सांगता येईल.

5. मानवी संसाधनाचा निकृष्ट दजा – कोणत्याही भागाचा विकास हा त्या क्षेत्रात राहणाऱ्या मानवी संसाधनांचा योग्य वापर यावर अवलंबून असतो. मानवी गुणवत्ता शिक्षण आणि आरोग्य आणि कौशल्य या आधारावर मोजली जाते. भारतीय ग्रामीण विकासात मानवी गुणवत्ता किंवा साधन संपत्तीचा दर्जा निकृष्ट मानला जातो. मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागात असणारे कुपोषण,जीवनसत्त्वांचा अभाव, आरोग्य निरक्षरता, अज्ञान, अंधश्रद्धा, जुनाट रूढी, परंपरा, लिंगभेद विषमता, प्रतिगामी वस्ती, याबरोबरच पुरेसे व्यवसायिक किंवा कौशल्य शिक्षणाचा अभाव यामुळे विकास प्रक्रिया हे काही अंषी संथ व अडचणी बनलेली दिसून येते.

6 विकासातील विषमता – विकास हा समतोल व सर्वांगीण होणे आवश्यक असते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर मोठ्या प्रमाणामध्ये तत्कालीन गरज म्हणून औद्योगिक करण्यास प्राधान्य देऊन शहरी भागात विकास साधण्यात येऊ लागला. परंतु ग्रामीण भागाकडे म्हणावे तसे लक्ष देण्यास शासन अपुरे पडले. यातून शहरी व ग्रामीण असा फरक मोठ्या प्रमाणात पडला. मागास प्रभाग अधिकच मागास राहिलेले आपणास दिसतो. याउलट प्रगत भाग अधिक प्रगत आणि प्रगत लोक अधिक प्रगती करताना दिसून येतात. उदाहरणार्थ महाराष्ट्रातील विभागवार पाहिले तर पश्चिम महाराष्ट्रचा झालेला औद्योगिक व शेती, सहकार यांचा घडून आलेला विकास या तुलनेत मराठवाडा व विदर्भामध्ये म्हणावा तेवढा विकास झालेला दिसत नाही. हीच खरी विकासातील विषमता आहे. हाच विषमता वाद आहे. असेच आपणास दिसून येते.

सारांश – ग्रामीण विकासाचा संबंध ग्रामीण क्षेत्राच्या विकासासाठी विकासाशी आहे. ग्रामीण विकासात सांस्कृतिक विकास, शिक्षण,आरोग्य, सामाजिक गरजा व सुविधांचा विकास घडवून आणण्याच्या प्रक्रियेचा समावेश होतो. भारताच्या विकासात ग्रामीण विकासाची भूमिका राहिली आहे. शेतीविकास, ग्रामीण औद्योगिक विकास, ग्रामीण सामाजिक समस्या दूर करून नागरी व ग्रामीण भागातील विषमता दूर करणे,ग्रामीण विकासात दारिद्रय दुरुकरून,रोजगाराची निर्मिती करणे मानव संसाधनाचा विकास घडवून आणण्यासाठी त्यादृष्टीने स्वयंरोजगार निर्माण करून, विभागीय असमतोल दूर करणे, यासाठी ग्रामीण विकासाच्या समस्या दूर करून ग्रामीण विकास साध्य केला जाऊ शकेल असे म्हणता येत.

संदर्भसूची

1. *डॉ.आवस्थी ए.पी. दृ विकास प्रशासन दृलक्ष्मी नारायण अग्रवाल,आग्रा २००७.पृष्ठ –१२८*
2. *World bank : Rural Development sector Policy paper]May 1975 च.दव.03*
3. *डॉ.पंत डी.सी. भारत मे ग्रामीण विकास ,कॉलेज बुक डेपो,जयपूर,2009–पृष्ठ 12.*
4. *भारतातील ग्रामीण विकास संपादक डॉ. अर्चना कांबळे (जगतकर), समाजशास्त्र विभागप्रमुख,न्यु कॉलेज,कोल्हापूर. प्रकाशक कुलसचिव , शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–२०१७.*
5. *संशोधक प्रा.सुरेश शंकर मुळूक ,जिल्हा परिषदे मार्फत राबवण्यात येणाऱ्या ग्रामीण विकास योजनांचे मूल्यमापन (२००२–२०१२) विशेष संदर्भ पुणे व सातारा जिल्हा. अप्रकाशित शोध प्रबंध,टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ,पुणे.*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

महिला सबलीकरण कार्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान

कुणाल दिलीप राठोड
राज्यशास्त्र विभाग

★★★

प्रास्ताविक – परमपूज्य, विश्वरत्न, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रिल 1891 रोजी रत्नागिरी जिल्ह्यात आंबेवडे येथे एका दलित कुटुंबात झाला. त्यांचे वडील रामजी सकपाळ हे सैन्यात होते. त्यांची आई भिमाबाई या बाबासाहेबांच्या लहानपणीच दिवंगत झाल्या होत्या. डॉ. बाबासाहेबांना दलितांच्या उन्नतीची आणि समाज सुधारणेची प्रेरणा त्यांच्या वडिलांकडून मिळाली. आंबेडकरांना घरातल्या वातावरणामुळे शिक्षणाची संधी मिळाली परंतु विशम समाजरचनेचे चटके त्यांना सहन करावे लागले.

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली येथे प्राथमिक व सातार्‌याच्या सरकारी शाळेत त्यांचे माध्यमिक शिक्षण झाले. शैक्षणिक कालखंडात अनेक अवमानकारक प्रसंगांना त्यांना तोंड द्यावे लागले. जन्म अनिष्ट विषमतेवर आधारित समाज व्यवस्थेबद्दल त्यांच्या मनात चीड निर्माण झाली आणि हीच सामाजिक विषमता त्यांच्या समाज सुधारणेच्या कार्यात प्रेरणादायी ठरली असे म्हटल्यास काही वावगे ठरणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पहिले भारतीय होते ज्यांनी महिलांच्या प्रगतीच्या मार्गातील अडथळे दूर केले. त्यांनी हिंदूंसाठी आणि भारतीय समाजातील इतर घटकांकरिता समान नागरी कायद्याचे संहितीकरण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्यांचे म्हणणे होते की स्त्रियांचा सर्वांगीण विकास होणे महत्त्वाचे आहे व स्त्रियांना सामाजिक शिक्षण दिले पाहिजे.डॉ. आंबेडकरांचा नेहमीच महिलांच्या चळवळीला पाठिंबा होता आणि त्यांचा असा विश्वास होता की समाजाच्या सर्व स्तरांतून महिलांचा सहभाग लाभल्यास त्या सामाजिक सुधारणांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात.

शोधनिबंधाची उद्दिष्टे –१) महिला सबलीकरण कार्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अभ्यासणे .२) महिला सबलीकरणाचे महत्व समाजातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविणे. ३) जास्तीत जास्त महिला सबलीकरण समाजात व्हावे यासाठी जनतेला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करणे.

संशोधन पद्धती – प्रस्तुत शोध अध्ययनासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करून तर त्याचे संकलन करण्यात आलेले आहे. अध्ययन विषयाशी संबंधित दुय्यम तथ्य संकलित करण्यासाठी प्रकाशित ,अप्रकाशित असलेले शोध अध्ययन संदर्भ ग्रंथे, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे, संशोधन पत्रिका इत्यादी दुय्यम स्त्रोत्रा च्या माध्यमातून संकलित करण्यात आलेले आहे.

आशय विश्लेषण – डॉ. बाबासाहेबांचा स्त्री–पुरुश समानतेचा आग्रह होता. स्त्री पुरुष समानता प्रस्थापित होण्यासाठी स्त्री शिक्षणाचा मार्ग त्यांनी सांगितला. त्यांचे स्त्री शिक्षणा बद्दल चे विचार हे त्यांनी शिक्षण घेत असताना लिहिलेल्या प्रबंधातून व त्यांनी केलेल्या पत्रव्यवहारातून दिसते. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाची एम.ए. ची पदवी संपादन करताना डॉ. आंबेडकर यांनी दोन प्रबंध वाचले त्यातील पहिला प्रबंध "प्राचीन भारतातील व्यापार" तर दुसरा होता प्राचार्य गोल्डनवेझर यांच्या वाद–कथा सभेत वाचलेला "भारतीय जातीसंस्था, तिची उत्पत्ती आणि वाढ" यात त्यांनी म्हटले आहे की मनू हा स्त्री द्वेष्टा होता, स्त्री जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन संकुचित असल्यामुळे मनुस्मृती मधील स्त्रियां बद्दल चे विचार हिंदू स्त्रीच्या अवनतीस कारणीभूत ठरला. ह्या प्रबंधावरून डॉ. आंबेडकर यांच्या मनाचा कल कळून येतो. याच काळात अमेरिकेत अध्ययन करीत असताना त्यांनी वडिलांच्या मित्राला लिहिलेल्या पत्रात एक महत्त्वाचा मुद्दा मांडला तो म्हणजे, "आईबाप मुलांना जन्म देतात, कर्म देत नाहीत हे म्हणणे ठीक नाही. आईबाप मुलांच्या आयुष्याला वळण लावू शकतात ही गोष्ट आपल्या लोकांच्या मनावर बिंबवून जर आपण मुलाच्या शिक्षणाबरोबरच मुलींच्याही शिक्षणासाठी धडपड केली तर आपल्या समाजाची प्रगती झपाट्याने होईल." या खोल विचारात त्यांच्या भावी कार्याचे बीज आहे.

अमेरिकेतील शिक्षण पूर्ण झाल्यावर आपले विचार प्रत्यक्षात उतरवण्यासाठी डॉ.आंबेडकर यांनी आपली चळवळ 1920 मध्ये सुरू केली ते म्हणाले, "आम्हाला लवकरच चांगले दिवस दिसतील, जर पुरुश शिक्षणाबरोबरच स्त्रीयांच्या शिक्षणाची बाजू घेतल्यास या कार्यास गती येईल." त्यांनी हिंदु सामाजिक व्यवस्थेविरोधात प्रचार करण्यासाठी 1920 मध्ये 'मूकनायक' व 1927 मध्ये 'बहिष्कृत भारत' नावाचे पाक्षिक सुरु केले. त्यांच्या मुद्दांमधून त्यांनी लैंगिक समानता, स्त्री शिक्षणावर जोर दिला व त्यांच्या समस्या उघडकीस आणल्या डॉ. आंबेडकर यांची महिलांच्या प्रश्नाविषयी धारणा शिक्षणाच्या अधिकारावर पुरुषांप्रमाणे समान वागणूक, मालमत्तेचा हक्क आणि राजकीय प्रक्रियेत सहभाग हा सध्याच्या काळातील सुद्धा स्त्रीवादयांच्या मागणीप्रमाणे आहे.त्यांच्या या कार्यात पत्नी रमाबाई यांनी सुद्धा सहभाग घेतला. डॉ. आंबेडकर यांनी पत्नी रमाबाई समवेत जानेवारी 1928 मध्ये 'विमेन्स असोसिषन' या संघटनेची मुंबई मध्ये स्थापना केली. याच प्रमाणे महिलांनी सुद्धा उस्फूर्तपणे त्यांच्या या कार्यात सहभाग घेतला. 1931 मधील नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेष सत्याग्रहात पाचशे महिला उपस्थित होत्या आणि त्यापैकी पुष्कळ महिलांना

पुरुषांसह अटक करून त्यांना तुरुंगात ठेवण्यात आले. डॉ. आंबेडकर यांच्या प्रोत्साहनाने 1931 मध्ये राधाबाई वडाळे या पत्रकार परिषदेत म्हणाल्या, "अपमानाने जीवन जगण्यापेक्षा शंभर वेळा मरणे बरे. आपण आपल्या जीवाचे बलिदान देऊनही हक्क मिळवा." महिलांच्या या आत्मसन्मानाचे व दृढ निश्चय याचे श्रेय आंबेडकरांना जाते. डॉ. आंबेडकरांनी महिलांच्या सामर्थ्यावर आणि समाज सुधारण्याचा प्रक्रियेत त्यांच्या भूमिकेवर विश्वास ठेवला व आपले कार्य करीत राहिले. महाड येथील ऐतिहासिक सत्याग्रहा मध्ये पुरुशांसह तीनशे महिलांचा सहभाग होत्या. सुमारे तीन हजार महिलांच्या दुसऱ्या बैठकीस संबोधित करताना ते म्हणाले, "मी समाजाची प्रगती मोजण्यासाठी त्या समाजातील महिलांची प्रगती पाहतो. ज्या मुलीने लग्न केले आहे त्या मुलीने तिच्या पतीच्या बाजूने मित्राप्रमाणे उभे राहिले पाहिजे. तसेच त्याचा गुलाम होण्यास नकार दिला पाहिजे. मला खात्री आहे की आपण या असल्याचे अनुसरण केल्यास तुम्ही स्वतःप्रत सन्मान व गौरव प्राप्त कराल."

स्त्रियांना समाजात समान दर्जा आणि चांगली वागणूक मिळाली पाहिजे. स्त्रीशिक्षणामुळे कुटुंब सुधारते, घरातील स्त्रीच जर आडाणी असेल तर कुटुंबाची उन्नती होत नाही. म्हणून स्त्रियांचा जीवनमान सुधारण्यासाठी आणि कुटुंबाला नैतिक वळण लावण्यासाठी स्त्रियांना शिक्षण देणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. तत्कालीन समाजात स्त्रियांचे कार्यक्षेत्र फक्त घरा पुरतेच मर्यादित होते त्यामुळे त्यांच्या बौद्धिकतेला आणि गुणवत्तेला अजिबात वाव मिळाला नाही. स्त्रियांमध्ये चौफेर जागृती निर्माण करण्यासाठी त्यांना शिक्षित करणे अत्यंत आवश्यक आहे. जो पर्यंत महिलांचा विकास होणार नाही महिला सबलीकरण होणार नाही तोपर्यंत राष्ट्राचा विकास होणार नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. हे विचार त्यांनी प्रत्यक्षात उतरवले. डॉ. आंबेडकर यांनी 1942 मध्ये मुंबई विधानसभेत महिलांसाठी कुटुंब नियोजन करण्याच्या उपायासाठी जोरदार प्रयत्न केले. गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी परिषदेत कामगार मंत्री असताना त्यांनी पगारी मातृत्व रजेची योजना अमलात आणली व तसेच हिंदू कोड बिल संसदेत सादर केले आणि महिलांच्या मालमत्तेच्या हक्काच्या मुद्द्यावर प्रकाश टाकला. या विधेयकाला बर्याच राजकीय नेत्यांनी विरोध केला त्यामुळे डॉ.आंबेडकरांनी मंत्रिमंडळातून राजीनामा दिला. नंतर हिंदू कोड बिलाचे चार विधेयकामध्ये विभाजन करण्यात आले, 1) हिंदू विवाह कायदा –1955 2) हिंदू वारसा हक्क कायदा –1956 3) हिंदू अल्पसंख्यांक व पालकत्व कायदा –1956 4) हिंदू दत्तक व देखभाल कायदा –1956 हे चार कायद्यात डॉ. आंबेडकरानी तयार केलेल्या हिंदू कोड विधेयकातील कल्पना व तत्त्वांचा समावेश होता. आंबेडकरांनी बालविवाहास पूर्ण विरोध केला होता. स्त्रियांनी उत्तम कपडे ,दागिने यासाठी हट्ट न धरता स्वच्छ व ताप टीपीने राहावे. गुणवत्तेवर चारित्र्यावर भर द्यावा. मुला–मुलींवर चांगले संस्कार करावे असा त्यांनी स्त्रियांना उपदेश केला. 'पाकिस्तान व भारताची फाळणी' या त्यांच्या प्रसिद्ध पुस्तकात त्यांनी मुस्लिम महिला आणि त्यांच्या धार्मिक परंपरा जसे बुरखा पद्धत, विवाह इत्यादी परंपरांचा विरोध केला मुस्लिम महिलांवर दडपशाही केलेल्या विविध धार्मिक परंपरा त्यांच्यावर लादण्यात आल्या स्त्रियांची जात, धर्म कोणताही असो डॉक्टर आंबेडकर यांनी सर्व प्रकारच्या अन्याया विरुद्ध वारंवार आवाज उठवला.

6 डिसेंबर 1956 रोजी सकाळी आपले परम वंदनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या सर्वांची सोबत सोडून गेले. डॉ. आंबेडकर यांच्या निधनानंतर संसदेत शोक प्रकट करताना नेहरू म्हणाले, "डॉ.बाबासाहेब आंबेडकर हिंदू समाजाच्या सर्व अत्याचारी गोष्टींच्या विरुद्ध बंडाची प्रतीक म्हणून जास्त आठवले जातील." डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व स्तरातील महिलांच्या जीवनाविषयी मते मांडली त्यांनी सांगितले की महिलांना समान वागणूक व प्रतिष्ठा दिली पाहिजे हिंदू कोड बिल यावर त्यांनी मूलभूत सुधारणा सुचवण्यावर भर दिला व दुरुस्ती करून त्यांनी हे विधेयक मंजूर करून घेण्यासाठी सर्व संसद सदस्यांना आवाहन केले. अखेरीस त्यांना राजीनामा दिला. त्यांचे विचार फक्त स्त्रियांसाठीच नाहीत तर सर्व भारतीयांच्या सर्वांगीण विकासासाठी आहे हे त्यांच्या प्रत्येक वाक्यातून आणि शब्दातून व्यक्त होते.

संदर्भ

1) *गायकवाड डॉ.ज्ञानराज (2013)– 'महामानव'– रिया पब्लिकेशन,कोल्हापूर.*

2) *कीर धनंजय (1980)– 'विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर' रघुवंशी प्रकाशन ,मुंबई.*

3) *Dr-M-R- Singaria Dr BR Ambedkar and women empowerment in India*& Quest journal-*

4) *Dr- Karnika Dubey ¼2020½& ^B-R- Ambedkar and women empowerment & Palarchs Journal of Archeology of Egypt- "efgyk lcyhdj.k dk;kZr M,- ckcklkgsc vkacsMdjkaps ;ksxnku"*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

भारतीय राजकारणात आदिवासी महिलांचा सहभाग

प्रा. रिता पी. खोब्रागडे
कार्यकारी प्राचार्य
गृहअर्थशास्त्र दृ विभाग प्रमुख
एस चंद्रा महिला महाविद्यालय, सडक अर्जुनी जि. गोंदिया

★★★

प्रस्तावना - आदिवासी समाजाचा अतीप्राचीन मूळ भारतीय समाज आहे. एकेकाळी भारतीय वनसंपत्तीचा मालक असणारा समाज इंग्रजांच्या आर्थिक शोषणामुळे आर्थिक दृष्ट्या दुर्बल बनत गेला. आदिवासी म्हणजे अधिक काळापासून वास्तव्य असणाऱ्या समूह हे आदिवासी समाजाला निसर्ग पूजक आहे. त्यांच्या दैनंदिन जीवनाचे इतर समाजाशी काही देणे घेणे नसते त्यांचे देव भाषा आणि चालीरीती अन्य ग्रामीण शहरी लोकांपेक्षा भिन्न असतात. जंगलात राहणारे काही आदिवासी तेथील उत्पादन या शहरात आणून देतात. भारतीय राज्यघटनेत अशा आदिवासींचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये केला आहे. समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाङ्गी त्यांना नोकरी व्यवसाय निवडणुकात उमेदवार म्हणून त्यांच्यासाङ्गी खास जागा ङ्ग्वेण्यात आलेल्या आहेत. भारतात ९ ऑगस्ट हा दिवस दरवर्षी आदिवासी दिवस म्हणून साजरा केला जातो. जगातील सर्वच देशांमध्ये आदिवासी जमाती आहेत विविध देशांमध्ये त्यांना वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते. उदा. अमेरिकेत रेड इंडियन्स ऑस्ट्रेलियात इम्बोरेजींस आणि युरोप खंडातील देशांमध्ये जिप्सी या नावाने संबोधले जाते. आफ्रिकेत आदिवासींच्या समूहाला ज्तपइसम असेही म्हणतात. ज्तपइसम म्हणजे 'जमात' संबोधले जाते. आजही आफ्रिका ,आशिया आणि अमेरिका खंडातील देशामध्ये मोङ्ग्या प्रमाणात अदिवासी जमाती आहे. संख्यात्मक दृष्ट्या सर्वात जास्त आदिवासी जमाती आफ्रिका खंडानंतर केवळ भारतातच आहेत. भारतीय संघराज्यात २९ घटक राज्य आणि सर्व केंद्रशासित प्रदेशात आदिवासी जमाती आहे. त्यांची नावे, बोलीभाषा, पोशाख पद्धती, नृत्यांचे प्रकार , आर्थिक क्रिया आणि आदी बाबतीत विविधता आहे . भारतात मोङ्ग्या व लहान आकाराच्या ५७० पेक्षाही जास्त जमाती आहेत.

आदिवासी मध्ये मूलनिवासी आदिवासी हा शब्द 'आदी' आणि 'वासी' या दोन शब्दापासून बनलेला आहे. याचा अर्थ मूळ निवासी असा होतो. डॉक्टर धुर्वे यांनी आदिवासी मागासलेले हिंदू असे संबोधले आहे. तर महात्मा गांधी यांनी आदिवासींना गिरीजन असे संबोधले आहे.

डॉ. धुर्वे यांनी आदिवासींना मागासलेले हिंदू म्हटले असले तरीही आदिवासी मात्र मागासलेले हिंदू नाहीत त्यांचा स्वातंत्र्य धर्म आहे रितीरिवाज आहेत. त्यांच्या देवता वेगळ्या आहेत त्यांचा समाज पद्धत वेगळी आहे त्यामुळे आदिवासींना मागासलेले हिंदू म्हणणे चुकीचे आहे.आदिवासी हि काही जमात नाही. ते मात्र मुळचे भारताचे रहिवासी आहेत.

आदिवासी महिला- भारतीय स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा करताना आदिवासी स्त्रियांचे प्रश्न सातत्याने दुर्लक्षित राहिले आहे. आजही आदिम अवस्थेत जगणाऱ्या आदिवासी स्त्रिया मुक्त असतात स्वतंत्रपणे जगतात म्हणून त्यांचे काहीच प्रश्न नाही असे प्रस्थापित समाजाची धारणा असते. मातृसत्ताक व्यवस्थेच्या पाईक असलेल्या आदिवासी स्त्रिया आजमात्र विपन्न अवस्थेत जगताना दिसतात आदिवासी जमाती जगाच्या वेगवेगळ्या कानाकोपऱ्यात विभागले गेले आहेत. त्यामुळे या जमातींमध्ये संघटनात्मक ऐक्य होत नाही फक्त महाराष्ट्रातील आदिवासी जमातींच्या विचार केला तर त्या त्या भागातील भौगोलिक राजकीय आणि सामाजिक परिस्थितीनुसार आदिवासींचे प्रश्न बदलत गेले आहे. सद्यस्थितीत आदिवासी स्त्री जगण्याच्या जीवघेण्या संघर्षात भरडून निघालेल्या आहे. तिचे जगणे असंख्य विरोधाभासाने भरलेले आहे. आजही आदिवासी जमातींमध्ये मातृसत्ताक व्यवस्थेचा प्रभाव जाणवतो. ब्रिटिश काळापासून आदिवासी जमाती प्रस्थापितांच्या संपर्कात येऊ लागल्यामुळे पितृप्रधान तिकडे वळू लागल्या. धर्म, जात व्यवस्थेतून निर्माण झालेल्या प्रश्नांपासून या स्त्रिया काही प्रमाणात दूर असल्या तरी त्यांचा प्रवास कोणत्या दिशेने सुद्ध झाला आहे. वसाहत काळापासूनच आदिवासींचे धर्मांतर करून घेण्याची प्रक्रिया सुद्ध झाली. आज आदिवासीचे हिंदुकरण करण्याची प्रक्रिया गतिशील आहे यात आदिवासी स्त्रियांचे प्रश्न अधिक बिकट बनत चाललेले आहे.

आदिवासी समाजात गोटूल प्रथा अस्तित्वात आहे. या प्रति विषय प्रस्थापित समाजाचे अनेक समज आणि गैरसमज आहेत. गोटुल मध्ये स्त्रियांना साथीदार निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. खरे म्हणजे लैंगिक स्वातंत्र्यापासून जमिनीवरच्या अधिकाऱ्यापर्यंत कधी कधी आदिवासी स्त्री स्वतंत्र होती पण जल, जमीन आणि जंगल आमच्या प्रस्थापित आक्रमणामुळे ती हतबल झालेली दिसते. आदिवासीच्या संपन्न लोकसंस्कृतीच्या दाखला दिला जातो. वाहरू सोनवणे सारखे आदिवासी कार्यकर्ते हे अभिमानाने सांगतात की, आदिवासी मुलांसाठी स्त्रियांचे बळी घेत नाहीत, पुरुषी अत्याचाराला बळी पडून आमच्याकडे आत्महत्या करीत नाहीत, आदिवासींमध्ये आजही तेच प्रथा अस्तित्वात आहे मुलाच्या कुटुंबाला वधूमूल्य द्यावे लागते लग्न झाल्यानंतर पुरूष स्त्रीयांकडे येऊन राहतात पण या नैसर्गिक जगण्याला आणि आदिवासींच्या आदिम लोकसंस्कृतीला बाहेर संपर्कामुळे आणि अंतर्गत कारणांमुळे धोका निर्माण झाला आहे. या लोकसंस्कृतीच्या अंतर्गत अमानुष रूढी परंपरा श्रद्धा-अंधश्रद्धा जोपासल्या गेल्या आहेत याचा पहिला बळी

आदिवासी स्त्रीचा आहे.आज धर्म आणि जात उतरंडीच्या सगळ्यात खालच्या स्थानावर आदिवासीचा आहे. आदिम संस्कृतीचे गोडवे गाताना या वास्तवाकडे दुर्लक्ष केले तर आदिवासी स्त्री ही आर्ट गॅलरीत भारतीय सौंदर्याचा नमुना म्हणून लटकलेली दिसते पण प्रत्यक्षात मात्र तिच्या मुलाबाळांसह उपोषणाला बळी ठरलेली असते.कधीकाळी लैंगिक दृष्ट्या मुक्त असलेली आदिवासी स्त्री आज लैंगिक अत्याचाराचे बळी ठरत आहे. हा बाईच्या विनाशाचा प्रवास नाही का, आदिम अवस्थेपासून झालेली माणसाची उत्क्रांती धर्म आणि जात वास्तव विभागली गेली तसा बाईचा प्रवास अधिक बिकट झाला. जंगलात राहणारे आणि आदिम मातृसत्ताक संस्कृतीचे प्रतीक समजले जाणारे आदिवासी स्त्री देखील या शोषणापासून दूर होऊ शकली नाही. चंद्रपूर-गडचिरोली भागातील आदिवासी स्त्री नक्षलवाद्यांच्या लैंगिक अत्याचारांना बळी पडताना दिसतात, तर दुसरीकडे पोलिस अधिकारी देखील स्त्रियांची विटंबना करत या सगळ्या विटंबनेच्या इतिहासात आदिवासींना मुख्य धारेत आना? म्हणजे नेमके काय करा? हा प्रश्न सुटत नाही. आदिवासी स्त्री पुरुषांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांची आर्थिक सांस्कृतिक आणि राजकीय लूटमार कह्न त्यांना देशोधडीला लावण्याचे उद्योग सध्या सुह्न आहे. आदिवासींनी स्त्रीच्या दर्जाबद्दल परस्पर विरोधी मते मांडली जातात आदिवासी स्त्री ही गुलाम असते. मूल्य देऊन तिला विकत घेण्यात येते व तिच्याशी पाशवी वर्तन करण्यात येते असा एक दृष्टिकोन आहे. मातृसत्ताक आदिवासी जमाती फार कमी आहे ऑस्ट्रेलियातील व आफ्रिकेतील काही जमाती भारतातील खासी जमात उत्तर अमेरिकेतील या जमाती मातृसत्ताक आहे. ब्रिटिश कोलंबिया सत्ता मातृप्रधान दिसत असली तरी प्रत्यक्ष व्यवहारात स्त्रीच्या भावाकडे सत्ता असते व लग्नानंतर पतीकडे जाते. आदिवासी जमातीत मात्र मालमत्ता आईकडून मुलीकडे जाते जोवर विवाहित मुलगी नवीन निवास स्थान निर्माण करीत नाही तोवर तिचा भाऊ तिचा पती मालमत्तेची व्यवस्था पाहतो.

आर्थिक दृष्ट्या पाहता वधूमूल्य देणाऱ्या जमातीत आदिवासी स्त्रीचा दर्जा निश्चित मानला जात नाही, असे गृहीत धरावे लागते. शेतीप्रधान पशुपालक समाजात स्त्रीचा दर्जा खालावलेला असतो, असे राबर्ट लोईने म्हटले आहे. सर्वसाधारणत: आदिवासी स्त्रीस चांगली वागणूक मिळते. स्त्री जरी नेहमी कामात असली, तरी तिच्या जबाबदार्यास पुरुषांच्या मानाने कमी असतात. आदिवासी जमातीत स्त्रीच्या मासिक विटाळाबद्दल घृणा असते. त्यांना त्या काळात वेगळे ठेवण्यात येते व त्यामुळेच त्यांना धार्मिक जीवनात महत्त्वाचे स्थान दिले जात नाही. मात्र आदिवासी स्त्रियांना प्रगत समाजातील स्त्रियांच्या तुलनेत अधिक लैंगिक स्वातंत्र्य असते. एकंदरीत बघितले गेले तर आदिवासी स्त्रियांच्या नेतृत्व हे पुरुषच करत असतात म्हणून आजही पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रीला दुय्यम स्थान मिळालेले आहे आणि आजही आदिवासी स्त्री यांचा हा राजकारणातील दर्जा त्याचप्रमाणे निर्णय स्वरूपाचा आहे आजही आपण पाहतो आहे की, राजकारणामध्ये आदिवासी स्त्रियांचा सहभाग हा फारच कमी प्रमाणात असतो. राज्यघटनेच्या तरतुदीनुसार ३३: जरी महिलांना राजकारणात आरक्षण असेल तरीही पाहिजे त्या प्रमाणात आदिवासी महिला ह्या स्वत:चे निर्णय स्वत: घेत नाहीत तर त्यांचे सगळे निर्णय हे पुरुष घेत असतात. स्थानिक पातळीवरच्या राजकारणामध्ये महिला फक्त नाममात्र पदावर असतात आणि संपूर्ण सत्ताही आदिवासी समाजातील पुरुष सांभाळत असतात आणि अजूनही आदिवासी महिलांना राजकारणामध्ये पाहिजे त्या प्रमाणात सहभाग मिळालेला आपल्याला दिसून येत नाही.

भारतीय राज्यघटनेतील आदिवासींच्या संविधानातील तरतुदीह्न - आदिवासी समाजाचा मागासलेपणा लक्षात घेऊन भारतीय राज्यघटनेमध्ये आदिवासीचे हितसंबंध जपण्यासाह्नी त्यांना पुरेसे संरक्षण देण्यासाह्नी आणि त्यांचे भौतिक जीवनमान उंचावण्यासाह्नी भारतीय संविधानात विशिष्ट तरतुदी करण्यात आल्या आहेत. भारतीय राज्यघटनेतील १९(५), ४६, १६४, पाचव्या अनुसूची सह २४४, २७५, ३३०, ३४३, ३३५, ३३९, ३४०, ३३६(२५) या कलमानुसार काही विशेष तरतुदी करण्यात आले आहे.

(१) धर्म वंश जात लिंग भेद जन्म ह्निकाण यावह्न त्यांच्याविरुद्ध पक्षपात केला जाऊ नये अथवा त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला जाऊ नये यासाह्नी प्रतिबंधक अशी कायद्याची तरतूद करण्यात आली आहे पक्षपात अथवा वेदना झाल्या तर असे वर्तन दंडनीय गुन्हा ह्नरवला जातो.

(२) आदिवासींची प्रगती व्हावी या दृष्टीने शासकीय व निमशासकीय उद्योग महामंडळे इत्यादी ह्निकाणी आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव पद्धतीने भरती करण्याची तरतूद करण्यात आली आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग, प्रादेशिक लोकसेवा आयोग, निवड मंडळामार्फत भरल्या जाणाऱ्या जागांपैकी अनुसूचित जमाती पैकी ७५ टक्यांलो पर्यंत जागा राखीव ह्नेवण्यात आल्या आहेत. काही ह्निकाणी लोकसंख्येनुसार जास्त जागा राखीव आहे शैक्षणिक संस्थांमधील विविध अभ्यासक्रमांसाह्नी लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव कोटा पद्धतीने प्रवेश विनाशुल्क व अल्प शुल्क घेऊन वस्तीगृह सुविधा शिष्यवृत्ती अर्थसहाय्य स्वह्नपातील मदतीचा हात दिला जातो.

(३) संसद, विधिमंडळे, महानगरपालिका, नगर परिषदा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या इत्यादी लोकप्रतिनिधी संस्थांमध्ये त्यांचे प्रतिनिधी लोकसंख्येच्या प्रमाणात असावे याची हमी देण्याच्या दृष्टीने त्यांच्यासाह्नी जागा राखून ठेवले आहे. १९७४ च्या अहवालानुसार भारतीय लोकसभेची जागा आदिवासींसाठी राखून ठेवले आहे. त्याचबरोबर विविध राज्यातील विधानसभेत एकूण ३७७१ जागांपैकी ३२१ जागा आदिवासीं करिता सुरक्षित आहेत. महाराष्ट्र विधानसभेचे आदिवासी प्रतिनिधींच्या संख्या१६ आहे.

(४) जंगल व जमिनी विषयी हक्क सुरक्षित राहावे या दृष्टीने आवश्यक ते कायदे करण्याची जबाबदारी केंद्र व राज्य सरकारवर टाकलेली आहे जमीन हा विषय सरकारच्या अखत्यारीत येत असल्यामुळे आदिवासींच्या जमिनी हस्तांतरित प्रतिबंध करणारे तसेच त्यांच्या हातून गेलेल्या जमिनी

परत मिळाव्यात या दृष्टीने योग्य तरतूद असलेले कायदे व राज्य सरकारांनी करावयाचे होते तसेच आदिवासी लोकसंख्या असलेल्या सर्व राज्यांनी केले आहे.

५) आदिवासींच्या परंपरा त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण संस्था व त्यांची संस्कृती यांच्यावर प्रामाणिक आघात केला जाऊ नये किंबहुना त्यांच्यापैकी मुलभूत मानवी हक्क व स्वातंत्र्य सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था यांच्यात आढळून येणार्या अशा संस्था व सांस्कृतिक वैशिष्ट्ये यांची जपणूक व संवर्धन करण्याची भूमिका अंगीकारणे या दृष्टीने आदिवासी लोकसंख्या असलेल्या राज्यांनी सल्लागार मंडळाची नेमणूक करणे बंधनकारक केले आहे.

६) राज्यघटनेच्या चौथ्या भागातील १६४ या कलमान्वये आदिवासींची अधिक वस्ती असलेल्या भागात आदिवासीच्या कल्याणासाङ्गी व विकासासाङ्गी एक स्वतंत्र आदिवासी मंत्री नियुक्त करण्याची तरतूद आहे.

राजकारणामध्ये आदिवासी महिलांचा सहभाग - भारतीय घटना समितीने शिक्षण व नोकरी या क्षेत्रात आदिवासी म्हणजेच अनुसूचित जमाती यांच्यासाठी स्पष्ट स्वरूपाच्या तरतुदी भारतीय संविधानात केले. मंडल आयोगाने भारतीय संविधानाचे अन्य मागासवर्गीयांच्या आरक्षणाला अधिक स्पष्ट स्वरूप प्राप्त करून दिले. अनुसूचित जाती व आदिवासींसाठी राखीव मतदारसंघ निर्माण करण्याची तरतूद करून त्यांना राजकीय क्षेत्रात प्रतिनिधित्व देण्याची तरतूद संविधानात करण्यात आली. भारतीय समाजात अनुसूचित जमाती आदिवासी स्त्रिया देखील दुर्बल घटक आहे परंपरेमुळे पुरुषांच्या वर्चस्व स्त्रिया भरून निघाले आहे. स्वातंत्र्य प्राप्त झाले त्या काळात मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण फारच कमी होते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून स्त्री शिक्षणाबाबत समाजसुधारकांचे प्रयत्न आणि भारत सरकारचे प्रयत्न व इतर धोरण यामुळे स्त्री शिक्षणाचे प्रमाण बरेच वाढले. शिक्षणाची सर्व क्षेत्रे उदा. मेडिकल, इंजिनियर, लष्कर इत्यादी स्त्रियांसाठी खुली झाली यामुळे सर्व क्षेत्रात पुरुषांप्रमाणे स्त्रियांनीही नोकरी व्यवसाय करू लागले आहेत, परंतु राजकीय क्षेत्रात प्रतिनिधित्व बाबत मात्र स्त्रियांची स्थिती अत्यंत खालावलेली आहे. स्तरावरून निवडून येणार्या स्त्रीयांची संख्या पुरुषांच्या तुलनेत फारच कमी असते.

स्त्रियांचे प्रतिनिधित्व वाढावे यासाठी १९९२ मध्ये ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका, पंचायत समिती व जिल्हा परिषद या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांसाठी ३३: जागा आरक्षित करण्यात आले आहे. महाराष्ट्र व अन्य काही राज्य घटक राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांना ५०: आरक्षण मिळावे यासाठी विधी नियम केले आहेत. घटक राज्यांच्या विधानसभा आणि लोकसभेत महिलांसाठी किमान ३३: जागा आरक्षित असाव्यात या आशयाचे महिला आरक्षण विधेयक मंजूर झाले नाही कारण त्याबाबत राजकीय पक्षांची मते परस्परविरोधी आहेत महिला आरक्षणा संबंधित सर्व पक्षांमध्ये एकमत झाल्याशिवाय घटना दुरुस्ती होऊ शकत नाही आणि राजकीय क्षेत्रातील स्त्री प्रतिनिधी त्यांच्या प्रश्न सुटू शकत नाही. शिक्षण नोकरी आणि निवडणुका म्हणजे जनप्रतिनिधी फळांसाठी चे मतदार संघ या तीन क्षेत्रांत जातीच्या आधारावरील आरक्षणाची तरतूद भारतात आहे आर्थिक विकासामुळे एकीकडे रोजगारांच्या संख्येत वाढ होते म्हणजे रोजगार प्राप्त होण्याची संधी तुलनात्मक दृष्ट्या वाढते. दुसरीकडे मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्पर्धा वाढते शिक्षण आणि नोकरी या दोन्ही क्षेत्रात या पूर्वी कधी नव्हती अशा जीवघेण्या स्पर्धेला सामोरे जाण्याची पाळी आलेली आहे. यामुळे आरक्षणाचे समर्थक आणि विरोधक अशा दोघांसाठी अत्यंत भावनात्मक असा नाजूक विषय झाला आहे. भावनात्मक आणि विकासात्मक अशा दोन्ही दृष्टीने आरक्षणाचे प्रश्नांशी निगडीत दोन्ही बाजूंची ओळख करून घेणे आजच्या काळाची एक प्रमुख गरज झाली आहे असे म्हणता येईल. भारतीय संसदेचे सभागृह असणार्या ५४३ सदस्यांच्या लोकसभेत अनुसूचित जमातीचे ४७ (८.४): सदस्य आहे हे सर्व आरक्षित मतदारसंघातून निवडून आलेले आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने घटक राज्याच्या मंत्रिमंडळात अनुसूचित जमाती चे प्रतिनिधी सामील करून घेण्याचा प्रघात नेहरूंच्या काळापासून निर्माण झाला. सत्तारूढ सरकार कोणत्या पक्षाचे असले तरीही राजकीय प्रथेचे पालन केले जाते सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयात न्यायाधीशांची नियुक्ती करताना अनुसूचित जमातीना देण्याचा प्रयत्न केला जातो. स्वतंत्र भारतात कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ या तीनही विभागात अनुसूचित जमातीना प्रतिनिधी देण्यासाठीची घटनात्मक तरतूद आणि राजकीय प्रथा आहे. याशिवाय स्थानिक शासन संस्था मध्ये म्हणजेच ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद व महानगरपालिका यांच्यामध्ये अनुसूचित जमाती आणि महिला अशा प्रतिनिधी देण्यासाठी त्यात ७३ आणि ७४ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. अशाप्रकारे स्थानिक प्रादेशिक आणि राष्ट्रीय स्तरावरच्या शासनाची अनुसूचित जमातीना सुरक्षित मतदारसंघ निर्माण करून प्रतिनिधित्व दिले जाते.

१) अनुसूचित जमाती यांच्यासाठी आरक्षणाची तरतूद ही प्रारंभी दहा वर्षासाठी होती. प्रथम ती पुन्हा दहा वर्षासाठी वाढविण्यात आली हा सिलसिला आजही सुरु आहे. नजीकच्या भविष्यातील मुदत संपली तेव्हा ती पुन्हा पुढील दहा वर्षासाठी वाढवली जाईल हे निश्चित आहे कारण अद्यापही अनुसूचित जमाती यांच्यामध्ये ५० टक्यांल पेक्षा अधिक लोक दारिर्द्यरेषेच्या खाली असणार्या जीवन स्थितीमध्ये जीवन जगत आहेत त्यामुळे जातीय आधारावर असणार्या आरक्षणाच्या तरतुदीची मुदत संपण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाही.

२) आरक्षणाच्या प्रश्नांचे स्वरूप नजीकच्या भविष्यात अधिक गुंतागुंतीचे होणार हे निश्चिात आहे की गुंतागुंत बहुपदरी आणि बहुढंगी स्वरूपाची असणार आहे हे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल उदा.(अ) अनुसूचित जमाती मध्ये इतर जातीचा समावेश करा अशी मागणी आली सूरही मागणी करणार यांचा आवाज बराच आहे, हे मान्य केले तरी दुसरी एक मागणी अधिक वेगाने समोर येऊ लागली आहे ती म्हणजे हिंदू धर्मात

मुस्लीम व ख्रिश्चन धर्मात धर्मांतरित झालेल्या दलित, ख्रिश्चन, मुस्लिम यांना आरक्षणाचे लाभ मिळावेत.

भारत देश स्वतंत होवून इतकी वर्षे लोटली तरीही कुठल्याही जमातीच्या महिलांचा विकास अजूनही झालेला नाही.आपल्या देशातील पुरुषप्रधान संस्कृतीमुळे महिला न धड शाशकीय, निमशाशकीय कार्यालयात काम करू शकत नाही. पूर्वोत्तर काळात जे गणाचे राज्य होते त्या राज्यात गणिका ही राज्यकर्ता असायची, आणि आजच्या आधुनिकीकरणाच्या जगात महिलांचे स्थान हे नेहमीच दुय्यम स्वरूपाचे दिसून येत आहे. त्या आदिवासी समाज हा अधिक मागासलेला ,शिक्षणापासून वंचीत असलेला आणि त्या समाजात महिलांना मिळालेल्या ३३: आरक्षणात सातत्याने पाहिले तर फक्त ग्रामपंचायत,नगरपंचायत, पंच्यात समिती आणि जिल्हा परिषदा यातच त्यांना ७.७: जागेवर निवडून येत येते.त्यातही त्या मात्र नाममात्र असतात. केंद्र आणि राज्यामध्ये तर या बाबतीत दूरदूर पर्यंत महिलांचा सहभाग दिडून येत नाही. विरोधात असणार्‍या पुरुषांना महिलांपुढे जाने आवडत नाही. जर आदिवासी महिला या विधानसभेत किंवा लोकसभेत गेल्या तर त्या आदिवासी महिलेचे प्रश्न उचलून धरतील. याचा फायदा हा इतर येणार्‍या मुलींना, महिलांना होईल. ही बाब कुठेतरी विरोधकांना खणत असते आणि म्हणून आजपर्यंत इतिहासात बोटावर मोजण्याइतक्याच महिला आपल्याला आमदार खासदार झालेल्या दिसतात.

फुलन देवी या सन १९९६-१९९८ मिर्झापूर लोकसभा निर्वाचन क्षेत्रातून अकराव्या लोकसभेत निवडून आल्या होत्या.त्या एक निर्मिड आणि खंभीर नेतृत्व म्हणून देशाला परिचित आहेत. मिस चंद्राणी मरुमु या ओडीसा लोकसभा मतदार संघातून निवडून आलेल्या होत्या. त्या उच्च शिक्षित आहे. त्या बिजू जनता दल या पार्टीतर्फे निवडून आलेल्या आहेत. मडावी या २०१९ मध्ये आंध्रप्रदेशातून लोकसभेवर निवडून आलेल्या आहेत. द्रोपदी मुरुमू या झारखंड राज्याच्या पहिल्या महिला राज्यपालपदी आहेत.

वरील परिस्थीचा विचार करता आदिवासी महिलांचा भारतीय राजकारणातील सहभाग तसा कमी आहे . आदिवासी महिलांच्या विकासासाठी आदिवासी महिलांना राजकीय कारभारात सहभागी करून जे आवश्यक त्याचबरोबर राजकीय क्षेत्रातील महिलांसाखी स्वातंर्त्य आरक्षण घोषित केले पाहिजे तेव्हा महिलांचा भारतीय राजकारणात सहभाग वाढेल.

निष्कर्ष-

१) आदिवासी महिलांसाठी उच्च शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे.

२) आदिवासी महिलांना राजकारणात मत असतांना त्यांच्यासाठी अधिका अधिक संरक्षणाच्या उपाययोजना वाढविणे आवश्यक आहे.

३) राजकीय सहभागाचे महत्व त्यांना पटवून देणे आवश्यक आहे .

४) आदिवासी महिलांचा उच्च शिक्षणात सहभाग वाढविणे आवश्यक आहे.

५) आदिवासी महिलांसाठी राजकारणातील आरक्षण वाढविणे आवश्यक आहे.

संदर्भग्रंथ

१) *Mr.m.wikipedia.in*

२) *रा.ज.लोटे आदिवासी समाजाचे समाजशास्त्र पिंपळापुरे अंड कं.पब्लिशर्स २०१०*

३) *डॉ.शौनक कुलकर्णी, महाराष्ट्रातील आदिवासी डायमं पब्लिकेशन्स, पुणे २००९*

४) *Aarhant multidisciplinary International Education research journal (AMIJR) 2014*

५) *https://hi.m.wikipedia.org*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

नवपिढी व जुनीपिढी मधील संघर्ष : एक सामाजिक अध्ययन

प्रा.डॉ.राजेंद्र यादवराव बारसागडे
समाजषास्त्र विभाग प्रमुख
एफ. ई. एस. गर्ल्स कॉलेज,चंद्रपूर

★★★

सारांश – समाजात प्रामुख्याने आपणास अनेकपिढया दिसून येतात. परिवर्तण हा निसर्गाचा नियम आहे. प्राचिनकाळा पासुन अनेक पिढया एकत्र नांदताना दिसतात. पूर्वी नवीपिढी व जुनीपिढी याच्यात संर्धा नव्हता. एकत्र कुटूबपध्दती असल्यामुळे तिन ते चार पिढीचे लोक एकत्र नांदत होते. वध्द व्यक्ती कुटूंब प्रमुख व कर्ता व्यक्ती होता. त्याच्या मार्गदर्शनातच नवपिढी घडत होती.कुटूंबातील मोठया व्यक्तीचा तरूणपिढी अपमान करत नव्हती. तर त्याच्या आज्ञेनेचे पालन करीत होते. शिक्षण नोकरी,पाश्चिमात्य संस्कृती, व्यक्तीवाद, बदलते सामाजिक मूल्य यामुळे नव पिढीवर वेगळा प्रभाव पडू लागला. तरूण पिढी स्वताला हुशार आणि नवविचारची मानु लागली. नव पिढी भावनिक दुष्टिकोणातुन विचार करायला तयार नसते जून्या पिढीच्या लोकांना नविन पिढीचे लोक मागासलेली समजतात. नव पिढी व जुनी पिढी यांच्या विचारात एकवाक्यता नसते. प्रत्येक पिढीचे एक विशेषता असते.त्यानुसार पिढीतील लोक जीवन जगण्याचा प्रयत्न करतात. प्रत्येक पिढीतील लोकांना वाटत असते की आपण जे करतो ते बरोबर व चागंले आहे. प्रत्येक पिढीचे सामाजिक मूल्य व जीवन जगण्याची पध्दत वेगळी असते. कुटूंबात आई वडील व मुले, सासू आणि सून यांच्या विचार भावना यात भिन्नता असते. निर्णयाच्या बाबतीत एकवाक्यता नसते.दोन पिढीच्या लोकांमध्ये सवांदात दुरावा असल्याने नवपिढी व जुनीपिढी याच्यात वाद होत असतात. परंतु वाद केवळ नकारात्मकच होत असते असे नाही तर तो सकारात्मक सुध्दा असते.

मुख्य शब्द : नवपिढी, जूनीपिढी, जीवन जगण्याची पध्दत, सामाजिक मूल्य, वैचारिक मतभेद, सवांदाचा दुरावा

प्रस्तावना 21व्या शतकाचा विचार करता मानवाला समाजात अनेक सामाजिक प्रश्नांना तोडं देत जीवन जगावे लागत आहे. खरे तर नविन पिढी व जुनी पीढी या मधील वाद हा नविन नाही. प्रत्येक पीढीने याचा अनुभव घेतलेला आहे. नविनपिढी आणि जुनीपिढी यात वैचारिक मतभेद असने स्वभाविक आहे.कारण परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. या नियमानुसार व काळानुसार जीवनाचा दृष्टिकोन व जीवन मूल्यात बदल होत असतात. परंतु या बदलांना जुनी पिढी सहजपणे स्वीकारू शकत नाही परंतु नव्यापिढीला बदल हवा असतो. परिणामतः दोनपिढयांमध्ये वाद होत असते. हा वाद कुटूंबात आईवडील व मुलां मध्ये आज मोठया प्रमाणात होवू लागले आहेत. आजी आजोबा आणि नातंवड याच्यात संधर्षाची तिव्रता कमी आहे. तर काही नातवंडचा अपवाद सोडल्यास ते आजी आजोबाच्या विचारांचा आदर करतात. अशा परिस्थतीत मधली पिढी जास्त प्रभावित होत असते. नविन व जुन्यापिढी मध्ये वाद मात्र आज होत असतात.

आधुनिक समाजात कुठलीही सामाजिक समस्या असेल ती संवादानी दुर केली जावु शकते. निश्चित स्वरूपात समन्वय साधता येते. दोन पिढयांमधील वैचारिक मतभेद असतात. त्यावर जुन्या पीढीतील लोकांनी बदलते सामाजिक मुल्य समजुन घेतले पाहीजे. जागतिकीकरणाने जगकुप जवळ आले आहे व त्यात वेगाने बदलही होत आहे. हल्लीची पीढी सतत मोबाइल व इतर इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करण्यात व्यस्त आहे. पूर्वी मनात कोणताही प्रष्न किवा षंका असली की एकमेकांना विचारून, त्यावर चर्चा करून, त्याचे निरसन करण्यात येत होते. कुटुंबातील सदस्यांषी सवांद साधून ते सोडविले जात होते. वर्तमानकाळात मनातील कोणताही प्रष्न, शंका असल्यास समाधान हातातील मोबाइल मध्ये उपलब्ध असते. त्यामुळे इतरांशी, प्रश्नांबाबत शंका, अडचणींबाबत घरातील सदस्यांमधे सवांद साधण्याचे प्रमाण कमी होत आहे. कौटुंबिक समस्येबाबत आजची नवपिढी दुर आहे. घरात काय चालेले आहे याचे त्यांना देणे घेने नसते. आजची नव पिढी मोबाईलवर अधिक व्यस्त आहे. मोबाईल मूळे तरूणाचे विश्वच आज बदलले आहे. कोराना महामारीच्या काळात अजुन त्याला अधिक खतपाणी घातले आहे. जसे मिटीगं क्लासेस सगळे ऑनलाईन असल्याने एकाच घरात राहुन सुध्दा एकमेकाषि संवाद साधला जात नाही. विचाराची देवाण घेवाण ही होत नाही. नवपीढीने गरजेपुर्ती या आधुनिक साधनांचा वापर केल्यास निश्चितच दोन्ही पिढयामध्ये सवांद वेळोवेळी साधता येइल.जुनीपीढी आणी नवीपीढी याच्यातील संघर्ष तर सुरूच राहणार कारण की दोन पिढयातील अंतर 20 ते 25 वर्ष किवा त्यापेक्षा जास्त असु शकेल तसेच तरूणपीढी आणि जुनीपीढी यांच्या विचारात तपावत असते. आपण किती सांगण्याचा प्रयत्न केला तरी वैचारिक मतभेद होणार कारण की काळानुसार सामाजिक मुल्य जीवनशैली बदलत असते नव विचार प्रवाह अस्तित्वात येते. नव विचार प्रवाहाला नवपीढी लवकर आत्मसात करीत असते. परतु जुनीपीढी ते लवकर आत्मसात करू शकत नाही. वास्तविक पाहता पुर्वी ग्रामिण व्यवसायाशी संबधीत संयुक्त कुटूंब पध्दती अस्तित्वात होती अषा संयुक्त कुटूंबपध्दतील कर्त्या व्यक्तीस व कुटूंब प्रमुखास मानाचे स्थान होते सर्व सदस्य त्याच्या विचाराच्या बाहेर जात नव्हते. कुटूंब प्रमुखचे नियत्रंण सर्व सदस्यावर असायचे समजा ऐखादया प्रसंगी सदस्यांमध्ये वाद निर्माण झाल्यास तरी कुटूंब प्रमुख सदस्यातील मतभेद दुर करीत होते. त्यामुळे कुटूंबात नविनपीढी व जुनीपीढी अतंर्गत वादाचे प्रमाण

फार कमी होते.आजच्या काळाचा विचार करता आज सामाजिक मुल्य बदलली आहे, शिक्षणाचा प्रसार, व्यक्तीवादी विचारसरणी, विभक्त कुटूंब, नोकरी, व्यवसाय शहरीकरण पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव यासारख्या घटकामुळे आज जुनीपिढी व नविन पिढीमध्ये वाद होताना दिसुन येते. कुटूंबसंस्था समाजरूपी मानवी जीवनाच्या इमारतीचा पाया व प्रथम बालवाडी मानली जाते. कुटुंबसस्थेत दोन पिढयान मध्ये संर्घश होताना दिसुन येते.

सामाजिक सशोधनाचा उध्देश : 1 नवपिढी व जुन्यापिढीत संघर्षाच्या कारणाचा शोध घेणे, 2.नवनि पिढी व जूनीपिढीतील संघर्षाच्या परिणामाचा अभ्यास करून त्यावर उपाय सुचविणे.

गृहितकृत्य : बदलत्या सामाजिक मूल्यांमूळे दोनपीढीत संधर्ष उद्भवतो. नवपिढी व जुनीपिढी यांच्या संधर्षाचा परिणाम कुटूंबावर पडतो.

तथ्य संकलंन पध्दती :: संदर्भ पुस्तके, वर्तमानपत्रे, सोशलमिडीया या दुय्यम स्त्रोतांच्या माध्यमातून माहिती संकलन करणे.

नवपिढी व जुन्यापिढीचा अर्थ : नविन पिढी म्हणजे जे आजच्या आधुनिक विचारसरणीला मानतात व त्यानुसार जीवन जगतात म्हणजेच एक प्रकारे आजची युवापीढी म्हणजे नविन पिढी होय तर जुनी पिढी म्हणजे जे लोक आधुनिक विचार धारेला विरोध करतात समाजाच्या जुन्या मुल्यांनुसार वागतात समाजाच्या प्रथा– पंरपरा याला अधिक महत्व देतात व जुन्या मुल्यांना चिकटून असतात. त्या लोकांचा अथवा व्यक्तीचा समावेश जुन्या पिढी अंतर्गत केला जातो ज्यात प्रामुख्याने वडीलधारी माणसे म्हणजेच एक प्रकारे आई,वडील आजी, आजोबा याचां समावेष जुन्या पिढी अंतर्गत केला जातो.

नवपिढी व जुनीपिढी सघंर्षाची कारणे –

1. जुन्यापिढीतील व्यक्ती नवपिढीवर सत्ता गाजवितात व अन्यायपूर्ण व्यवहार करतात. नव पिढीला हे नको असते. यातूनच नवपिढी व जुनीपिढी यात वाद होत असतो.
2. नवपिढीतील युवकांना वाटत असते की आम्ही आमच्या पालकांपेक्षा प्रगतीशील व सुंस्कृत आहोत या विचारातुन नवपिढी व जुन्यापीढीत वाद होतो.
3. नवपिढीच्या युवकांना वाटत असते की आमच्या स्वतंत्र्य व विकासा मध्ये जुन्यापिढील सदस्यांची विचारधारा बाधक ठरत असते हे नवपिढीच्या लोकांना नको आहे यातुनच एक प्रकारे दोन पिढयातील लोकांमध्ये सघर्श उदभवत असतो.
4. बरेचदा जुन्यापिढीतील लोक म्हणजे पालक नवपिढीच्या आवश्यक गरजा पूर्ण करीत नाही यातूनच मुलांचे वडीलांषी वाद होत असतात.
6. जुन्यापिढीतील लोकांना नवपिढीतील तरूणाची मुक्त जीवनशैली आवडत नाहीकृतर नवपिढीला आईवडीलांचे जुन्यापंरपरा व रूढी चिकटून असणे पटत नाही.यातून दोन पिढीत वाद होत असतो.
7. आजच्या शिक्षणप्रणालीत मुल्यांचा अभाव जाणवतो व व्यक्तीने कसे वागावे, एकमेकांशी व संबंध कसे ठेवावे, वृध्द आजी आजोबा बाबत आपले कर्तव्य काय, याबाबत तरूण पिढी विसरत चाललेली आहे व यातूनच एक प्रकारे नवपिढी व जुनीपिढी या मध्ये दरी निर्माण होत आहे.
8. नवपिढी व जुन्यापिढीत सामाजिकतेचा अभाव निर्माण होत आहे व सोबतच सदस्यांमध्ये मानवी संवेदनशिलता या व्यक्तीभिमुख होत आहे. त्यामुळे दोन पिढीत दुरावा निर्माण होत आहे.
9. व्यक्तीची आजची जीवनशैली ही यांत्रिक बनलेली आहे. व्यक्ती दिवसभर कामात व्यस्त असतो. त्या व्यक्ती कडुंन जीवन मुल्य जोपासणे, वडील व्यक्तीचा आदर, सेवेची अपेक्षा करणे निरर्थक आहे. परंतु घरातील वडीलधारी व्यक्तीना कमवित्या व्यक्ती कडुन अनेक अपेक्षा असतात त्या अपेक्षा पूर्ण न झाल्यामुळे वाद निर्माण होतात.
10. नव्यापिढीचे स्वैरपणे वागणे, मुला मुलीचे एकत्र फिरणे, फैशन करणे,रात्री उशिरा घरी परत येणे, मुलींचे तोकडे कपडे घालणे जुन्यापिढीतील लोकाना आवढत नाही. यातुनच एकप्रकारे जुनीपिढी आणि नवपिढीतील लोकांना मध्ये वाद निर्माण होतात.

नवपिढी व जुनीपिढीवादाचे परिणाम : दोनपिढीतील विचारां मध्ये व मुल्यांमध्ये भिन्नता असल्याने नवपिढी व जुनीपिढी याच्यात एकमेकांबाबत वैचारिक, कलहामुळे व्यक्तींमध्ये निराशा निर्माण होते. दोन्ही पिढीतील लोकांची मानसिकता बिघडते, याचा परिणाम कुटूंबावर पडत असते. कुटूंबात नेहमी एकमेकांनबाबत राग असतो. त्यातुन चिडचिडपणा निर्माण होते. एकाच घरातील सदस्यां मध्ये एकमेकांविषयी कटुता निर्माण होते. व यातुन मानसिक संतुलन ढासळते मनात अनेक विचार येतात काही व्यक्ती टोकाची भूमिका घेऊन स्वतःला संपवितात. दोन पिढीतील संघर्षामुळे व्यक्तीमध्ये निराशा निर्माण होते व कुटंबाचे विघटन होते.

नवपिढी व जूनीपिढी संघर्षावर उपाय –

1. जुन्यापिढीने नवपिढीला चांगले काय वाईट काय याची जाणीव करून देणे. जुनीपिढी व नवपीपिढीने आपले कर्तव्य व जबाबदारी योग्य रीतीने पार पाडून दोन्ही पिढीत समनवय साधने आवश्यक आहे.

2. प्रत्येकाचे स्वतःचे कुटूंबाशी आणि समाजाशी नाते असते व ते नाते जपण्यासाठी सामाजिक मूल्य कायम ठेवुन काळानुरूप प्रत्येक गटातील व्यक्तीने नविन मार्गाचा स्विकार केला पाहीजे

3. जुन्यापिढीतील व्यक्तीने आपला इगो, मी पणाची भावना बाजुला ठेवाव्या 4. नव विचारप्रवाह मध्ये वावरताना जेष्टानी नवा दृष्टिकोण निर्माण केला पाहिजे व घरातील सदस्याशी जुळवुन घेतले पाहीजे

5. प्रत्येकाला आनंदान रहावे असे वाटत असेल तर आपल्या भूमेकेची अदला बदल करून पाहावी तेव्हा आपणस सर्व नव दिसेल व आपणास आनंदात राहता येइल 6. आपल्या बोलण्याच्या वागण्यातुन एकमेकांबाबत आदर, प्रेम, काळजी व्यक्त केली पाहीजे. त्यामुळे आपल्या मुलांच्या मनातही त्या प्रवृत्ती रूजतील आणि कुटूंबा मध्ये व आपल्या घरामध्ये एक प्रकारे आनंदमय वातावरण निर्माण होइल.

7. नवपिढी व जुनीपिढी काळानुसार बदलत असते व जुने व नविनवाद हा चालु असते त्यामुळे दोन्हीपीढीतील घ्येय धोरण परस्परातील सामंजस्य निर्माण करून सवांदातुन आणि समन्वयातुन वाद सोडवता येतात. 8. काळानुसार एका पिढीची जागा पुढची पिढी घेते त्यामुळे जुन्यापिढीतील लोकांनी नविन पिढी चा द्वेश न करता काळानुसार स्वतः मध्ये बदल केल्यास दोन पिढीत वाद होणार नाही

9. जुन्यापिढीतील लोकानी नवपिढीतील लोकाना जुन्या मुल्याचे महत्व पटवून देणे आजच्या परिस्थितीत त्यां उपयुक्तता समजवुन सांगणे आवश्यक आहे. कारण काळ कीतीही बदलला तरी वडीलधार्यांचा आदर करणे त्याची सेवा करणे, खोटे न बोलणे, प्रामाणिकपणे वागणे ही मुल्य कधीच कालबाहय होत नसतात

10. आधुनिक तत्रंज्ञान व त्यावर आधारित नवविचार व नविनमूल्ये बदलत्या काळानुसार कशी महत्वाची आहेत हे जुन्यापिढीतील लोकाना पटवून देणे हे नव्यापिढीची जबाबदारी आहे

11. जुन्यापिढीतील लोकानी आपल्या जीवनशैलीत बदल करून नवपिढीतील आधुनिक व वैज्ञानिक विचार स्विकारणयाचा प्रयत्न केले असता दोन पिढीत संघर्ष होणार नाही.

12. नवपिढीने वृध्दांचा मान करणे त्यांच्या विचार, भावना समजून घेतल्यास दोनपिढीत वाद होणार नाही.

13. जुन्यापिढीतील लोकांनी नवपिढीला पंरपरागत, सामाजिक व धार्मिक विचाराचे महत्व पटवून देणे पंरतु बधंने मात्र नवपिढीवर लादू नये

निष्कर्श – नवपिढी व जुनीपिढी एकाच नाण्याच्या दोन बाजु आहे कृनवपिढी ही आधुनिक विचारांना महत्व देते तर जुनीपिढी ही पांरपारीक विचार व मुल्यांना महत्व देते. 1960 मध्ये जनरेषेन गॅप या सिध्दांताची निर्मिती झाली. यानुसार.दोन्ही पिढीतील अंतर हे 20ते 25 वर्षापेक्षा अधिक असते कृदोन्ही पिढीत खानपान, विचार ,आवड निवड ,सामाजिक विष्वास, सामाजिक मुल्य, या याबाबत बरीच भिन्नता असते. आधुनिक जीवनशैली, सामाजिक माध्यमे, नविन सभ्यता, व्यक्तीगत स्वातंत्र्य नवपिढीतील मुलांना हवे असते. परंतु जुन्यापिढीतील लोकांना या बाबी नको असतात. नवपिढी व जुनीपिढी यात संधर्ष होते जेव्हा वाद टोकाला जाते व्यक्तीच्या मनात एकमेकांबाबत कटुता, मत्सर भावना निर्माण होते. नवपिढीतील युवक जुन्यापिढीच्या लोकांचे बोलणे मनावर घेत असतात व काही शेवटी स्वातःलाही सपंवतात. दोन्ही पिढीतील लोकांनी सामाजिक सबंध सलोख्याचे ठेवण्यासाठी दोन्ही पिढीतील सदस्यानी एकमेकास समजुन घेतले पाहिजे. दोन्ही पिढीतील लोकानी वैचारिक भिन्नतेचा आदर राखला पाहिजे व एकमेकांच्या भावना विचारसरणी सामाजिक मुल्य समजून जीवन जगले पाहिजे तेव्हाच दोन्ही पिढीत एक प्रकारे समन्वय साधता येईल

सदंर्भ :

1. *भारतीय समाज संरचनात्मक प्रष्न आणि सामाजिक समस्या लेखक डॉ.आगलावे प्रदिप डॉ. आगलावे सरोज श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर जुलै2018*
2. *.www.hindikiduniya.com>essy*
3. *From m.Jagran.com. delivered by google*
4. *https://m-patrika.com.cdn cdn.ampproject.org*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

"मराठी कादंब–यातुन चित्रित झालेले शैक्षणिक व्यवस्थेतील वास्तव"

संशोधक विद्यार्थी
मुळाटे श्रीधर सुधाकर
एम.ए.मराठी–नेट,सेट, मराठी भाषा व वाङमय विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

★★★

प्रास्ताविक – स्वातंत्र्योत्तर काळात समाजाच्या विकासाच्या दृश्टीने 'शिक्षण' महत्त्वाचे अंग बनले. ठराविक लोकापर्यंत मर्यादित असणारे शिक्षण तळागाळातील माणसापर्यंत पोहोचले होते. भारतीय संविधानाच्या कलम २१–अ अंतर्गत सहा ते चौदा वर्षाच्या बालकांना मोफत व सक्तीचे षिक्षण झाल्यामुळे दारिर्द्य, गरिबीत जगणाऱ्या समाजातील लोकांच्या बालकांचा शिक्षणाशी संबंध आला. प्राथमिक शिक्षण पूर्ण करेपर्यंत कोणत्याही बालकाला त्याच वर्गात ठेवणे, शाळेतून काढून टाकणे अथवा अनुत्तीर्ण करण्यास मनाई असल्याने शाळेतील गळतीचे प्रमाण झाले. बहुजन वर्गातील तरुण वर्ग शिक्षण घेऊन नोकर्या ला लागला. त्याला सुखाचे दिवस भोगायला मिळाल्याने शिक्षणाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची वृत्ती समाजात निर्माण झाली. त्यामुळे शिक्षणाचा प्रचार व प्रसार होण्यास सुरुवात झाली. प्रारंभी शिक्षण घेताना दारिर्द्यात जगणार्याव सामाजिक हतबल समूहाला शिक्षण घेताना संघर्ष करावा लागला. उपासमार, अवहेलना, कुचंबणेला तोंड द्यावे लागले. शिक्षणाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग बाहेर पडत होता. त्यामुळे राजकारणी लोकांनी खाजगी शिक्षण संस्था, शासन अनुदान तत्त्वावरील संस्था स्थापन केल्या. शैक्षणिक शाळा, कॉलेजचे जाळे निर्माण झालेय परंतु या संस्था ठराविक जातींच्या मत्तेदारीवर होत्या. मराठा–ब्राह्मण समाजाचे या शैक्षणिक संस्थावर वर्चस्व होते. त्यामुळे सुशिक्षित वर्ग बाहेर पडला आणि सुशिक्षित बेकारीची संख्या वाढीस लागली. त्यामुळे नोकर्या मध्ये जातीयता जागृत झाली. आरक्षणाच्या जागेवरही गुणवंत्ता कैंडिडेट मिळाला नाही शेरा मारून आपल्या जातीच्या उमेदवाराची निवड होऊ लागली. शिक्षण क्षेत्रात यामुळे वशिलेबाजी आणि भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढत गेले. खेड्या दृ पाड्यात शिक्षण संस्थाची संख्या वाढीस लागणाने, शिक्षणातील परीक्षातील भ्रष्ट प्रवृतीमुळे शिक्षण क्षेत्रात बाजारीकरण पुढे आले.

शिक्षणात विशिष्ट समुदायाची मतेदारी असल्याने शिक्षकी पेशा लाचार, हतबल बनू लागला. राजकीय हितसंबंधाची,वशिलेबाजी मध्ये गचाळ गटबाजी, जातीयतेची जोड, हेव्यादाव्याच्या आणि सूडाच्या भाव–भावनाला ऊत आला. शाळा, महाविद्यालयाप्रमाणे हे लोण विद्यापीठीय स्तरापर्यंत पोहोचले. शिक्षण व्यवस्थेचा होणारा मूल्यरहास, शिक्षण महर्शी लोकांची आरेरावी, शोषण, स्त्रियांच्या हतबलतेचा फायदा घेऊन लादले जाणारे अनैतिक संबंध, साहित्य,प्रकाषकाची किळसवाणे वर्तन यामुळे भ्रमनिराशा होणे साहजिकच आहे. त्यामुळे नव्या पिढीतील लेखकांनी शिक्षण क्षेत्रातील वास्तव कथा कादंबर्यातून मांडले आहे. स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबर्यात शिक्षण क्षेत्रातील तरूणाचा शिक्षणासाठी संघर्ष, अगतिकता, मनाची व्दिधा स्थिती, शिक्षण महर्शीचे जाळे, त्यामुळे शिक्षणातील मूल्यर्हास होऊन बाजारीकरण, वशिलेबाजी, भ्रष्टाचार, अनैतिक वर्तन, जातीयता, पैशाच्या हव्यासापोटी भोगवादी बनलेल्या पांढरपेषा समूहाचे वास्तव मराठी साहित्यिकांनी समोर ठेवून कथा–कादबर्यातून मांडल्याचे लक्षात येते.

मराठी कादंबरीतील शिक्षणासाठीचा संघर्ष – शैक्षणिक कादंबर्यामध्ये शिक्षणासाठी केलेल्या संघर्षाची गाथा नायक, प्रतिनायिक, अन्य व्यक्तिरेखाच्या रूपामधून आलेला आहे. हा संघर्ष दु:ख, दारिद्रय, भुकेचा प्रश्न, शिक्षणासाठी धडपड व दारिद्रयातून कुंटूबाची सुटका होण्याकरिता असल्याचे वर्णन कादंबर्यातून येताना दिसते.

'कोसला' कादंबरीतील पांडूरंगाचा संघर्ष शिक्षणासाठी नसून स्वत:च्या अस्तित्वासाठी आहे. त्याची धडपड नवीन अनुभवातून शिकण्याची आहे. त्याला पुण्यातील पुण्यक्षेत्री अनेकाकडून फसवणूकीची शिकवण मिळते. कोसलातील काही व्यक्तिरेखा शिक्षणासाठी संघर्ष करताना दिसून येतात. त्यापैकी खानोलकर हा गरीब बाहेरून बी.ए. करणारा बायको, मुलबाळं , नोकरी, घरदार सासूसासरे सांभाळून शिक्षण करीत होता. शिक्षणासाठी त्याचा संघर्ष, जिद्द मनाला स्पर्श करते.

छाया महाजन यांच्या 'कॉलेज' कादंबरीतून शिक्षणासाठी संघर्ष करणार्या तात्पुरत्या नोकरीवरील व गरिबीतून वर आलेल्या प्राध्यापकांचे वर्णन येते. त्यापैकी परमार अगदी गरीबीतून शिक्षण घेतलेला मुलगा. लेखिका त्याचा परिचय देताना म्हणते, "परिस्थितीनं गरीब ' कमवा आणि शिका' योजनेत शिकलेला. विद्यापीठाच्या वसतिगृहातल्या खोलीचं भाड परवडत नाही म्हणून अक्षरष: झोपडपट्टीत राहणारा. धाकट्या भावाला घेऊन येऊन त्यालाही शिक्षण देण्याची ध डपड करणारा" वडील हमाली करणारे, घरात अनंत अडचणी तरीही नोकरी कायम स्वरूपी लागेल आशेवर संघर्ष करीत राहतो कॉलेजातील प्राध्यापकावर त्याच्या जिद्दीची छाप आहे. त्याच्याविषयी वहाब सर म्हणतात, "पर बच्चा अच्छा है, मॅंडम.मेहनती है.घरका बहुत गरीब है सुना हूं". कादंबरीची नायिका मध्यमवर्गिय असल्याने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिस्थितीचा अनुभव तिला नाही. तिला ऐकीव गोष्टी माहित होत्या. त्यात कॉलेज बहुजनांच असल्याने विद्यार्थ्यींचं नव्हे तर शिक्षक देखील संघर्षातून आलेले होते. "कॉलेजमध्ये बरेच

प्राध्यापक गरिबीतून वर आलेले. शिक्षणासाठी धडपड केलेले. मिळेल ते आणि मिळेल तसं शिक्षण घेतलेले" प्रा. माघारे ,माधवनं कांबळे सर व इन्स्पेक्टर चव्हाण यासारखे पात्रे गरिबीचे अन्यायावरील प्रतिवाद करतांना चव्हाण साहेब कॉलेजचे अध्यक्ष व सचिव यांना मनातील अगतिकता व्यक्त करताना म्हणतो, "जरा जास्त बोललो असेलय पण मनानं कवी आहे मी ! गरीबीतून वर आलोय. अशा गोष्टींनी मन दुखावतं. श्रीमंतांनी गरिबांना जगू द्यायला पाहिजे. हे वाटत तेवढं अवघड नाही.

चांगदेव चतुष्टयातील नामदेव भोळे शिक्षणाचा गंध नसणाऱ्या धनगर समाजातील आहे. शिक्षणासाठी मुलूकगिरी केल्याप्रमाणे मामा, मावशी, काकूच्या गावची बोर्डिंग, बहिण असा शिक्षणाच्या प्रिन्सिपॉलकडे बंगल्याबाहेरच्या बागेत एका छानशा खोलीत दोन वर्ष. त्याच्या घरची सटरफटर काम करून अहोरात्र वाचन, अभ्यास". नामदेवाच्या संघर्शमय शिक्षणाप्रमाणे या समाजातील बिकट स्थितीत षिकलेला डॉ. शेळके 'व्हायरस' कादंबरीतून येतो. परंतु डॉ. स्वतः ऐवजी व्यवस्थेविषयी अधिक बोलतात इतिहास विषयाशी संबंधीत विद्यार्थ्यांची अगतिकता ते अचूकपणे मांडतात. त्यापैकी प्रशांत काळोखे भटक्या प्रवर्गातील तरूणाला गुणवत्ता असूनही केवळ मागासवर्गीय असल्याने संस्थाचालक नोकरीवर घेत नाही. डॉ. शेळकेच्या मार्गदर्शनातून तो कुलगुरूकडे तक्रार करतो. परंतु कुलगुरूकडून त्याला न्याय मिळण्याऐवजी त्रास सहन करावा लागतो. कोर्टात न्याय मिळेल आशेने जमीन विकुन वकील दिला परंतु कोर्टाने प्रकरण नाकारले. शेतमजुरांच्या मुलाला व्यवस्थेविरुद्ध संघर्ष केला तरी न्याय मिळत नाही याच जीवंत उदाहरण लेखकाने चित्रित केले आहे. दुसरा विद्यार्थी,चिवटे हा अफाट वाचन, सूक्ष्म चिकित्सा यामुळे त्याला इतिहासकार म्हणून ओळख. घरात गरिबी असल्याने लहानपणापासूनच किराणा दुकानदार काम करत. शिक्षण घेतो. धावतपळत शिक्षण करणाऱ्या चिवटेचा संघर्ष मनाला स्पर्श करणारा आहे. उदा. "अहो सर, आम्हाला कोण देणार प्राध्यापकाची नोकरी? तुमचा काळ गेला आता". किंवा "गरिबांच्या पोटी जन्म घेतला हाच आमचा गुन्हा आहे सर".६ शिक्षण व्यवस्थेतील कुचकामीपणा व्यक्त करत असता लेखकाने चिवटेच्या माध्यमातून पोटाची खळगी भरण्यासाठी संघर्ष करणाऱ्या तरूणास प्रतिनिधीक स्वरुपात चित्रित केले आहे. नंदिनी सुर्वे हिचा शैक्षणिक संघर्ष तर निराळाच आहे. त्याच्यापेक्षा जास्त पगाराची बायको नको असणाऱ्या नवऱ्याला तिला शह द्यावयाचा आहे. एकूण शिक्षण व्यवस्थातील संस्थाचालक, बेकारी आणि अस्तित्व यादृष्टीने हा शैक्षणिक संघर्ष येताना दिसतो.

शैक्षणिक कादंबऱ्यामध्ये स्वानुभव कथन करणाऱ्या कादंबऱ्यातून नायकांचा संघर्ष प्रखरतेने वास्तव चित्रित करतो. 'झोंबी'तील आनंदा, पागोरा'तील अवधूत व धूळपेरणी'तील श्रीराम या नायकांचा संघर्ष आपल्या कुटुंबाचा उध्दार करण्यासाठी शिक्षण घेण्याची दृष्टीने आहे.

शिक्षणाच्या संघर्शातून काही शिक्षकाचे जीवन आलेले असते. त्यांनाही विद्यार्थीदशेत दारिद्रय, उपासमार, हाल आपेष्टातून शिक्षण घेतलेले असते. या शिक्षकांचे वर्णन स्वातंत्र्योत्तर मराठी कादंऱ्यातून येताना दिसते. मराठीतील सर्व प्रश्न अनिवार्य' मधील सिद्धेश्वर सपकाळ, कॉलेज मधील माघारे सर , हाताची घडी तोंडावर बोट मधील राधाकृष्ण शिपटेकर, झूल मधील नामदेव भोळे, झूंड मधील आनंद काशीकर व दौलत कांबळे इत्यादी या शिक्षकांचे जीवन चित्रण शिक्षणासाठी केलेल्या संघर्षातून प्रतिपादित झाले आहे. ज्यांनी शिक्षण घेण्यासाठी अंतोनात कष्ट घेतले. शिक्षणांचा गंध नसताना शिक्षक पेशामध्ये आपले अस्तित्व निर्माण केले.

शिक्षण व्यवस्थेतील राजकारण – राजकारण हा केवळ सत्तासंघर्ष नसतो. तर त्याला अनेक पदर असतात. ज्याची कल्पना सर्वसामान्य माणसाला नसते. सामान्यांची दिशाभूल करणे हा या व्यवस्थेचा स्थायीभाव आहे. हे राजकारण केवळ व्यवस्थेतच नव्हे तर शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात शिरलेले आहे. स्वातंत्र्योत्तर कादबऱ्यातून शिक्षकांना ग्राम पातळीपासून ते उच्चशिक्षण, नोकरीपर्यंत राजकारणाच्या व्यवस्थेला बळी पडावे लागते. किंबहुना अनेक शिक्षक –शिक्षकांचे हितसंबंध, संस्थाचालक, प्राचार्य अथवा मॅनेजमेंट व प्राचार्य संबंध, शिक्षकामधील हेवेदावे, कॉलेजमधील अथवा विद्यापीठातील प्राध्यापकामधील हितसंबंधांचे राजकारण, स्थानिक अथवा गावपातळीवरील राजकारण यातून हे प्रखर वास्तव कादंबऱ्यातून चित्रित होत असल्याचे जाणवते. शिक्षणात शिरलेल्या राजकारणाचे चित्रण प्राथमिक, माध्यमिक, कॉलेज व विद्यापीठीय स्तरावर असल्याचे स्पष्ट करता येते.

शिक्षण क्षेत्रातील राजकारणाचा प्रारंभ ग्रामपातळीवर होऊ पाहत आहे. ग्रामीण भागातील शालेय शिक्षक विद्यार्थी यांना राजकीय स्थितीचा फटका बसतो.

'निशाणी डावा अंगठा' या कादंबरीमध्ये साक्षरता अभियान केंद्रस्थानी असले तरी गावपातळीवरील बदललेले राजकारण आणि समाजकारणाची चर्चा होताना दिसते. विविध राजकीय पक्ष ग्रामपातळीवर पोहचले आहोत. त्यांच्या गटबाजीच्या राजकारणामुळे षिक्षकांना करावी लागणारी कसरत, साक्षरतेच्या अंतिम मूल्यमापनासाठी गावातील राजकीय पक्षांना सहभागी करून घेतल्याशिवाय कार्य पूर्णत्वास जाणे शक्य नसल्याची जाणीव शिक्षकांच्या संवादातून येते.

"भाऊ धनुष्यवाले बोलावले की नाही? सगळे बोलावले पंजावाले, कमळवाले, धनुष्यवाले, घड्याळवाले–एकेक हत्तीवाला अन् तराजूवालाबी घेतला बोलावून".

"सगळे बोलावले हे बर केलं धनुश्यवाल्याकडे पुन्हा निरोप धाडा. एकदा अजून नाही तं त्याहीचे भाते केव्हाबी खांद्यावरच राहतात बरंकृ "हा वोकृते बी खरंच पण सध्या तं आपल्याले सगळ्याही जावाईबुवा सगळे आले की तुम्ही प्रस्तावना करून मार्गी लावून द्या. मग मी अन् जुंबडसर लोण्याहीचे गोळे घेऊन तयारच राहतो". येथे

बदलत्या राजकीय परिस्थितीची नोंद शैक्षणिक कादंबऱ्यातून येत असल्याचे दिसून येते. ग्रामपातळीवरील शिक्षक व ग्रामस्थ राजकारणी यांच्यातील हितसंबंध या सारख्या प्रसंगातून चित्रित होतात.

शालेय शिक्षणाचे चित्रण 'हाताची घडी तोंडावर बोट' या कादंबरीतून होत असताना ग्रामपातळीवरील राजकीय प्राबल्य चित्रित होताना दिसते. येथे पक्षांचा स्पष्ट उल्लेख नसला तरी राजकारणांनी लोकांचे शिक्षक–शिक्षिका यांच्यावर. वर्चस्व गाजवितात. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या लुडबुडपणामुळे शिक्षकाला आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावताना अडचणी निर्माण होतात. तसेच बोंडाळ गुरूजी सारख्या शिक्षकांचे सरपंच बापूसाहेब उर्फ हौशा तिरवाडकर उर्मट राजकारणी सोबत संबंध असल्याने ऑफिसकडे तक्रार करता येत नाही.श्री सोमाजीराव चोरगावकर हे नुकतेच जिल्हा परिशदेच्या शिक्षणखात्यावर निवडून गेल्याने सरपंच तिरवाडकर नाकाचीवाडी व आजूबाजूच्या दहा–बारा शाळातील शिक्षकांना बोलावून सत्काराचे नियोजन करण्यासाठी सभा घेतो.ही सभा वेळेवर घेत नाही. स्वतःच्या सोयीनुसार बैठकीच्या ठिकाणी येतो. काही शिक्षक कंटाळून निघून जातात. तेंव्हा सरपंच म्हणतो, "मी तालुकापंचायत समितीच्या सभापतीना विचारतो शिक्षकांना असं सरपंचाच्या परवानगी षिवाय जाता येतं का? सरपंच तिरवाडकरांच्या ग्रामपातळीवर राजकारणाचा प्रभाव शिक्षकावर असल्याचे तसेच त्याच्या बदल्या करण्यासाठी, तक्रारी करण्यासाठी व आडमार्गी गावी बदली करण्याच्या त्रासाला शिक्षक सहन करतात. अधिकारी देखील सरपंचाच्या कोबंड खाण्याच्या लालचीने सरपंचाची मनमानी चालवतात.

'सर्व प्रश्न अनिवार्य' या कादंबरीमध्ये देखील ग्राम पातळीवरच्या राजकारणाचा प्रश्न आलेला आहे. परंतु हे राजकारण तालुका पातळीवर येते. सारंगपूर येथील कॉंग्रेसचा आमदाराच्या लायकीचा माणूस पंचायत समितीचा सभापती आहे. कारण हा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी सुटल्याने सेनेविरूध्दी उभा आपल्या पक्षातील उमेदवाराला निवडून आणलेल्या विलासदादाचा दबदबा आहे.त्याचा मुलगा मोटेगाव बुद्रुक शाळेत शिक्षण घेतो. मांजरसुंबा केंद्रावर ही परीक्षा होणार होती. ध्ानोकार सर त्यांच्या गावातील शिक्षक सभापतीच्या मुलाला स्कॉलरशिपच्या परिक्षेत राज्यात पहिला आणून सभापतीकडून प्रशंसा मिळवण्यासाठी प्रयत्नाची शर्थ करतो. सपकाळ सर त्याला यशस्वी होऊ न देता परीक्षेत गैरप्रकाराला विरोध करतात. गावच्या लोकांना दादाचा अपमान वाटल्याने त्यांनी देवप्रिंपीची शाळा गाठली. कार्यकर्त्यांच्या प्रश्नावरून त्यांचा रूबाब समजून येईल. "तसं तुमालेच तिकडं बलवता आलं आस्तं पण म्हटलं आपुनच जाऊन पाहू कोण मायचा लाल हाये ज्यो दादाले वळखत नाही". किंवा 'मास्तर, दादांच्या पोराले वर्गातून हाकलून द्यायच्या आधी पुढं काय होईल याचा काही इचार केला नाही वाटतं तुम्ही? किंवा साताशे मास्तरलोकंहे पुऱ्या ब्लाकमधी आजून कोण एवढी हिंमत नव्हती केली'. किंवा 'पण मी म्हंतो मुकाट्यानं नोकरी करायची सोडून बांडयापंचायची करात कषाले ?"ह सभापतीच्या कँबीनमधून बाहेर पडलेल्या गटषिक्षणाधिकाऱ्यांनी घटनेची चौकशी करण्यासाठी मांजरसुंब्याला जायचं ठरवलं केंद्रप्रखुक, हेडमास्तर, शिक्षक यांच्या खोट्या जबाण्यातून सपकाळ सरांवर निलंबनाच्या कारवाईचे पत्र काढले. शिक्षण क्षेत्रातील या राजकीय खेळीचा बळी ठरलेल्या शिक्षकाला पडलेल्या प्रश्नाच्या काहूरातून पुढे कादंबरी परीक्षेतील गैरमार्गाचे अवलोकन करते.

'कळप' कादंबरीतून गाथी पक्षाच्या घोसरवाडकर उर्फ गांधीनंतरच्या महात्म्याचे राजकीय प्राबल्य चित्रित होते. घोसरवाडकरांची मर्जी सांभाळण्यासाठी सनमाडीकर सर, महाजन सर, सुरेश संकेश्वरी, चिंचवाडे सर हे कॉलेज शिक्षक सतर्क राहतात. पक्षावाले सामाजिक कार्याच्या नावाखाली तरूणांना हाताशी धरतात. गाथी पक्षावाले व कॉंग्रेस राजकारणातील सुशिक्षित, तडफदार तरूणाची अवस्था विदाळक पध्दतीने लेखकाने चित्रित केली आहे.

झुंड– शरणकुमार लिंबाळे, व्हायरस– रवींद्र ठाकूर, पागोरा– रमेश अंधारे यांच्या कादंबरीत शैक्षणिक व्यवस्थेतील भ्रष्टाचार, वाईट वृत्ती, प्रवृती यात चिरडला गेलेला विध्यार्थी, शिक्षक आणि समाज याचे विदारक सत्य चित्रित झाले आहे.

सुशिक्षित बेकारीचे वर्णन – स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीमध्ये सुशिक्षित बेरोजगार तरूणाचे वर्णन येते. शिक्षण घेऊन समस्या सुटत नाही नोकऱ्यातील वशिलेबाजी, जातीयवाद, धर्मवाद, अगतिकता, प्रभावषून्यता, नैराश्य, हतबलता अन्य कारणानी तरूण वर्ग सुशिक्षित बेकारीमध्ये जगतो. काहीच्या पोटापाण्याचा प्रश्न सतत नजरेसमोर असतो. काही परिस्थितीला सामोरे जातात तर काही तरूण आत्महत्या करीत असल्याचे वास्तवाभिन्मुख वर्णन कादंबऱ्यातून येते.

भालचंद्र नेमाडे यांच्या बिढार मधून महानगरीय शहरातील तरूणाच्या बेरोजगारीचे चित्रण येते. चांगदेव मित्राची ओळख करताना म्हणतो, "त्यातून नाम्या आणि सारंग सध्या बेकारच होते. बापू अधूनमधून बेकार. त्यांना यांच्या त्यांच्याकडे जाऊन नवीन बातम्या काढणं सांगण आणि स्वतःचा वेळ घालवत चहा जेवण काढणं हेच उद्योग होते". शंकर देखील बेकारीतच होता. त्याचे जीवन स्थिर नव्हते. पेपरमध्ये लेख लिहिणे. प्रकाशकाकडे थोडेफार काम करून जगण्याचा उद्योग करतो. 'हूल', 'जरीला' कादंबऱ्यात मुलाखतीसाठी भेटतो. कानडी असणाऱ्या हूलमणीला बार्शीच्या कॉलेजमध्ये केवळ पाच इन्क्रीमेंट मुळे काढले जाते. जातीयतेच्या गटबाजीत त्याला कोणीही स्वीकारत नाही. मुलाखतीसाठी येणारे प्राध्यापक उमेदवार सुशिक्षित बेकार आहेत. त्याची होणारी घुसमट लेखकाने प्रभावीपणे मांडली आहे.

'कॉलेज' छाया महाजन यांच्या कादंबरीतून येणारा सुषिक्षित बेकार तरूण परमार गरिबीने ग्रासलेला आहे. ज्या कॉलेजात तो तात्पुरती नोकरी करतो. तेथे आज उद्या आपणास नोकरी मिळेल आषेवर असणाऱ्या परमारला नोकरीवरून काढले जाते तेव्हा तो आपण

कुटुंब, भावास सांभाळण्यास असमर्थ आहोत अशी चिठ्ठी लिहून कॉलेजातच आत्महत्या करतो.

'व्हायरस' रवींद्र ठाकूर कादंबरीतून प्रशांत काळोखे, इतिहासकार चिवटे हे सुशिक्षित बेकार तरूण नोकरी नसल्या कारणांनी हतबल झाले आहेत.

'कळप' राजन गवस यांच्या कादंबरीत सुरेश संकेश्वरी, दिलावर व तांबट हे सुशिक्षित बेकार येतात. नोकरीसाठी सुरेशची अगतिकता टोकाची आहे. तो म्हणतो "अलीकडे जगायला नको वाटाय लागलंय. कुठंही कारकुनाची, शिपायाची नोकरी लागली तरी मला हवी आहे" मुस्लिमनांना कोणत्या संस्थेत नोकरी मिळत नाही. कमवता मुलगी बेकार असल्याने घरी मनस्ताप होतो. त्याच्याही मनातील घालमेलीत फरक नाही तो म्हणतो, "मला तर आता सगळचं संपवावं असं वाटाय लागलंय नोकरी तर नाहीच मिळणार". सुशिक्षित बेकार तरूणाची दुरावस्था लेखकाने वास्तवपणे मांडली आहे. स्वकथनपर 'धूळपेरणी' शेषेराव मोहिते यांच्या कादंबरीत श्रीरामचीही अशीच अगतिकता पाहावयास मिळते. आपण घेतलेले षिक्षण निरूपयोगी असल्याचे समजून तो हतबल होतो अशा सुषिक्षित बेकार तरूणांची अगतिकता, अवहेलना, जातीयता, मनाची घालमेल कशी होते हे अचूकपणे मांडले आहे.

समारोप– स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा स्तर सर्व जाती–धर्माच्या लोकांपर्यंत पोहोचला होता. शिक्षण सक्तीचे झाल्याने सर्वसामान्य लोकांनाही शिक्षणाची पिढी बाहेर पडली तशी सुशिक्षित बेकारी वाढत गेली. दुरूख, दारिर्द्य, हाल–अपेष्टा सहन करून शिक्षण घेतलेल्या तरुण वर्गाला शिक्षणातील ठराविक मक्तेदारी, शिक्षण संस्था राजकारणी लोकांचे वर्चस्व जनसामान्यांची दिशाभूल करणारे असल्याची जाणीव साहित्यकृती होऊ लागली. शिक्षण क्षेत्र राजकारणीच्या बाहुपाशात असल्याने गैरमार्गाचा शिरकाव झाल्याचे स्पष्ट होते.

संदर्भ

१) *महाजन छाया,कॉलेज, मेहता पब्लिसिंग हाऊस,पुणे, फेब्रूवारी २०१५,पृ१२*

२) *तत्रैव,पृ क्र.१७*

३) *तत्रैव,पृ क्र.१६*

४) *तत्रैव,पृ क्र.२४६*

५) *नेमाडे भालचंद्र, झूल,पॉप्यलर प्र.२०१५पृ क्र.*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

अवंतिकाबाई गोखले जीवन व कार्य

देशमुख प्रतीक्षा ब्रम्हदेव
संशोधक विद्यार्थी, विभाग– इतिहास
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

★★★

गोषवारा–महाराष्ट्रातील समाज सुधारणा चळवळ विसाव्या शतकात अवंतिकाबाई गोखले यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली अस्पृश्योद्धाराचे कार्य करून अस्पृश्यांना योग्य वागणूक दिली स्त्री वर्गाच्या विकासासाठी महिला समाजाची स्थापना करून त्याद्वारे स्त्री शिक्षणाचे कार्य केले कार्पोरेशन मधील आपल्या कार्याद्वारे समाजाच्या दृष्टीने उपयुक्त असे अनेक कार्य अवंतिकाबाई गोखले यांनी केले की वर्ड्स–

1. अस्पृष्यता निवारण
2. चंपारण्यातील सुधारणा
3. स्त्री विषयक सुधारणा
4. हिंदी महिला समाजाची स्थापना

प्रस्तावना – 19 व्या शतकात स्त्रियांचे समाजातील स्थान अतिशय खालावलेले होते त्यांना कोणतेही अधिकार नव्हते स्त्रियांना अनेक बंधनात जीवन जगावे लागत असे यांना समाजात व कुटुंबात कोणतेही स्थान नव्हते एकोणिसाव्या शतकात ज्यावेळी भारतात सामाजिक सुधारणांना सुरुवात झाली त्यावेळी स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यात आली सती प्रथा बालविवाह स्त्री शिक्षण या संदर्भात अनेक समाजसुधारकांनी सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला सुरुवातीला जरी श्री सुधारणांमध्ये पुरुश मंडळी अग्रस्थानी असली तरी नंतरच्या काळात अनेक स्त्रिया पुढे आल्या व त्यांनी स्वतःलाच स्वतःच्या समस्या सोडविण्याचा व स्त्रियांना संघटित करून त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला. सावित्रीबाई फुले तिच्या भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका म्हणून ओळखल्या जातात पंडिता रमाबाई की ज्यांनी शारदा सदन या संघटनेद्वारे स्त्री उद्धाराचे कार्य केले लक्ष्मीबाई टिळक की ज्यांनी स्मृतिचित्रे या आत्मचरित्रात्मक लिखाणामुळे स्त्रीमुक्ती चळवळ व साहित्य क्षेत्रात प्रसिद्ध पावल्या काशीबाई कानिटकर डॉक्टर रखमाबाई राऊत डॉक्टर आनंदीबाई जोशी आनंदीबाई कर्वे पार्वतीबाई आठवले अशा अनेक स्त्री समाज सुधारक झाल्या की ज्यांनी प्रतिकूल परिस्थितीतून सुधारणा चळवळीला मोलाचा हातभार लावला. ज्या काळात स्त्रियांवर अनेक बंधने लादून चूल व मूल हे स्त्रीचे कार्यक्षेत्र ठरविण्यात आले होते त्या काळात या स्त्रियांनी त्यांच्यावरील बंधने मोडून स्वतःचा उद्धार तर केलाच पण स्त्री वर्गाच्या प्रगतीसाठी त्यांनी आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले अशा समाज सुधारक आन पैकी एक आणि यांच्या प्रभावाने महाराष्ट्रात मुंबई या ठिकाणी हिंद महिला समाजाची स्थापना करणाऱ्या अवंतिकाबाई गोखले या देखील एक स्त्री समाज सुधारक होऊन गेल्या ज्यांनी स्त्रियांना फक्त शिक्षित–अशिक्षित अस नाही तर सुशिक्षित करण्यासाठी आपले संपूर्ण आयुश्य पणाला लावले अशा या स्त्री सुधारक अवंतिकाबाई गोखले यांच्या कार्या या विशयाची माहिती प्रस्तुत शोधनिबंधात देण्यात आलेली आहे

उद्दिष्टे– 1. अवंतिकाबाई गोखले यांच्या अस्पृष्य उद्धाराच्या कार्याची माहिती मिळवणे 2. अवंतिकाबाई गोखले यांनी केलेल्या स्त्री विशयक सुधारणांची माहिती मिळवणे 3. हिंद महिला समाज या संघटनेतील शिक्षणाच्या कार्याची माहिती मिळवणे

गृहितके– 19 व्या शतकात स्त्री सुधारणा चळवळीत अनेक स्त्री यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली अवंतिकाबाई गोखले यांनी अस्पृश्योद्धाराचे महत्त्वपूर्ण कार्य केले हिंदी महिला समाजाच्या स्थापने द्वारे अवंतिकाबाई गोखले यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य केले

व्याप्ती व मर्यादा– स्त्री सुधारणा चळवळी मध्ये अनेक स्त्रियांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली असली तरी प्रस्तुत शोधनिबंधात अवंतिकाबाई गोखले यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात येणार आहे

विषय ज्ञान– 17 नोव्हेंबर 1882साली महाराष्ट्रातील इंदूर या ठिकाणी विष्णुपंत जोशी व सत्यभामाबाई या दापतत्यांच्या पोटी अवंतिका बाईचा जन्म झाला. अवंतिकाबाई हे त्यांचे तिसरे अपत्य पहिले दोन अपत्य गेल्यामुळे अवंतिकाबाई या अतिशय लाडाकोडात वाढलेल्या त्यांच्या शेजारीच राहणाऱ्या झाशीवाले बाई या नावाने परिचित असलेल्या बाईच्या पोटी त्यांना लहानपणी देण्यात येऊन कृष्णा हे त्यांचे नाव ठेवण्यात आले होते घरात त्यांना चिंगी या नावाने संबोधले जात असे ही मुलगी मोठेपणी चांगले नाव काढेल व कीर्ती मिळवेल असे भाकीत झाशी वाल्या बाईंनी करून ठेवले होते. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह गोपाळराव गोखलेचे एकुलते एक पुत्र बबनराव गोखलेंशी करून देण्यात आला होता माहेरी अक्षर ओळख नसलेल्या अवंतिकाबाई यांनी सासरी शिक्षणाची संधी मिळाली गोपाळ गोखले व लक्ष्मीबाईंनी त्यांच्या शिक्षणात मोलाचे योगदान दिले बबनराव यांच्या इच्छेनुसार वयाच्या सतराव्या वर्षी नर्सिंगचे शिक्षण घेऊन मिडवायफरी झाल्या व या शिक्षणाच्या जोरावर भविष्यात त्यांनी समाजसेवेची अनेक कामे केली

1913 साली इचलकरंजीच्या राजे श्रीमंत घोरपडे यांच्या राणींना इंग्लंड ला पोहोचवण्याची जबाबदारी मिळाली त्यातून त्यांना इंग्लंडला जाण्याची संधी मिळाली या प्रवासात अनेक गोश्टी त्यांना पाहिल्यावर शिकावयास मिळाल्या मग ते नेपोलियनचे थडगे असो की त्या ठिकाणच्या श्री संस्था नेपोलियन च्या थडगे पाहून त्यांना राष्ट्र

प्रतीचे प्रेमाची व राष्ट्रापती आपल्या असलेल्या कर्तव्याची जाणीव झाली व स्त्री संस्थांमुळे आपणही आपल्या देशात स्त्रियांना संघटित करून कार्यप्रवृत्त केले पाहिजे ही जाणीव त्यांच्यात निर्माण झाली व भारतात आल्यावर आपल्या या कार्याला लगेचच त्यांनी सुरुवात केली. सुरुवातीला गोपाळ कृष्ण देवधर की जे थोर भारत सेवक व पुण्याच्या प्रसिद्ध सेवासदन संस्थेचे शिल्पकार होते यांच्या मार्गदर्शनाखाली समाज सेवेला प्रारंभ केला सेवासदन मार्फत चालवण्यात येणाऱ्या शिक्षण प्रसार प्रचार प्रसाराच्या कार्यात त्या सहभागी झाल्या अवंतिकाबाई रोज दोन तास निरनिराळ्या वर्गांना शिकवीत असत त्याच बरोबर इंग्लंड मध्ये मॅचेस्टर बर्मिंघम या प्रसिद्ध औद्योगिक क्षेत्रात कामगार विभागात काम करणाऱ्या समाजसेविका चे कार्य त्यांनी पाहिले होते आणि तसेच कार्य आपण आपल्या देशातील कामगारांसाठी केले पाहिजे असे त्यांना वाटू लागले म्हणून त्यांनी लालबाग–परळ या कामगार वस्तीत दर आठवड्यात तीन तास जाऊ लागल्या तेथील कामगार स्त्रियांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे शिक्षणाची आवश्यकता त्यांना समजावून सांगणे आणि लहान मुलांची जोपासना कशी करावी याचे प्रात्यक्षिक दाखवणे अधिक कार्य त्या करू लागल्या भारतातील कामगार स्त्रिया कामावर जाताना आपल्या लहान मुलांना घरात कोंडून ठेवीत आणि त्यांची झोप मोडू नये म्हणून त्यांना यापुढे ती पद्धत किती चुकीची आहे याची जाणीव अवंतिका बाईंना होती इंग्लंडमध्ये त्यांनी पाहिले होते की गिरणीत कामगार स्त्रियांच्या लहान मुलांवर देखरेख करणारी शिशू संगोपन गृह असतात त्यावेळी भारतात असे एकही शिशू संगोपन गृह नव्हती अवंतिका बाईंनी गिरणी विभागात अनेकांच्या सहकार्याने शिशु संगोपन गृह स्थापन केले. अस्पृश्य वर्गाच्या प्रगतीसाठी आपण कार्य केले पाहिजे असे त्यांना वाटत होते त्यासाठी अस्पृश्य समाजात जाऊन त्यांच्यात मिसळून त्यांच्या त्यांच्या अडीअडचणी समजावून घेत असे त्यांच्या सुख–दुःखात सहभागी होत असत अस्पृश्य समाजाच्या सहवासात आल्यानंतर संक्रांतीचा सण त्यांनी कधीही घरी साजरा केला नाही प्रत्येक संक्रांतीच्या दिवशी एक डबाभर तिळाचे लाडू घेऊन त्या अस्पृश्य वस्तीत जात असत आणि तिथे हळदी कुंकाचे समारंभ करून त्या सर्व अस्पृश्य महिलांकडून तिळगुळ घेत व तसेच या कामात काकासाहेब खाडिलकर यांच्या पत्नी सौ गौरीताई खडीलकर यांचे त्यांना सर्वात अधिक सहकार्य मिळाले.

1916 चे लखनऊ अधिवेशनात त्या सहभागी झाल्या होत्या या अधिवेशनात गांधीजींबरोबर त्यांचा परिचय झाला व यानंतर गांधीजींच्या प्रत्येक कार या कार्यात त्या सहभागी झाल्या गांधीजींच्या चंपारण याच्या सत्याग्रहात त्या सहभागी झाल्या व बँड ठरवा या गावात सहा महिने वास्तव्य करुन श्री शिक्षणाचे व समाज जागृतीचे कार्य त्यांनी केले. बरहरवा या ठिकाणी स्त्रियांसाठी व मुलींसाठी त्यांनी जे कार्य केले त्यामुळे त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला होता आपण स्त्रियांना संघटित करून त्यांच्या उद्धारासाठी कार्य केले पाहिजे हा विचार त्यांच्या मनात निर्माण झाला व त्यातूनच 27 नोव्हेंबर 1918 सालि हिंद महिला समाज या संघटनेची स्थापना करून श्री उद्धाराच्या कार्याला त्यांनी सुरुवात केली हिंदी महिला समाजात द्वारे स्त्रियांसाठी वाचनालय सुरु करण्यात आली त्याचप्रमाणे स्त्रिया इंग्रजी व हिंदी भाशेचे ज्ञान देण्यासाठी ही वर्ग सुरू करण्यात आले श्री यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी विविध कला कौशल्याचा शिक्षणाचा प्रसारही स्वर्गात करण्यात आला एवढेच नव्हे तर स्त्रियांमध्ये राष्ट्राभिमान जागष्त करण्याच्या दृष्टीने 1920 सालापासून अवंतिका बाईंनी समाजात खादीचा प्रचार सुरू करून सूत कातण्याची वर्गही सुरू केले त्याचबरोबर महात्मा गांधी लोकमान्य टिळक व श्री गुरव गोपाळ कृश्ण देवधर यासारख्या प्रसिद्ध पुढाऱ्यांची भाषणे होत हाऊसफुल अधिवेशनातही अवंतिकाबाई यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवकांचे पथक त्या ठिकाणी कार्यरत होते अवंतिका बाईंना मूलबाळ नव्हते हिंद महिला समाज ही संस्था त्यांची मानसकन्या होती सतत 31 वर्ष या संस्थेचे पालनपोषण त्यांनी केले

1923 साली अवंतिका बाईंचा मुंबईच्या म्युनिसिपल कॉर्पोरेशन मध्ये प्रवेश झाला कॉर्पोरेषन मध्ये सभासद म्हणून गेलेल्या पहिल्या स्त्री सभासदांपैकी त्या एक होते त्या ठिकाणीही त्यांनी भरीव अशी कामगिरी केली शाळेत जाणारी मुले दुपारच्या वेळी फेरीवाल्याकडुन जो जिन्नस घेऊन खातात ते अस्वच्छ व अनारोग्यकारक आहे म्हणून त्यांनी ते खाद्यपदार्थ विकण्यावर बंदी घातली त्याचप्रमाणे चौपाटीवर होणारे घाण अधिक कार्यक्षमतेने साफ करून घ्यावी असाही एक ठराव त्यांनी पास करून घेतला. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतही त्या सहभागी झाल्या व त्यासाठी त्यांना तुरुंगवास भोगावा लागला हिंद महिला समाज असो कॉर्पोरेशेनची बैठक असो कॉंग्रेसची सभा असो वा घरातील वागणूक असो प्रत्येक बाबतीत शिस्त हा त्यांचा आधी दंडक होता

सारांश– अषाप्रकारे महाराश्ट्रातील समाज सुधारणा चळवळ विसाव्या शतकात अवंतिकाबाई गोखले यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली अस्पृष्योद्धाराचे कार्य करून अस्पृष्यांना योग्य वागणूक दिली स्त्री वर्गाच्या विकासासाठी महिला समाजाची स्थापना करून त्याद्वारे स्त्री षिक्षणाचे कार्य केले कार्पोरेषन मधील आपल्या कार्याद्वारे समाजाच्या दृश्टीने उपयुक्त असे अनेक कार्य अवंतिकाबाई गोखले यांनी केले

संदर्भसूची–

1. *तिवारी विनायकय आदर्श हिंदू महिला, व्हीनस प्रकाशन, मुंबई 1950*
2. *गाठाळ एस एसय भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन, कैलास पब्लिकेशन ,औरंगाबाद, जुलै 2013*
3. *हिंद महिला समाज अहवाल, सुवर्ण महोत्सव,1968*
4. *हिंद महिला समाज अहवाल ,अमृत महोत्सव 1968 ते 1993*
5. *प्रसाद राजेंद्रय चंपारण्य मे महात्मा गांधी, आत्माराम अँड सन्स, दिल्ली,1955*
6. *ढेरे अरुणाय विस्मृती चित्रे,श्रीविद्या प्रकाशन, पुणे, 25 नोव्हेंबर 1998*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

गोंड आदिवासी जमाती लोकसाहित्य आणि लोकगीते

राजेश्वर किसन खुडे
Research student
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

★★★

प्रस्तावना – जगातील सर्वच देशात आदिवासी ही जमात सर्वात जास्त आहे . जंगलात पर्वत रांगात दऱ्याखोऱ्यात राहणारी जमात म्हणून आदिवासींना ओळखले जाते. भारतीय संस्कृतीला प्राचीन आशा स्वरुपाची दीर्घ परंपरा प्राप्त झाली आहे भारतातील प्रचलित समाजव्यवस्था अनेक जाती धर्म यांनी बनवलेली आहे स्वातंत्र्यप्राप्तीच्या अगोदरपासून भारतीय लोकशाहीत्यांच्या अभ्यासाला विल्यम जोन्स थांमस जान आब्रे सर थामस वॉल्टर थामस नाइटले तामस राईट यासारख्या मानवंशशास्त्रज्ञांनी खऱ्या अर्थाने शास्त्रीय स्वरूपाची बैठक प्राप्त करून दिली

गोंडा आदिवासींची लोकगीतांचा मूळ असा कोणी नाही आदिवासी लोकसाहित्य जन्मास आली तीच मूळ जंगलाच्या घनिष्ठ संबंधातून यामुळे लोकगीते जन्मली वाढली ती जंगलातच आदिवासींचा जंगलाशी घनिष्ठ संबंध येतो त्यांच्याइतके जंगलातील वन औषधांचे ज्ञान कुणाजवळही नाही आदिवासी समाजाचे संगीत नृत्य सण–उत्सव यात वेगळेपण दिसून येते ही आदिवासी लोकसाहित्य व लोकगीतातील त्यांची जीवनप्रणाली आहे.

गोड ही दविडाची प्रमुख जात आहे. जंगलात राहणाऱ्या जमातीपैकी एक जमाज म्हणून तिची ओळख आहे गोडांची वस्ती गोदावरी व विध्यापर्वत यामध्ये आढळते. सर जॉर्ज ग्रीअसनच्या गोंडी बोली तेलगू पेक्षा तमिळशी व कन्नडसी जास्त मिळतीजुळती वाटते. ही जमात महाराष्ट्रातील चंद्रपूर–गडचिरोली अमरावती मध्ये आढळतील गोंडवनावर मराठ्यांचे राज्य प्रस्थापित होईपर्यंत गोडांचे राज्य होते. गोंडांचा वंशज स्वतः स राजगोड महनवीत असे ते स्वतःस गोंड संस्कृती व भाषेचे खरे प्रतिनिधी समजतात. गोंड या शब्दांचा अर्थ जंगलात राहणारा गोंड लोक स्वतःला कोया किंवा कोयतुर म्हणून घेणे पसंत करतात गो म्हणजे जंगल आणि अड म्हणजे मूळ निर्मितीची जागा होय. गोंडांचा एकंदर 40 जमाती आहेत. त्यापैकी महाराष्ट्रात पंधरा आहेत आणि त्याचबरोबर गोंड जमातीचे प्रकार खालील प्रमाणे आहेत. एक राजगोंड दोन धुर्वे तीन खातेला चार माडिया गोंड

संशोधन विषयाची उद्दिष्टे– १) गोंड आदिवासींच्या साहित्यांचा व लोकगीतांत काही साहित्यिक मूल्य आहेत काय याचा शोध घेणे

२) गोंड आदिवासी लोकसाहित्यातून रसनिष्पत्ती होताना दिसून येते काय ? हे जाणून घेणे

३) आदिवासी गोंड समाजातील भाषिक दृष्टीने अध्ययन करून मांडणी करणे

४) आदिवासी गोंड लोकगीतांचा साहित्यिक प्रभाव आजच्या नव साहित्यावर झाला आहे काय याचा शोध घेणे

५) गोंड आदिवासींच्या सर्वांगीण अभ्यासासाठी लोकगीत महत्त्वाचे माध्यम आहे यांची विश्लेषणात्मक मांडणी करणे

संशोधन विषयाची गृहीतके – १) गोंड आदिवासी लोकसाहित्यांच्या लोकगीतांचे साहित्य पोहोचण्यास कमी पडते.२) गोड आदिवासी लोकसाहीत्यांचा व लोकगीतांचा जगासमोर प्रभावीपणे मांडण्यात असक्षम ठरते. ३) गोंड आदिवासीच्या जमातीतील लोकशाहीत्यांचा वेंदना विद्रोह व नकार मांडण्यात आला. ४) आदिवासींच्या जमातीच्या लोकसाहित्यांचे व लोकगीतांचे साहित्य व्यापकप्रमाणात स्वीकारले गेले नाही.

लोकगीत म्हणजे काय – लोकवांगमययांचा बराच मोठा भाग लोकगीतामध्ये मोडतो. लोकगीतांचे महत्व विषद करताना ना. रा. शेंडे आपल्या लोकगीतातील काव्य आणि कल्पना वैभव या निबंधात लिहितात. लोकशाहीत्यांची जी अनेक अंगे उपांगे आहेत. त्यात लोकगीत हे विशेष भरदार अंग आहे ते तेजस्वी अंग म्हणजे खेडूतांच्या जीवन संस्कृती रिती रिवाज आदिचे जीवन चित्र उमटविनारा अगदी स्वच्छ आरसाच होय.

लोकगीताला इंग्रजीमध्ये थ्वसोवदह म्हटले जाते. लोकसाहित्य बरोबर लोकगीतांचा ही अभ्यास जागतिक पातळीवर झाला आहे. अनेक विचारवंतांनी आपल्या शब्दात लोकगीतांचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. अलेक्झांडर क्राप यांचे मत डॉ. शरद व्यवहारे यांनी दिली आहे त्यानुसार लोकगीत हे भावगीत असून लोकगीतांचा उगम निरक्षरात होऊन त्यांचा कता अनामिक असतो. लोकगीतांची निर्मिती भूतकाळातील असून कित्येक शतकांची परंपरा या गीतांना लाभलेली असते. वरील मतानुसार लोकगीत ही प्राचीन काळात निर्माण झालेली व परंपरेने चालत आलेली असून ती अनामित कर्त्यांची भावगीत निर्मिती आहे.

आदिवासींच्या लोकगीता विषयी माहिती – रंगीबेरंगी पानाफुलांच्या नेत्रदीपक झुपकयाने मनोहरी नी देखणी सजावट अंगाअंगावर धारण करणाऱ्या महावस्त्रांना रात्रीखुशीने पेललेल्या दऱ्याखोऱ्यातील दुनिया म्हणजे आदिवासींची दुनिया. शहरापासून लांब दूरवर असलेल्या या

दुनियेतील माणस हौस मौजेने ऐस पैस मैदानात येऊन नाचायला व गायाला लागली म्हणजे धरित्रीच्या अंगावर समाधानाचे रोमांच फुलू लागतात. अशावेळी पहाडी मुलुखातील मंद शितल वारा शिळ घालून धावून पुढे येतो. पानाफुलांमधील पार्श्व संगीत उभे करतेकृ मग निजायला धरित्री उशिला धोंडा अनू पांघरायला आभाळ घेत निसर्गाच्या कुशीत वावरताना ही मंडळी एवढी आनंदी कशी ह्यातलं गणित काही दिल्यास सुटतच नाही. आदिवासींची ही दुनिया अदभुताचे पंखलयाली गंधर्व कन्या आहे. ती देखणी तसेच मोहमयीही आहे.

आदिवासींना स्वतःची भावना विचार कल्पना होती. या भावना विचार कल्पना त्यांची आपल्या गीतातून प्रकट केलया आहेत. वाटयाला येणाऱ्या सुख दुःखांच्या वेळ गीतांनी त्यांना सहारा दिला.

गीतामुळेच त्यांना धैर्य शक्ती मिळत होती.

आदिवासी लोककथा,– आदिवासी काही विशिष्ट जात नावहे तर समाज वैशिष्ट्ये धारण करणाऱ्या अनेक जमातींचा तो एक समूह आहे. भारतातील अनेक जमाती त्यात मोडतात.

इतिहासाचा एक नियम आहे. ज्या समाजाकडे पाशवी तांत्रिक ज्ञान असते तो समाज इतिहास लेखनावर ताबा मिळतो. त्यामुळे इतर समाज घटकांचा इतिहास हळुहळु लोप पावतो.

आदिवासी लोकगीते – आदिवासी साहित्याचा विचार करताना तिसरा भारत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आदिवासी जमातींचे सांस्कृतिक भावविश्व आदिवासी लोकगीतांतून प्रकट होते. भौगोलिकदृष्ट्या भारताचा २० टक्के भूभाग आदिवासी क्षेत्राने व्यापलेला आहे. महाराष्ट्राचा विचार करता 47 प्रमुख आदिवासी जमाती महाराष्ट्रात आहेत अनेक उप जमातीही आहेत. यापैकी 74 आदिवासींच्या बोलीभाषा अस्तित्वात आहेत.

आदिवासी लोकगीतांचे वैशिष्ट्ये – आदिवासी लोकगीतांची स्वतःची काही वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या लोकगीतात सौंदर्य जाणिवा व प्रेरणा आहेत.ती स्वयंपूर्ण आहेत. डॉक्टर विनायकराव तुमराम यांनी आदिवासी लोकगीतांची ठळक वैशिष्ट्ये सांगितली आहेत ती पुढीलप्रमाणे

आदिवासी लोकगीते ही आदिमाचया अस्तित्वा इतकीच प्राचीन असतात. जीवनातील बहुतेक महत्त्वाच्या प्रसंगांना उद्देशून ही लोकगीते असतात. आदिवासी लोकगीते ही गेय स्वरूपाची असून ती त्यांच्या नृत्याच्या वेळी पारंपारिक वाद्यांच्या संगीतावर गायली जातात. नृत्य वाद्याशिवाय आदिवासी लोक ही लोकगीते सहसा गात नसतात. आदिवासी लोकगीतांचा कवी वास्तविक कवी नसून गायक असतो. आदिवासींच्या पथक संस्कृतीचे प्रतिबिंब त्यांच्या लोकगीतात पडलेले आढळून येते.

आदिवासी लोकगीते त्यांच्या समाज जीवनातून आकारास आलेले आहेत. लोकगीते व्यक्ती समाजजीवनावर आधारित आहेत. त्यांच्या लोकगीतांचा महत्त्वाचा विशेष त्यांच्या काव्यात्मक यामध्ये आहे. अशा काव्यातील भावविष्व तर रम्य आणि सौंदर्य संपन्न आहे. ही त्यांच्या बोलीभाशेतून आलेले आहेत. रोजच्या जीवनातील बोल या लोकगीतात आलेले असल्याने लोकगीताने वेगळेपण दिसून येते

गोंड जमातीचे वर्गीकरण – भोगोलीक निकशावरील वर्गीकरण दक्षिण भारतात व पश्चिम भारतात गोंड जमात आढळते. दक्षिण भारतात तामिळनाडू केरळ कर्नाटक आंध्र प्रदेश भाषा या निकशावरील वर्गीकरण दविडियन भाषा समूह यात गोंड कोलाम तोडा कोया परध ान आहे.

गोंड जमातीचे सामाजिक जीवन – गोंड ही जमात गोदावरीच्या तसेच बस्तर आणि सातपुडा पर्वतांच्या रांगात बसलेली आहे. गोंड मुळचे रहिवासी दक्षिण भारतातील असावे असे काही तज्ज्ञांचे मत आहे. साधारण जंगलाच्या पेनगंगा गोदावरी इंद्रावती अशा नद्यांच्या जवळ वस्ती आढळून येते. या लोकांची बोली गोडी आहे.

गोंड जमातीचे संस्कृती जीवन – गोंड जमातीत सण– उत्सवाला विशेष महत्व आहे. माडिया भाषेत सणाला पंडूमा म्हणतात. शेतात बी पेरणे नवीन धान्याचे पिक काढणे. नवी फळ काढणे व खाणे इत्यादी. सर्व गोष्टीसाठी गावकरी सामुदायिकरीत्या सन साजरी करतात. त्या दिवशी पोलो म्हणजे सार्वजनिक सुट्टी जाहिर केली जाते. या सणाची पूजा पेरमा किंवा पुजारी करतो पेरमा धार्मिक विधी करतो त्याला वनौपधीचेही ज्ञान असते. पुजारी शकुन आणि अपशकुन सांगतो काळी जादू त्याला येते. दोन जमातीत मृत व्यक्तीला पुरण्याची प्रथा आहे. मूर्तपूर्वजांची पुजा करणे बंधनकारक असते. माडिया गोंड मध्ये दहाव्या दिवशी किंवा केव्हाही करसड हा धार्मिक विधी करण्यात येतो. मृत व्यक्तींच्या स्मरणार्थ एक मोठा दगड उभारण्यात येतो त्याला कलबंडा म्हणतात. गोंड जमातींचा आता बाही बाह्य जगासी संपर्क आल्यामुळे त्यांच्या या रूढी–परंपरामध्ये फरक पडत चाललेला दिसून येतो.

गोंड जमातीचे शैक्षणिक जीवन – गोंड जमातीची शैक्षणिक विकासात अतिशय कमी प्रमाण येते. प्राथमिक शिक्षण गोंड जमातीत दिल्याषिवाय शिक्षणाची प्रगती होणे कठीण आहे. सन 2011च्या जनगणनेनुसार राज्यातील एकूण आदिवासी साक्षरता प्रमाण ५२.२ टक्के आहे. गोंड जमातीचे साक्षरता प्रमाण ७ टक्के आहे. पूर्व महाराष्ट्रात आदिवासी कल्याण योजने अंतर्गत शिक्षित गोंडांना नोकर्या दिल्या गेल्या. आदिवासी केंद्रे व राज्यसरकार यांनी अनेक योजना राबविले आहेत. ६ ते १४ वर्षे या वयोगटातील आदिवासी विद्यार्थ्यांना पर्याय शिक्षण मोफत देण्यात यावे व विद्यार्थ्यांना अनौपचारिक शिक्षण व प्रौढ शिक्षण मिळावे यासाठी 100 लोकसंख्या असलेल्या परिसरात प्राथमिक शाळा उघडणे यासारखे व अंशकालीन वर्ग व पाळणाघरे ही शासनाने सुरू केली आहेत.

समारोप – आदिवासी समाज शिक्षणाचा आधार घेऊन नोकरी

व्यवसायाकडे ते मार्गक्रमण करू लागला आहे. तसेच राजकीय ध ार्मिक सामाजिक क्षेत्रांचे महत्व त्यांना पटायला लागले आहे. पण ज्यू व निग्रो लोकांच्या तुलनेत भारतीय आदिवासी खूप खूप मागे आहेत. त्यांनी आजूनही पूर्णपणे आपला विकास व्हावा या दृष्टीने पाऊले उचललेली नाही. त्यांना ब्राह्मणाच्या वर्चस्वाखाली येणे कध ीच पसंत नाही. आदिवासी संस्कृतींची जडणघडण व विकास आदिवासी समाजाने मोठ्या कौषल्याने केला आहे. आदिवासी समाज एका छताखाली आणण्यासाठी विविध संघटनांच्या माध्यमातून प्रयत्न होत असली तरी त्याला पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नाही. जागतिक पातळीवर आदिवासींची एक विचार प्रणालीची प्रक्रिया सुरू झाली तरी तिला देश सीमांचे बंधन आहेत. आदिवासीसाठी शासनाने व वैध ानिक संरक्षण दिले.

संदर्भ ग्रंथ

१) *डॉ, तुकाराम षेगटे आदिवासी साहित्य नियतकालिकातील डिंपल पब्लिकेषन नवघर वसई जि. ठाणे पहिली आवृत्ती ५ डिसेंबर पान नंबर १०६*

२) *डॉ,ऊशा किरण आक्रोष आत्राम आदिवासी वीर पुरुश . प्रकाशन अहेरी संमेलन आदिवासी भारत १९९४ विशांक यवतमाळ पान नंबर 06*

३) *डॉ, सौ. शैलजा देवगावकर .आदिवासी विश्व .आनंद प्रकाशन नागपूर .आवृत्ती पहिली जुलै २००१ पान नंबर १६१.*

४) *सुनील शिंदे .आदिवासींचे शिक्षण आणि दुर्गम आदिवासी अकोले तालुका प्रकाषन सुगावा पुणे . आवृत्ती पहिली डिसेंबर १९९९ पान नंबर ७०.*

५) *डॉ, रामशेट्टी शेटकार. प्रा. बालाजी शिंदे. लोकसाहित्य काल आज आणि उद्या. अरुण प्रकाशन लातूर*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

शिवकालीन महसूल व्यवस्था : एक अभ्यास

प्रा. गिरी सचिन रमेश
सह प्रा.
मधुशाली कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय, सलगरा दि.

★★★

संक्षेप – मराठी राज्याच्या उत्पन्नाचा विचार करता किती प्रकारे कर आकारले जात होते याची कल्पना येते. समाजातील कोणताही घटक करापासून मुक्त नव्हता. सरकारी खजिण्यात प्रत्येकाला काहीं ना काही भर घालावी लागत होती. मिठावरील करातून तर कोणाचीही सूटका नव्हती. मध्य काळात उत्पन्नाचे प्रमुख साधन शेती असल्यामुळे शेतसारा चुकविता येत नव्हता. कारण सरकारची सारी मदार जमिन महसूलावरच होती.

बीज शब्द :– छत्रपती शिवाजी महाराज यांची महसूल विषयक धोरण, महसूल कर पध्दत, सरदेशमुखी आणि चौथाई इ. तत्वज्ञान

प्रस्थावना :– प्रत्येक स्वतंत्र राज्याची काही कायम स्वरूपाची ध्येय धोरणे असतात. त्या शिवाय राज्याचे स्वतंत्र व सार्वभौम स्वरूप दिसून येत नाही. राज्यांच्या निश्चित ध्येय धोरणामुळे राज्यकारभाराची दिशा स्पष्ट होते. त्याला विशिष्ट असा द्रष्टीकोण प्राप्त होत असतो. ते त्या त्या राज्याचे नैतीक अधिष्ठान बनते. त्यावरच राज्याची भरभराट होत असते. राज्याचे अस्तित्व टिकून आपले सार्वभौमत्व देखिल अबाधित राहते.

मराठयांच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीला अद्वितीय महत्व आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापणा केली. वडीलार्जीत जाहागिरीमध्ये धैर्य, शौर्य, चातूर्य आणि राजकीय मुत्सद्देगिरी यांचा अवलंब करून त्या छोटयाश्या जहागिरीचे स्वतंत्र राज्यात रूपांतर केले. शिवाजी महाराज जसे उत्तम योध्ये, युध्द शास्त्र निपून, लोकहितवादी, प्रजाहितदक्ष, महापराक्रमी, धर्मसहिष्णू राजे होते. तत्वतच ते ' बहुत जनासी आधारू ' असे श्रीमंत योगी जाणते, रचनात्मक कार्य करणारे काळाच्या पूढे जाणारे मुत्सद्दी, उत्तम प्रशासक शेतकरी व कष्टक–यांचे कैवारी होते. राज्य सर्वांचे आहे रयतेचे आहे हा आत्मविष्वास त्यांनी प्रजेमध्ये निर्माण केला.

प्रत्येक कालखंडातील शासकाने तत्कालीन काळात कृषी विषयक धोरण ठरवले होते. काही शासकांचे धोरण हे अन्यायकारी होते तर काहींचे जनकल्यानकारी होते. अन्यायकारी पध्दतीतूनच कृशी कर व्यवस्था जन्माला आली. जमिनदार व सावकार यांच्या कडून मोठया प्रमाणात शेतकऱ्यांची पिळवणूक करण्यात आली. हे धोरणवजन्मापर्यंत असेच सुरू राहीले.परंतू शिवकाल खंडामध्ये महाराजांनी बदल केलेला दिसून येतो.

संशोधन पध्दती :– प्रस्तूत संशोधन निबंधासाठी दुयम संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे. त्या मध्ये ऐतिहासिक संदर्भग्रंथ, साप्ताहिके, इ. दूय़यम साहित्याचा उपयोग करण्यात आला आहे.

उद्देश

1. शिवकालीन महसूल व्यवस्था जाणून घेणे.
2. शिवरायांचे शेतकरी कष्टकरी यांच्या बद्दलची तळमळ याचा आभ्यास करणे.
3. शिवकालीन उत्पनाच्या प्रमुख साधनांची माहिती घेणे.
4. शिवाजी महाराजांचा लोक कल्याणकारी दृष्टीकोन जाणून घेणे.

गृहितके

1. शिवकाळात महसूल अधिकारी सरकारी नियुक्त होते.
2. शिवकाळातील राज्यांच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन शेती हे होते.
3. शिवाजी महाराजांचे शेती विषयक धोरण शेतकरी पूरक होते.

शिवाजी महाराजांची महसूल व्यवस्था :– न्या. रानडे यांच्या मते शिवरायांची सर्वश्रेष्ठ कामगिरी म्हणजे स्वराज्य अथवा राष्ट् निर्मिती हे होय. मात्र थोडी दुरूस्ती करून असे म्हणता येईल की त्यांनी निर्माण केलेली नूतन सष्टी टिकून ठेवण्यासाठी ही सत्ता आर्थिकदृष्टया प्रबळ करण्याचा काटोकाट प्रयत्न केला. यासाठी त्यांनी शेती व्यवसाय उद्योग विकास व त्यातून उत्पन्नात वाठ कशी होईल याचा सतत विचार करून आपले आर्थिक धोरण निश्चित केले.

शिवाजी महाराजांच्या महसूल पद्धतीवर निजामशाही, आदिलशाही व मोगलयांच्या महसूल पद्धतीचा कमी अधिक प्रभाव पडलेला दिसून येतो. डॉ. बाळकृष्ण 'शिवाजी द ग्रेट' या ग्रंथात लिहितात 'शिवकाळात विजयनगर, निजामशाही, आदिलशाही व मोगलशाही अशा चार सामशज्यातील पद्धतीचा मिलाफ करण्याचे आवघड काम शिवाजी महाराजांच्या पुढे होते.' प्रत्येकाच्या आधिका–याची श्रेणी ही वेगळी असे त्यांचे अधिकार महसूलाची आकारणी तसेच जमिन महसूल व इतर उत्पन्नाची साधणे यामध्ये सुद्धा फरक असे. अशा स्थितीत या सर्व पद्धतीमधील चांगले गुण घेउून दोष काढून टाकण्याचे महत्वाचे काम महाराजांनी केले. 17 व्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात

जी राजकीय धामधूम होती तीचा फायदा घेउून शिवाजी महाराजांनी स्वतःची अशी महसूल पद्धत महाराष्ट्रात लागू केली. शिवाजी महाराजांच्या काळात जमीन महसूल हाच महसूलाचा मुख्य आधार होता. महसूलाच्या वसूलीसाठी राज्याचे दोन भाग पाडण्यात आले होते.

1. **स्वराज्य** : स्वराज्य म्हणजे शिवाजी राजांच्या ताब्यात असलेला प्रदेश
2. **मोगलाई** : मोगलाई म्हणजे मोगलाईच्या ताब्यात असलेला पण शिवाजी महाराजांना खंडणी देणारा प्रदेश

महसूल विभागाची रचना

1 विभाग होते एका विभागात अनेक सुभे असत.
2. सुभा :– दिड ते तीन लाख होन महसूल जमा होणारा प्रदेश
3. परगणा :– परगण्यात चाळीस ते साठ खेडयांचा समावेष होत होता.
4. महाल कार्यात
5. तपे तर्फ :– हा सर्वात छोटा विभाग होता.

शिवाजी महाराजांच्या जमिन महसूलाच्या संदर्भात खालील तीन व्यक्तींनी सहकार्य किंवा प्रयत्न केले ते प्रयत्न कोणी व कोणत्या वर्षी केले ते या प्रमाणे

1. दादोजी कोंडदेव :– इ. स. 1636
2. मोरोपंत पिंगळे :– इ. स. 1648
3. अण्णाजी दत्तो :– इ.स. 1678

दादोजी कोंडदेव यांनी लागवडीखाली आणलेल्या जमिनीवर पुढील प्रमाणे कर आकारणी केली.

1. पहिल्या वर्षी बिघ्याला 1
2. दुस–या वर्षी 1 बिघ्याला 3
4. चौथ्या वर्षी 1 बिघ्याला 9
5. पाचव्या वर्षी 1 बिघ्याला 10
6. सहाव्या वर्षी 1 बिघ्याला 20

जमिन महसूलाची आकारणी करताना पुढील तीन घटक विचारात घेतले जात.

1. जमिनीची प्रत
2. जमिनीस मिळणारे पाणी
3. जमिनीत काढलेले पिक. एकाच वर्षात जमिनीत किती व कोणती पिके घेतली जातात ही बाब विचारात घेतली जाईल.शेतसारा आकारणी करताना लागवडीखाली असलेल्या जमिनीचा विचार केला जाई. पडीक जमिन, जंगले, कुरण इ. जमिन जी एकूण गावच्या मालकीची असे त्यावर सारा आकारणी केली जात नसे. सारा आकारणी करताना नगदी पिक, खरीप पिक, रबी असे वर्गीकरण केले जाई. उस पिकासाठी सरकारी कालव्याचे पाणी घेतले असेल तर आडीच होन सारा एका बिघ्यास आकारत. जर उसासाठी विहिरीचे पाणी वापरले असेल तर दोन होन सारा एका बिघ्यास आकारला जाईल. जेंव्हा डोंगराळ व पडिक जमिन लागवडीखाली प्रथम आणली जाईल तेंव्हा प्रथम काहीं वर्ष सारा आकारला जात नसे; पण नंतर मात्र या जमिनीवरही सारा आकारणी केली जाई पण ती मापक असे. बागायती जमिनीवरचा सारा आकारताना कालव्याचे पाणी व विहिरीचे पाणी हा फरक ही विचारात घेतला जाई. सारा आकारणी बाबत शेतक–यांची काही तक्रार असेल तर त्याची राहनिषा केली जात असे. गावच्या पाटलास दप्तरात दुरूस्ती नोंद करण्याचा आदेश दिला जात होता.

आण्णाजी दत्तो यांनी शिवाजी महाराजांच्या काळात महसूलाची पुनर्रचना केली होती. प्रथम प्रत्येक गावातील लागवडीखाली असणा–या जमिणीची यादी तयार करून प्रत्येक जमिनीत कोणते पिक येते याच्या यादया तयार करण्यात आल्या होत्या. डोंगराळ, दलदलीची व काळी जमिन या गटात जमिनीचे वर्गीकरण केले जाई. जमिन मोजण्यासाठी काठीचा वापर केला जात असे. त्या काठीला शिवशाही काठी म्हणत ती काठी पाच हात लांब व पाच मुठी लांबीची असे. वीस चौरस काठयांचा एक पांड व वीस पांडाचा एक बिगा होई. 120 बिघ्याचा एक चावर होत असे. जमिनीच्या मोजणीचे काम महारांकडे असे. जमिनीची प्रत ठरवित असताना 1,2,3,4 असे गट पाडले जात त्यास अव्वल, दमू, सीम व चारहम अषी नावे होती.

महसूल अधिकारी :– शिवाजी महाराजांनी पुढील महसूल अधिकारी वर्गांच्या नेमनूका केल्या. प्रांताच्या प्रमुखाला सुभेदार म्हणत. त्याच्या मदतीला खालील अधिकारी होते. 1. दिवाण, 2. मुजुमदार, 3. फडणीस, 4. सबनीस, 5. कारखानीस, 6. चिटणीस, 7. जमादार, 8. पोतनीस. सुभेदाराला 400 होन पगार होता तर मुजुमदारास 100 ते 125 होन पगार होता. सर्व महसूल अधि ाका–यांना रोख पगार दिला जाई. शिव पूर्व काळात गावच्या महसूलाची विक्री बोली लावून केली जात असे. त्यात जनतेचे प्रचंड शोषण होई. पण छत्रपती शिवाजी महाराजांनी ही पद्धत बंद केली. त्यांनी जमिनदारी पध्दतीऐवजी रयतवारी पध्दत सुरू केल्याने सामान्य शेतकरी–राजा यांच्या प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाले. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी सा–यात सुट देण्याची पध्दत त्यांनी अमलात आणली. शिवाजी महाराजांच्या महसूल पध्दतीमुळे जनतेचा फायदा झाला असे मत ग्रॅंड टफ ने हिष्ट्री ऑफ द मराठास' या ग्रंथात मांडले.

संभाजीराजाला शिवाजी महाराजांच्या एकूण प्रशासनात सुधारणा करण्याची संधी मिळाली नाही. एक तर त्यांची कार किर्द 9 वर्षाची व तिही युद्धस्थितीतील होती. राजाराम महाराजांना संकटामुळे सुध ारणा करणे शक्य झाले नाही. त्यामुळे शिवाजी राजांनी निर्माण केलेले प्रशासन पेशवाईस प्रारंभ होईपर्यंत कायमच होते.

शिवाजी महाराजांची कर पध्दती :– जमिन महसूल हे शिवकाळात महत्वाचे साधन होते. त्याशिवाय जे कर लावले जात ते खालीलप्रमाणे होते.

1. पायपोसी :– चांबारावरील कर
2. सिंहासनपट्टी :– राज्याभिशेकाच्या वेळी सिंहासन पट्टीद्वारे पैसा उभा केला जाई.
3. मोहतरफा :– व्यापा–याकडून हा कर वसूल केला जाई.
4. सराफी पट्टी :– सोन्याचांदीचा व्यवसाय करणा–यावर हा कर लावला जाई.
5. जकात कर :– पर राज्यातून स्वराज्यात येणा–या व स्वराज्यातून बाहेर जाणा–या प्रत्येक वस्तूवर कर लावला जाई.
6. कारागिरावरील कर :– परीट, सुतार, शिंपी, नाव्ही, सोनार, गुरव, कुंभार, कोळी इ. फ व्यवसायिकावर हा कर होता.
7. मिठावरील कर.
8. मेटवाणी पट्टी :– सरकारी अधिकारी किंवा साधुसंत फिरतीवर असताना त्यांच्या खाण्यापिण्यासाठी म्हणून हा कर वसूल केला जाई
9. मांग टाका :– हा कर साळी, कोष्टी, मोमीन या विणक–यांकडून वसूल केला जाई.

असे वरील कर असून जंगलापासून मिळणारे उत्पन्न, टाकसाळी पासून मिळणारे उत्पन्न, मच्छीमार व खाणीपासून मिळणारे उत्पन्न ही उत्पन्नाची प्रमुख साधने होती. त्या शिवाय दंड न्यायालयीन शुल्क, बेवारस मालमत्ता, सरजामदार व संस्थानिक यांच्याकडून मिळणारी खंडणी, युद्धात मिळालेली लुट, गुप्त धन इ. उत्पन्नाची प्रमुख साधने होती.

चौथाई व सरदेशमुखी :–चौथाईचा अर्थ राष्ट्राच्या /राज्य /प्रदेशाच्या उत्पन्नाचा चौथा हिस्सा होय. चौथाईची पध्दत शिवाजी महाराजांनी सुरू केलेली नाही. शिवपूर्वकाळात प्रबळ राजे दुबळ्या राज्याकडून चौथाई वसूल करत असत. **डॉ. एस. एन. सेन** यांच्या मते चौथाई म्हणजे शत्रू पासून आपल्या प्रदेशाचे संरक्षण होण्यासाठी किंवा लुटीपासून संरक्षण मिळविण्यासाठी दयावयाचा कर होय. **सर जदुनाथ सरकार** यांच्या मते शिवाजी महाराजांची चौथाई म्हणजे एक प्रकारची खंडणी होय. ही खंडणी त्यांचे सैन्य नियमितपणे वसूल करीत असे. ही रक्कम एकूण जमिन महसूलाच्या उत्पन्नाच्या 1/4 इतके असे. चौथाईचा हक्क जिंकलेल्या प्रदेशातून किंवा शत्रूच्या प्रदेशातून चौथाईची रक्कम गोळा केली जात असे. इ.स. 1668 नंतर चौथाई हक्क देण्यासंबंधी आदिलशाही व कुतूबशाही या सत्तांशी शिवाजी महाराजांनी करार केले होते. आदिलशाही व कुतूबशाही कडून अनूक्रमे दर वर्षी 3 व 5 लक्ष होन चौथाई वसूलीचा हक्क मिळवला होता. पोर्तूगिज सत्तेकडून शिवाजी महाराजांनी चौथाई वसूल केली. सभासद बखरीमध्ये शिवाजी महाराजांना चौथाईपासून 80 लाख होन एवढे उत्पन्न मिळाले असे म्हंटले आहे.

सरदेशमुखी ही कल्पना चौथाई पासून भिन्न आहे. चौथाई ही शस्त्रास्त्राच्या बळावर कोणत्याही प्रदेशातून वसूल केली जात होती. शिवाजी महाराजांनी आपण महाराष्ट्राचे वर्ष परंपरागत सरदेशमुख आहोत व आपणास सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क आहे असा दावा माणला व सरदेशमुखी वसूल करण्यास सुरूवात केली. **न्या. एम. जी. रानडे** यांच्या मते शिवाजी महाराजांचा सरदेशमुखी वरील हक्क सन 1650 पासून वसूल करीत असे. **डॉ. एस. एन. सेन** यांच्या मते शिवाजी महाराजांचा सरदेशमुखीवरील हक्क हा त्यांना वंश परंपरेने प्राप्त झाला होता. मुस्लिम इतिहासकार **काफीखान** हा सरदेशमुखीच्या हक्काबाबत म्हणतो मराठयांच्या चौथाईशिवाय जहागिरदारांकडून व रयतेकडून 10 टक्के सरदेशमुखी मिळत असे.

निष्कर्श

1. शिवकाळात महसूल अधिकारी हे सरकार नियूक्त असून त्यांना रोख पगार दिला जाई.
2. शिवकाळात महसूलाचे मुख्य आर्थिक स्त्रोत शेती हाच होता.
3. शिवरायांचे शेती विषयक धोरण शेतकरी हिताचे होते.
4. ग्राम हा शिवकालीन प्रशासनाचा कणा होता.
5. शिवकाळात धान्य किंवा पैशाच्या स्वरूपात सारा घेतला जाई.

संदर्भ सुची

1. *खोबरेकर. वि. गो., महाराष्ट्राचा इतिहास, मराठा कालखंड, भाग 1 शिवकाल, महाराष्ट् राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्रथमाव्रत्ती, नोव्हें 2006, पृ क्र. 469*
2. *खोबरेकर. वि. गो, पूर्वोक्त प्र क्र. – 470*
3. *कुलकर्णी अ. रा., अशी होती शिवशाही, राजहंस प्रकाशन, प्रा. लि. पुणे आवृती पाचवी, सप्टें 2012 प्र. क्र. 50*
4. *गाठाळ एस.एस., मराठयांचा इतिहास, कैलास पब्लिकेशन औरंगपूरा, औरंगाबाद प्रथमावृत्ती जुलै 2010 प्र. क्र. 221*
5. *गाठाळ एस. एस., पूर्वोक्त प्र. .क्र. 226*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

प्रत्यक्ष विदेशी गुंतवणीकीचा FDI भारतीय शेतीक्षेत्रावर झालेल्या परिणामांचा विश्लेषणात्मक अध्ययन

प्रा. भेदराज भानुदास ढवळे
सहायक प्राध्यापक व विभाग प्रमुख अर्थशास्त्र विभाग
स्व. निर्धनराव पाटील वाघाये कला व विज्ञान महाविद्यालय
मुरमाडी/तुपकर ता. लाखनी जि. भंडारा (महाराष्ट्र)

★★★

सारांश : विकसनशील अर्थव्यवस्थेत भांडवलांची कमरता हा विकासातील महत्वाचा अडथळा आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेचा विचार केला तर गुंतवणूकीची कमतरता हे वैशिष्टेच असलेला दिसुन येते. ही भांडवलाची कमरता दूर करण्यासाठी प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक अत्यंत महत्वाची भुमीका पार पाडताना दिसत आहे. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीमुळे भारतातील गुंतवणूक तर वाढलीच त्याचबरोबर तंत्रज्ञानाचे आदानप्रदान, रोजगारावाढ, आधारभुत संरचनेची निर्मिती, उत्पादनात वाढ व एकूणच देशातील नागरिकांच्या राहणीमानात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. म्हणूनच प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीला विकासाचे इंजीन म्हटलेले आहे.

भारत हा कृशीप्रधान देश आहे. भारतातील जवळपास 65टक्के लोकसंख्या शेती व शेतीवर आधारीत उद्योगावर अवलंबून आहेत. देशाच्या एकुन घरगुती उत्पादनात जवळपास 19टक्के वाटा हा शेतीक्षेत्राचा आहे. म्हणूनच शेतीक्षेत्राला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे असे म्हटले जाते. त्यामुळेच देशातील अर्थव्यवस्थेच्या बाबतीत घेतलेला कोणताही निर्णय हा प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरित्या शेतीक्षेत्रावर परिणाम करताना दिसून येतो. इ.स. 1991 ला भारत सरकारने देशाच्या प्रगतीसाठी खाजगीकरण, उदारीकरण, जागतीकीकरण असा विकासचा मॉडेल प्रस्तूत केलेला आहे. याच विकासाच्या सिध्दान्ता मधुन विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीला पुर्वी 51टक्के पर्यत गुंतवणूक करता येत होती. आता शेतीक्षेत्रात 100 टक्के प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीला प्रोत्साहन दिलेली आहे. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीमुळे भारतातील सेवाक्षेत्र, औद्योगिक क्षेत्र, शेतीक्षेत्र, रस्ते व वाहतुक, आरोग्यक्षेत्र, विमा क्षेत्र, शिक्षण क्षेत्र, वाहन उद्योब क्षेत्र इत्यादीमध्ये भरीव गुंतवणूक झालेली आहे. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीमुळे फार मोठया प्रमाणात रोजगार प्राप्त झालेला आहे. शेतीक्षेत्रामध्ये अन्न व प्रक्रिया उद्योग, रबर उद्योग, फरमैटेशन उद्योग, वनस्पती तेल उद्योग शेतीसाठी लागणारी यंत्रे, खत उद्योग, चहा व कॉफी उद्योग इत्यादी शेती व शेतीवर आधारीत उद्योगामध्ये फार मोठया प्रमाणावर प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर व मुलतः शेती क्षेत्रावर काय परिणाम झाला हे पडताळून पाहणे हाच या अभ्यासाचा मुलभूत उद्देश आहे. शेतीक्षेत्रातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक वाढविण्यासाठी भारत सरकारने कोणकोणते प्रयत्न केले? आणि त्याचा काय परिणाम झाला? 1991 ते 2020 या एकुण कालावधीत प्रत्यक्ष विदेशी गुंतणूक किती झाली? कोणकोणत्या राज्यात झाली? कोणकोणत्या क्षेत्रात झाली? या सर्वांचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्याचा हेतु आहे.

महत्वपूर्ण शब्द :– प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक, भारत सरकारचे शेतीविषयक धोरण, प्रत्यक्ष झालेली गुंतवणूक, आर्थिक विकास.

प्रस्तावना – स्वातत्र्यानंतर भारतात भांडवलशाही व समाजवादी अर्थव्यवस्थेच्या चांगल्या गुंणांचा अवलोकन करून मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार करण्यात आला. भांडवलशाही समाजवादी अर्थव्यवस्थचा स्विकार करण्यात आला. भांडवलशाही समाजवादी अर्थव्यवस्था असा या अर्थव्यवस्थेचा स्वरूप होता. काही उद्योग सरकारद्वारा व काही उद्योग भांडवलदारांकडून तर काही उद्योग दोन्हीकडून चालविले जात होते. शेतीक्षेत्र सुध्दा खाजगी क्षेत्रातच होते. शेती क्षेत्राचा व अर्थव्यवस्थेचा विकास व्हावा या उद्देशाने नियोजन आयोगाची स्थापना करून पंचवार्षिक योजना तयार करण्यात आल्या. प्रत्येक पंचवार्शिक योजनेची विशिष्ट उद्दिष्टे तयार करण्यात येतात. त्या माध्यमातुन प्रत्येक क्षेत्राचा विकास करण्यात येतो.

भारतात खाजगी उद्योग स्थापन्यासाठी सरकारची परवानगी आवश्यक होती. त्यासाठी खुप मोठा भ्रष्टाचार, दप्तर दिंरगाई होत असे. उदयोगाने कोणत्या वस्तुंचे उत्पादन घ्यावे, किती प्रमाणात घ्यावे, कुठे विकावे, किमंत किती असावी या सर्वांचे नियंत्रण सरकारकडे होते. त्यामुळे एखादा उद्योग स्थापन करण्यासाठी सरकारवर अवलंबून राहावे लागे. मुलभुत आधारभुत क्षेत्रात फारच कमी गुंतवणूक झाली त्यामुळे भारताचा विकास फारच प्रभावित झाला. 1960 च्या दशकात भारताचा राजनैतिक सबंध सोव्हीयत रशिया सोबत होते. रशियाच्या मदतीने भारतात काही उद्योग स्थापन करण्यात आले. भारताचे रशियाशी संबंध चांगले असल्याने अमेरिका सारखे पश्चिम युरोपीय देशासोबत भारताचे सबंध चांगले नव्हते. 1980 मध्ये सोव्हीयत रशियाचे विघटन झाले त्यामुळे भारताचा आयात निर्यात व्यापार प्रभावित झाला.

1991 पर्यत भारतात षेती क्षेत्रात मूलभुत गुंवणूक न झाल्याने, रस्ते व वाहतुक क्षेत्राचा विकास न झाल्याने, जलसिंचनाच्या मूलभुत सोयीची कमतरता असल्याने दरहेक्टरी उत्पादन फारच कमी होते. त्यामुळे

भारत देश अविकसीतच राहिला होता. भारताचा विदेशी व्यापार प्रभावित झाल्याने आयात वाढली निर्यात कमी झाली त्यामुळे विदेशी कर्ज वाढले. व देशाचा विकास खुंटला. म्हणून भारतासमोर देशाची अर्थव्यवस्था खुली करण्याशिवाय कोणताही पर्याय नव्हता. 1991 मध्ये पंतप्रधान पि. व्ही. नरसिंहराव व अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेला विकासाची चालना मिळावी याहेतुने खाजगीकरण, उदारीकरण व जागतीकीकरण हा नविन सिध्दांत विकसित केला.

ऐतिहासिक पार्श्वभुमी :– विदेशातील एखाद्या कंपनीने दुसऱ्या देशाच्या उत्पादनात किंवा उद्योगात केलेली प्रत्यक्ष गुंतवणूक म्हणजे प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक असे म्हणता येईल. ही प्रत्यक्ष गुंतवणूक दुसऱ्या देशातील एखादी कंपनी खरेदी करून किंवा त्या देशात पूर्वीपासूनच अस्तित्वात असलेल्या उद्योगातील पूर्वीच्याच व्यवहारांमध्ये अधिक किंवा जास्तीची वाढ करून केलेली असते. भारतात आर्थिक उदारिकरणाची सुरूवात 1991 मध्ये झाली. आणि तेव्हाच प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीची सुरूवात झालेली दिसून येते. भारत हा विकसनशील देश असून येथील ग्राहक उपभोग्य वस्तु बाजार खुप मोठा आहे.

भारत हा जगातील तिसरा महत्वाचा देश आहे की ज्यामध्ये प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक आकर्शित झालेली आहे. UNCTAD च्या सर्वेक्षणानुसार 2013 ते 2015 मध्ये चिन आणि संयुक्त अमेरिका यांच्यानंतर भारतामध्ये सर्वात जास्त विदेशी गुंतवणूक झालेली आहे.

अध्ययनाचे उद्देश

1. भारत सरकारच्या प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक नितीचा विश्लेषण करणे.
2. प्रत्येक्ष विदेशी गुतवणूकीचा शेतीक्षेत्रावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
3. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा शेतीक्षेत्रावर झालेल्या परिणांमाचा चिकित्सक अभ्यास करणे.

संशोधनची कार्यपध्दती :– सदरील संशोधनासाठी वर्णनात्मक पध्दतीचा उपयोग केलेला आाहे. संशोधनासाठी दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. त्यामध्ये प्रकाशित पुस्तके, जर्नल्समध्ये प्रकाशित झालेली संशोधने, वर्तमानपत्र, विविध विभागांची ऑनलाईन वेबसाईटवर असणारी आकडेवारी यांचा संशोधकाला निष्कर्षाप्रत पोहचण्यासाठी मदत घेतलेली आहे.

भारत सरकारची प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक निती प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा इतिहास बघीतला तर असे लक्षात येते की 1991 च्या नविन आर्थिक धोरणानुसार सन 2000 पासून प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीला सुरूवात झाली. भारतात 2000–2001 ते 2020–2021 या एकुण 20 वर्षाचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की या कालावधीत 2000–2001 मध्ये एकूण 10,733 करोड रूपये तर 2001– 2002 या कालावधी 18,694 करोड रूपये प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक झाली. तर 2019–2020 ला 3,53,558/– करोड रूपये तर 2020–2021 या कालावधीत 4,42,869 करोड रूपये म्हणजेच 20 वर्शाच्या कालावधीत गुंतवणूक फार मोठया प्रमाणात वाढली. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा क्षेत्रावार विचार केला तर गुंतवणूकीत सेवाक्षेत्राला सर्वाधिक पंसती मिळालेली आहे. त्याचबरोबर वाहतुक व दळणवळन, आरोग्य, विमा, रस्ते विकास, खनिकर्म, पोलाद उद्योग, वनोत्पादन, शिक्षण, शेती अशा विविध क्षेत्रात गुंतवणूक झालेली दिसुन येते.

प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा राज्यवार क्रमवारी पाहिली तर 2021ला गुजरात राज्यात 1,81,794 करोड रूपये गुंतवणूक होऊन देशात प्रथम क्रमांक पटकावला, तर त्याच वर्षी महाराष्ट्र राज्यात 1,71,807 करोड रूपये गुंतवणूकी सह दुसऱ्या क्रमांकावर, तर कर्नाटक तिसऱ्या क्रमांकावर आहे. तर उत्तरप्रदेश मध्ये सर्वात कमी गुंतवणूक 4,861 करोड रूपये गुंतवणूकीसह सर्वात शेवटी असलेला दिसून येते. 2019 मध्ये प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा विचार केला तर महाराष्ट्र 52,073 करोड रूपये गुंतवणूकीसह प्रथम क्रमांक, गुजरात 18,964 करोड रूपये गुंतवणूकीसह द्वितिय क्रमांक तर कर्नाटक 30,740करोड रूपये गुंतवणूकीसह तृतिय क्रमांकावर असलेला दिसून येते.

प्रत्यक्ष विदेशी गुंतणूक करणारे देश या बाबत विचार केला तर भारतामध्ये मार्च 2021 ला सर्वात जास्त गुंतवणुक करणारा देश मॉरिशस हा आहे. एकुण गुंतवणूकीच्या 28 टक्के गुंतवणूक मॉरिशस या देशाने केली. तर सिंगापुर ने एकुण 22 टक्के गुंतवणुक केली तर यु. एस. ए. ने एकुण 8 टक्के गुंतवणूक केली तर नेदरलॅन्ड या देशाने एकुण 7 टक्के गुंतवणूक केलेली आहे.

20 वर्षात झालेली प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीतील वाढ पाहीली तर असे लक्षात येत की, भारतातील मोठी बाजारपेठ मोठा विमाक्षेत्र, आरोग्य क्षेत्र, खनन उद्योग, शेतीउद्योग, सेवाक्षेत्र इत्यादी क्षेत्रामध्ये वाढ झालेली लक्षात येते.

भारत सरकारची शेती क्षेत्रातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक निती.

भारत सरकारच्या प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीच्या नविन धोरणानुसार शेती व शेतीशीसंबधित क्षेत्रात 100टक्के गुंतवणूकीस स्वयंचलित मार्गाने करता येईल. त्यातील महत्वाचे क्षेत्र खालील प्रमाणे.

1 फ्लोरीकल्चर, हार्टीकल्चर, कल्टीवेशन ऑफ व्हेजिटेवल आणि मशरूम नियंत्रित उत्पादनातील गुंतवणूक.

2 बि–बियाने आणि वनस्पती लागवडीसाठी साहित्याचे विकसन आणि उत्पादन.

3 पशुपालन (कुत्र्यांचे प्रजोत्पादन)मासेमारी जलचर, मत्सपालन.

4 शेती व शेतीसबंधीत सेवा क्षेत्र.

त्याचबरोबर चहा क्षेत्र, चहामळे, कॉफीच्या मळयाचे लागवड, रबर लागवड, वेलदोडा लागवड, पॉम आईल वनस्पती लागवड, ओलिव्ह तेल झाडांची लागवड या सर्व क्षेत्रात 100 टक्के प्रत्यक्ष गुंतवणूक स्वयंचलित पध्दतीने करण्याची परवानगी दिलेली आहे. मल्टी–ब्रॅन्ड रिटेल सेक्टरमध्ये 51टक्के गुंतवणूकीची परवागनी काही अटी व षर्तीच्या अधिनस्त प्राप्त झालेली आहे. खालील तक्त्यावरून 2012 ते 2020 –2021 मध्ये झालेली शेतीक्षेत्रातील वर्शानिहाय गुंतवणूकीचे विश्लेषण करता येईल.

तक्ता क.1 :– भारतातील शेतीक्षेत्रातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुक

वर्षे	एकुण गुंतवणूक करोड मध्ये
2012 – 2013	1392
2013 – 2014	845
2014 – 2015	796
2015 – 2016	673
2016 – 2017	618
2017 – 2018	8.21.3
2018 – 2019	664.7
2019 – 2020	1040.64
2020 – 2021	1502.72

Source :- Government of India ministry of Commerc and Industry Department for promotion of Industry and Internal Trade (FDI Divison)

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की सन 2020–2021 या आर्थिक वर्षात शेती व शेतीषी सबंधीत असलेले इतर तत्सम उद्योगांमध्ये 1,34,094.21 करोड रूपयांची प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक झालेली दिसुन येत आहे. परंतु या वर्षात भारतात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक एकुण 4,42,569 करोड एवढी झालेली आहे. त्यामाने भारतातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूनक शेतीवर अवलंबुन असलेल्या लोकसंख्या मागे अगदी अल्प असल्याचे दिसुन येते.

प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक आणि नविन शेतीविषयक कायदे– भारतसरकारने सप्टेंबर 2020 मध्ये भारतातील शेतीक्षेत्रावरील विकासाच्या उद्देशाने शेतीला लाभ होतील असे कायदे संसदेच्या चर्चेविना संमत केलेत.

1. आवश्यक वस्तु साठेबाजी कायदा–2020
2. शेतकरी हक्क व सुरक्षा हमी व कृषी सेवा करार विधेयक–2020
3. शेतकरी उत्पादने (व्यापार व वाणिज्य प्रोत्साहन व सुविधा) विधेयक–2020

वरील कायदे शेतकरी हिताचे आहेत असे सरकार म्हणत आहे. परंतु या कायद्याला षेतकऱ्यांचा व अर्थतज्ञांचा मोठया प्रमाणात विरोध होत आहे. हे कायदे रद्द होण्यासाठी शेतकरी गेल्या 6 महिन्यांपासुन आंदोलन करीत आहेत. त्या आंदोलनात आतापर्यत 400 च्या वर शेतकऱ्यांनी आपला जिव गमावला. विरोध करण्याचे प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे दिसुन येत आहेत.

1. आवश्यक वस्तु साठेबाजी विधेयकानुसार कोणालाही शेतमालाची साठवणूक करण्यात कोणतेही बंधन असणार नाही. याचा परिणाम असे होईल की व्यापारी हंगामात शेतकऱ्यांचा माल कमी किमंतीत घेऊन त्याची साठेबाजी करेल. कृत्रिम टंचाई निर्माण करेल व बिगर हंगाामात खुप जास्त चढया किमंतीत विकेल यामध्ये फायदा फक्त व्यापाराचा होईल.

2. शेतकरी हक्क व सुरक्षा किमंत हमी व कृषी सेवा करार विधेयका नुसार – व्यापारी शेतकऱ्यांशी एकत्रित करार शेतमाल लागवडीपूर्वीच करेल व त्या करारात विशिष्ट किमंत ठरवेल. त्या किमंतीनुसार शेतकऱ्यांना करारानुसार आपला शेतमाल विकावा लागेल. जर त्या वेळेस हमी भावापेक्षा जास्त किमंत असेल तर व्यापारी माल विकत घेणे टाळू शकतो. यामध्ये हमीभावापेक्षा कमी किमंतीला शेतकऱ्यांचा माल घेता येणार नाही याची कोणतीही हमी सरकार घेत नाही. म्हणजेच हमी भाव आपोआपच नष्ट होईल. यास शेतकऱ्यांचा विरोध आहे. एपीएमसी आपोआपच बंद होईल.

3. शेतकरी उत्पादने (व्यापार व वाणिज्य प्रोत्साहन व सुविधा) विध ेयकानुसार शेतकऱ्यांना आपला माल कुठेही आणि कितीही भावाने विकता येईल व कोणत्याही पॅनकार्डधारकाला माल खरेदी करता येईल. यामुळे काय होईल तर सुरवातीला मल्टीब्रॅड क्षेत्रातील व्यापारी अदानी–अंबानी एपीएमसीच्या बाहेर सुरूवातील चढया भावाने माल विकत घेतील. काही वर्षानंतर एपीएमसी बंद होईल व त्यामुळे मल्टीब्रॅड उद्योजक कोणत्याही भावाने माल खरेदी करू शकतील.

प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक अशा क्षेत्रात केली तर आपले शेतकरी देशोध डीला लागू शकतील. आपण उत्पन्न केलेले आपल्यालाच विकत घेता येणार नाही. या विधेयकानुसार या शेतीक्षेत्रात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीला वाव आहे. भारत देश अन्नधान्याच्या बाबतील स्वयंपुर्ण राहणार नाही याचेच ज्वलंत उदाहरण म्हणजे यावर्शी सोयाबीनच्या हंगामात सोयाबीन 4,000रूपये प्रति क्विटल विकत घेण्यात आला आणि आजच्या घडीला 10000 ते 11000रूपये क्विंटलने विकल्या जात आहे. आज सोयाबीन तेलाचे भाव 160 रूपये प्रति किलो आहे.

टिकात्मक विश्लेषणः– 1991 च्या खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण या धोरणानुसार शेतीक्षेत्र खुले करण्यात आले व विदेशी गुंतवणूक होऊ लागली 2000–2021 या 21 वर्षाच्या कालावध

ीत प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक 10,733 करोड रूपयावरून 4,42,569 करोड एवढी वाढली. परंतु शेती क्षेत्रात झालेली वाढ अगदी नगण्य आहे. एकुण 21 ते 30 वर्षाच्या कालावधीत 2,96,438 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. यावरूनच प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचे अपयश आपल्याला दिसून येते.

प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा एकुण 20 वर्षाचा कालावधी पाहीला तर शेतीक्षेत्रात आधारभूत संरचना, रस्ते वाहतुक, गोदामाची व्यवस्था, नविन शेतीउपयोगी मशनरीज, शेतीसाठी लागणारी ऊर्जा, जलसिंचनाचे प्रकल्प, इत्यादी क्षेत्राात फारच कमी गुंतवणूक झालेली आहे. त्यामुळे आजही भारतीय शेती मान्सूनच्याच पाऊसावर अवलंबून असलेली दिसते. शेतक-यांना 15–16 तास लोडशेडींग असते. पिकलेला माल गोदामे नसल्याने साठवून ठेवता येत नाही. नाशिवंत वस्तूंची वाहतुक त्वरीत होत नाही. डिझेल पेट्रोलचे भाव वाढल्याने शेतक-यांचा उत्पादन खर्च वाढला. यावरून असे लक्षात येते की प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा फारसा फायदा भारतीय शेतक-यांना झालेला नाही. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीसाठी आकर्शित करणारे वातावरण आजही भारतीय शेती व्यवस्थेत वातावरण आजही भारतीय अर्थव्यवस्थेत व पर्यायाने शेती व्यवस्थेत दिसून येत नाही.

तक्ता क. 2 :– शेतीक्षेत्रातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक (शेती व शेती संबधित इतर उद्योग)

अ.क.	शेतीक्षेत्र	मुल्य (करोड)	टक्केवारी
1.	अन्न प्रक्रिया उद्योग	64745.57	1.96
2.	रबर वस्तु	19994.02	0.62
3.	शेती क्षेत्र	12368.89	0.43
4.	फरमेनटेशन	17823.17	0.58
5.	वनस्पती तेल	6142.63	0.19
6.	शेतीसाठी लागणाऱ्या मशिनरी	4294.53	0.14
7.	खत उद्योग	4045.15	0.13
8.	साखर उद्योग	1465.02	0.05
9.	चामडा उद्योग	1228.96	0.04
10.	टिंबर प्रोडक्ट	1159.06	0.04
11.	चहा आणि कॉफी उद्योग	854.21	00.3
	एकूण	**13409**	**4.21**

निष्कर्श :– भारतातील नविन आर्थिक धोरणानुसार भारतीय ग्राहक उपयोगी बाजारपेठ खुप मोठी असल्याने प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीच्या संधी विदेशी गुंतवणूकदारांना खुणावत आहेत. 2000 ते 2021 या कालावधीत लक्षात येते की गुंतवणूकीचा प्रवाह कित्येक टक्क्याने वाढलेला आहे. शेतीक्षेत्रातही नविन नविन उद्योग या मार्फत येत आहेत. भारताचा विदेशी व्यापार ही प्रभावीत होत आहे. नविन कृशी कायदेही तयार झालेली आहेत. परंतू त्यात चर्चा घडवून काही सुध्ाारणा केल्या तर त्याचा फायदा विदेशी गुंतवणूक भारतीय शेतीची व शेतक-यांचे जिवनमान उंचाऊ शकेल. आधारभुत संरचना निर्माण होऊ शकतील अशा प्रकारे प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक आणि भारतीय शेती याचा विश्लेषण करता येईल.

संदर्भः

1. *दत्त एवं सुंदरम–'भारतीय अर्थव्यवस्था' एस. चंद्र प्रकाशन दिल्ली.*
2. *मोहरे, डॉ रामदास य– 'भारतीय अर्थव्यवस्था' साई ज्योती प्रकाशन नागपुर*
3. *प्रतियोगिता दर्पण भारतीय अर्थव्यवस्था विशेषांक*
4. *आर. बी. आय. रिपोर्ट*
5. *वर्तमानपत्र लेख*
6. *झामरे, डॉ. जी. एन.– 'इंडियन इकोनॉमी' पिपळापुरे प्रकाशन नागपुर.*
7. *झामरे, डॉ. जी. एन– 'भारतीय आर्थिक विकास आणि पर्यावरण अर्थशास्त्र' पिंपकापुरे प्रकाशन नागपुर*
8. *Government of India Ministry of commerce and Industry Department for promotion of Industry and Internal Trade (FDI Division) Website*
9. *Kanika Varma – FDI Opprtuties in India Agriculture.*
10. *Sonawane S.T. – Analysis of FDI (Foreign Direct Investment on Maharashtra Agriculture Sector – International Journal of Innovative Research in science Engineering and Techonology – 2017*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

भारताचे राजकीय वर्तमान

डॉ. मनोहर नाईक, नागपूर

★★★

माहिती तंत्रज्ञानाच्या युगातूनच जाहिरातींचे दांभिक युग उदयास आले आणि या युगाने अवघे विश्व आपल्या ताब्यात घेतले. जाहिरातीत सत्यापेक्षा आभासाला अधिक महत्त्व असते. जाहिरातींमधून प्रभावीपणे आभासी चित्र उभे करण्याची कला ज्याला अधिक साध्य होते तो यशस्वी होतो, याचा प्रत्यक्ष अनुभव समस्त भारतीयांनी राजकीय पटलावर २०१४ साली घेतलेला आहे आणि घेत आहेत.

धर्माचा आधार आणि जाहिरातींचा बाजार मांडून 'अच्छे दिन' चे आभासी चित्र भारतीय जनता पक्षाने मतदारांपुढे उभे केले.त्यातून या पक्षाने राजकीय सत्ता प्राप्त केली. लोकशाही मार्गाने सत्ता प्राप्त करण्याचा सर्वच राजकीय पक्षांना समान अधिकार आहे. परंतु लोकशाहीवरच प्रहार करणे हा संविधानद्रोह व राष्ट्रद्रोह आहे. हा मार्ग लोकशाहीमारक आहे.भारताचे राजकीय वर्तमान याच मार्गाने पुढे जाताना दिसत आहे. हा मार्ग समस्त भारतीयांना व भारताला अधोगतीकडे घेऊन जाणारा आहे. धर्माचा आधार घेऊन सत्तास्थानी आलेला पक्ष समाजमनातील धर्मभावना

अधिक उत्तेजित करण्याचा सतत खटाटोप करते आहे. धर्म हेच सत्ताधारी पक्षाचे मुख्य भांडवल आहे. सत्ता अधिक भक्कमपणे टिकवून पाशवी पध्दतीने राबविण्यासाठी

धार्मिक करण – करणे त्यांनी उघडपणे सुरू केले आहे.त्यासाठी त्यांनी धर्माच्या वेदीवर लोकशाहीचा बळी देण्याची पूर्वतयारी सुरू केली .हे भारतीय जनता पक्षाच्या व मातृसंघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एकूणच कृती आराखड्यावरुन स्पष्ट होवू लागले आहे. मुस्लिम धर्माला शत्रू ठरवून व मुस्लिम धर्मियांविरुध्द विव्देष पेरुन हिंदू धर्मियांना संघटित करणे आणि या संघटित मतांवर सत्ता बळकावून उच्च वर्णीयांच्या तसेच उच्च वर्गीयांच्या हिताचा गुप्त अजेंडा राबविणे हे भाजपचे व आर. एस.एस.चे मुख्य उद्दिष्ट आहे. या उद्देश पूर्तीसाठीच संघ–भाजप मग लवजिहाद, घरवापसी,गोरक्षा,सी. ए.ए., राममंदिर अशा भावनिक मुद्दयांच्या आधारे धार्मिक विद्वेश पसरवून सामाजिक सौहार्द व राष्ट्रीय एकात्मता बाधित करणारे व आपली राजकीय पकड अधिक घट्ट करणारे क्षूद्र राजकारण करीत आहे.

धर्मव्यवस्थेचा भारतीय समाजमनावर जबरदस्त पगडा आहे. धर्मव्यवस्थेने भारतीय समाजाची विचारशक्ती विकलांग करून बहुजन समाजाला मानसिक गुलाम केले. धर्मसत्तेच्या व राजसत्तेच्या अभद्र युतीतूनच बहुजन समाजाचे शतकानुशतके सर्वांगीण स्वरुपाचे शोषण करण्यात आले. उन्नयनाचे सर्व मार्ग बंद करण्यात आले. धर्माचा हा विषारी विळखा लक्षात घेऊनच भारतीय संविधानाने स्वातंर्त्योत्तर भारतातील राजकारणातून

धर्म आणि राजकारण–यांची संवैधानिक फारकत करण्याकरिताच धर्मनिरपेक्ष– धर्मातीत राजकारणाचे तत्व निर्धारित केले आहे. संवैध ानिक मर्यादांचा भंग करून असंवैधानिक मार्गांचा अवलंब करणे हे तर संघ–भाजपाचे चरित्र आहेय आणि धर्म हा तर त्यांच्या राजकारणाचा मूलाधार आहे. वर्णाधारित शोषण व्यवस्था अबाधित राखण्यासाठीच संघाच्या गर्भातून भाजपचे धर्मनिष्ठ राजकारण जन्मास आले आहे. त्यामुळेच भाजपचे राजकारण कायम धर्मकेंद्री राहिले आहे.आणि या धर्मकेंद्री राजकारणास अनुकूल जनमानस तयार करण्याकरिताच संघाच्या वि.ही.प.बजरंग दल, दुर्गा वाहिनी,अ.भा.वि.पी.,वनवासी कल्याण आश्रम अशा वेगवेगळ्या आघाड्या सक्रीय झाल्या आहेत. बाबरी मशीद–रामजन्मभूमी हे भावनिक आंदोलन भाजपने धार्मिक ध्रुवीकरणाच्या दुष्ट हेतूनेच सुरू करुन आपला सत्ताप्राप्तीचा मार्ग प्रशस्त केला आहे.

'भाजप सत्तास्थानी आल्यापासून तर देशात धार्मिक असहिष्णुतेच्या व धार्मिक उन्मादाच्या घटनांनी कळस गाठला आहे. उघड–उघड देशभक्त–देशद्रोही, रामजादे–हरामजादे असे प्रमाणपत्र वाटणे सुरू झाले आहे. धर्माचा अजगर भारतीय लोकशाहीला गिळंकृत करु लागला आहे. या धर्मांध सत्तेने भारतीय लोकशाहीतील महत्त्वपूर्ण स्वायत्त स्वस्थांना दुर्बल केले आहे.नियमबाहय पध्दतीने उच्चवर्णातील अपात्र उमेदवारांना सर्वोच्च श्रेणीतील मुख्य अधिकारी पदांवर नियुक्त करुन प्रशासन व्यवस्था लाचार करण्यात आली आहे. लोकसभेत–कायदेमंडळात भाजपच्या तिकिटावर निवडून गेलेल्या बहुजन लोकप्रतिनिधींवर जरब बसवून त्यांची तोंडे बंद करण्यात आली आहेत. देशाच्या न्यायव्यवस्थेला बटिक बनवून मर्जीनुसार वापरणे सुरू आहे. अशाप्रकारे संघ–भाजपने देशाच्या कायदे मंडळावर, कार्यकारी मंडळावर व न्यायव्यवस्थेवर आपली धर्मांध पकड मजबूत केली आहे. देशाची अर्थव्यवस्था मर्जितील मुठभर भांडवलदारांच्या ताब्यात दिली आहे. आणि महत्त्वाचे म्हणजे लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ समजली जाणारी प्रसारमाध्यम यंत्रणा दाराषी बांधून त्यांच्या ताला–सुरातील भुंकण्यातून स्वतरूची स्तुतीस्तोत्रे जनतेला ऐकवली जात आहेत.हे एकूणच भारतीय लोकशाहीच्या पतनाचे संकेत आहेत.

या सर्व घटनाक्रमात भारतीय न्यायव्यवस्थेची भूमिका तर अतिशय संशयास्पद व खेदजनक वाटू लागली आहेकृ भारतीय लोकशाहीची

धर्मनिरपेक्षता अबाधित राखण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी न्यायव्यवस्थेवर असताना सर्वोच्च न्यायालयच भावनिक आधारावर राममंदिर निर्माणाच्या बाजूने निकाल देवून निर्माणकार्यात शासन यंत्रणेला सामिल करुन घेते ही बाब न्यायव्यवस्थेच्या विष्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे. त्यात धर्मनिरपेक्ष देशाच्या प्रधानमंर्त्याच्या हस्ते दिनांक ५ ऑगस्ट २०२०ला मंदिर निर्माण कार्याचे भूमिपूजन होणे ही घटना भारतीय लोकशाहीची विटंबना करणारी आहे.तसेच भारतीय लोकशाहीच्या व न्यायव्यवस्थेच्या इतिहासाला कलंकित करणारी आहे.

भारतीय संविधानाने धर्म,पंथ, जात,वर्ण, वर्ग, लिंग, भाषा, प्रदेश या सर्व विविधतेचे विसर्जन करुन प्रत्येक नागरिकाला भारतीयत्वाची नवी ओळख दिली आहे. सर्व नागरिकांना समान दर्जा दिला आहे.या देशातील जाती–धर्माची विभिन्नता व विशमता नष्ट करुन एकसंध भारतीय समाज निर्माण करणे हे भारतीय संविधानाचे अंतिम उद्दिष्ट आहे.या संविधान उद्दिष्टालाच संघ विचारसरणीचा व भाजपच्या भूमिकेचा प्रखर विरोध आहे. विषमता नष्ट होवून समता प्रस्थापित होणे म्हणजे वर्णश्रेष्ठत्व आणि वर्णाधारित शोषणव्यवस्था संपुष्टात येणे होय, हेच त्यांना नको आहे. एकूणच व्यवस्थेत आपले वर्चस्व कायम राखण्यासाठीच त्यांनी राजकारणाला धर्माची जोड देऊन सत्ता हस्तगत केली आहे. बहुसंख्यांकांच्या मनात अल्पसंख्यांकांविषयी जेवढा

धर्मद्वेश व जातिभेद – धगधगत राहील तेवढी त्यांची राजसत्तेवरील पकड अधिक घट्ट होणार आहे. म्हणूनच त्यांनी मुस्लिम हिंसेचे गुजरात मॉडेल देशभर राबविणे सुरू केले आहे.दादरी कांड, आसिफा कांड, मुझफ्फरनगर कांड अशी अनेक हत्याकांडे घडवून त्यांनी मुस्लिम धर्मियांना भयभीत केले आहे. आंबेडकरवादी विचारधारा ही त्यांच्या धर्मांध व विषमतावादी राजकारणाच्या मार्गातील फार मोठा अडसर आहे. आंबेडकरवादी विचार हाच या देशातील लोकषाहीवादी व संविधाननिष्ठ आंदोलनांचा मूलस्त्रोत आहे. त्यामुळेच त्यांनी आंबेडकरी आंदोलनांना व आंदोलकांना मुख्य लक्ष्य केले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्वालाग्राही विचारांचा धसका घेवूनच त्यांनी भीमा–कोरेगाव हल्ला प्रकरण, उना हल्ला प्रकरण, संविधान होळी अशा अनेक घटना घडवून आणल्या आहेत. त्यांच्या मनुवादाला विरोध करणाऱ्या भिन्न विचारधारेच्या समुदायाला गैरमार्गाने दडपून टाकणे ही त्यांची कुटील व क्रूर प्रवृत्ती आहे. मुस्लिम धर्मियांना भयभीत करून दहशतवादी ठरविणे आणि पुरोगामी–आंबेडकरवादी चळवळीतील कार्यकर्त्यांना व विचारवंतांना माओवादी–नक्षलवादी ठरवून त्यांना तुरुंगात डांबणे हे लोकशाहीवादी विचारांना दडपण्याचे फार मोठे शडयंत्र आहे. एकीकडे विरोधी विचारधारेला जेरबंद करायचे आणि दुसरीकडे विरोधी विचारधारेतील वलयप्राप्त कार्यकर्त्या–नेत्यांना व प्रतिष्ठाप्राप्त व्यक्तींना साम–दाम–दंड–भेद वापरून आपल्या कळपात सामावून घ्यायचे हे मनुवादाचे नवे

सत्तेचे समीकरण – आहे. परिवर्तनाची व आपल्या खऱ्या राजकीय अस्तित्त्वाची ओळख होवू लागलेल्या अनेक समाजघटकांना संघ–भाजपने हिंदुत्त्वाच्या फसव्या जाळ्यात ओढून आपली राजकीय शक्ती वाढविली आहे. संघ–शाखांचा विस्तार करून , धार्मिक उन्माद वाढवून , व्यक्तिगत स्वार्थाला खतपाणी घालून ,काही समाजपुढाऱ्यांना अधिक मोठे भासवून अनेक समुदाय हिंदुत्वाकडे आकर्षित केले आहेत. उदारमतवादी व पुरोगामी पक्षात अनेक वर्षे घालवलेल्या बहुजन समाजातील अनेक नेत्यांना सत्ता–संपत्तीचे आमिष दाखवून तर कधी दडपण आणून तसेच सी.बी. आय., ई.डी.चा धाक दाखवून भाजपने पक्षवाढ केली आहे. आमदार–खासदारांच्या खरेदी–विक्रीत तर या पक्षाने उच्चांक गाठला आहे.वनवासी कल्याण आश्रम, सामाजिक समरसता मंच अशा मायावी संघटनांद्वारे नवनवीन समाजघटक जोडून भाजपची शक्ती वाढवणे सातत्याने सुरू आहे. दोन खासदार संख्येवरून स्पष्ट बहुमतापर्यंत मजल मारणे म्हणजे संघ–भाजपच्या कुटील, दांभिक व पाताळयंत्री मनुवादी नीतीला आलेले यश होय.या यशाने संघ–भाजप आता अधिक मग्रुर झाला आहे.उन्मत्त झाला आहे. शक्तिशालीही शांती स्थापित कर सकते हैं! अशी आता ते उघड–उघड आतंकी भाषा वापरु लागले आहेत. हे भाजपने सुरू केलेले दमनपर्व आहे. भाजपचे नेते व मंत्री आता भारतीय लोकशाहीचे रक्षण करु पाहणाऱ्या संविधाननिष्ठ आंदोलकांपुढे उभे राहून देश के गद्दारोंको गोली मारो सालोंकोत्त अशा हिंसक घोषणा देवू लागले आहेत. आणि या घोषणा दिल्यानंतर आंदोलकांवर गोळीबारही करण्यात आला आहे. शाहीनबाग आंदोलनातील महिलांविषयी वापरलेली अर्वाच्च भाषा व झालेले हल्ले,जामिया–इस्लामिया विद्यापीठातील व जे.एन.यु.तील विद्यार्थ्यांवर झालेले हल्ले या सर्व घटना पूर्वनियोजित कटाचा भाग आहेत. रोहित वेमुलाला जीव नकोसा करणे, डॉ.नरेंद्र दाभोळकर, गोविंद पानसरे, डॉ.एम.एम.कलबुर्गी, गौरी लंकेश इत्यादींच्या हत्या घडवून आणणे म्हणजे लोकशाहीवादी व संविधाननिष्ठ लोकांच्या मनात दहशत निर्माण करण्याचा प्रकार आहे. हे देशात सुरू झालेले दमनपर्व आहे. भारतीय राजकारण अल्पावधीतच अकल्पित पध्दतीने बदलू लागले आहे. यापुढे देशातील लोकशाहीची दिशा कोणते वळण घेईल यांचे स्पष्ट संकेत दिसू लागले आहेत. भारतीय संविधानाने दिलेला धर्म निरपेक्ष राजकारणाचा स्पष्ट निर्देश झुगारून आता उघडपणे धर्माधिष्ठित राजकारणाला सुरुवात झालेली आहे. संसदेत विरोधी पक्ष नसला तरी विरोधी पक्षाची भूमिका निभावणाऱ्या पक्षाने देखील एकप्रकारे धर्मनिष्ठ राजकारणाला सहमती दर्शविल्याचे चित्र स्पष्ट होऊ लागले आहे. अलीकडे घेण्यात आलेले काही निर्णय, जाहीर केलेली धोरणे आणि देशात निर्माण झालेली एकूणच परिस्थिती बघता भांडवली धर्मसत्ता इथून पुढे निरंकुश पध्दतीने काही काळ तरी सत्तास्थानी राहील असे सखेद नमूद करण्यासारखे राजकीय वर्तमान आहे.

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

सेंद्रिय शेती – काळाची गरज

प्रा. डॉ. सुरेंद्र पोथारे (उपप्राचार्य)
अर्थशास्त्र विभाग
शरदचंद्र कला वाणिज्य महाविद्यालय, बुटीबोरी, नागपूर

★★★

प्रस्तावना – भारतीय समाज जीवन बघताना निरोगी व स्वस्थ जीवन जगणे सध्याच्या परिस्थितीत महत्वाचे झाले आहे आपल्या सवयी व आवडी निवडी वर आपले आरोग्य अवलंबून असते मग आपण घेतो तो प्राण वायू असो अथवा आपण खात असलेले अन्नपदार्थ त्यातील प्रदुषण म्हणजे रासायनिक प्रक्रिया कशी झाली ते कसे निर्मीत करण्यात आले कोणत्या द्रव्याचा त्यावर वापर करण्यात आला हे महत्त्वाचे त्यात धान्य पिकवीताना वापरण्यात येणारी रसायने असो अथवा कारखान्यात होणारे प्रक्रियाकरन सर्व आरोग्यासाठी घातक असल्याचे दिसून येते यात सर्वप्रथम आपण ज्या जमिनीत पीक घेतो तेथूनच विचार करने गरजेचे आहे.

भारतात पुर्वी पारंपरिक पद्धतीने शेती केली जात होती म्हणजे सेंद्रिय खतांचा भूमीत व सेंद्रिय औषधे पीकांवर फवारणी करून पीक उत्पादन घेतले जात पण जास्त नफा कमविण्यासाठी आधुनिकीकरणाचा विचार करून भूमी व पिकांवर रासायनीक खते व किटकनाशकाचा वापर करण्यात येऊ लागला. रासायनीक खते व रासायनीक किटकनाशके याचा मोठ्या प्रमाणावर वापर झाल्याने भूमीचा कस कमी झाला भूमी तू उत्पादीत अन्नधान्य यावर देखील परिणाम झालेला दिसतो. रासायनीक खता मुळे कस कसा कमी होतो? म्हणजे आधी ज्या एकरी शेतीतून शेतकरीर्याला ४ क्विंटल पीक प्राप्त होत असे आता १ क्विंटल पीक प्राप्त होते त्यातून त्या भूमीचा कस कमी झाला हे सिध्द होते. भूमीचा कस वाढविणे व भूमी नापीक होवू नये या साठी प्रयत्न करणे आवष्यक आहे तेथे रासायनीक खता ऐवजी सेंद्रिय खतांचा वापर करून पीक उत्पादन घेतले जाणे गरजेचे आहे. पर्यावरणाचा व आरोग्यदायी लाभाचा विचार करून भारतातील काही राज्यांनी आपल्या क्षेत्रात सेंद्रिय शेतीला महत्त्व दिले आहे ज्यात महाराष्ट्र, कर्नाटक, मध्येप्रदेश, गुजरात, तमिलनाडू, केरळ, राजस्थान, नागालैंड, मिझोराम व सिक्कीम या राज्यांनी प्रमुखतेने विचार केला त्यात त्यांनी प्रमाणके व प्रमाणीकरण या संकल्पनेचा वापर करून पीक उत्पादन तंत्रे विकसित केले व शासकीय स्तरावरून सेंद्रिय शेती संबंधात राष्ट्रीय कार्यक्रमाची अंमलबजावणी केल्याचेही दिसून येते.?

सेंद्रिय शेतीचे उद्देश

१.) सेंद्रिय खतांचा व सेंद्रिय किटकनाशके उपयोग करून शेतीतील भूमीचा कस कमी होण्यास आळा घातला येतो व रासायनीक खते व किटकनाशके या पासून भूमीचे रक्षण केले जाते

२.) सेंद्रिय खतांचा व द्रव्याचा उपयोग पिकांसाठी करावा. त्यामुळे भूमी व पीकांचेव सुक्ष्म जीवाणूंचे रक्षण होईल.

३.) सेंद्रिय स्वरूपातील नायट्रोजनचा उपयोग करावा आणि कार्बनीक द्रव्यांची फवारणी करावी.

४.) पीकांचे रोगांपासून संरक्षण करण्यासाठी रासायनीक द्रव्यांची फवारणी केल्याने आरोग्यावर दुष्परिणाम होतात म्हणून पीकावर रासायनीक द्रव्याचा उपयोग टाळावा.

५.) सेंद्रिय खते प्राण्यांपासून प्राप्त होते म्हणून जनावरांनची काळजी घ्यावी ज्यात त्यांचे राहण्याचे ठिकाण व चारा याचे विषेश लक्ष द्यावे.

६.) महत्वाचे म्हणजे पर्यावरणावर पडणारा प्रभाव जंगल आणि त्यात असणारे प्राणी व प्रकृतीक जीव यांचे संरक्षण करावे.

काळाची गरज लक्षात घेऊन सेंद्रिय शेती अवलंब केल्यास उपयोग–

१.) सेंद्रिय षेती द्वारे भूमीची उत्पादन क्षमता स्थिर ठेवणे शक्य होते.

२.) सेंद्रिय शेतीतून भूमी व पर्यावरण संतुलित राखण्यास मदत होते.

३.) सेंद्रिय शेती ने कृषी मित्र आणि उपयोगी कृमी व किटकांच्या संरक्षण होईल.

४.) सेंद्रिय खते व द्रव्यासाठी लागणारा खर्च कमी करण्यास मदत होते

५.) सेंद्रिय खतांचा व द्रव्याचा उपयोग कमी खर्चात अधिक उत्पादन व लाभ प्राप्त करून देतो.

६.) सेंद्रिय शेती पासून प्राप्त अन्य धान्य, फळे आणि भाजीपाला यांचे मुल्य पोष्टीकता रासायणीक पध्दतीच्या तुलनेत जास्त असते.

सेंद्रिय शेती करताना शेतकर्यांनी शेती पिकविण्यासाठी योग्य प्रकारे जमीनीची मशागत करून दर्जेदार बी–बीयाणे निवडावी त्यामुळे भरघोस पीक प्राप्त होते व पीके ही आलटून पालटून घ्यावी जमीनीची

कस वाढविण्यासाठी शेणखत, वाळलेल्या तनाचे खत , शेळ्या, मेंढ्या,डुकर., कोंबडी , गांडूळ, कासव , या सारख्या प्राण्यांच्या विष्ठेतून प्राप्त खत तसेच हाडाचा चुरा या सारख्या प्राणीजन्य सेंद्रिय खताचा उपयोग करावा.

सेंद्रीय शेती करणे आवश्यक –

१. मातीचे संवर्धन झाले पाहिजे.

२. तापमानात होणा–या बदलानुसार उत्पादन घेणे.

३. पावसाचे पाणी अडवा झाडे जगवा यासाठी नियोजित संवर्धन.

४. पाण्यासाठी सौर उर्जाचा,सौर नलिकांचा उपयोग.

५. शेतीसाठी उपयोगी गरजांचे नियोजन.

६. नैसर्गिक कालचक्रांचा विचार आणि त्याचे पालन.

७. जनावरांची काळजी.

८. नविनिकरणीय संसाधनाचा उपयोग.

सेंद्रीय शेतीचे मुख्य वैशिष्टे

१. **मातीची सुपीकता कायम टिकवून ठेवता येते** सेंद्रीय शेती हि एक स्थायी आणि पर्यावरणास अनुकूल असी उत्पादन प्रक्रिया आहे की ज्यामुळे लहान शेतक–यासाठी फायद्याचे असते. शेतीची योग्य पध्दतीने मशागत करून कमी खर्चात जास्त व दर्जेदार उत्पादन घेता येते.

२. आर्थिक उत्पादनात वाढ सेंद्रीय शेती पध्दती पीकांची लागवड केल्यास शेतक–यांना करावा लागणारा खर्च कमी येतो व आर्थिक फायदे होते. सद्या भारतात रासायनिक खते व किटकनाशक फवारनी यावर प्रचंड खर्च करावा लागतो. परंतु उत्पन्नात व उत्पादनात वाढ होत नाही. शेतक–यांच्या डोक्यावर कर्जाचे डोंगर वाढला की आत्महत्याचे प्रमान वाढते.

३. अन्न सुरक्षिततेची खात्री व जीवनमान उंचावण्यासाठी मदत होईल भारतात हरितक्रांती जेव्हा घडून आली तेव्हापासून रासायनिक खतांचा वापर जमीनीत मोठ्या प्रमाणात होऊ लागला, वारंवार एकच एक पीक त्या जमीनीतून घेत आहेत त्यामुळे शेतातील उत्पादन घटत आहे. तसेच अन्नघान्य व इतर पीकात पौष्टिकतेचे प्रमान कमी होऊन आरोग्यास हानीकारक होते.परंतु सेंद्रीय शेतीतील अन्नधान्य व उत्पादन विशमुक्त होऊन आरोग्य, जीवनमान उंचावण्यासाठी मदत होते.

सेंद्रिय शेती मुळे फायदे

१. नत्र पुरवठा जमीनीत सेंद्रिय खते टाकल्यास झाडाची झपाट्याने वाढत होते फळे व फुले अधीक येतात.

२. जमीनीच्या ओलावा क्षमतेत वाढरू जर शेतीत सेंद्रिय खतांचा वापर केल्यास जमीनीत पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते व जमीनीची धूप थांबते.

३. कार्बनीक पुरवठा जमीनीची असंख्य जीवानूच्या वाढीसाठी कार्बनीक सेंद्रिय खतांचा उपयोग होतो हे जीवाणू झाडांना जमिनीतून अन्नद्रव्य उपलब्ध करून देण्यास व पीकांची वाढ होऊन उच्च प्रतीच्या आरोग्यास पोषक असणारे उत्पादनाची निर्मिती होते. भूमी संरक्षण व सुपिकता टिकवून ठेवण्यासाठी पुन्हा एकदा सेंद्रिय षेती कडे वळणे गरजेचे असल्याचे दिसून येते काळाची पावले ओळखून काही ठिकाणी सेंद्रिय शेती ची वाट धरत असल्याचे दिसते ज्यातून आरोग्य, पर्यावरणाचे संवर्धन करणे शक्य होते.

संदर्भ

1. *'बोहरा, मनात. " जैवीक खेती समय की मांग" कृषी सेवा पत्रिका, घक्टोबर ३०,२०१७, http://www-krishisewa-com] acces फेबृवारी २८,२०१८.*

2. *धुबे, नागेश शेंद्रिय खतांचे प्रकार." कृषकिंग, नोव्हेंबर ३,२०१७, ttp://www-krishiking- com] acces-मार्च,२,२०१८*

3. *मधसुदन, गजेंद्र सिंह."जमाना जैवीक खेळती का." कुरुक्षेत्र६०, अंक०५(२०१६)रू२४–३०.*

´4. *पटवर्धन, जगदीश."सेंद्रिय षेती आणि फायदे." फेबृवारी,१०,२०१४, http://www-maathisrushti\com]acces- मार्च,८,२०१८.*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

भारतीय उच्च शिक्षणा समोरील आव्हाने

प्रा. बाळासाहेब विठ्ठलराव तौर
सहाय्यक प्राध्यापक आणि विभाग प्रमुख समाजशास्त्र विभाग,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंकुशनगर, ता. अंबड, जि. जालना

★★★

गोषवारा– ब्रिटिशांपासून आपण साहेबी परंपरा स्वीकारली आणि सोयीस्करित्या ती जोपासली. गल्लोगल्ली आणि घरोघरी साहेब निर्माण झाले. पोषाखी पंडित यांचीही त्यातभर पडली. प्रत्यक्ष काम अथवा श्रम करणे म्हणजे कमीपणा, हे त्या परंपरेचे सूत्र. खरे तरी त्याचे मूळ केवळ इंग्रजांच्या वर्चस्वाच्या परंपरेत आहे असे म्हणणे ही तितके बरोबर नाही. ब्रिटिशपूर्व काळात ही आपल्या देशातल्या तथाकथित पंडितांनी आणि धर्ममार्तंडांनी बुद्धी आणि श्रम यांची फारकत केली. त्या आधी भारतात श्रमाला प्रतिष्ठा होती. विद्वान व कारागिर यांच्या मध्ये संपर्क होता. विज्ञान व कला यांची जोपासना होत होती. ताम्रपाशाण युगाच्या प्रगतीची पूर्वपीठिका होती आणि त्यानंतर ही पोलाद उत्पादनाची प्रक्रिया व त्या संबंधीचे षोध, जस्त शुद्ध करण्याची पद्धत, दशांश पद्धत, शून्याची कल्पना, हस्तकला व हस्त कौशल्य या नानाविध बाबतीत भारतात प्रगती झाली होती. कापड विणण्याची कला विलोभनीयरित्या विकास पावली होती. इतकेच नाही तर पुरातन काळात रोगनिदान उपचार याबाबतीतही शास्त्र विकसित झाल्याचे आपणास वाचावयास मिळते.

वरील स्थितीत समाज एक प्रकारे एकसंघ होता तथापि समाजाच्या सुस्थितीचे हे पर्व लवकर संपले. तथाकथित धर्ममार्तंडांनी विव्दानाची व समाज धुरिणांची जागा घेतली. त्यांना अहंकार निर्माण झाला. केवळ पुरातन कल्पना, परंपरा व तथाकथित ज्ञान यांची जोपासना करण्याची संकुचित कल्पनाच ते उराशी बाळगून बसले. समुद्र पर्यटनावर त्यांनी बंदी घातली. त्यामुळे जगाचा संपर्क तुटला. जातीपातीच्या उतरंडी रचनेची नसती उठाठेव शूद्रांना शिक्षणाचे दरवाजे बंद करणारी ठरली. स्त्रियांनाही क्षेत्राप्रमाणेच तुच्छ लेखले. दोघांचीही गणना त्यांनी जनावरांच्या बरोबरीने केली. शूद्र व स्त्री यांच्या दास्याची वाटचाल पुढे चालत राहिली. कोणत्या जातीने काय काम करावे, याच्या चर्वितचर्वणात हे धर्ममार्तंड दंग झाले. परकीय गुलामगिरी चीड यांच्यात निर्माण झाली नाही. विज्ञान युगाच्या काळात या महाभागांना जाग आली नाही. धर्म आणि विज्ञान हे भिन्न आहेत, असे गॅलिलियो युरोपमध्ये सांगत होता. पण या धर्ममार्तंडांच्या ते गावीही नव्हते, इतकेच नव्हे तर त्यानी त्याचा छळ केला. येथेही ज्ञानेष्वर आणि तुकाराम यांचा छळ झाला. हा खरा प्रत्यक्ष ज्ञानाचा छळ होताच पण जातीपातीच्या उच्चनीचतेच्या विशारी विकृतीची ही ही जोपासणा होती. कर्मठ धर्ममार्तंडाच्या उण्मत सत्तेचा समाजावर पगडा बसला होता. या परंपरेच्या पगडयातून आजही आपली शिक्षण पद्धती पूर्णपणे मुक्त झालेली नाही. स्त्रिया, दलित, आदिवासी, भटके विमुक्त व इतरही गरीब श्रमजीवी आजही शिक्षणापासून वंचितच आहेत. ज्ञान–विज्ञानाची त्यांची गाठ पडायला अजूनही किती पिडया जातील हा संशोधनाचा विषय ठरेल. त्यातच ग्रामीण आणि शहरी, ध नाडे आणि निर्धन अशा विभागणीची दरी शिक्षण क्षेत्रात अधिकच रुंदावत आहे. स्वातंर्त्यानंतर पन्नास वर्षाचा काळ जाऊन आमच्या शिक्षणाची ही अवस्था. पण त्याबाबत फारशी खंत आम्हाला नाही हा मोठा धक्कादायक दैवदुर्विलास आहे. म्हणूनच प्रस्तुत, "भारतीय उच्च शिक्षणासमोरील आव्हाने" या संशोधन लेखांमध्ये भारतातीय उच्च शिक्षणव्यवस्थे समोरील आव्हाने या अध्ययन विशयाच्या अनुशगाने उच्च शिक्षणाची संकल्पना समजून घेऊण, उच्चशिक्षणाची वर्तमान स्थिती व भारतीय उच्च शिक्षणाचा समोरील आव्हानाचे या बाबीवर चिंतन करण्यात आले आहे.

मुख्यशब्द – भारतातीय, उच्च शिक्षण, आव्हाने.

प्रस्तावना – मानवी जीवन व शिक्षण यांचा संबंध अत्यंत घनिष्ट आहे. शिक्षण हे मानवी विकासाचे सर्वात महत्वाचे साधन आहे. शिक्षणाद्वारे विकास व विकासाद्वारे शिक्षण. या समिश्र प्रक्रियेतून मानवी जीवनाचा प्रवास पुढे जात असतो. शिक्षणामुळे मानवी जीवनामध ये उत्क्रांती घडून आलेले आहे. शिक्षणामुळे रूढी, प्रथा, परंपरा, अस्पृष्यता, गुलामगिरी या समस्या संपुष्टात येऊन प्रत्येक व्यक्तीला आत्मसन्मानाने जगता येते आणि कुटुंब समाज व देशाचा विकास होतो. शिक्षण आणि विकास अनन्य प्रक्रिया आहे. शिक्षणामुळे व्यक्तींच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांचा सर्वोच्य आविष्कार होतो. शिक्षण हे केवळ जीवनाला आकार देत नाही तर जीवनातील समस्यांची सोडवणूक देखील करते. शिक्षणामुळे मानवाचे नवीन विचार प्रगल्भ होतात. मानवी जीवनावर सुसंस्कार करून ते अधिक सहेतुक सुखी व समृद्ध बनविणे हा शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. उदान्त विचाराने वागणारी चांगली माणसे तयार करणे हा शिक्षणाचा खरा उद्देश प्लेटो या तत्त्ववेत्त्यांनी सांगितला. मानवी जीवनात नैतिकतेला अनन्य साधारण महत्व आहे. चारित्र्याविणा शिक्षण याला महात्मा गांधीनी सामाजिक पापांच्या जंत्रीत समाविष्ट केले आहे. चारित्र्य आणि शील जोपसनारे शिक्षण आवश्यक आहे. नीतिमान समाज त्यातून निर्माण झाला पाहिजे. नीतिमान समाज, नीतिमान शिक्षण तज्ञ, शास्त्रज्ञ, प्राध्यापक, शिक्षक आणि तशाच नीतिमत्तेच्या वारसा घेतलेले विद्यार्थी हीच जगातील स्पर्धेला सामोरे जाण्याचे महत्वाची शक्ती, शक्तिस्थाने भविष्यात असतील परंतु भारतीय शिक्षण पद्धतीचा विचार करता ती

परंपरेच्या पगडयातुन आजही पूर्णपणे मुक्त झालेली दिसत नाही. १९९१ मध्ये भारतात जागतिकीकरणाला सुरुवात झाली. १९९५ मध्ये स्थापना झाल्यानंतर गॅट्स कराराअंतर्गत डंकेल प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर भारताची शिक्षण व्यवस्था ही जागतिक उदारीकरणाच्या धोरणामुळे जागतिक बाजारासाठी खुली करण्यात आली. मुक्त आर्थिक धोरणानुसार शिक्षण क्रयवस्तू ठरले. शिक्षणावरील खर्च अनुत्पादक समजला गेल्यामुळे शिक्षणावरील खर्चात कपात करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर भारताने स्वीकारलेल्या कल्याणकारी योजनेला व भारतीय संविधानातील कलम २६ (१) Right to Education मूलभूत अधिकाराला मूठमाती देणारी शैक्षणिक धोरणे स्वीकारली जात आहेत. संविधानातील १४, १५, १६ व १७ या कलमांना बाजूला सारून, शिक्षणाचे खाजगीकरण करून शैक्षणिक भेदभावाला सुरुवात झाली. शिक्षणाच्या खाजगीकरणे आर्थिकदृष्ट्या मागास समाजाला शिक्षणापासुन दूर लोटल्याने त्यांचे उच्च शिक्षणातील प्रमाण कमी होत आहे. जागतिक स्तरावरील एलपीजी चा परिणाम भारतीय शिक्षण व्यवस्थेवर झाला आहे आणि त्यामुळे आज शिक्षण क्षेत्रात अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. आज अनेक षैक्षणिक आव्हाने भारतीय शिक्षणव्यवस्था समोर उभी टाकली आहेत. म्हणून प्रस्तुत, "भारतीय उच्च शिक्षणा समोरील आव्हाने" या संषोधन लेखांमध्ये उच्चषिक्षणाची संकल्पना समजून घेऊन, भारतातील उच्च शिक्षणाची सद्यास्थिती व उच्च शिक्षणात समोरील आव्हानाचे विष्लेशण करण्यात आले आहे.

अध्ययन विषयाचे उद्दिष्ट

1. उच्च शिक्षणाची संकल्पना समजून घेणे.
2. उच्च शिक्षणाची वर्तमान स्थिती अभ्यासणे.
3. भारतीय उच्च शिक्षणासमोरील आव्हाने अभ्यासणे.

अध्ययन विशयाचे महत्व – शिक्षण हे मानवी विकासाचे सर्वात महत्वाचे साधन आहे. शिक्षणाद्वारे विकास व विकासाद्वारे शिक्षण. या समिश्र प्रक्रियेतून मानवी जीवनाचा प्रवास पुढे जात असतो. शिक्षणामुळे मानवी जीवनामध्ये उत्क्रांती घडून आलेले आहे. शिक्षणामुळे रूढी, प्रथा, परंपरा, अस्पृष्यता, गुलामगिरी या समस्या संपुष्टात येऊन प्रत्येक व्यक्तीला आत्मसन्मानाने जगता येते आणि कुटुंब समाज व देशाचा विकास होतो. शिक्षणामुळे व्यक्तींच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांचा सर्वोच्य आविष्कार होतो. मानवी जीवनावर सुसंस्कार करून ते अधिक सहेतुक सुखी व समृद्ध बनविणे हा शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. भारताची शिक्षण व्यवस्था ही जागतिक उदारीकरणाच्या धोरणामुळे जागतिक बाजारासाठी खुली करण्यात आली. मुक्त आर्थिक धोरणानुसार षिक्षण क्रयवस्तू ठरले. षिक्षणावरील खर्च अनुत्पादक समजला गेल्यामुळे शिक्षणावरील खर्चात कपात करण्यात आली. शिक्षणाचे खाजगीकरण करून शैक्षणिक भेदभावाला सुरुवात झाली. जागतिक स्तरावरील एलपीजी चा परिणाम भारतीय शिक्षण व्यवस्थेवर झाला आहे आणि त्यामुळे आज अनेक शैक्षणिक आव्हाने भारतीय शिक्षणव्यवस्था समोर उभी टाकली आहेत, "भारतीय उच्च शिक्षणा समोरील आव्हाने" या संशोधन लेखांमध्ये उच्चशिक्षणाची संकल्पना समजून घेऊन, भारतातील उच्च शिक्षणाची सद्यास्थिती व उच्च शिक्षणात समोरील आव्हानाचे विश्लेषण करण्यात आले आहे. म्हणून प्रस्तुत अध्ययनाला खूप महत्त्व आहे.

संशोधन पद्धती – प्रस्तुत "समकालीन भारतातील आदिवासी समाजाच्या समस्या आणि उपाय" या अध्ययनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केला असून. सदरील विषयाच्या संदर्भातील तथ्य संकलनासाठी दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केला आहे. त्यामध्ये अनेक संदर्भग्रंथ, नियतकालिके, मासिके, पाक्षिके, संकेतस्थळे, वर्तमानपत्रे तसेच शासकीय व निमशासकीय संस्थाचे अहवाल इत्यादीचा उपयोग करून अध्ययन विशयाशी संबंधित तथ्याचे संकलन करण्यात आले आहे.

शिक्षणाची संकल्पना – प्रस्तुत संशोधन हे भारतातील उच्च शिक्षणा समोरील आव्हानाच्या संदर्भात असले तरी येथे त्या अनुशंगाने उच्च शिक्षणाची संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. म्हणून उच्च शिक्षण कशाला म्हणायचे याचादेखील थोडक्यात आढावा घेणे या ठिकाणी क्रमप्राप्त ठरते. उच्च शिक्षण कशाला म्हणायचे अमुक एक अभ्यासक्रम उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात बसतो की नाही, ते कसे ठरवायचे हा वादाचा विषय होऊ शकतो. "इंटरनॅशनल स्टँडर्ड क्लासिफिकेशन ऑफ एज्युकेशन" या पुस्तकात म्हटले आहे की, १२ वर्षे उत्तम पायाभूत शिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थी विशेष जे शिक्षण घेतो त्याला उच्च शिक्षण म्हणतात. या पुस्तकात उच्च शिक्षणाच्या तीन पातळ्या दर्शविल्या आहेत. काही विशिष्ट व्यवसायांना अनुलक्षून अभ्यासक्रम उदाहरणार्थ परिचारक किंवा शिक्षक होण्यासाठीची अहर्ता देणारा अभ्यासक्रम पहिल्या पातळीत येतात, त्यांच्या वरच्या पातळीवर ज्या अभ्यासक्रमातून पदवी मिळते असे अभ्यासक्रम दुसऱ्या पातळीत येतात आणि तिसरी पातळीही पदव्युत्तर व संशोधनपर अभ्यासक्रमाची असते. उच्च शिक्षणाचा अर्थ स्पष्ट करताना असे म्हणता येईल की, "भावी जीवनात आवश्यक असणारे ज्ञान, क्षमता, आरोग्य, उपजीविकेचे साधन, समायोजन करण्याचे सामर्थ्य, गुण व कौशल्य या सर्वांची जोपासना करणे म्हणजे उच्च शिक्षण होय".

भारतातील उच्च शिक्षणाची स्थिती – भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले तेव्हा देशात केवळ २० विद्यापीठे, ५०० महाविद्यालये आणि त्यात केवळ १.२ लाख विद्यार्थी होते. आज मात्र देशातील विद्यापीठांची संख्या ४० टक्क्यांनी, महाविद्यालयांची संख्या ८० टक्क्यांनी व विद्यार्थ्यांची संख्या १२७ टक्क्यांनी वाढली आहे. हे मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या २०१५ च्या वार्षिक अहवालानुसार मार्च २०१५ पर्यंत देशात विद्यापीठांची संख्या ७११ व महाविद्यालयांची संख्या ४०७६० इतकी आहे. राज्यनिहाय विद्यापीठांची संख्या लक्षात घेतली तर असे निदर्शनास येते की राजस्थान राज्यात सर्वात जास्त म्हणजे ६८ विद्यापीठ आहेत. त्या खालोखाल उत्तर प्रदेश ६४ आणि तमिळनाडू ५२ विद्यापीठे आहेत. याचा अर्थ देशातील विविध राज्यात विद्यापीठाचे

असमान वितरण झालेले आढळून येते. शैक्षणिक सत्र २०१४–१५ मध्ये सर्व अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांचे एकूण नामांकन २६५.८५ लाख होते. ज्यामध्ये १२४.७६ लाख विद्यार्थिनी होत्या. विद्यार्थिनींचे नामांकनाचे हे प्रमाण ४६.९३ टक्के इतकी होते. उत्तर प्रदेश मध्ये विद्यार्थ्यांचे नामांकन सर्वात जास्त ४३.९७ लाख होते. त्यानंतर महाराष्ट्र २८.६० लाख, तमिळनाडू २४.१ लाख आणि राजस्थानमध्ये १६.२४ लाख इतके होते. देशातील विद्यापीठे आणि महाविद्यालयातील शिक्षकांची संख्या २०१३–१४ मध्ये १०.४९ लाख होती ती २०१४–१५ मध्ये १२.६१ लाख इतकी झाली आहे या १२.६१ लाख शिक्षकांपैकी ८४.६६ टक्के शिक्षक महाविद्यालयात आणि बाकीचे १५.३४ टक्के शिक्षक विद्यापीठात होते. वर्ष २०१४–१५ मध्ये २२८४९ पीएच. डी पदव्या प्रदान करण्यात आल्या. यामध्ये सर्वात जास्त कला शाखेत ७४९० पीएच. डी पदव्या देण्यात आल्या त्यानंतर विज्ञान शाखेत ७०१८ पीएच. डी पदव्या प्रदान करण्यात आल्या. या दोन्ही शाखेतील एचडी पदव्यांचे एकूण प्रमाण ६३.४५ टक्के इतके होते.

भारतीय उच्च शिक्षणासमोरील आव्हाने – १९९१ नंतर स्वीकारलेल्या नव्या आर्थिक धोरणांचा स्वीकार केल्यामुळे शिक्षण क्षेत्रावरील जबाबदारी वाढली. शिक्षण क्षेत्रात बरेच बदल अपेक्षित होते परंतु आपण जुन्या नैसर्गिक व मानवी संसाधन साधना सह २१ व्या शतकात उभे आहोत. तोच तोच जुना अभ्यासक्रम, शिक्षकांची उदासीनता, जुन्या इमारती, जुने ग्रंथालय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाप्रतीच्या आवडीचा अभाव (कारण रोजगारांची हमी नाही), प्राथमिक सोयी, सुविधांचा अभाव यामुळे शिक्षण संस्था आणि एकूणच शिक्षण व्यवस्थेत एक प्रकारचा ठराविक साचलेपणा आला आहे. या शिक्षण व्यवस्थेमुळे विद्यार्थी केवळ परीक्षार्थी झाला आहे. ज्ञानार्थी नाही. त्याला केवळ पदवी हवी आहे जेणेकरून पदवीच्या आधारे नोकरी मिळेल पण आता नोकरीची हमी सुद्धा राहिली नाही. या सर्व प्रकारामुळे शिक्षण क्षेत्राला मरगळ आलेली आहे. ती दूर करणे आवश्यक आहे. हा साचलेपणा काढून शिक्षण क्षेत्राला गतिमान करण्याची गरज आहे.

2. संशोधनाचा दर्जा – आज आपल्या देशातील विद्यापीठात मोठ्या प्रमाणात संशोधन होत आहे. परंतु या संशोधनाचा गुणात्मक दर्जा हा अतिशय खालावलेला आहे. विद्यापीठ शिक्षण आयोगाने महाविद्यालयीन आणि विद्यापीठातील शिक्षकांना संशोधनासाठी प्रोत्साहन दिले आहे. विशेष म्हणजे संशोधनास अधिक चालना मिळावी म्हणून पीएच.डी करणाऱ्या शिक्षकांना जास्तीचे इन्क्रिमेंट दिले जाते. त्यामुळे अनेक प्राध्यापक पीएच.डी चे संशोधन करतात. परंतु त्यांच्या पीएच. डी संशोधनाचा दर्जा अतिशय निकृष्ट असतो. विषेशता समाजविज्ञान, कला इत्यादी क्षेत्रातील संशोधनाचा दर्जा खूपच निकृष्ट आहे. त्याकरिता संशोधनास प्रोत्साहन देणे, त्याची गुणवत्ता वाढविणे हा नवीन शैक्षणिक जीवनातील एक महत्त्वाचा मुद्दा आहे.

आपल्या देशातील संशोधनाचा दर्जा हा अतिशय निम्न आहे. ही बाब विद्यापीठ आयोगाने देखील मान्य केली आहे. या संदर्भात सखोल चिंतन केल्यानंतर असे निदर्शनास येते की, विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव आहे. शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा निर्माण होऊन, तो प्रत्येक गोष्टीचा संदर्भात प्रश्न उपस्थित करून त्याचे उत्तर किंवा कारण शोधण्याचा प्रयत्न तो करतो. शिक्षणाचा उद्देश हा सत्याचा शोध घेणे हा आहे. पाश्चात्य देशांमध्ये तेथील विद्यार्थी असो किंवा शिक्षक असून त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टी आहे. त्यामुळे पाष्चात्य देषातील महाविद्यालये आणि विद्यापीठ आतून मोठ्या प्रमाणात मूलभूत संषोधन कार्य होते. नवनवीन विषयासंदर्भात ते संशोधन करून अनेक शोध लावतात. परंतु आपल्या देशात वैज्ञानिक दृष्टीच नाही. त्यामुळे संषोधनाचा दर्जा एक भारतीय उच्च शिक्षणाच्या समोर महत्त्वाचे आव्हान असल्याचे आढळुन येते.

3. शिक्षणाचे खाजगीकरण आणि गुणवत्तेचा प्रश्न पाष्चात्य देशातील चारशे विद्यापीठ भारतात येण्यास उत्सुक आहेत. या विद्यापीठांना हव्या असलेल्या सुविधा पुरविण्याची जबाबदारी शासनाने घेतली आहे. या विद्यापीठांचे अभ्यासक्रम कोणत्या देशाच्या विकासाच्या अनुशंगाने तयार करण्यात आलेला आहे? दर्जेदार उच्च शिक्षण या विद्यापीठात मिळेल का? या विदेशी विद्यापीठांच्या तुलनेत भारतीय विद्यापीठे तग धरू शकतील का? या विदेशी विद्यापीठांची शैक्षणिक गुणवत्ता कोण तपासणार? भारताच्या शिक्षण क्षेत्र विदेशी विद्यापीठांसाठी खुले केल्यानंतर असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. हे विदेशी विद्यापीठ भरमसाठ शिक्षण शुल्क आकारणार अशा विद्यापीठातून पैसे देऊन श्रीमंतांची मुले प्रवेश घेतील व गरीब पण हुशार विद्यार्थी या विदेशी विद्यापीठातील शिक्षणापासून वंचित राहतील.

१९९१ नंतर भारताने स्वीकारलेल्या खाजगी करणाच्या धोरणाचा परिणाम शिक्षण क्षेत्रावरही झाला. शिक्षण ही क्रयवस्तू ठरली. शिक्षण शुल्क आकारण्याचा अधिकार शिक्षण संस्थांना दिला. शिक्षण संस्थांनी भरमसाठ शुल्क आकारले. त्याचा परिणाम गरीब विद्यार्थ्यांवर झाला. पैशा अभावी ते उच्च शिक्षण घेऊ शकत नसल्याने त्यांचे आयुश्य अंधकारमय झाले आहे. श्रीमंतांची मुले मात्र जास्त पैसे देऊन शिक्षण घेतील बुद्धिहीन उच्चशिक्षिताचा एक नवा वर्ग तयार होईल. म्हणून आजच्या भारतीय उच्च शिक्षण समोरील आव्हानाचा जर आपण विचार केला तर शिक्षणाचे खाजगीकरण आणि गुणवत्तेची समस्या हे एक मोठे आव्हान असल्याचे आपल्याला दिसून येते.

4. संगणक साक्षरता व तंत्रज्ञानाचा अभाव – २१ व्या 'krdkrhy Social Transformation च्या युगात Communication Computer मजूवता आणि Knowledge अत्यावश्यक आहे. अलीकडे डिजिटल हा शब्द अनेक ठिकाणी अनेकदा ऐकायला मिळतो. परंतु भारताला डिजिटल इंडिया बनविण्यासाठी आपण तयार आहोत का ? वरील चारही बाबीसाठी भारताला बरीच पावले उचलणे गरजेचे आहे. भारतात कम्प्युटर साक्षरता केवळ ६.१५ टक्के आहे. ५ जी नेटवर्कचे जाळे भारतभर पसरले नाही, यावर विशेष लक्ष द्यावे लागेल. कारण उत्तर आधुनिक काळात संगणक साक्षरता, तंत्रज्ञान साक्षरतेवरून

जगाची विभागणी दोन वर्गात होत आहे. तंत्रज्ञान ज्यांच्याकडे तो देश प्रगती करेल त्यांचे वर्चस्व जगावर राहील. तांत्रिक प्रगती करणे ही काळाची गरज आहे हे ओळखून भारतात डिजिटल लिटरसी मिशन राबविणे आवश्यक आहे.

5. सार्वजनिक–खाजगी भागीदारी – अलीकडे Public Private Participation च्या संकल्पनेबाबत बोलले जाते. ही संकल्पना १९९४ मध्ये चीनने राबविली. उच्च शिक्षण संस्थातील स्थानिक लोकांचा सहभाग वाढला. भांडवलदार आपला बाजारभिमुख अभ्यासक्रम संस्थांना देतात. त्या संस्था Lowost Program Course तयार करून देतात व विद्यार्थी तसे तयार केले जातात. विद्यार्थ्यांना बाजारभिमुख अभ्यासक्रमात शिक्षण घेतल्या मुळे रोजगार सहज उपलब्ध होतो. बेकारीचा प्रश्न मिटतो. परंतु भारतात मात्र हे चित्र उलट आहे. येथे खाजगी क्षेत्राचे उद्दिष्ट निव्वळ नफा कमावणे हे आहे. शिक्षण क्षेत्राचे चाव्या सरकार समारंभपूर्वक खाजगी क्षेत्राच्या हातात देत आह. या खाजगी क्षेत्राला उच्च शिक्षणाची काही देणेघेणे नाही. शिवाय जनता सुद्धा आपली जबाबदारी सरकारवर टाकून मोकळे होत आहे. त्यामुळे ची संकल्पना भारतात मूळ धरू शकली नाही. हे देखील भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेची समोरील महत्त्वाचे आव्हान आहे.

6. शिक्षणाचे भगवीकरण – भारतात काही फुटीरतावादी शक्ती आहेत. त्या देषात अशांतता व अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. भारताने लोकशाहीचा अवलंब केल्यानंतर सर्व भारतीयांना स्वातंत्र्याचा अधिकार प्राप्त झाला. घटनेच्या माध्यमातून धर्मनिरपेक्षता पाळण्याची हमी भारताच्या लोकांना दिली. परंतु अलीकडे एक विशिष्ट प्रभावी विचारधारेचे लोक मात्र देशात अस्थिरता आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. घटनेने प्रदान केलेल्या स्वातंत्र्यावर गदा आणत आहे. त्याचा फटका शिक्षण क्षेत्रालाही बसत आहे. विध्वंसक षक्ती देशात घातक क्रुत्ते करून उच्च शिक्षणापासून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना मागे खेचण्याचा प्रयत्न करीत आहेत. खरेतर धर्म आणि शिक्षण ही दोन्ही क्षेत्रे वेगवेगळे आहेत परंतु शिक्षण क्षेत्रात धर्माला घुसवून अलीकडे जे वादळ निर्माण करण्यात येत आहे त्याचा परिणाम मागास जातीच्या विद्यार्थ्यांना भोगावा लागत आहे. जात, धर्म, विचारधाराच्या आधारावर होणारा धुडगूस देशाची प्रतिमा मलिन करीत आहे. विशिष्ट एका धर्माची धार्मिक मुले अभ्यासक्रमात टाकण्यात आली आहेत. या शिक्षणातील भगव्याकरणाचे देखील भारतीय उच्च शिक्षण समोर फार मोठे आव्हान असल्याचे दिसून येते.

निष्कर्श आणि सारांश – २१ व्या शतकात जग विज्ञान – तंत्रज्ञानाने समृद्ध होऊन सर्व क्षेत्रात प्रगती करत आहे. भारत देखील त्या दृष्टीने प्रयत्नशील आहे. भारतात युवा मनुष्यबळ सर्वाधिक आहे. त्या मनुष्य बळाला शिक्षित आणि प्रशिक्षित केल्यास डॉक्टर अब्दुल कलाम यांच्या स्वप्नातील भारत लवकरच आर्थिक महासत्ता होईल. विज्ञान तंत्रज्ञानाच्या आधारे आर्थिक विकास साधताना बौद्धिक विकासावर भर देणे आवष्यक आहे. परंतु त्या दृश्टीने भारतात पुरेषा शैक्षणिक सुविधा उपलब्ध नाहीत. सरकारने स्वीकारलेल्या शैक्षणिक धोरणामुळे उच्च शिक्षण क्षेत्रावर आरिष्ट येत आहेत. त्यामधून मार्ग काढावा लागेल, शिक्षणाची गुणवत्ता वाढवावी लागेल, शिक्षणावरील खर्च वाढ करावी लागेल, शिक्षणाच्या खाजगीकरणावर अंकुष घालावा लागेल, बहुजनांच्या शैक्षणिक विकासाकडे लक्ष द्यावे लागेल, जागतिक बदलांचा विचार करीत भारतातील परिस्थिती लक्षात घेऊन उच्च शिक्षणासंदर्भात नियोजन करावे लागेल.

संदर्भसूची

1. *शिंदे रावसाहेब, (२०१०), "शिक्षण आणि समाज", अमेय प्रकाशन,पुणे.*
2. *वाघमारे जनार्धन, (२०१२), "लोकशाही आणि शिक्षण", पद्मगंधा प्रकाशन, पुणे.*
3. *भगत रा. तू. आणि कुलकर्णी विशंभर, (२००८), "पाश्चात्य शिक्षणातील विचारवंत", चौतन्य प्रकाशन, कोल्हापूर.*
4. *समाजशास्त्र सशोधन पत्रिका, (मार्च द्र २०१६), विशेशांक, भारतातील उच्च शिक्षण प्रश्न आणि आव्हाने, मराठी समाजशास्त्र परिशनेचे मुखपत्र, अंक–२०वा.*
5. *दुखाने अरविंद आणि देशपांडे लिला, (२००७), "प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र", नित्य नूतन प्रकाशन, पुणे.*
6. *दवेदी सीमा, (२००८), "वर्तमान शिक्षा नीति स्वरूप येऊ संभावनाए", साहित्य नीलम प्रकाशन, कानपूर.*
7. *शेख फारुख (संपादित), (२०१३), "आर्थिक विकास एक चिंतन", चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.*
8. *कापरे आनिता आणि भुते स्नेहल, (ऑक्टोंबर–डिसेंबर–२०१६), "अक्षरवेल", परिवर्तन प्रशिक्षण केंद्र, पुणे, त्रिमासिक, अंक–०३रा.*
9. *समाजशास्त्र सषोधन पत्रिका, (मार्च द्र २०१५), विशेषांक, शिक्षण आणि समाज, मराठी समाजशास्त्र परिषनेचे मुखपत्र, अंक–१९वा.*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

विनोबा भावे व महात्मा गांधी यांचे महिला सबलीकरणाविषयी विचार

प्रा. डॉ. सुषमा देशपांडे
इतिहास विभागप्रमुख,
डॉ. सौ. इं. भा. पाठक महिला महाविद्यालय, औरंगाबाद.

★★★

एक विधायक दृष्टीचे समाज सुधारक व मानवतेची प्रतिष्ठा जपणारे मानवता हा त्यांच्या तत्त्वविचारांचा केंद्रबिंदू असणारे आधुनिक संत म्हणून महात्मा गांधीजीचे नाव भारतीय इतिहासात अजरामर झालेले आहे. सत्ता विभागणी, निर्णय प्रक्रिया व सामाजिक, आर्थिक, राजकीय जीवनात समान सहभाग अशा महिला सबलीकरणाच्या पार्श्वभूमीवर गांधीजींनी म्हटले की स्त्रीलाही पुरुशांच्या बरोबरीने समाजात हक्काचे स्थान मिळायला हवे. ज्या स्वराज्यात स्त्री व पुरुशांना समान स्थान नाही ते स्वराज्यच नव्हे असे ते म्हणत. 'समान भौतिक पात्रता असणारा पुरुशाचा जोडीदार ही स्त्रीची भूमिका' गांधीजींना अपेक्षित होती. स्त्रीला पुरुशांएवढीच मानसिक शक्तीची देणगी मिळालेली आहे. त्यामुळे अहिंसक लढा देण्यास तीच अधिक कार्यक्षम व लायक आहे असे ते म्हणत. म्हणूनच त्यांनी स्त्रियांना राजकारणात व आपल्या चळवळीत सहभागी करुन घेतले.

स्त्रियांमधील आंतरिक शक्तीला ओळखून गांधीजींनी महिलांच्या शिक्षणावरही अधिक भर दिला. एक पुरुश शिक्षण मिळाल्यास सुशिक्षित होईल, पण एक स्त्री शिकल्यास एक कुटुंब सुशिक्षित होईल. कारण लहान मुलांवर संस्कार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य स्त्री करते. महात्मा गांधीजींनी महिलांमध्ये स्वाभिमान, स्वावलंबन, राष्ट्रीय भावना, विश्वास नेतृत्व भावना जागृत करण्याचे कार्य केले. स्त्रियांमध्ये निःस्वार्थी सेवाभाव, स्वार्थत्याग, सोषिकता, सहन शक्ती, नम्रता हे गुण निसर्गतःच आहे. त्यामुळे पुरुषांच्या तुलनेत स्त्री ही अधिक थोर ठरते. स्त्री ही त्याग, श्रद्धा, आत्मबलिदान, ज्ञानाचे मूर्तिमंत उदाहरण आहे असे गांधीजींचे मत होते.

गांधीजींनी आपल्या आश्रमातही स्त्री–पुरुष समानतेचा आदर्श ठेवला होता. गांधीजींच्या मते इष्वराने स्त्री पुरुषांना परिपूर्ण बनविले आहे. निसर्ग प्रक्रियेत दोघेही समान आहेत. तसेच स्त्री व पुरुश हे परस्परांस पूरक आहेत. भारतीय धर्म व संस्कृती ती स्त्रियांनीच टिकविली आहे. भारतीय स्त्रियांनी सीता, दमयंती, द्रौपदी यांचे आदर्श समोर ठेवून कठिण प्रसंगी निर्णायक वृत्ती ठेवावी व स्वतःची आणि समाजाची नैतिक पातळी उंचवावी व आजच्या समाजाचे नेतृत्व करावे.

गांधीजींच्या प्रेरणेनेच भारतीय राजकारणात कस्तुरबा गांधी, विजयालक्ष्मी पंडित, डॉ. सुशीला नायर, अरुणा असफअली अशी स्त्री रत्ने स्वयंतेजाने तळपून गेली व गांधीजींच्या चळवळीत या स्त्रियांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. आपल्या पत्नीच्या स्वभावावरुन समस्त स्त्री वर्गाच्या स्वभावाचा आपण अभ्यास केला असता असे आढळून आले की, स्त्रियांमधील असलेल्या आत्मभानाद्वारे संपूर्ण देशाचा कायापालट करतील. म्हणून त्यांनी नेहमी स्त्री जागृतीवर भर दिला. कायद्याने समान दर्जा व मतदानाचा अधिकार स्त्रियांना मिळालाच पाहिजे तसेच आर्थिक दृष्टीनेही स्त्री स्वयंपूर्ण व्हावी म्हणून पुरुषांप्रमाणेच स्त्रियांना आर्थिक अधिकार असावेत. आर्थिक क्षेत्रात अधिकार नसल्यामुळे पुरुशांनी स्त्रियांवर आजवर वर्चस्व गाजविले. पुरुशी अत्याचाराला उत्तर देण्यासाठी शिक्षण व शिक्षणातून आर्थिक दृष्टीने संपन्नता स्त्रियांमध्ये येईल. म्हणून ते स्त्रियांना उपयुक्त शिक्षण मिळायलाच हवे. त्याशिवाय त्यांना प्राप्त झालेले नैसर्गिक अधिकारही त्या उपभोगू शकरणार नाही. स्वतःचे रक्षण करु शकणार नाही. म्हणून त्यांनी नेहमीच स्त्री शिक्षणाची अपरिहार्यता विशद केली, पण स्त्रियांनी पुरुषांची नक्कल करु नये व पुरुषांशी स्पर्धाही करु नये. स्त्री पुरुश परस्परांना पुरक आहेत. स्त्रियांनी स्वतः शिक्षण घेवून सुशिक्षित होवून परस्परांना, परस्परांच्या प्रगतीचा फायदा करुन द्यावा.

गांधीजींनी भारतीय समाजातील पडदा पद्धतीवरही टीका केली. ही पद्धत त्यांना स्त्रियांवर अत्याचाराचे द्योतक वाटत होती. त्यामुळे त्यांनी ही एक रानटी प्रथा असून तीचा त्याग करावा असे ते म्हणत. एकूण महिला सबलीकरणाच्या संदर्भात गांधीजींनी स्त्री शक्तीचे मोठेपण ओळखले होते. स्त्रियांमध्ये सहनशक्ती, सोशिकता या गुणांबरोबर श्रद्धा, ज्ञान आहे व या ज्ञानाची ओळख गांधीजींनी स्त्रियांना करुन दिली व या शक्तीद्वारे स्त्रियांनी आपले स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण करावे. स्त्रियांना योग्य संधी मिळाल्यास त्या संधीचे सोने करण्याचे सामर्थ्य आहे. म्हणूनच गांधीजीनी आपल्या स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांना नेतृत्वाच्या संधी उपलब्ध करुन दिल्या व म्हणूनच महिला सक्षमीकरणात गांधी विचारांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. स्त्रियांच्या मनातील अनामिक भीती दूर करुन त्यांना समाजाच्या सर्व प्रवाहात सामील करुन घेणे गरजेचे आहे असा त्यांचा ठाम विष्वास होता. गांधीजींच्या योगदानामुळेच व प्रयत्नामुळेच भारतीय स्त्री स्वहक्काबाबत जागृत झाली व भारताच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनात तिची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली.

महिला सबलीकरणासंदर्भात विनोबा भावे यांचे ही नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. विनोबाजींच्या आश्रमात स्त्रियांनाही पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण दिले जात असे. कारण बालकांचे शिक्षण स्त्रियांशिवाय होवूच

शकत नाही. यावर त्याचा विश्वास होता. स्त्रीपुरुष भेद नष्ट करुन स्त्रियांना सामाजिक, कौटुंबिक, राजकीय अधिकार मिळावेत. समाजाच्या रक्षणासाठी स्त्रियांनी प्रयत्न करावेत, स्त्रियांनी कुठल्याही कामात पुरुशांवर अवलंबून न राहता आत्मविश्वासाने प्रत्येक कार्य करावे. स्त्रियांना पुरुशांच्या बरोबरीने अधिकार मिळावेत, पण हे अधिकार स्त्रियांनी स्वतः प्राप्त करावेत व अशा प्रकारे स्त्रियांनी समाजाला बदलण्याचे कार्य करावे. स्त्रियांनी सार्वजनिक जीवनात काम करावे, पण पुरुषांचे अनुकरण करु नये, तर स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करावे. स्त्रियांमध्ये समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, यांच्याविरुद्ध लढण्याची शक्ती असल्यामुळे त्यांच्या शिक्षणाचे महत्त्वही विनोबा भावे अधोरेखित करतात. विनोबा भावे स्त्री पुरुश समानतेचे पुरस्कर्ते होते. पुरुशाप्रमाणेच स्त्रियांना ही सामाजिक, राजकीय, कौटुंबिक अधिकार व कर्तव्य आहेत.

स्त्री शक्तीचा उपयोग हा अहिंसा, सेवा, सर्वोदय, शांती रक्षणासाठी व्हावा. तसेच स्त्रियांनी उद्योगी व स्वावलंबी व्हावे असे ते म्हणत. स्त्री ही उपभोगाचे साधन नाही तर परमेष्वराचे सृजन आहे, पूजा आहे असे ते मानत. स्त्रियांनी अखंड ज्ञानसाधना करुन समाजाचे मार्गदर्शन करावे. नैतिक आचरण व ब्रह्मविद्येच्या निष्ठेने तिने सिंहासारखी गर्जना करावी व समाजाला प्रभावित करावे. स्त्रियांनी पुरुषांची सेवा करावी हे विनोबाजींना मान्य नव्हते. उलट स्त्री स्वातंत्र्याचे त्यांनी नेहमीच समर्थन केले होते, विवाहाचा निर्णय स्त्रीने स्वतः घ्यावा. केवळ आईवडिलांच्या आनंदासाठी तिने त्यांच्या पसंतीने विवाह करु नये. स्त्रियांना अबला म्हणनेही त्यांना मान्य नव्हते. विनोबाजी स्त्रियांना सबला म्हणत व तिने स्वतःचे रक्षण स्वतःच करावे असे ते मानत व त्यासाठी त्यांनी पडदा पद्धतीलाही विरोध केला होता. त्यांनी अनेक स्त्रियांचे आश्रम सुरु केले. तसेच अनेक स्त्रियांची संमेलनेही आयोजित केली. ते स्त्रियांना प्रथम व श्रेष्ठ गुरु मानत असत. यावरुन आपल्याला विनोबाजींच्या विचारात स्त्रियांचे उच्च स्थान अर्थात् महिला सबलीकरणाबाबत त्यांचा दृष्टीकोण लक्षात येतो.

संदर्भ सूची :

1. *विनोबा, स्त्री शक्ती, परमधाम प्रकाशन, पवनार, 1999*
2. *विनोबा, नारी का महिमा, सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी 1992*
3. *विनोबा, सप्तशती, परमधाम प्रकाशन, पवनार, 2000*
4. *आचार्य विनोबा भावे, टंडण विष्वनाथ, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, दिल्ली 1997*
5. *नारियों के नेता और षिक्षक, कृपलानी सुचेता, साहित्य प्रकाशन वाराणसी, 1969*
6. *समाजसुधार : समस्याएँ और समाधान, गांधी साहित्य प्रकाशन, इलाहाबाद, सुमन श्री रामनाथ, 1969*
7. *भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास, डॉ. अनिल कटारे, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद*
8. *गांधी–पंडित नलिनी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, 1683*
9. *गांधी विचार दर्शन खंड – 1, गांधी वाङ्मय प्रकाशन समिती, महाराष्ट्र, 1969*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

आधुनिकीकरणाचा आंध आदिवासी जीवनावरील प्रभाव

डॉ. आर. वाघडव
समाजशास्त्र, विभागप्रमुख
विवेकानंद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

★★★

प्रस्तावना:— आंध आदिवासी जमात भारतात महाराष्ट्रासह तेलंगबाणी, आंध्रप्रदेश आणि मध्यप्रदेशात आढळते— हसन यांच्या मते, आंध जमात ही गोंड आदिवासी जमातीची शाखा आहे— त्या त्या भागातील प्रबळ जातींच्या प्रभावामुळे ते मूळ समाजापासून वेगळे झालेले आहेत. महाराष्ट्रात मराठा समाजाच्या संपर्कात आल्यावर त्यांनी त्यांच्या रूढी, परंपरा आणि भाषेत मराठा लोकांप्रमाणे बदल केलेला दिसतो. आंध हे स्वत:ला सातवाहन शरीराचे वंशज मानतात. सातवाहनाच्या काळात ही जमात जमीन जंगलाची मालक होती— सातवाहन राजाच्या मृत्यूनंतर ब्रिटीशांनी जमीन आणि जंगले आपल्या ताब्यात घेतली म्हणूनच आंध ही जमात मागासलेली राहिलेली दिसते. महाराष्ट्रात आंध ही जमात मराठवाडा आणि विदर्भात विखुरलेली आहे. भारतीय संस्कृती कोणात आंध ही एक विदर्भातील शेतकरी जमात असल्याचा उल्लेख आलेला आहे. परंतू बहुतांश आंध जमातीच्या लोकांकडे कोरडवाहू जमीन असून ते अल्पभूधारक आहेत. ही जमात मूळ आंध्रातील आहे असे अनुमान काढले जाते कारण आंध्रप्रदेशातही त्यांची बरीच वस्ती आहे. आंध्र प्रदेशातील आदिलाबादची सीमा महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्याला लागुन आहे. उद्योग व्यवसायाच्या निमित्ताने अनेक आंध कुटुंबीय महाराष्ट्रात स्थलांतरीत झाली असून मराठवाडा प्रदेश व परभणी आणि नांदेड जिल्ह्यांमध्ये आंध जमातीची संख्या अधिक असल्याचे दिसून येते. 2011 च्या जगणना अहवालानुसार महाराष्ट्रातील आंध आदिवासी जमातीची लोकसंख्या ही 4,74,110 इतकी असलेली दिसते. महाराष्ट्रातील परभणी, नांदेड, यवतमाळ, हिंगोली व अकोला जिल्ह्यात आंध जमातीचे लोक मोठ्या **प्रमाणात आढळतात** — परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. मानवी समाज देखील परिवर्तनशील आहे. परिवर्तनाची गती समाजपरत्वे वेगवेगळी असू शकेल मा. परिवर्तन नाही असा समाज पृथ्वीतलावर अस्तीत्वात नाही. समाजाची संरचना ही आर्थिक संबंधांनी निर्मित असते. औद्योगिक क्रांतीमुळे समाजाची आर्थिक संबंधांची व्यवस्था बदलल्यामुळेच समाजात परिवर्तनाची प्रक्रिया गतीमान झाली आहे. आदिवासी समाजात देखील आधुनिक समाजाच्या प्रभावामुळे परिवर्तन घडून येत असून महाराष्ट्रातील आंध आदिवासी जमात देखील त्याला अपवाद नाही. आंध आदिवासी जमातीतील परिवर्तनाचे स्वरूप विशद करणे हा या शोध निबंधाचा प्रमुख उद्देश आहे—

आंध समाज व संस्कृती :— आंध ही ,क प्राचीन आदिवासी जमात आहे. प्राचीन काळापासून या जमातीची समृध्द अशी सांस्कृतिक परंपरा आहे. मात्र आधुनिक समाजाच्या संपर्काने ही संस्कृती लोप पावत चालली आहे. पारंपारिक लोकनाट्या, विधिनाट्यो, लोकनृत्ये, दिंडार, लोककथा, लोकगीते, म्हणी, वाक्य प्रचार, उखाणे, वाद्य, संगीत या माध्यमातून आंध संस्कृती टिकून आहे. आंध जमातीचे दोन प्रकार पडतात. 'वरताती' म्हणजे वरचे अथवा उच्च आणि 'खालताती' म्हणजे खालचे आंध होय. या दोन टात विवाह संबंध होत नाहीत. आंध्र प्रदेशातील आंध लोक तेलगु भाषा बोलतात तर महाराष्ट्रातील आंध मराठी भाषेचा वापर करतात. हे लोक मध्यम ते कमी उंचीचे, पसरट नाक आणि चेहऱ्याची ठेवण असलेले आहेत. ही जमात मांसाहारी असून मराठी लोकांच्या संपर्कात आल्याने काही आंध आज संपूर्णत: माळकरी आणि शाकाहारी झाले आहेत.

आंध लोकांचे आडनावावरून बरेच समूह तयार होतात. उदा. बनसाले, डुकरे, नटकर, मगरे, मिटकरी, वाघमारे वगैरे आंध लोकांचे घर दगड मातीचे आणि काही प्रमाणात झोपडीवजा असते. परंतु आता शासकीय योजनांमधून त्यांना पक्के घरकूल मिळत आहे. आंध जमातीमध्ये छोटे शक्यतो दोन खोल्यांचे घर असते. घराभोवती लाकडी काटक्यांनी बनवलेले कुंपण असते. या कुंपणात पशुधन ठेवले जाते. काही घरे वाड्याप्रमाणे असतात. आंध लोकांचा पेहेराव हा मराठी लोकांप्रमाणे असतो. पुरूष धोतर बंडी घालतात, तर स्त्रिया साडी आणि चोळी परिधान करतात. आंध लोकांमध्ये मराठी लोकांप्रमाणे दागीणे वापरतात. शेती हा आंधांचा मुख्य व्यवसाय असून महादेव, खंडोबा, मसाई, मुंजा आणि स्थानिक देवतांची पूजा ते लोक करतात. आखाडी, गुढीपाडवा, नागपंचमी, होळी, पोळा, शिवरात्री हे त्यांचे प्रमुख सण आहेत. आंध जमातीचा हिंदू धर्माशी संपर्क वाढल्याने आपल्या मूळ संस्कृतीपासून हे लोक विचलित झालेले असून या जमातीत सामाजिक सांस्कृतिक परिवर्तनाची प्रक्रिया गतीमान झालेली आहे. या परिवर्तनाचा आढावा संशोधकाने खालील मुद्यांव्दारे घेतला आहे.

कुटुंब संस्थेतील परिवर्तन :— आंध जमातीत पूर्वी संयुक्त कुटुंब पध्दती अस्तीत्वात होती. आज आधुनिकी करणाच्या प्रक्रियेच्या प्रभावातून व्यक्तीवादी दृष्टीकोन या जमातीत वाढला असून विभक्त कुटुंबाचे प्रमाण या जमातीत वाढते आहे. आंध जमातीच्या कुटुंब संस्थेतील बदलाचा आढावा शिंदे पंडित (2001) यांनी आपल्या संशोधनातून घेतला आहे. आज आंध लोकांचा आपल्या कुटुंबाचा आकार हा लहान ठेवण्याकडे कल आहे. कुटुंबात लिंगाधारीत श्रमविभागणी झालेली दिसून येते. कुटुंबात प्रामुख्याने पुरूष प्रधान संस्कृती असते मात्र कुटुंबातील महत्वाच्या निर्णय प्रसंगी महिलांची मते देखील विचारात घेतली जातात. अपत्य संगोपनात कुटुंबातील सर्व सदस्य सहभागी असतात. पूर्वीपासून चालत आलेली आप्तसंबंध व्यवस्था व कुलपध्दती आजही आंध जमातीत कायम आहे. सर्व समान वंश परंपरा मानणारे परस्परांच्या सुख दु:खात सहभागी होतात. अपत्यांच्या

शिवाजी बाबत हे लोक अधिक जागृक असल्याचे दिसतात. आधुनिकतेचा प्रभाव मान्य करावा लागतो.

विवाह प्रथेतील परिवर्तन :– आंध जमात प्रामुख्याने अंतर्विवाही आहे. विवाहासाठी जोडीदार निवडीसाठी आपल्याच जमातीतील व्यक्तीला प्राधान्य दिले जाते. मात्र समान आडनाव किंवा रक्त संबंधीत सदस्यात विवाह केले जात नाहीत. आंध ही जमातीत वरताती व खालताती या दोन गटात विवाह करणे निशिध्द मानले जाते. दोन्ही गटातील आंध लोक विवाह समारंभादी प्रसंगी परस्परांना आंमत्रित करतात मात्र बेटी व्यवहार करीत नाहीत. विधवा पूनर्विवाहाला मात्र मान्यता दिसत. पूर्वी घरातील जेष्ठ लोकच मुलांच्या विवाहासंबंधीचा निर्णय शेत होते मात्र आता विवाह प्रसंगी वर वधूची पसंती विचारात घेतली जाते. शिवाय आज आंध जमातीत हुंडा प्रथा देखील वाढली आहे. आज या जमातीत शिवाजीच्या प्रभावामुळे क्वचित प्रसंगी आंतरजातीय विवाह होऊ लागले आहेत.

धार्मिक श्रध्दा व संस्कृतीमधील परिवर्तन:– आदिवासी समाजाचा नेहमीच इतर धार्मिक प्रवाहांशी संबंध आलेला आहे. केवळ धार्मिक प्रवाहच नाहीत तर स्थानिक प्रवाहांशी त्यांचा संपर्क राहिलेला आहे. इतर धर्मियांकडून त्यांनी काही बाबीच केवळ स्वीकारलेल्या नाहीत तर इतर समाजावर देखील काही प्रमाणात आदिवासींचा प्रभाव पडलेला आहे. हिंदू धर्मातील जाती संस्थेशी आदिवासी समाजाचा सर्वात अधिक संबंध आल्याचे ,म. ,न. श्रीनिवास यांना आढळून आले आहे. आदिवासींनी हिंदूधर्मियांकडून काही धार्मिक प्रथा देखील स्वीकारलेल्या आहेत. आदिवासी प्रामुख्याने निसर्ग पूजक आहेत मात्र हिंदू धर्माच्या प्रभावामुळे त्यांनी हिंदू देव देवतांचा देखील त्यांनी स्वीकार केला आहे. आंध जमातीच्या बाबतीत ही जमात हिंदू की अहिंदू हा वाद कायम राहिलेला आहे. हिंदू धर्माच्या संपर्कात आल्याने हिंदू संस्कृतीचा प्रभाव आंध जमातीवर अधिक पडलेला दिसतो. मूलतः आंध जमातीची संस्कृती, आचार विचार, खानपान, परंपरा यांचे अवलोकन करता असे दिसते की यांची संस्कष्ती अन्य समाजापेक्षा भिन्न आहे. आंध जमात निसर्ग पूजक आहे. ते जंगलातील वर्ष, प्राणी, जल, अग्नी, आकाश यांना देव मानतात त्यांची उपासना करतात. त्यांचे संपूर्ण जीवन निसर्गाच्या सानिध्यात व्यतीत होत असल्याने निसर्गातील अलौकीक शक्तीची उपासना करणे ते आवश्यक मानतात. देवी देवतांची पूजा नैवेद्य देऊन दाखवून करण्याची परंपरा होती. नवस फेडताना बोकड किंवा कोंबड्याचा बळी दिला जात होता. आज आंध जमातीच्या धार्मिक जीवनावर हिंदू धर्माचा प्रभाव अधिक असल्याचे जाणवते. आज आंध समुदायातील देवी देवतांबरोबरच राम, कृष्ण, गणपती, विशू विठ्ठल–रूखमाई अशा देवी देवतांचीही पूजा केली जाते. त्याच बरोबर साईबाबा, गजानन महाराज यांच्यावरही त्यांची श्रध्दा दिसते. आज पूजा पध्दती मध्ये बळी देऊन पूजा करणाऱ्यांचे प्रमाण कमी झाले आहे. पूजा आणि नवस आता साध्या पध्दतीने केली जातात. आज आंध लोक काशी, प्रयोग, मथुरा, नाशिक, केदारनाथ, बद्रीनाथ, तिरूपती येथील बालाजी, शेगाव, शनिशिंगणापूर अशा हिंदू धार्मिक स्थळांना भेटी देतात. आंध जमातीत हिंदू सणवार, उत्सव साजरे केले जातात. संक्रांत सणाला हिंदू स्त्री प्रमणेच आंध स्त्री देखील वण देते व राखी पौर्णिमेला भावाला बहिणी राखी बांधतात, पूर्वी राखी बांधली जात नव्हती. हिंदू धर्मातील सण उत्सवांचे अनुकरण आंध जमातीतील महिलांनी केलेले दिसते. आंध जमातीतील सण व उत्सव प्रसंगातील गाणी मात्र हिंदूपेक्षा वेगळी असलेली दिसतात. व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत विविध धार्मिक संस्कार पूर्वीप्रमाणेच काटेकोर पेक्षा केले जात असल्याचे दिसून येते. आदिवासी समाज अज्ञान आणि अंधश्रध्देच्या प्रभावाखाली आहे. बहुतांश आदिवासी जमातीत आजारपणात पारंपारिक उपचार केले जातात. आंध आदिवासी जमातीतही पूर्वी आजार दूर कर. यासाठी नवस सायास केले जात होते. आज आधुनिक उपचार पध्दतीमुळे देवी देवतांवरील विश्वास कमी झाला असून आजार ठिक होण्यासाठी नवस केले जात नाही तर आधुनिक उपचार घेतले जातात.

आदिवासी जमातींचे वस्त्रालंकार देखील पारंपारिक आणी वैशिष्ट्यापूर्ण दिसतात. आदिवासी जमातीत प्रामुख्याने अगदी मोजके कपडे अंगावर परिधान केले जात होती. मात्र आज इतर आदिवासी स्त्री पुरूषांप्रमाणेच आंध आदिवासी स्त्री पुरूषांच्या पारंपारिक वस्त्राभषणांमध्ये देखील बदल झाला आहे. महिला आज साळी व ब्लाऊज वापरतात तर बहुतांश पुरूष देखील धोतर, सदरा,ेवजी आधुनिक पॅन्ट, शर्ट परिधान करतात. आंध तरूण आधुनिक फॅशनप्रमाणे केशभुषा करतात.

दिंडार नृत्य नाट्याचे बदलते स्वरूप :– दिंडार हे आंध जमातीसाठी मनोरंजनाचे माध्यम असून तो त्यांच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. पूर्वी दिंडारामध्ये पौराणिक कथा घेऊन दिंडार केला जात होता. आज पौराणिक कथोंवजी वर्तमान समाजातील व्यंगांवर बोट ठेऊन दिंडार केला जातो. पेक्षकांना खिळवून ठेव. यासाठी हास्य विनोद केले जातात. आज दिंडारात चित्रपट गाण्यांच्या चालीवर अभंग, गौळणी म्हटल्या जातात. आधुनिक मनोजंनाची साधणे आणि संस्कृतीचा हा प्रभाव आहे असे म्हणता येईल. आंधाच्या दिंडार या नृत्यनाट्याचे झालेले हे रूपांतरण संस्कृतीकरणाची प्रक्रिया स्पष्ट करते.

शेती पध्दतीत परिवर्तन :– शेती हा आंध लोकांचा पारंपारिक आणि प्रमुख व्यवसाय आहे, तर पशुपालन, शिकार आणि सरपण गोळा करणे हे त्यांचे दुय्यम व्यवसाय आहेत. आंध जमातीतील लोक मोठ्या प्रमाणात लोक रोजंदारीवर काम करतात. डिंक संकलन व तेंदूपत्ता गोळा करण्याचे कामही करतात. आज काही आंध लोक दुसऱ्याची शेती कसणे, त्याचबरोबर शेती विभागून ती कसणे अशा प्रकारची कामे करतात. तर औद्योगिकरणाच्या प्रक्रियेमुळे आज बरेच आंध कुटुंबीय शहरात असंघटीत क्षेत्रात, बिल्डींग कन्स्ट्रक्शनमध्ये मजूर म्हणून काम करत आहेत. बरेच आंध लोक आज सरकारी खात्यात लेखनिक तसेच शिक्षक म्हणूनही काम करू लागले आहेत.

कृशी व्यवसाय संबंधित धार्मिक विधीत बदल झाला आहे. आता पेरणी, पीक काढणी अशा वेळी पूजा अर्चा क्वचितच केली जाते.

कारण आज लाकडी अवजारे क्वचितच दिसतात. शासकीय योजनांच्या लाभान्वये अनेक आंध लोकांना लोखंडी अवजारे मिळालेली आहेत. शिवाय आधुनिक मळणीयंत्र देखील मिळाले असून धार्मिक विधी, पूजा अर्चा यांचे प्रमण कमी झालेले दिसते.

शिक्षणामुळे झालेला बदल :– शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. शिक्षणामुळेच नवीन कौशल्ये आत्मसात केली जातात व त्यामुळे रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतात. स्वातंत्र्योत्तर काळात कल्याणकारी शासन व्यवस्था स्वीकारल्यामुळे सर्वांचे हित साधणे व सर्वांचा विकास घडवून आणलो शासनाचे कर्तव्य मानले गेले. त्यामुळे संविधानातच समाजातील इतर मागास घटकांबरोबरच अनुसूचित जमातीच्या लोकांनाही शिक्षण घेता यावे यासाठी काही तरतूदी केलेल्या दिसतात. संविधानातील तरतूदीनुसार अनुसूचित जमातीमधील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, आश्रमशाळा, वसतीगृहे, आरक्षण, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन, स्वयंरोजगार प्रशिक्षण अशा अनेक तरतूदी केलेल्या दिसतात त्याचाच लाभ घेतल्याने आंध ा जमातीत परिवर्तनाची प्रक्रिया गतीमान झाली आहे.

राजकीय बदलाचे स्वरूप :– आंध जमातीत पूर्वी जमात पंचायत प्रचलित होती. आंधांच्या परंपरागत जात पंचायतीचे प्रमुख पद हे जमातीतील जेष्ठ व्यक्तीकडे असते त्यास 'मोहतरिया' असे म्हणतात. जमात पंचायतीत पाच वा सात पंच असत. त्यातही वृध्द, अनुभवी लोकांना स्थान दिले जात होते. जमात पंचायतीत स्त्रियांचा सहभाग नव्हता. आंध जमातीतील भांडण, तंटे, मतभेद आणि इतर गुन्हे सोडविण्याचे काम ही पंचायत करीत होती. स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींच्या राजकीय विकासासाठी लोकसभा, विधानसभा यातून आपले प्रतिनिधी पाठविता यावे यासाठी जागा राखून ठेवल्या आहेत. तसेच स्थानिक राजकारणातही सहभाग घेता यावा यासाठी पंचायत संस्थांमध्ये देखील आरक्षण देण्यात आले आहे. या आरक्षणाचा फायदा घेत आंध आदिवासी जमातीतून काही राजकीय नेतष्त्व उदयास आलेले दिसते. मात्र प्रभावी राजकीय नेतृत्वाच्या अभावामुळे राजकीय विकास साधता आलेला नाही. लोकसंख्या मुळात कमी असल्याने राजकीयदृष्ट्याा ही जमात उपेक्षित राहिलेली आहे. तरीही जमातीमध ीील काही राजकीय नेतृत्वाने प्रभावी काम केल्याने त्याचा राजकीय फायदा आंध आदिवासी जमातीला झालेला दिसतो. कै. ॲड. गोविंदराव बुचके हे आंध जमातीतील पहिले विधान परिषद सदस्य होते. ॲड. शिवाजीराव माघे महाराष्ट्राचे सामाजिक न्याय मंत्री राहिलेले आहेत. तसेच किशनराव पाचपुते, आमदार इंगळे, डॉ. संतोष टारफे हे देखील विधानसभेचे सदस्य राहिलेले आहेत. आज आंध तरूण पीढी राजकीय क्षेत्रात येऊ लागली आहे. मात्र शिक्षणाचा अभाव व नवीन आचार विचारांशी समायोजन करण्याची जमातीची अल्प मानसिकता यामुळे या जमातीच्या राजकीयकरणाची गती मंद आहे. आज राजकीय आरक्षणाचा फायदा घेत आंध आदिवासी महिला देखील राजकारणात सक्रीय होत आहेत. परंतु आंध जमातीमधील कजूटीच्या अभावामुळे व इतर राजकीय नेतृत्वाच्या खेळीमुळे आंध जमातीमधील नेतृत्व कमकुवत होत आहे. परिणामी आंध जमातीमधील विधानसभा सदस्य निवडणूकीत पराजित होत आहेत. हे प्रमुख राजकीय परिवर्तन आंध जमातीत दिसून येत आहे. तेलंगाणा राज्यातही आंध आदिवासींची संख्या कमी असल्याने त्या राज्यातही या जमातीला राजकीय विजनवास भोगावा लागत आहे. राजकीय आरक्षणाचा फायदा घेत राज्यातील दसनापूर गावातील आंध जमातीतील शोभाबाई पोटे यांची इंदर्वेल्ली मंडळ परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाली. शोभाबाई पोटे या त्यांच्या जमातीतील पहिल्याच लोकप्रतिनिधी ठरल्या. अशा प्रकारे राजकीय आरक्षण आणि थोडया प्रमाणात होत असलेली राजकीय जाणीव जागृती यामुळे आंध जमातीत राजकीय परिवर्तन देखील मूळ धरू लागले आहे.

सारांष :– आदिवासी समाज आज सभ्य समाज संस्कृतीच्या प्रभावापासून अलिप्त राहिलेला नाही. आदिवासी समाजाच्या विकासासाठी शासकीय आणि अशासकीय स्तरावर जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात असल्याने या समाजात परिवर्तन होणे क्रमप्राप्त आहे. आंध जमातही त्याला अपवाद नाही. औद्योगिकीकरण, आधुनिकीकरणाच्या प्रभावामुळे या जमातीच्या कुटुंब, धर्म, विवाह संस्थेत बदल झाला असून राजकीय आरक्षणामुळे राजकीय विकासही शक्य झाला आहे. कुटुंब कल्याण तसेच आधुनिक वैद्याकीय सेवा सुविधा याबाबत आंध जागृरूक झालेले आहेत. रोजगार योजना, वीज प्रकल्प, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा इत्यादींमुळे आंध समाजाचे जीवनमान सुधारत आहे. महाराष्ट्रात आंध जमातीतील लोकांनी हिंदू धर्मातील अनेक प्रथा परंपरांचे अनुकरण करून त्या आत्मसात केलेल्या दिसतात. त्यामुळे आदिवासी आणि हिंदू धर्मीय अशी मिश्र संस्कृती उदयास येत आहे.

संदर्भ सूची

1 *कुलकर्णी, शौनक– (2009)– 'महाराष्ट्रातील आदिवासी' पुणे डायमंड पब्लिकेशन्स, पृ.क्र.12*
2 *https://en-wikipedia-org/wiki/Andh*
3 *जोशी, महोदव शास्त्री (संपा.) (1982) भारतीय संस्कृती कोश, खंड.1, पुणे भारतीय संस्कृती कोश मंडळ, पृ 32*
4 *http://censusindia-com, 2011*
5 *कुलकर्णी, शौनक (2009) उपरोक्त, पृ क्र. 12.13*
6 *शिंदे, पंडित (2001) 'मराठवाड्याातील आंध आदिवासी समुदायातील सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास' डॉ– बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पी,च डी (समाजशास्त्र) पदवीसाठी सादर कर.यात आलेला प्रबंध, पृ. क्र. 123–125*
7. *धनजकर, राजेश. (2012) 'आंध समाजः शोध आणि बोध' नांदेड अनुराधा पब्लिकेशन, पृ.क्र 10*
8 *Srinivas] M-N-1952 Religion and Society among the Coorgs of South India Ûford: Clarendon Press*
9 *Srivastav Vinay kumar-2010 Social & economic Characteristics of Tribal ommunities That Call Themselves Hindu Working Paper Series, Vol- 01, No- 03, New Delhi: Indian Institute of Dalit Studies] p-5*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

कोविड–19 चा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामाचा अभ्यास

प्रा. डॉ. सर्जेराव गंगाधर गोल्डे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.

★★★

प्रस्तावना – आज जगात कोविड–19 मुळे सर्व जगभर हाहाकार माजलेला असुन मष्युचे तांडव सुरू आहे. याला भारत देश देखिल अपवाद नाही. भारतामध्ये कोरोनाची दुसरी लाट आलेली असुन ही लाट ग्रामीण भागात शिरल्याने मृत्युचे प्रमाण वाढलेले आहे. याचे कारण म्हणजे ग्रामीण भागातील लोक कोरोनाला घाबरतात व दुसरे म्हणजे अंगावर दुखणे काढतात. यामुळे कोरोना स्कोर वाढतो आणि पेशंट डॉक्टरांच्या हाताबाहेर जातो. याकारणाने येथील मृत्युदर अधिक आहे. पहिल्या लाटेत ज्याप्रमाणे कोरोनामुळे संपुर्ण जगभर लॉकडाऊन करण्यात आले. अगदी त्याचप्रमाणे भारतात दुसऱ्या लाटेमध्ये काही राज्यामध्ये लॉकडाऊन करण्यात आले. याचा फटका सर्वच क्षेत्राला बसलेला आहे. आज लॉकडाऊनमुळे जगातील सर्वच अर्थव्यवस्था डबघाईला आल्या आहे. मात्र भारतीय अर्थव्यवस्थेला मागील वर्षी व या वर्षी देखिल कृशी क्षेत्राने सावरले. याचे महत्वाचे कारण म्हणजे भारतीय अर्थव्यवस्था कृशी प्रधान असुन ती यापुढे देखिल राहिल हे कोविड–19 मुळे करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे पुन्हा एकदा सिध्द झाले आहे. लॉकडाऊनच्या काळात उद्योग क्षेत्र, सेवाक्षेत्र पुर्णपणे बंद असतांना भारतीय अर्थव्यवस्थेला तारणारे एकमेव क्षेत्र म्हणजे फक्त कृशीक्षेत्र होते. कोविड–19 मुळे भारतासह जगभरातील उद्योगक्षेत्र, व्यापारक्षेत्र ठप्प झाले होते. मात्र कृशीक्षेत्रामध्ये षेतमालाची कापणी,काढणी, मळणी असे विविध कामे चालुच होती. एवढेच नव्हे तर पुढील पिकांसाठी शेतीची मशागत देखिल करण्यात आली. कोविड–19 षी कोरोना योध्दे म्हणुन डॉक्टर जसे लढत आहे अगदी तसेच शेतकरी देखिल त्यांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावुन लढत आहे. संपुर्ण देश कोरोनामुळे बंद असतांना देखिल शहरातील लोकांना त्यांच्या घरापर्यंत अन्नधान्य, भाजीपाला शेतकऱ्यांनी पुरविला आहे. देशामध्ये अन्नधान्याची टंचाई भासु दिली नाही. याचे महत्वाचे कारण म्हणजे मागील तीन दशकामध्ये शेतीक्षेत्रामध्ये जी प्रगती झाली त्याचा हा परिणाम आहे. देशभर लोकांना पुरेसे अन्नधान्य उपलब्ध झाले असले तरी हे ही तेवढेच सत्य आहे की, अन्नधान्य उत्पादनात ज्याप्रमाणात वाढ झाली त्याप्रमाणात शेतकऱ्याच्या उत्पन्नामध्ये मात्र वाढ झाली नाही. हे सत्य नाकरता येणार नाही. कोविड–19 चा परिणाम कोणत्याही एकाच क्षेत्रावर झालेला नाही तर कृशी, उद्योग व सेवा क्षेत्र यांच्यावर भौगोलिक, सामाजिक, आर्थिक स्वरूपात संपुर्ण क्षेत्रावर आणि पुर्ण जगावर याचा वाईट परिणाम झाला आहे. भारतीय अर्थव्यवस्था देखिल याला अपवाद नाही. आज भारतीय अर्थव्यवस्था देखिल एका कठीण परिस्थितीतुन जात आहे. देशात विविध क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांवर याचा वाईट परिणाम झालेला आहे. कृशीक्षेत्र, उद्योगक्षेत्र आणि सेवाक्षेत्र हे तीनही क्षेत्र मंदीकडे वाटचाल करतांना दिसुन येत आहे. सदय स्थितीमध्ये जागाच्या तुलनेत भारताची स्थिती भयावह झाली आहे. कारण भारताकडे आजही आवश्यक तेवढी आरोग्य सुविधा उपलब्ध नाही. डॉक्टर, नर्स, खाटा यांची संख्या कमी आहे, लोकांना ऑक्सीजनचा पुरवठा वेळेवर होत नाही, दवाखान्यात बेड उपलब्ध नाही, व्हेंटिलेटर अपुरे आहेत. इंजिशेनचा तुटवडा आहे. एकुनच भारतीय आरोग्य यंत्रनेवर अधिक ताण आलेला आहे. या एक नव्हे अषा अनेक समस्या भारतापुढे आज निर्माण झाल्या आहेत. यामुळे भारतामध्ये मष्त्युदर वाढला आहे. आपल्याकडे आजही ग्रामीण भागात स्वच्छ पिण्याचे पाणी, पौश्टिक आहार, चांगली आरोग्य सेवा यासारख्या सुविधांचा अभाव आहे. पहिल्या लॉकडाऊनच्या काळात षहरामधील अनेक कंपन्या बंद झाल्याने शहरातील अनेक कामगारांनी खेडयाकडे धाव घेतली यामुळे शेतीक्षेत्रावर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे. याचा परिणाम उत्पादकतेवर होऊ शकतो असे भाकित केले होते मात्र सुदैवाने तसे झाले नाही. पहिली लाट ओसरली आणि ग्रामीण भागात आलेला मजुर पुन्हा शहराकडे आला. परप्रांतीय मजुर रोजगारासाठी पुन्हा महाराष्ट्रात आला कारखाने, कंपन्या, उद्योगधंदे, शाळा महाविद्यालये सुरळीत सुरु झाली. मात्र कोरोनाचे निर्बध न पाळले गेल्याने काही काळातच परिस्थिती पुर्व पदावर येत काही नाही तेवढयात कोरोनाची दुसरी लाट आली आणि पुन्हा राज्यांना लॉकडाऊन करावा लागला. तर देशात दुसरीकडे पाच राज्याच्या निवडणुका आणि येथील प्रचाराच्या रणधुमाळीमध्ये जणु काही कोरोना संपला अशा अर्विभावात राजकिय नेत्यांनी सभा घेतल्या व जे व्हायला नको होते तेच झाले. येथे कोरोना उद्रेक झाला व आज भारतामध्ये दररोज चार लाखाच्या वर कोरोनाची लागण झालेले लोक सापडत आहे. याला जबाबदार कोन असा प्रश्न निर्माण होतो?

उद्दिष्टे : – प्रस्तुत संशोधनासाठी खालील प्रमाणे काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

1. कोविड – 19 चे भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्राावर होणाऱ्या परिणामाचे अध्ययन करणे.
2. कोविड – 19 मुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या अनुकुल परिणामाचे अध्ययन करणे.
3. कोविड–19 मुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या प्रतिकुल परिणामाचे अध्ययन करणे.

गृहितके : प्रस्तुत संशोधनासाठी खालील प्रमाणे काही गृहिते मांडण्यात आली आहेत.

1. कोविड–19 चा भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रावर परिणाम झाला आहे.
2. कोविड–19 मुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर अनुकुल परिणाम झाले आहे.
3. कोविड–19 मुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर काही प्रतिकुल परिणाम झाले आहे.

संशोधन व्याप्ती : प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती खुप मोठी असुन कोविड–19 चा प्रभाव संपुर्ण जगावर झालेला असुन यामुळे मोठी जागतीक महामारी आलेली असुन जागतीक महामंदी सदय परिस्थिती निर्माण झालेली आहे. कोरोनामुळे षेती, उद्योग, सेवा या सर्वच क्षेत्रावर वाईट परिणाम झालेला आहे. प्रस्तुत संशोधनात एकुन भारतीय अर्थव्यवस्थेवर व विविध क्षेत्रावर झालेल्या अनुकुल व प्रतिकुल परिणामांचे अध्ययन करण्यात येणार आहे.

संशोधन पध्दती : प्रस्तुत संषोधनासाठी पुर्णपणे व्दितिय साधन सामग्रीचा वापर करण्यात आला असुन यासाठी विविध दैनिक पेपरर्स, विविध वेबसाईट, विविध संदर्भ ग्रंथ याचा आधार घेऊन माहिती संकलित करण्यात आली आहे.

विषय विस्तार : कोविड–19 चा भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रावर दुरगामी असा काही चांगला तर वाईट परिणाम झाालेला दिसुन येतो. या परिणामाची सविस्तर माहिती पुढील प्रमाणे पाहता येते.

कृशी क्षेत्रावरील परिणाम : भारतीय शेती व्यवसाय हा निसर्गाशी खेळला जाणारा जुगार समजला जातो. यातच आपल्या शेतकऱ्याच्या वाटयाला आठराविश्व दारिद्रय आहे. यामुळे त्यांना नेहमीच वेगवेगळया समस्यांना तोंड द्यावे लागत असते. कधी आस्मानी संकटे तर कधी इतर संकटे असतातच. विशेषतः भारतीय शेतकऱ्यासमोर नेहमी तीन महत्वाच्या समस्या राहिल्या आहेत. त्यात पहिली समस्या म्हणजे भारतीय शेतकरी मोठया प्रमाणात कर्जबाजारी आहे. दुसरी समस्या उत्पादन खर्चात सतत वाढ होते आहे. तिसरी आणि सर्वात महत्वाची समस्या म्हणजे उत्पादन खर्चापेक्षा अधिक किंमत शेतमालाला मिळत नाही. आज या तीनही समस्या सोडविण्याची गरज आहे. तरच कृशी व शेतकरी वाचेल. कोविड–19 मुळे संपुर्ण देशात लॉकडाऊन केल्यामुळे ग्रामीण भागातुन शहरी भागात विविध वस्तुचा पुरवठा करणारी साखळी तुटली आहे. ही साखळी पुर्ववत करण्याची गरज आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये कृशी उत्पादित शेतमाल उपभोक्त्यापर्यंत पोहचविण्यासाठी सरकारी प्रयत्न होणे आवष्यक आहे. आज ग्रामीण भागातुन जो भाजीपाला येत आहे त्याला कवडीमोल भाव मिळत आहे. यामुळे शेतकरी हताश झाला आहे.

कोविड–19 च्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेला सावरणारे एकमेव क्षेत्र कष्शी क्षेत्र आहे. असे असले तरी या क्षेत्राची उत्पादकता खुप आहे असे नाही. मागील वर्शी मार्च महिण्यात लॉकडाऊन सुरु झाला त्यावेळी षेतमाल काढणीची वेळ होती. जेमतेम षेतमाल काढला मात्र बाजारपेठेअभावी त्याला चांगला भाव मिळु षकला नाही. यावर्शी यापेक्षा वेगळी परिस्थिती नाही उलट जास्त विदारक परिस्थिती आहे. कारण अवेळी पाऊस, हवामानात बदल, मुख्यबाजारपेठा बंद यामुळे शेतकरी देशोधडीला लागला आहे. यातच आताची कोरोना साथ ही ग्रामीण भागात जोरात पसरल्याने शेतकरी पुरा हैरान झालेला आहे. दवाखान्यामध्ये लाखो रुपये लागले आहे. आता बी बियाने, खते कशी विकत घ्यायाची याची शेतकऱ्याला भ्रांत आहे. लोकांना शेतमालाचे उत्पादन दिसत असले तरी त्याला किंमत कवडीमोल मिळाल्याने शेतकरी आर्थिक विंवचनेत आहेत. किराणा माल किंवा इतर वस्तुच्या किंमती भरमसाठ वाढल्या आहेत. त्यात खते, बियाने, खाद्यतेल, कपडे, सिमेंट आदी वस्तुच्या किंमती गगणाला भिडल्या आहेत. मात्र दुसरीकडे सोयाबिन वगळता इतर शेतमालाला कवडीमोल भाव आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यासमोर अनेक प्रश्न आ वासुन उभे आहेत. मागील काही वर्षामध्ये भारतीय कृशीक्षेत्राच्या विकास दरामध्ये ऐतिहासिक घटीची नोंद झाली आहे. हे कृशी व संबंधित क्षेत्राचा विकासदर पुढील तक्त्यावरून लक्षात येइल.

अ.क्र.	वर्ष	कृषी व संबंधित क्षेत्राचा विकास दर
1	2012.13	1.5
2	2013.14	5.6
3	2014.15	0.2
4	2015.16	0.6
5	2016.17	6.3
6	2017.18	5.0
7	2018.19	2.9
8	2019.21 अंदाजे	2.8

वरील आकडेवारीवरून लक्षात येते की, कृशी व संबंधित क्षेत्राच्या विकासदरामध्ये मोठी घसरण झालेली आहे. ही घट असीच सुरू राहीली तर कृशी विकासदर पुन्हा नकारात्मक होऊ शकतो. सरकारने कृशी विकासाठी अनेक घोषणा केल्या असल्या तरी त्या अतिशय तटपुंज्या आहेत. लॉकडाऊनमुळे कृशी बाजार भरत नाही. यामुळे मागणी आणि पुरवठा यांचे संतुलन बिघडू शकते. आज ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शहरी अर्थव्यवस्था असी विभागणी राजकारणी लोक करतांना दिसुन येतात मात्र सदय स्थितीला ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शहरी अर्थव्यवस्था अशी विभागणी होऊ शकत नाही. कारण आज अशा काही बाबी आहेत की, शहरामधील लोक ग्रामीण भागावर आवलंबुन आहे. याउलट ग्रामीण भागातील लोक हे शहरीभागावर आवलंबुन आहेत. याचाच अर्थ ग्रामीणभाग व शहरीभाग परास्परावंबी

आहेत. त्यांना वेगवेगळे करता येणार नाही. संयुक्त राष्ट्राच्या 2019 च्या अहवालात असे म्हटले आहे की, भारतातील 69 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. याचा दुसरा अर्थ असा होतो की, 69 टक्के मागणी ही ग्रामीण भागातुनच येते. मात्र याकडे आपले दुर्लक्ष होतांना दिसुन येते.

उद्योग क्षेत्रावरिल परिणाम : ज्या अर्थव्यवस्थेला उदोयन्मुख अर्थव्यवस्था म्हणुन संबोधले जायचे त्या अर्थव्यवस्थेतील कोविड–19 या विशाणुच्या भितीपोटी सुक्ष्म, लघु, मध्यम व मोठे असे सर्वच उद्योग, कंपन्या, कारखाने बंद करण्यात आले. औद्योगिकीकरणाला विकासाचे इंजिन म्हणतात. मात्र या विशाणुच्या प्रार्दुभावामुळे नविन उद्योग तर सोडाच अस्तिवात असलेले उद्योग देखिल बंद करावे लागले. यामुळे अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला आहे. देशातील अनेक लोक बेरोजगार झाले आहेत. यात परप्रांतीय आपल्या गावी जाण्यासाठी वाहन नसल्याने पायी गेले तर कित्येकांनी आपला जीव गमवला लागला. अशी विदारक स्थिती कोरोनामुळे निर्माण झाली होती. मधल्या काळात शासनाच्या कठोर उपाय योजनामुळे व लोकांच्या सहकार्यामुळे कोरोना थोडा कमी झाला होता. त्यामुळे देशातील अनेक उद्योग, कंपन्या, कारखाने सुरु झाले. मात्र पुन्हा दुसऱ्या लाटेच्या माध्यमातुन कोरोनाने डोके वर काढले. आणि पुन्हा सर्व कारखाने, कंपन्या, उद्योगधंदे बंद करावे लागले. म्हणजेच अर्थव्यवस्था पहिल्या लाटेपासुन सावरत नाही तोपर्यंत दुसरी लाट आली आणि पुन्हा जैसे थे परिस्थिती झाली. यामुळे अर्थव्यवस्था डबघाईला तर आलीच शिवाय यामुळे अनेक लोकांना बेरोजगार व्हावे लागले. हातावर पोट असणाऱ्या मजुराची अवस्था तर खुपच वाईट आहे.

सेवा क्षेत्रावरिल परिणाम : ज्या अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचा आणि उद्योग क्षेत्राचा वाटा अधिक असतो ती अर्थव्यवस्था विकसीत असते असा एक संकेत आहे. भारतामध्ये देखिल हळुहळु अशी स्थिती होतांना दिसु लागली होती. जीडीपी मध्ये कष्शी क्षेत्राचा वाटा कमी होऊन सेवा क्षेत्राचा वाटा वाढु लागला होता. आंतरराष्ट्रीय आयात निर्यात वाढली होती. परकिय निर्यात वाढली होती. यानिर्यातीमध्ये सर्वाधिक वाटा सेवा क्षेत्राचा होता. जहाज सेवा, हवाई वाहतुक, डॉक्टर, वकिल, इंजिनियर, विविध यंत्राचे सुटे भाग,मसाल्याचे पदार्थ, सुती कापड अशा एक दोन नव्हे तर हाजोरो वस्तु व सेवांची निर्यात आपण करत होतो आणि परकिय चलन मिळवित होतो. मात्र या कोविड–19 च्या काळात आंतरराष्ट्रीय व्यापार बंद झाला. यामुळे देशाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. म्हणजेच कोरोनामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला आहे. लॉकडाउनमुळे सर्व व्यवहार ठप्प झाल्याने देशासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. यातुन अर्थव्यवस्थेला सावरण्यासाठी रिझर्व्ह बॅकेचे गव्हर्नर मा. शक्तीकांत दास यांनी मागे दुसरे तिमाही धोरण जाहिर केले त्यामध्ये त्यांनी भारतासमोर उभ्या राहिलेल्या आर्थिक संकटाची सविस्तर मांडणी केली आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेचा विकासदर पहिल्या सहामाहित उणे राहणार आहे असे सांगितले. यातुन बाहेर पडण्यासाठी उद्योजकांच्या कर्जाची फेररचना, सोन्यावर 90 टक्क्यापर्यंत कर्ज, गृहनिर्माण क्षेत्रात पाच हजार कोटी रू.चा अर्थपुरवठा आणि शेतकऱ्यांना अर्थपुरवठा करण्यासाठी नाबार्डकडे आणखीन पाच हजार कोटी रू. ची केलेली तरतुद इत्यादी उपाय योजना करण्यात आल्या. याशिवाय देशाच्या आरोग्य यंत्रणेची स्थिती बघुन तिसऱ्या तिमाही धोरणाची वाट न बघता गर्व्हनरने नुकतेच बॅकासाठी

तरलतेसाठी मोठा निधी उपलब्ध करुन दिला आहे. मात्र हा निधी म्हणजे कर्ज फक्त आरोग्य सुविधा निर्माण करणाऱ्या उद्योजकांना मिळणार आहे. यामुळे आरोग्य सुविधा निर्माण करण्याला मदत होईल. व देशातील मृत्युदर कमी होईल.

आज कोविड–19 मुळे देशातील सर्वच क्षेत्र प्रभावित झाले आहे. यात शाळा महाविद्यालयाचा देखिल समावेश आहे. मागील वर्षापासुन सर्व शाळा महाविद्यालये बंद असुन पहिली ते नववी मधील सर्व विद्यार्थ्यांना परिक्षाविना पुढच्या वर्गात बढती देण्यात आली होती. मागील वर्षी दहावी आणि बारावीच्या परिक्षा झाल्या होत्या मात्र या वर्षी त्या देखिल घेता आल्या नाहित. उच्च्य शिक्षणामध्ये ऑनलाईन पध्दतीने परिक्षा घेतल्या जात आहे मात्र येथे देखिल अनेक विद्यापीठाचा घोळ झालेला आहे. परिक्षेसाठी आवश्यक साधनाचा आणि प्रशिक्षित मणुष्य बळाचा अभाव असल्याने अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

कोविड–19 चा प्रार्दुभाव असला तरी कोविडच्या या संकटामुळे प्रभावित झालेले विविध क्षेत्र पुर्ववत कसे सुरू करता येईल यावर आज सर्वत्र मोठया प्रमाणात चर्चा चालु आहे. मात्र यामध्ये ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अधिक चर्चा होतांना दिसुन येत नाही. कृशीक्षेत्र हे एकमेव क्षेत्र असे आहे की, वर्तमानात आणि भविष्यात देखिल भारतीय अर्थव्यवस्थेला तारूण नेऊ शकते, भारतीय अर्थव्यवस्थेला पुन्हा उभारी देऊ शकते. त्यामुळे याकडे अधिक लक्ष देण्याची गरज वाटते.

भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील ज्वलंत आणि महत्वाचा प्रश्न म्हणजे बेरोजगारीचा होय. देशभरातील लॉकडाऊनमुळे असंघटित व खाजगी क्षेत्रातील सर्व लोकांचे रोजगार बुडाला आहे. देशासमोर बेरोजगारीचा भयानक प्रश्न उभा ठाकला आहे. बेरोजगारीवर सरकारने दोन महिने रेशन मोफत देण्याची घोषणा केली आहे. मात्र देशातील अनेक लोकांकडे रेशनकार्ड नाही. शिवाय कंपनीमध्ये चांगल्या पदावर असल्याने त्याला रेशन मिळत नाही. रोजगार चालु असतांना हे ठिक होते मात्र आज नोकरी नाही आणि रेशनही नाही असे अनेक बेरोजगार लोक आहेत. याव्यतिरिक्त अनेक भटके लोक आहेत की ज्यांच्याकडके रेशन कार्डच नाही अशा लोकांचे काय? यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. याला पर्याय रोजगार हमी योजना आहे. मात्र सर्वचजन येथे काम करु शकत नाही त्याला काही मर्यादा आहेत. एकुनच संघटीत क्षेत्रातील बेरोजगारापेक्षा असंघटित लोकांच्या रोजगाराचा प्रश्न विदारक आहे.

भारतामध्ये असंघटित क्षेत्रामध्ये काम करणारे लोक अधिक आहे. तसेच एका राज्यामधुन दुसऱ्या राज्यात काम करायला जाणाऱ्याची संख्या देखिल माठी आहे. लॉकडाऊन सुरू झाल्यावर याच लोकांचे हाल सर्वात जास्त झाले आहे. उद्योग, व्यवसाय, कंपन्या सर्वच बंद झाल्याने या मजुरांनी आपला मोर्चा आपल्या गावाकडे वळवला मात्र वाहतुक व्यवस्था बंद असल्याने मिळेल त्या मार्गाने, पायी लोक आपापल्या गावी गेले. यामध्ये अनेक मजुरांना आपला जीव गमवावा लागला. थोडक्यात भारतामध्ये असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्याचे प्रमाण आजही मोठे आहे. एका आकडेवारीनुसार भारतामध्ये असंघटित क्षेत्रात सर्वाधिक कामगार संख्या असणारी पाच राज्य खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	राज्य क्षेत्रातील	संघटित कामगारांच्या संख्येशी टक्केवारी
1	राजस्थान	54.08
2	पंजाब	51.0
3	आंध्रप्रदेश	51.08
4	छत्तीसगड	49.0
5	गुजरात	48.4

भारतामध्ये वरील पाच राज्यामध्ये असंघटित क्षेत्रामध्ये काम करणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे हे वरिल आकडेवारीवरून सहज समजते. भारतातील शहरी भागात नियमित रोजगार किंवा पगार मिळवणारे (बिगर कृशी क्षेत्रातील) 37 टक्के लोक हे असंधटित क्षेत्रात मोडतात. आणि शहरी भागातील लॉकडाऊनमुळे त्याचे देखिल नियमित मिळणारे उत्पन्न बंद झाले आहे. यामुळे यांचे देखिल हालच झाले आहेत. भारतामध्ये भविष्यात कोविड–19 सारखी परिस्थती निर्माण होऊ नये किंवा जरी अशी परिस्थिती निर्माण झालीच तर त्यावर उपाय आपणाला आत्ताच शोधले पाहिजे. आपल्या देशात औद्योगिकीकरणाचे केंद्रीकरण झालेले आहे विषेशतः शहरी भागात पायाभुत सोयी सुविधा अधिक असल्याने शहरी भागातच उद्योग स्थापन होतात. मात्र त्याचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे. यापुढे ग्रामीण भागावर अधिक लक्ष केंद्रित करून ग्रामीण भागात पायाभुत सोयी सोविधा निर्माण करून नविन उद्योग ग्रामिण भागात उभारण्याला प्राधान्य दिले पाहिजे. विषेशतः कृशी क्षेत्रावर आधारित उद्योगधंदे किंवा कृषीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग, कंपन्या ग्रामीण भागात स्थापन कराव्यात. यामुळे अनेक फायदे होईल. कच्चामाल सहज उपलब्ध होईल, वाहतुक खर्चात कपात होईल, स्वस्तामध्ये मजुर उपलब्ध होतील आणि सर्वात मोठा फायदा म्हणजे ग्रामीण भागातुन शहरी भागाकडे रोजगाराच्या शोधासाठी येणारा लोकांचा लोंढा थांबवता येईल. पर्यायाने शहरी भागात लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या कमी होतील.

अनुकुल परिणाम : कोविड–19 च्या प्रभावामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम झालेला असुन त्याला भारतीय अर्थव्यवस्था अपवाद नाही. उलट भारतासारख्या विकसनशिल अर्थव्यवस्था अधिकच खिळखिळया झालेल्या आहेत. असे असले तरी या कोरोनाच्या महामारीतुन अनेक देशांना एका अर्थाने शिकवणच मिळाली असुन यामध्ये काही गोष्टी चांगल्या घडल्या आहेत त्या पुढील प्रमाणे सांगता येतील.

1. परकिय देशावर आवलंबुन राहण्याचे प्रमाण कमी झाले आहे.
2. देश स्वंयपुर्ण असणे किती गरजेचे आहे याची कल्पना आली.
3. वैद्याकिय सुविधेमध्ये वाढ करण्यात आली.
4. स्वदेशी उद्योगाला चालना मिळाली.
5. प्रदुषण कमी होण्याला मदत झाली.
6. जागतिक स्तरावर आपला देश कोठे आहे याची कल्पना आली.
7. सर्वांना स्वंयशिस्त लागली.
8. आरोग्य विषयी व स्वच्छेतेविषयी जाणीव जागृती झाली.
9. अनेकांना नवनविन तंत्रज्ञान व उपकरणे हाताळण्या विषयीचे ज्ञान अवगत झाले.
10. अनावश्यक खर्च कमी झाला.

प्रतिकुल परिणाम : कोविड–19 च्या प्रभावामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर अनुकुल परिणामापेक्षा प्रतिकुल परिणाम अधिक झालेले आहे. ते परिणाम पुढील प्रमाणे सांगता येतील.

1. अनेक लोकांचे रोजगार जावुन बेरोजगारीत मोठी वाढ झाली.
2. लॉकडाऊनमुळे राज्याच्या सीमा बंद असल्याने जीवनावश्यक वस्तुची टंचाई निर्माण होऊन भाववाढ झाली.
3. आपण वैद्याकिय सुविधमेध्ये किती मागे आहोत याची जाणीव झाली.
4. वैद्याकिय सुविधे अभावी अनेक लोकांना आपला जीव गमवावा लागला.
5. देशातील सर्वच विद्यार्थ्यांचे न भरुन निघणारे शैक्षणिक नुसान झाले.
6. शेतीमालाला कवडीमोल दर मिळाला.
7. कारखाने, कंपन्या, उद्योगधंदे बंद पडल्याने विकासदर खुंटला.
8. लॉकडाऊनमुळे आंतरराष्ट्रीय व्यापार बंद झाल्याने परकिय गंगाजळी येणे थांबले.
9. हॉस्पीटल बॅकिंग सेवा वगळता सर्व सेवा क्षेत्र जवळपास बंद आहे.
10. डॉक्टर, पोलिस व स्वच्छता कर्मचारी यांच्यावर अतिरिक्त ताण आला.

11. अनेकांचे संसार मोडले.
12. हातावर पोट असणाऱ्या लोकांचे हाल झाले.
13. परराज्यातुन आलेल्या मजुराचे देखिल हाल झाले असुन गावी जातांना अनेक मजुराचा जीव गेला.

शिफारशी : कोविड–19 मुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्र प्रभावित झाले असुन या जागतिक महामारीतुन देशाला व देशातील जनतेला सुरक्षित रित्या बाहेर काढणे आवश्यक आहे. भारताने कोरोनाच्या पहिल्या लाटेला सावधनतेने व प्रभाविपणे हातळल्याने पहिली लाट लवकर ओसरली मात्र कोरोना संपला या अर्विभावाने लोक कोणत्याही प्रतिबंधात्मक उपाय योजना न करता वावरु लागले. सर्व व्यवहार देखिल सुरु झाले. मात्र लोकांचा गैरसमज, लग्नसमारंभ, धार्मिक विधी आणि राजकिय सभा यामुळे होणाऱ्या लोकांची गर्दी वाढली यातुन कोरोनाने पुन्हा डोके वर काढले व देषात दुसरी लाट पहिल्यापेक्षा जोमाने आली. कोरोना ग्रामहण भागात शिरल्याने त्याला अटोक्यात आणणे कठीण झाले. या लाटेत मृत्युदराचे प्रमाण अधिक आहे. ऑक्सिजनच्या व बेडच्या अभावी लोक मरत आहे. ही बाब आंतरराष्ट्रीय पातळीवर लक्षात आल्याने आपणाला अनेक देशाकडुन ऑक्सिजन, व्हेंटिलेटर अशा सुविधा पुरविल्या जात आहे. आरोग्या सारख्या सुविधासाठी आपणाला दुसऱ्या देशाकडे हात पसरावे लागतात यासारखी दुसरी लाजीरवाणी गोष्ट नाही. येथे ज्या देशांनी आपणाला वैद्याकिय सोयी सुविधा पुरविल्या त्या देशाचे खरोखरच आभार मानावे तेवढे कमीच होतील.

1. लवकरात लवकर देशातील सर्व लोकांचे लसीकरण करावे.
2. दोन व्यक्तीमध्ये सुरक्षित अंतर ठेवावे.
3. हात नेहमी साबनाने स्वछ धुवावे.
4. सॅनिटायझरचा वापर करावा.
5. लग्न समारंभ दहा व्यक्तीमध्येच पुर्ण करावा.
6. राजकिय सभा घेण्यावर बंदी असावी.
7. धार्मिक सण उत्सव कोरोना नियमाचे पालन करुनच पार पाडावे.
8. गर्दी करणे व गर्दीत जाणे टाळावे.
9. अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडु नये.
10. घराबाहेर पडल्यास मास्कचा वापर करावा.
11. बाहेरुन आल्यावर हात पाय स्वछ धुतल्या शिवाय घरात येवु नये.
12. संतुलित आहार घ्यावा.
13. दररोज व्यायाम, योगा करावा.
14. अंगावरिल कपडे, रुमाल, मास्क दररोज धुवावेत

सारांश :– **अ**सारांश रूपाने असे म्हणता येईल की, लॉकडाऊनमुळे कृशी क्षेत्राबरोबरच उद्योग क्षेत्र आणि सेवा क्षेत्र यांचे खुप मोठे नुकसान झाले आहे. असे असले तरी ही परिस्थिती अशीच राहणार नसुन कोरोनावर आपण लावकरच मात करणार आहोत. तेव्हा निराश किंवा हाताश न होता कोरोना प्रतिबंधात्मक नियमाचे पालन करुन आधी कोरोनाला हरवु. आणि नंतर नव्या जोमाने कामाला सुरुवात करु यात शंका नाही. सध्या शेतीचा हंगाम संपला असुन नविन हंगामाची सुरुवात होत आहे. तेव्हा कृशीसाठी लागणारी सर्व आदाने शेतकऱ्याला उपलब्ध करुन द्यावी. उद्योगक्षेत्र देखिल टप्याटप्याने पन्नास टक्के उपस्थितीमध्ये सुरु करावे. सेवा क्षेत्रामध्ये जेवढे घरुन काम करता येईल तेवढ करावे. व अर्थव्यवस्थतेला चालु ठेवावे लागेल. आवश्यकता भासेल त्यांना कमी व्याजदराने या तीनही क्षेत्राला स्वस्त कर्ज पुरवठा करावा. हाताश न होता, घाबरुन न जाता, मनात येणाऱ्या निराशेला पळवुन लावुन येणाऱ्या परिस्थिला आपणाला सामोरे जावे लागणार आहे. तेव्हा लॉकडाऊन हे संकट नसुन आलेली संधी आहे असे समजुन या संधीचे सोने करण्याची ही वेळ आहे. शेवटी एकच सांगेल आपण सर्व कोरोनाची लस घेऊन, कोरोना नियमाचे पालन करुन कोरोनाला पळवुन लावु.

संदर्भ –

1. *www.loksatta.com*
2. *https://www.bbc.com/marathi/india-52097708*
3. *https://www.maxmaharashtra.com/max-reports/potential-impact-ofcovid-19-on-the-indian-economy-food-andagriculture/82261/*
4. *https://www.maxmaharashtra.com/max-reports/kpmg-report-potential-impact-of-covid-19-on-the-indian-economy-1/82248/*
5. *https://www.orfonline.org/marathi/covid-19-could-be modis-reform-moment-68118/*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

ज्ञानशाखा म्हणून लोकप्रशासनाचा संघर्ष आणि विकास

डॉ. भारत गोरे
सहयोगी प्राध्यापक तथा प्रमुख,
लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्र, विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद

★★★

गोषवारा – लोकप्रशासन म्हणजे राज्यषास्त्र नाही किंवा राज्यशास्त्राचा एक भाग नाही, त्याचे वेगळे अस्तित्व आहे. राज्यशास्त्रापासून पृथक, स्वतंत्र व पद्धतशीरपणे त्याचा अभ्यास करता येणे शक्य आहे व तो केला पाहिजे या भूमिकेतून लोकप्रशासनाचा एक अभ्यासविषय म्हणून जन्म झाला. एक अभ्यास विषय म्हणून राज्यशास्त्रा पासून अलग झाल्यानंतर लोक प्रशासनाला अनेक स्थित्यंतरांतून जावे लागले. एक ज्ञानषाखा व एक व्यापक प्रक्रिया अशी दुहेरी भूमिका लोकप्रशासनाची असल्याने लोकप्रशासनाला काहीसा अधिक संघर्ष करावा लागला. पारंपारिक कार्यक्षमता व काटकसरीपुरतेच मर्यादित न राहता लोक प्रशासन आज सामाजिक परिवर्तन, न्याय व समानता, मूल्य व नैतिकता या समकालीन मुद्यांवर चिंतन करतांना दिसत आहे. सद्यस्थितीत सामाजिकशास्त्रे विश्वात लोक प्रशासन स्वतरूची एक निश्चित, वेगळी व आश्वासक ओळख निर्माण करत आहे.

मुख्य शब्द – लोकप्रशासन, ज्ञानशाखा, सिद्धांत, विकास

प्रास्ताविक – लोकप्रशासनाचे अस्तित्व दोन प्रकारे परिभाशित करता येते. लोक प्रशासन एक क्रिया किंवा प्रक्रिया आहे त्याच बरोबर लोक प्रशासन एक बौद्धिक अन्वेशणाचा अर्थात एक ज्ञान शाखा किंवा अभ्यास विषय म्हणूनही अस्तित्त्वात आहे. एक प्रक्रिया म्हणून लोक प्रशासनाचे अस्तित्त्व तितकेच जुने आहे जितकी मानवी सभ्यता वा संघटनप्रियता. मात्र एक अभ्यासविषय म्हणून अर्थात, लोकप्रशासनाशी संबंधित सिद्धांत, प्रक्रिया, कार्ये इत्यादीचे एक शास्त्र म्हणून पद्धतशीरपणे अभ्यास करणे, शिकवणे अथवा संशोधन करणे इत्यादी, याचा जन्म आधुनिक काळातील (1887) आहे. अमेरिकन अर्थमंत्री अलेक्झांडर हॅमिल्टन यांनी 18 व्या शतकाच्या शेवटी प्रकाशित फेडरलिस्ट (Lederalist Issue 72) या संकलनातून प्रथमच लोक प्रशासनाचा अर्थ, उद्देश, व्याप्ती इ. स्पष्ट केले. फ्रांसमध्ये चार्ल्स जीन बुनिन (Charles Jean Bounin) यांनी सर्वप्रथम 1812 साली लोकप्रशासनाचे सिद्धांत (Principles D' Administration Publique) नावाचे पुस्तक फ्रेंच भाशेत लिहिले. 1859 साली फ्रांन्समध्येच विवेयन यांनी प्रशासकीय अभ्यास (Administrative Studie) नावाचा महत्त्वपूर्ण शोधग्रंथ लिहिला. मात्र विशयाला वेगळे अस्तित्त्व व सन्मान देण्यासाठी पुरेसे नव्हते. एक अभ्यासविषय किंवा ज्ञानशाखा म्हणून लोक प्रशासनाच्या विकासाकडे पाहत असतांना ढोबळ मानाने याचे पाच टप्पे पाडले जातात. कालखंड पहिला रू राजकारण–प्रशासन द्विभाजनाचा कालखंड (1887 ते 1926)

प्रा. वुड्रो विल्सन यांचा पॉलिटीकल सायंस क्वार्टरली या नियतकालिकात दी स्टडी ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन हा 1887 साली छापून आलेला लेख लोकप्रशासनाच्या व्यवस्थित व शास्त्रीय अभ्यासाचा आरंभबिंदू ठरला. यामध्ये विल्सन यांनी प्रशासन आणि राजकारण हे दोन्ही क्षेत्रे भिन्न भिन्न आणि विशेषीकृत असल्याचे स्पष्ट केले. ते म्हणतात की, एक संविधान तयार करण्यापेक्षा त्याची अंमलबजावणी करणे अधिक अवघड आहे. प्रशासकीय प्रश्न हे राजकीय प्रश्न नसतात. प्रशासनाचे क्षेत्र हे पूर्णतरू व्यावसायिक असून राजकारणाच्या गती व संघर्षापासून ते दूर आहे. यासाठी प्रशासनाचे एक वेगळे विज्ञान असणे आवश्यक आहे, जे आज पर्यंत नव्हते. प्रशासनामध्ये कार्यक्षमता व नैतिकता येण्यासाठी लोकप्रशासन राज्यशास्त्राच्या प्रभावातून मुक्त होण्याबाबतच्या या विचारांमुळे प्रा. वुड्रो विल्सन यांना लोक प्रशासनाचा जनक असेही म्हटले जाते.

याच काळात इ.स. 1900 साली कोलंबिया विद्यापीठातील प्राध्यापक फ्रँक गुडनाऊ (Frank J- Goodno) यांनी आपल्या 'Politics and Administration' या पुस्तकातून राज्याची इच्छा अभिव्यक्त करणे राजकारणाचे तर या इच्छेला किंवा धोरणाला मूर्त रुप देणे किंवा प्रत्यक्षात आणणे प्रशासनाचे कार्य असल्याचे प्रतिपादन केले. याचाच अर्थ, राजकारण व प्रशासन ही शासनाची दोन प्रमुख मात्र वेगवेगळी कार्य आहेत. प्रशासनाला कायद्याची अंमलबजावणी करतांना काही प्रमाणात अर्ध वैज्ञानिक, अर्ध–न्यायिक, अर्ध–व्यापारिक व अर्ध–वाणिज्यिक कार्येही करावी लागत असतात. शिवाय राज्यशास्त्राचे संस्थात्मक स्थान कायदेमंडळ आहे तर प्रशासन हे नोकरशाही रुपाने शासनाचे कार्यकारी अंग म्हणून कार्य करते. पुढे 1926 साली एल.डी. व्हाईट यांनी लोक प्रशासनाचे पहिले पाठयक्रमिक पुस्तक 'लोकप्रशासन अभ्यासाची ओळख' (Introduction to the Study of Public Administration) लिहिले. या पुस्तकात, सार्वजनिक ध्येयधोरणांची अंमलबजावणी करणारे लोकप्रशासन आधुनिक शासन व्यवस्थांचा केंद्रबिंदू असल्याचे मत व्यक्त करण्यात आले, शिवाय लोकप्रशासन–राज्यशास्त्र या द्विभाजनात आस्था असणाऱ्या या पुस्तकात राज्यशास्त्रापेक्षा अलग लोकप्रशासनाचा उद्देश काटकसर आणि कार्यक्षमता असल्याचे स्पश्ट केले. या कालखंडाचे विश्लेषण करतांना रॉबर्ट गोलम्ब्युस्की (Robert T- Golembiewski) म्हणतात – या कालखंडामध्ये लोकप्रशासनाचा लोकसत्ता (स्वबने) अर्थात 'कुठे' म्हणजे विशयाचे संस्थात्मक ठिकाण अथवा जागा शोधण्याचा प्रयत्न केला गेला. या काळात विचारवंतानी लोकप्रशासनाचे स्थान म्हणून

शासकीय नोकरशाही निर्धारित केली. यानंतर राजकारण–प्रशासन विभाजनाच्या बरोबरीने मूल्य–तथ्य विभाजनालाही गती मिळाली. लोकप्रशासनातील कार्यकारी शाखेचे अंमलबजावणीचे कार्य हे तथ्याध ाारित व शास्त्रीय असल्याचे आणि राज्यशास्त्रातील सार्वजनिक ध ोरणनिर्मिती व तत्सम बाबी या मूल्याधारित असल्याचे स्पष्ट करण्यात आले. लोकप्रशासन शिकवतांना संघटनांचे सिद्धांत, अर्थसंकल्प तसेच कर्मचारी प्रशासन शिकवले जाते तर राज्यशास्त्रात शासन, न्याय व्यवहार, राज्य व स्थानिक शासन तसेच कायदेशीर प्रक्रिया अभ्यासली जाते. एकंदरीत या कालखंडाची दोन वैशिष्ट्ये होती 1) लोकप्रशासनाचा जन्म व 2) राज्यशास्त्र –लोकप्रशासन द्विभाजनावर भर. कालखंड दुसरा रू प्रशासकीय सिद्धांतांचा सुवर्णकाळ (1927 ते 1937) एक अभ्यासविशय म्हणून मान्यता मिळवत असतांना लोकप्रशासनाच्या विकासाचा हा दुसरा टप्पा अधिक महत्त्वूपर्ण ठरला. पहिल्या कालखंडातील मूल्य निरपेक्ष शास्त्रीय व्यवस्थापन आणि राजकारण–प्रशासन द्विभाजनाच्या विचाराला या काळात अधिक गती देण्यात आली. लोकप्रशासन हे तथ्याधारित असून कार्यक्षमता या आपल्या उद्दिष्टप्राप्तीकडे जाण्यासाठी एक सर्वात्तम मार्ग (One best way) अर्थात निष्चित सिद्धांत यात असू शकतात आणि यामुळे ते विज्ञान होण्याच्या मार्गावर असल्याचे किंवा झाल्याचे मत प्रतिपादित करण्यात आले. लोकप्रशासनाच्या अशा सिद्धांताची निर्मिती अथवा शोध आणि त्याची यशस्वी अंमलबजावणी या कालखंडातील प्राथमिकता होती. या दृष्टीने सर्वप्रथम 1927 साली डब्ल्यू. एफ. विलोबी (W-F-Willoughby) यांचे लोकप्रशासनाचे सिद्धांत (Principles of Public Administration) हे पुस्तक प्रकाशित झाले. यानंतरच्या काळात सिद्धातांच्या अनुशंगाने बरेच लेखन झाले ज्यामध्ये मेरी पार्कर फॉलेट यांचे सृजनात्मक अनुभव (Creative EÛperience, 1924), हेन्री फेयॉल यांचे औद्योगिक व सामान्य व्यवस्थापन (General & Industrial Management] 1916–इंग्रजी अनुवाद 1929), ल्युथर गुलिक आणि उर्विक यांचे संपादन असलेले प्रशासन विज्ञानावरील लेख (Papers on the Science of Administration] 1937), मुने व रिले यांचे संघटनेचे सिद्धांत (The Principles of Organization] 1939) ही पुस्तके प्रमुख होती. या कालखंडामध्ये लोकप्रशासन हे मूल्यनिरपेक्ष विज्ञान असल्याचा आणि त्यामुळे ते सार्वभौम असल्याचा दावा करण्यात आला. साहजिकच, संघटना किंवा प्रशासनातील रचना, कार्ये आणि प्रक्रियांचे विश्लेषण करतांना या विचारकांनी खाजगी व सार्वजनिक असा भेद पाळला नाही. औद्योगिक आणि सार्वजनिक संघटनांमध्ये समसमान उपयुक्त ठरणाऱ्या या सिद्धातांच्या प्रतिपादनाने लोकप्रषासनातील लोक हा शब्द काहीसा फिका पडला आणि लोकप्रशासनाला व्यवस्थापनशास्त्राशी जोडण्यात आले. संघटनेचा उद्देष, राजकीय–सामाजिक संस्कृती किंवा मानवी मर्यादांचा विचार न करता अत्यंतिक तांत्रिक स्वरुपात नमूद या प्रशासकीय तत्त्वांना सार्वभौमिकता दिली गेली. उद्योग आणि शासनातील संघटनांना कार्यक्षमता प्रदान करु शकणाऱ्या सिद्धातांच्या निर्मितीमुळे लोकप्रशासनाचा हा कालखंड प्रतिष्ठेच्या शिखरावर होता. कालखंड तिसरा (आव्हान व टीकेचा कालखंड 1938 ते 1947) सैद्धांतिक पाठबळाचा दावा करुन प्रसिद्धी व प्रतिष्ठेच्या शिखरावर असणाऱ्या लोकप्रशासनावर या कालखंडात मोठी टीका झाली. लोकप्रशासनातील सिद्धातांना पर्यायाने त्याच्या शास्त्रीयतेच्या दाव्यांना या काळात मोठे आव्हान देण्यात आले. तसेच लोकप्रशासन स्वतंत्र किंवा राज्यशास्त्रापासून अलग असू शकते का ? किंबहुना ते तसे करता येऊ शकते का? ते अलग करावे का ? अशा अनेक प्रश्नांना या काळात लोकप्रशासनाला तोंड द्यावे लागले. यानंतरच्या काळातील संघटनात्मक विष्लेशणाचे सैद्धांतिक दृष्टिकोन तत्कालीन औद्योगिक, सामाजिक तसेच प्रशासकीय समस्या सोडवण्यात अपयशी ठरले. फ्रेडरिक टेलरचा शास्त्रीय व्यवस्थापनाचा औपचारिकध्यांत्रिकी दृष्टिकोन औद्योगिक कलह व सामाजिक संघर्ष निर्माण करणारा ठरला. याच कालावधीत (1924 ते 1932) एल्टन मेयो (Elton Mayo) यांच्या नेतृत्वाखाली 'वेस्टर्न इलेक्ट्रिक कंपनी' येथे झालेल्या हॉथ्रॉर्न प्रयोगांनी (Hawthorne EÛperiment) संघटनात्मक उत्पादनावरील सामाजिक व मानसशास्त्रीय प्रभावांची उकल केली. प्रशासकीय सिद्धातांचा भडिमार असणाऱ्या संरचनात्मक दृष्टिकोनात दुर्लक्षित राहिलेली मानवी संबंधाची बाजू व अनौचारिक समूहांची भूमिका उत्पादन वाढ व कार्यक्षमतेसाठी कृषी महत्वाची आहे, हे या काळात प्रामुख्याने अधोरेखित करण्यात आले. मानव संबंध विचारधारा आणि वर्तनवादी दृष्टिकोनाच्या प्रतिवादाने लोकप्रशासन विकासाच्या गतीला मोठा अवरोध निर्माण केला. प्रामुख्याने चार विचारवंतांच्या लेखनाने या काळात लोकप्रशासनाच्या परिपक्वतेला प्रश्नांकित करुन त्याच्या भावी वाटचालीसाठी दिशादर्शन करण्याचा प्रयत्न केला.

चेस्टर बर्नार्ड (Chester Barnard) यांनी, जे स्वतरू एक प्रशासक होते, आपल्या कार्यकारींची कार्ये (The Functions of the EÛecutive, 1938) या पुस्तकात कोणत्याही स्वरुपाच्या सिद्धातांचा उल्लेख टाळला. त्यांनी संघटनांचा खास करुन मोठया संघटनांचा व्यवस्थित आणि सखोल अभ्यास करत औपचारिक संघटनांच्या बरोबरीने अनौपचारिक संघटनांचेही महत्त्व आणि परस्परावलंबित्त्व अधोरेखित केले. संघटनेच्या सिद्धांत आणि व्यवहारात संतुलन निर्माण करत त्यांनी एल्टन मेयोच्या विचारांना पुढे नेण्याचे कार्य केले. आपल्या विचारांमध्ये त्यांनी प्रामुख्याने तीन बाबींवर भर दिला. 1) लोकप्रशासन व राज्यशास्त्र यांचे विभाजन होऊ शकत नाही. 2) प्रशासकीय सिद्धांतात असणारा तार्किक सुसंगतीचा अभाव आणि 3) संघटना विष्लेशणात मानसशास्त्रीय तसेच वर्तनवादी घटकांवर भर. सायमनसहित इतर अनेक अभ्यासकांवर बर्नार्ड यांच्या विचारांचा मोठा प्रभाव राहीला.

एफ. एम. मार्क्स यांनी संपादित केलेल्या 'लोकप्रशासनाचे घटक' (Elements of Public Administration, 1946) या पुस्तकात सामुहिक कार्याचे महत्त्व प्रतिपादित केले. यामध्ये लोक प्रशासनातील पायाभूत प्रश्नांची चर्चा केवळ तांत्रिक अंगाने न करता संघटनात्मक वातावरणाच्या अनुशंगाने करण्यात आली. राजकीय अंगाने लिहिल्या गेलेल्या या पुस्तकात राज्यशास्त्र–लोक प्रशासन द्विभाजनाच्या शक्यतेला सर्वप्रथम प्रश्नांकित करण्यात आले होते.

हर्बर्ट सायमन यांनी लिहिलेला लेख प्रशासकीय म्हणी (The Proverbs of Administration]1946) आणि प्रशासकीय वर्तन रू प्रशासकीय संघटनातील निर्णय निर्धारण प्रक्रियेचा अभ्यास (Administrative Behaviour : A Study of Decision Making process in Administrative Organizations] 1947) हे पुस्तक सर्वार्थाने वादळी ठरले. पारंपारिक प्रशासनावर टीका करुन लोकप्रषासनांच्या सिद्धातांची म्हणी (Proverb) म्हणून संभावना सायमन यांनी केली. आदेषाची एकता, कार्य विभाजन तसेच नियंत्रण क्षेत्र इत्यादी संदिग्ध आणि परस्पराविरोधी सिद्धांतावर त्यांनी टीका केली. या प्रत्येक सिद्धांताला दुसरा तितकाच विरोधी सिद्धांत सायमन यांनी सांगितला. मनुश्याला राहण्यासाठी घर तयार करण्याऐवजी हे सिद्धांत छोट्या छोट्या कड्यांची एक साखळी तयार करतात असे सायमन यांनी स्पष्ट केले. या प्रचलित प्रशासकीय सिद्धांतांचा पाया शास्त्रीय नसल्याचे सांगत त्यांनी लोक प्रशासनाच्या शास्त्रशुद्ध विष्लेशणासाठी वर्तनवादी दृष्टिकोनाची शिफारस केली. प्रशासनाचे हृदय म्हणून ते निर्णय निर्धारणाला महत्त्व देतात आणि त्यालाच सिद्धातांच्या समकक्ष मानतात. राजकारण–प्रशासन द्वैतभावाला स्पष्ट नकार देणाऱ्या या अभ्यासकाने तार्किक अनुभववादी (Logical Positivism) पद्धतीने धोरणनिर्मिती करण्याचे सुचवले. त्यांच्या 'मर्यादित विवेक असणाऱ्या प्रशासकाच्या' विचाराने लोक प्रशासनाच्या सैद्धांतिक असण्याच्या चर्चेला मोठे आव्हान दिले.

रॉबर्ट डाल यांनी लोकप्रशासनाचे विज्ञान – तीन प्रश्न (The Science of Public Administrati on : Three Problems] 1947) या आपल्या लेखातून लोकप्रशासनाच्या विज्ञान होण्याच्या मार्गातील तीन अडथळे सांगून अप्रत्यक्षपणे लोकप्रशासन हे नैसर्गिकशास्त्राप्रमाणे वैज्ञानिक होवू शकत नसल्याचे स्पष्ट केले. ते म्हणतात, विज्ञान हे मूल्यमुक्त असते तर प्रशासन त्या मूल्यांना प्राधान्य देत असते किंबहुना प्रशासकीय ध्येय हे आदर्शवादीच असतात. दुसरी अडचण सांगतांना डाल म्हणतात की, मानवी वर्तन अनिश्चित आणि वैविध्यपूर्ण असते. निर्जीव अशा संघटनात्मक संरचना मानवी व्यवहाराला, त्यातील गुंतागुंतीला समजून घेऊ शकत नाहीत. प्रशासनाच्या वैज्ञानिकतेबाबत त्यांचा तिसरा प्रश्न आहे की, मर्यादित राष्ट्रीय व ऐतिहासिक संरचना तसेच परिस्थितींचा अभ्यास करुन सर्वव्यापी, सार्वभौम सिद्धातांची मांडणी कषी करता येईल? थोडक्यात, लोकप्रशासनाला विज्ञान व्हायचे असेल किंवा त्यात यशस्वीपणे सर्वमान्य सिद्धातांची निर्मिती करावयाची असेल तर लोकप्रशासन हे मूल्य तटस्थ व्हावे लागेल, त्यातील मूल्यांचे प्राधान्य व जागा निर्धारित कराव्या लागतील. लोकप्रशासनातील मानवी स्वभाव व व्यवहाराचे अचूक आकलन व्हावे लागेल जेणे करुन प्रशासकीय वर्तनात एक वाक्यता येऊन त्याबाबत भविष्यवाणी करणे शक्य होईल आणि शेवटचे म्हणजे लोकप्रशासनात तुलनात्मक अध्ययन व्हावे लागेल, जेणे करुन भिन्न भिन्न स्थानिक राष्ट्रीय मानसिकता, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाचा अभ्यास लोकप्रशासनात होईल. लोकप्रशासनामध्ये वैष्विक सिद्धातांची निर्मिती करावयाची असेल तर मर्यादित व ठराविक राष्ट्रीय सीमा ओलांडून जावे लागेल आणि तेंव्हाच सार्वभौम सिद्धातांची मांडणी षक्य होईल.

याच काळामध्ये जर्मन समाजशास्त्रज्ञ मॅक्स बेवर यांच्या साहित्याचा इंग्रजीत अनुवाद झाला. अधिसत्ता, नोकरशाही, आदर्श प्रतिमान याबाबतच्या त्यांच्या विचारांनी संघटना विचारांना नव्याने परिभाषित करण्याची आवष्यकता वाटली. मानव संबंध आंदोलनाप्रमाणेच वेबरच्या नोकरषाहीने पारंपारिक लोक प्रशासनाला निरुत्तर केले. त्यानंतर ड्वाएट वाल्डो यांनी आपल्या प्रशासकीय राज्य अमेरिकन लोकप्रषासनाच्या राजकीय सिद्धातांचा अभ्यासष (Idministrative State : A Study of Political Theory of American Public Administration] 1948) या पुस्तकात लोकप्रशासनाच्या सार्वभौम सिद्धांत, त्यामागील अभ्यासपद्धतीमध्ये असणाऱ्या विसंगती आणि कार्यक्षमता – काटकसरीच्या मूल्यांतील संकुचितपणा स्पष्ट केला. कालखंड चार रू अस्तित्त्व, ओळख व स्वरुपाच्या संकटाचा काळ (1948 ते 1970)

राज्यशास्त्र–लोक प्रशासन यांच्यातील विभाजनरेशा ही भ्रम आहे. अर्थात, लोकप्रशासन हे राज्यशास्त्रापासून वेगळे होवू शकत नाही आणि लोक प्रशासनाचे स्वतरूचे सिद्धांत नाहीत त्यामुळे ते विज्ञान होण्याच्या शर्यतीत नाही, या दोन तर्कशुद्ध प्रतिवादांमुळे या नवनिर्मित विद्याषाखेबाबत अभ्यासक–विचारवंतामध्ये अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले. ज्या दोन मुख्य गृहीतकांवर लोकप्रशासनाचे आजपर्यंतचे चर्चाविश्व आकाराला आले होते त्यावरच घेण्यात आलेल्या शंकेमुळे लोक प्रशासनाच्या स्वतंत्र अस्तित्त्व किंवा राज्यशास्त्रापासून अलग त्याची नवीन ओळख व चेहरा काय आहे या मूलभूत प्रश्नांमुळे लोकप्रशासनाच्या विकासक्रमात हा काळ संकटाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. मोठया वाटचालीनंतर पुन्हा एकदा स्वतरूच्या ओळखीसाठी प्रयत्न करणे म्हणजे पुन्हा शून्यापासून सुरुवात होती. अचानक निर्माण झालेल्या या आव्हान आणि टीकेमुळे लोकप्रशासनाच्या अभ्यासकांना बचावात्मक पवित्रा स्वीकारावा लागला. अशा परिस्थितीत त्यांच्या समोर दोनच पर्याय होते. 1) आपल्या मातृविज्ञानाकडे अर्थात राज्यशास्त्र या पूर्वगृही परतणे किंवा 2) प्रशासन विज्ञान (Administrative Science) स्वीकारणे. यातील दुसऱ्या पर्यायाचा स्वीकार करणाऱ्यांच्या मते, प्रशासन हे प्रशासन आहे ते कोणत्याही प्रकारचे अथवा परिप्रेक्षातील असो. याच कारणासाठी 1956 साली 'जर्नल आफ एडमिनिस्ट्रेटीव्ह सायंस क्वार्टरली' (Journal of Administrative Science Quarterly) सुरु करण्यात आले. मार्च व सायमन यांचे संघटना (Organization) तसेच सीर्त व मार्च यांचे 'उपक्रमांचा वर्तनवादी सिद्धांत' (A Behavioural Theory of the Farm) याच दृष्टिकोनाला पुढे घेऊन जाणारी पुस्तके होती. अर्थात, या दोन्ही प्रतिक्रियांमध्ये लोकप्रशासनाची स्वतरूची जी ओळख निर्माण झाली होती, तिला बाधा पोहचली. लोकप्रशासनाची नवनिर्मित लहान धारा मोठया प्रवाहामध्ये जाऊन लुप्त होण्याच्या मार्गावर होती.

लोकप्रशासनाचे स्वतरूचे अस्तित्त्व आणि वेगळेपण या दोन पर्यायांपैकी कोणत्याही एका पर्यायाच्या स्वीकाराने संपुष्टात येणार होते आणि म्हणूनच या कालखंडाला ओळखीचे संकट (Crisis of Identity) असे म्हटले जाते. कालखंड पाच रू आंतरविद्याशाखीय अभ्यास व परिपक्वतेचा काळ (1971 ते आज)

परंतु या सर्व निराशाजनक वातावरणात लोक प्रशासनाच्या दृष्टीने एक दिलासादायक बाब घडत होती. 1950 च्या कालखंडात सर्वच सामाजिक शास्त्रांत तसेच लोकप्रशासनात नवनवीन संकल्पनांचा उदय आणि विकास होत होता. 1940 नंतरच्या वर्तनवादी, निर्णय निर्धारण, तुलनात्मक, व्यवस्थात्मक, पर्यावरणीय तसेच वेबरप्रणीत अभ्यासविशयांचे अनेकविध पद्धतीने सखोल विष्लेशण चालू होते. या कालखंडात फ्रेड रिग्ज यांचा पर्यावरणीय दृश्टिकोन, विडनर व रिग्ज यांचे विकास प्रषासनावरील विचार, तुलनात्मक लोक प्रशासन, आरगॅरिस, मॅकग्रेगर, लिकर्ट, बेनिस यांचा नव–मानव संबंध दृ ष्टिकोन, नवलोकप्रशासन इत्यादींवर सविस्तर विवेचन करण्यात आले. यानंतर सर्वच सामाजिक शास्त्रांमध्ये स्थित्यंतरे घडवून आणणाऱ्या उत्तर वर्तनवादी युगाची सुरुवात झाली. लोकप्रशासनात राज्यशास्त्र–लोकप्रशासन द्विभाजनाचा नव्याने विचार सुरु करण्यात आला, आंतरविद्याषाखीय अभ्यासाचे महत्त्व वाढत गेले, तथ्य–मूल्य संघर्षाला रचनात्मकता प्रदान करण्याचे प्रयत्न सुरु झाले. या सर्वांचा एकत्रित परिणाम असा झाला की लोकप्रशासनाच्या अभ्यासाची क्षेत्रे विस्तारत गेली. विषयाच्या संशोधनात मौलिकता येत गेली. लोकप्रशासनाचे स्वरुप हे अधिकाधिक आंतरविद्याशाखीय होत गेले. आज व्यवस्थापनशास्त्र याचा मोठा प्रेरणास्त्रोत असला तरी राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र, कायदा यासहीत नैसर्गिक शास्त्राच्या नियमांसोबतही याने समन्वय साधला आहे. विकास प्रशासन, तुलनात्मक प्रशासन, राजकीय अर्थशास्त्र व धोरण विज्ञानासारख्या महत्वपूर्ण अध्ययनातून या विषयाने आपली प्रासंगिकता वाढवली आहे. धोरण विज्ञानाच्या माध्यमातून निर्माण झालेल्या आंतरविद्याशाखीय अभ्यासाने, विशेषतरू राजकीय पर्यावरण व अर्थशास्त्रीय विष्लेशणाने विशयाला एक प्रकारची खोली प्राप्त झाली. सरकारी नोकरशाहीची विवेकसंपन्नता आणि निपेक्षता ही गुणवैशिष्ट्ये भ्रम असल्याचे स्पष्ट करुन तिचे स्वहितवादी, लोकहित विरोधी व संसाधनांचा अपव्यय करणारी यंत्रणा हे रुप डाऊन्स, टुलॉक व निस्कानिन या अभ्यासकांनी दाखवून दिले. सहाजिकच यामुळे लोक प्रशासनामध्ये अनेक नवीन संकल्पनाचे आगमन होणे अपरिहार्य झाले होते. अनेक विचारवंत 1990 नंतरच्या काळात झपाटयाने वाढलेल्या जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या लाटेचा लोक प्रशासनावर झालेला परिणाम म्हणून अनेक नवीन संकल्पनांचा विचार करतात व त्याला विशयाच्या विकासक्रमातील आधुनिक किंवा सहावा टप्पा संबोधतात. या काळात प्रामुख्याने बाजारपेठीय अर्थशास्त्राच्या नियम व पद्धती लोकप्रशासनातही स्वीकारण्यात आल्या. शासनाच्या पर्यायाने लोकप्रशासनाच्या भूमिकेबरोबर या काळात खाजगी क्षेत्रांची आणि नागरी संघटनांची भूमिकाही मध्यवर्ती होत गेली. नवलोक व्यवस्थापन, लोकनिवड दृष्टिकोन, सार्वजनिक खाजगी भागीदारी, सुशासन इत्यादी संकल्पनांनी पारंपारिक शासन व नोकरषाहीच्या कार्यपद्धती व प्रक्रियेवर असमाधान व्यक्त केले आणि कार्यक्षमता व काटकसरीच्या नवनवीन तंत्राचा व पद्धतींचा अभ्यास केला. याच कालखंडात डेनहार्ट व डेनहार्ट यांचे नव लोक सेवा प्रतिमान (New Public Service) विकसित झाले जे एका अर्थाने नवलोक व्यवस्थापनाला प्रतिक्रिया स्वरुप होते. यामध्ये लोकांना ग्राहक न समजता नागरि समजण्यात आले. थोडक्यात, या कालखंडाचे वैशिष्ट्य असे होते की, तत्कालीन जागतिक पातळीवर होणाऱ्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक बदलांना प्रतिसाद देण्याची भूमिका लोक प्रशासनाची राहिली.

युरोपियन प्रशासनाचे जनक व जर्मन अर्थशास्त्रज्ञ प्रा. लॉरेंज वॉन स्टेन (Lorenz Von Stein) म्हणतात त्याप्रमाणे सिद्धांत व व्यवहाराची कसरत करणारे लोक प्रशासन अनेक विषयांना एकत्रित आणणारे विज्ञान (Integrating Science) आहे. लोकहित व लोककेंद्रितता या विषयाची सर्वात प्रमुख बाजू आहे.

नवडक संदर्भ सूची –

1. *शर्मा एम.पी. आणि सदाना बी.एल., पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन इन थिअरी अँड प्रॅक्टिस, न्यू दिल्ली,२००७, किताब महल पब्लिषर्स*
2. *अवस्थी अमरेश्वर आणि माहेश्वर श्रीराम, पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन आग्रा, २००७, लक्ष्मी नारायण अगरवाल एडयुकेषनल पब्लिषर्स*
3. *नकोलस हेन्री, पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन अँड पब्लिक अफेअर्स, न्यू दिल्ली,२००७, पिअर्सन एडयुकेषन इ. अँड डोर्लिंग किंडर्स्ल्ये पब्लिशिंग*
4. *सहानी प्रदीप आणि वायुनंदन ए., ॲडमिनिस्ट्रेटिव्ह थिअरी, न्यू दिल्ली,२०१०, पीएचआय लर्निंग प्रा. लि.*
5. *कटारिया सुरेंद्र, प्रषासनिक सिद्धांत एवं प्रबंध, जयपुर,२०१५, नेशनल पब्लिकेशन हाउस*
6. *दी इंडियन जर्नल ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, जानेवारी–मार्च २०१४, व्हॉल्यूम एलएक्स, नं ०१*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

सायबर गुन्हे आणि महिला व बालसुरक्षा एक आढावा

डॉ. विलास चव्हाण
समाजशास्त्रे विभाग प्रमुख, शंकरराव चव्हाण महाविद्यालय,
अर्धापूर, जि.नांदेड

★★★

सारांश – आजच्या डिजीटल युगात इंटरनेटच्या. माध्य मातून जगाच्याड काणा–कोपऱ्यातील माणस संवाद साधतांना दिसून येत आहेत. आपल्याच वैयक्तिक आवडी–निवडी, वेगळेपण गुप्तं ठेऊन व्यहक्त. होण्याघ्साठी समाजमाध्य–मांचा खूप मोठ्या प्रमाणात वापर होतांना दिसून येत आहे. हिच समाजमाध्योम मात्र स्त्रियां आणि लहान मुलांसाठी अत्यंसत घातक ठरत आहेत. सायबर गुन्हेंगार आपली विकृत इच्छाल पूर्ण करण्या साठी समाजातील असाहय असलेला घटक म्हंणजे स्त्रिया आणि लहान मुलं टार्गेट करताना दिसून येतो. याचा परिणाम म्हीणून महिला आणि बालकांच्याल लैंगिक छळाच्यो घटना वाढत आहेत. सायबर गुन्हेंणगारीमुळे महिला आणि बालकांच्याा आत्मसहत्येहचे प्रमाण वाढलेले दिसून येते.

प्रस्ताणवना : मानवी समाजाइतकीच गुन्हें गारी प्राचीन असून कोणताही मानव समाज गुन्हेंमगारी मुक्तह नाही. गुन्हा ही एक सार्वत्रिक आणि अपरिहार्य अशी घटना आहे. एमिल डरखीम म्हंणतात गुन्हेंनगारीची समस्यार भेडसावत नाही असा एकही समाज नाही. त्यां च्यान प्रकार आणि वैशिष्ट यांमध्ये फरक असले इतकेच 1 सामाजिक कल्याणण, सामाजिक सुरक्षितता आणि जीवित व वित्तल गुन्हेंगारीमुळे धोक्याकत आलेले दिसून येते. इतकेच नव्हें तर वाढत्याव गुन्हेंगारीमुळे समाजशास्त्रयज्ञ, पोलिस व कायदेशीर यंत्रणेची डोकेदुखी वाढलेली आहे. स्थल–कला–समाज परत्वेबिदलणारी गुन्हीय ही एक गूढ अषी संकल्प्ना असून वेगवेगळ्या अभ्याळसकांनी त्यापचा वेगवेगळा अर्थ लावलेला आहे. गुन्हवयांची संकल्पलना समजून घेण्यामध्येव कायदा महत्वाआचा घटक असून या संकल्पेनेनुसार प्रचलित कायद्याचे उल्लंयघन करणे म्हमणजे गुन्हाक असे म्हलणता येईल.

पॉल तपन यांच्याा मते गुन्हा म्हेणजे हेतूतः केलेले कृत्य की जे केल्यानने फौजदारी कायद्याचे उल्ल्घंन होते. कोणतेही संरक्षण किंवा समर्थनाशिवाय असे कृत्यर केलेले असते आणि त्यां कृत्याहला गंभीर किंवा सौम्यन अपराध म्हीणून राज्यआसंस्थेतची **मान्यणता असते.**

2 सायबर गुन्हाय म्हाणजे काय – गेल्याग काही दषकात माहिती तंत्रज्ञानाचा विकास मोठ्या प्रमाणात झाला. या विकासाचा प्रारंभ 1980 नंतर झाला. आधुनिक तंत्रज्ञानाच्यां युगात इंटरनेट एक सर्वश्रेष्ठा अविष्कार म्हरणून वापरला जातो. इंटरनेटच्या माध्यमातून जग अगदी लहान झालेले दिसून येते. काही क्षणातच आपण जगातील सर्व माहिती सर्फिंग करून घेऊ शकतो. वास्तविक पाहता तंत्रज्ञानही मानवाच्या प्रगतीसाठी वापरली जाणारी वस्तू आहे. परंतु काही मंडळी तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करून विविध प्रकारे गुन्हे करतात त्या गुन्ह्याला सायबर गुन्हा असे म्हणतात. सायबर गुन्हा हा पारंपरिक गुन्ह्याप्रमाणेच असतो फक्त तो सायबर स्पेसमध्ये इलेक्ट्रॉ निक व संगणकीय वातावरणात केलेला असतो, म्हणून त्यास सायबर गुन्हा म्हणतात. संगणक, इंटरनेट आणि मोबाईलचा वापर करून किंवा त्यांना टार्गेट करून केलेले गुन्हे म्हणजे सायबर गुन्हे होय.

प्रा.एन.व्हीय. परांजपे यांच्या मते, सायबर गुन्हा म्हणजे असा गुन्हा की जो संगणकाचा वापर करून केला जातो. या गुन्ह्यात संगणकाचा वापर माध्यम म्हणून लक्ष साध्य करण्यासाठी म्हणून किंवा पुन्हा अपराध करण्याचे साधन म्हणून केला जातो. आज आधुनिक काळात तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे माणूस त्याच्या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी इंटरनेटवर अवलंबून आहे. इंटरनेटचा विकास आणि फायद्यामुळे सायबर गुन्ह्यांमध्ये देखील वाढ होताना दिसून येत आहे.

सायबर गुन्ह्याचे प्रकार :– संगणकीय क्षेत्रात आज सायबर गुन्ह्यांचा झालेला शिरकावा अनेक संकटांना आमंत्रण देणारा आहे. सायबर हल्ल्यापासून समाजातील कोणतीही व्यक्ती अलिप्त असलेली दिसून येत नाही. कारण प्रत्येक व्यक्तीला रोजच या सायबर गुन्ह्या चा सामना करावा लागत आहे. आपल्या ई–मेलवर अनेक प्रकारचे स्पॅममेल येतात. मोबाईल वर वेगवेगळ्या ऑफरचे लॉटरी लागल्याचे संदेश व कॉल येतात. ऑनलाईन बँकिंग व्यवहार असतील तर त्याचा पासवर्ड आयडी हॅक होतो. हे सर्वच प्रकार सायबर गुन्हेगारीत मोडतात. हॅकिंग, सायबर स्टॉकिंग, व्हा.यरस अॅटक, पोनोग्राफी डेनायल ऑफ सर्विस अॅटक, व्हाकरसडेसीमिनेशन (व्हाययरसमुळे विध्वीसंक) क्रेडीट कार्ड फ्रॉड, नेट एक्ट्रॉत रशन, पिशींग, चाईल्ड पोनोग्रॉफी इत्यादी माध्यमांचा वापर करून सायबर गुन्हेगार लोकांची फसवणूक करतो. देशात 2019 मध्ये 51 लाख 56 हजार 172 एकूण गुन्हे दाखल झाले आहेत. यामध्ये 44 हजार 556 सायबर गुन्हे आहेत. देशात 2018 मध्ये 27 हजार 248 सायबर गुन्हे घडलेले होते. यावर्शी 63 टक्यांनी सायबर गुन्ह्यात वाढ झाली. देशात सर्वाधिक सायबर गुन्हे कर्नाटकात दाखल झाले असून महाराष्ट्र सायबर गुन्ह्या त तिसऱ्या स्थानकावर आहे. तर मुंबई शहर देशात दुसऱ्या स्थानावर असल्याचे दिसून आले. सायबर गुन्ह्यात सर्वाधिक गुन्हेंश 26891 हे फसवणुकीच्या संदर्भातील आहेत. त्यानंतर लैंगिक छळाच्या उद्देशाने 2 हतार 266 गुन्हे घडले.3 राष्ट्रीय गुन्हे नोंदणी नोंदणी यंत्रणा (एन सी आर पी) यांच्या अहवालानुसार 1–3–2020 ते 18–9–2020 मध्ये राष्ट्रीय सायबर गुन्हे नोंदणी पोर्टलवर चाईल्ड पॉर्नोग्राफी, बलात्कार

आणि सामूहिक बलात्काराच्या दाखल झालेल्या तक्रारीची एकूण संख्या 13244 एवढी आहे.

सायबर गुन्हे आणि महिला व बालकांची स्थिती : आज आधुनिक काळात स्मार्टफोन, इंटरनेट सर्वसामान्यांपर्यंत पोहोचलेला असून त्याळचा वापर वाढत असलेला दिसून येतो. वाढत्या इंटरनेटच्या वापराचा परिणाम म्हणून काही विकृत प्रवृत्तीची माणसे त्याचा गैरवापरही करताना दिसून येतात. त्यातल्या त्यात महिला आणि लहान मुले हे त्यांचे सोपे लक्ष (सॉफ्ट टार्गेट) असते. स्त्रिया मुख्यतः सोशल नेटवर्किंग वेबसाईट वापरासाठी आणि ऑनलाईन खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात मोबाईलचा वापर करतात तर लहान मुलं ऑनलाइन गेम व कुतूहल म्हणून अलील क्लिप पाहण्यासाठी मोबाईलचा वापर करतात. एखाद्या परिस्थितीत आपला फोन हरवला, गहाळ झाला किंवा दुरुस्तीसाठी दिला असता त्यामधील संवेदनशील माहिती ही सायबर गुन्हेंगाराच्या हाती लागल्यास गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. केवळ आपल्या फोनमध्ये असलेले पाहून कुणालाही आपल्या वयाच, लिंगाचा, ठिकाणाचा, आवडीचा व इतर वैयक्तिक रूचीचा अंदाज सायबर गुन्हेगार करत असतो. सामाजिक माध्यंमामुळे माहितीचे जग सर्वांसाठी खुले झालेले आहे. मित्र–मैत्रिणी समान विचार व आवडीनिवडी असणारे लोक एकमेकांच्या सतत ऑनलाइन संपर्कात येतात. त्याच बरोबर आपली स्वतःची ओळख उघड न करता किंवा गोपनीयता राखून आपापली इतरांपेक्षा वैशिष्ट्यपूर्ण असलेली रूची किंवा आवड पूर्ण करण्यासाठी त्याच विचाराचे मित्र–मैत्रिणी बनवल्या जातात. मात्र याच माध्यमातून कळत नकळत स्त्रिया सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकले जातात आणि त्यांचे आर्थिक आणि लैंगिक शोषण केले जाते.

सायबर बुलिंग : एखाद्या व्यक्तीची बदनामी करण्याच्या उद्देशाने किंवा मानसिक त्रास देण्याच्या उद्देशाने ई–मेल, इन्स्टंट मेसेजिंग, एसएमएस मोबाईल सोशल नेटवर्कींग साईट, वेबसाईट यांचा वापर करून त्या व्यक्तीला घाबरविणे किंवा त्या व्यक्तीची बदनामी करणे या प्रकाराला सायबर बुलिंग म्हणतात. स्त्रिया आणि लहान मुले या सायबर बुलिंगचे खूप मोठ्या प्रमाणात शिकार होतात.

ई–मेल द्वारे होणारा छळ : महिला आणि बालकांना टार्गेट करण्याचे एक अत्यंत महत्त्वाचं माध्यम म्हणजे ई–मेल. सायबर गुन्हेगारांसाठी ई–मेल हे आवडते साधन बनले आहे. सायबर गुन्हेगार सामान्यपणे व्यवस्थापक मित्र आणि अगदी पती–पत्नीकडून धोकादायक ई–मेल पाठवू शकतात. सायबर गुन्हेंगार आकर्शक ई–मेल व्दापरे महिलांना आपले लक्ष्य करतात. बहुतेक महिलांना नकली ई–मेल्स पाठवून भेटवस्तू किंवा धमकावण्याचे संदेश देऊन लक्ष केले जाते.

अष्लील मेसेज पाठवून बदनामी करणे : काही विकृत प्रवृत्तीची माणसे आपली विकृत इच्छा पूर्ण करण्यासाठी महिलांना अश्लील मेसेज असले फोटो आणि व्हिडिओ पाठवून त्यांची बदनामी करण्याचा प्रयत्न करतात. तसेच फोनवरील अश्लील संभाषण रेकॉर्ड व्हामयलर करणे वैयक्तिक फोटो व्हा.यलर करण्याची धमकी देऊन आपली विकृत इच्छा पूर्ण करतात. सायबर स्टॉकिंग (सायबर विश्वातून होणारा पाठलाग) आधुनिक काळातील हा सर्वाधिक चर्चित सायबर गुन्हा म्हणावा लागेल. यामध्ये सातत्याने ठराविक महिलेवर लक्ष ठेवले जाते किंवा तिचा पाठलाग केला जातो. सतत मेसेज पाठविणे, ई–मेल्स पाठविणे किंवा ती महिला वापरत असलेले चॅट रुम्स यामध्ये प्रवेष करणे इत्यादी प्रकारांनी त्या महिलेवर इंटरनेटवरील सर्व हालचालीवर पाळत ठेवली जाते. बहुतेक वेळा महिला व मुले सायबर गुन्हेगारीचे बळी ठरतात.

खाजगी माहितीचा वापर करून छळ : एखाद्या स्त्री चा बदला घेण्यासाठी किंवा आपली विकृत इच्छा पूर्ण करण्यासाठी वैयक्तिक माहितीचा वापर सायबर गुन्हेगार करतात. यात समाज माध्यमावरील संबंधित महिलेचे खाते हॅक करून तीची खाजगी माहिती मिळवणे, फोन नंबर मिळवणे व त्यावरील वैयक्तिक फोटो व इतर मजकूर गोळा करणे आणि समाज माध्यमावर प्रसारित करणे. तसेच तरुण मुलं आणि मुली जेव्हा रिलेशनशिपमध्ये असतात तेव्हा अनेक मुलीचे खाजगी क्षण शूट केले जातात. खाजगी संबंधाचे फोटो काढले जातात आणि नंतर आपली लैंगिक इच्छा पूर्ण करण्यासाठी सदरील खाजगी क्षण प्रसारित करण्याची धमकी देऊन आपली इच्छा पूर्ण करून घेतात.

ऑनलाईन जोडीदार निवडीतून फसवणूक : सध्याच्या डिजिटल झालेल्या युगात लग्न जुळवण्याची पारंपारिक पद्धतही ऑनलाईन झालेली आहे. तसेच लग्न देखील ऑनलाईन ठरवले जात आहे. तर काही विवाह ऑनलाईन होत आहेत. परंतु मॅट्रिमोनियल साईटचा वापर करून फसवणूक करणार्याल भामट्यांची संख्या वाढलेली दिसून येते. फेसबुकवर जसे फेक अकाउंट बनवले जातात. त्याच पद्धतीने मॅट्रिमोनियल साइटवर ही फेक प्रोफाईल बनवली जातात. त्या फेक प्रोफाईलच्या माध्यमातून समोरच्याची चांगलीच फसवणूक होऊ शकते.

सायबर पोर्नोग्राफी : महिला नेटिझन्ससाठी ही आणखी एक महत्त्वाची समस्या आहे. यामध्ये पोर्नोग्रफिक वेबसाइट, संगणकाचा वापर करत निर्मिलेली फोनोग्रफी इंटरनेट वरील अश्लील चित्र, छायाचित्र किंवा मजकूर डाऊनलोड करणे याचा समावेश होतो. संबंधित महिलेचा चेहरा अश्लील फोटोला लावणे किंवा अश्लील चित्रफितीतील महिलेच्या चेहर्यावर आपण ज्या महिलेची बदनामी करणार आहोत तिच्या चेहर्याला लावणे असले प्रकार यामध्ये येतात याचाच परिणाम त्या महिलेची सर्वांगीण दृष्टीने कोंडी होते आणि ती सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात पडते.

निष्कर्ष आणि शिफारस

1. इंटरनेट वापरताना आपली वैयक्तिक व गोपनीय माहिती कोणत्याही अनोळखी व्यक्ती अथवा वेबसाईटवर अपलोड करू नये.
2. महिलांनी आपल्याला आलेली अनोळखी अथवा फसवे मेसेजेस ई–मेल उघडू नये तसे कोणत्याही लिंक्स ला कॉपी किंवा क्लिक करू नये.
3. ऑनलाईन व्यवहार करताना अगदी सुरक्षितता बाळगण्यास हवी.
4. आपल्या वैयक्तिक नाजूक खाजगी क्षणांचा गैरवापर होऊ नये म्हणून असे शुटींग करणे टाळावे.
5. सोशल मीडिया डेटिंग आणि मॅट्रिमोनियल साइट्स वापरताना सावधगिरी बाळगली पाहिजे.
6. जर आपली फसवणूक होत आहे हे लक्षात आल्यावर ताबडतोब सायबर क्राईम विभागाकडे तक्रार दाखल करावी.
7. सायबर क्राईम विभागाने तक्रारीची दखल घेऊन ताबडतोब त्या सायबर गुन्हेगाराचा शोध घेऊन त्यास न्यायालयामार्फत शिक्षा दिली तर सायबर गुन्हेगारावर वचक बसेल आणि समाजातील महिला आणि बालकांच्या होणाऱ्या शोषणाला आळा बसेल.

संदर्भ सूची :

1. *पी.के.कुलकर्णी, गुन्हें गारीचे समाजशास्त्रे, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्तीण, जून–2013.*
2. *https://vishvakosh-marathi-gov-in xqUgsa~'kkL=h-*
3. *https://mr-m Wikipedia-org सायबर गुन्हाह विकिपीडिया.*
4. *https://maharashtratime-com: 12 April 2020.*
5. *महिला आणि बालविकास मंत्रालय, नवी दिल्ली, 22 सप्टेंडबर 2020, स्मृती इराणी यांचे एका लेखी प्रश्ना ला उत्तलर.*
6. *https://pib-gov-पदमहिला अत्यानचार.*
7. *National Crime Records Bureau 3 – 2019.*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

अतिरिक्त लोकसंख्या–भारताची समस्या

प्रा.डॉ. आव्हाड भगवान भानुदास
समाजशास्त्र विभाग
आनंदराव धोंडे महाविद्यालय कडा. ता. आष्टी

★★★

गोषवारा–सध्याच्या जागतिक लोकसंख्येत विकसनशील देशांची लोकसंख्या साधारणत ८० टक्के आहे. विकसनशील देशांचा लोकसंख्या वाढीचा वेग सरासरी १.५ टक्के आहे, तर विकसित देशांचा फक्त ०. ५ टक्के आहे. विकसनशील देशांच्या लोकसंख्येच्या जडणघडणीत भारताचा मोठा वाटा आहे. जगाच्या लोकसंख्येने आतापर्यंत सातशे नव्वद कोटींचा पल्ला ओलांडला आहे. जगाच्या लोकसंख्यावाढीचा आधीचा वेग अतिशय कमी होता, म्हणजे सन १८०४ मध्ये जगाची लोकसंख्या शंभर कोटी होती, ती २०० कोटी होण्यास १२३ वर्षाचा कालावधी जावा लागला. त्यानंतर २०० कोटी लोकसंख्येचे ३०० कोटी होण्यास फक्त ३३ वर्शे लागली आणि नंतर ३०० कोटींची ४०० कोटी लोकसंख्या फक्त १४ वर्षात झाली. देशांच्या 'जलद विकासासाठी' लोकसंख्या महत्वाचा घटक आहे पण भारतासारख्या अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या देशाचा विचार केला तर वाढती लोकसंख्या विकसनशील देशांच्या सामाजिक विकासाच्या स्त्रोतांवर अडथळा बनते. भारत लोकसंख्येच्या दृष्टीने जगातील दुसर्याम क्रमांकाचा देश आहे. हा लेख वाढत्या लोकसंख्येचा परिणाम म्हणून निर्माण झालेल्या समस्येवर प्रकाश टाकतो तसेच जन्मदर, मृत्यूचे प्रमाण आणि मृत्यू दर कमी होण्याच्या घटकांचे विश्लेषण केले आहे. मुख्य शब्द रू लोकसंख्या वाढ, दारिर्द्य, जन्म दर आणि मृत्यू दर प्रमाण, लोकसंख्या वाढीचे कारणे

परिचय– मनुष्य सर्व संपत्तीचा निर्माता आहे आणि मनुष्याशिवाय इतर सर्व साधने काहीच उपयोगाची नाहीत. म्हणून मनुष्य हा सर्व विकास प्रयत्नांचा केंद्रबिंदू आहे. समग्र मानवजातीच्या वापरासाठी संपत्ती निर्माण केली जाते. देशाची लोकसंख्या ही सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण घटक आहे. पाष्चात्य देशांच्या 'लवकर विकासामध्ये लोकसंख्या हा सर्वात महत्वाचा हातभार लावणारा घटक होता. वाढत्या लोकसंख्येमुळे कामासाठी अतिरिक्त हात आणि नव्याने तयार केलेला माल खरेदी करण्यासाठी अतिरिक्त पैसा मिळत गेला. तथापि, भारतासारख्या अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या देशाच्या विकासात अडथळा बनते, विशेषत अविकसित देशांच्या बाबतीत अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या जीवनाला उदासीन करते. त्यामुळे बेरोजगारांच्या वाढत्या प्रवाहात भर घालत आहे. म्हणूनच लोकसंख्यावाढीचा दर नियंत्रित ठेऊन सामाजिक विकास करण्यासाठी लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. भारताची लोकसंख्या रू लोकसंख्येच्या दृष्टीने भारत जगात सध्या दुसर्या क्रमांकावर आहे. पहिला क्रमांक अर्थातच चीनचा आहे. सध्याच्या भारतीय लोकसंख्यावाढीचे प्रमाण लक्षात घेता सन २०५० पर्यंत भारत चीनला मागे टाकून प्रथम क्रमांकावर येऊ शकेल. सध्याच्या जागतिक लोकसंख्येत भारताचा वाटा १६ टक्के आहेय परंतु जगाच्या भूभागांपैकी फक्त २.४ टक्के भूभाग भारताने व्यापला आहे. भारताचे राष्ट्रीय उत्पन्न एकूण जागतिक उत्पन्नाच्या केवळ दोन टक्के आहे. हे स्पष्टपणे सामाजिक व्यवस्थेवरील प्रचंड ताण दर्शवते, दरवर्षी भारतीय लोकसंख्येत सुमारे १.८ कोटींची भर पडते. या वेगाने सन २०५० पर्यंत भारतीय लोकसंख्या १५३ कोटींवर पोहोचेल, तेव्हा भारताची लोकसंख्या चीनपेक्षा जास्त असेल. लोकसंख्या जनगणना २०११ –२०११ च्या जनगणनेच्या अहवालानुसार २०११ मध्ये भारताची एकूण लोकसंख्या १२१.० कोटी होती तर २००१ मध्ये १०२.८ कोटी लोक होते.

तक्ता – १ भारतात लोकसंख्या वाढ १९०१–२०११

वर्ष	भारताची लोकसंख्या (कोटी मध्ये)	मागील दशकात वाढ किंवा घट (कोटी मध्ये)	मागील दशकात टक्केवारी वाढ किंवा घट (कोटी मध्ये)
१९०१	२३. ६१	———	
२००१	१०२.८०	१८.१७	२१.४६
२०११	१२१.०२	१८.२२	१७.७२
१९११	२५.२१	१.६०	६.७७
१९२१	२५.१३	–०.०८	–०.३
१९३१	२७.९१	२.७८	११.०६
१९४१	३१.८७	३.९६	१४.१८
१९५१	३६.११	४.२४	१३.३
१९६१	४३.९२	७.८१	२१.६२

तक्ता दृ १ प्रस्तुत तक्ता १९५१–२०११ या साठ वर्षांच्या कालावधीमध्ील लोकसंख्या वाढ दर्शवतो. भारताची लोकसंख्या ८४.६ कोटीने वाढली आहे. २००१–२०११ च्या फक्त एका दशकात १८.२२ कोटी लोकसंख्येची वाढ नोंदली गेली होती जी या दशकातील १७.७२ टक्के वाढीचा दर दर्शवते तर १९९१–२००१ या काळात २१.४६ टक्के वाढ झाली होती. लोकसंख्या अनियमित वाढीचा कालावधी (१९०१–२०२१) रू वरील तक्ता –१ मधून असे दिसून आले आहे की लोकसंख्या वाढीचे प्रमाण २०२१ पर्यंत मध्यम व अनियमित होते. १९०१ ते १९२१ दरम्यान भारताची लोकसंख्या १.६ कोटीने वाढली. दोन दशकांच्या संपूर्ण कालावधीसाठी ०.२ टक्क्यांपेक्षा कमी दर. या छोट्या आणि अनियमित वाढीमागील मुख्य कारण म्हणजे दुष्काळ आणि वारंवार साथीच्या रोगांनी मानवी जीवन धोक्यात आले होते. १९१८–१९१९ च्या दरम्यान शीतज्वर या रोगाने २.० कोटी लोकांना आपले प्राण गमवावे लागले. लोकसंख्या वेगवान वाढीचा कालावधी जनगणना आयोगाने सन १९२१ चे 'महान विभाजन' म्हणून वर्णन केले कारण तेव्हापासून वाढीचा दर सातत्याने वाढत राहील व आता तो चिंताजनक झाला आहे. १९२१ ते १९५१ या काळात वर्शात लोकसंख्येची निव्वळ वाढ १०.६८ कोटी इतकी होती. पुढील चार दशकांत म्हणजेच १९५१–१९९१ मध्ये आणखी ४८.५२ कोटी लोकांना भारताच्या लोकसंख्येमध्ये जोडले गेले. १९२१ पासून भारतातील लोकसंख्येतील ही भन्नाट वाढ ही मुख्यत साथीच्या आजारात आणि दुष्काळांतून झालेल्या "असामान्य मृत्यू" आणि इतर मृत्यूचे प्रमाण यामध्ये झालेली घट यामुळे झाली. भारतातील लोकसंख्या वाढीची क्षमता दोन कारकांमुळे उच्च आहे. प्रथम पायाभूत लोकसंख्या मोठी आणि दुसरी, जन्म दरात अनुरुप घट झाल्याशिवाय लोकसंखेच्या दरात घाट होणे अत्यंत अशक्य आहे.

तक्ता–2 भारतात सरासरी वार्षिक जन्म दर आणि मृत्यू दर

वर्ष	जन्म दर	मृत्यू दर	भारतात सरासरी वार्षिक जन्मदर
१९०१–१९११	४९.२	४२.६	६.६
१९११–१९२१	४८.१	४८.६	–०.५
१९२१–१९३१	४६.४	३६.३	१०.१
१९३१–१९४१	४५.२	३१.२	१४.०
१९४१–१९५१	३९.९	२७.४	१२.५
१९५१–१९६१	४१.७	२२.०	१९.७
१९६१–१९७१	४१.२	१९.०	२२.२
१९७१–१९८१	३७.२	१५.७	२१.५
१९८१–१९९१	३३.९	१२.६	२१.३
१९९१–२००१	२५.८	८.५	१७.३
२००१–२०११	२२.१	७.२	१४.९
२०११–२१.	४७.	०१	४.४

तक्ता दृ २ असे दिसते की १९५१–१९६१ मध्ये भारतातील वार्षिक जन्म व मष्त्यू दर प्रति हजार ४१.७ आणि २२.० होता. परिणामी लोकसंख्येत १९.७: लोकांची वाढ झाली. १९६१–७१ दरम्यान, जन्मदर प्रति हजारात ४१.२ वर कायम राहिला तर मष्त्यूदर घटून तो १९.० प्रति हजार झाला, ज्यामुळे लोकसंख्येमध्ये २२.२: वाढ झाली. त्याचप्रमाणे २००१ ते २०११ या दशकात जन्म दर आणि मृत्यूच्या दरात आणखी घट झाली. जन्म दर दर हजारांवर २२.१ पर्यंत खाली आला असताना मृत्यू दर किरकोळ घटून दर ७.२ वर आला. यामुळे लोकसंख्येच्या वाढीच्या दरामध्ये तुलनेने थोडीशी वाढ झालीय राष्ट्रीय लोकसंख्यावाढीचा दर हा दर हजारी १४.९ आहे जो मागील दशकात १७.३ प्रति हजार होता. २००१–११ च्या दशकात भारताच्या लोकसंख्येमध्ये सुमारे १८.१ कोटी लोकांची भर पडली तथापि जन्मदर कमी करणे ही मूलभूत सामाजिक समायोजना अंमलात आणणे अत्यावश्यक आहे.

लोकसंख्या वाढण्याचे कारणे: भारतातील लोकसंख्या वाढीचा तीव्र परिणाम म्हणजे जन्माचा उच्च दर आणि आपल्या देशात मृत्यू दरात मोठ्या प्रमाणात घट. अशा प्रकारे उच्च जन्म दर कोणत्या घटकांचे आणि मृत्यूच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात घट होण्यास कारणीभूत असलेल्या घटकांचे विष्लेशण केले पाहिजे.

१. जन्म–मृत्युदर – आपल्या देशात मृत्युदरात घट झालेली आढळून येते. परंतु जन्मदर मात्र त्या मानाने घटलेला नाही. आपल्या देशाचा १००० लोकांमध्ये जन्मदर १८.२ आहे व मृत्युदर ७.३ आहे. त्यामुळे लोकसंख्येत वाढ होते.

२. बालविवाह– आजही अनेक मूला–मुलींचा विवाह कायद्याने घालून दिलेल्या नियमाप्रमाणे होत नाहीत. विवाह झाल्यावर लवकर मुले होतात. त्यावर नियंत्रण करण्यासाठीच्या माहितीचा अभाव व अज्ञान असते. या वयामध्ये महिला कोणत्याही गोष्टींचे निर्णय कुटुंबामध्ये घेऊ शकत नाही. त्याचप्रमाणे वयाच्या ४५ वर्शापर्यंत ती गर्भधारणा करू शकते. त्यामुळे अनेक अपत्य जन्माला येतात. हे देखील लोकसंख्या वाढीमध्ये भर घालणारे घटक आहेत.

३. मुलगा वंशाचा दिवा – समाजामध्ये काही अंधश्रद्धा असतात. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा, मेल्यावर पाणी पाजण्यास, अग्नी देण्यास, संपत्तीला वारस मुलगाच पाहिजे, त्यामुळे मुलाची वाट पाहत कुटुंबात माणसे वाढतात. मुलगी ही परक्याचे धन समजले जाते त्यामुळे मुलगा होईपर्यंत कुटुंब नियोजन केले जात नाही. त्यामुळे लोकसंख्येत वाढ होताना दिसून येते.

४. मुले ही ईश्वरी देणगी आहे – आजही काही समाजामध्ये कुटुंब नियोजन करणे पाप मानले जाते. मुले ही ईश्वरीय देणगी समजले जाते. या अंधश्रद्धेपोटी लोकसंख्या वाढ होताना आढळून येते.

५. बाल मृत्यू व अर्भक मृत्यूचे प्रमाण – ग्रामीण भागांमध्ये बालमृत्यूचे व अर्भक मृत्यूचे प्रमाण जास्त असल्यामुळे अनेक मुलांना जन्म दिला जातो. त्यामुळेही लोकसंख्येमध्ये वाढ होते.

६. निरक्षरता – आपल्या देशात निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.

निरक्षरतेमुळे अंधश्रद्धा वाढतात. लोकसंख्या वाढली तर माणसाला अनेक अडचणींना तोंड दयावे लागते. शिवाय शासनालासुद्धा आरोग्य सुविधा व इतर सुविधा पुरविणे अवघड होते. तेव्हा ही लोकसंख्यावाढ थांबविण्यासाठी विविध स्तरावर अनेक प्रयत्न चालू आहेत. ग्रामीण तसेच शहरी भागातील स्त्री पुरुषामध्ये जागृती निर्माण करणे गरजेचे आहे. लोकसंख्यावाढीमुळे अनेक अडचणी उभ्या राहतात. त्या संबंधीची जाणीव लोकांमध्ये निर्माण करायला हवी.

७. दारिद्रय गावोगावी जनतेचे दारिर्द्य हे आणखी एक कारण आहे. कारण जितकी कुटुंबातील व्यक्तीची संख्या तितके काम करणारे हात अशी त्यांची धारणा असते.

मृत्यूचे प्रमाण कमी होण्याचे मुख्य कारणे आहेतः

१. व्यापक आणि सुधारित वैद्याकीय आणि आरोग्य सुविधा.

२. वाहतूक व दळणवळणाच्या माध्यमांच्या विकासामुळे भारतात दुष्काळावर नियंत्रण.

३. मलेरिया आणि टीबीसारख्या भयानक रोगांवर नियंत्रण आणि देवीरोग, कांजन्या इत्यादी रोगांचे पूर्णपणे निर्मूलन केले गेले आहे.

४. ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागात स्वच्छतेमध्ये सुधारणा आणि शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा. सर्वसामान्यांच्या एकूणच आर्थिक परिस्थितीत होणाऱ्या सुधारणांमुळे मृत्यूदरात घट झाली आहे. वरच्या चर्चेतून हे स्पश्ट होते की सतत वाढलेला जन्म दर आणि मृत्यू दरात तीव्र घट यामुळे भारत सध्या 'लोकसंख्या स्फोट' या कालखंडातून जात आहे.

लोकसंख्या संक्रमानचा सिद्धांत हा सिद्धांत एखाद्या देशाच्या लोकसंख्येच्या आकार आणि वाढ दरावर आर्थिक विकासाच्या परिणामाचे स्पष्टीकरण देतो. सिद्धांत आर्थिक विकासाच्या विविध टप्प्यांवरील लोकसंख्या वाढीच्या दराचा संदर्भ देतो. या सिद्धांतानुसार, अर्थव्यवस्थेच्या प्रगतीसह लोकसंख्या वाढीचे तीन वेगळे चरण आहेत जे बदलत्या सामाजिक–आर्थिक परिस्थितीनुसार जन्म दर आणि मृत्यूच्या दरात बदल झाल्यामुळे होते.

१. उच्च जन्म दर आणि तितकाच उच्च मृत्यू दर ज्यामुळे लोकसंख्येचा वेग स्थिर राहतो.

२. उच्च जन्म दर आणि वेगाने घसरत जाणारा मृत्यू दर ज्यामुळे लोकसंख्या स्फोट होते.

३. कमी जन्म दर आणि सामान्य मृत्यू दर लोकसंख्या वाढीचा दर कमी करते.

अतिरिक्त लोकसंख्या – भारताच्या सामाजिक विकासासाठी एक अडथळा वर्तमान स्थितीचा आढावा घेतला असता २०२१ मध्ये भारताची लोकसंख्या १३५ कोटी पेक्षा जास्त आहे. याचा अर्थ असा आहे की जगातील एकूण २.४ टक्के क्षेत्रावर जगातील जवळजवळ १७ टक्के लोक भारतात राहतात. आणि आपल्या संसाधनांचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी देशाकडे भांडवल आणि तंत्रज्ञानाचा अभाव असल्याने बहुतेक भारतीय गरिबीत जीवन जगतात, बेरोजगाराला तोंड देतात आणि आरोग्य समस्यांनी ग्रस्त आहेत. त्यामुळे भारतातील जवळजवळ २० टक्के लोक आजही अनेक सुविधा पासून वंचित आहेत. आजच्या अविकसित तसेच विकसनशील देशांमध्ये वाढती लोकसंख्या सामाजिक विकासाला अडथळा ठरते. समाजाचा विकास करण्याचे ध्येय साध्य करत असतांना लोकसंख्या वाढीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे हे आता सर्वत्र मान्य आहे.

लोकसंख्येच्या वाढीने निर्माण झालेल्या समस्या

१. वाढत्या लोकसंख्येमुळे अतिरिक्त उत्पन्नाचा बराचसा भाग खाऊन टाकला आहे. त्यामुळे सामाजिक जीवनाचा दर्जा घसरला आहे.

२. भारतात लोकसंख्येच्या स्फोटांमुळे देशात अनेक समस्यांनी उग्ररूप धारण केले आहे, म्हणतात ना 'वाढती लोकसंख्या अनेक समस्यांची जननी' याचा प्रत्यय आज येत आहे. साठ टक्क्यांहून अधिक व्यक्ति शेती तसेच शेतीपूरक प्राथमिक व्यवसायात गुंतले आहेत. तरी अनेक भारतीय व्यक्तींना पुरेसे अन्नही मिळत नाही.

३. सतत वाढणारा जन्म दर देशाच्या अनुत्पादक लोकसंख्येत अधिक भर घालत आहे.

४. लोकसंख्येच्या वाढीमुळे बेरोजगारांची संख्या वाढली असून त्यामध्ये सातत्याने वाढ होत आहे.

५. लोकसंखेच्या प्रचंड वाढीमुळे सामाजिक विकासात बाधा निर्माण झाली आहे. त्यामुळे साहजिकच दरडोई उत्पन्न कमी झाले सर्वसामान्यांचे जीवनमान खालावले आहे.

निष्कर्ष– भारतात लोकसंख्या वाढीच्या वेगाने सामाजिक विकासास अडथळा निर्माण झाला आहे. यामुळे लोकसंख्येच्या दारिद्रात वाढ झाली आहे. अतिरिक्त लोकसंख्या वाढ बेरोजगारीची परिस्थिती निर्माण करते, दरडोई उत्पन्न कमी करते आणि उत्पादक लोकांचे प्रमाण घटवते, भांडवल निर्मितीला खीळ बसते आणि लोकांना अकार्यक्षम बनवते. त्यामुळे समाजातील बहुसंख्य व्यक्तींचा सामाजिक दर्जा घसरला आहे. म्हणून कुटुंब नियोजन कार्यक्रमाच्या माध्यमातून जन्मदर कमी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत जेणेकरुन देशाच्या सामाजिक विकासासाठी असलेली संसाधने पुरेशी होतील. एवढेच नव्हे तर जलद लोकसंख्या वाढीचे प्रमुख कारणही गरीबीच आहे. जर लोकसंख्या वाढीवर गरीबी हे मुख्य कारण ठरत असेल तर गरिबांना चांगले शिक्षण आणि चांगले जीवनमान कसे निर्माण करता येईल याकडे लक्ष्य केंद्रित करावे लागेल.

संदर्भ

1. *https://vishwakosh-marathi-gov-in*
2. *https://mr-vikaspedia-in*
3. *https://maharashtratimes-com*
4. *https://www-deshdoot-com*
5. *https://www-loksatta-com*
6. *https://yojana-gov-com*
7. *Mr-wikipedia-org*
8. *www-censusindia-gov-in*
9. *www-worldmeters-info*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

'भारतीय इतिहासातील आधुनिकतेचा नवा संदर्भ'

प्रा.डॉ.दिलीप तुकाराम कदम
इतिहास विभाग कै.न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील कला
महाविद्यालय, मारवड, ता.अमळनेर जि.जळगांव

★★★

प्रस्तावना – आधुनिक भारताचा इतिहास हा अनेकांगी अर्थांनी वैशिष्टयेपुर्ण असा आहे. या इतिहासात वसाहत वादाविरूध्द झगडणारा राष्ट्रवाद आहे, शेतकरी, मजुर, स्त्रीयांच्या चळवळी आहेत. प्रभावशाली अशा दीर्घकाळ चालणाऱ्या दुहेरी सामाजिक चळवळी आहेत. त्या म्हणजे ब्राह्मणी आणि ब्राह्मणेत्तर अशा चळवळी होत. प्रस्तुत स्वातंत्र्य लढा यांची पदरेही अनेक स्वरूपाची अशी आहेत. हा स्वातंत्र्य लढा जितका परकीय राजवटी विरूध्दच्या जुलूमशाही विरूध्दचा होता, तितकाच किंबहुना त्यापेक्षाही तीव्र असा अंतर्गत अशा बाबींसाठी शतकानुशतकांचा होता. त्यामुळे हा आधुनिक भारताचा इतिहास हा चकाकार अशा गतीचा वा स्वरूपाचा आहे. यात संदेह नाही.

प्राचीन भारत – सर्वप्रथम भायतीय इतिहासाला समजून घेण्याकरीता आपल्याला हे मान्य करावे लागते ही प्राचीन काळापासून भारत ही एक सातत्याने परकीय अशा राजवटींची भुमी राहिली आहे. त्यामुळे याच्या प्रत्येकातिहासात अशा राजवटींचा आपआपला प्रभाव पडला आहे. कोणतीही राजवट ही जरी सुरूवातीला राजकीय स्वरूपाची प्रभावशाली अशी राजवट असली तरी ती सर्वार्थाने तसीच असत नाही. त्यातंर्गत धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक असे त्यापेक्षाही प्रभावशाली असे घटक असतात. (थापर, 2000, प्रस्ता.) प्रस्तुत विचाराच्या स्पष्टीकरणादाखल प्राचीन भारताचे एक महत्वाचे उदाहरण देता येईल की, या काळात कनिश्कांनी आपली ग्रीक सत्ता येथे प्रभावीपणे उभी केली. आणि त्याच्या काळात सम्राट अशोकानंतरची दुसरी सर्वात प्रभावषाली अशी बौध्द धर्माला उभारी मिळाली. या त्याच्या सत्तेतून या बौध्द धर्मातील कला स्थापत्य प्रभावीपण उदय पावले. यांच्या काळात बौध्दांच्या प्रचंड मोठया अशा मुर्त्याच निर्माण झाल्या असे नाहीत तर या धम्माच्या बाबतीत त्याच्या धर्मग्रथांचे संकलन होऊन याचे पंथही उदय पावले. यांचे ग्रंथ स्पष्ट स्वरूपात पुढे आले. (गायधनी, राहूरीकर, 1998, 121) त्यामुळे त्यांच्या राजसत्तेचे आपण केलेले राजकीय विष्लेशण करून कदापी चालणार नाही. तो पर्यत तो अपुराच आहे.

मध्ययुगीन भारत – भारताच्या इतिहासात मध्यकाळात सुलतानशाही आणि मोगलषाही अशा तुर्कसत्ता भारतात आल्या या सत्तेचे स्वरूप विषद करताना कॉणशरद पाटील यांनी यास सांमती स्वरूपातच विषद केले आहे. (पाटील,1999, प्रस्ता.) आणि ते साधारपणे त्यांनी स्पष्ट करून दाखवले आहे. या मध्यकालीन भारतीय इतिहासात सातत्याने दारूल–उल–हर्ब अर्थात गैरइस्लाम आणि दारूल–उल–इस्लाम. इस्लाम भारत असेच स्थित्यंतर करण्याकडे सर्वच सत्ताधीशांचा कल होता. या मध्यकालीन भारताच्या बाबतीत एका इतिहासकाराने खुप मार्मिक असे विष्लेशण केले आहे की, या काळात या इस्लामी राजवटी भारतीय इतिहासाने स्विकारल्या याबाबत यात कोणताच निष्चित पर्याय नव्हता. परंतु जर का आपण सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवर सुक्ष्मपणाने पाहिले तर, आपणास असे दिसूनयेते की, या काळात हिंदू धर्मावर इस्लामचा आणि इस्लाम ध र्मावर हिंदुचा प्रचंड प्रभाव पडला हा प्रभाव केवळ धर्म मुल्यांचा, विचारांचाच होता असे नाही तर हिंदुच्या घर, स्वयंपाक गृह इथपर्यत इस्लामी संस्कृती आली, तर इस्लामच्या बाबतही हाच हिंदुचा प्रभाव राहिला. यात उदा.राजपुतांनी त्यांची पडदा पध्दती घेतली. हिंदुनी खाद्य संस्कृती, मुस्लीमांनीही खान बान पध्दती, हा प्रभाव इतका गुंतागुंतीचा जरी पडला असला तरीही हे दोन्ही धर्म कायम स्वरूपात निरनिराळेच असे राहिले. आणि त्यांनी या प्रभावासह आपले निराळेपणा टिकवून ठेवला होता. (हबीब, 2002, 123)

आधुनिक भारत – 18 व्या शतकात ज्यावेळी ब्रिटीशांनी भारतात आपले व्यापारवादी पाऊल ठेवले होते. आणि लवकरच त्यांच्या व्यापारवादाला सत्ता स्थापनेची सुसंधी चालून गेली. या काळात भारतीय इतिहासाच्या दुर्दैवाने एकही केंद्रीभूत अशी सत्ता नव्हती. सर्वच प्रादेशीक सत्ता होत्या यासाठी सत्तांची आपापली स्पर्धात्मक अशी कार्यक्षेत्र होती. त्यामुहे त्यांची सतत स्वतःच जुंपत होती. या सर्व स्थितीचा ब्रिटीशांनी जबर फायदा झाला. आणि आपल्या आपल्या येथील शाळांच्या पुस्तकामध्ये व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनले. (जावडेकर,1998,47) अशी उक्ती बनली. मुळात यामागे दीर्घ अशा सत्तांतराचा आणि भारतीय इतिहास अवस्थांतराचाच अधिक संदर्भ आहे. हे आपण समजून घेतले पाहिजे.

ब्रिटीश कालीन भारत समजून घ्यायला आपल्याला बऱ्याच सुक्ष्म अशा संकल्पना समजून घ्याव्या लागतात. यापैकी सर्वात महत्वाची संकल्पना म्हणजे राष्ट्रवादाची होय. प्राचीन मध्ययुगीन काळापासून जरी भारत हे एकसंघ राष्ट्र असा जरी इतिहास असला तरी दुसरी वस्तुस्थिती अशी आहे की ज्यावेळी हा ब्रिटीशांच्या हाती गेला त्यावेळी वर उल्लेख केल्याप्रमाणे हा प्रादेशीक सत्ताचा देश होता. ही ब्रिटीश सत्ता कार्यरत असतांना त्यांनी एकीकडे येथील सत्तांना अंकीकष्त करून दुसरीकडे प्रत्यक्ष ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता अशा दुहेरी पध्दतीने आपल्या सत्तेचे बस्तान निर्माण केले होते. (चंद्रा,1990,12) 18 व्या शतकातील भारत आणि त्यांची ही वैविधता या बाबतीत ब्रिटीष इतिहासकाराने असे म्हटले आहे की, भारत हे आपल्यामध्येच

एक विष्व प्रतिकष्ती आहे. विष्वात जेवढया भाषा, संस्कष्ती, सांस्कृतिक बाबी आहेत, असतील त्यापेक्षाही भारतामध्ये वैविध्यता अधिक आहे. (चंद्रा, 2000, 70) एवढेच नव्हे तर ज्यावेळी भारताला स्वातंत्र्य देण्याची प्रत्यक्ष वेळ येवून ठेपली होती, त्यावेळी ब्रिटीष पंतप्रधान चर्चील, याने असे म्हटले होती की, भारतात कदापीही स्वातंत्र्य टिकवून राहणार नाही आणि यापेक्षाही या देशात कधीच लोकशाही नांदू शकणार नाही. *India is not capable for Democracy and Freedom* आणि कदाचित भारत परत या ब्रिटनसत्तेला त्याच्या भविष्याकरीता बोलविल असाच त्याचा अविर्भाव कायम होता. वरील स्पष्टीकरणावरून हे स्पष्ट होतेच की, प्राचीन काळापासून भारतीय इतिहासाला परकीय अशा राजवटींची त्यांच्या प्रभावाची दीर्घ अशी परंपरा आहे. तरीही आधुनिक भारताचा इतिहास हा निष्चितपणे या दोन्ही काळा पैसा निराळा आणि अभिजात असाच आहे. आधुनिक भारत आणि याच्या जाणिवा ब्वदेबपवनेदमे या निष्चितपणे ब्रिटीष केंद्रीत जरी असल्या तरी त्या खुप पुढे जावून राष्ट्रनिर्मितीच्याही पुढे स्वयंभू राष्ट्रवाद (Ultimate Nationalism) या परिघाच्या होत्या. यामध्ये त्यांनी आतापर्यंतचा सर्वच प्रभाव बाजुला सारत भारतीय संविधानातील शब्द सार्वभौम या सम हा निर्माण होत गेला (सरकार,2002,24) हे या आधुनिक भारतीय इतिहासाचे अभिजात असे वैशिष्टये आहे.

आधुनिक भारताचे वैशिष्ट्रये – आधुनिक भारताचे दीर्घ असे वैशिष्टये आहेत यांची विस्तृत अशी मांडणी प्रो.बिपन चंद्रा (1928–2014) यांनी आपल्या आधुनिक भारताच्या इतिहास मांडणीत केली आहे. यांनीच आपल्या लेखनातून आर्थिक राष्ट्रवादाच्या सिध्दांताची प्रखर अशी सैध्दांतिक मांडणी केली.

1) लोकशाहीत्मक संवैधानिक लढा.

2) सामाजिक सुधारणांचा लढा.

3) कामगार हिताच्या संघर्शाचा लढा.

4) स्त्रियांच्या हित, सुधारणांचा लढा.

5) ब्राह्मण, ब्राह्मणेत्तर सुधारणा.

6) जातीच्या शोषणाचा लढा.

7) सामंतशाही विरूध्दचा लढा.

8) प्रादेशिक सत्ता व त्याविरूध्दच्या शोषणाविरूध्दचा लढा.
9) स्थानिक सरकार शोषणाविरूध्दचा आदिवासींचा लढा.
10) जंगल बचाव पर्यावरणाचा संरक्षणाचा इतिहास.

या प्रकारची सर्वच वैशिष्टये विषद करतांना प्रो.चंद्रा यांनी सरतेशेवटी सर्वात महत्वाचे असे आधुनिक भारताच्या इतिहासाचे आणखी एक वैशिष्टये प्रस्तुत केले आहे. ते म्हणजे म.गांधी आणि त्यांच्या लढा आणि विचारदर्शन होय. म.गांधी आणि त्याच्या दृष्टीने प्रस्तुत होणारे गांधीवादाचे दर्शन सत्य आणि अहिंसा हे प्रो.चंद्रा हे आधुनिक भारताने जगाला दिलेली अपूर्व अशी देणगी आहे. असे त्यांनी मांडले आहे. त्यांच्या मते गांधीवादाच्या अंगाने आधुनिक भारतातील क्रमिकरित्या झालेल्या तीन चळवळी या अत्यंत संगत अषाच स्वरूपाच्या आणि महत्वपूर्ण आहेत. गांधीनी खऱ्या अर्थाने आधुनिक भारताची सर्वकश निर्मिती केली आणि जगातील सर्वात प्रखर अशा साम्राज्यवादी सत्तेविरूध्द भीती भारतीयांच्या मनामधून त्यांनी कायमची काढून टाकली. (चंद्रा,2000,112)

आधुनिक भारताच्या इतिहासातील दोशस्थळे – आधुनिक भारताच्या इतिहास हया अनेकांगी बाबीत वैशिष्टये पुर्ण अस असला तरीही या इतिहासात ब्रिटीश सत्ता या अर्थाने अनेक दोशस्थळे आपणांस निष्चितपणे दिसून येतात ती पुढीलप्रमाणे

1) भारतीय इतिहासात कधीच नव्हे त्या पातळीवर जमातवाद फोफावला.

2) हिंदु मुस्लीम जमातवादाने प्रखरता प्रस्तुत केली.

3) जातीय तत्वावर मतदार संघ निर्मित झाले.

4) लोकशाही लढयाला अनेक दिव्यातून जावे लागले.

5) हिंदु मुस्लीमांतील मध्यस्थ वर्ग ब्रिटीश धार्जिणा होता.

6) शेतकऱ्यांचे अतोनात शोषण झाले.

7) वर्ण व जातीने प्रखर स्वरूप धारण केले.

8) भारताचे दोन देशात विभाजन झाले. अशा प्रकारे आपणास स्पष्ट करता येते.

आधुनिक भारतातून येणारे इतिहास भान – आधुनिक भारताच्या इतिहासातून निष्चितपणे आपल्याला प्रभावी असे इतिहासभान प्राप्त होते. यात संदेह नाही. यातून आपल्या आधुनिक भारत या इतिहासाची एक प्रभावषाली अशा राष्ट्राची निर्मिती झाली. भारतात सातत्याने सामाजिक सुधारणांना प्रभावी असा प्रत्यक्ष अवकाश प्राप्त झाला होता. हिंदु मुस्लीम हा जरी जमातवाद निर्माण झाला असला तरी या वेळोवेळी हे दोन्ही समाज जिथे गरज पडेल त्या ठिकाणी येतील. सांस्कषतिक मूल्ये हा ऐतिहासिक ठेवा गृहित धरून हे दोन्ही समाज धर्म एकत्रितपणे लढले. उदा. वंगभंग चळवळ, चलेजाव चळवळ, असहकार चळवळ इ. (वैद्य, कोठेकर, 1998,124)

निष्कर्ष –

1) आधुनिक भारताचा इतिहास हा अभिजात आणि वैशिष्टपुर्ण असाच आहे.

2) हा लढा जितका परकीय सत्तेविरूध्दचा होता तितकाच तो अनादिकाळापासूनचा सामाजिक आणि सांस्कृतिक बाबींचा होता.

3) या इतिहासात जिथे एकीकडे गांधीवाद हा अभिजात आहे. तद्वतच आंबेडकरवाद ही येथील शोषणाविरूध्दचा अविष्कार आहे.

4) संवैधानिक लढा आहे.

5) हा लढा एकीकरणाच्या चळवळींचा आहे.

6) देशातील आर्थिक प्रगती, औद्योगिकरणांचा आहे.

थोडक्यात संबंध युरोपच्या इतिहासात जेवढे म्हणून प्रभावशाली विजय आणि ज्यामुळे युरोपचा इतिहास समृध्द आहे ते सारेच विषय या आधुनिक भारताच्या इतिहासात प्रस्तुत आहेतच.

संदर्भ –

1) *चंद्रा, बिपन 1990 – आधुनिक भारत का इतिहास, हिंदू विश्वविद्यालय, दिल्ली.*
2) *पाटील शरद 1999 –सामंती सेवकत्व, सुगावा प्रकाशन, पुणे.*
3) *जावडेकर श द. 1998– आधुनिक भारत कॉन्टीनेन्टल प्रकाशन,*
4) *थापर रोमिल 2000 – प्राचीन भारत, ग्रंथशिल्पी, नई दिल्ली*
5) *हबिब, इरफान 2002 – मध्ययुगीन भारत, राजकमल, नई दिल्ली*
6) *गायधनी राहुरीकर 1998 – प्राचीन भारत, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे*
7) *सरकार सुमित – आधुनिक भारत, मॅकमिलन प्रकाशन, दिल्ली*
8) *रॉय, सत्या 2019 – आधुनिक भारत, दिल्ली विष्वविद्यालय, नई दिल्ली*
9) *वैद्य, कोठेकर 1998 –आधुनिक भारत, साईनाथ प्रकाशन नागपूर*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

'महाराष्ट्राची लोककला लावणी'

श्री. प्रवीण भांकर सोलनकर
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

★★★

सारांश :– लावणीचे असलेले मराठी मानवी जीवनातील स्थान अतिशय महत्त्वाचे व मोलाचे आहे. लावणीला लोकसंस्कृती म्हटले आहे. आणि संस्कृती असलेल्या प्रत्येक घटनेला, स्थानाला अनन्य साधारण महत्व आहे. त्यामुळेच लावणीला महत्व प्राप्त झाले असावे असे वाटते. लावणी वाड्.मयातील रचनातून तत्कालीन समाज जीवनाचे विविध स्तरीय चित्र पहावयास मिळते. समाज जीवनातल्या या चित्रात धर्म आणि संस्कृती या अंगाचे जसे दर्शन घडते तसेच व्यक्ती जीवनाच्या पार्श्वभूमीवर त्यातील व्यक्तिजीवनाचे वेगवेगळे नमुने. स्वभाव विशेशांचे अनुभव आपल्याला जवळून दिसतात. लावणी वाड्. मयात प्रतिबिंबित झालेल्या तत्कालीन समाज जीवनाचे, त्या जीवनातील कुटुंब व्यवस्थेचे, कौटुंबिक नात्याचे आणि जिव्हाळयाचे जसे काही विशेष पहावयास मिळतात. तसेच समाजातील इतरही विषेश प्रसंगातून बरेच काही दिसून येते. अशा समाजजीवनाचा मागोवा याठिकाणी घेण्याचा प्रयत्न आहे.

बिजशब्दः–लावणीचीयाख्या,स्वरूप,प्रकार,लावणीकार, लावणीची आजची परिस्थती,उपाय या गोष्टीचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते.

प्रास्ताविक :– संताच्या भक्तिभावातून गौळणी,अभंगाची निर्मिती झाली,याच भावनेतून पुढे लावणी अवतरली असावी. लावणीची निर्मितीमागची प्रेरणा भक्तीची होती. या भक्तिभावात स्त्री मनाची विविध रूपे प्रकट झालेली आहेत. पुरूषमनाला असलेली स्त्रीदेहाची,आणि शृंगाराची अभिलाषा काही गौळणीतून व्यक्त होताना दिसते. हीच अभिलाषा लावणीला कारणीभूत ठरली असावी. लोकसंगीतात लावणी प्रकार आजही लोकप्रिय आहे. मात्र त्याचे स्वरूप बदलत गेले आणि लावणीतील लावण्यही हरपत गेले. चित्रपटांच्या गीतांवर होणारे नृत्य असे आजकालच्या लावणी फडांचे स्वरूप झाल्याने, खरीखुरी लावणी हळूहळू लुप्त होत आहे.

लावणीच्या व्याख्या :– 1 ''हृदयाला चटका लावते ती लावणी''.

1 – अ.ब. कोल्हटकर. कोणतेही गीत असो ते माणसाला आवडले पाहिजे. त्याप्रकारे लावणी सुध्दा कशी अपवाद असेल ती सुध्दा माणसाला नाचवते. ती सतत गुणगुणावी वाटते. ती मानसाच्या हृदयाला चटका लावते ती लावणी होय.

2 ''शेतात लावणी करताना म्हटले जाणारे ते लावणी गीत''शेतकरी शेतीत कामे करत असताना त्याला आलेला थकवा दूर होण्यासाठी म्हटले जाणारे गीत लावणी असते. लावणी करत असताना म्हटलेले गीत लावणी होय. कामे लवकर होण्यासाठी आपल्याला आलेला थकवा दूर होण्यासाठी व मनोरंजन होण्यासाठी गीत म्हणतात त्या सुध्दा एक प्रकारे लावणी होय.

3''लावणी हे एक प्रकारचे ग्राम्य गीत आहे'

KIND OF RURAL EROTIC SONG.– अशा प्रकाराचा उल्लेख मराठी व्युत्पत्तिकोशात आहे. म्तवजपब हे विशेषण इंग्रजीत लावण्यातील ग्राम्यता शृंगार विषयक असते, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. इंग्रजी व मराठी अर्थातून ग्राम्यता, शृंगार व गेयता ही लावणीची तीन लक्षणे प्रामुख्याने आढळतात. या तीन लक्षणांसोबत नृत्यत्मकता हे ही लावणीचे लक्षण आहे असे मला सुचवावे वाटते. ग्रामीण किंवा ढंगाचे गीत म्हणजे लावणी असा अर्थ होतो.

4 ''लावणी म्हणजे शाहिरांनी विविध विषयावर तालबध्द,लयबध्द शब्दांनी साकार केलेली सुबक काव्यरचनना होय' तालबध्द, लयबध्द शब्दांपासून तयार झालेले गीत किंवा काव्यरचना लावणी होत असे देशमुख म्हणतात. सुबक रचना हया कोणत्या मानाव्यात आणि कोणत्या नाही याचे उत्तर देणे कठिण जाते. त्यामुळे हि व्याख्या अपुरी वाटते.

5 ''लावणी हा गायन प्रकार प्रामुख्याने भावनात्मक संगीताचा असल्याने लावणी म्हणजे शृंगार–विरहाचा परिपोष करणारी बहुजन समाजाच्या बोलीभाषेतील भावगीतच होय असे म्हटले असता चूक होणार नाही''. डॉ.मांडे यांनी लावणी हा गायन प्रकार असल्याचे सांगितले आहे. तसेच भावनेला प्राधान्य ते शृंगार विरह यांचा त्यात समावेश असतो. लावणीत एक प्रकारचा बहुजन समाज त्यांच्या बोलीभाषेत गीत तयार करतो आणि ते गीत म्हणजे लावणी अशी लावणीची व्याख्या केलेले आहे.

6 ''सर्वसाधारणपणे तालठेक्यात म्हणता येणारी पद्मावर्तनी वा भृंगावर्तनी मात्रावृतांत रचलेली कविता म्हणजे लावणी''.6

तालठेक्यात म्हणता येणारी पद्मावर्तनी, भषंावर्तनी मात्रावष्तांत रचलेली असते. यमक जुळणारी तालात म्हणता येणारी कविता ही लावणी असे जरी असले तरी सर्व कविता हया लावण्या होत नाहीत.

लावणीचे प्रकार

1) वगाची लावणी

2) बालेघाटी लावणी

3) छक्कड लावणी

4) जुन्नरी लावणी

5) धावती किंवा झडती लावणी

6) हौदयाची लावणी क्र वगाची लावणी – वग म्हणजे ओघाने केलेली रचना. वगाची चाल असलेली ही लावणी कथाप्रधान असून ती कथा सांगत पुढे जाते. शाहीर कथानकाचा थोडक्यात परिचय करून देतो. लोकांचे मन तात्काळ आकर्षन करणारे वगाची लावणी असते.

''कुणा देशात अमुक शहर,
तिथे राज्य करी तमका नरवीर
हत्ती घोडयाचं लावलष्कार
सेना मोठी – सेनापती कपटी''7

म्हणजे या लावणीचा बाजच मुळी वगाचा असतो. त्यामुळे वगाची चाल हा पद्यरचनेचा देखणा अविष्कार असतो यातून वगनाटयाची थोडक्यात रूपरेषा मांडली जात असते तिला तमाशा कलावंत 'नांदी' असे म्हणतात. या नांदीनेच शाहिरीच्या कार्यक्रमाला सुरूवात होते. वगाच्या लावणीमध्ये एखादी घटना मांडलेली आसते.

बालेघाटी लावणी – दुःखाची व विरहाची भावना असलेल्या लावणीला 'बालेघाटी लावणी' म्हटले जाते. या लावणीमध्ये दुःख,यातना, भोग आणि विरह भरलेला असतो. विरह भावना हा मानवी मनाचा एक आर्त आविष्कार आहे. ही भावना स्त्री आणि पुरूष या दोहोंच्याही मनातून संवेदित होते.

''उठउठुनी रातीची रडते
तळमळ पलंगी पडते
माझ्या संगती जळती समया
मी जागी निजता दुनिया
कुठे असाल,कधी याल,जवळी घ्याल''8

आपल्या पतीच्या जवळ नसण्याने पत्नीला रात्री–अपरात्री त्याच्या

आठवणीने ती रडत असते. ज्या प्रमाणे पणत्या जळत आहेत,त्या प्रमाणे मी पण जळत आहे. विरहाचे चित्रण जसे उत्कट व हळुवारपणे असते. एवढेच नाहीतर गतकाळाच्या आठवणी विस्मष्तीत गेल्या की,तेथे विरहाचा प्रत्यय योतोच.

छक्कड लावणी – छक्कड म्हणजे लावणीतील द्रुत चाल. 'छ' म्हणजे सहा ओळीचे कडवे ज्यात आहे ती छक्कड. पूर्वी नाचे लोक या लावण्या हावभाव करून सादर करायचे. स्त्रीचे वर्णन या छक्कड मध्ये केलेले असायचे. म्हणून याला छक्कड म्हणत असावेत. झगडा, छेड, राग, ईर्षा या भावनांचा कडक आविष्कार छक्कड मध्ये होत असतो. ठायी चालीतील लावण्या ऐकून कंटाळलेल्या रसिकावर छक्कड म्हणजे गुलाबपाण्याचा वर्षावच करून जातो. आधुनिक लावणीकार म्हणून ओळख असणारे सुहास म्हस्के यांनी हगणदारीमुक्त गाव या संकल्पनेवर छक्कड लावणी लिहीली आहे.

''गुड मॉर्निगंचा झालाय वांधा,
राया लगेच शौचालय बांधाकृ
रोज सकाळी पथक फिरतंया,
माझं काळीज धडधड करतंयाकृ
नाक झाकून कुठं चालायचं,
चांगल्या रस्त्याचं वाटूळ व्हायचं,
सा–या घाणीचा झालाय रेंदा,
राया लगेच शौचालय बांधाकृ''

सुहास म्हस्के यांची ही अधुनिक लावणी विजया पालव या लावण्यवतीने अकलूजच्या लावणी स्पर्धेत पहिल पारितोषिक मिळवून दिले आहे. या छक्कड प्रकारची लावणी सादर करण्यारी लावण्यवतीने चालू विषय हाताळून या लावणीला प्रसिध्द केलेले आहे. कारण खेडयात आजपण प्रत्येकाच्या घरात पंधरा–वीस हजारांचे मोबाईल आहेत. परंतु साध संडास बाथरूप नाही. महाराष्ट्र राज्य शासनाने हागणदारी मुक्त गाव योजना राबवून प्रत्येक गावात संडास बाथरूप बांधण्यासाठी प्रयत्न करत असताना ही छक्कड लावणीने अकलूज लावणी स्पर्धेत पहिले पारितोषिक मिळवून दिले आहे.

जुन्नरी लावणी – जुन्नरी लावणी हा लोककला प्रकार आता जास्त प्रमाणात कोणत्याही तमाशात किंवा लावणी फडात म्हटला जात नाही. जुन्नरी लावणीतील गद्य घाईने म्हणावे लागते. त्यासाठी धावती चाल असावी लागते. धावती चाल म्हणणे म्हणजे समोरील प्रेषकांना न समजण्यासारखे होते. त्यामुळे हा प्रकार लोप पावत चालचा आहे.

''कष्टाची बरी भाजि भाकरी तुप साखरेची चोरी नको। आल्या अतिथा मुठभर द्याया मागे – पुढती पाहु नको। दिली स्थिती देवाने तीतच मानी सुख कधी विटु नको।''9

अनंत फंदी यांच्या लावण्या फार प्रसिध्द आहेत. त्यापैकी ही जुन्नरी लावणी आहे. एखादा कीर्तनकार त्याच्या तीन तासाच्या व्याख्यानातून जे जीवनाचे तत्त्वज्ञान सांगतो ते अचूकपणे अनंत फंदी यांनी या लावणीतुन मांडले आहे. चोरीकरून पोट भरण्यापेक्षा कष्टाची भाजी भाकरी मानसाला सुख देत असते. आपल्या घरी येणा–या तहानलेल्या व भुकेलेल्या अन्न देताना मागे पुढे पाहू नका असे वर्णन या लावणीत केलेले आहे.

झडती लावणी – वरवरचे मनोरंजनात्मक वर्णन करणारी ही लावणी असते. शब्दचमत्कृती, शब्दललित्य, भावनेच्या आहारी न जाता केवळ मनोरंजनासाठी गंमत म्हणन केलेली लावण्यमयी रचना म्हणजे ध ाावती लावणी होय.

''ही नटरंगी नार, मारी काळजात वार,
पाडी कासोटयाला, पार चापुनिया पट्टी।
पाटलाला दावला चाळा, कुलकर्ण्याला घाली डोळा,
मास्तरानं सोडली शाळा हिच्यासाठी।।१।।

तेल्यापासून तेल नेती, वाण्यापासून गूळ नेती,
हनं गुजराला वेडा केला गं, खुळा झाला ब्राह्मण,''10

('मराठी पारंपारिक लावणी', पृ –73)

पठ्ठे बापूरावांच्या लावणीतील लावण्यवती आपलया आदाकारीने गावातील सर्वाना भुरळ घालीत आहे. बाराबलूतेदारी अस्तित्वात असणा–या काळात सर्व जातीजमाजींचा नामोल्लेख या लावणीत आला आहे. वाटेवरून येणारा जाणाराला या नटरंगीने सोडले नाही. पाटला बरोबर चाळा करते आणि कुलकर्णी काकाला डोळा मारते. हिच्या आदाकारीने तर कहरच केला गुरूजीन शाळेत येणेच बंद केले. प्रत्येक व्यापा–याला गोड बोलून त्यांच्यापासून तेल,गुळ,साखर अशा संसार उपयोगी वस्तू घेवून जाते. या लावणीतून पठ्ठे बापूरावांनी गावातील नटरंगी नार कसे संपूर्ण गाव बेजार करते याची प्रचती देतात.

हौदयाची किंवा चौकाची लावणी – चार चौकाची ,चार वेळा चाली बदलणारी लावणी म्हणजे चौकाची लावणी होय.हत्तीला सजवण्यासाठी त्याच्या पाठीवर अंबारी चौकोनी आकाराची असते, तसेच तालमीतील कुस्ती खेळण्याचा हौद चौकोनी असतो. त्याप्रमाणे लावणीत त्यावरून ही लावणी प्रकार तयार झालेला असावा असे वाटते. नऊ ते दहा ओळीची कडवे असणा–या रचनेला 'चौक' असेही म्हणतात. असे अनेक चौक एकत्रीत असलेल्या हया हौदयाच्या किंवा चौकाच्या लावण्या होत.

''घरामध्ये नवीन तरणी जान, सुबक ठेंगणी
वयाने लहान मला नुकतेच आले नहाण
पती दुष्मान परठाई अंग सखे दुःख
सांगू या कर्माची कहाणी।।१।।
मारून धनद्रव्यावर लाथ वाटते जावा
धरून याचा हात आबरू जाईल
याजगात अथवा घात करू काही। अगं सखें।।२।।''

('मराठी पारंपारिक लग्न होऊन घरामध्ये आलेल्या सुनबाईच भावनिक आंदोलनाचे प्रतिबिंध या लावणीतुन मांडण्यात आलेले आहे. ही लावणी सगनभाऊची आहे. या लावणीला हौदयाची लावणी असे म्हणता येईल कारण या लावणीतील प्रत्येक चौकाची चाल ही वेगळी आहे असे तिचे सादरीकरण करताना ते जाणवते. कारण त्यावेळी आपण रसिक प्रेक्षक असतो. लावणी वाचत असताना तीची चाल वाचकांना माहीत नसते. त्यामुळ वाचक लावणी ताला सुरात न वाचता अगदी साध्या पध्दतीने वाचतात. त्यामुळे त्यांना चाल लक्षात येत नाही.

लावणीचे महत्त्व महाराष्ट्राची लोककला किंवा लोकनष्त्य कला म्हटल्यावर लहानथोरापासून लावणीचे नाव घेतील. लावणी माहीत नसणारा कोणीही नसेल. एवढा लावणीचा प्रभाव मराठी रसिकांवर उमटलेला आहे. मात्र या लावणीला म्हणावी तशी प्रतिष्ठा मिळालेली नाही. कारण तिचे बोल व कामोत्तेजक,भावभावनांचे दर्शन यामुळे लोकांनी तिचा अर्थ वेगळा घेतला आणि तिला गावकुसाबाहेरचे जीवन जगावे लागले. गावकुसाबाहेर राहून तिने आपले अस्तित्व टिकवून ठेवले. गेल्या दोन–तीन दशकांत पांढरपेशांचेही मनोरंजन करताना दिसत आहे. त्या कलेने अनेक बदल–स्थित्यंतरे पचवली आहेत. लावणी पेशवाईच्या अस्ताबरोबर संपली असे वाटत असतानाच खोलवर घुसवली गेलेली ती एक कला आहे. जमिनीच्या आतून बाहेर पडून आकाशाच्या दिशेने वर फोफावलेली व बहरलेली जाणवते.

लावणी ही स्त्रीनष्त्यप्रधान कला असल्यामुळे त्याकडे सारेजण आकर्षित झालेले दिसतात. पेशवाईच्या काळापासून पुरूष मंडळी कामानिमित्त दोन तीन वर्ष तरी घराबाहेर असते. घरची स्त्री विरहात,चुकून नीतिच्या दष्टीने पाय वाकडे वळणे नाकारता येत नव्हते. अशा नीतिचे व अनीतिचे,विरहाचे इष्काचे मोठे रोचक वर्णन त्या काळापासून आज पण होत राहिले आहे. राधा–कष्ण,गवळणी,रासलिला,शंकरपार्वती हे विषय शाहिरांनी हाताळले तरी त्यांची वष्त्ती इष्कात रंगली. गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत लावणी हा विषय गाजलेला होता. तसा विचार केला तर लावणी ही टाकाव नव्हती. जितके टाळाला महत्त्व होते तितकेच चाळाला पण महत्तव होते. टाळाची व चाळाची गरज संपूर्ण महाराष्ट्राला होती आणि आहे. लावण्याची लज्जत वाढवण्यासाठी सुंदर चालींना स्वरही सुमधूर,मंजूळ व गोड असावा लागतो. तरच लावणी लावणी होते. आज त्याच लावण्या तमाशातून फडातून,बारीतून यात्रामधून पहावयास व ऐकावयास मिळत होत्या. अजूनही पुष्कळ गायिका व नष्त्य कलावंतीणी आहेत. त्यांची उणीव नाही फक्त योग्य मार्गदर्शकाची,नियोजनाची,कलेशी प्रामाणिक राहून अदाकारी करण्याची आवश्यकता आहे. या चाल आणि ताल याच्या जोरावर काही लावण्या परदेशी गेल्या आहेत. काही चित्रपटात गेल्या आहेत. महाराष्ट्राची शान आणि कलेचा अभिमान असणारी ही लावणी जिवंत ठेवायची असेल तर नवनवीन वगनाटये,लावणी रचना करून योग्य ते शिक्षण कलावंताना देणे गरजेचे आहे.

लावणी महोत्सव कार्यक्रम घेणे गरजेचे आहे. लावण्यवत लावणीचे रूप गोंडस,साजरं गोजर मिळवायचे असेल लावणीकार,संगीत,दिगदर्शक,नवे नवे नष्त्य कलावंत,कलावंतीणीचा गौरव करून त्यांना मानधन दिले पाहिजे. लावणी रचणा–याकडून नव लावणी निर्मितीच्या निर्माणसाठी प्रोत्साहनपर बक्षीस योजना राबवाव्यात. लावणी टिकली तरच कलावंत टिकतील. लावणीरचनाकार व लावणी कलावंतीणीना योग्य स्थान जर समाजाने दिले तरच त्या योग्य प्रकारे लावणी सादर करतील.

शिफारशी

1. लावणी जिवंत ठेवण्यासाठी तिचा प्रचार करणे गरजेचे आहे.
2. लावणीकार यांना पेशवाईप्रमाणे मान सन्मान दिला पाहिजे.

3. मुंबई व नागपूर विद्यापीठाप्रमाणे लावणी हा विषय अभ्यासक्रमात ठेवला पाहिजे.

4. आकूलज लावणी महोत्सवाप्रामणे लावणी महोत्सव घ्यावेत.

5. लावण्यवती व लावणी रचनाकार यांना वृध्दापकाळात मानधन दयावे.

6. लावणी कार्यक्रमासाठी सांस्कषतिक भवने जिल्हाच्या ठिकाणी बांधावे.

7. राज्य सरकारच्या वतीने देण्यात येणारे पुरस्कार कलावतांना योग्य त्या वेळी दयावेत,

8. लावणीला अभ्यासक्रमात स्थान देण्यात यावे.

निष्कर्ष

1 लावणीतून शृंगाररस निर्झराप्रमाणे वाहतो.

2 लावणी वाद्यांमध्ये काळानुरूप बदल झालेला दिसला.

3 लावणी मनोरंजनाचे साधन आहे.

4 लावणीतून जीवन जगण्याचा दिलेला जीवनसंदेश हा तत्ववेत्त्याच्या भूमिकेतून मांडला आहे, असे दिसते.

संदर्भ :–

1. *डॉ.दि.भी.गायकवाड, सेट नेट मराठी, प्रगती बुक्स प्रा.लि.पान 12.28*
2. *म.वा.धोंड,'म–हाटी लावणी' मौज प्रकाशन,मुंबई, तिसरी आवष्त्ती. 2003 पान 17*
3. *कष्पा.कुलकर्णी,'मराठी व्युत्पत्तीकोश,लेखनवाचन भांडार,पुणे पान 676*
4. *प्रा.बी.बी.देशमुख,'लावणी वाङ्:यःउद्गम आणि विकास पान*
5. *डॉ. प्रभाकर मांडे,मराठवाडयातील कलगी–तु–याची आध्यात्मिक शाहिरी पान 2*
6. *डॉ. गंगाधर मोरजे,मराठी लावणी वाङ्:मय पान 58*
7. *भारतीय संस्कष्ती कोश,खंड आठवा पान 361*
8. *राजा मंगळवेढेकर,'शाहीर ग.दि.माडगूळकर', पान 76*
9. *वि.ना.आहेर,स्वांत्र्योत्तर कालीन मराठी लावणी वाङ्:मय एक चिकित्सक अभ्यास,पीएच.डी.प्रबंध,डॉ.बा.आ.म.वि.औरंगाबाद पान 72*
10. *वि.ना.आहेर,स्वांत्र्योत्तर कालीन मराठी लावणी वाङ्:मय एक चिकित्सक अभ्यास,पीएच.डी.प्रबंध,डॉ.बा.आ.म.वि. औरंगाबाद पान 76*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

विदर्भाच्या मराठी गझलेतील आंबेडकरवादी जाणीव

प्रा. संजय एस. पोहरे
मराठी विभाग
श्री शिवाजी कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.

★★★

प्रस्तावना - सुरेश भटांनी गझल हा सशक्त काव्य प्रकार तंत्र शुद्ध आकृती बंधासह मराठी कवितेमध्ये आणून मराठी कविता समृद्ध केली. गझलेला कोणत्याही विशिष्ट आशय विषयाचे बंधन नसावे, जे जे चांगले आहे ते ते गझलेमध्ये यायला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. गझल म्हणजे प्रेमाची कविता है समीकरण बदलून त्यांनी गझलेमध्ये प्रेमासह सामाजिक विषय, राजकीय, आत्मचिंतन आदी जाणिवेने गझल लेखन केले आहे. सुरेश भटांनंतर गझलेचा परिघ अधिक व्यापक होत गेला आहे. सुरेश भटांनी मराठी गझलेला जो मान-सन्मान प्राप्त करून दिला तो पुढील चार ते पाच दशकांपासून उंचावत जाताना दिसतो आहे. सुरेश भटांनंतर मराठी गझलेतून कृषी विषयक जाणिवेची गझल, स्त्री विषयक जाणिवेची गझल, जागतिकीकरणाची गझल सुरेश भटांच्या पुढच्या काळाचा टप्पा आहेत. पण सामाजिक जाणीवेची गझल जास्त लोकप्रिय आणि जनमानसाच्या मनाचा ठाव घेणारी ठरली. त्या पुढचा महत्वाचा टप्पा म्हणून आंबेडकरवादी गझलेकडे पाहावे लागेल. आंबेडकरवादी जाणिवेची गझल ही मोठ्याप्रमाणात लिहिली जात आहे. बहुतांश मराठी गझलकारांचे प्रेरणास्थान सहाजिकच सुरेश भट हे होत. त्याला दलित गझलकारही अपवाद नाहीत रामदास कुहिटे, (वर्धा), हृदय (बंजू) चक्रधर (नागपूर) हे काफला (१९९०) ह्या पहिल्या प्रातिनिधिक मराठी गझल संग्रहातील दलित गझलकार सुरेश भटांचे ऋण मान्य करतात.

सुरेश भटांनंतर लिहिली गेलेली आंबेडकरवादी मराठी गझल रचनातंत्र आणि आकृतीबंधाच्या संदर्भात सुरेश भटांचा प्रभाव दिसून येतो. तर आशय अभिव्यक्तीच्या अंगाने वामनदादा कर्डकच आंबेडकरीवादी गझलेचे आद्यप्रणेते वा आंबेडकरी आद्य गझलकार ठरतात, यात शंका नाही. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार तत्वज्ञानाचे आणि वैश्विक मूल्य दर्शक बुढाच्या धम्माचे मानवतावादी तत्वज्ञान आहे. वामनदादा कर्डक आणि आंबेडकरी चळवळ हे समीकरण सर्वज्ञात आहे. आंबेडकरवादी आशय, विषय घेऊन गझल लिहिणारे वामनदादा कर्डक आंबेडकरवादी गझलेचे आयप्रणेते ठरतात. यामध्ये कोणतीही विसंगती नसून, सुसंगतीच आहे. भारतीय संविधानाच्या क्षितिजातून आंबेडकरीवादी साहित्याचा उगम झाला आणि महाकवी वामनदादा कर्डकांच्या लेखणीतून आंबेडकरवादी गझल जन्माला आली. आंबेडकरवादी गझलकार म्हणून भाऊ पंचभाई, हृदय चक्रधर, प्रमोद बाळके, फकीरा मोरे, नीलकांत ढोले, ल. स. रोकडे, सुदाम सोनुले, सिद्धार्थ भगत, गौरवकुमार आठवले, सुखदेव ढाणके, अनंत भीमनवार, रमेश बुरबुरे, प्रकाश मोरे, विनोद बुरबुरे, प्रल्हाद सोनवणे, अमोल शिरसाट, मंगेश गजभिये, मिलिंद हिवराळे, संदीप वाकोडे, अविनाश येलकर, प्रवीण हटकर, रवी चापके आदी गझलकारांचा उल्लेख करता येईल. जुन्या पिढीतील दलित कवींची गझल तंत्र शुद्धतेत कच्ची आहे, तर नव्या पिढीतील दलित कवींची गझल तंत्रशुद्धतेच्या बाबतीत बऱ्यापैकी समाधान देणारी आहे. असे म्हटले जाते की, कोणत्याही काळात नवीन पिढी ही आधीच्या पिढीच्या एक पाऊल पुढे असते. आधीच्या गझलकारांनी आकृतिबंधापेक्षा आशयालाच अधिक महत्व दिले होते. तर आज नव्या पिढीने आशयासोबत आकृतिबंधावरही आपले महारथ मिळवलेले आहे.

आंबेडकरवादी गझल - आंबेडकरवादी गझल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार प्रेरणेतून जन्म आलेली आहे. सुरेश भटांनाही आंबेडकरवादी गझलेला जवळचे असलेले समाजवादाचे तत्वज्ञान महत्वाचे वाटत आलेले होते. माझे भांडण प्रवृत्तीशी आहे. ज्या वर्गाची सुखे-समृद्धी इतरांच्या दु:खावर अवलंबून असतात. ज्या वर्गाचा मोठेपणा इतरांच्या तथाकथित लहानपणावर अवलंबून असतो. ज्या गर्वाची सांस्कृतिक श्रेष्ठता इतरांच्या वंचितपणावर अवलंबून असते, त्या वर्गाविषयी माझ्या मनात घृणा आणि द्वेष आहे. निश्चितपणे तिरस्कार आहे. आधुनिक कालखंडात समाजवाद म्हणजे शोषण करणाऱ्या भांडवली व्यवस्थेतून सर्वसामान्य कामगार, कष्टकरी जनतेची सुटका व्हावी आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित लोकशाही व्यवस्था दृढमूल व्हावी. हेच आजच्या आंबेडकरवादी गझलेचे उद्दिष्ट आहेत. आंबेडकरवादी गझलेची संकल्पना दृढमूल करणारे गझलकार, गझल समीक्षक प्रमोद वाळके, युगंधर. आंबेडकरवादी गझलेविषयी भाष्य करताना असे म्हणतात की, ''आंबेडकरवाद म्हणजे जीवनाचे सौंदर्यशास्त्र या सौंदर्यशास्त्राची जातीयता, धर्मनिरपेक्षता, बुद्धिप्रामाण्यवाद हे उपांगे आहेत. लोकशाही समाजवादाची प्रस्थापना करणे, संविधान संस्कृती रुजविणे, सांप्रदायिक शक्तींना थांबविण्यासाझी शर्थीने प्रयत्न करणे, इहवादाच्या अधिष्ठानावर स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाचे दीपस्तंभ उभे करणे, ही त्याची उद्दिष्टये आहेत. या उद्दिष्टांचे अनुगामित्व पत्करणाऱ्या गझलकारालाच आंबेडकरवादी गझलकार म्हणणे संयुक्तिक ठरेल. तर आंबेडकरवादी गझल म्हणजे काय? सांगताना डॉ. यशवंत मनोहर म्हणतात, आंबेडकरवादी गझल म्हणजे मूल्यसंघर्षापोटी जन्माला येणारी विचागझल आहे. विषमतातीत जीवनासाठी जगभर चाललेल्या युद्धात ती सैनिक म्हणून सहभागी होते. शेरातील एका चरणाच्या हातात बाबासाहेबांचा वैज्ञानिक समाजवाद असतो आणि चरणाच्या दुसऱ्या हातात बाबासाहेबांचे एकूणच पुनर्रचनाशील तत्वज्ञान असते. या तत्वज्ञानाच्या बोधीवृक्षातून गझलेतील संवेदनांची आणि भावनांची नक्षत्रे उगवतात.श्श आंबेडकरवाद म्हणजे काय ते काही व्याख्येवरून समजून घेण्याचा प्रयत्न करता येईल

आंबेडकरी कविता दु:खाच्या कोषातून दु:खाबाहेर येणारी आणि मानवी सुखाच्या विश्व घटनेला कवटाळणारी कविता आहे. या कवितेला जन्म देणाऱ्या प्रतिभेचे दिशाकोनच निराळे आहेत, जे मन या कवितेतून बोलते आहे ते मन आंबेडकर मन आहे. यशवंत मनोहर आंबेडकरी कविता आंबेडकरी चळवळीची निर्मिती आहे. नव- सर्जक जाणिवांमधून उभा झालेला हा सांस्कृतिक विद्रोह अमानुष वेदनांना मानवी संवेदनेशी झालेल्या संयोगाची फलश्रुती आहे. ही संवेदना आंबेडकरी संस्कारांनी संस्कारीत झालेली असून, या संवेदनेशी ज्याचा स्पर्श

झाला त्याच्या उरा ओठांतून बाहेर पडणारा स्वर हा क्रांतीचे चिरंतन गीत होणार हे निश्चितश्श प्रा. सतेश्वर मोरे वरील आंबेडकरवादी भाष्यावरून आणि व्याख्येवरून असे म्हणता येईल की, अमानवीय, अवैज्ञानिक आणि विषमतावादी सामाजिक व्यवस्थेपासून दु:खी मानवाची मुक्ती करून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या आदर्श मूल्यांवर मानवा-मानवातील भेद संपुष्टात आणणारी मानवतावादी विचारधारा ज्या आशय लेखनामध्ये ओतप्रोत भरलेली असते. त्या कवितेला या गझलेला आंबेडकरवादी असे म्हणता येईल. त्यामुळे गझल म्हणजे आंबेडकरी कविताच आहे. फरक तो एवढाच की, आंबेडकरी कविता मुक्तछंदात व्यक्त होते. तर गझल तिच्या विशिष्ट आकृतिबंधात लिहिली जाते. परंतु आंबेडकरी विचारांची प्रेरणा दोन्ही ठिकाणी सारखीच प्रवाहित असते. आंबेडकरवादांची मूल्ये ही विशिष्ट जात, धर्म, पंथ वा देशांपर्यंत मर्यादित नाहीत तर ते वैश्विक नाते निर्माण करणारे आहेत.

कर तू बंद कवाडे मज पर्वा नाही
मजसाठी तर सारे जग बाकी आहे
कायद्याचा प्रश्न नाही प्रश्न आहे वागण्याचा
कायद्याने कायद्याची रोज होते पायमल्ली.

जागतिकीकरणाच्या बदलत्या काळातही अभिजनवादी धर्ममार्तंड कोणत्याही बदलाचे वारे आपल्याला लागू देण्यास तयार नाहीत. परिवर्तन स्वीकारण्यास तयार नाहीत. कारण इतरांच्या शोषणांवरच त्यांच्या श्रेष्ठत्वाचा डोलारा उभा आहे. हे सर्व कुभांड माहिती असल्यामुळेच गझलकार त्याच्या बंद दाराला घाबरत नाही. किंवा त्याला पूर्णत माहिती आहे की, या अमानवीय व्यवस्थेला व्यवस्थित करण्यासाङ्गी कितीही कायद्याचे बंधन घातले तरी हे त्यातून पळवाट काढतील. कारण झोपलेल्याला जागे करता येते पण झोपेचे सोंग घेणाऱ्याला जागे करता येत नाही. या म्हणीप्रमाणे कायदे आपल्या नैतिकतेला जागृत करण्यासाठी आहेत. नाहीतर अधिकारांचा गैरफायदा घेतला जात आहे. अशा प्रवृत्तीसमोर आपले जीवन स्वाभीमानानेच जगले पाहिजे, अशी शिकवणच आंबेडकरवादी गझलेतून मिळते.

खुर्ची समोर कोण्या हलवू नकोस शेपूट
बापापरीच निर्भीड तूव्हावास वाघ मित्राश्श
ष्वाघ होऊनी जगणे आता शिकून घे तू
कुणाकुणाची कुठवर होते शिकार मित्रा

कोणत्याही ठिकाणी काम करताना निर्भीड राहणे, वाघासारखे राहणे म्हणजे आपल्या कामामध्ये चोख राहण्याचा सल्लाच कवी देतात. डॉ. आंबेडकरांनी सांगितलेले त्यांचा शब्द आंबेडकरी समाजासाठी लेखकांसाठी प्राणवायू झालेले आहेत. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जे तो प्राषण करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. या शब्दात शिक्षणाचे महत्व अज्ञान समाजामध्ये चेतना निर्माण करणारे ठरले आणि डॉ. आंबेडकर म्हणायचे, लक्षात ठेवा शेळ्या-मेंढ्यांची शिकार कोणीही करेल पण वाघाची नाही. म्हणून वाघांसारखे जगा. शंभर वर्षे शेळी म्हणून जगण्यापेक्षा एक दिवस वाघ बनून जगा. या सर्व संदेशामागचा उद्देश मागासलेल्या समाजामध्ये जाणीव जागृती निर्माण करण्याचा होता. त्याच जाणिवेतून शिकून पुढे आलेली पिढी लिहिती झाली. त्याच पिढीचा आदर्श घेत भटोत्तर आंबेडकरी गझलकार मार्गक्रमण करताना दिसताहेत.

शेळीसारखा वागलास तू वाघासारखा वाग मराठा मराठा समाज हा मुख्य शेतकरी समाज आहे. शेतीची अवस्था बिकट होत चालली आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले जात नाहीत. उलट त्यांना जाती-धर्माच्या अहंकारात ठेवले जाण्याची शक्कल पूर्वापार चालत आलेली आहे. एकाच वेलीवर एकाच ऋतूत जन्माला आलेली विविध जातीतील फुलांना जातिनिहाय वेगळे केले जात आहे.

संसर्ग माणसाचा झाला कसा ऋतूंना ?
आली फुले कशी हो जातीनिहाय भाऊ
जात अंताची खरी जर बात करतो
मग लढाया का पुढे तू जात करतो

हजारो वर्षाच्या जातीयवादी, विषमतावादी समाजामध्ये विशेष आरक्षणाचा लाभ घेतलेल्या अभिजन समाजामुळे इतर समाजाचे सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, मानसिक, बौद्धिक इत्यादी शोषण झालेले आहे. यातून थोडीफार झिज भरून निघावी म्हणून राजर्शि शाहू महाराजांनी देशात आरक्षणाची सुरुवात केली. त्याचाच पुढे सविस्तर विस्तार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला. मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय म्हणजेच आजच्या मराठा समाजापासून ते मातंग समाजापर्यंत सर्वांना आरक्षणाची गरज असल्याने त्यांना ते मिळण्यासाठी संघर्ष केला. परंतु काही महाभागांनी मागासलेले असतानाही आरक्षणाला विरोध केलेला होता. आता परिस्थिती बदलली. आरक्षणाच्या हक्काने समाजाच्या सर्वच स्तरात परिवर्तन दिसून येवू लागले. आणि त्यातील मुख्य विषय हा आरक्षण ठरला तेव्हा आता सर्वच समाजाकडून आरक्षणाची मागणी होताना दिसते तेव्हा ष्कोणत्याच कळपात नाही एकटाच चालतो मी धर्म माझा जात माझी फक्त संविधान आहे. जे कधी आरक्षणाला भीक संबोधित होते

लागले रांगेत आता का बरे भत्यास तेही

आज पाटीदार, मराठा, ब्राह्मण, जाट इत्यादी सर्वांना आरक्षण हवे आहे. याला कारण मागासवर्गीय समाजाची डोळ्यात भरणारी प्रगती आहे. त्याच्या सामाजिक स्तरात कमालीची झालेली भरभराट आहे. यावर अनेक संशोधने करावीत आणि या सामाजिक परिवर्तनाचा शोध घ्यावा, असे हा बदल आहे. या बदलासाठी फक्त आरक्षण हा एकच भाग कारणीभूत आहे, असे म्हणणे योग्य होणार नाही. तर त्या पाठीमागे जो विचार आहे. तो विचार समजून घेण्याची गरज आहे असे दिसून येते.

´ चाकरी आम्हा नको अन् भीकही आम्हा नको
न्याय हक्काचा शिरावर ताज आम्ही मागतो
भोवती धर्मांधतेचा कहर क्रूर होता,
धम्मधारी पावलांचा विनय पाहिला मीश्श

भगवान बुद्धांची मानवतावादी मूल्ये आणि डॉ. बाबासाहेबांचा क्रांतिसन्मुख विचार हाच खऱ्या अर्थाने मागासलेल्या समाजाच्या उत्थानाचा केंद्रबिंदू आहे. या बाबींकडे आरक्षण मागणाऱ्या समाजाने दुर्लक्ष करून चालणार नाही. या सर्व विचाराला आत्मसात केल्यामुळेच या समाजाची प्रगती होणे शक्य झालेले आहे. १९५० पासून संविधानिक भारत म्हणून एक नवी ओळख निर्माण झाली. आधीची मनूशाही, ठोकशाही, पेशवाई, राजेशाहीतील हुकूमशाही जावून लोकशाही आली. लोकशाहीच्या भवितव्याची जबाबदारी आपण भारतीय लोक म्हणून स्वीकारली. सर्वांना समान दर्जाची समान संधी प्राप्त व्हावी, राजकिय लोकशाहीतून सामाजिक लोकशाही प्रस्थापित व्हावी. जाती-धर्म विरहित एक

धर्मनिरपेक्ष भारत निर्माण व्हावा, ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धारणा होती. पण प्रत्यक्षात लोकशाहीतील लोकांच्या मनोभूमिकेमध्ये परिवर्तन झाले नाही तर मात्र हे सर्व कुचकामी ठरेल, असा धोका ही त्यांनी नोंदवून ठेवला होता.

मातीत जगतो मी, मातीत राब राबुन, माझ्याच जीवनाचा होतो कसा उकंडा
´राहू दे तुझ्याकडेच त्या हिटलरची मूर्ख तत्वे, बुद्धाची होती ती लोकशाही
मागतो आम्ही

मातीत राबणाऱ्या शेतकऱ्यांना अस्मानी संकट जसे छळते तसेच सुलतानी संकटही छळत असेल तर शेतकऱ्यांच्या जीवनाचा उकंडा होणे निश्चित आहे. तेव्हा मानवतेचे शासन म्हणून ज्या लोकशाहीचा एवढ्या मोठ्याप्रमाणात उदो उदो करण्यात येतो, त्या लोकशाहीला दोश दिला जातो. तसे पाहिले तर हा दोश लोकशाहीचा नसून, ती राबवणाऱ्या माणसांचा आहे. ती राबवणारी माणसे चांगल्या विचारांची असतील तर ते राज्य चांगल्या मूल्यांवर चालेल. निरपेक्ष लोकशाही देऊन भारताला पाया समानतेचा रचनास भीमराया डॉ. आंबेडकर हे एक नाव नसून, तो आता एक विचार झाला आहे. आणि डॉ. बाबासाहेबांचे नाव कोण्या विशिष्ट जातीचे वा धर्माचे नाही. तर ते एक वैश्विक विचारवंत आहेत. ते महापुरूष आहेत. आणि महापुरूष हा सर्वांचा असतो. नाव घेऊन फक्त चालत नाही. त्यांचे विचारही आचारात आणणे तितकेच महत्वाचे असते. त्यामुळे जातीने वा धर्माने बाबासाहेबांचे स्वत:ला समजणाऱ्या महाभागांचीही गझलेतून कानउघाडणी केलेली दिसते.ष्मुक्त केले काल ज्यांना गीत गाण्या क्रांतिचे का गुलामी सापळ्याचे लोक झाले सोबती बाबा तुझी कमाई लोभात हारणारे ते कालचे जुवारी होते तसेच दिसती आंबेडकरी विचार नास्तिक विचार नाहीत तर श्रद्धापूर्वक आस्तिक विचार आहेत. पण ही श्रद्धा डोळस आहे. परंपरेने, रूढीने चालत आलेल्या गोष्टी जशाच्या तशा स्वीकारीत नाही. आपल्या विवेकाच्या कसोटीवर वैज्ञानिक दृष्टिकोनातून पडताळून पाहिल्या जातात. माणसाचे कल्याण, माणसाची समृद्धी हा या विचाराचा केंद्रबिंद आहे. मूर्ती पूजा कोणाची? आणि कशाची? अशी चिकित्सा करण्याचे स्वातंत्र्य या विचाराने दिले आहे. म्हणून गौरवकुमार आठवले म्हणतात

पांगळ्यांना मानतो मी देव माझा, व्यर्थ पाशाणास ओवाळीत नाही
चालणाऱ्यांना दिला मी हात माझा, पाय त्यांचे मी कधी ओढीत नाही

जीवन जगताना सकारात्मक विचारांची फार गरज असते. म्हणून आपल्या आदर्शाच्या व्यक्तिमत्वातून आपल्याला सकारात्मकतेची प्रेरणा मिळत असते. तीच प्रेरणा घेवून कवी येथे व्यक्त होतो आहे. डॉ. बाबासाहेबांनी पुराणातील आदशांना नाकारून सिद्धार्थ गौतमाच्या नैतिकतेच्या आदर्शाचा स्वीकार केला. ज्यांनी चार्तुवर्ण्य व्यवस्था नाकारली. यक्षपूजा कर्मकांड असून, ती चुकीचा आदर्श समाजासमोर ठ्ठेवते आहे. म्हणून त्यांनी प्राणी हिंसा, दुसऱ्याची वस्तू हिसकावून घेणे, चारित्र्य संपन्न जीवन जगणे, मिथ्या वचन न करणे, मानवाचे मानसिक संतुलन बिघडवणारे नशापान न करणे अशा पंचशीलाच्या मार्गाला आदर्श समाजाच्या निर्मितीसाठी योग्य ठरवले होते. यामध्ये कोणतेही कर्मकांड वा चमत्कारादी प्रकार नसून, पूर्णतरू लौकिक आणि वास्तववादी विचारातून माणसाच्या जीवनामध्ये सुखाची प्राप्ती होवू शकते.

हा देह जरी तृष्णेच्या ज्वालांनी व्याकुळ झाला बुद्धाच्या उपदेशाने तृष्णेला विझवत असतो. ज्यांच्या मुखी भीम ज्यांच्या मनी बुद्ध त्यांच्या उरी काळ घेतोय

आकार आंबेडकरवादी गझल मराठी गझलसृष्टीला नवा विचार देणारी गझल आहे. चळवळीचा बाज, इहवादी जीवनाचा साज आणि बुद्धिप्रामाण्यवादी आणि विज्ञानवादी आगाज असणारी गझल आहे..

सत्यास वर्तनारा ठरतो विचार द्रोही
धोक्यात लोकशाही... शंकाच उगीच नाही

वास्तवात निर्माण झालेल्या परिस्थितीवर भाष्य करताना कवी म्हणतात अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी होत आहे. देशभक्तीचे स्वरूप बदलते आहे. सोईच्या विचारांना राष्ट्रवादी आणि विरोधी विचारांना राष्ट्रद्रोही ठरविले जात आहे. अशा वातावरणात लोकशाही धोक्यात आल्याची शंका उगीच येत नाही तर जाहली ही लोकशाही बघ कशी घायाळ मित्रा पेशवाईचाच आला तर नव्हे हा काळ मित्रा हा विचार इतर जाणिवांपेक्षा दाहक आहे. समाज आणि देश हिताचा आहे. आता देशसेवा करावयाची असेल तर एकमेव मार्ग शिल्लक राहिलेला आहे आणि तो म्हणजे लोकशाही टिकवण्याचा तिचे संरक्षण करण्याचा. आंबेडकरी विचार, वादा करिता बाद म्हणून कधीच येत नाही तर सर्वसामान्यांच्या यातनांचा गोषवारा घेवून येतो. भोगलेल्या यातनांचा गोषवारा सर्व हा व्यर्थ नाही मांडिला वादाकरीता वाद मी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार कक्षेतून वंचित असे कुठलेही क्षेत्र नाही. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, स्त्रीमुक्ती, सांस्कृतिक, जल, जमीन इत्यादी संबंधी त्यांनी मौलिक विचार व्यक्त केलेले आहेत. ते आजच्या परिप्रेक्ष्यातही तंतोतंत लागू पडणारे आहे. ही डॉ. बाबासाहेबांच्या विचारांची कालातितता आहे. मराठी गझलेमध्ये आद्य आंबेडकरी गझलेचीही उपेक्षाच झालेली आहे. त्याचे कारण कदाचित मुसलसल गझल म्हणून ती दुर्लक्षित राहिली असावी, असा तर्क करता येतो. परंतु सुरेश भटांनंतरच्या मराठी गझलेमध्ये आंबेडकरवादी गझल गैरमुसलसल अशी अस्सल आकृतीबंधासह आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगाने मराठीचे गझलक्षेत्र समृद्ध करणारी ठरली आहे. तिची संवादी भाषाशैली, प्रतिमा, प्रतिकांचे वेगळेपण लक्ष वेधून घेणारे ठरले आहे.

राख झाल्या झोपड्यांची राख सांभाळून येथे
न्याय समतेचे मनोरे बांधते माझी गझल

संदर्भ

1. *सांगोलेकर डॉ. अविनाश, गझलचिंतन, सायन पब्लिकेशन्स,पुणे, प्र.आ. २०१७, प१४३*
2. *मनोहर डॉ.सर्जनादित्य, आंबेडकरवादी गझलेतील नक्षत्रमुद्रा, आंबेडकरवादी गझलवेध, संपादक, प्रमोद वाळके/शरज शेजवळ, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, प्र.आ. २०१८, पृ.१६३*
3. *सांगोलेकर डॉ. अविनाश, गझलचिंतन, सायन पब्लिकेषन्स, पुणे, प्र.आ. २०१७, प१५१*
4. *काळे डॉ. अक्षयकुमार, सुरेश भटांची गझल एक संवाद, अन् उदेला एक तारा वेगळा, संपा. डॉ. राम पंडित बांधण प्रतिष्ठन मुंबई.प्र.आ. २०११, प२००*
5. *मनोहर यशवंत, आंबेडकरवादी गझलेचे सौंदर्यशास्त्र, आंबेडकर वादी गझलवेध, संपादक, प्रमोद वाळके*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

भारतीय शेतमजूर : एक अभ्यास

प्रा. डॉ. सुरेश बन्सपाल
समर्थ महाविद्यालय, लाखनी जि.भंडारा (म.रा.)

★★★

गोषवारा – भारतातील ग्रामीण भागात शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. बहुसंख्य लोक षेतीवर अवलंबून असतात. परंतु सर्वांकडे शेती करीता जमीन उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे अनेकांजवळ असणारी जमीन ही त्यांना पुरेसे जीवनमान प्राप्त करून देत नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील बहुसंख्य लोकांना शेतमजूर म्हणून काम करण्याशिवाय पर्याय नसतो. शेतमजूरांचे विविध गट पडतात. जसे भूमिहीन शेतमजूर जे कोणत्याही एका विशिष्ट जमीनदाराशी बांधलेले नसतात. परंतू ते इतरांकरीता आपले श्रम देत असतात. स्वतःची जमीन असणारे परंतू त्यामधून पुरेसे उत्पन्न प्राप्त होत नसल्याने इतरांच्या जमिनीवर काम करणारे, स्वतःजवळ जमीन असणारे परंतु कुटुंबातील सदस्यसंख्या जास्त असल्याने इतरांच्या शेतावर काम करावे लागणारे शेतमजूर असतात. यापैकी भूमिहीन शेतकरी अत्यंत हालाखीचे जीवन जगत आहेत. ग्रामीण भागातील बेकारी कमी करण्याकरिता सरकारने अनेक योजना राबविल्या आहेत. जसे कामाच्या बदली धान्य योजना, महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार, एकात्मिक ग्रामीण विकास योजना, इत्यादी या योजनांद्वारे ग्रामीण भागातील दारिद्रय रेशेखाली जीवन जगणाऱ्या शेतमजूरांना मोठया प्रमाणावर लाभ झालेला आहे.

प्रस्तावना :– शेती व्यवसाय हा अत्यंत पुरातन असा व्यवसाय आहे. शेती व्यवसायाने मानवाला प्रारंभिक अवस्थेत जीवनमान व स्थैर्य प्राप्त करून दिले आहे. मानवाची अन्नधान्याची गरज शेती कडूनच पूर्ण करण्यात येते. भारतासारख्या विकसनशील आणि अमेरिका, जपान यासारख्या विकसित देशांतदेखील शेती व्यवसायाला विकासाच्या प्राथमिक अवस्थेत महत्वाचे स्थान होते. जसजषी अर्थव्यवस्था विकसीत होत जाते, तसतसा शेती व्यवसायाचा एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी होत जातो. भारतीय अर्थव्यवस्था विकसनशील अर्थव्यवस्था असल्याने एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीक्षेत्राचा वाटा अद्यापही मोठा असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागात प्रमुख व्यवसाय शेती असला तरी तो सर्व लोकांना रोजगार देऊ शकत नाही. ग्रामीण भागामध्ये जशी अल्पभूधारकांची संख्या सुध्दा मोठी आहे. त्याचप्रमाणे स्वतःजवळ काहीच जमीन नसणारे व स्वतःजवळील जमिनीमधून पुरेसे उत्पादनमान, उत्पन्न प्राप्त होवू न शकणाऱ्या लोकांची संख्या सुध्दा मोठी आहे. अशा लोकांना मात्र दुसऱ्याच्या शेतावर काम करणेच एवढाच पर्याय उपलब्ध असतो. ग्रामीण भागात शेतमजूर म्हणून करणारे व शहरी भागात मजूर, श्रमिक म्हणून काम करणारे हया दोहांमध्ये फरक असल्याचे दिसून येते. शहरी भागामधील मजुरांना व्यवसायाशी संबंधित असणारे ज्ञान, कौषल्य प्राप्त झालेले असते. ग्रामीण भागातील मजूरांना मात्र तशा प्रकारची संधी उपलब्ध होऊ शकत नाही.

संशोधन पध्दती :– या शोध निबंधाकरिता प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. भेटी व निरिक्षण नोंदविण्यात आले आहे. टी.व्ही वरील कार्यक्रम, वर्तमानपत्रे यांच्या आधारे शोध निबंध लिहिण्यात आला आहे.

उद्देश :–

1) शेतमजूर स्वतःची जमीन नसल्यामुळे विशिष्ट जमीनदाराशी बांधील राहतात काय याचा अभ्यास केला आहे.
2) शेतमजूराची जमीन सावकाराने ताब्यात घेतल्यावर शेतकऱ्याला शेतमजूर म्हणून काम करण्याशिवाय पर्याय नसतो याचा अभ्यास केला आहे.
3) शेतीची उत्पादन क्षमतेत वाढ नसल्यामुळे दुसऱ्याच्या शेतावर शेतमजूर म्हणून काम करण्याशिवाय पर्याय नसतो याचा अभ्यास केला आहे.
4) लोकसंख्या वाढीमुळे जमिनीचे मोठया प्रमाणावर तुकडीकरण झालेले असल्याने जमिनीच्या लहान तुकडयातून पुरेसे उत्पादन घेणे अवघड बनते. त्यामुळे अधिक उत्पन्न मिळविण्याकरीता शेतमजूर म्हणून काम करतो. याचा अभ्यास केला आहे.

गृहितके :–

1) शेतमजूर जमीनदाराशी बांधील असतात.
2) शेतजमिन सावकाराकडे गहान असल्याने शेतमजूर म्हणून काम करतात.
3) शेतीची उत्पादन क्षमता कमी असल्यामुळे दुसऱ्याकडे शेतमजूर म्हणून काम करतात.
4) भाऊ हिश्यामुळे जमिनीचे लहान तुकडे झाल्यामुळे शेतमजूर म्हणून काम करतात.
5) अधिक उत्पन्न मिळविण्याकरीता शेतमजूर म्हणून काम करतात.

शेतमजूरांचे वर्गीकरण :– शेतमजूरांचे वर्गीकरण पुढील प्रमाणे

1) भूमिहीन शेतमजूर :– ज्या शेतमजूरांकडे त्यांच्या मालकीची जमीन नसते त्यांना भूमिहीन षेतमजूर असे म्हणतात. भूमिहीन

शेतमजूर जे जमिनदाराशी, त्याच्या षेतावर काम करण्याकरीता बांधील असतात.

2) व्यक्तिशः स्वतंत्र भूमिहीन शेतमजूर :– भूमिहीन शेतमजूर जे व्यक्तिशः स्वतंत्र असतात परंतू इतरांकरीता ते आपले श्रम देत असतात. म्हणजेच या वर्गातील शेतमजूर कोणत्याही एका जमीनादारांशी बांधेले नसतात.

3) गरीब शेतमजूर :– ज्याशेतकऱ्याजवळ जमिनीचा लहानसा तुकडा असतो. पण त्यांना त्यामधून पुरेसे उत्पन्न उपलब्ध होत नसल्यामुळे इतर शेतकऱ्याकडे काम करतात.

4) कुटुंब संख्या जास्त असणारे शेतमजूर :– स्वतःजवळ शेती असणारे म्हणजेच आपल्या जवळील जमिनीतून पुरेसे उत्पन्न प्राप्त होऊ शकणारे ष्शेतकरी, परंतु कुटुंबावर अवलंबून राहणाऱ्या सदस्यांची संख्या मोठी असणारे व इतर मोठया षेतकऱ्यांकडे काम करणारे षेतकरी

शेतमजूरांची सद्यःस्थिती :– भूमिहीन षेतमजूरांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. दारिद्रयाची आहे. भूमिहीन शेतमजूर गुलामांप्रमाणे आपले जीवन जगत असतात. त्यांना आपली मजूरी पैशाच्या स्वरूपात न मिळता वस्तूंच्या स्वरूपात जसे धान्य, कपउे, राहण्याकरीता षेतावर तात्पुरती जागा इत्यादीच्या स्वरूपाची प्राप्त होते. भूमिहीन षेतमजूर एका विशिष्ठ जमीनदारास किंवा मालकास बांधील असतात. त्यामुळे त्याला सोडून इतर कोणाकडे काम करण्याचे स्वातंत्र्य त्याला नसते. आपल्या मालकास खूष ठेवण्याकरीता काही भेटवस्तू त्यांना मालकास द्याव्या लागतात. ग्रामीण भागातील शेतमजूरांपैकी भूमिहीन शेतमजूरांची स्थिती अत्यंत दयनीय आहे.

शेतमजूरांची संख्येतील वाढीची कारणे :–

1) शेतीवर लोकसंख्येचा अधिक भार पडणे, घरातील धार्मिक कार्ये, अनुत्पादक कामे, यासारख्या विविध कार्याकरीता शेतकरी मोठया प्रमाणावर सावकारांकडून कर्जे घेत असतात. अनेकदा हे कर्जे फेडणे शेतकऱ्याच्या आवाक्याबाहेरचे असते. कर्ज सहज प्राप्त होत असल्यामुळे कर्ज घेण्याची त्यांची वृती वाढीस लागते. सावकार कर्जावर व्याजसुध्दा जास्त लावतात अशा परिस्थित कर्जफेडणे शक्य होत नाही. तारण म्हणून ठेवण्यात आलेली शेती सावकार आपल्या ताब्यात घेतो. त्यामुळे शेतकऱ्याला शेतमजूर म्हणून काम करण्याषिवाय पर्याय नसतो.

2) शेतीच्या उत्पादन वाढीकरीता मुबलक पाणीव्यवस्था, खते, बी–बियाण्यांचा पुरेशा प्रमाणात पुरवठा, त्याचबरोबर वित्तपुरवठा असणे आवश्यक असते. भारतात या सुविधा पुरेशा प्रमाणात नसल्यामुळे उत्पादनात वाढ होणे शक्य नसते. त्याचा परिणाम म्हणून शेतकऱ्याला षेतमजूर म्हणून काम करण्याशिवाय पर्याय नसतो.

3) कुटुंबातील संख्या वाढत असल्यामुळे जमिनीचे मोठया प्रमाणावर तुकडीकरण झालेले असल्याने, जमिनीच्या लहान तुकडयामध्ुन पुरेसे उत्पादन घेणे अवघड असते. परिणामी घरच्या गरजा भागविण्याकरीता व अधिक उत्पन्न मिळविण्याकरीता शेतकऱ्याला शेतमजूर म्हणून काम करण्या शिवाय दुसरा पर्याय नसतो.

निष्कर्ष :– भारतीय शेतमजूरांचा अभ्यास केला असता खालील निष्कर्श आढळून आलेत.

1) भूमिहीन शेतमजूर मालकी जमीन नसल्यामुळे जमीनदारंषी बांधील असतात.

2) घरातील धार्मिक कार्ये, अनुत्पादक कामे यासारख्या विविध कार्याकरीता शेतकरी मोठया प्रमाणावर सावकाराकडून कर्ज घेत असतात. कर्जे फेडू न सकल्यामुळे शेतजमीन सावकाराकडे गहाण ठेवीवी लागते. त्यामुळे शेतकरी षेतमजूर म्हणून काम करतात.

3) पाणीव्यवस्था, खते, बी–बियाणांचा पुरेशा पुरवठा, वित पुरवठा नसल्यामुळे षेतीची उत्पादक्षमता कमी होते. त्यामुळे शेतकऱ्याला दुसऱ्याकडे शेतमजूर म्हणून काम करावे लागते.

4) कुटुंबातील संख्या वाढल्यामुळे भाऊ हिष्षे होतात. त्यामुळे जमिनीचे लहान–लहान होतात तुकडे त्यामुळे शेतकऱ्याला शेतमजूर म्हणून काम करावे लागते.

5) जमिनीचे लहान तुकडयामुळे घरच्या गरजा भागविण्याकरीता व अधिक उत्पन्न मिळविण्याकरीता शेतमजूर म्हणून काम करतात.

संदर्भ :–

1. *अतकरे, प्रकाश.2002. भारताचा आर्थिक विकास,*
2. *नाशिक कुलसचिव यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, पृ शर्मा एंव सिंह, भारत का आर्थिक विकास आगराः साहित्यावन*
3. *वर्तमानपत्रे*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

महात्मा गांधीच्या विचाराची प्रस्तुतता

डॉ.नामदेव बाबुराव डोंगरे
डॉ.तात्यासाहेब नातू कला व वाणिज्य महाविद्यालय,
मार्गताम्हाने ता.चिपळूण जिल्हा रत्नागिरी

★★★

निष्कर्ष महात्मा गांधी हे एक अध्यात्मवादी व आदर्शवादी विचारवंत होते.सत्य व अहिंसेच्या बळावर त्यानी उच्च आदर्शाची समाजामध्ये जोपासना केली.देशाने आज वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये प्रगती केली तरीही महात्मा गांधीजीनी सांगीतलेल्या सत्य आणि अहिंसेच्या मार्गावरूनच प्रत्येकाला वाटचाल करावी लागेल. महात्मा गांधी यांचा जन्म दिवस संपूर्ण जगामध्ये आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस म्हणून साजरा केला जातो. यावरून गांधीजीचे विचार संपूर्ण मानवजातीसाठी प्रस्तुत आहेत.त्यामुळे जगाला गांधींजीच्या विचारानेच मार्गाक्रमन करावे लागेल. ामलूवतकरू सत्त्य, अहिंसा, अध्यात्म, ईश्वर, प्रस्तुतता, मानवता

प्रस्तावना– सत्य आणि अहिंसा या मानवी मुल्याची संपूर्ण जगाला देण देणारे महात्मा गांधी हे एक आदर्ष व अध्यात्मवादी पुरुश होते. ते मानवतावादी विचारवंत होते. धर्म आणि राजकारन याला दृश्टी दिली.आई–वडीलंच्य धार्मिक विचारांचा प्रभाव सुरवातीपासुन त्यंच्यवर पडला होता.गांधीजीवर गीता या हिंदु धर्मातील ग्रंथाचा सर्वात अध ीक प्रभाव पडला होता.गीतेला ते आपला मार्गदर्शक मानत होते. संकटकालात गीतेनेच माझे मार्गदर्शन केले आहे असे गांधीजीनी म्हटले आहे. गीतेप्रमानेच रामायंण,महाभारत आणि बौद्ध धर्मातील ग्रंथाचा प्रभाव पडला होता अहिंसक विचाराचे शिक्षन त्यांना बायबल या ग्रंथातुन मिळाले.

येशु ख्रिस्ताचे पुढील वाक्य त्यांच्या मनावर बिंबले होते देवा, त्यांना क्षमा कर,कारन ते काय करतात ह्यांची त्यांना जाणीव नाही.गांध ींजीच्या नेतीकने व राजकीय विचारावर जॉनरस्किन रस्किन डेव्हिड थुरो,टोलस्टोय ई.विचारांचा प्रभाव पडला आहे. न्द जव जेम स्रेंज ह्या पुस्तकाने त्यांच्या जीवनाला नवे वळण दिले. ह्या विचारातुन श्रमाला जीवनात महत्त्वाचे स्थान दिले.रामचंद्रजी ह्या समाजसुधारक कवीचाही प्रभाव गांधीजीच्या नेतिक व धार्मिक जीवनार झाला होता.याशिवाय गांधीजिंच्या काळात भारतात जी राजकीय परीस्थिती होती तीचा प्रभाव गांधीजीवर पडला होता.पारतंत्र्य व दारीद्रय ह्यानी त्यांच्या विचाराला चालना दिली. सत्य व अहिंसा हा त्यांच्या विचारांचा पाया होता.०यक्ती व समाजाला ते नेतिक बनवू इच्छित होते.त्यासाठी त्यांनी ही दोन तत्वे महत्त्वाची मानली.त्यांच्या मते सत्य व अहिंसा एक दूसरयाला पूरक आहेत.सत्याशिवाय कोणतेही तत्व पुर्ण होत नाही.

संशोधन पद्धती– प्रस्तुत संषोधन पेपर संदर्भ ग्रंथाच्या आधारे तयार करण्यात आला आहे. महात्मा गांधीजिंच्या राजकीय विचारांचा आधार सत्य हे तत्व आहे.सत्य हे त्यांनी साध्य मानले होते.अहिंसा या साधनाद्वारे सत्य साध्य करता येते. अशी त्यांची धारना होती.सत्याशिवाय कोणतेही तत्व पूर्ण नाही,असे स्पस्ट करून त्यांनी सत्त्याचे सापेक्ष सत्य आणि निरपेक्ष सत्य असे दोन प्रकार सांगीतले आहेत.सापेक्ष सत्याची कल्पना ही परिस्थितीनुसार बदलत असते. सापेक्ष सत्याच्या साहाय्याने ०यक्ती निरपेक्ष सत्याकडे जाते.निरपेक्ष सत्य म्हणजे सत्त,चीत्त व आनंद यांचा सुंदर समन्वय होय.निरपेक्ष सत्य म्हणजे ईष्वर होय. गांधीजिंच्या मते,निरपेक्ष सत्य हे श्रेष्ठ दर्जाचे सत्य असते.ते प्राप्त करन्ह्यासाठी सापेक्ष सत्त्याचा मार्ग स्वीकारावा लागतो.गांधींजीच्या मते, सत्य, प्रेम, आत्मबलिदान,बंधुत्व याद्वारे निरपेक्ष सत्य प्राप्त करता येते. गांधींजीनी सत्याचे प्रयोग या आत्मचरीत्रात सत्त्याची महती वर्णीलेली आहे.गांधीजीच्या मते सत्त्यामध्ये न्यायाचा अंतर्भाव असतो.अधर्म व अन्याय दूर करन्याचे सामर्थ्य सत्त्यामध्ये असते. सद्या परीस्थितीमध्ये भोतिक सुख प्राप्त करण्यासाठी मानव असत्त्य व अनेतिक मार्गाचा अवलंब करत आहे.गांधीजीनी सत्त्याचे महत्व विशद करताना सहस्र सूर्य एकत्र केले तरीही यावरून देनंदिन मानवी जीवनामध्ये सत्त्याचे महत्व अधोरेखित होते.

सत्त्याप्रमानेच गांधीजीनी आपल्या तत्त्वज्ञानात अहिंसा या तत्वाला अतिषय महत्व दिले आहे.गांधीजीच्या मते अहिंसेच्या मार्गानेच सत्त्य प्राप्त करता येते.सत्त्य व अहिंसा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.कारण सत्त्य व अहिंसा एकमेकापासून अलग करणे कठीण असते.पष्ठ्वीच्या पाठीवरील कोणत्याही वस्तुमात्राला व प्राणिमात्राला विचाराने,शब्दाने वा कृत्याने संभवनारी दुखापत टाळने अशी अहिंसेची ०याख्या हरिजन मधील एका लेखात केली आहे.अहींसेला ते आत्मिक शक्ती म्हणतात.गांधीजीच्या मते अहिंसेचे कार्य केवळ नकारात्मक नाही तर सकारात्मक आहे.त्यांच्या मते परीपूर्ण अहिंसा ही केवळ ईष्वरालाच साध्य होवू शकते मनुष्य मात्र हा संपूर्णपणे अहिंसक होऊच शविचाकत नाही.गांधींजिंच्या विचाररची प्रस्तुतता अधोरेखित करताना श्री.मोहन धारीया म्हणतात. गांधींजिची हत्या एका माथेफिरूने केली, असे आपण म्हणतो,पण त्यांच्या विचारांची हत्या आपण सर्वानी केली. यावरून गांधींजिंच्या विचाराची प्रस्तुतता २१ ०या शतककातही अधोरेखित होते.आज दहषतवादाचा प्रश्न संपूर्ण जगाला भेडसावत आहे. दहशतवादामुळे अनेक निष्पापांचे जिव जात असुन जागतिक शांतता धोक्यामध्ये आलेली आहे. अशावेळी महात्मा गांधी यांनी सांगीतलेला ०यापक अहिंसेचा अर्थ सर्वानी घेतल्यास जगामध्ये

षांतता नांदेल.व हिंसाचार थांबण्यास मदत होऊ षकते.मानवी अपरीपूर्णतेमुळे काही ठिकाणी हिंसा अटळ असते. पण गांधींजिंच्या तत्वज्ञानात हिंसेला अजिबात थारा नाही.यावरून गांधींजिंच्या अहिंसारुपी तत्वज्ञान जगाला किती उपयुक्त आहे हे गांधीजिंनी जगाला प्रेम आणि मानवतेची षिकवन दिली.प्रेमषक्ती ही आत्मषक्ती किंवा सत्यषक्तीसारखीच आहे.ती षक्ती नसेल तर जग नश्ट होईल. सत्य अहिंसा या बलाढय निषस्त्र साधनाद्वारे प्रेम व मानवतेच्या आध ाारे गांधीजिनी संपूर्ण जगाला मानवतेची षिकवन दिली. यामुळे गांध ीविचार आजही उपयुक्त आहे. गांधीजिंनी सांगीतलेल्या विचाराषिवाय जगाला पर्याय नाही. २१ ०या शतकात ज्या अनेकविध समष्या निर्माण झाल्या आहेत.त्या वेगवेगळ्या समष्यावर गांधीविचार हेच उत्तर आहे. गांधीजीनी संपूर्ण आयुष्यभर सर्वधर्म समभाव जोपासला. भारताची फाळणी होउन धर्माच्या आधारावर दोन स्वतंत्र राष्ट्रे उदयाला आली. गांधीजिनी शेवटच्या क्षनापर्यंत फाळणीला विरोध केला पण त्यांना त्यात यश आले नाही.नोखालीतल्या हिंसेच्या तांडवाने गांध ीजिंच र्‍हद्या वेदनेने अक्षरषः कळवळून गेल. नोखालीतल्या महिलांचे हंबरडे मला बोलावत आहेत. माझ्या अहिंसेची परिक्षा आता नोखालीतच होणार आहे. दुखितांचे दुखं निवारण झाल्याषिवाय मी नोखालीतुन हलनार नाही.त्यात मला मृत्त्यू आला तरी चालेल,पण पराभूत होउन मी परतनार नाही. अशी प्रतीज्ञा करून गांधीजी नोखालीला निघाले. नोखालीच्या शांतीयात्रेत गांधीजिनी रात्रीचा मुकाम गरीबांच्या झोपडित केला. हिंदु–मुसलमानाच्या घरात राहिले हरिजन, कुंभार ,विणकर ,शेतकरी, ब्राह्मण, नाहवी, वाणी, लोहार अशा अनेकाच्या कुटुंबात राहिले. गांधीजीच्या अथक प्रयत्नामुळे नोखाली पुन्हा एकजिव होण्यास मदत झाली.

समारोप – भारतासारख्या विशाल लोकसंख्या असलेल्या देशात विविध धर्माचे लोक वास्तव्य करतात.देशामध्ये खर्‍या अर्थाने बंधुभावाची जोपासना करायची असेल तर गांधीजीनी सांगीतलेल्या सत्त्य आणि अहिंसेच्या मार्गावरून प्रतेकाला वाटचाल करावी लागेल. गांधीजीचे विचार संपूर्ण मानवजातीसाठी प्रस्तुत आहेत.जगाला गांध ीजीच्या विचारानेच मार्गाक्रमन करावे लागेल.

संदर्भग्रंथ सुची

१. भारतीय राजकीय विचारवंत,श्रीकांत वी.देशपांडे पष्ठ क्र. ३०,श्री.मंगेष प्रकाषन,नागपूर,प्रथम आवष्ती.

२. भारतीय राजकीय विचार,प्रा.पाटील बी.बी.,सो.चव्हाण ऊर्मिला, पष्ठ क्र.६७,फडके प्रकाषन,कोल्हापूर.

३. आधुनिक भारतातील राजकीय,डॉ.भोळे भास्कर लक्ष्मण, पष्ठ क्र.४७०,पिंपळापुर – कंमपब्लषर,नागपूर.

४. लोकराज्य, ऑक्टोबर २०१०, पृष्ठ क्र.१८,महात्मा माणुसकीची मषाल,माहिती व जनसंपर्क महासंचानलाय,महाराश्ट्र षासन.

५. शोध महात्मा गांधीचा,सारथी अरुण,खंड एक, पृ क्र.५१२.

६. अज्ञात गांधी,देसाई नारायणभाई पृष्ठ क्र.५१२.

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

तथागत गौतम बुद्धांचा आर्य आष्टांगिक मार्ग व त्यांचे सामाजिक महत्त्व

प्रा व्ही एन कांबळे
पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग प्रमुख
फुलसिंग नाईक महाविद्यालय,
पुसद जिल्हा यवतमाळ

★★★

प्रस्तावना – बौद्ध धर्माच्या तत्वज्ञानाचा मूळ गाभा, केंद्रस्थानी असणारी चार आर्य सत्ये व अष्टांगिक मार्ग हे दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, पहिल्या तीन आर्यसत्यात उपदेशाचा तात्विक भाग असून चौथ्या आर्यसत्याचा आधारस्तंभ आर्य अष्टांगिक मार्ग आहे, म्हणून च या दोन्ही संकल्पनाना बौद्ध धर्मात महत्वाचे स्थान आहे,परत परत उत्पन्न होणारी तृष्णा ही दुःखाची जननी होय, अशा या तृष्णेचा नाश झाला की सर्व दुःखाचा नाश होतो, व्यक्ती जन्म मृत्यू च्या चक्रातून सुटते व सत्याचा मार्ग ज्ञात होऊन निर्वाण पदास पोहचते, दुःख तृष्णेपासून उत्पन्न होते, म्हणून त्याला विरोध ही आहे केवळ त्यासाठी खडतर तपृचर्या, शारीरिक क्लेश, देहदंड, कर्मकांड यांची आवश्यकता नसून सर्वसामान्यांना आचार ता येईल असा मार्ग गौतम बुद्धांनी सांगितला तो म्हणजे आर्य अष्टांगिक मार्ग होय. दैनंदिन जीवनात वागण्याचा आचारधर्म या आठ मार्गाद्वारे सांगितला आहे यालाच मध्यम प्रतिपदा असेही म्हणतात,या आर्य अष्टांगिक मार्गाबरोबरच अष्टविध कुमार्ग देखील गौतम बुद्धांनी सांगितले ते असे–मिथ्या श्रद्धा, मिथ्या निष्चय, मिथ्या वाणी, मिथ्या कृती, मिथ्या जीवन, मिथ्या प्रयत्न, मिथ्या विचार, मिथ्या समाधी,जी व्यक्ती कुमार्गाचा त्याग करून सुख, कल्याण, निर्वाण मिळविण्याचा प्रयत्न करते ती व्यक्ती आर्य अष्टांगिक मार्गाचाच अवलंब करते,

अष्टांगिक मार्ग–आर्य अश्टांगिक मार्गातील आठ मार्ग हे जसे दिशा दर्शक आहेत त्याचप्रमाणे सद्गुणांचे भांडार ही आहेत, पहिला मार्ग सम्यक दृश्टी हा दर्षन मार्ग आहे व यावरच या सातही मार्गाची उभारणी झालेली आहे, दैनंदिन व्यवहारात व्यक्तीने सदाचाराने वागण्यासाठी प्रथम त्याच्याजवळ यथार्थ, वास्तव दृष्टी असणे आवश्यक असते, तरच व्यक्ती सदाचाराने वागू शकतो, रेल्वेच्या इंजिनाप्रमाणे श्सम्यक दृष्टीष्हा मार्ग आहे, इंजिनामागिल सात डब्बे म्हणजे च आर्यसपृ मार्ग होय,

१) सम्यक दृष्टी–आर्य अष्टांगिक मार्गातील अग्रस्थानी असणारा हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे, यावरच इतर मार्गाचे अस्तित्व अवलंबून आहे यथा दृष्टी तथा सृष्टीष्या तत्वानुसार माणसाने आपली दृष्टी यथार्थ ठेवणे आवश्यक आहे, जे जे वास्तव आहे, ज्याची कारणमीमांसा स्पष्ट करता येते हे जाणून घेणे म्हणजे सम्यक दृष्टी होय,यामध्ये सत्य जाणणे,सद्सद्विवेक बुद्धी चा विकास झाल्याने विष्वातील मिथ्या बाबीकडे व्यक्ती दुर्लक्ष करू शकतो, अदभूत, चमत्कारिक कल्पनांचा त्याग करू शकतो, कर्मकांड, काल्पनिक दिव्यशक्ती, दैव या सर्वाचा त्याग करते, विष्वात घडणारी कोणतीही घटना दैवी शक्तीच्या कृपेने अथवा अवकृपेने घडत नसून ती निसर्ग नियमानुसारच घडते असे मानणे म्हणजेच सम्यक दृष्टी होय,कोणत्याही दबावाखाली न येता स्वतंत्र रित्या वास्तविकता जाणून घेण्याची वत्ती यामुळेच वाढू शकते,

२) सम्यक संकल्प– योग्य गोषटी करण्याचा श्चिय किंवा शुद्ध विचार विकसित करणे म्हणजे सम्यक संकल्प होय, अर्थात हे मानसिक स्वरूपाचे कार्य आहे, जेव्हा व्यक्ती ची दृष्टी यथार्थ बनते तेंव्हा योग्य विचार, योग्य हेतू, योग्य आकांक्षा व्यक्ती मनात बाळगून त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करते,सर्वाबद्दल प्रेम मैत्रीची भावना असणे, कोणत्याही दुःखी प्राण्याबद्दल मनात करुणा असणे, इतरांच्या सुखदुःखात सुखदुःख पाहणे, या सर्व बाबींचा समावेष सम्यक संकल्पात होतो, समाजशास्त्रीय दृष्टच्या विचार करता हा दुसरा आर्य मार्ग षुद्ध भावनेवर आधारित असल्याने व्यक्ती व समाज या दोहोंच्या दृष्टीने अत्यंत उपकारक वाटतो, कारण कोणतीही कृती प्रेरणेतूनच निर्माण होते, तेव्हा शुद्ध प्रेरणा असेल तर सामाजिक कृतीदेखील शुद्ध बनते, सम्यक संकल्पामुळे सर्वाबद्दल प्रेम, मैत्रीची भावना वाढते व दुराचारापासून व्यक्ती अलिप्त राहते.

३) सम्यक वाचा – जेंव्हा व्यक्तीची संपूर्ण विष्वविशयीची दृष्टी यथार्थ बनते, मनाशी युद्ध संकल्प व्यक्ती बाळगू लागते तेंव्हा तीची वाणी देखील यथार्थ बनते. थोडक्यात सत्यवचन,असत्याचा त्याग, परनिंदा करणे, चहाडी, शिविगाळ न करणे, समाजात भांडण होऊ नयेत ,हिंसाचार माजू नये, हे लक्षात ठेवून चांगले बोलणे, या सर्व बाबी समाज संघटनाच्या, स्थैर्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण आहेत, सत्य व प्रिय संभाशणाने नेहमीच समाजाचे कल्याणच साधले आहे, शाब्दिक चकमकीतून होणारे भांडण तंटे, सामाजिक कलह यातुन सुटका करून घेण्यासाठी सम्यक वाचा आवष्यक आहे, म्हणूनच ही आर्य अष्टांगिक मार्गातील तिसरी पायरी होय

४) सम्यक कर्म – योग्य वर्तनाची शिकवण सम्यक कर्मा द्वारे मिळते,मानवी जीवन व समाज जीवन यांचेशी सुसंगत असेच वर्तन म्हणजे सम्यक कर्मांत होय, बौद्ध धर्मातील कायिक, वाचिक, मानसिक सत्कर्म ही व्यक्तीच्या विकासासाठी नेहमीच पोषक ठरली आहेत, समाजधारनेला पोषक असेच कर्म करणे म्हणजे सम्यक कर्म होय आणि अष्टांगिक मार्गातील होय

५) सम्यक आजीविका – जीवनावश्यक सर्वच बाबींचा सर्वांगीण विचार बुद्धाने केलेला आढळतो, शरीराचे अस्तित्व टिकून राहण्यासाठी

चरितार्थ चालविणे तर आवश्यक आहे पण आत्यंतिक हव्यासामुळे व्यक्ती व समाजाचा विनाश ओढवतो, हे मर्म त्यांनी जाणले होते, म्हणून च योग्य मार्गाने चरितार्थ चालविणे म्हणजे च सम्यक अनिविका हा मार्ग गौतम बुद्धाने सांगितला आहे, शस्त्राचा वापर, चौर्य कर्म, वेश्या व्यवसाय, लाचारी, अप्रामाणिकपणा, भ्रष्टाचार, इत्यादी कुकर्म किंवा निशिद्ध कर्मे म्हणून ओळखले जातात, तात्पर्य हेच की न्यायपूर्ण मार्गाने आपली उपजीविका चालविणे म्हणजेच सम्यक आजीविका होय, निर्वाण पदास पोहचवणारा हा पाचवा मार्ग होय,

६) सम्यक व्यायाम– अष्टांगिक मार्गापैकी हा सहावा मार्ग आहे, मनातील दुष्ट वासनांचे दमन करून चांगले विचार व सद्गुण यांची जोपासना करावी, वाईट अशुभ विचार यांना आसरा न देता षुभ विचाराने प्रेरित होऊन मानसिक, नैतिक, अध्यात्मिक उन्नती साठी प्रयत्नशील असणे म्हणजे सम्यक व्यायाम होय, सद्गुण युक्त प्रयत्नवाद सांगणारा हा मार्ग व्यक्तीला निश्चितच दैववाद, अंधश्रद्धा यापासून दूर नेणारा, सत्याच्या मार्गाकडे वाटचाल करणारा ठरतो

७) सम्यक स्मृती – जीवनात सत्य व नित्य दुःख आहे, सुख क्षण भंगुर आहे, याची जाणीव होणे, म्हणजे सम्यक स्मृती होय, दुष्ट वासनावर मनाचा पहारा ठेवणे हे सम्यक स्मृतीचे दुसरे नाव होय, आपल्या हातून कुकर्मे होऊ नयेत यासाठी सदैव जागृत असणे असाही सम्यक स्मृतीचा अर्थ घेतला जातो थोडक्यात मानवाने सदैव चांगल्याच बाबीचे स्मरण करावे, कृतीही तशीच करावी, ही निर्वाणपदाची सातवी पायरी होय

८) सम्यक समाधी – आर्य अष्टांगिक मार्गातील ही शेवटची पायरी आहे, मनाचे केंद्रीकरणात पाच अडथळे आहेत, लोभ, द्वेश, आळस, सुस्ती व अनिश्चय, निर्वाण प्राप्तीसाठी या सर्व अडथळ्यावर मात करून मनाची एकाग्रता वाढविणारा मार्ग म्हणजे सम्यक समाधी होय, बुद्धाच्या मते, ध्यानमार्गाचा अवलंब करून सम्यक समाधी साध्ता येते, ध्यानमार्गाचा अवलंब केल्याने सर्व विकारांवर, तृष्णेवर, विजय मिळवता येतो, सुख दुःखाच्या भावनेच्या पलीकडे व्यक्ती जाते, यामुळेच व्यक्ती निर्वाण पदास पात्र ठरते

आर्य अष्टांगिक मार्गाचे सामाजिक महत्त्व – बौद्ध धर्म हा संपूर्ण तरूप्रयत्न वादी, व्यवहारवादी असल्याने या धर्मातील प्रत्येक तत्वांना सामाजिक अर्थपुर्णता लाभते चार आर्यासत्याषी संबंधित अश्टांग मार्ग हा सर्वसामान्य जनतेला जीवनाच्या आदर्षाचे,आचरणाचे दिग्दर्षन करतो, कठोर देहदंड आधुनिक सुखपयोग यांच्यातील सुवर्णमध्य ठरणारा, आठ सद्गुणांनी युक्त असा संयम मार्ग तथागत गौतम बुद्धाने शोधून काढला,सम्यक दृष्टी पासून ते सम्यक समाधी पर्यंत ही आठ अंगे पायरी पायरीने दिलेली आहेत, यातूनच व्यक्ती जीवनाच्या दुःखाचा शेवटही होतो, मानवी जीवन हे दुःखमय आहे हे जाणून घेणे, जगातील इतर दुरूखीतांबद्दल करुणा वाटणे, अवि द्दो चा नाश करणारी वृत्ती समाजशास्त्रीय दृष्टीने अतिशय महत्त्वाची वाटते, जन्म, वार्धक्य, मृत्यू हया संसार लोकांतील बाबी अटळ आहेत,तृश्णा हीच अविद्येचे मूळ कारण आहे अशी ही सम्यक दृष्टी पदोपदी व्यक्तीला जाणीव करून देणारी आहे,मिथ्या वाणीचा त्याग करून संयम युक्त वर्तन समाजाच्या स्थैर्याला,सुस्थिरतेला उपयुक्त ठरते, सत्याची कास असणारी वाणी कोणत्याही काळी समाजाचे संवर्धन करणारीच ठरते, सम्यक उपजीविका या मार्गाद्वारे व्यक्तीने योग्य मार्गाने चरितार्थ चालवावा, परहिताला बाधा न आणणारा न्यायपूर्ण मार्ग उपजीविकेसाठी वापरावा, हा मार्ग तर आत्यंतिक स्पर्धा, अनाचार, अत्याचार या पासून समाजाचे संरक्षण करतो, चोरी, फसवणूक, भ्रश्टाचार यापासूनही समाजाची सुटका करतो, सम्यक व्यायाम हा मार्ग व्यक्तीला शिलाचा आधार घेऊन अळसाचा त्याग करून प्रयत्न करण्यास प्रवृत्त करतो, त्यामुळे व्यक्तितील दुर्गुणांचा त्याग होतो, सद्गुणांचा विकास होतो, पर्यायाने समाजाचाही विकास साधला जातो,सम्यक स्मृती हा मार्ग व्यक्तीला चित्ताचा समतोल कायम ठेवण्यासाठी आग्रह धरतो, त्यामुळे स्वभूमिकेपासून व्यक्ती कधीच विचलित होत नाही,सम्यक समाधीचा मार्ग व्यक्ती स सर्व मनोविकार दूर करण्यास मदत करतो, चित्ताची एकाग्रता, मनाचा समतोल राखणे या बाबी केंव्हाही व्यक्ती आणि समाजहितास उपकारकच आहेत,

सारांश, समाजधरणा, समाज विकास, समाज स्वास्थ्य, समाज चारित्र्य, समाज संघटन ,समाज अस्तित्व, व समाज सातत्य या सर्व दृष्टीने विचार करता, व्यक्ती च्या आचरणाचे यथायोग्य दिग्दर्शन करणारी ही आठ अंगे समाजाच्या दृष्टीने निश्चितच फलदायी ठरतात, असे महान तत्वज्ञान मांडणारे तथागत गौतम बुद्ध हे उच्च कोटीचे समाजशास्त्रज्ञ ठरतात हे निर्विवाद सत्य आहे.

संदर्भ ग्रंथ सूची

१) *बुद्ध आणि त्याचा धम्म, डॉ बाबासाहेब आंबेडकर, सुगत प्रकाशन नागपूर*

२) *प्रा पी के कुलकर्णी–भारतातील धर्म, विद्याभारती प्रकाशन, लातूर, 2001*

३) *विजय डांगे–धम्म भूमी, मासिक पत्रिका, तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध जयंती विशेषांक 2007*

४) *गंगाधर पानतावणे–बुद्ध चिंतन, संकेत प्रकाशन, नागपूर 2010*

५) *डॉ सुरेंद्र गायधने–तत्वज्ञानाची रुपरेशा, महाराष्ट्र तत्वज्ञान परिशद 2009*

६) *प्राचार्य, पा, दा, चौधरी–भारतीय तत्वज्ञानाचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर 1979*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

भारताच्या शैक्षणिक विकासात विनाअनुदानित शैक्षणिक धोरणाचा परिणाम

संशोधक
अमोल शशीकांत भोसले

मार्गदर्शक
डॉ.बी.एन.कावळे
प्रोफेसर आणि समाजशास्त्र विभागप्रमुख
इंद्रराज कला, वाणिज्य व इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय सिल्लोड, जि. औरंगाबाद.

★★★

प्रस्थावना :– भारत स्वतंत्र झाल्यावर आपल्या देशासमोर अनेक समस्या होत्या, त्यापैकी सर्वात महत्वाची समस्या म्हणजे भारतीय समाज व्यवस्थेतील एकूण लोकसंख्यापैकी 86 टक्के भारतीय लोक निरक्षर होते. त्यामुळे भारतीय लोकांचा विकास साधायचा असेल तर त्यांना शिक्षण देणे महत्त्वाचे होते, त्यासाठी भारत सरकारने अनेक आयोग व समित्याची स्थापना आतापर्यंत केल्याची दिसून येते. त्यामध्ये डॉ. राधाकृष्णन आयोग, मुदलीयार समिती, डॉ. कोठारी आयोग, राष्ट्रीय शिक्षण आयोग वरील प्रमाणे आयोग आणि समित्या स्थापन होऊन ही साक्षरतेचे प्रमाण फारसे वाढले नाही. शिक्षणाची गंगा खेडयापाडयापर्यंत पोहचवण्यासाठी 2001 साली महाराष्ट्र शाासनाने कायम विनाअनुदानित शैक्षणिक धोरणाचा अवलंब केला. त्याचा परिणाम म्हणून या शिक्षणसंस्थेत काम करणाऱ्या विनाअनुदानित शिक्षकांना अनेक समस्याचा सामना करावा लागला आहे, व आजही ते सामना करत आहेत. या विनाअनुदानित धोरणात कसे बदल झाले ते पुढील प्रमाणे पाहता येईल.

Keywords शिक्षक, विनाअनुदानित शिक्षक, उच्च माध्यमिक शिक्षक, शैक्षणिक धोरण.

उदीष्टय :–

1) 2001 साली कायम विनाअनुदानित धोरण पुढे विनाअनुदानित धोरण झाले. त्याचा अभ्यास करणे.
2) विनाअनुदानित उच्च माध्यमिक शिक्षकांना सामाजिक आर्थिक समस्या आहेत का याचा अभ्यास करणे.
3) विनाअनुदानित धोरणाचा परिणामाचा अभ्यास करणे.

संशोधन आराखडा :– प्रस्तुत शोध निबंध लिहीत असतांना वर्णणात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे. तसेच तथ्य संकलनासाठी द्वित्तीयक स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये ग्रंथालयातील संदर्भ पुस्तके, शासकीय दस्त ऐवज व वृत्तपत्राचा वापर केला आहे.

प्रस्तुत संशोधन :– भारतीय समाज व्यवस्थेचा अभ्यास करत असतांना अनेक सामाजिक समस्या आढळतात. त्यामध्ये दारिद्रय, बेरोजगारी, व्यसनाधिणता व वाढती गुन्हेगारी इत्यादी. वरील समस्या या भारतीय लोकांमध्ये असलेला शिक्षणाचा अभाव यामुळे दिसून येतात. परंतु आज भारत देश स्वतंत्र होऊन 73 वर्षे पुर्ण होत असतांना काही नवीन समस्या समोर येत आहेत, त्यातील समस्या ग्रस्थ हे सुशिक्षीत आहेत. प्रस्तुत शोध निबंधात जी समस्या मांडायची आहे ती म्हणजे विनाअनुदानित उच्च माध्यमिक शिक्षक. भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर या देशाचा विकास व्हावा या उददेशाने अनेक योजना आखल्या गेल्या त्यामध्ये शेती, आरोग्य, उदयोगधंदे, रोजगार व या सर्वामध्ये प्रगती व्हावी यासाठी सर्व भारतीय जनतेला शिक्षण इत्यादी, यामध्ये भारतीय जनतेचा किंवा समाजव्यवस्थेचा विकास घडवून आणण्याच्या प्रक्रियेत शिक्षण हा घटक खुप महत्त्वाचा आहे. भारत स्वतंत्र झाला तेव्हा एकूण भारतीय समाजव्यवस्थेत फक्त 14 टक्के लोक साक्षर असल्याचे आढळते. यावरुन असे दिसून येते की, 1947 साली 86 टक्के भारतीय समाज हा निरक्षर होता, म्हणून भारतीय समाजव्यवस्थेचा विकास साधायचा असेल तर भारतीय लोकांचे साक्षरतेचे प्रमाण वाढले पाहिजे, यासाठी 1947 पासून आतापर्यंत अनेक शैक्षणिक आयोग व समित्यांची निर्मीती झाली. त्यामध्ये 1948 डॉ. राधाकृश्णन आयोग, 1952 मुदलियार समिती, 1968 कोठारी आयोग, व 1986 राष्ट्रीय शैक्षणिक आयोग, अशा प्रकारच्या आयोगाच्या शिफारशी वरुन शिक्षण व्यवस्थेत आजपर्यंत अनेक बदल घडून आले. वरील प्रमाणे बदल होत असतांना भारतीय समाज व्यवस्थेतील लोकांचे साक्षरतेचे प्रमाण वाढत होते. वरील आयोगांनी शिक्षणाचे तीन टप्प्यात विभाजन केले ते म्हणजे प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण व उच्च माध्यमिक शिक्षण अशा प्रकारे शिक्षणाचा विस्तार होत गेला. परंतु भारतीय जनतेला आरोग्याच्या सुविधा मिळू लागल्याने मृत्यूदर कमी झाला. त्यामुळे 1971 साली 54.81 कोटी असणारी लोकसंख्या वर्ष 2001 साली 102 कोटी झाली. 1971 ते 2001 या 30 वर्षात लोकसंख्या दुप्पट झाली होती. यामुळे वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शाळामध्ये वाढ करणे अपरिहार्य होते. तसेच शिक्षणावरील खर्च 1990–1991 दरम्यान G.D.P. च्या 4 टक्के असणारा खर्च पुढे आणखी कमी होत गेला 2010 मध्ये तर ळण्क्ण्च्य च्या 3.3 टक्के इतका कमी खर्च शिक्षणावर करण्यात आला. यावरुन असे दिसून येते की, शिक्षणावरील खर्च कमी होत गेला आहे. परंतु अजनू ही 2001 या सालापर्यंत एकूण लोकसंख्येच्या 35 टक्के भारतीय जनता निरक्षर आढळून आली. सन 1976 च्या संवैधानिक संशोध

ानानुसार शिक्षण ही केंद्र व राज्य शासनाची जबाबदारी असल्याने महाराष्ट्र शासनाने वर्ष 2001 पासून कायम विनाअनुदानित धोरणाचा अवलंब करुन शिक्षणाचा प्रसार व्हावा सर्वांना शिक्षण मिळावे या उददेशाने शासनाकडून कुठलिही आर्थिक मदत मिळणार नाही या अटींवर खाजगी शिक्षण संस्थाना शाळा काढण्यास परवानगी दिली. तेव्हा पासून महाराष्ट्रात प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण कायम विनाअनुदानित धोरणानुसार शाळा चालविण्यात आल्या. परंतु कायम विनाअनुदानित धोरणातील "कायम" शब्द वगळण्यात यावा अशी मागणी विविध घटकांकडून होऊ लागली, त्यामुळे अशा संस्थांना अनुदान देण्याचा निर्णय दिनांक 16/06/2009 रोजी निर्गमित झाला. तसेच शासनाने परवानगी दिल्यापासून सतत चार वर्शे ते वरील शासन निर्णय येईपर्यंत चालवली गेली अशा प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना दरवर्शी 20 टक्के अनुदान देण्याचे ठरले त्यानुसार त्या शाळांना पुढील पाच वर्षात 100 टक्के अनुदान देण्यात येईल असे महाराष्ट्र शासनाने जाहिर केले. या काळात दहावी बोर्ड परिक्षेत उत्तीर्ण होण्याचे प्रमाण वाढले. उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या प्रमाणात उच्च माध्यमिक शाळा कमी प्रमाणात होत्या म्हणून शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे, यांनी शालेय शिक्षण व क्रिडाविभाग, मंत्रालयाकडे दि. 24/06/2008 रोजी विनंती पत्राद्वारे नविन उच्च माध्यमिक इयत्ता 11 वी च्या वर्गास कायम विनाअनुदान तत्त्वावर परवानगी मागितली. ही विनंती मान्य करुन शासनाने दि. 29 ऑगस्ट 2009 रोजी तसा शासन आदेश निर्गमित केला व अशा उच्चमाध्यमिक शाळांचा, तसेच विनाअनुदानित तुकडयांचा "कायम" शब्द दि. 26 फेब्रुवारी 2014 च्या शासन निर्णयाद्वारे वगळून त्यांना अनुदानावर आणण्याचा निर्णय झाला. वरील कायम विनाअनुदानित धोरणाचा अभ्यास करतांना आज विनाअनुदानित शिक्षकांचे पुढील प्रकार आढळतात. 1) वर्ष 2001 पासूनचे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विनाअनुदानित शिक्षक, 2) 2008–2009 पासूनचे विनाअनुदानित उच्च माध्यमिक शिक्षक, 3) राज्यातील खाजगी मान्यता प्राप्त अनुदानित उच्च माध्यमिक शाळातील सन 2003–2004 ते 2010–11 या वर्षामधील वाढीव तुकडयातील विनाअनुदानित शिक्षक इत्यादी. वरील तिन्ही प्रकारच्या शिक्षकांनी आता पर्यंत 221 च्या वर आंदोलने करुन आपल्या मागण्या शासनाकडे केल्या आहेत. परंतु त्यांच्या मागण्या आजही पुर्ण झाल्या नाहीत.

15 ऑगस्ट 2019 भारत स्वातंत्र्य दिनी गोंदिया जिल्हयातील आदिवासी ज्यूनिअर कॉलेज (उच्च माध्यमिक शाळा) झाशीनगर, मोरगाव अर्जुनी या शाळेतील विनाअनुदानित उच्च माध्यमिक शिक्षक केशव गोबडे यांनी आत्महत्या केली. मागिल पंधरा वर्षापासून ते या विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळेवर काम करीत होते. शिक्षक हा शिक्षक असतो तो अनुदानित असो किंवा विना अनुदानित, शिक्षकाची आत्महत्या होणे ही आपल्या भारतीय संस्कृतीस न शोभनारी गोश्ट आहे. शिक्षक म्हणजे गुरु, "गुरु रे देवो, गुरु रे विष्णू, गुरु रे साक्षात परब्रम्हः" वैदिक कालखंडात गुरु ला अनन्य साधारण असे महत्व आहे. एवढेच नाही तर गुरु ही मनुश्य आहे. मनुश्य आहे म्हणून गरजा आहेत आणि त्या गरजा समाजव्यवस्थेत योग्य वेळी पुर्ण होणे गरजेच्या आहेत. प्राचिन काळापासून भारतीय समाजव्यवस्थेत चार आश्रम आहेत ब्रम्हचर्याश्रम, ग्रहस्थाश्रम, संन्यासाश्रम व वानप्रास्तआश्रम प्रत्येक आश्रमाचा कालखंड 25 वर्षाचा गृहीत धरुन मानवी आयुष्य 100 वर्षाचे गृहीत धरले गेले. तसेच हिंदू धर्मानुसार तीन पुरुशार्थ सांगितले आहेत ते म्हणजे अर्थ, काम व मोक्ष. वरील शिक्षकाची आत्महत्या ही एक सामाजिक घटना आहे. आयुश्यातील 25 वर्षे शिक्षण घेतल्यानंतर शुशिक्षित बेरोजगार होण्यापेक्षा विनाअनुदानित शिक्षक होऊन 15 वर्षे विनावेतन किंवा कमी वेतनावर काम करुन कुटुंबाच्या किमान गरजा पुर्ण करु न शकल्याने ही आत्महत्या झाली. अशा प्रकारच्या कित्येक आत्महत्या पुर्वीही विनाअनुदानित शिक्षकांनी केल्या आहेत. काहींनी अर्थप्राप्ती झाल्यावर गृहस्थाश्रमात प्रवेश करु म्हणून विवाहयोग्य असणारे वय निघुन गेले आहे. काही विनाअनुदानित शिक्षक सेवानिवृत्त झाल्याचे आढळते. शिक्षक म्हणून वेतन, मानधन तर सोडाच : पण शिक्षक म्हणून किमान असलेली प्रतिष्ठाही या विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांना मिळत नाही. विनाअनुदानित शैक्षणिक धोरणाने शैक्षणिक विकास घडून आला परंतु शिक्षण प्रक्रियेतील एकूण 22500 शिक्षक विनाअनुदानित तत्त्वावर काम करीत असून राज्यातील

146 घोषीत व 1656 अघोशित शाळेतील विनाअनुदानित शिक्षक या समस्येला तोंड देत आहेत. शिक्षक हा महत्वाचा घटक शासनाच्या विनाअनुदानित धोरणामुळे सामाजिक व आर्थिक समस्येत गुरुफटला आहे. करीता या विनाअनुदानित शिक्षकाचा सामाजिक व आर्थिक दृष्टीकोनातून संशोधन होणे गरजेचे आहे.

संदर्भ ग्रंथ

1) *आहुजा, रा., साजाजिक समस्यांए, (2016) रावत पब्लिकेशन जयपुर.*
2) *डॉ. दोमडिया, डि.एम., भारतीय षिक्षा का इतिहास, रावत प्रकाशन.*
3) *डॉ. शेटकर, ग.,डॉ. शेवतेकर, शा.,डॉ. जोशी, शो., भारतीय शिक्षणाचा इतिहास मृश्मयी प्रकाशन औरंगाबाद.*
4) *डॉ. किसलय, श., पाण्डेय, अ., भारतीय शिक्षा–नीती (एक नजर) 2006 डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.*
5) *शासन निर्णय दि. 29 ऑगस्ट 2009 महाराष्ट्र राज्य.*
6) *शासन निर्णय दि. 26 फेब्रुवारी 2014, महाराष्ट्र राज्य*
7) *दैनिक लोकशाही दि. 19 ऑगस्ट 2019.*
8) *दैनिक लोकमत दि. 22 ऑगस्ट 2019 पान नं. 08*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

ग्रामीण रोजगार हमी योजनेतील राजकारण

प्रा. डॉ. कल्पना आर. टेकाडे
सहयोगी प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग डॉ. एम.के. उमाठे कॉलेज, भामटी, रिंग रोड, नागपूर 22.

★★★

प्रास्तावना :– ग्रामीण रोजगार हमी योजनेची बीजे सर्वप्रथम महाराष्ट्रामध्ये उमजली गेली. महाराष्ट्राचे तत्कालीन विधान परिशदेचे अध्यक्ष व महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध विचारवंत कै. विलास सखाराम पागे यांनी रोजगार हमी योजनेची आखणी केली व या योजनेची प्रत्यक्ष कृती ही 1969 मध्ये सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील विसापूर गावात सुरू केली.

ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजुर, बेरोजगार ही मंडळी प्रामाणिकपणे कष्ट करू इच्छिते. पण त्यांच्या हातामध्ये कोणतेही काम करण्याचे साधन नाही. कोणत्याही रोजगाराची हमी नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीस सरकारने कामाची हमी दिली पाहिजे असे श्री पागे यांना वाटू लागले. त्यादृष्टिने "मागेल त्याला काम व कामाप्रमाणे दाम" हा कायदा संमत करण्यात आला. व या कायद्याने बेरोजगार व्यक्तीस काम मिळवून देणे सोयीस्कर झाले.परंतु, आपल्या देशात आर्थिक प्रगतीमध्ये तसेच उद्योगधंदे व सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत नाही. रोजगार हमी योजनेतुन ग्रामीण भागात वनीकरण, पाझर तलाव, शेततळे, मातीचे धरण, कालवे, तळ्यातील गाळ काढणे, जुन्या तळ्यांचे नुतनीकरण, रस्त्याचे रूंदीकरण, रस्ते, रोपवाटीका, वृक्ष लागवड अशा प्रकारचे अनेक कामे केली जातात. लोकशाही आणि 'रोहयो' या दोन्ही प्रक्रिया संपूर्ण देषाचे भवितव्य ठरविण्यासाठी असुन ही खऱ्या अर्थाने लोकशाहीत रूजलेली नाही. समाजातील राज्यकर्ते, बागायतदार, प्रशासकीय वर्ग, गावे पातळीवरील पुढारी वर्ग यांचा हस्तक्षेप या योजनेत होतांना दिसतो. यामुळे मजुरांना काम करतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या लोकांच्या हस्तक्षेपामुळे रोजगार हमी योजना 'अर्ध्यात तुम्ही अर्ध्यात आम्ही' अशी अवस्था झाली आहे.

रोजगार हमी योजना चालु ठेवणे ही राज्यकर्त्या वर्गाची गरज आहे. कारण व्यापक हितसंबंध त्यांचे त्यामध्ये गुंतलेले आहेत. स्वतः पुरत्या विचारामुळे या योजनेचा फायदा प्रत्यक्ष मजुरांना होतांना दिसत नाही. मुळात ही योजना चांगली असली तरी याची योग्य पद्धतीने अंमलबजावणी होतांना दिसत नाही. ठराविक लोकांची मक्तेदारी 'रोहयो' मध्ये असल्याचा भास यातुन होतो. जगण्यासाठी जो धडपडतो आणि प्रामाणिकपणे कष्ट करू इच्छितो असा सर्वसामान्य माणूस या योजनेचा गाभा आहे. या योजनेमुळे दीर्घकाळ टिकणारी सार्वजनिक मालमत्ता ही ठराविक लोकांच्या हातात जाणार असेल तर त्याद्वारे महाराष्ट्राच्या पर्यायाने देशाच्या फक्त मुठभर लोकांच्या हातात संपत्तीचा मोलाचा भर पडेल. मजुरांचा या योजनेच्या नावाखाली राजकीय हस्तक्षेप वाढत गेला तर याचा मजुरांना फायदा होणार नाही. यावर आज विचार करणे गरजेचे आहे.

उद्दिष्टये :–

1) 'रोजगार हमी योजनेतील' राजकीय हस्तक्षेपाचा आढावा घेणे.

2) 'रोजगार हमी योजनेतील' मजुरांची होणारी उपेक्षांची कारण मिमांसा करणे.

3) 'रोजगार हमी योजनेमध्ये' होणाऱ्या भ्रष्टाचारा विषयी उपाययोजना सुचविणे.

संशोधन पद्धती :–या शोध निबंधासाठी संशोधकाने दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर केला आहे. यामध्ये मासिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, लेख शोध प्रबंधाचा वापर केला आहे.

"रोहयो" राजकीय हस्तक्षेप :–रोजगार हमी योजनेत काम करणारा मजूर अल्पभूधारक व छोटा शेतकरी, शेतमजूर आहे. या लोकांकडुन शासकीय कामाऐवजी श्रीमंत शेतकरी, जमीनदार व मध्यम शेतकरी शासकीय अनुदानावरती स्वतः शेतातील कामे व इतर कामे करून घेतात. सरकारच्या खर्चावर आपल्या शेतावर आपले काम म्हणून मजुरांना आपल्या शेतावर राबवुन घेतात. या योजनेवर कंत्राटदार व अधिकाऱ्यांच्या सहकार्याने मजुरांचे कामे कागदपत्री दाखवून पैसा उखळतात. प्रत्यक्ष त्या कामाची मजुरांना माहिती नसते. अनेक पुढारी आमदार आणि अधिकारी हे संगनमत करून 'रोहयो' मधील मजुरांचे कामे टँकर, पोकलॅण्ड यासारखी मोठी अवजारे लावुन करतात व अव्वाच्या सव्वा खर्च दाखवून लुटालुट करतात. याचाच अर्थ हे लोक रोजगार हमी योजनेतील काम 'अर्धे तुम्ही व अर्धे आम्ही' या वाक्याप्रमाणे काम करून घेतात. म्हणजे या योजनेच्या मजुरांना फायदा होत नाही. याचा लाभ पुढारी, कंत्राटदार, आमदार आणि सक्षम अधिकारी या योजनेचा पैसा लुबाडतांना दिसतात. या योजनेची अधिकाऱ्यांना किंमत राहिलेली नाही. वास्तविक त्यांनी मष्दा व जलसंधारणाची कामे केली तर पाच वर्शात महाराश्ट्राचा चेहरा मोहरा बदलु षकेल.

दृष्टीक्षेपात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना– महाराष्ट्र

अ.	तपशिल	परिणाम	वर्ष 2016–17	वर्ष 2017–18
1.	जॉब कार्ड वितरीत केलेल्या एकूण कुटूंबाची संख्या	लाखात	81.72	83.22
2.	मजुरी वाटपासाठी बँक/पोस्टात मजुरांची उघडण्यात आलेली एकूण खाती	लाखात	68.48	68.42
3.	रोजगार उपलब्ध करून दिलेल्या एकुण कुटूंबाची संख्या	लाखात	14.33	16.98
4.	रोजगार उपलब्ध करून दिलेल्या एकूण मजुरांची संख्या	लाखात	27.26	31.40
5.	एकूण मनुष्य दिवस निर्मिती	लाखात	708.99	825.32
6.	सरासरी प्रती कुटूंब मनुष्य दिवस निर्मिती	दिवस	49	49
7.	100 दिवसापेक्षा जास्त दिवस रोजगार पुरविण्यात आलेल्या कुटूंबाची संख्या	लाखात	1.65	1.98
8.	एकूण खर्च.	कोटीत	2083.12	2300.06
9.	मजुरी व साहित्यावरिल खर्चाचे प्रमाण	टक्के	68.32	72.28
10.	चालु वर्षातील एकूण पुर्न कामे	लाखात	1.61	2.21

स्त्रोत : *https://mahaegs.maharashtra.in/site/Hame/Hame/Index.aspx*

उपाययोजना :– ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये काम करणाऱ्या मजुरांना अडचण म्हणून राजकीय हस्तक्षेप हा मोठा पेचप्रसंग उभा राहिला आहे. या संदर्भात शासनाला योजनेतील कार्यवाही सुबद्ध पद्धतीने राबविली जाण्यासाठी काही उपाययोजना सुचविण्यात येतील.

1) शासनाने रोजगार हमी योजना कंत्राटी पद्धतीनेन राबविता या योजनेची कामी सक्षम प्रशासकीय वर्गाच्या देखरेखी अंतर्गत करावीत. जेणेकरून मजुरांच्या कामात व मजुरी मध्ये भ्रष्टाचार होणार नाही.

2) रोजगार हमी योजना पारदर्शक बनविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने स्वतंत्र प्रशासन व्यवस्था निर्माण करावी.

3) शासन काही काळापासून बँक व पोस्ट ऑफीस मध्ये रोहयो मजुरांची पगार जमा करते. परंतु, जे कामे पोकलॅड, टॅक्टर यांच्या सहयाने करतात ते बंद करण्यात यावे.

4) रोजगार हमी योजनेमध्ये कामे केल्याचा तपशील ग्रामसभेत मजुरांच्या व गावकऱ्यांच्या समक्ष ग्रामसेवक व पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी साद करावी.

5) रोजगार हमी योजना पातळीवर आणण्यासाठी केंद्र व राज्य सरकार स्वतंत्र मंत्री, प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र जिल्हाधिकारी यांची नियुक्ती असुनही रोहया पाहिजे तेवढी सक्षमपणे राबविली जात नाही याची कारणमिमांसा करावी.

संदर्भ सूची :–

1. *पागे वि.स.– बेकारी निर्मुलनातून ग्रामीणविकास, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, प्रस्ताविक आवृत्ती, 1989*
2. *क्षीरसागर व्ही.एस.– अस्सा हा महाराष्ट्र रोजगार व संबंधित कार्यक्रम के. सागर पब्लिकेशन, पुणे, 2005.*
3. *पेठे वसंत प्रभाकर,– गरिबी निर्मुलन आणि आर्थिक विकास 21 व्या शतकासाठी नवीन प्रतिमान, अर्थसंवाद, एप्रिल–जून 2006.*
4. *कविमंडन विजय– ग्रामीण विकासाचा एकत्मिक दृष्टिकोन नीती, कार्यक्रम आणि व्युहरचना, मंगेश प्रकाशन, नागपूर, 2006.*
5. *राजहंस बा.न.– रोजगार हमी योजनेमुळे आदिवासी मध्ये जागृती लोकराज्य, रोजगार हमी विशेषांक 1983.*
6. *देसाई दत्ता– महाराष्ट्रातील दुष्काळी मागोवा प्रकाशन, शांती भुवन, पुणे, मे, 1987.*
7. *साधु अरूण– जागतिकीकरणाचा झंझावत टिकुन राहिलेली पुरोगामी योजना, रोहयो लोकराज्य, मे, 2002.*
8. *सुधीर भोंगळे– विकासवाटा, सुज्ञान प्रकाशन, कोथरूड, पुणे. प्रथम आवृत्ती 20, ऑक्टोबर, 2005.*
9. *देसाई संदिप– भारतासमोर सध्या प्रश्न आहेत तरी कोणते? योजना, एप्रिल, 2004.*
10. *दैनिक लोकमत– दिनांक– 1 जानेवारी, 2010.*
11. *दैनिक सकाळ– दिनांक– 15 जानेवारी, 2010.*
12. *दैनिक लोकमत– दिनांक– 2 फेब्रुवारी, 2011. (विशेष पुरवणी)*
13. *https://Mahaegs.Maharashtra.in/site/Hame/Index.aspx*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

नविन शैक्षणिक धोरण २०२० : २१ वी शताब्दी लक्षप्राप्ती संदर्भाने

प्रा.अभिजीत अनिलराव पिलखाने
विभाग प्रमुख लोकप्रशासन विभाग,
चे.शि.प्र. कला वरिष्ठ महाविद्यालय, हर्सूल सावंगी, औरंगाबाद.

★★★

(**मुख्य शब्द :** उच्च शिक्षणाबाबत प्रावधान, भाषेची प्रासंगिकता, शिक्षणाबाबत धोरणे, शिक्षणाचे संस्कृतिकरण इ.)

प्रस्तावना - शिक्षण प्रक्रियेला नियंत्रित करणारी सिद्धांत आणि नियम-कायदे यांच्या समुच्चयास शिक्षण-धोरण (ũation Policy) संबाधले जाते. योग्य वेळ आणि स्थानावर योग्य कार्य करण्याच्या कलेला धोरण (Policy) म्हणतात. धोरण, विचारपूर्वक निर्माण सिद्धांताची प्रणाली आहे जे योग्य निर्णय आणि सम्यक परिणाम करण्यास मदत करते. धोरण एक प्रक्रिया (Procedure) आणि कसे राबवयाचे या विषयी दिनानिर्देश करते.

राष्ट्रीय शिक्षण धोरण : भारतीय संविधानाच्या चौथ्या भागातील निती निर्देशक तत्वात प्राथमिक स्तरावरील सर्व बालकांना अनिवार्य आणि नि:शुल्क शिक्षण व्यवस्था करणे ही बाब नमुद केली आहे. सन १९४८ मध्ये डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेत विश्वविद्यालय शिक्षण आयोग निर्माण करुन शिक्षण प्रणाली व्यवस्थित स्वरुपात आणण्याचे कार्य हाती घेण्यात आले. १९५२ मध्ये लक्ष्मी मुदलियर अध्यक्षतेत माध्यमिक शिक्षा आयोग, १९६४ मध्ये दौलत सिंह कोठारी अध्यक्षतेत नियुक्त आयोगाच्या शिफारशी आधारे १९६८ शिक्षण धोरण प्रस्ताव प्रकाशित केला गेला. यात राष्ट्रीय विकासाप्रती वचन बद्धता, चारित्रवान तसेच कार्यकुशल युवक युवती तैयार करण्याचे लक्ष संपादित करण्यात आले.

१९८६ सालात राष्ट्रीय शिक्षा धोरण लागु केले ते आजतागायत चालु होते. या दरम्यान राष्ट्रीय शिक्षा धोरणाची समिक्षण करणेसाठी १९९० मध्ये आचार्य राममुर्ती यांच्या अध्यक्षतेखाली तर १९९३ मध्ये प्रो. यशपाल समितीची निर्मिती करण्यात आली.

कोठारी आयोग - सन १९६४ मध्ये केंद्र सरकार यांनी डॉ. दौलत सिह कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली शालेय शिक्षण प्रणाली याला नवीन आकार दिशा देणेसाठी आयोगाचे गठन केले, यालाच कोठारी आयोग असे संबोधले जाते. डॉ. कोठारी तेव्हा विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष होते शालेय शिक्षणाबाबत विस्तृत स्वरुपात समिश्रण करतांना त्यांनी (कोठारी आयोग १९६४-६६) सामाजिक बदल लक्षात घेऊन शालेय शिक्षणात बदल सुचवत काही ठळक सूचना नमुद केल्या.

१९८६ ते २०२० या कालावधीत असा कोणता सामाजिक, आर्थिक आणि जागतिक बदल झाला ज्या कारणाने नविन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अमलात आणावे लागले. याबाबत उहापोह संबधित शोध प्रत्रिकेत आपण करणार आहोत.

शिक्षण याचा अर्थ अविस्तर शिक्षण प्राप्त करणे जे समाजासाठी उपयुक्त ठरते आणि यातून मनुष्यांचा आंतरीक आणि वैचारिक शक्तीना वाढण्यास मदत होते. शिक्षणाद्वारे प्राप्त ज्ञान आणि कौशल्य आधारे नागरिक घडवण्यास मदत होते. नविन शैक्षणिक धोरण २०२० घोषणा होताच मानव संसाधन मंत्रालय याचे नविन नामकरण शिक्षण मंत्रालय केले गेले. या धोरणा अतंर्गत २०३० पर्यंत १००% (Gross Enrolment Ratio) पूर्ण नामकन अनुपात, केंद्र आणि राज्यसरकार सहयोगाने जीडीपी च्या ६% सार्वजनिक न्याय शिक्षा क्षेत्रासाठी करण्याचे लक्ष्य आहे. राष्ट्रीय शिक्षा धोरणाचे प्रमुख बिदु खालील आपणास अधोरेखित करता येतात.

शालेय शिक्षणाबाबत प्रावधान - नविन शैक्षणिक धोरणात ५+३+३+४ अशी शैक्षणिक सरंचना केली गेली आहे. ३ ते १८ वर्ष वयोगटाचा समोवश होतो.पाच वर्ष Foundational Stage - ३ वर्ष प्री प्रायमरी शाळा आणि ग्रेड १,२ तीन वर्ष साठी प्री-पेट्रेरी स्टेज, तीन वर्ष मध्य (उच्च प्राथमिक) चरण ग्रेड ६,७,८ आणि ४ वर्ष माध्यमिक चरण ग्रेड ९,१०,११,१२, ज्ञे २०२० अंतर्गत National mission on foundational Literacy and Numeracy स्थापनेचा प्रस्ताव असून २०२५ पर्यंत कौशल्य सुनिश्चित केले जाईल. भाषा आणि संरक्षणात कक्षा - ५ पर्यंत स्थानिक भाषेत शालेय आणि कक्षा - ८ अणि पुढील वर्गासाङ्गी मातृभाषेतून शिक्षणाला प्रोत्साहन देण्यात आले आहे. याबरोबर प्राचीन भारतीय भाषा आणि संस्कृत भाषेचा विकल्पही उपलब्ध करुन देण्यात आला आहे. शारीरिक शिक्षणातंर्गत मार्शल आर्ट, मैदानी खेळ नृत्य योग याचा समावेश करुन शारीरिक हालचाल आणि व्यायाम याचीही उपलब्धता करुन देण्यात आली आहे.

भारतीय उच्चशिक्षा आयोग - नविन शैक्षणिक धोरणात उच्च शिक्षण संस्थासाठी एक नियामक आणि भारतीय उच्च शिक्षा परिषद (úgher Education Commission of India – HECI) तयार करण्याची परिकल्पना केली आहे. भारतीय उच्च शिक्षा आयोग. चिकित्सा आणि कायदा शिक्षण वगळता इतर सर्व उच्च शिक्षण क्षेत्रासाठी एकल विभाग (Single Umbrella Body) रुपात कार्य करेल. शिक्षण क्षेत्रातील डिजीटल शिक्षा संसाधनाना विकसित करणेसाङ्गी वेगळी संरचना आणण्याचे सुनिश्चित करण्यात आले ही संरचना आवश्यक संसाधन, सामग्री आणि क्षमता निर्माण हेतू समन्वयात्मक कार्य करेल.

शालेय शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी करणेसाठी जूनी १०+२ रचनेला आता बदलून ५+३+३+४ करण्यात आले.जसे की ५ (३ ते ८ वर्ष वयगट) जे (एल के जी ते वर्ग ३) अध्ययन ३ (८ ते ११ वयगट) जे (वर्ग ४ ते ६) अध्ययन करतील ३ (१२ ते १४ वयगट) जे (६ ते ८ वर्ग) अध्ययन४ (१४ ते १८ वयगट) जे (वर्ग ९ ते १२) अध्ययन करतील.

अतंर्गत भारतात सर्व स्पर्धा परीक्षा एकाच वेळी घेण्याचे नियोजन आहे कारण विद्यार्थी वेगवेगळ्या परिक्षा तयारी करण्याच व्यग्र असायचा, २०२० अतंर्गत अनेक परिक्षा ऐवजी एकच कॉमन एट्रेस टेस्ट जसे जेईई मेस् जेई एडवास डब्लूडी जेई अशा अनेकविध ऐवजी एकच परिक्षा द्यावी लागणार.

''खेलकुद के साथ शिक्षा इस धरोहर पर'' या विचाराने NEP चे स्वरुप दिसते.महाविद्यालय शैक्षणिक जिवनात १ वर्षाचे शिक्षण पूर्ण करणाऱ्यास काही कारणास्तव शिक्षण सोडल्यास १ वर्ष कॉलेज प्रमाणपत्र, २ वर्षाने सोडल्यास Diplom तर ३ वर्षाने सोडल्यास Bachelor Degree आणि पूर्ण ४ वर्ष केली असता Level Research Degree दिली जाईल. अर्धवट शिक्षण सोडणाऱ्या विद्यार्थ्यास परत नव्याने सुरु न करता जिथे सोडले तेथून सुरुवात हा विकल्प आहे. तसेच NEP अंतर्गत M.Phil (Master of Philosophy) डिग्री संपुष्टात आणून १००% (GRE) Graduate Record Examination हे लक्ष समोर ठेवले आहे.

शिक्षकांसाठी ४ वर्षाच्या अभ्यासक्रम या कालावधीत मुलांना कोणत्या प्रकारे अध्यपन केले जावे. याबाबत प्रबोधन आणि प्रशिक्षण, कोडीग आणि मातृभाषेतून शिक्षण देणे इ. बोर्ड परिक्षेचा दबाब विद्यार्थीवर्गावर कमी करणेसाठी सहामाही पद्धतीने परिक्षा Semister स्वरुपात होईल व ज्यात अधिकचे गुण प्राप्त होतील ते ग्राह्य धरण्यात यावे ही यातील विशेषबाब आहे. नविन शैक्षणिक धोरण २०२० हे शैक्षणिक वर्ष २०२२ पासून अंमलात आणण्याचा शासनाचा विचार कोरोना ससंर्गजन्य रोगाच्या जागतिक व्याप्तीने शक्य होणार नाही असे शैक्षणिक तज्ञांचे मत आहे.

मातृभाषेतून शिक्षण धोरणाने मातृभाषेतील शिक्षकांची असलेली कमतरता ही भासणार नाही कारण या शिक्षकांची भरती कराव्याच लागतील.०४ वर्षाचे होण्याचे कारण गुणवत्ता पूर्वक शिक्षकांची उपलब्धता व्हावी हा उद्देश अंत: केंद्रित मंत्रीमंडळाने २१ वी शतकातील भारत यात शिक्षणात शारीरीक, मानसिक आणि जागतिक स्पर्धाला सामोरे जाणारे असे शैक्षणिक अभ्यासक्रम सर्व वयोगासाठी निर्माण केले आहे.

सारांश देशातील शिक्षण व्यवस्थेत जवळपास ३४ वर्षानी बदल करण्यात येऊन प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षण तर स्तानक स्तर हा ०४ वर्षाचा केला आहे. प्राथमिक ते विश्वविद्यालय शिक्षण पद्धतीत बदल करणारी नविन शैक्षणिक धोरण २०२०, केंद्रिय सरकारने बुधवारी २९ जुलाई रोजी घोषणा करुन मानव संसाधन मंत्रालय याचे नाव बदलून शिक्षण / शिक्षा मंत्रालय करण्यात आले. या नव्या शैक्षणिक धोरणात व्यवहारीकता आणि कौशल्य विकासावर भर देण्यात आला आहे. नविन शिक्षण धोरणात अधोरेखित खालील महत्वाच्या बाबीत पाचवी वर्गापर्यंत मातृभाषेतून शिक्षण आणि शक्य असल्यास आठवी आणि त्यापुढील वर्गासाठी मातृभाषेतून शिक्षणाचा पर्याय खुला असावा. यात हिंदी, इंग्रजी बरोबरच स्थानिक भाषा विषय पाठ्यक्रमात असावे, देशातंर्गत १०+२ ही प्रचलित पद्धत बदलून ५+३+३+४ या रुपात पाठ्यक्रमाची निर्मिती प्रायमरी ते वर्ग दुसरा एक, तर तिसरी ते पाचवी दुसरा आणि साहवी ते आठवी तिसरा व नववी ते १२ वी हा चौथा आणि वर्गीकरणातील शेवटचा टप्पा असवा, बोर्ड परिक्षा कायम ठेऊन ज्ञान आधारीत करण्यात आली आहे.

नविन शैक्षणिक धोरणात मुल्यमापन करतांना आता तीन पद्धतीचा अवलंब होईल एक स्वत: मुल्यमापन करणे दुसरे सहपाठी मार्फत आणि तिसरे अध्यापका मार्फत वर्ग सहा पासून कोडिंग शिक्षण जे की कौशल्य विकासाचा एक महत्वपूर्ण भाग ठरेल, स्नातक (Graduate) ३ वर्ष ऐवजी ४ वर्षाचे आणि ४ वर्ष पूर्ण केल्यावर १ वर्षात (Graduate) स्तातकोत्तर पदवी मिळवू शकेल. एम.फिल पूर्ण स्वरुपात संपुष्टात आणून एम.ए. नंतर विद्यावाचस्पती (Ph.D) करता येईल. नविन धोरणात खाजगी आणि शासकीय विद्यापीटासाठी नियम एकच असतील, राष्ट्रीय पाली संस्था, पारसी आणि प्राकृत भारतीय अनुवाद संस्था आणि व्याख्या याची स्थापना करण्यात येईल.

नवीन शैक्षणिक धोरण भारतास प्रगती आणि नविनतम शोध निर्मितीचे केंद्रबिंदू ठरणारे असावे अशा पद्धतीने प्रत्येक वयोगटाचा विचार करुन हे धोरण निर्माण करण्यात आले आहे.

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

भारतीय परंपरेतील प्रमुख धर्मांचा नैतिक दृष्टिकोण

प्रा. डॉ. सीमा देशपांडे
तत्वज्ञान विभाग प्रमुख,
एल.ए.डी. महाविद्यालय, शंकरनगर, नागपूर–10

★★★

सारांश – 'धर्म' हा भारतीय संस्कृतीच्या रचनेतील व विकासातील महत्त्वाचा घटक आहे. व्यक्तीचे विचार, भावना, संकल्प, प्रेरणा, संस्कार, सवयी व आचार या सर्व गोष्टी सर्वस्वी व्यक्तीच्या मनातील धार्मिक दृष्टिकोणावर अवलंबून असतात. विज्ञानाच्या क्षेत्रात माणसाने प्रचंड प्रगती केलेली असली तरी 'धर्म', 'तत्त्वज्ञान', 'नीती' या गोष्टी माणसाच्या दैनंदिन जीवनाचे अधिश्ठान आहेत. ज्या त्यांना प्रेरणा व मार्गदर्शन पुरवितात.

आजच्या भारतीय संस्कृतीच्या विकासात आर्य, द्रविड, हिंदू, बौध्द, जैन, ख्रिष्चन, शीख, इस्लाम, पारशी इत्यादी विविध धर्म प्रणालींनी आकार दिलेले आढळतो. प्रत्येकच धर्म व्यक्तीच्या वर्तनास मार्गदर्शक ठरतो. प्रेम, ज्ञान, दान, अहिंसा, सत्य इ. नैतिक मुल्यांची शिकवण देतो. एकूणच व्यक्ती व समूह यांच्या वर्तनाशी व व्यवहाराशी धर्माचा प्रत्यक्ष संबंध असतो.

प्रत्येक धर्माची नावे ही वेगवेगळी असली तरी अंतिमतः प्रत्येक धर्माची उभारणी ही व्यक्तीला नीतिमान बनविणे या संकल्पनेतूनच झालेली आहे असे दिसून येते, त्यामुळे धर्म हा मानवी जीवनाच्या इतिहासात महत्त्वाचा घटक ठरतो.

सांकेतिक शब्द : धर्म, नैतिक तत्त्वे, जीवनमूल्ये.

प्रस्तावना – भारतीय इतिहास हा धर्म दर्षन आणि संस्कृती यांच्या गाथांनी भरलेला आहे. धर्म हा तर मानवी संस्कृतीच्या रचनेतील महत्त्वाचा घटक होय- धर्माने सांगितलेली नैतिकतत्त्वे माणसाच्या दैनंदिन जीवनाचे अधिष्ठान आहेत. आजच्या भारतीय संस्कृतीच्या विकासाला द्रविड, हिंदू, बौद्ध, जैन, ख्रिश्चन, षीख, इस्लाम, पारशी इत्यादी विविध धर्म प्रणालींनी आकार व अर्थ दिलेला आढळतो. वरील सर्व धर्मांची स्थापना ही वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या काळी, स्थळी झाली असली तरी प्रत्येक धर्माने आपले मौलिक व नैतिक विचार लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

त्यादृष्टीने प्रस्तुत शोधनिबंधात, भारतीय परंपरेतील प्रमुख धर्मांचा नैतिक दृष्टिकोण अभ्यासला. त्यांचे तात्त्विक व नैतिक

विचार हे या शोधनिबंधाच्या अध्ययनाचे केंद्र आहे.

भारतातील प्रमुख धर्माचे परिचय करून घेण्यापूर्वी 'धर्म' या संज्ञेचा अर्थ समजावून घ्यायला हवा. धर्म' हा शब्द 'धृ' या धातूपासून तयार झालेला असून 'धृ' याचा अर्थ 'धारण करणे' असा होतो. 'धारणात ध र्म मित्याह धर्मो धारयाति प्रजा अशी त्याची व्याख्या होते. म्हणजे प्रजेला एका सूत्रात बांधणारा तो धर्म, असा त्याचा अर्थ होतो. ऋग्वेदात आधार देणे, पोषण करणे, पालन करणे नैतिक कायदे व आचार अषा अर्थाने 'धर्म' हा शब्द योजिला गेल्याचे आढळते तर लोक व्यवहार नीट चालविणे हेच धर्माचे खरे कार्य होय असे महाभारतातील शांतीपर्वात म्हटलेले आहे.

वरील सर्व अर्थाशी मिळतीजुळती अशी व्याख्या 'ऐतरेय ब्राह्मण' या धर्मग्रंथात, न्यायभाश्यात, ऋग्वेदातील पुरूष सुक्तात केलेली आढळते तर मीमांसकाच्या जैमिनी सुत्रात 'चोदनालक्षणोर्थ धर्माः।' अशा धर्मविशयक कल्पनेत, चोदना म्हणजे उपदेश, आज्ञा, विधी, प्रेरणा होय तर मनुःस्मृती मध्ये धर्माची दहा लक्षणे सांगितलेली आहेत. 'धैर्य', 'क्षमा', 'संयम', 'अस्तेय', 'शौच', 'इंद्रियनिग्रह', 'बुध्दी', 'विद्या', 'सत्य' आणि 'क्रोध न करणे' इत्यादी धर्मशास्त्रामध्ये चार पुरूषार्थापैकी धर्म या पुरूषार्थाला सर्वात महत्त्वाचे स्थान आहे.

थोडक्यात, व्यक्ती व समाज यांनी कसे वागावे कोणती आचारसंहीता आचरणात आणावी याचे विवेचन 'धर्म' या शब्दात अभिप्रेत आहे तर धर्माचे प्रयोजन सांगतांना कणादांनी धर्माची व्याख्या – 'यतोभ्युदयानिः श्रेयसिद्धिः सः धर्म,' अशी केलेली आहे. म्हणजेच ज्याने संसारिक समृध्दी (अभ्युदय) आणि आध्यात्मिक कल्याण (निःश्रेयस) यांची सिध दी होते तो धर्म. वैशेशिकांनी केलेली धर्माची ही व्याख्या भौतिक आणि आध्यात्मिक दोन्ही क्षेत्रात समन्वय प्रस्थापित करते.

अशा प्रकारे भारतीय परंपरेत 'धर्म' या शब्दाचा अर्थ वेगवेगळया संदर्भात वेगवेगळा केलेला आढळतो. लैकिक अर्थाने ज्याला आपण धर्म म्हणतो तो म्हणजे 'हिंदू', 'इस्लाम', 'खिश्चन', ' बौध्द' या प्रमुख धर्मांची नैतिक जीवन दृष्टि जाणून घेवू.

हिंदू धर्म : जगातील अतिप्राचीन आद्यधर्म समजल्या जाणाऱ्या हिंदू धर्माने त्रिविध दृष्टिकोण स्वीकारलेला दिसून येतो. त्यामध्ये ऐहिकवाद, पारमार्थिकवाद व उभयवाद या तीन दृष्टिकोणांचा समावेश होतो. जसे हिंदू धर्माने समाजातील लोकांना दैनंदिन जीवन व्यवहार करीत असतांना माणसामाणसांमधील संबंध चांगले रहावे म्हणून आश्रम व्यवस्था, वर्णव्यवस्था सांगितली, 'सत्य', 'अहिंसा' व इतर 'नीतिधर्म' यांची मीमांसा केली. या सर्वावरून हिंदू धर्मातील ऐहिक दृष्टिकोण स्पष्ट होतो. तसेच उपनिशदातील सांगितलेल्या ब्राम्हणस्वरूपावरून, स्मृती व धर्मशास्त्रात केलेल्या आत्मा, परलोक इत्यादींच्या विवेचनावरून

तसेच पुराण ग्रंथ, आगम ग्रंथ यामध्ये सांगितलेल्या व्रत, यात्रा, उपासना या सर्व गोष्टीतून हिंदू धर्मातील आध्यात्मिक प्रेरणा स्पष्ट होते, जी पारलौकिक जगताविशयीची जागरूकता सुस्पष्ट करते. हिंदू धर्माने अनेक देवतावाद, पाप, पुण्य, पुनर्जन्म, कर्मसिध्दांत या गोश्टी मानल्या आहेत. हिंदू धर्मात आध्यात्मिक जीवनाबरोबरच समाजधारणेला व अभ्युदयालाही महत्त्व दिलेले दिसून येते. म्हणूनच या धर्मात इह–पर, प्रपंच–परमार्थ, प्रेयस–श्रेयस, अभ्युदय– निःश्रेयस इ. च्या संदर्भात समन्वयी दृष्टिकोण दिसून येतो. गीतेतील उपदेश, श्रुती, स्मृती, पुराणे, दर्शन, मध्ययुगीन संत, भारतीय तत्त्वचिंतकांनी याच भूमिकेचा स्वीकार केलेला दिसून येतो. हिंदू धर्माच्या आचारधर्माचे, विधींचे निरीक्षण केल्यास असे लक्षात येते की, ते ऐहिक सुखाला नाकारीत नाही तर त्यांनी मोक्षा व्यतिरिक्त अर्थ व काम हे पुरूशार्थ देखील स्वीकारलेले आहे. पण ते केवळ साधन म्हणून साध्य म्हणून नाही. हिंदू धर्मानुसार, धर्माधिष्टीत अर्थ काम हेच पुरूषार्थ होत. धर्म विरोधी अर्थ काम पुरूषार्थ नव्हे.

हिंदू धर्मातील आचारधर्माच्या या विवेचनात वर्णाश्रमधर्मानुसार केले जाणारे नित्यविधी म्हणजे संध्या, देवपूजा, पितृतर्पण, यज्ञ, अग्निपूजा, इ. चे पालन करणे आवश्यक मानलेले आहे. तर सकाम उपासनेमधे येे यज्ञ, दान, तप, व्रत, उपवास इत्यादींचा समावेश दिसून येतो. नैमित्तिक विधींमध्ये जन्म, मृत्यू, विवाह या प्रसंगी करण्यात येणाऱ्या विधींचा समावेश होतो. जीवनातील प्रत्येक अवस्थेत आध्यात्मिक महत्त्व देणे हा या संस्कार विधीचा हेतू आहे. यावरून प्रापंचिक व पारमार्थिक जीवन यात अंतर राहू नये व संपूर्ण मानवी जीवन पवित्र व्हावे, धर्मनिष्ठ व्हावे हा हिंदू धर्माचा हेतू दिसून येतो.

थोडक्यात, हिंदू धर्मशास्त्रात, मानवी जीवनामध्ये आध्यात्मिक साफल्य व जन्म–परंपरेवर आधारलेला कर्मसिध्दांत व चातुर्वर्ण्यव्यवस्था, तसेच आश्रमव्यवस्था याद्वारे मनुष्याला क्रमाक्रमाने मोक्षस्वरूपी परम पुरूशार्थ कसा साध्य करून घेता येतो, याविषयी जे मार्गदर्शन केलेले आहे, त्यातून हिंदू धर्मांतर्गत नीतिविचार व्यक्त होतातच पण त्याच बरोबर भारतीय नीती ही हिंदू धर्मशास्त्राचे अधिष्ठान होय हे सुस्पष्ट होते.

इस्लाम धर्म :– इस्लाम धर्मानुसार, हा धर्म ईष्वरी संदेशातून प्रकट झालेला पवित्र धर्म असून, ईश्वर एक आहे. मुहम्मद पैगंबर त्याचे प्रेषित आहेत. तत्कालीन अरब समाजातील अनीती, अंधश्रध्दा, यांना आळा घालण्यासाठी अरबस्थानातील मक्का या शहरी इ. स. 610 साली नव्या धर्माची स्थापना केली व त्याला 'इस्लाम' हे नाव दिले. इस्लाम हा अरबी शब्द असून त्याचा अर्थ 'शांतीमध्ये प्रवेश करणे' असा होतो.

पैगंबरांनी तत्त्वज्ञानाच्या जंजाळात न पडता सरळ कर्ममय धर्माचाच पुरस्कार केला. अनेकश्वरवाद व मुर्तिपूजा यांना त्यांनी कडाडून विरोध केला. इस्लाम धर्माचे इमान (श्रध्दा) व अमल (आचरण) असे दोन भाग पडतात.'इमान' म्हणजे प्रथा पुढील सहा गोष्टींवर त्यांचा मुलभूल श्रध्दा सामावलेल्या आहेत. 1) अलाह 2) देवदूत (फरिष्ते) 3) ईष्वरग्रंथ, कुराण 4) ईश्वराचे प्रेशित वा पैगंबर रसूल 5) अंतिम निवाडयाचा दिवस 6) ईष्वराचे आदेष नबीने घोषित केलेल्या सत्याची स्वीकृती.

इस्लाम धर्मानुसार जे पुण्यवान, सदाचरणी असतील ते जन्नतमध्ये जातात जे दुराचरणी आहेत ते 'जहन्नूम' म्हणजे नरकात जातात अशी श्रध्दा आहे. कुराणच्या 'अमल' या विभागातील ज्या पाच आवश्यक गोष्टी म्हणजे धार्मिक कृत्ये सांगितलेली आहेत त्यांना 'पंचअर्कात' असे म्हणतात. त्यामध्ये दिवसातून पाच वेळा नमाज पठण, पाच वेळा कलम पठण, दान देणे, रोजा ठेवणे व जीवनात एकदा तरी हजला जाणे आवश्यक मानले जाते. वरील सहा गोष्टींवर पूर्ण श्रध्दा व पाच आचारांचे पालन मिळून इस्लाम धर्म बनतो. वरील सहा गोष्टींवरून इस्लामांची जी जीवनदृष्टी स्पष्ट होते त्यात त्यांनी, इतर प्राण्यांच्या तुलनेत मानवास सृष्टीतील श्रेष्ठ घटक मानलेले आहे. तसेच मनुष्य जेव्हा जन्माला येतो तेव्हा तो कुठल्याही पूर्वसंस्कारांनी पापमय होत नाही. त्याला मिळणारे सुख वा दुःख हे त्याच्या कर्माचा परिणाम आहे. मरणोत्तर स्वर्गनरकाची कल्पना इस्लामांना मान्य आहे. तसेच ईष्वरी प्राप्तीसाठी इस्लामधर्ममध्ये कर्मकाण्डाला स्थान नाही. प्रत्येकाला त्याच्या कर्मफलाप्रमाणे स्वर्गनरक प्राप्त होतो. अशी त्यांची श्रध्दा आहे. याशिवाय इस्लाम धर्माने, मानवाने जीवनात कसे वागावे, या संबंधी काही नियम सांगितलेले आहेत. या नियमांचे पालन करणे प्रत्येक इस्लामी व्यक्तीचे कर्तव्य मानले गेले आहे. ते खालील प्रमाणे – 1) ईश्वराप्रित्यर्थ सेवा करणे 2) ज्ञान संपादन करणे, 3) न्यायी बनणे 4) सत्य बोलणे 5) शिष्टाचारांचे पालन करणे 6) कृतज्ञता दर्शविणे 7) दान देणे 8) मातापित्यांची सेवा करणे 9) सौजन्य व नम्रतेचा स्वीकार करणे 10) प्राण्यांवर दया करणे 11) संकटाला धैर्याने सामोरे जाणे 12) क्षमा करणे 13) पष्चात्ताप होणे 14) मद्यपान न करणे 15) व्यभिचार न करणे 16) जुगार न खेळणे इत्यादी सदाचारावर इस्लाम धर्माने भर दिलेला आहे. सारांष रूपाने इस्लाम धर्माविशयी असे सांगता येईल की, अनाचार, हिंसा, पाप–दुर्गुण दूर करून जीवनात तपष्चर्या व ईष्वर चिंतन यावर अधिक भर द्या, ही षिकवण त्यांनी समाजाला दिली.

बौध्द धर्म :– इ. स. पूर्व सहाव्या शतकात बौध्द धर्म उदयास आला. भगवान बुध्दांनी प्रवर्तित केलेल्या धर्माची जगातील प्रचलित धर्मात गणना होते. बौध्द धर्म हा जगातील एकच असा धर्म आहे की जो मानवी प्रज्ञेतून निर्माण झालेला धर्म होय. बुध्दांच्या धर्मप्रसाराच्या या कार्याला सारनाथ पासून प्रारंभ झाला. वैदिक धर्मातील यज्ञ जातिभेद, व आत्म्याचे अमरत्व यांना विरोध करून कर्मकांडापेक्षा नैतिक वर्तन हे श्रेष्ठ होय व तोच मुक्तीचा मार्ग होय असे या धर्माने सांगितले. म्हणून जप, तप, उपवास, व्रत, तीर्थयात्रा इत्यादी नियम व्यर्थ असून तृष्णेचा पूर्णपणे नायनाट करणे हाच मोक्षाचा खरा उपाय होय. अशी शिकवण गौतम बुध्दांनी आपल्या धर्मप्रसाराच्या माध्यमातून लोकांना दिली.

गौतम बुध्दांनी ज्या गोष्टी बुध्दी पलिकडच्या आहेत, अनाकलनीय आहेत, त्या गोष्टींविषयी म्हणजे विष्वाची निर्मिती, विनाश, ब्रम्हतत्त्व, आत्मतत्त्व याविषयी तटस्थेतेची भूमिका घेतलेली होती. आपल्या दैनंदिन जीवनातील दुःखाशी याचा कोणत्याही प्रकारे संबंध नाही. म्हणून प्रत्यक्ष अनुभवास येणारी संकटे व नित्य प्रतीत होणारी दुःखे, यांनाच प्रबळ प्रमाण घेऊन त्यांनी बौध्द धर्माची उभारणी केली. त्यामुळेच या धर्मात, ईश्वर, आत्मा, परलोक इत्यादी तत्त्वांचे खंडन केलेले दिसून येते. शुध्द चरीत्र व संयमात्मक जीवन जगण्यास महत्त्व दिलेले आढळते. म्हणूनच बौध्द धर्माने, 'प्रज्ञा' व 'करूणा' यांना श्रेष्ठ स्थान देणारा, नीतीचा मार्ग सांगितलेला आहे. ज्याच्या आधारे अहंकाराचा निरास, चित्तशुध्दी व विश्व व्यापक मैत्री यांच्या योगाने या जन्मातच निर्वाण प्राप्ती शक्य आहे. सारनाथ येथील प्रवचनात सांगितलेल्या चारआर्यसत्याचा व आर्य अष्टांगमार्गाचा माध्यमातून त्यांनी हा नीतीचा उपदेश लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला.

ख्रिस्ती धर्म :– येशू ख्रिस्तांच्या नावाने प्रचलित असलेल्या संप्रदायाला किंवा धर्माला ख्रिस्ती धर्म म्हणतात. येशू ख्रिस्तांनी आपल्या असामान्य दैवी तेजाने, कार्याने, श्रेष्ठ नीतिमूल्यांवर आधारलेल्या धर्माचे प्रवर्तन केले. त्यांच्याच नावाने ओळखला जाणारा हा धर्म म्हणजे 'ख्रिस्ती धर्म' होय.

हा धर्म कोणत्याही शास्त्रावर सिध्दांतावर किंवा सुत्रावर आधारलेला नसून ख्रिस्तांविषयी दृढ श्रध्दा हाच त्याचा पाया होय. आंतरिक नैतिक प्रगती हे धर्माचे खरे लक्षण होय असे ख्रिस्ती धर्म मानतो. त्यांनी सामान्य माणसाला अनुलक्षून उच्चतम नैतिक आदेषांची षिकवण दिलेली आहे. प्रार्थना, परोपकार, बंधूभाव ही मूल्ये आचरणात आणण्यावर ख्रिस्ती धर्माचा भर आहे. अहंकार शून्य व अनन्यशरण ईश्वरी भक्ती हे ख्रिस्ती धर्माचे प्रमुख अंग होय. जीवनात भक्तीभाव विकसित करण्यासाठी वैयक्तिक व सामुदायिक प्रार्थनेला ख्रिस्ती धर्मात महत्त्वाचे स्थान आहे. त्याच बरोबर दानधर्म, उपवास, व्रतोत्सव, सण, समारंभ या गोष्टी आचरणात आणण्यावर व तसेच 'पश्चात्तापाला' म्हणजे आपण केलेल्या पापाबद्दल ईश्वराजवळ कबुली देउन त्याची क्षमा मागणे, या पष्चात्तापाला ख्रिस्ती धर्मात मन पालटणे असे म्हणतात. हा पश्चात्ताप मनुश्याचे अहंकेंद्रित्व नष्ट करून त्याला ईश्वर केंद्रित करतो.

जगातील सर्व प्राणीमात्रांवर प्रेम करावे. शेजाऱ्यावरच नाही तर वैऱ्यावर देखील प्रेम करा, असा संदेश देणारा ख्रिस्ती धर्म हा करूणा, प्रेम, सेवा या श्रेष्ठ मूल्यांवर आधारलेला असून, विष्वकल्याण ही त्यांची ध्येय दृष्टी आहे. या धर्माने ऐहिक, पारलैकिक, व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनाला नीतिमूल्यांचे अधिष्ठान दिलेले आहे. अशाप्रकारे 'धर्म' हाविशय जीवनस्पर्षी आहे. हा मानवी जीवनातील ऐतिहासिक घटक आहे. विविध धर्म संस्थापक, महापुरूश, प्रज्ञावंत, संत यांना जीवनाचा जो अन्वयार्थ समजला तो त्यांच्या त्यांच्या धर्मातून प्रकट झाला आहे व त्यानुसार त्या त्या धर्माच्या लोकसमूहात निर्माण झालेल्या धार्मिक प्रथा, दृष्टिकोण, मूल्यप्रणाली यामधून लोक समुहाचे धर्मशास्त्र निर्माण झाले असून, प्रत्येक धर्माचे धर्मशास्त्र हे स्वतंत्र आहे. प्रत्येकच धर्माने 'सत्य', 'अहिंसा', 'ब्रम्हचर्य', 'अपरिग्रह', 'अस्तेय' इ. जीवनमूल्यांना प्रतिष्ठा दिलेली आढळते. मानवाचा नैतिक विकास व्हावा व अज्ञान दूर व्हावे यासाठीच धर्माचे प्रवर्तन झालेले दिसून येते. त्याप्रमाणे प्रत्येकाने स्वहिता बरोबरच इतरांच्या हितासाठी देखील प्रयत्नशील रहावे, समाजाची सेवा करावी यावर सर्व धर्मांनी भर दिलेले आढळून येतो.

निष्कर्ष – सर्व धर्माचा इतिहास पाहता असे लक्षात येते की, प्रत्येकच धर्माच्या प्रवर्तनास व विकासास अनेक चिंतनशील निःस्वार्थी, लोक कल्याणाची इच्छा असणारे संत, महात्म प्रेशित, मुनी अशा महापुरूशांची प्रज्ञा व प्रयत्न यांची मदत झालेली आढळते. अतःप्रज्ञेचा साहाय्याने जाणलेले जीवनरहस्य या महापुरूशांनी आपल्या धर्मप्रणालीतून प्रकट केलेले आढळते. प्रत्येक धर्म संस्थापकाने मानवी जीवनात समाधान, षांती लाभावी व अंतिम सत्याकडे वाटचाल करता यावी म्हणून त्यांच्या धर्मग्रंथात आचारसंहीता घालून दिलेल्या आहेत. प्रत्येक धर्माची स्थापना करणारा धर्मसंस्थापक, त्याने घालून दिलेले आचार, विचार विषयक धर्मग्रंथ हा त्या त्या धर्माच्या लोकांसाठी श्रेष्ठ ठरतो. म्हणूनच जीवन जगत असताना आपापला धर्मग्रंथ प्रमाण मानूनच सर्व धर्मातील माणसे आयुश्यातील सारे व्यवहार करीत असतात. 'गीता', 'कुराण', 'बायबल', 'त्रिपिटक' यासारखे धर्मग्रंथ क्रमषः हिंदू मुसलमान, ख्रिष्चन, बौध्द इ. समाजाचा व्यवहाराला दिशा देताना दिसतात.

या प्रत्येक धर्मात प्रत्येक माणसाचा परमोच्च विकास व्हावा, त्याला पूर्णत्व प्राप्त व्हावे, त्याला परमोच्च आनंद मिळावा, कैवल्य, निर्वाण, मोक्ष मिळावा ही निःश्रेयस कल्पना प्रभावी दिसते, त्याच प्रमाणे सामाजिक सदाचरणावरही प्रत्येक धर्माने भर दिलेला आढळून येतो. याचाच अर्थ असा की, अभुदय (प्रपंच) आणि निःश्रेयस (परमार्थ) या दोन्हींची सांगड कशी घालावी याचे उत्तम मार्गदर्शन प्रत्येक धर्मात केलेले दिसून येते.

संदर्भ ग्रंथ

1. *दिक्षित श्रीनिवास – भारतीय तत्वज्ञान.*
2. *जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री – लेखनसंग्रह खंड पहिला*
3. *जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री – वैदिक संस्कृतीचा वकास.*
4. *जोशी ज. वा. – धर्माचे तत्त्वज्ञान*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

''मराठी विज्ञान कादंबरीतील विज्ञानवादी जीवनदृष्टी''

डॉ. शिवचरण गिरी
वसंतराव नाईक महाविद्यालय, औरंगाबाद

★★★

आधुनिक मराठी साहित्य प्रवाहातील विज्ञानसाहित्य हा एक महत्वपूर्ण वाङ्मय प्रकार असून विज्ञान कादंबरी हा त्यातील एक सशक्त साहित्य प्रकार आहे. आजवर मराठीत स्वतंत्र रूपांतरित व भाषांतरित अशा अनेक विज्ञान कादंब–यांची निर्मिती झालेली आहे. मराठीतील आघाडीच्या विज्ञान कादंबरीकारांच्या निवडक कादंब–यातील विज्ञानवादी जीवनदृष्टीचा शोध प्रस्तुत ठिकाणी घेतला आहे.

इ.स. 1960–70 च्या दशकात मराठी साहित्य प्रवाहात स्वतःची ओळख व अस्तित्व प्रस्थापित करतांनाच मराठी विज्ञान साहित्याने अनुभवाचे व अभ्यासाचे एक नवे दालन उघडे करून दिले. विज्ञान संशोधनामुळे गोंधळ, कुतूहल व आश्चर्य निर्माण झालेल्या सामान्यांच्या मनात विज्ञानाला साहित्य म्हणून रूजवणे हे विज्ञान साहित्यकांचे स्पखहणीय यश मानावे लागते. मराठी विज्ञान कादंबरीकारांनी विज्ञान आणि व्यक्तीच्या अनुबंधाचे अणुरेणू एका परिघात आणले, वैज्ञानिक प्रगतीच्या विधायक व विघातक अशा दोन्ही संभाव्य परिणामांचे चित्रण केले. माणूस व त्याचे जीवन हाच विज्ञान कादंबरीच्या निर्मितीचा प्रमुख घटक मानला एकूणच मराठी विज्ञान कादंबरीतून वैज्ञानिक प्रगतीच्या भविष्यकाळाचे, विज्ञानातील शोधांच्या परिणामांचे व त्याला सामो–या जाणा–या मानवाचे संभाव्यचित्र उभे केले. त्यातील समस्या प्रधान कथानकांमुळे त्या विज्ञानगर्भ व रहस्यमय झाल्या आहेत. विज्ञान कादंबरीतून एका अपरिचित पण संभाव्य अशा दृष्टीकोनातून जीवनदर्शन घडतांनाच विज्ञानाधिष्ठीत आशयाच्या माध्यमातून जीवसृष्टी व निसर्गाकडे पाहण्याचे रूढ संकेत बदलले. विज्ञान कादंबरीच्या आषय सूत्रातील विज्ञानाचे अधिष्ठान, वैज्ञानिक सूत्र–संकल्पनांचा कल्पनाविस्तार अज्ञात अशा भविष्यकाळाचे प्रक्षेपण, वातावरण, व्यक्तिरेखा, विज्ञानवादी जीवनदृश्टी व भाशेचे संमिश्र वळण यामुळे विज्ञान कादंबरीचे अन्य कादंबरीपेक्षा एक वेगळेपण निर्माण झाले आहे व एकूणच मराठी वाङ्मयाच्या कक्षा रूंदावल्या गेल्या आहेत.

विज्ञान कादंबरीचा आशय विज्ञाननिष्ठ असल्याने आपोआपच त्यातून एक विज्ञानवादी जीवनदृश्टी प्राप्त होते. विज्ञान कादंबरीचे वेगळेपण विज्ञाननिष्ठ आशयामध्ये आहे संभाव्य वैज्ञानिक सत्य हा विज्ञान कादंबरीचा आधार आहे. तरीही ती मानवकेंद्री असून मानवी जीवनाला व्यापणा–या चित्रणातून भविश्याचा वेध घेतला जातो. विज्ञाननिष्ठ, तर्कनिष्ठ, वस्तुनिष्ठ या विज्ञाननिष्ठेचा अविष्कार त्यातून होत असतानाच विज्ञान कादंबरीतून प्रमाण विज्ञान, कल्पनीय विज्ञान व काही वेळा व्याज विज्ञानही येते त्यातील कल्पनासृष्टी वाचकांपुढे वास्तव विष्वाचा नवार्थ मांडते आणि त्यातून मानवी जाणिवांच्या क्षितिज रूंदावते व एक नवी जीवनदृष्टी प्राप्त होते. विज्ञान कादंबरीकार वैज्ञानिक किंवा प्रचलित विज्ञानाची माहिती असलेला जाणकार असतो. त्याच्या जीवनदृष्टीचा परिणाम कादंबरीवर असतो, प्रचलित विज्ञानाच्या भक्कम आधारावर भविष्यविषयीचा बुध्दिनिष्ठ अंदाज व त्याचा मानवी जीवनावरील परिणाम अधोरेखित करताना ज्या विज्ञानातील शोधांचा परिणाम मानवी जीवनावर होतो त्याला विज्ञान कादंबरी केंद्रस्थानी मानते. वैज्ञानिक घडामोडीचे ज्ञान, विज्ञानामुळे निर्माण झालेले फायदे अथवा तोटे आणि त्याला सामोरे जाण्याचे, त्या प्रष्नांची उकल करण्यास विज्ञान कादंबरी साहायभूत ठरते. एक प्रकारचा विज्ञानव्यासंग वाढवण्याचे कार्य कादंबरीच्या माध्यमातून होते. विज्ञानातील नव्या संकल्पना नवे शोध हे सामाजिक, कौटुंबिक घडामोडीत महत्वाचे परिणाम साधणारे घटक असतात. या घडामोडीचे चित्रण विज्ञान कादंबरीत असल्याने वाचकांचे वैज्ञानिक कुतूहल शमवत एक वैज्ञानिक दृष्टिकोन–जीवनदृष्टी व भोवतालच्या विष्वाबद्दलचे ज्ञान अद्ययावत करण्यास विज्ञान कादंबरी महत्वाचे साधन ठरते. मराठी वैज्ञानिक कादंबरीतील दृष्टेपणाची चिकित्सा करताना रा.ग. जाधव म्हणतात, खरे तर, आपली अध्यात्मप्रवण मानसिकता आणि वैज्ञानिक जीवनदृष्टी यांच्या सर्जनशील संयोगातून आपणास वैज्ञानिक कादंबरीतून दृष्टेपणाची अपूर्व रंगरूपे गवसू शकतात. एवढेच नव्हे, तर सामाजिक वास्तवाच्या चित्रणालाही कालोचित असा दृष्टीपणा त्यामुळे प्राप्त होईल. वैज्ञानिक जीवनदृष्टी ही मूलतः समाज संस्कृती निरपेक्ष असते. सामाजिक–सांस्कृतिक वास्तवाच्या जटिल डोके दुखीतून बाहेर पडून नव्या मानवी परिप्रेक्ष्यातील निर्मिती करण्यास वैज्ञानिक मानसिकतेची मदत होईल असे वाटते. कादंबरीतील दृष्टेपण हे उद्या–परवाचे पाहूणे, संभाव्य पाहणे भावी भविष्यकालीन पाहणे यांसारख्या कथ्यनांचा त्याच्याशी संबंध सूचवत हे दृष्टेपण पुढचे पाहण्याशी बांधील असून भविष्यवेधक मर्मदृष्टी म्हणजेच कादंबरीतील दृष्टीपणा असून कादंबरीकार हाच त्याचा जनक असल्याने त्याची जीवनदृष्टी कादंबरीतील दृष्टेपण ठरते.

विज्ञान कादंबरीच्या माध्यमातून लेखक साहित्यमूल्यांची जोपासना करतानाच वाचकांना विज्ञानसाक्षर करून त्यांच्यातील गैरसमज, अंध ाश्रध्दा दूर करण्यास व एक वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यास मदत करतो. सत्यावरची श्रध्दा हा वैज्ञानिक दृष्टिकोनाचा पाया असतो. 'वैज्ञानिक दृष्टिकोनाची व्याप्ती' स्पष्ट करतांना सुधीर पानसे म्हणतात 'सम'वैज्ञानिक दृष्टिकोन ही संज्ञा केवळ विज्ञान शोधकार्य व संदर्भासाठी मर्यादित नसून त्याच्या अवाक्यात आपल्या संपूर्ण जीवनाचा व्यवहार मावतो. भोवताली व्यवहार करताना जी गृहितके, ज्या धारणा आपण अवलंबितो त्या तर्क आणि अनुभवाशी सुसंगत असाव्यात असा अग्रह वैज्ञानिक दृष्टिकोनात अभिप्रेत असतो''

विज्ञान कादंबरीच्या माध्यमातून वैज्ञानिक जीवनदृष्टी समाजात रूजली जाते व त्यासाठी लेखक वैज्ञानिक दृष्टिकोनाला समाजात उपकारक तसेच अपकारक असणा–या प्रेरणा–प्रवृत्तीचा शोध घेतो. विज्ञान कादंबरी वाचकाला जगाकडे डोळसपणे, चौकस बुध्दीने व विवेकशील वृतीने पाहण्यास व तर्कशुध्द पध्दतीने विचार करण्यास भाग पाडते. संभाव्य वैज्ञानिक प्रगतीचा भविष्यकालीन दर्शनातून वर्तमान वास्तवाचे अन्वयार्थ लक्षात आणून देताना कधी कधी त्यातून वास्तवदर्शी चित्रही रेखाटले जाते. एकूणच विज्ञान कादंबरीतील विज्ञान, वैज्ञानिक व विज्ञानव्यवहार यांच्या दर्शनातून एक वैज्ञानिक जीवनदृष्टी निर्माण होते. विज्ञान कादंबरी या सृजनषील वाङ्मय प्रकारातून वैज्ञानिक उदबोधन आणि मानव्याच्या शोधा बरोबरच प्रगत विज्ञानाचा मानवी जीवनावरील परिणामांची व वैज्ञानिक प्रगतीबरोबर बदलणारे नवे जग त्याविशयीचे कूतूहल शमवून एका नव्या विष्वाबोधाची प्रचिती करून देतानाच साहित्यकृती म्हणून काळाच्या कसोटीवर उतरते. हे स्पष्ट करताना रवींद्र किंबहुने म्हणतात, ''कुठल्याही साहित्यकृतीचे श्रेष्ठत्व किंवा महत्ता अंतिमतः तिच्यातील विष्वबोधाशी जडलेले असते. सदर विश्व बोध स्वतंत्र सहज, व्यापक आणि दर्जेदार भाषेतून व्यक्त होत असेल तरच ती कृती काळाच्या कसोटीवर टिकते आणि तिचा प्रभाव नंतरच्या पिढयांनाही नवी अर्थवत्ता सूचित करून देउ शकते.''अशी काळाच्या कसोटीवर टिकण्याची क्षमता विज्ञान कादंबरीमध्ये असून साहित्यमूल्यांबरोबरच त्यातील जीवनदर्शन विज्ञानप्रणीत मानवी समस्या व विज्ञानाने प्रभावित झालेल्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनमूल्यांतून एक नवी जीवनदृष्टी प्रतीत होते. विज्ञान हे मानवी जीवनात अमूलाग्र परिवर्तन घडवण्याचे साधन आहे व विज्ञान कादंबरीच्या माध्यमातून परंपरेने जोपासले गेलेले गैरसमज दूर होउन नव्या ज्ञानाने मानवाचे उदबोधन होते व भविष्यकालीन समाजजीवनाची पूर्वकल्पना देण्यास उपयुक्त ठरते. एकूणच मराठी विज्ञान कादंबरीतून अशी विज्ञानवादी जीवनदृष्टी प्रतीत होताना दिसते.

जयंत नारळीकरांच्या एकूणच विज्ञान कादंबरीतून वाचकांची विज्ञानविषयक जागृती व वैज्ञानिक दृष्टीकोनाची निर्मिती करणा–या आहेत. विज्ञानाला केंद्रस्थानी ठेवून विज्ञान आणि मानवी जीवन यांच्या संबंधावर त्या प्रकाश टाकताना त्यातून विज्ञान प्रबोधनाची दृष्टी अभिव्यक्त करतात. 'प्रेशित' या कादंबरीतील वैज्ञानिक कल्पना परग्रहावरील सजीवसृष्टीचा पृथ्वीशी झालेला संपर्क हा असला तरी मानवी अस्तित्वाच्या लढयाला केंद्रस्थानी ठेवून वसाहतवादाच्या पार्श्वभूमीवर सांस्कृतिकदृष्टया भाष्य करते व पृथ्वीवरील भविश्यकालीन कल्पित आदर्ष स्थितीचे चित्र रेखाटतानाच त्यात खगोलशास्त्र, भौतिक, गणित, संगणक, मनोविज्ञान यांसारख्या विज्ञानातील आजवरच्या ज्ञानाचा आणि संभाव्य प्रगतीच्या शास्त्रीय आधाराने योगायोग कल्पित यांच्या माध्यमातून विज्ञान–तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे दर्शन व भविष्यकालीन समाजाची नवी मूल्यदृष्टी प्रगट करते. विज्ञानातील शोध, शोधक्रिया रहस्याच्या मार्गाने उकलत रहस्य आणि विज्ञान यांचा संयोग साधते. 'सायक्लॉप्स' प्रकल्पाच्या माध्यमातून अवकाश संशोधकाचा आजवरचा टप्पा आणि भविष्यातील प्रगतीचा आलेख मांडला जातो. देश–विदेशातील संशोधक, वेधशाळा, त्यातील संशोधन विज्ञानविरोधी वातावरण, मानवातील विविधा वृत्ती–प्रवृत्ती, निसर्गाबददलचे त्याचे कुतूहल, मुलभूत संशोधनाचे सामान्यांच्या जीवनावर होणारे परिणाम इत्यादीतून एक वैज्ञानिक जीवनदृष्टीचा प्रत्यय येतो इ.स. 1985 ते इ.स. 2047 पर्यंतच्या विस्तृत वैज्ञानिक घडामोडीतून विज्ञानवादी जीवनदृष्टीचे दर्शन घडवतात 'वामन परत न आला' या कादंबरीतून विज्ञानाच्या प्रगतीतून मानवाने निसर्गाच्या नियमांमध्ये बदल करण्याचा प्रयत्न केला तर कोणते भयावह परिणाम भोगावे लागतील. याचे चित्र विज्ञान कल्पनेच्या साहचयाने उभे केले आहे. तर 'व्हायरस' मधील नारायण जगताप व 'अंतराळातील स्फोट' मधील अविनाष नेने यांच्या माध्यमातून संषोधकाची मानव्यासाठीची तळमळ, धडपड व त्यांच्या कार्यातून विज्ञानातील शोधकार्य अखिल मानवजातीच्या कल्याणाचे साधन व्हावे तदवतच विज्ञान प्रगतीच्या अतिवापराचे दुष्परिणाम व भविष्यातील अण्वस्त्रासारख्या घातक शस्त्रावर माथेफिरूंचा ताबा इत्यादींच्या माध्यमातून भविष्यकालीन मानवाच्या परस्पर संबंधावर भाष्य करते व विज्ञानाच्या विनाशक वापरावर मानवाने आवर घालून त्याचा विधायक वापर करावा हे सूचित करते. मनोरंजनातून विज्ञान प्रबोधनाची दृष्टी ठेवत एकूणच विज्ञान कादंबरी हे उद्याचे वास्तव असून त्या वास्तवाकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी नारळीकरांच्या कादंबरीतून दृष्टीस येते. निरंजन घाटे यांच्या 'वारस' कादंबरीतील भविष्यकालीन मानवाची विज्ञान–तंत्रज्ञानाची प्रगती आणि संपूर्ण विष्वाबाहेर अधिराज्य गाजवण्याची प्रेरणा या मानवी प्रवृत्तीवर भाष्य करते. तर हेबळेकरांच्या 'आदित्य' मधून आधुनिक विज्ञान संशोधनाचा वापर करणारा माणूसही तेवढाच सक्षम असावा, अन्यथा ते संशोधन मानवाच्या हितास बाधा निर्माण करणारे ठरू शकते, मानवातील भ्रष्टाचारी प्रवृत्ती विनाशकारी ठरू शकते व विज्ञानातील संशोधन हे मानवाच्या विधायक कार्यासाठीच असावे याची जाणीव करून देत विज्ञानवादी दृष्टीतून वर्तमानकालीन समस्यांचा वेध घेते. मानवाच्या अंतराळ प्रवासातील वैज्ञानिक प्रगतीचा वेध व भविश्यकाळात मानव पष्थ्वीबाहय वसाहती निर्माण करू शकतो. या बरोबरच मानवा–मानवातील वृत्ती–प्रवृत्ती, वंषभेद, वर्णभेद दूर झाला तर विज्ञानाच्या साहाचयाने मानव अशक्य गोष्टी शक्य करू शकेल, परंतु त्यासाठी माणसातला 'माणूस' जिवंत असणे गरजेचे असल्याची दृष्टी 'जोनास आर्क' मधील भारतीय शास्त्रज्ञ डॉ. परेश शिरालीच्या माध्यमातून दाखवून देतात, तर निसर्गाच्या पुढे मानव व त्याचे विज्ञानही अपुरे ठरते याची जाणीव करून देत आदिम संस्कृतीतील मानवाची विकृत कामांध वासना विनाशकारी मार्गानेच घेउन जाते याचे चित्र एका काल्पनिक संस्कष्तीच्या निर्मितीतून 'भद्रमुखी' सारख्या कादंबरीतून ज्वालामुखीच्या उद्रेकातून व आदिम संस्कृतीच्या विनाशातून लेखकाने दर्शवले आहे.

पृथ्वीवरील अण्वस्त्रांच्या निर्मितीसाठीची स्पर्धा, त्यासाठी केला जाणारा प्रचंड मोठा खर्च, वापरली जाणारी बुध्दी, विशमतेकडे केले जाणारे

दुर्लक्ष या सर्व गोष्टी मानवतेच्या दृष्टीकोनातून मूर्खपणाच्या आहेत याची जाणीव 'विप्लवा' या काल्पनिक पृथ्वीबाहय प्रगत जीवसृष्टीच्या आदर्श संस्कृतीच्या माध्यमातून दाखवतानाच अशा आदर्श संस्कृतीची खरी गरज पृथ्वीवरील मानवाला असल्याची कल्पनादृष्टी देतानाच मानवाला अखंड पृथ्वीबदल विचारप्रवृत्त करत एक नवी जीवनदृष्टी अरूणसाधू यांच्या 'विप्लवा' या कादंबरीतून प्राप्त होते तर 'स्फोट' सारख्या कादंबरीतून जगातील वाढत्या लोकसंख्येची समस्या आणि त्यावरील तेवढाच अनैसर्गिक उपाय, भावना व बौध्दिक वस्तुनिष्ठता यांच्या द्वंातील सामाजिक, मानसिक, नैतिक संघर्षाची चिकित्सा करणारी कादंबरी ठरते. 'क्लोनिंग' सारख्या तंत्रज्ञानाने मानवाने निसर्गाला दिलेले आव्हान व अंतराळ संशोधनातील मानवाचे भविष्यातील पुढचे पाउल, महत्त्वाकांक्षा यातून विज्ञानाच्या विश्वरूपाचे दर्शन डॉ. पंडित विद्यासागर यांच्या 'सुपरक्लोन' मधून घडते. विश्वाचे अनादी–अनंतरूप आणि त्यात मानवापेक्षा प्रगत संस्कृतीचा संपर्क झाला तर मानवाच्या अस्तित्वा संबंधीची समस्या, अज्ञात बददलची भीती आणि त्यातून मानवाने उचलले पाऊल, त्याचा भविश्यातील पिढीवर होउ शकणारे परिणाम याचे कल्पनाचित्र साकारतानाच संशोधनातील मूलगामी वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगला नाही तर मानवजातीच्या प्रगतीची दिशाच खुंटेल अशी विज्ञान प्रगतीच्या संभाव्य परिणामाबददलची दृष्टी 'देवांसि जिवें मारिले' सारख्या कादंबरीतून प्रतीत होते. अंतराळातील सजीव हेच देव असून ते कुठल्याही ध र्माशी जोडले गेलेले नाहीत ही विज्ञानवादी दृष्टी दर्शविते. अंतराळातून मानवावर 'व्हायरसच्या' रूपाने येऊन शकणारे संकट आणि त्याच मानवातील सामूहिक व अंतर्गत मनोवृत्तीच्या शोधातून मानवी अस्तित्व, दुःख, वेदना यासारख्या गूढतेची विज्ञानाच्या साहचयाने केलेली उकल व वेदनारहित समाजनिर्मितीच्या दिशेने टाकलेले मानवाने पाऊल यांसारख्या मानशस्त्रीय वळणातून 'स्कायलॅब' सारख्या कादंबरीच्या माध्यमातून एक नवी दृष्टी वाचकांना चकित करते. तर 'ब्रेनवेव्हज' सारख्या कादंबरीतून उदात्त भावनेतून झालेल्या संशोध नाचे रूपांतर मानवाच्या विध्वंसक विकृत्तीमध्ये परावर्तित होउ शकते. अशा विकृत्तीला पोचवणारे संशोधन व संशोधक नष्ट होणे हीच ख–या संशोधकाची विज्ञानवादी जीवनदृष्टी प्रबळ ठरते. तर संशोध नाचा वापर अखिल मानवजातीच्या हितासाठी व्हावा की देश राष्ट्र आणि देशभक्ती यापुरतेच ते मर्यादित राहावे या द्वंद्वातून संशोध काच्या मनात निर्माण होणारा संघर्ष 'ऑपरेशन भागीरथी' सारख्या कादंबरीतून निर्माण होतो.

विज्ञानातील वेगवेगळया सूत्रावर, सिध्दांतावर आधारलेल्या विविध विषयांतून विज्ञान कादंबरीतून विज्ञानवादी जीवनदृष्टीचा परिचय होतो. आज विज्ञानाची प्रगती प्रचंड वेगाने होत आहे आणि त्याचा परिणाम मानवी जीवनावरही तेवढाच प्रचंड वेगाने होत आहे. विज्ञान–तंत्रज्ञानातून निर्माण झालेल्या साधनांचे बरे–वाईट परिणाम एकूणच मानवाच्या जीवनावरही होत आहेत, त्याच्या नाते–संबंधावर हात आहेत. अशा मानवी जीवनावर परिणाम घडवणा–या विज्ञानाच्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या व होऊ शकणा–या प्रश्नांना मानव कसा सामोरा जातो याचे प्रभावी चित्र विज्ञान कादंबरीत आहे. विज्ञान कादंबरीतील आशयसूत्र विज्ञानाधारित आहे त्यातून येणा–या कल्पित भविष्याच्या चित्रणालाही विज्ञानाचा आधार आहे आणि मुख्य म्हणजे तिच्या केंद्रस्थानी माणूसच आहे. विज्ञान कादंबरीतील कथानकातून वाचकांना वास्तवाकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी निर्माण करण्याचे कौशल्य विज्ञान कादंबरीकरांनी साधलेले आहे. जीवनाच्या विविध पैलूंचे दर्शन त्यातून घडते हे जीवनदर्शन विज्ञानाच्या आधारे अज्ञात काळातील वैज्ञानिक प्रगतीच्या आधारे लेखकाने साधलेले असल्याने कल्पित आशयातून वास्तवाकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी विज्ञान कादंबरीतून निर्माण होते, कारण त्यातील कल्पिताचा पाया हा प्रचलित विज्ञानावर आधारलेला आहे. त्यामुळे त्यातून एक विज्ञानवादी जीवनदृष्टी प्रत्ययास येते व वाचकांचीही अशीच एक विज्ञानवादी जीवनदृष्टी विज्ञान कादंबरीच्या वाचनातून बनत राहते.

संदर्भ

1. *रा.ग. जाधव 'निवडक समीक्षा' पदमगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती – 2006ण*
2. *सुधीर पानसे 'वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आपण' लोक वाड़मयागृह, मुंबई.*
3. *रवींद्र किंबहुने, 'विज्ञान कथाः मूल्यमापनाच्या समस्या' प्रतिष्ठान, मे–जून 2000.*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

इतिहास लेखनातील स्त्रीवादी प्रवाह

प्रा. डौले वैशाली नामदेव
लोकनेते रामदास पाटील धुमाळ,
कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

★★★

सारांश – **19** व्या शतकाच्या शेवटी इंग्लंड, अमेरिकेत झालेल्या मताधिकार आंदोलनापासून जागतिक स्त्रीमुक्ती चळवळीला सुरुवात झाली. २०व्या शतकात स्त्री हक्क व स्त्री स्वातंत्र्यासाठी अनेक आंदोलने झालेली दिसून येतात. अनेकदा स्त्रीवादी चळवळी पुरुशांच्या पुढाकाराने विकसित झालेल्या दिसून येतात. प्रस्तुत शोध निबंधात इतिहास लेखनातील स्त्रीवादी प्रवाह यावर अल्पसा प्रकाष टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

बीजशब्द– स्त्री, स्त्रीवादी, इतिहास, प्रवाह.

उद्दिष्टे–

१) स्त्रीवादी चळवळीचा अर्थ जाणून घेणे.
२) स्त्रीवादी चळवळीच्या विविधशाखांवर प्रकाश टाकणे.
३) स्त्रीयां विषयीच्या इतिहास लेखनाचा आढावा घेणे.
४) स्त्री वादी इतिहास लेखनाची संकल्पना समजावून घेणे.

गृहितके –

१) स्त्री वादी चळवळीमुळे स्त्रीला स्वतःच्या शक्तीचे भान आले.
२) स्त्रीवादी इतिहास लेखन वर्तमानकालीन स्त्रियांची परिस्थिती बदलण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेले दिसून येते.
३) स्त्री चळवळीचा इतिहास म्हणजे स्त्रियांच्या कर्तेपणाच्या इतिहासाची मांडणी स्त्रीवादी इतिहास करतो.

संशोधन पध्दती– वर्णनात्मक, ऐतिहासिक, विष्लेशणात्मक विषय ज्ञान–स्त्री वाद म्हणजे स्त्रीला स्वःताच्या शक्तीचे आलेले भान होय. एका बाजूने अन्याय, अत्याचार, शोषण या खाली दडपण्याचे याचे भान आणि दुसऱ्या बाजूला मानव जातीच्या प्रगती मधील सहभागाचे भान स्वतः ची किंमत स्वतःचा मान, स्वतःची अस्मिता यांचे भान म्हणजे स्त्रिवाद किंवा फेमिनिझम. जगाकडे नव्या चश्म्यातून पाहयला शिकणे म्हणजे फेमिनिझम फेमिनिझम ही आधुनिक काळातील संकल्पना आहे. Feminism हा मुळ शब्द लॅटिन भाषेतील आहे. विकिपीडिया व ऑक्सफर्ड शब्दकोशा प्रमाणे स्त्रीयांचा समान, राजकीय, सामाजिक ,आर्थिक आणि सांस्कृतिक हक्कांची व्याख्या करुन त्यासाठी लढणारे व हे हक्क कायम ठेवण्यासाठी लढणाऱ्या वेगवेगळ्या विचार सरणी व आंदोलने हे एकत्रितपणे म्हणजे स्त्रीवाद म्हणजे लिंगभेद झुगारुन स्त्रीपुरुष समानतेकडे वाटचाल करणारा विचार प्रवाह. पितृसत्ताक कुटुंब व्यवस्थेमुळे केवळ भारतात नव्हे तर जगाच्या इतिहासात स्त्रिया दीर्घकाळ शोषित व उपेक्षित राहिलेल्या पाश्चात्त्य देशात मात्र १८व्या शतकात स्त्रीवादी विचारसरणीचा उदय झाला. विकासित, विकसनशील देशात स्त्रीचळवळीचा अभ्यास वेगवेगळ्या टप्प्यावर केलेला आहे स्त्रीवाद म्हणजे समान हक्क, समान दर्जा ,व समान संधी होय. जगभरातील सर्व समाज व्यवस्थांनी स्त्रीच्या बाबतीत दुय्यम स्थान दिले गेले. सर्वत्र पितृसत्ताक कुटुंब व्यवस्था अस्तित्वात होती स्त्रीला स्वतःचे असे स्वतंत्र व्यक्तिमत्त्वही नव्हते. स्त्रीला पिता पुत्र पती यांच्या वर्चस्वाखाली राहावे लागत होते. युरोपमध्ये सोळाव्या शतकात धर्मसुधारणा चळवळ ,पुनरुज्जीवन चळवळ, फ्रेंच राज्यक्रांती, औद्योगिक क्रांती यासारख्या अनेक घटनांनी समाज जीवन हे ढवळून निघाले या सर्वांमुळे कला, विद्या साहित्य ,ज्ञान विज्ञान, तंत्रज्ञान आणि सामाजिक, आर्थिक ,राजकीय, क्षेत्रात बदल झाले यातून नवीन मूल्यव्यवस्था जन्माला आली . पाश्चात्त्य देशात स्त्रीया आपल्या अधिकारासाठी झगडू लागल्या. यातूनच पुढे स्त्री अभ्यासाची सुरुवात झाली. त्यातून स्त्रीयांच्या दडपणुकीच्या कारणांचा शोध घेऊन स्त्री–पुरुष समानतेच्या विचारातून स्त्रीवादी विचारसरणीचा उदय झाला तो पुढील प्रमाणे.

स्त्रीवादी विचारसरणीचे प्रमुख प्रवाह

१) उदारमतवादी स्त्री वाद

२) मार्क्सवादी स्त्रीवाद

३) जहालमतवादी स्त्रीवाद

४) समाजवादी स्त्रीवाद

५) काळा स्त्रीवाद

६) पर्यावरणी स्त्रीवाद – अठराव्या शतकात उदारमतवादी स्त्रीवादाचा युरोपमध्ये उदय झाला. या उदारमतवादी विचारसरणी स्त्री–पुरुष समानेतेवर भर देतात. स्त्रीने शिक्षण घेतलेच पाहिजे. जॉन स्टुअर्ट मिल, हॅरिएट टेलर दोघांनीही स्त्री–पुरुषांना सारखेच शिक्षण दिले पाहिजे. स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने नागरी हक्क व आर्थिक संधी ही मिळाल्या पाहिजे. जॉन स्टुअर्ट मिलचा सब्जेक्शन ऑफ वुमेनूहा ग्रंथ उदारमतवादी स्त्रीयांसाठी महत्त्वाचा मानला जातो. पत्नी व माता म्हणून स्त्रीयांना कामामध्ये शक्ती व वेळ खर्च होतो . स्त्रियांची उसंत व एकाग्रता ही सततच्या कामामुळे स्त्रियांकडून हिरावून घेतली जाते. एमली डेव्हिस, फ्लोरेंन्स, नाईटेगंल, फ्रान्सिस

पावर कॉल या स्त्रियांनी स्त्रीस्वातंत्र्याचा जोरदार पुरस्कार केलेला दिसून येतो.

मार्क्सवादी स्त्रीवाद–मार्क्सवादी स्त्री वादाने उदारमतवादी स्त्रीवादी विचारांतील कमतरता शोधून स्त्रीवाद हा अधिक मजबूत केला मार्क्सवादी स्त्रीवादी परंपरेत स्वप्नाळू समाजवादी विचारवंत फुरियर , रॉबर्ट ओवेन, त्याच प्रमाणे व्हीलर यांनी स्त्री प्रश्नासंबंधी विचार मंथन केलेले दिसते. भांडवल शाहीच्या उदया बरोबर स्त्रीचे आणखी अवमूल्यन झाले. स्त्रीयांचे श्रम स्वस्तात मिळून मजुरी कमीत ठरवली गेली. लिंगभाव सत्तासंबंध व समाजातील उत्पादनाचा व पुनरुत्पादन प्रक्रियेत स्त्रियांचे शोषण कसे होते याचे विष्लेशण मार्क्सवादी स्त्री वादाने केले.

फ्रेडरिक एंगल्स यांचाद ओरिजिन ऑफ द फॅमेली, प्रायव्हेट प्रोपर्टी अण्डद स्टेटहा मार्क्सवादी श्री वादी ग्रंथ होय. यामध्ये स्त्रियांचे शोषण हे निसर्गदत्त नसून ऐतिहासिक कालक्रमात कुटुंब व्यवस्था खाजगी मालमत्ता व राज्य संस्था हे कसे सुरु झाले याची मीमांसा केलेली आहे. मार्क्सवादी विचारवंत उदा. एंगल्स, कार्ल मार्क्स

जहालवादी स्त्रीवाद – जहाल स्त्रीयांच्या दुय्यम स्थानांची ची चिकित्सा करतो ऐतिहासिक दृष्ट्या स्त्रियांचे शोषण सर्वप्रथम झालेले दिसून येते. राज्य न्यायव्यवस्था अर्थव्यवस्था समाजातील विविध सामाजिक संस्था कुटुंब विवाह, धर्म, कला, साहित्य , तत्वज्ञान इ. संस्कृतीची विविध अंगे अषा सर्वच क्षेत्रांत व्यापून असलेली दिसून येतात. राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, लैंगिक, भौतिक मानसिकता शोषणाला कारणीभूत ठरते. जहालवादी विचारवंत उदा. शुलामिय फायरस्थने, केटमिलेट, जर्मेन ग्रिअर

समाजवादी स्त्रीवाद – समाजवादी स्त्रीवादाचा जन्म मार्क्सवादी स्त्रीवादातून झाला जूलिएट मिचेल या समाजवादी विचार वतीनेवुमन्स इस्टेटया ग्रंथात भांडवलशाही विषयी व पितृ सत्तेविषयी विष्लेषण केले. स्त्री विषयक व पुरुश विषयक धारणा, लिंग दृश्टया कामाचे विभाजन याविषयीचा विचार जोपर्यंत बदलत नाही. तोपर्यंत स्त्री पुरुष समानता अस्तित्वात येणार नाही. असे विचार देखील मिचलने सायको घ्नॅलिसिस ॲण्ड फेमिनिझम या ग्रंथात मांडले. समाजवादी विचारवंत–उदा. हायटी हार्टमन, आइसिंग यंग,ज्युलिएट मिचेल

काळा स्त्रीवाद – बेल हुक्स या काळ्या विचार वंतीने मांडलेले स्त्रीवादी चळवळ आणि काळ्यांची यापासून वेगळी काळ्या स्त्रियांनी आपली वेगळी चूल का मांडावी?

कृष्णवर्णीय स्त्रिया कायमच समाजातील अधिकच शोषित गट राहिलेला दिसून येतो. पितृसत्ता, वंशवाद व वसाहतीक अशा पाशातून पीडित अशी काळ्या स्त्रीवादी भूमिका होती. कोम्बही रिव्हरी कलेक्टीव्ह या गटाने काळ्या स्त्रियांच्या मुक्ती मुळे वंशवाद, लिंग वाद व वर्गवाद यांचा शेवट होईल असे घोषित केले. काळ्या स्त्रीवादी विचारवंत–बेल हुक्स, घलिस वॉकर, जेला डेविस

पर्यावरणीय स्त्रीवाद – आपल्या सभोवतालचा निसर्ग, त्यामधील जैवविविधता, संसाधने यांचा उपयोग करून मानवाने प्रगती केली. परंतु वैज्ञानिक क्रांती नंतर भांडवलशाहीने निसर्गाची लुटालूट केली त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळला. वंदना शिवा, मारिया मिस, यासारख्या पर्यावरणीय स्त्रीवादांनी विज्ञान तंत्रज्ञानाची समीक्षा केली. स्त्रिया त्यांच्या जैविक जडणघडणी मुळे निसर्गतः हा भावनिक, हळव्या असतात. ऋतुचक्र, बाळंतपण, संगोपन या प्रक्रियांशी जोडलेले असल्यामुळे त्या निसर्गाला न ओरबडता त्या निसर्गाचे संवर्धन करतात. आफ्रिकेतील वंगारी मथाई व भारतातील मेधा पाटकर ही पर्यावरणवादी नेत्यांची उदा. आहे.

निष्कर्ष– स्त्री अभ्यासाने इतिहास या ज्ञान शाखेचे स्वरूप बदलले. स्त्रीवादाचे स्त्री बद्दलचे आकलन जसे बदलत गेले .तसे स्त्रीवादी इतिहास लेखनाचे स्वरूपही बदलले. स्त्रीवादी इतिहास लेखनाचा इतिहासाचा कालखंड आकलनावर, सामाजिक विष्लेशणावर आणि आणि सामाजिक बदलांच्या सिद्धांकनांवर प्रभाव पडला. जगभरातील विविध देशातील गटांनी स्त्रियांच्या प्रश्नांची मांडणी केली.उदा. भारतात महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या नेत्यांनी स्त्रीमुक्तीचा विचार विकसित केला. इतिहास, राज्यशास्त्र अर्थशास्त्र समाजशास्त्र साहित्य या सर्वच शाखा स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून नवी मांडणी होताना आपणास दिसते.

संदर्भ

१) *विद्युत भागवत, शर्मिला रेगे, (संपादक) भारतातील समकालीन कळीचे प्रश्न स्त्रीवादी चळवळीचा आढावा.*

२) *विद्युत भागवत, षर्मिला रेगे, (संपादक) भारतातील समकालीन कळीचे प्रश्न स्त्रीवादी चळवळीचा चर्चा विषयचा आढावा.*

३) *डॉ. भारती नवथर, पुर्नवादाचा ऐतिहासिक अभ्यास (अप्रकाशित) लघुशोध प्रकल्प, २०१४*

४) *डॉ.भारती नवथर, पुर्नवादाचा ऐतिहासि अभ्यास (अप्रकाशित) लघुशोध प्रकल्प,२०१*

५) *प्रा.जास्वंदी वांबुरकर, (संपादक) इतिहासातील नवे प्रवाह , डायमंड पब्लिकेशन्स, २०१४*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

मुस्लिमस्त्रीयांची आर्थिक साक्षरता विशेष संदर्भ औरंगाबाद शहर

साहेब वि.पडलवार
(सहा.प्राध्यापक) समाजशास्त्र विभाग प्रमुख
ज.जि.म.वि.प्र. समाजाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय जळगाव.
अलमास अंजुम अहेफाज खान (संशोधक विद्यार्थीनी)

★★★

प्रस्तावना – कुठल्याही समाजाच्या विकासात निम्मा वाटा हा त्या समाजातील स्त्री चा असतो. जेवढ समाजामध्ये स्त्रीला कनिश्ठ स्थान असेल त्या समाजाच्या विकासाची गती तेवढी मंदावलेली असते. समाजाचा विकास जलद आणि चिरंतर करावयाचा असेल तर देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय विकासात स्त्रीयांचा सहभाग आवष्यक आहे. हे सत्य सर्वानाच माहीत आणि मान्य असून देखील पितृसत्ता समाज व्यवस्थेत स्त्रीयांना रूढी, प्रथा,परंपरेने जखडलेले आहेत. सर्व सत्ता ही पुरुषांच्या हाती आहे, स्त्रीला प्रत्येक वेळेस दुय्यमत्व स्वीकारव लागलं आहे. आजही मुस्लिम महिलांची स्थिति बघीतली तर ती असमाधान कारक आहे. पितृसत्ता कुटुंबपद्धती, पुरुषवर्चस्व, कुटुंबात देण्यात येणार कनिष्ठतेची भावनेमुळे मुस्लिम स्त्रिया तुलनेने अजूनही मागासलेली आहे. त्यातही आर्थिक व्यवहार करण्यास आणि निर्णय घेण्यास ती सक्षम नाही, ती जरी स्वतः कमवती असली तरी निर्णय घेण्याची अधिकार तिच्या हातात पुरुशांच्या तुलनेने कमीच आहे. मोठ मोठे व्यवहार, गुंतवणुकी हे सर्व निर्णय पुरुशांच्याच हाती आहेत हे आपल्याला रोजच्या निरक्षणातून दिसून येईल. आपण आर्थिक साक्षर होणे म्हणजे अगदी सोप्या शब्दात श्आपल्या उत्पन्नाचा आणि खर्चाचा मेळ घालून योग्य ठिकाणी गुंतवणूक करणे आणि कुवतीनुसार जोखीम घेऊन चांगला परतावा मिळवणे होय. येणार्‍या काळात आर्थिक साक्षरता ही सर्वांसाठी अत्यंत गरजेची गोष्ट होणार आहे. कारण आपल्या आजूबाजूला ज्या झपाट्याने बदल होत आहेत ते तर आपण टाळू शकत नाही. आपल्या उत्पन्नाचा आणि खर्चाचा मेळ घालणे आणि चांगला परतावा मिळवणे हे आर्थिक साक्षरतेचे निकश म्हणता येतील. आपल्याला वाटते तेवढे ते अवघड नाही. अत्यंत सोपे ठोकताळे वापरून आपण ते बर्‍याच अंशी साध्य करू शकतो.

"मुस्लिम स्त्रियांची आर्थिक साक्षरता" विशेष संदर्भ औरंगाबाद शहरातील वस्ती प्रस्तुत विषयांमध्ये मुस्लिम स्त्रियाना बँकेविषयी माहती आहे का ?, बँकेचे व्यवहार खाते सुरू करणे, पैसे जमा करणे, काढणे, ऑनलाईन बँकिंग, कॅशलेस व्यवहार , व्यवहारासाठी मोबाइल, लॅपटॉप,संगणकचा वापर करता का? , विमा विषयी किती प्रमाणात स्त्रियांना माहीती आहे ?, असल्यास किती स्त्रियानी स्वतःचा विमा उतरविला आहे ?, करविशयक व बचती विशयी नियोजन किती आणि कसे करतात ? त्यामध्येही स्वतः स्त्री किती प्रमाणात करतात ?, की पती किंवा कुटुंबातील इतर पुरुश निर्णय घेतात या वरुन स्त्रीयांची आर्थिक साक्षरतेचे अध्ययन करण्यात आलेले आहे.

अर्थरू सरळ साध्या आणि सोप्या भाशेत आर्थिक साक्षरता म्हणजे पैसे काय आहेत ? आणि पैषांच्या साहाय्याने आपण काय काय करू शकतो ?, पैसे कुठे आणि कशासाठी खर्च करायला हवेत?, भविष्याच्या दृष्टीने पैशांच नियोजन करणे ह्या गोष्टींचे ज्ञान असणे म्हणजेच आर्थिक साक्षरता होय.

संशोधनाच उद्दिष्टे–

१) वस्तीत राहणार्‍या मुस्लिम स्त्रियांच्या बचत व गुंतवणूक विषयीक प्रवृत्तीचा अभ्यास करणे.

२) वस्तीत राहणार्‍या मुस्लिम स्त्रियांमधील बँकिंग व्यवहार व विमा विषयक व्यवहारांची माहिती जाणून घेणे व खर्च व कर प्रवृत्तीचा अभ्यास करणे.

३) राष्ट्रीयकृत बँकेविषयी योजनांची माहिती आहे किंवा नाही हे जाणून घेणे. ४)स्वतः मोठे आर्थिक व्यवहार तसेच व्यवहारासाठी इंटरनेट, मोबाईल, कॉम्प्युटर ई. साधनांचा वापर करतात की नाही हे जाणून घेणे.

गृहीतकृत्ये

१) औरंगाबादमधील वस्तीत राहणार्‍या मुस्लिम स्त्रिया स्वतः आर्थिक व्यवहार करत नाही.

२) औरंगाबादमधील वस्तीत राहणार्‍या मुस्लिम स्त्रिया ऑनलाईन बँकिंग करत नाही.

३) औरंगाबादमधील वस्तीत राहणार्‍या मुस्लिम स्त्रिया बँकेचे सर्व व्यवहार स्वतः करत नाही.संशोधन पद्धती प्रस्तुत संशोधनासाठी प्रथमिक आणि द्वितीयक सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक आधारसामग्री जमा करण्यासाठी नमूना निवड पध्दतीचा संभाव्य नमूना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. नमूना म्हणून औरंगाबाद मधील वस्तीत राहणार्‍या ३० मुस्लिम स्त्रियांकडून मुलाखात अनुसूची च्या साह्याने तथ्य जमा करण्यात आले आहे. प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक आणि द्वितीयक सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. प्रत्यक्ष मुलाखात, इंटेरनेट, जनगणना अहवाल ई. माहिती तथ्याच्या सहाय्याने संशोधन केल आहे.

विश्लेषण – प्रस्तुत संषोधनामध्ये प्रष्नावलीच्या साह्याने तथ्य संकलन करुन विष्लेशण करण्याच्या प्रयत्न करण्यात आलेला आहे. त्यातले काही निवडक महत्वाचे प्रष्नांचे विष्लेशण, आणि स्पष्टीकरण पुढील प्रमाणे करण्यात आले आहे. ज्यामध्ये एकूण ३० नमूना पैकी टक्केवारीच्या साह्याने विष्लेशण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. औरंगाबाद शहरातील वस्ती मध्ये राहणाऱ्या मुस्लिम स्त्रियांच्या एकूण ३० नमून्या पैकी करविषयक व बचतीविषयक नियोजना विषयी माहितीच्या अभ्यास केला असता असे स्पष्ट होते की निवडलेले ३० नामूना पैकी १० मुस्लिम स्त्रिया कर व बचतीविषयक नियोजन करतात तर २० स्त्रिया ह्या करत नाही. यावरुन साधारणतः ६६.६७ः मुस्लिम स्त्रियाना करविषयी व बचती विषयीक माहीती नसेल किंवा याविषयी काम कसे करायचं हे माहिती नसेल.

विमाविषयी माहितीचा अभ्यास या मुद्याचे अध्ययन करताना असे आढळून आले की, ३० पैकी केवळ ५ स्त्रियांना विमा विशयी सखोल माहिती होती, तसेच विमा विशयी माहीती नसलेल्याची संख्या २५ होती. म्हणजे केवळ १६.६७ः औरंगाबाद मध्ये वस्तीत राहणाऱ्या मुस्लिम स्त्रीयाना विमा विषयी माहिती आहे आणि ८३.३३ः स्त्रियाना विमा विषयी माहिती नाही. या प्रमाणेच ३० पैकी केवळ ४ स्त्रीया म्हणजे १३.३३ः अशे आढळून आले की जे बँकेच्या सर्व व्यवहार स्वतः करतात, बाकी २६ म्हणजेच ८६.६६ः स्त्रिया पतीच्या साह्याने बँकेच्या व्यवहार करतात. ऑनलाईन बँकिंगच्या संदर्भात अभ्यास करताना

गृहितकृत्याची पडताळणी –

१) औरंगाबादमधील वस्तीत राहणाऱ्या मुस्लिम स्त्रिया स्वतः मोठे आर्थिक व्यवहार करत नाही. मुलाखत अनुसूची च्या साह्याने संकलन केलेल्या तथ्याचे आधारे १३.३३टक्के स्त्रिया स्वतः मोठे आर्थिक व्यवहार करतात तर ८६.६६टक्के मुस्लिम स्त्रिया ह्या स्वतः मोठे आर्थिक व्यवहार करत नाही. यावरून गृहितकृत्य क्र. १ सिद्ध झाले.

२) औरंगाबादमधील वस्तीत राहणाऱ्या मुस्लिम स्त्रिया ऑनलाईन बँकिंग करत नाही. प्रसूत संशोधनामध्ये एकूण स्त्रियांच्या ९०ः स्त्रिया ह्या ऑनलाईन बँकिंग करत नाही तर १० टक्के स्त्रिया ह्या ऑनलाईन बँकिंग करतात. यावरून गृहितकृत्य क्र. २ सिद्ध झाले.

३) औरंगाबादमधील वस्तीत राहणाऱ्या मुस्लिम स्त्रिया बँकेचे सर्व व्यवहार स्वतः करता नाही. एकूण स्त्रियांपैकी १३.३३ टक्के बँकेच्या सर्व व्यवहार स्वतः करतात, बाकी २६ म्हणजेच ८६.६६टक्के स्त्रिया पतीच्या साह्याने बँकेच्या व्यवहार करतात. यावरून गृहितकृत्य क्र. ३ सिद्ध झाले.

निष्कर्ष – तथ्य संकलन, तथ्यांच विश्लेषण, गृहितकृत्याची पडताळणी या सर्व गोष्टींचा अध्ययन केल्यानंतर निदर्शनास येत की मुस्लिम स्त्रीला अजूनही प्रवाहसोबत बदलण्यास अनेक अडचणी आहेत. सर्व आर्थिक व्यवहाराकरीता मुस्लिम स्त्री ही अजूनही पुरुषांवर अवलंबून आहे. स्त्रियांच समाजिक दर्जा बादलवायचा असेल तर स्त्रीला आर्थिक स्वावलंबी होणे, आर्थिक साक्षर होणे गरजेच आहे. आर्थिक साक्षरतेमुळे सामाजिक, आर्थिक स्थिती बदलेल महिलांना त्यांच्या क्षमतांची जाणीव करून वैयक्तिक स्वातंत्र्य व निर्णय घेण्याचा अधिकार मिळण्यास मदत होईल.

शिफारसी–

१) मुस्लिम स्त्रियांसाठी करविशयक आणि बचतविशयक नियोजन कसे करावे तसेच बचत कोणत्या गोष्टीमध्ये करावी या विषयीचे ज्ञान तसेच जनजागृती करावी.

२) मुस्लिम स्त्रियांनी गुंतवणूकीमधील सहभाग वाढविला पाहिजे तसेच स्त्रीयांनी काशामध्ये गुंतवणूक केली? त्याचा हातभार देशाच्या विकासासाठी लागेल जसे की, स्त्रियांना सोन्या, चांदी, मध्ये गुंतवणूक करण्याऐवजी बँक, रोखे बाजार, म्यूचुअल फंड ई. मध्ये गुंतवणूक करायला पाहिजे यावविषयीचे मार्गदर्शन शासनाने वारंवार करायला हवे.

३) कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तिनी स्त्रीविषयीचा दृष्टिकोण बदलावा लागेलच, जेणेकरून स्त्रीयांना आर्थिक व्यवहार करण्यास संधी मिळेल तसेच मोठ्या आर्थिक व्यवहारविशयी माहिती मिळेल व समाजातील स्त्रीयांचा दर्जा उंचावेल.

४) बँकच्या योजनांची जनजागृती करायला हव्या जेणेकरून सर्वांना योजनेविषयी माहिती होईल व योजनांचा लोक उपभोग घेऊ षकतील.

५) आधुनिक तंत्रज्ञानाविषयी माहिती प्रशिक्षण प्रत्येक घरातील स्त्रियां पर्यन्त पोहोचवली पाहिजे. ऑनलाइन बँकिंग ई. गोष्टींच्या वापराचे फायदे काय आहेत? या विषयी जनजागृती करायला हवी.

संदर्भ ग्रंथ

1. *डॉ. गीताली मंदाकीनी " स्त्रीप्रश्न सोडवताना ", दिलीपराज प्रकाषन प्रा.लि.,शनीवारपेठ पुणे.*
2. *डॉ नारायण भोसले "जात वर्ग लिंगभाव इतिहासमीमांसा ",अथर्व पब्लिकेशन ,धुळे.*
3. *डॉ नारायण भोसले "अब्राम्हणी स्त्रीवाद ",अथर्व पब्लिकेश,धुळे.*
4. *वंदना सोनाळकर ,शर्मिला रेगे "पितृसत्ता व स्त्रीमुक्ती "क्रांतीसिंह नाना पाटील अकादमी , अहमदनगर डॉ अशाक चौसाळकर धर्म समाज आणि राजकारण ", लोकवाडमय गृह, मुंबई*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

वृद्धांच्या कुटुंब विषयक समस्या –एक समाजशास्त्रीय अध्ययन

प्रा.डॉ. ज्ञानोबा विठ्ठलराव पडोळे
समाजशास्त्र विभाग प्रमुख
श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा
ता. उमरगा जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र)

★★★

प्रास्ताविक – कुटुंब संस्थेच्या विघटनातून वष्द्धाची समस्या निर्माण झाली संयुक्त कुटुंब आणि विभक्त कुटुंब हे सदस्य संख्या वर आधारित कुटुंबाचे प्रकार आहेत. संयुक्त कुटुंबात एकाहून अधिक पिण्याचे सदस्य एकत्र राहत असतात. सामायिक निवासस्थान सामायिक भोजन देव आदी देव कार्यक्रम संपत्ती पूजा विधी या बाबी संयुक्त कुटुंबात महत्त्वाचे असतात प्राचीन समाज व्यवस्था ही बलुतेदारी वर अवलंबून होती तर अर्थव्यवस्थाही शेतीवर अवलंबून होती कुटुंबात वृद्ध व्यक्तीला मानाचे स्थान होते त्यांच्या विचाराला घरात किंमत होती वृद्ध व्यक्तीला कुटुंबात सांभाळले जात होते जोपर्यंत त्यांचे हात–पाय चालत होते तोपर्यंत त्या व्यक्तीचाच कुटुंबात सल्ला घेत असत. परंतु आज विसाव्या शतकात औद्योगीकरण शहरीकरण आणि आधुनिकीकरण यामुळे संयुक्त कुटुंबांमध्ये संरक्षणात्मक आणि कार्यात्मक बदल झाले भारतात ६५ वर्षा वरील वर्धा चे प्रमाण 4 टक्के आहे आणि ते सतत वाढणार आहे तर अमेरिका स्वीडन इत्यादी अति प्रगत देशांमध्ये वृद्धांची संख्या बारा टक्के आहे वयोवृद्ध व्यक्तींना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते सर्वाधिक तरुणांची संख्या आज भारतामध्ये आहे परंतु काही दिवसानंतर भारत हा सर्वाधिक वृद्ध असणारा देश ठरणार आहे मानवाच्या जीवनात चार भाग पाडता येतात बालपण तारुण्य प्रौढत्व वरिधावस्था त्यातील वृद्धावस्था हा माणसाच्या आयुश्याचा साधारण ६५ व्या वर्षापासून मृत्यूपर्यंतचा कालखंड असतो वृद्धावस्थेत लोकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते शरीरातील अनेक अवयव कमजोर झालेली असतात त्याचबरोबर कुटुंबातील अनेक व्यक्तीची बोलणी खावी लागतात. इ.स.२०५० पर्यंत देशातील वृद्धांची संख्या २५ टक्के होण्याची शक्यता आहे भारतातील अनेक समस्यांपैकी आपण वृद्धांच्या कौटुंबिक समस्यांचा अभ्यास करणार आहोत वृद्धाच्या समस्याचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र शास्त्र उदयास आली आहे यास वृद्धाचे शास्त्र असे म्हणतात

वृद्धांची व्याख्या

१) एलिझाबेथ हरलॉक – वृद्धावस्था हा मानवी जीवनातील शेवटचा चरण आहे

२) **ऑक्सफर्ड डिक्शनरी**– वृद्ध म्हणजे सर्वसाधारणपणे साठ वर्षे पूर्ण केलेली व्यक्ती होय

३) हेन्ड्री आणि क्युमिंग– जीवनातील उपयोगी व अभिलाशा असणाऱ्या आरंभीच्या अवस्थेपासून दूर जाण्याच्या प्रक्रियेला वृद्धावस्था असे म्हणतात

संशोधनाचा उद्देश

१) वृद्धांच्या कौटुंबिक समस्यांचा अभ्यास करणे हा संशोधनाचा उद्देष आहे

२) वृद्धांच्या समस्या मागील कारणांचा आढावा घेणे

३) वृद्धाच्या समस्या चा अभ्यास करणे

४) वष्द्धांच्या समस्या वरील उपाय योजनांचा अभ्यास

१ संशोधनाची गृहितके–

१) वृद्धांचा कुटुंबातील दर्जा कमी झालेला आहे

२) वृद्धांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे

३) बदलत्या परिस्थितीषी वृद्धांना समायोजन साधता न आल्याने वष्द्धांचा प्रष्न गंभीर बनला आहे

४) अपवादात्मक परिस्थितीत वष्द्धाश्रम ही आधार अवस्था आवष्यक आहे

संशोधन पद्धती – प्रस्तुत षोध निबंध लिहिण्यासाठी द्वितीय स्त्रोतांचा आधार घेतला आहे यामध्ये ग्रंथ संपादित ग्रंथ वर्तमानपत्रे इत्यादींचा आधार घेतला आहे

वृद्धांच्या समस्या निर्मितीची कारणे – वृद्धत्व ही नैसर्गिक घटना आहे जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला या अवस्थेतून जावेच लागते. त्याच बरोबर औद्योगीकरण भारतीय जीवन मुल्यावर पाचषे त्यांचा प्रभाव चंगळवाद संमिश्र समाज पद्धती यात वृद्धाला दुर्लक्षित केले. यातूनच वष्द्धांच्या समस्या निर्माण झाल्या. आणि सध्याच्या समाज व्यवस्थेच्या बदलत्या परिस्थितीनुसार वृद्धांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे भारतात एकूण लोकसंख्येच्या जवळजवळ 75 टक्के लोक वृद्ध आहेत अशा वृद्धांच्या समस्या मागील पुढील कारणे पाहता येतील

१) कुटुंबाचे विघटन – भारतीय कुटुंबाच्या समस्यांना जबाबदार असलेला घटक म्हणून भारतातील बदललेल्या कुटुंबव्यवस्थेचा

नामोल्लेख करावा लागतो ारतीय समाजातील सर्व वृद्धांचा कुटुंबा महत्त्वाचा आधार होता परंतु पाश्चिमात्य राज्यकर्ते पाश्चात्त्य संपर्क त्यांनी येथे चालू केली कारखानदारी त्यातून वेगाने वाढलेले शहरीकरण यामुळे येथील कुटुंब पद्धती कुटुंबरचना कुटुंबाचे कार्य यामध्ये आमूलाग्र बदल झाला त्यामुळे व्यक्तीच्या वृद्धांचे अनेक प्रश्न निर्माण झाली म्हणून कुटुंबाचे विघटन हा एक प्रथाच या समस्येला कारण ठरलेला आहे

२) ग्रामीण भागाचे बदलते स्वरूप– पारंपारिक भारतीय समाजात अमृता पद्धती असल्यामुळे व्यवसायिक शिक्षण कुटुंबातच मिळत असे यामुळे वृद्धांच्या अनुभवाचा व्यावसायिक कसबा चा लाभ पुढील पिढीला होत असे शेती उद्योग याबाबतीत वर्धा कडून सल्ला घेतला जाईल पण आज आधुनिकीकरण औद्योगिकरणामुळे नवीन तंत्रज्ञान आले. त्यातून उत्पादन वाढले त्यामुळे वृद्धांच्या सल्ल्याला ज्ञानाला नवीन पुढे दुय्यम मानू लागली यातूनच दोन पिढ्यांमध्ये संघर्ष निर्माण होऊन वृद्धांचे प्रश्न निर्माण होऊ लागले

३) व्यक्तिवादी वृत्तीची जोपासना – आज भौतिक सुखाच्या कल्पनांच्या विस्तार झाल्यामुळे व्यक्तिवादी विचारांची जोपासना समाजात मोठ्या प्रमाणात होऊ लागली आहे आणि यादीत उत्पन्न उच्च सामाजिक दर्जा प्राप्त करण्याची अभिलाशा हिताला प्राधान्य यातून कुटुंबातील व्यक्ती व्यस्त झाले आहेत नोकरी व्यवसाय लघु उद्योग कुटिरोद्योग कौशल्य विविध स्पर्धात यशस्वी होण्यासाठी रस्सीखेच निर्माण झाली आहे त्यामुळे कुटुंबातील व्यक्तीचा सांभाळ करणे त्यांच्यासाठी वेळ देणे त्यांची काळजी घेणे कठीण झाली आहे यातूनच वृद्धांचा प्रश्न गंभीर बनला आहे

४) वृद्धत्वाकडे पाहण्याचा दृटिकोन – वृद्ध माणसाची शक्ती क्षीण होते. डोळ्यांना दिसत नाही, कानांनी ऐकू येत नाही, लक्षात राहत नाही, केस पिकतात, गळतात, त्वचेला सुरकुत्या पडतात इत्यादींमुळे वृद्ध व्यक्तींना कुटुंबातील व समाजातील व्यक्तींना समजून घेणे आवश्यक आहे. वृद्धांमध्ये हट्टीपणा, आग्रहत्मक भूमिका, आततायी स्वभाव याकडे कल चुकतो, यामुळे वृद्धाचे व नवीन पिढीचे विचार जुळत नाहीत. मने व मते यातील दरी रुंदावत जाते, संबंध पितृत्वाचे, सहानुभूतीचे राहण्याऐवजी तनाव पूर्ण होतात. यातून वृद्धाच्या समस्येत भर पडत जाते.

५) वृद्धांच्या कौटुंबिक समस्या – आज ग्रामीण व नागरी भागातील प्रत्येक मध्यमवर्गीय आणि निम्न वर्गीय कुटुंबाला आर्थिक समस्या जाणवते ह्यासाठी व्यक्ती व्यक्तिवादी दृष्टिकोनातून वर्तन करत आहे. मी व माझी बायको, मुले या शिवाय कुटुंबातील इतर व्यक्तीकडे लक्ष दिले जात नाही. येथूनच कुटुंबिक समस्यांना सुरुवात होते.

व्यवसाय, नोकरी, शेती करणाऱ्या नववधूना समाजातील बदलत्या वातावरणानुसार आपल्या पती व मुलाशिवाय इतरांची अडचण निर्माण होते येथेच कुटुंब बघण्यास सुरुवात होते. अशा वेळीच वृद्ध माता–पित्यांना शारीरिक, कौटुंबिक, मानसिक धक्का बसतो. एकाच घरात वेगळी चूल, वेगळा स्वयंपाक, वेगळी खोली जे काही संपूर्ण आयुश्य जगलं नाही असे जीवन जगण्याची वेळ आल्यामुळे मानसिक खच्चीकरण होत आहे.

कालपर्यंत अंगा खात्यांवर खेळणारी नातवंड आज आईवडिलांच्या सांगण्यामुळे दुरावली जात आहेत, सकाळ–संध्याकाळ विचारपूस करणाऱ्या व मुलगा–सून आता आठवड्यानंतर दिसू लागतील तीसुद्धा धुसफूस करीतच, कोठे जाव कसं जगावं कोठे बाहेर जायचं तर जवळ पैसा नाही, पैसा मागितला तर तो स्वखुशीने नमिता वैतागल्या सारखा फेकला जातो. मनात कुढत कुढत किती दिवस काढायचे यापेक्षा मरण आलेलं वर या मनोवृत्तीतून वृद्ध व्यक्ती जगत आहेत. जेवताना समाजातील इतर घटकांशी जुळवून घेणे जमते त्यावर त्यांना फारशी समस्या जाणवत नाही.

कुटुंबात वृद्धांना मानसन्मान न देणे.' कुटुंबातील व्यक्तीला आपण नकोसे झालो आहोत अशी वृद्धाची मानसिकता. विविध नाते संबंधित असणारे मतभेद. मालमत्तेची वाटणी न झाल्यामुळे. वृद्धाची सत्ता, वर्चस्व,मुलांना नको वाटणी इत्यादी कारणांमुळे कुटुंबात सत्तासंघर्श निर्माण होतो. बुद्धाचे पारंपारिक विचार नवीन पिढीतील लोकांना पटल्यामुळे दोघात सतत मतभेद होऊन कौटुंबिक समस्या निर्माण होते.

उपाय योजना –

१) स्वातंत्र्यपूर्व कालखंडात इ.स. 1940 मध्ये बेंगलोर येथे जीम तिपमदक पद needs society ही संस्था स्थापन करून वृद्धाची वृद्धाश्रमात द्वारे सेवा करण्याचा उद्देश समोर ठेवण्यात आला.

२) स्वातंत्र्योत्तर कालखंडात ई.स.1956 हिंदू दत्तक विधान कायद्यानुसार प्रत्येक व्यक्तीवर स्वतःच्या वृद्ध आई–वडिलांची काळजी घेण्याचे बंधनकारक करण्यात आले.

३) महाराष्ट्रात शासनाने 65 वर्षावरील निराधार व्यक्तींना निवृत्तिवेतन मिळण्याची व्यवस्था केली.

४) भारत सरकारने संजय गांधी निराधार योजने निराधारांना आर्थिक लाभ मिळवून देण्यात आला.

५) महाराष्ट्र सरकारने वृद्धांसाठी प्रवासभाड्यात सवलत देण्याची योजना एस.टी महामंडळाकडून राबवली.

६) वृद्धाश्रमांची उभारणी अनेक सामाजिक संस्था द्वारे व केंद्रीय समाज कल्याण बोर्ड कडून करण्यात आली.

७) वृद्धांसाठी दैनंदिन केंद्र स्थापन करणे यात मनोरंजन, खेळ,वाचनालय, वैद्यकीय मदत उपलब्ध करून देणे यात वृद्ध व्यक्ती दिवसभराचा कार्यक्रम आठवण रात्री आपल्या कुटुंबात परत जातील.

८) वृद्धांसाठी विविध बचत गट, वृद्धापकाळात निवृत्तीवेतन, तारुण्यातच सक्तीचे आर्थिक नियोजन करणे.

९) आधुनिक काळात वृद्धाश्रमाची कल्पना मान्य झाली आहे पुण्यामध्ये 885 मध्ये डेव्हिड ससून वृद्धाश्रम विदर्भातील नागपूर येथे मातृसेवा संघ द्वारे 1961 मधील पंचवटी वृद्धाश्रम.

निष्कर्ष –

१) विभक्त कुटुंब पद्धतीच्या व्यक्तिवादी दृष्टिकोनामुळे वृद्धांच्या कौटुंबिक समस्या निर्माण झालेली आहेत.

२) कुटुंबातील समाजातील व्यक्तींनी वृद्धांना समजून घेतल्यास व वृद्धांनी ही नवीन पिढी यांचे विचार जुळवून घेतल्यास वृद्धांच्या समस्या कमी होण्यास मदत होईल.

३) समाजातील सर्व वृद्धांना कौटुंबिक मानसिक, भावनिक, आधार मिळाल्यास वृद्धांचे प्रष्न सुलभतेने सुटतील.

४) पर्यायी आधारे व्यवस्थेमुळे दोन पिढीतील अंतर कमी होण्यास मदत होऊन संवाद सकारात्मक दिशेने होतील त्यातून वृद्धत्वाच्या प्रश्न निर्माण होणार नाहीत.

५) वृद्धत्व ही नैसर्गिक घटना आहे प्रत्येक व्यक्तीला या वस्तीतून जावेच लागते याची जाणीव निर्माण करणे गरजेचे वाटते.

समारोप – जर वष्द्धांना सुद्धा समजून घेतले आणि वृद्धांचा मान–सन्मान आदर सत्कार केला तर ते त्यांच्या समस्या विसरून जाऊन समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये सामील होतील आणि आनंदी जीवन जगतील त्यासाठी वरील उपाय योजनांचा सकारात्मक विचार व्हायला हवा.

संदर्भसूची –

१) समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना सर्जेराव साळुंखे

२) भारतीय समाज व्यवस्थेतील वृद्धाश्रम डॉ स्मिता अवचार

३) वृद्धांच्या समस्या चिंता आणि चिंतन डॉ दिलीप खैरनार

४) भारतीय समाज आव्हाने आणि समस्या रू रा.ज लोटे

५) संजय गांधी निराधार निराधार योजना कक्ष– सांगली

६) जेष्ठ नागरिक दिन वर्तमानपत्रे 20 ऑगस्ट 2018

७) सिंहासन –दिवाळी विषेशांक– 2018

८) भारतीय समाज प्रष्न आणि समस्या रू आर. बी. मेश्राम

९) भारतीय समाज प्रश्न आणि समस्या डॉ. सुधा काळदाते

१०) भारतातील सामाजिक समस्या प्रा. पी. के कुलकर्णी

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

महिला सक्षमीकरण–एक वास्तव

प्रा. कोल्हे तुकाराम त्रिंबकराव
सहयोगी प्राध्यापक (समाजशास्त्र विभाग)
वि.पा.शि.प्र.म.स. कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय कन्नड जि. औरंगाबाद.

★★★

संकल्पणा – महिला सक्षमीकरण म्हणजे सामाजिक, आर्थिक, राजकिय, सांस्कृतीके व शैक्षणिक दृष्टया महिला शक्तीमान होणे होय. महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांच्या असंभूत क्षमतांचा विधायक विकास होणे होय. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने निर्णय प्रक्रियेत व सामाजिक, राजकिय, आर्थिक व सांस्कृतीक व्यवस्थेत समान स्वरुपाची संधी, स्थान लाभ व प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. जननक्षमता, लौगिकता श्रमावर तसेच विचारांवर फक्त् पुरुषांचे वर्चस्व न राहता स्त्रियांना पुरुशांच्या बरोबरीने स्थान मिळणे आवशयक आहे. या सारख्या विचारास महिला सक्षमी करणाचा पाया मानतात. महिला सक्षमीकरण ही एक दिर्घकाळ व निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. या प्रकियेच्या व्दारे महिला सामुहिकपणे विकासाच्या ध्येयाने प्रेरित होऊन कार्यप्रवण राहातात. महिला आर्थीकदृष्टया स्वावलंबी स्वयंनिर्भर होतील तेव्हाचाच सर्व क्षेत्रात आत्विश्वासाने वावरु शकतील. ख–या अर्थाने त्याचे सबलीकरण होईल. स्तरूचे कुटुंब, समाज व राष्ट्राला त्यामुळे पुढे नेहतील. स्वयं सहाययता समुहाचा चळवळीमुळे महिला सक्षपिकरणातील ब–याच प्रमाणात पोषक वातावरण निर्माण झालेले आपणाला दिसून येते. स्वयंसहायता समुहाद्वारे बचत, कर्ज, व्यवसायामार्गाने महिला समाजात स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न करतांना स्वतारूच्या विकासाबरोबर आपल्या कुटुंबाच्या आर्थीक आडचणी सोडविण्यास हातभार लावतात तसेच त्या या प्रेरणेतुन राजकारण प्रवेष करतांना दिसतात. श्शासकीय धोरणामुळे त्याचा राजकिय सहभाग वाढला आहे. व ब–याच प्रमाणात महिलांची राजसाता निर्माण झालेली आहे. स्त्रियांच्या आत्मविश्वासात वाढ होतांना आपणास दिसत आहे.

यावरुन ब–याच प्रमाणात सामाजिक दर्जात व स्थानात वाढ होतांना दिसते त्यामुळे सामाजिक व राजकिय दर्जात वाढ झालेली आपणाला दिसून येते. कुटुंबाच्या विकासामध्ये स्त्रियांचे खुप महत्व आहे. प्रत्यक्ष आर्थिक दृश्टीकोणातून तरी स्त्री विकास करीत नसलीतरी इतर बाबतीत कुटुंबातील मुले, पिता यांचा विकास स्त्रीयांमार्फत होत असतो. कुटुंबातील स्त्री जर सबला असेल तर ती आपल्या मुलांचा, कुटुंबाचा विकास खुप चांगल्या प्रकारे करु शकते. जर स्त्रीयांना आर्थीक बाबतीत संधी दिली तर ती योग्य प्रकारे कुटुंब आर्थिक दृ ष्टया सक्षम करु शकते.**व्याख्या** – सबलीकरण ही एक बहुविविध पैलू असलेली बहुस्तरीय आणि प्रवाही सकल्पना आहे. त्यामुळे सबलीकरण किंवा सक्षमीकरणाच्या बाबतीत एकच मत किंवा एकव विधान करता येत नाही. म्हणून वास्तव एकच व्याख्या करता येते नाही. 1) महिला सबलीकरण म्हणजे स्त्रीच्या अंगी निर्णय घेण्याची नियंत्रण करण्याची संघतीत करण्याची, मतप्रदर्शन करण्याची कृ तीशील कार्यक्रमाचे आयोजन, लोकसंपर्क, आर्थिक व्यवहार करण्याची क्षमता व आवड निर्माण होणे यास महिला सबलीकरण म्हणतात. 2) अबला महिलांना सबला करण्यासाठी त्यांना समानसंधी देण्यासासाठी विचार मांडणे म्हणजे महिला सबलीकरण होय. 3) सामाजिक व आर्थिक दृष्टया स्त्रायावरील अन्याय व अत्याचार दूर करुन त्यांना न्याय मिळवून देणे म्हणजेच महिला सबलीकरण होय. मानवी हक्काविषयी अनेक आंतरराष्ट्रीय करारात मान्यता मिळूनही स्त्राया निर्धन आणि निरक्षर राहण्याचे प्रमाण मोठे आहे. वैद्याकीय सुविधा, मालमतेची मालकी, पत पुरवठा प्रषिक्षण आणी रोजगाराच्या बाबतीत पुरुशांच्या तुलनेत राजकिय दृष्टया सक्रीय असलेल्या प्रमाण कमीच दिसून येते. घरगुती हिसांचार्‌यां बाबतीत जेवढे प्रमाण कार्य होणे आवष्यक आहे, तेवढे होतांना दिसत नाही. स्त्रायांची मानसिकता बदलणे अतिशय महत्वाचे दिसून येत आहे. ग्रामीण भागात आतासुध्दा म्हणावे तेवढया प्रमाणात स्त्राया अजूनही स्वतारू निर्णय घेवू शकत नाहीत. या भागात आणखी देखील त्यांना पुरुषांच्या निर्णयावर आवलंबून राहतात. म्हणून त्यांची निर्णयसक्षता वाढविणे गरजेचे आहे. घटनेने त्यांना जे विविध प्रकारचे अधिकार दिलेले आहेत याची सविस्तर माहिती त्यांच्यापर्यंत पोहविली पाहिजे. त्यांचे योग्य ते प्रबोधन झाले पाहिजे. अजूनही स्त्रि ही 100 टक्के सक्षम आहे हे आपण मान्य करु षकत नाही. ही वस्तुस्थिती आहे हे आपण मान्यच करावे लागेल. स्त्रायांच्या बाबतीत निर्णय स्वतंत्र आपले जीवन कसे व्यतित करायचे, काय श्किायचे, कसे जगायचे, कोणाबरोबर जगायचे, कुठे जगायचे हया बाबतीत सर्वच निर्णय सक्षम स्त्रीला घेता यावेत. तिला भावनिक व शारिरीक स्वातंत्रयाच्या बाबतीत, तिला आपल्या भावना व्यक्त करण्याचे स्वातंत्रय दिल्यास खर्‌या अर्थाने महिलांचे सक्षमीकरण झाले असे आपणास म्हणता येईल.

दैनंदिन जीवनात अगदी सहजतेने विविध भूमिका पार पाडत महिला समाजाच्या आधारस्तंभ बनल्या आहेत. कधी प्रेमळ कन्या, तर कधी वात्सल्यपुर्ण माता, तर कधी सक्षम सहचारिणी अशी विविध नाती अत्यंत कुशलतेने आणि कोमलतेने त्या व्यवस्थीतपणे पार पाडतांना दिसतात म्हणजेच त्या आपली कर्तव्य निभावतना दिसतात असे असले तरी जगाच्या पाठीवर बर्‌याच ठिकाणी समाजाकडून त्यांच्याकडे दुर्लक्ष होतांना दिसते तसेच महिला मोठया प्रमाणात सामाजीक असमानता, अत्याचार, आर्थिक पारंबन्तीबाबत आणि अन्य सामाजिक अत्याचारांना बळी पडतात अगदी काळा पासून महिलांवरील ही

बंधने त्यांच्या वैयक्तीक आणी व्यावसायीक विकासाच्या आड येत आहेत. महिलांना समाजात सन्मान प्राप्त करुन देण्यासाठी आर्ट ऑफ लिव्हींगने समाजातील विविध स्तरावरील महिलांना आत्म सन्मान, अंतर्गत मजबुती आणि रचनात्मक विकासात कारणीभूत होती ल असे महिला सक्षमीकरण कार्यक्रम सुरु केले आहेत. या कार्यक्रमांमुळे महिला आता सर्व समस्यांवर मात करत आपले कौशल्य, आत्मविश्वास आणि उपयोगिताबाबात अग्रेसर होतांना दिसतात. आपल्या कुटुंबामध्ये, इतर महिलासाठी आणि समाजामध्ये शांतीचे आणि सकारात्मक सामाजिक परिवर्तनाचे प्रतिनिधीत्व करतांना दिसतात. जीवनात प्रगती आणि सक्षमीकरणासाठी (Mahila sashaktikaran) शिक्षणापेक्षा जास्त परिणामकारक काय असू शकते. आर्ट ऑफ लिविंगने शिक्षणाद्वारे देशातील कान्या कोपरऱ्यातील ग्रामीण मुली आणि महिलांना समान दर्जाने सक्षम बनवले आहे. या वरुन असे सिध्द होते की, स्त्रियांना आत्मनिर्धर व स्वतारूच्या पायावर उभे राहाण्यासाठी षिक्षणाची अत्यंत आवष्यकता दिसून येते त्यामध्ये यांत्रीक, कौषल्य, व्यवसायीक, तांत्रीक शिक्षण चालविणाऱ्याला मुलींना व स्त्रियांना भेटल्यास खऱ्या अर्थाने सबलीकरणाची सुरुवात झालेली दिसून येईल. पुर्ण जगात भारत देशाची संस्कृती परंपरा आध्यात्म व भौगोलीक विविधता यामुळे ओळखता जातो. ही नाण्याची एक बाजू झाली पण हाच देश जगभर पुरुषप्रधान संस्कृतीसाठी प्रसिध्द आहे. तस बघितले तर भारतात महिलांना आदर्श शक्तीचे रुप मानूनर पुरातन काळापासून पुजनीय मानले गेलेले आहे. त्याच वेळी याच भारतात महिला घरात आणि समाजामध्ये बंधनामध्ये आडकलेल्या आहेत त्यांना दुययम स्थान दिले जाते. त्यांचे अधिकार व विकास यापासून त्यंना बऱ्यांचप्रमाणात दूर केले जाते. तरीसुध्दा स्त्री पुरुष समानतेच्या गोष्टी बोलल्या जातात. महिलांच्या स्वताच्या व अधिकाराविषयी कळकळ वाटत केली जाते. असे असतांना कोपर्डी किंवा निर्भयाकांड सारख्या घटना घडतांना दिसतात. अशा वेळेस महिलांचे प्रश्न बिकट समस्या म्हणून उभ्या राहतात. त्यावर उपचार म्हणून समाजास महिलांना स्वयत्तता सुरक्षा व संरक्षण देण्यासाठी सबलीकरणाने अभियानाची सुरुवात करतो पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्री आज समाज व कुटुंबाच्या बंधनात अडकून पडली आहे. अर्थात पिता, पती आण पुत्र यांच्या आदेशाने आणि बंधनाने ती आपले आयुष्ट काढते नोकरदार स्त्रीयासुध्दा स्वतरूला पुर्णपणे सक्षम मानत नाहीत. त्यांच्यादृष्टीने कार्यक्रम घटनाचा पुरतेच मर्यादित सबलीकरण आहे. पण तसे न होता वास्तविकतेत महिलांना त्यांच्या क्षमतांची जाणीव करुन वैयक्तीक स्वतंत्रय व निर्णय घेण्याचा अधिकार मिळणे होय वैयक्तीक स्वातंत्रय व निर्णय घेण्याचा आधिकार मिळणे होय तरच त्यांना खऱ्या अर्थाने मुक्त स्वातंत्रयाचा लाभ घेता येईल. त्यांना त्यांच्या क्षमताची जाणीव करुन व त्यांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे तेव्हा त्यांना त्यांच्या एकूण अधिकाराची जावीण व माहिती होऊन त्यांचा विकास होण्यास मदत होईल व खऱ्या आर्थाने महिलांचे सबलीकरण होईल असे अभ्यासावरुन वाटते. मानवसमुहात स्त्रीजातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. स्त्रियांशी दृतोत्साहीत करणारे वर्तन त्यांचा जीवनस्तर उंचावण्याकडे दुर्लक्ष करण्यापासून ते त्यांचा छळ आणि अत्याचार करण्यापर्यंत अनेक प्रकारे हीनत्तवाची वागणूक स्त्रीजातीला मिळत राहिली आहे. हा भेदभाव दूर करुन स्त्रियांच्या प्रगतीस पोषक वातावरणाची निर्मीती आणी त्यांचे सुव्यवस्थीत नियोजन करणे आणि लैंगिक समतेद्वारे जेंडर इक्वॉलिटी समाजाचे संतुलन साधने यासाठी पुरोगामी आणि विवेकी समाजाने बाळगलेला दृष्टिकोत केलेली कृती यांचा समुच्च म्हणजे स्त्री सक्षमीकरण, असे थोडक्यात म्हणता येईल. मानवी हक्काविषयी अनेक आंतरराष्ट्रीय करारात मान्यता मिळूनही स्त्रीया निर्धन आणी निरक्षर राहण्याचे प्रमाणे मोठे आहे. वैदयकीय सुविधा, मालमत्तेचा मालकी, पतपुरवठा, प्रशिक्षण आणी रोजगारात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना कमी संधी मिळते. त्या पुरुषांच्या तुलनेत राजकीय दृष्टया सक्रीय असण्याची शक्यता फारच कमी आहे आणि त्या घरगुती हिंसाचाराचा बळी होण्याची शक्यता खुपच मोठी आहे. स्त्रियांना मानसिकता बदलणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागात अजूनही स्वतरूनिर्णय घेऊ शकत नाहीत. इथे त्या पुरुषांच्या निर्णयावर अवलंबून राहतात. त्यांची निर्णय क्षमता वाढणे गरजेचे आहे. घटनेने अनेक अधिकारी दिलेले आहेत, याची माहिती त्यांच्यापर्यंत पोहचली पाहिजी प्रबोधन झाले पाहिजे ती अजूनही 100 टक्के सक्षम आहे हे आपण मान्य करु शकत नाही. म्हणून आणखी समाज व्यवस्था आणि शासन व्यवस्थेने महिला सबलीकरणाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

निष्कर्ष

1) महिला सबलीकरणात महिलांच्या आंगभूत क्षमताचा विधायक विकास होतो.
2) स्वयंसहाययता समुह चळवळीमुळे महिला सबलीकरणाला पोषक वातावरण तयार झाले आहे.
3) कुटुंबात प्रामुख्याने आर्थिक दृश्टीने सक्षम करण्यासाठी स्त्रिची भूमिका महत्वाची ठरते.
4) महिला सबलीकरण ही एक अषी प्रक्रिया आहे की, स्त्रियामध्ये सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करते.
5) महिला सक्षमीकरणासाठी महिलांनी स्वावलंबी व आत्मनिर्भर बनले पाहिजे.
6) वास्तविकतेत महिलांना त्यांच्या क्षमताची जानीव करुन वैयक्तीक स्वातंत्रय व निर्णय घेण्याचा अधिकार मिळणे आवश्यक आहे.

संदर्भ ग्रंथ सूची

1) *स्त्री प्रश्नांची वाटचाल विदयूत भागवत.*
2) *Maharashtra times 1 Oct 2016.*
3) *पाटील शोभा (2007) स्त्रीवादी, विचार आणि समिक्षांचा मागोवा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.*
4) *रानडे प्रतिभा, स्त्री प्रश्नांची चर्चा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.*
5) *सहयोगी मार्गदर्शक पुस्तीका महिला विकास महामंडळ*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

"जागतिकीकरणाच्या प्रभावाचे मराठी साहित्य"

डॉ. प्रीती किशोर उमाठे
मराठी विभागप्रमुख
डॉ. एम. के. उमाठे कॉलेज, नागपूर.

★★★

आजचा काळ हा जागतिकी करणाचा आहे. आपले जीवन आपले भावविश्व आणि आपला समाज जागतिकीकरणाच्या संज्ञेत बद्ध झालेला आहे १९९१ मध्ये भारताने जागतिकीकरणाचा स्विकार करून आपल्या आर्थिक धोरणांना नवे रूप दिले. त्याचा परिणाम सामान्य माणसाच्या जीवनावर अधिक झाला माणसाला माणुस म्हणून जगण्यासाठी करावी लागणारी धडपड करूनही त्यांच्या समस्या वाढतच गेल्या. साहित्य हे समाजाचे एक महत्वपूर्ण अंग आहे. जागतिकीकरणाच्या कच्चाटातून साहीत्य ही सुटले नाही. मराठी साहित्यावरही जागतिकीकरणाचे परिणाम होऊन नव्या अंगाने ते लिहिले जाऊ लागले. माणसाच्या जगण्याच्या मुलभूत प्रश्न साहित्य मांडू लागले. मराठी जागतिकीकरणाने स्थित्यंतर घडून आल्याचे जागवू लागले. त्यामुळे नव्या जीवन जाणिवा निर्माण होऊन साहित्य पुढे येऊ लागते त्याची समिक्षा होऊ लागली. जागतिकीकरणाची संज्ञा आर्थिक स्तरांबरोबरच धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि वाङमयीन असा बहुविध क्षेत्रात बाधित करणारी अशी शक्तीमान, सामर्थ्यशाली संज्ञा आहे. जागतिकीकरण ही एक प्रक्रिया असुन तिचा संबंध मानवी जीवनाषी संस्कृतीशी आहे. जागतिकीकरणातून नव्या वसाहतवादी संस्कृतीचा जन्म झाला. संपूर्ण समाज जीवन ढवळून टाकणारी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा मराठी साहित्यावर परिणाम कसा झाला. याचा आढावा प्रस्तुत शोधप्रबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे. जागतिकीकरणाच्या चर्चा सुरू झाल्या तेव्हा त्याच्या कशा कशावर परिणाम होईल यांची चर्चा सुरू झाली. नव्वदीला आम्ही नवे आर्थिक धोरण स्विकारले मुक्त धोरणाचा पुरस्कार केला. विविध सेवाक्षेत्रात खुलेपना आला. नागरिकीकरणाचे साहित्यावर काय परिणाम झाले होतात यांची वेगवेगळ्या ठिकाणी चर्चा सुरू झाली जागतिकीकरण म्हणजे काय? त्यांचे स्वरूप कसे असते व त्यांचा समाजावर व साहीत्यावर परिणाम कसा होतो.

जागतिकीकरण म्हणजे काय – डॉ. मनमोहन सिंग भारताचे अर्थमंत्री असताना त्यांनी अमलात आणलेल्या नविन आर्थिक धोरणांमुळे १९९१ मध्ये भारतातील जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळाली त्यांच्या धोरणांना L.P.G. असे म्हटले गेले. 'एल' म्हणजे लिवलायझेशन म्हणजेच उदारीकरण आणि 'पी' म्हणजे प्रायव्हेटायझेशन म्हणजेच खाजगीकरण आणि 'जी' म्हणजे ग्लोबलायझेषन म्हणजेच जागतिकीकरण या तीन नवीन धोरणामूळेच भारतीय अर्थव्यवस्थेला जणु मोकळे आकाशच भांडवल आणि स्त्रोत आकृष्ट करण्यासाठी खुले वातावरण, आणि उदयोग सुरू करण्याची सुलभता उपलब्ध झालेल्या आहेत. अशा जागतिकीकरणाची व्याख्या काही अभ्यासकांनी दिलेला आहे.

1) मार्टिन आलब्रो आणि एलिझाबेध किंग :–"ज्यामुळे जगातील लोक एकाच वैष्विक समाजाचे महत्त्व बनतात अशा सर्व प्रक्रियांचा संदर्भ जागतिकीकरणाशी जोडलेला आहे."

2) ॲन्थनी गिडेन्स – "ज्यामुळे दुरावस्था प्रदेशांनी असलेले नाते अशा पध्दतीने जोडले जाते कि अनेक मैल दूर असलेल्या प्रदेशात घडणाऱ्या घटनांचे पडसाद स्थानिक घटनावर होतात आणि त्याच न्यायाने स्थानिक घटनांचा परिणाम जागतिक पातळीवरील घटनांवर होतो ती प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण" वरील व्याख्यावरून आपल्या लक्षात येते कि जागतिकिकरण, उदारीकरण आपल्या लक्षात येते. जागतिकीकरण याचा सरळ अर्थ 'मुक्तव्यापार' असा होतो. या प्रक्रियेत अमेरिका युरोपीय देश यांची मक्तेदारी असून त्यांनी आपला नवा साम्राज्यवाद जागतिक पातळीवर पसरविला आहे. याचे परिणाम, विकसनशील राष्ट्रातील साहित्य, कला, संस्कृती व समाज अशा सर्वच पातळीवर झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांच्यावरही जागतिकीकरणाचा परिणाम झाला आहे. साहित्य व समाज यांचा अनोखा असा संबंध आहे. जे समाजात निर्माण होत असते तेच साहित्यात येत असते. साहित्य समाज अनुभवातून जन्माला येऊन समाजाचे वस्तुरूप दर्शन प्रश्न आणि समस्या यांच्यासह घडवित असते मराठी साहीत्यं 1990 नंतरच्या काळात जे निर्माण झाले ते जागतिकिरणाच्या प्रवाहातून झालेले आहे त्याचा विचार या ठिकाणी करणे महत्वाचे आहे.

जागतिकिकरण आणि मराठी कथा व कविता– जागतिकीकरणाने मराठी माणसाचे अंर्तबाहय जीवन ढवळून निघाले आहे. त्याने अनेक स्थिततरे मराठी साहित्यात घडून आली. माणसाचे जीवन गुंतागुतीचे बनले नव्या जाणीवा निर्माण झाल्या. त्यामुळे मराठी साहित्य नवा चेहरा, नवे अंतरंग घेऊन पुढे येऊ लागले याला मराठी कथाही उपवाद ठरली नाही. सदानंद देशमुख यांनी 'लचांड' आणि उठावण या कथासंग्रहातून बदलेल्या गावांचे चित्रण रेखाटले आहे. श्रीराम गुंदेकर यांनी 'उचल' या कथासंग्रहातून सावकारही तिला बळी पडणारे श्रमिक, वेठविगारी यांचे चित्रण केले आहे. राजेन्द्र महाळ यांच्या कोंडी, सतिश तराळ यांचा 'लढा' या कथा संग्रहातून बदलत्या परिस्थितिचे चित्रण प्रत्यकारीपणे झाल्याचे दिसून येते.

जागतिकीकरणाने गावांचा विकास झाला. असे वखर दिसत असले तरी गावे उजाड बनली हे वास्तव आहे. गावगाडयाचे स्वरूप बदलून गेले. स्वावलंबी असलेले गावे परावलंबी बनली गरीब माणसाला जगणे मुश्कील झाले. ग्रामसंस्कृतीला तडे गेले. आलुतेदार आणि बसुतेदार गोंधळून गेले जागतिकीकरणाने खेडयातील नात्यातला जिव्हाळा संपूर्ण कृत्रिमता आली शेतीवर जीवापाड प्रेम करणाऱ्या शेतकऱ्याला मुलगा शेती विकायला सांगु लागला आलेल्या पैशातून पान तंबाखुची टपरी, मोबाईल शॉप काढू लागला नाही तर ढाबा टाकण्याची विपरीत बुध्दी तरूणांना सुचू लागली हे सर्व जागतिकीकरणाच्या प्रभावातून घडत होते. या सर्वांना कवींनी आपल्या कवितांमधून शब्दबध्द केले आहे. मराठी कवितेत जागतिकीकरणाचे वारे वाहू लागते. इंद्रजित भालेराव (टाहो) या संग्रहातील एका कवितेत म्हणतात.

"जागतिकीकरणाचा एन्ड्रीन डबा
कुणी धुतला माझ्या निर्मळ गंगेत
निरागस विहार करणाऱ्या नौकात
कुणी आणून ओतला अचानक आकांत"

बदलल्या व्यवस्थेलाच कवी इंद्रजित भालेराव प्रश्न विचारतात जागतिकीकरणाचा विषारी डबा कोणी आणला आहे? देशात अनेक समस्या असतांना गरिबांसाठी नसलेल्या जागतिकीकरणाचा अनेक समस्या निर्माण केल्या. जागतिकीकरणामुळे गावांची होणारी वाताहात सदानंद देशमुख यांनी 'गावकळा' या काव्यसंग्रहातून मांडली आहे जागतिकीकरणाने गावापर्यंत पोहचलेली मीडियासारखी साधने यातील मनोरंजनाने तरूण तरूणींची वर्ग शेती कामाकडे दूर्लक्ष करू लागला. जागतिकीकरणाने कंथबुडे मोडलेल्या शेतकऱ्याचे दुःख भगवान ढग यांनी 'अन्यदात्याची मुळाक्षरे' या काव्य संग्रहात अभंग शैलीत मांडली आहेत.

समारोपः–

जागतिकीकरण हे आजच्या जीवनशैलीचे अखिल असे वास्तव झालेले आहे. आदिवासी, ग्रामीण, शहरी संस्कृती पर्यंत जागतिकीकरणाचा विळखा मानवी जीवनाला घटटपणे बसलेला आहे. सर्वसामान्य मानसाच्या विचार प्रक्रियेपासून त्यांच्या जीवन प्रक्रियेपर्यंत जागतिकीकरणाचे प्रभुत्व प्राधान्याने जाणवत्यावाचून राहत नाही. मानवी मुल्यधारेशी संबंधित असलेल्या समाजकारण, राजकारण, ध र्मकारण, शिक्षण संस्कृती आणि साहीत्यकारण इत्यादी अंगावर जागतिकीकरण धो.धो. कोसळत आहे. जागतिकीकरणाचा प्रभावाचा वेध मराठी साहित्यामध्ये घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

निष्कर्ष :–

1. जागतिकीकरण ही एक प्रक्रिया आहे.
२. १९९१ मध्ये गॅट करारावर सही करून भारताने खुले आर्थिक धोरण स्विकारले
3. जागतिकीकरणातून नव्या आर्थिक वसाहतवादी संस्कृतीचा जन्म झाला.
4. जागतिकीकरणाने खेडयांचे रूप बदलते. रस्ते, विज, पाणी, करमणूकीची साधने, सुविधा आपल्या परंतु खेडीही वकास बनत गेली.
5. शेती मालाला हमी भाव मिळत नसल्याने शेती व्यवसाय तोटयात जाऊ लागला. खते, बी, बीयाणे यांच्या किमती सतत वाढत राहील्या.
6. जागतिकीकरणाने माणसाचा चेहरा हरवला.
7. जागतिकीकरणाने मराठी साहीत्यात स्थित्यंतरे घडून आले. वास्तव परिस्थितीच्या रेखाटनाला प्राधान्य मिळाले नव्या जाणीवा साहीत्यात अवतरल्या.

संदर्भग्रंथ

1. *मुलाटे वासुदेव :– "ग्रामीण साहित्य चिंतन आणि चर्चा" स्वरूप प्रकाशन औरगांबाद, प्रथम आवृत्ति 2002.*
2. *नेमाडे भालचंद्रएः– "साहित्य संस्कृती आणि जागतिकीकरण, लोकवाङमय" गृह. मुंबई, सहावी आवृत्ती 2009.*
3. *रंगनाथ पठारे, "जागतिकीकरण आणि देशीवाद, लोकवाङमय" गृह मुंबई, पाचवी आवृत्ती 2009.*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

कोरोना महामारीचा भारतीय समाज जीवनावरील परिणाम

प्रा. डॉ. मैंद बालासाहेब वैजनाथ
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
वसंतराव काळे महाविद्यालय,ढोकी,ता.जि.उस्मानाबाद.

★★★

1 घोषवारा – कोरोना महामारीने संपूर्ण जगात थैमान घातला आहे. कोरोनाने लाखो लोकांचा जीव घेऊन ,अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले आहे. त्यामुळे कोरोना महामारीने संपूर्ण भारतीय सामाज जीवन ढवळून निघाले आहे. covid–19 मुळे सामाजिक संबंधात दुरावा निर्माण होत आहे. मनुश्य एकलकोंडी बनत आहेत. कौटुंबिक कलह वाढले आहेत.उत्पन्न आणि खर्चाचे प्रमाण घटले आहे.गरीबीत वाढ, बेरोजगारीत वाढ झाली आहे. अनेक उद्योग अडचणीत येऊन कामगार वर्गांचे हाल झाले आहेत. लोकांचा ग्रामीण भागाकडे जाण्याचा ओढ वाढला आहे. विद्यार्थ्यांना मोबाईलची सवय लागत आहे. त्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. वृद्धांना मुक्तपणे फिरणे अवघड होऊन बसले आहे. लॉकडाऊन मुळे उद्योजक,व्यसायिक,व्यापारी व शेतकऱ्यांचे खूप नुकसान झाले आहे. प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी लोक आरोग्याकडे लक्ष देऊ लागले आहेत. कोरोनामुळे पर्यावरणात सुधारणा झाली आहे. लोकांना मास्क,सॅनिटाइजरची सवय लागली आहे.एकंदरीत कोरोनाच्या संकटाने संपूर्ण जमाज जीवन उध्वस्त झाले आहे.

2 प्रस्तावना – जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या या युगात विज्ञानाने मानवी जीवनात आमूलाग्र असा बदल केला आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर नैसर्गिक साधनसामग्रीचा वापर करून खूप प्रगती केली आहे. आज प्रत्येक जण भौतिक सुखाच्या पाठीमागे लागला आहे. आर्थिक विकास साध्य करण्यासाठी प्रत्येक देश एकमेकांच्या खूप जवळ आलं आणि जगाची एक अर्थव्यवस्था बनली ज्यास आपण जागतिक अर्थव्यवस्था म्हणतो. आज या जागतिकीकरणाच्या युगात कोणताही देश स्वतःला इतरांपासून वेगळा ठेवू शकत नाही. जागतिकीकरणामुळे स्पर्धा वाढली लोकांचे उत्पन्न वाढलं, खर्च वाढला, राहणीमानाचा दर्जा सुधारला , भौतिक सुखात वाढ झाली, आर्थिक प्रगतीबरोबरच आर्थिक विषमता वाढत गेली. कर्ज काढून उपभोग घेण्याची प्रवृत्ती वाढली. मनुष्य संपत्तीच्या पाठीमागे, भौतिक सुखाच्या पाठीमागे एवढा लागला की त्याला स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी वेळ मिळेनासा झाला. मानसिक ताणतणाव वाढला, प्रदूषणामध्ये वाढ झाली. या स्पर्धेच्या युगात जो थांबला तो संपला असे त्याला वाटू लागले आणि त्यामुळे भौतिक सुखासाठी प्रत्येक जण स्पर्धा करू लागला. मनुष्याची ही जीवनशैली एका सूक्ष्म अशा कोरोना विशाणू मुळे बदली. चीनमधील वुहान शहरातून पसरलेली ही साथ अवघ्या बघता बघता जगभरात पसरली आणि डब्ल्यू एच ओ ने यास महामारी घोषित केले. या महामारीने आज संपूर्ण जगात थैमान घातले आहे. यापुढे जगातील बलशाली सत्ता देखील हतबल झालेल्या आहेत. या साथीने मानवी समूहाला भौतिक सुख किंवा आर्थिक प्रगती पेक्षा जिवंत राहणे हीच प्राथमिकता असल्याची जाणीव करून दिली. संपूर्ण जगाला वेटिस धरलेल्या कोरोना विशाणूच्या हल्ल्यामुळे मानव जातीच्या दिनचर्येत ,जीवनशैलीत अमुलाग्र बदल घडवून आला आहे. या कोरोनाच्या प्रकोपापासून भारत देखील स्वतःला रोखू शकला नाही. भारतात देखील कोरोनाची साथ दिवसेंदिवस वाढत असलेली दिसून येते.पहिली लाट,दुसरी लाट व येऊ घातलेली संभाव्या लाटेच्या भितीने देशातील संपूर्ण समाज जीवन भयभित झाले आहे. कोरोना महामारीमुळे भारतीय समाज जीवन पूर्णतः विशकळीत होऊन उध्वस्त झाले आहे.

1.3 संशोधनाची उद्दिष्टे–

1) Covid–19 चा भारतीय समाज जीवनावर परिणाम अभ्यासणे.
2) Covid–19 चा सामाजिक संबंधावर, अनावश्यक खर्चावर झालेला परिणाम अभ्यासणे.
3) Covid–19 चा सुक्षम उद्योग, कामगार व विद्यार्थी जीवनावरील परिणाम जाणून घेणे.
4) Covid–19 चा कृशी आणि कृशीवर आधारित उद्योगावरील परिणाम अभ्यासणे.

1.4 संशोधनाची गृहितके–

1) Covid–19 मुळे सामाजिक संबंधावर परिणाम झाला आहे.
2) Covid–19 मुळे अनावश्यक खर्चाला आळा बसला आहे.
3) Covid–19 चा सुक्षम उद्योग आणि कामगार वर्गावर विपरीत परिणाम झाला आहे.
4) Covid–19 चा वष्द्व आणि विद्यार्थी जीवनावर परिणाम झाला आहे.
5) Covid–19 कृशी आणि कृशीवर आधारित उद्योगावर विपरीत परिणाम झाला आहे.

1.5 संशोधन पद्धती– प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय साधन सामुग्रीचा वापर करण्यात आलेला आहे.त्यामध्ये संदर्भग्रंथ, कोश, शोधप्रबंध, मासिक, साप्ताहिके, दैनिके, वेबसाईटस इ.चा आधार घेण्यात आला आहे.

1.6 Covid–19 – चा भारतीय समाज जीवनावर परिणाम– कोरोनाच्या साथीने संपूर्ण जगाला आपल्या विळख्यात घेतले असून संक्रमित लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.आज पर्यंत जगात

18 कोटी लोकांना कोरोनाचा संसर्ग झाला आहे. तर 40 लाख लोकांचा मृत्यू झाला आहे. भारतात तीन कोटी पेक्षा जास्त लोकांना कोरोनाचा संसर्ग झाला आहे.तर जवळपास चार लाख लोकांचा मृत्यू झाला आहे.भारतात कोरोनाच्या पहिल्यालाटे पेक्षा दुसरी लाट भयानक ठरली. आरोग्य व्यवस्थेची दानादान उडाली. ऑक्सिजनसाठी तर युध्द पातळीवर प्रयत्न रुग्णांना व नातेवाईकांना करावे लागले. दुसऱ्या लाटेत लोकांचे प्राधान्य हे जीव वाचवणे हेच प्रमुख होते. आनखी संभाव्य तीसऱ्या लाटेच्या भितीखाली समाज दबक्या स्वरात जीवन जगत आहे.

1) सामाजिक संबंधात दुरावा रू– कोरोनाविशाणू मुळे सामाजिक संबंध पूर्वीसारखे राहिले नाहीत तर त्यामध्ये दुरावा निर्माण झाल्याचे दिसते. कोरोनाविशाणू पासून आपला बचाव करण्यासाठी आपण सध्या समाजिक अंतराचे पालन करत आहोत. कोरोनाच्या भीतीमुळे जे सामाजिक अंतर आपण राखत आहोत. त्यामुळे सामाजिक संबंधात दुरावा निर्माण झालेला आहे. आपण पूर्वी मुक्त पणे कसलेही बंधन न पाळता मित्र–मैत्रिण, षेजारी, आपले नातेवाईक यांच्याकडे आवडीने जात होतोत. शॉपिंग, खरेदी विक्री किंवा इतर कोणत्याही कारणासाठी घराच्या बाहेर पडल्यानंतर आपला अनेकांशी संबंध येत होता. यातूनच आपल्या मित्रपरिवारात वाढ होत होती आणि आपण अशा आपल्या मित्र, नातेवाईक, शेजारी यांच्या सुखदु:खात सामील होत होतोत. एकमेकांना समजून घेऊन एकमेकांना आधार धीर देत होतोत. आणि त्यातून आपसात एक प्रकारची प्रेम, आपुलकीची भावना निर्माण होत होती. पण कोरोनाच्या भीतीमुळे एकमेकांकडे जाण्याचे प्रमाण कमी झाले आहे. सोशल मीडिया द्वारे केवळ विचारपूस होऊ लागली. एकमेकांना टाळण्याची प्रवृत्ती वाढत आहे. याचा परिणाम कुटुंब एकलकोंडी बनत असल्याचे चित्र आपणाला दिसत आहे. सामाजिक संबंध दुरावत आहेत. गावातील एखाद्या व्यक्तीच्या अंत्यविधीसाठी नातेवाईक मित्रमंडळी जवळचे लोक यायचे. पण कोरोनाच्या भीतीमुळे, कोरोनामुळे जरी एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला नसला तरी त्याच्या अंत्यविधी मध्ये फारसे लोक येत नाहीत. अगदी कुटुंबातील व्यक्ती देखील अंत्यविधी करण्यासाठी पुढे येत नसल्याची उदाहरणे आपणाला दिसली आहेत. विवाह सोहळ्याच्या बाबतीत पण असाच बदल झालेला दिसतो. आता पन्नास लोकांच्या उपस्थितीत, सामाजिक अंतर ठेवून विवाह होत आहे. सण–उत्सव, विवाह सोहळा यासारख्या उपक्रमात लोकांचा सहभाग कमी झाला आहे. जर लोकांचा सहभाग असाच कमी राहिला तर माणसातील आपुलकी, दया, प्रेम हे कमी होतील आणि नवीन पिढी केवळ सोशल मीडियाद्वारे समाजशील होईल. आपल्या समाजात काही असे लोक आहेत की जे फक्त सोषल मीडियाच्या माध्यमातूनच् लोकांच्या संपर्कात राहतात. पण प्रत्यक्षात मात्र ते त्यांच्या संपर्कात आल्यास एक शब्दही बोलू शकत नाहीत. आणि म्हणून जर या सामाजिक अंतरामुळे मनुष्य असा वागू लागला तर समाजाच्या दृष्टीने हे खूप घातक आहे. यामुळे मनुष्याचा ताण वाढेल. मानसिक रुग्णांचे प्रमाण वाढेल, लोक एकलकोंडी बनतील आत्महत्येचे प्रमाण वाढेल. थोडक्यात कोरोनामुळे सामाजिक संबंधात दुरावा निर्माण झाला आहे.

2) लोकांच्या खर्चात घट – कोरोना साथी पूर्वी मागील २०–२५ वर्षांपासून लोकांच्या उत्पन्नात भरमसाठ वाढ झाली होती. आपण आपल्या देशात 1 लाखांपासून 70–75 लाखांच्या दरवशीर्च्या पॅकेजेसची भाषा बोलत होतोत. काही हजारांत उत्पन्न कमावणाऱ्यांच्या घरात आता लाखाने उत्पन्न येऊ लागले होते. त्यांना सर्व उत्तम दर्जाच्या आणि आकर्शक अशा गोष्टींचे आकर्षण वाटू लागले. महागड्या गोष्टींकडे कल वाढला. त्यांना अधिक खर्च करणे शक्य आहे. म्हणून ते साध्या दुकानात न जाता मॉल्सच्या वाटेने जाऊ लागले होते. या ग्राहकवर्गाने 'महागड्या जीवनशैलीचा' मनापासून स्वीकार केलेला दिसून येत होता. परंतु कोरोना विशाणूमुळे हे चित्र बदलत असलेले दिसत आहे. आता कोरोनाच्या भितीमुळे आणि लाकडाऊनमुळे कामगार गावाकडे गेलेले आहेत. अनेकांच्या नोकरी जाण्याच्या मार्गावर आहेत त्यामुळे अनावश्यक खर्च कमी केला जात आहे. पुर्वी काही लोकांचा घरापेक्षा बाहेरच खाण्याकडे कल होता. मुंबई–पुणे–अहमदाबाद अशा काही शहरांत 'किचनलेस होम' ही संकल्पना रूढ होत होती. तरुण जोडप्यांनी तिचा अवलंब करायला सुरुवात केली होती. सकाळी ८ ते रात्री १० पर्यंत घराबाहेर असलेल्या या तरुण जोडप्यांना 'किचन'ची आवश्यकताच भासत नव्हती. सकाळचा चहा–नास्ता बाहेर. दुपारचे जेवण ऑफिसच्या कॅंटिनमध्ये आणि रात्रीचे घरी परतताना चांगल्या हॉटेलमध्ये. ही जीवनशैली बनली होती. पण कोरोना मुळे ही जीवनशैली बदलत असलेली दिसते. आता रेस्टॉरंट मध्ये लोक जाण्यासाठी इच्छुक नाहीत.मार्केट,पर्यटन,रेस्टॉरंट बंद असल्यामुळे लोकांच्या खर्चात मोठी घट झाली आहे.लोक बाहेरचा साधा चहा सुध्दा टाळण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात. सण, उत्सव,लग्न यासारखे सोहळे घरच्या घरी किंवा मर्यादित लोकांच्या उपस्थितीत साजरी केली जात आहेत. त्यामुळे या कार्यक्रमाचा खर्च देखील कमी झालेला आहे. थोडक्यात कोरोनामुळे खर्च घटलेला आहे हे स्पश्ट होते.

3) सुक्ष्म उद्योग – देशाच्या अर्थकारणात सूक्ष्म उद्योग खूप महत्त्वाची भूमिका बजावत असतात. हे छोटे उद्योग आणि त्यांच्या उपजीविकेचे साधन आहे. कोरोनाच्या महामारीला रोखण्यासाठी भारतात लॉकडाऊन केले. या लॉकडाऊनमुळे आणि कोरोनाच्या साथीने अनेकांच्या निर्वाहाचे साधन असलेला हा सूक्ष्म उद्योग अडचणीत आला. लॉकडाऊनमुळे या उद्योगातून उत्पादन किंवा विक्री होत नसल्याने, मात्र भाडे, घरखर्च, कर्ज परतफेड यासारख्या गोष्टी वरील खर्च कसा पूर्ण करायचा आणि जीवन कसे जगायचे हा फार मोठा प्रश्न या कमी भांडवलावर चालणाऱ्या उद्योगापुढे भेडसावत आहे. लॉकडाउन शिथिल केल्यामुळे काही प्रमाणात या उद्योगांना दिलासा मिळाला तरी झालेले नुकसान पचवण्याची ताकद या उद्योगांमध्ये नाही. सलून आणि ब्युटी पार्लर यासारखे व्यवसाय तर फार अडचणीत आले आहेत. कोरोना विशाणूंमुळे अनेकांचा व्यवसाय गेला. लोकांचे उत्पन्न कमी झाले. लोकांनी खर्च कमी केला. याचा परिणाम या छोट्या व्यवसायाच्या

मागणीवर झालेला दिसतो. सूक्ष्म उद्योगांची मागणी घटलेली दिसते.

4) कामगार वर्गाचे शहरी भागाकडून ग्रामीण भागाकडे स्थलांतर – कामगार हा उत्पादनाचा एक महत्त्वाचा घटक असून देशाच्या अर्थव्यवस्थेत याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. देशात स्वस्त, मुबलक आणि गतिशील श्रमिक असतील तर देशाची आर्थिक प्रगती होण्यास फार मदत होते. भारतासारख्या कृशीप्रधान, जास्त लोकसंख्येच्या देशात कृशी आणि कृशीवर आधारित उद्योगात 58 टक्के लोकसंख्या गुंतलेली आहे. इंग्लंड, अमेरिका यासारख्या विकसित देशात हेच प्रमाण केवळ दोन ते तीन टक्के आहे. भारतामध्ये शेती क्षेत्रामध्ये छुप्या बेकारीचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात आहे. गावाकडे पोट भरत नसल्यामुळे आणि स्वतःची प्रगती करण्यासाठी, स्वतःचे नशीब आजमावण्यासाठी अनेकांनी ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतर केले होते. मोठ्या शहरांमध्ये अनेक व्यवसायांमध्ये रोजंदारीवर छोटे–मोठे काम करणारे कामगार आलेले होते. महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नाशिक यासारख्या शहरांमध्ये अनेक वर्षापासून अनेक राज्यातून कामगार आले होते. परंतु कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर सरकारने मार्च अखेर देशभर टाळेबंदी केली त्यामुळे हे कामगार बेरोजगार झाले. यात बहुसंख्य लोक हे रोजंदारीवर जगणारी होती. बेरोजगारीमुळे होत असलेले आर्थिक नुकसान, सातत्याने वाढत जाणारा अनिश्चित स्वरुपाचा लॉकडाऊन, गाठीचा संपत चाललेला पैसा आणि शहरातील कोरोना संसर्गाची वाढती भीती यांचा एकत्रित परिणाम म्हणून काही प्रवासी कामगार आपापल्या मूळ गावाकडे वळली. कामगारांना गावाकडच्या या प्रवासात अनंत हाल–अपेष्टा सहन कराव्या लागल्या. काही जणांचा दुर्दैवी मृत्यूही झाला. कोरोनामुळे कामगारांचे जीवनच बदलून गेले.

5) विद्यार्थी आणि वृद्ध – कोरोना पासून शिक्षण क्षेत्र देखील सुटले नाही. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले. शाळा महाविद्यालय बंद केले गेले. शिक्षणाच्या प्रवाहापासून विद्यार्थी दूर होत चालेले आहेत. विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुद्धा घेता येत नाही. अभ्यास नाही, मैदानी खेळ नाही, बाहेर फिरणे नाही, घरात विद्यार्थी कैद होऊन बसले आहेत. त्यातच ऑनलाइन टीचिंग चा प्रयोग या सर्वाचा मुलांच्या जीवनावर थोडा प्रभाव पडत आहे. मुलांना मोबाईलची सवय लागत आहे. विद्यार्थ्यांचा चिडचिडेपणा वाढत आहे. कोरोनाची भीती जास्त असल्याने त्यांना घराबाहेर पडता येत नाही घरातच ते कैद झाले आहेत. ते एकलकोंडी बनत आहे.

6) कृशी व कृशीवर आधारित उद्योग– कोरोनाच्या साथीपासून स्वतःला वाचवण्यासाठी भारतात लॉकडाऊन केले गेले आणि या लॉकडाऊनचा फटका शेतकरी वर्गाला फार मोठ्या प्रमाणात झालेला दिसतो. टरबूज, द्राक्षे, आंबे, भाजीपाला यासारख्या पिकांचे उत्पादन हाती आले असतानादेखील शेतकऱ्यांना लॉकडाऊनमुळे आपल्या मालाची विक्री करता आली नाही. बेभाव किंमती मध्ये त्यांना विक्री करावी लागली. विक्री करण्याचे नवीन आव्हान शेतकऱ्यांपुढे होते. यात शेतकऱ्यांचे फार मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते. दुधाला देखील योग्य भाव मिळत नसल्याने दुधाची नासाडी झाली.

7) आरोग्य आणि पर्यावरण – कोरोनाच्या साथीपासून स्वतःला वाचवण्यासाठी प्रतिकार शक्ती वाढवणे गरजेचे असल्याने आता मनुष्य आरोग्याकडे लक्ष देऊ लागला आहे. लोक पायी फिरणे, योगासन, प्राणायाम करू लागली आहेत. आरोग्याबाबत जागरूक झाले आहेत. लॉकडाऊन व अनावश्यक प्रवास लोक टाळत असल्याने प्रदूशण कमी होऊन पर्यावरणात सुधारणा होत आहे. पूर्वी शहरी भागात रात्री घराबाहेर लोक जास्त वेळ रहात होती, आता मात्र चित्र बदललेले दिसते. लोक फार वेळ घराच्या बाहेर जात नाहीत. त्यांना घरात राहण्याची सवय लागली आहे. अनावश्यक फिरणे कमी झाले आहे. अशा प्रकारचा बदल कोरोनामुळे मनुष्याच्या जीवनात घडून आलेला आहे.

8) रोजगारा वरील परिणाम – देशात कोरोनाच्या संकटाने बेरोजगारी मध्ये मोठी भर टाकली आहे. देशात पहिल्या लाटे 14 कोटी तर दुसऱ्या लाटेत एक कोटी लोक बेरोजगार झाले आहेत. देशात बेरोजगारीचा दर 14.7 टक्क्यांपर्यंत वाढली आहे.ही एक गंभीर बाब आहे. अर्थतज्ञ रघुराम राजन यांच्या मते,कोरोनाचा सर्वात मोठा फटका असंघटित कामगार वर्गाला बसला आहे. लॉकडाऊनमुळे असंघटित मजुरांकडे उपजीविकेचे साधन राहिले नाही. त्यामुळे त्यांच्या पुढे अन्न, वस्त्र, निवारा याचा प्रश्न उभा राहिला आहे.

1.7 सारांश – भारतातील वाढत्या कोरोनाच्या प्रसाराने संपूर्ण समाज जीवन उद्ध्वस्त झालेले असताना लोकांच्या मनातील कोरोनाची भीती व अनिश्चितता कमी करून जास्तीत जास्त लोकांना कोरोनाची लस घेण्यास प्रवृत्त करणे गरजेचे आहे.तरच भारतातील कोरोना थांबेल व लोक आत्मविश्वासाने जगू लागतील, लोकांच्या मनातील कोरोना विषयीची अनावश्यक भीती काढून टाकावी लागेल. तरच भारतीय समाजाची घडी नव्याने सुव्य वस्थित बसेल व समाजाचा सामाजिक विकास घडून येईल.

1.8 संदर्भ सूची –

1) *कोसंबी राजरत्नरू कोरोना भारतातील सामाजिक, आर्थिक परिस्थिती, द वायर मराठी न्यूज– 2020*
2) *मार्थ हेनरिक्स रू मानवता पर कोरोना का कहर प्रकृती को क्या फायदा, बीबीसी हिंदी न्यूज, 9 जून –2020*
3) *IIMS Report, Govt-of India-2020 4, WHO, Coronavirus disease,COVID&19Situation Report – 153, Data as received by WHO from national authorities by 10:00 CEST 21 June 2020*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

खराशीच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वेगळेपण

श्रीमती मंदा प्रकाश उमाठे (वंजारी)
मुख्याध्यापिका,
स्व. प्रकाशभाऊ उमाठे विद्यालय, नागपूर.

प्रा. डॉ. रेणू बायस्कर सदार
सहायक प्राध्यापिका, पदव्युत्तर शिक्षणशास्त्र विभाग,
रातुम नागपूर विद्या. नागपूर

★★★

प्राथमिक शाळा त्यातल्या त्यात जिल्हा परिशदेची प्राथमिक शाळा म्हटल्याबरोबर आपल्या डोळ्यापुढे एक चित्र उभे राहते. एका रांगेत शाळेच्या खोल्या, त्यासमोर पटांगण अन् या सर्वांचे भोवती असतीलच तर एक संरक्षक भित. पण नुसत्या खोल्या, पटांगण अन् संरक्षक भिंत यानी षाळा घडत नसते तर ती शाळेशी संबंधीत प्रत्येक घटकाच्या सहकार्याने, सहभागाने घडते. नुसती घडतेच असे नव्हे तर नावा पालाही येते आणि पंचक्रोशीत प्रसिद्ध होते. असाच काहीसा अनुभव खराशीच्या प्राथमिक शाळेला भेट दिल्यावर आला.

उद्दिष्ट :– प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शैक्षणिक कार्यक्रमांतर्गत विद्यार्थी आणि शाळा प्रगत करण्यासाठी खराशीच्या जि.प. प्राथमिक शाळेने केलेल्या कार्यक्रम, उपक्रम आणि प्रयासांचे मूल्यमापन करणे तसेच विद्यार्थी, षाळा आणि शिक्षकांच्या गुणवत्तेमध्ये झालेल्या परिणामांची चिकित्सक पाहणी करणे हे या शाळा भेटीचे प्रमुख उद्देश होते. खराशीची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शासनाने प्रशंसलेली अन् त्यामुळेच शाळेला भेट दयावी ही उत्सुकता मनी बाळगुन आमच्या शाळेतील शिक्षकांनाही हा आगळावेगळा अनुभव घेता यावा म्हणून पुढाकार घेऊन एक सहलीच्या रूपात क्षेत्रभेट आयोजिली. शाळेत बुधवार हा दिवस अभ्यासगतांचा दिवस (भेटणाऱ्यांचा), पाहुण्यांचा दिवस असतो हे माहिती असल्याने बुधवार, दि. 09.01.2019 हा दिवस निश्चित केला. खराशी हे खेडे भंडारा जिल्ह्यात साकोली तहसीलीत साधारणतः 700 ते 800 लोकवस्तीचे गाव. पण सर्व गावकऱ्यांना अभिमान वाटावा असे नेत्रदीपक कार्य या शाळेने सर्वांच्या सहकार्याने, सहभागाने करून शाळेचा नावलौकिक शासनदरबारी नोंदविला. काय केले असेल या शाळेने? त्यातील प्रत्येक मानवी घटकाने? या उत्सुकतेपोटी आणि आपली ज्ञानेंद्रिये जागरूक ठेवून बुधवार, दि. 09.01.2019 रोजी शाळेला भेट दिली. आणि एका वेगळ्याच दुनियेत आलोत, जादूच्या ठिकाणी आलोत असा आभास झाला. शाळेच्या प्रवेशद्वारापाशी बस थांबली. बस मधून उतरून शाळेच्या प्रवेशाद्वारापाशी पोहचताच 4 ते 5 विद्यार्थांनी गुड मॉर्निंग मॅडमगुड मॉर्निंग सर म्हणून आमचे स्वागत केले. आत शिरताच प्रामुख्याने जाणवली ती शाळेतील स्वच्छता अन् शिस्त. शाळेतल्या प्रत्येक विद्यार्थ्यांचा गणवेश नीटनेटका, स्वच्छ अन् पूर्ण होता. आपल्या गणवेशाविषयीचा अभिमान प्रत्येक विद्यार्थ्यांच्या चेहेऱ्यावर दिसत होता. त्याच बरोबर प्रत्येक विद्यार्थ्यांच्या वागण्यात सहजता होती. शाळेच्या आवारात ध्वनिक्षेपकावरून कोणी तरी विद्यार्थ्यांना संबोधून बोलत होते. परिचयानंतर लक्षात आले की, आवाज शाळेच्या मुख्याध्यापक गुरूजी मुबारक अली सय्यद सरांचा.

संचयनी :– डाव्या बाजूला 8–10 विद्यार्थी, विद्यार्थीनी (मॉनिटर) रांगेत उभे होते. त्यांच्या पुढ्यातील रांगेत विद्यार्थी, विद्यार्थीनी वर्गवार, शिस्तीने उभे राहून आपल्याला आपल्या गंगाजळीत खाऊचे किती पैसे टाकायचे ते त्या समुह प्रमुखाला (ग्रष्प लिडर) सांगुन देत होते. जे विद्यार्थी, विद्यार्थीनी पैसे घेत होते ते प्रत्येकाला विचारत होते. "How much money do you want to deposit in your account today?" अन् मिळालेल्या उत्तरानुसार पैसे खात्यात जमा करून उरलेले पैसे परत करत होते. चौकशी अंती कळले की, षाळा "संचयनी" प्रकल्प राबविते. या प्रकल्पाद्वारे मुले, मुली आपल्या खाऊचे पैसे आपल्या खात्यात जमा करतात. त्याचा प्रत्येक मुलाचा हिशोब लिहिला जातो. यामुळे मुलांना बचतीची सवय तर लागतेच, शिवाय बचतीचे महत्व कळते आणि बँकेत पैशाची देवाण–घेवाण कशी चालते याचेही ज्ञान मिळते. शिवाय प्रत्येकाला मॉनिटर बनण्याची संधी मिळते. अशा पद्धतीने रोज जमलेली रक्कम आठवड्याच्या शेवटी एकूण जमलेली रक्कम विद्यार्थ्यांना कळते. हे सर्व पैसे दर शनिवारी शाळेच्या पोस्टातील खात्यात जमा होतात. जेणे करून विद्यार्थ्यांना जमलेल्या रकमेवर व्याजही मिळेल. सातत्याने व सचोटीने राबविलेल्या या संचयनीमुळे आज शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या खात्यात रूपये 10,000/– ते 12,000/– रक्कम जमा आहे. याच रकमेतून पुढे विद्यार्थी शैक्षणिक साधन म्हणून Android Mobile घेतात. पालकांचे तर हे स्वप्न आहे की, या रकमेतून मुलांना विमानाने मुंबई दर्शन करून आणावे. "केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे कृकृ" याचा प्रत्यय पावलोपावली येत होता. संचयनीचे काम संपता संपता माईकवरून एक सूचना आली. आपआपली कामे आवरून पुढील पाच मिनीटात मुले परिपाठ (Assembly) साठी शिस्तीने आवाज, गोंधळ, गडबड न करता पटांगणात हजर झाली. त्यावेळी जाणवले की, शाळेत घंटा नाही. Bell-less घंटाविना शाळा असूनही सर्व कामे वेळेच्या आत आणि शिस्तबद्ध पद्धतीने होतांना पाहून खूप कौतूक वाटले.

परिपाठ :– प्रत्येकच शाळेत दिनचर्येचा भाग म्हणून परिपाठ घेतला जातो. पण या जिल्हा परिशदेच्या शाळेतील परिपाठ एकदम वेगळा असल्याचे जाणवले. मुलांचे शिस्तबद्ध पद्धतीने पटांगणात येऊन रांगेत उभे राहणे. रांगा आपसूकच तयार व्हाव्यात म्हणून पटांगणात कायम रंगविलेले गोलाकार, त्या गोलातच मुले उभी होत असल्याने आडवी, उभी, तिरपी कसेही बघितले तरी रांग सरळच दिसत होती. एका मिनीटात सर्व शिस्तीने उभे झाले. समोर डाव्या बाजूला उभ्या असलेल्या दुसरी, तिसरीच्या 4 मुलांच्या पथकाने वादचे वाजवायला सुरूवात केली. त्या वादचांच्या सुरात सर्वांनी सामुहिक राष्ट्रगीत

म्हटले. त्यापाठोपाठ प्रतिज्ञा आणि भारताचे संविधान झाल्या बरोबर "जय हिन्द" आणि "जय जवान– जय किसान" अषा विद्यार्थ्यांनी घोषणा दिल्या. यानंतर लगेच मुख्याध्यापकांनी आज Visitor's Day आहे त्यामुळे शाळेला भेट दयायला कोण कोण आलेत ते सांगितले व परिपाठ कसा होणार त्याची पाहुण्यांना कल्पना दिली. परिपाठाचे हेच स्वरूप दररोज (Visitors असो अथवा नसो) असेच असते हेही नमूद केले. आम्ही शाळेला भेट दिली त्या दिवशी दुसऱ्या वर्गातील मुले, मुली इंग्रजीतून परिपाठ घेत होती. प्रत्येक विद्यार्थी स्वतःची ओळख करून देतांना स्वतःच्या नावाच्या आद्याक्षराने सुरू होणारे इंग्रजी विशेषण लावून स्वतःचा परिचय करून देत होता. उदा. Respectful Rutuja, Pretty Prachi etc. अशाप्रकारे परिपाठ घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चमूने स्वतःचा आगळावेगळा परिचय आम्हा सर्वांना करून दिला. त्यानंतर एकीने संचलन केले, दुसरीने त्या दिवसाच्या ठळक बातम्या सांगितल्या, तिसरीने तारखेनुसार त्या दिवशी 9 तारीख असल्याने सर्वांना सामुहिक 9 चा पाढा म्हणायला सांगितला. सर्वांकडुन 9 चा पाढा म्हणून घेण्याचा मुख्य उद्देष प्रत्येक दिवसाची तारीख विद्यार्थ्यांच्या लक्षात राहावी आणि पाढे पाठ व्हावे. त्यामुळे परिपाठात गणिताचाही अंतर्भाव झाला. पाहुण्यांची ओळख सांगतांना पाहुणे नागपूरचे आहेत म्हणून मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना नागपूरचे महत्व विचारले. प्रश्न सर्वांना उद्देशून विचारल्याने 5–7 विद्यार्थ्यांनी एकदम पण निरनिराळी उत्तरे दिली. नागपूर मोठे शहर आहे, नागपूर संत्र्यासाठी प्रसिद्ध आहे, नागपूला मेट्रो रेल्वे तयार होत आहे, नागपूरला महाराजबाग, अजब बंगला आहे इत्यादी उत्तरे पुढे आल्याने पाहुण्यांनाही विद्यार्थ्यांचे खूप कौतूक वाटले. त्यानंतर विद्यार्थ्याने दिनविषेश सांगितले. 9 जानेवारी हा दिवस कोणत्या कारणामुळे विषेश आहे, या दिवशी कोणाची जयंती/पुण्यतिथी आहे, मग या व्यक्तिंची वैशिष्टये काय? अशासारख्या प्रष्नांचा समावेश होता. 9 जानेवारी 1922 हा हर गोविंद खुराना यांचा जन्म दिवस. मग खुराना कोण? कशासाठी प्रसिद्ध? त्यांना नोबेल पुरस्कार कोणत्या संशोधनासाठी मिळाला? मग नोबेल पुरस्कार कोणी जाहिर केला? कोणत्या देशा तर्फे ? कोणत्या कामगिरीसाठी ? कोणत्या क्षेत्रातील कामगिरी? या वर्षीचा पुरस्कार कोणाला मिळाला? भारताला नोबेल पुरस्कार केव्हा मिळाले? आतापर्यंत किती भारतीयांना नोबेल पुरस्कार मिळाले? रमण मॅगसेस पुरस्कार कोणत्या देशाद्वारे दिला जातो? कोणत्या भारतीयांना आता पर्यंत रमण मॅगसेस पुरस्कार मिळाला? विदर्भातील कोणत्या कुटूंबातील तीन व्यक्तींना रमण मॅगसेस पुरस्कार मिळाला? कोणत्या कामगिरीसाठी? मग भारताद्वारे कोणते पुरस्कार दिले जातात? मग कोणत्या राष्ट्रपतींना भारतरत्न पुरस्कार मिळाले? मग सलग सगळ्या 15 राष्ट्रपतींची नावे, पंतप्रधानांची नावे, भारताचे इतर पुरस्कार कोणते? पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, शौर्यचक्र, अशोकचक्र, खेलरत्न, मग राष्ट्रीय क्रिडा दिन केव्हा? ध्यानचंद पुरस्कार, साहित्यातील पुरस्कार, ज्ञानपीठ पुरस्कार, साहित्यासाठी सर्व प्रथम कोणाला मिळाला? महाराष्ट्रातून कोणाला? अशी चौफेर प्रश्नांची उधळण मुख्याध्यापक करीत होते आणि उत्तरासाठी सर्व विद्यार्थ्यांचे हात वर प्रत्येकाला प्रत्येक प्रश्नाचे उत्तर माहित होते. सर मी असा प्रतिसाद विद्यार्थी देत होते. मुख्याध्यापक मधूनच कोणालाही उत्तर देण्याची संधी देत होते. कधी पहिल्या, दुसऱ्या वर्गातील विद्यार्थ्यांना उत्तरे विचारली जात होती. पहिली, दुसरीतील चिमुकलेही अगदी बरोबर उत्तर देत होते. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना ज्या भाषेत प्रश्न विचारले जात त्याच भाषेत विद्यार्थी पटकन उत्तर देत होते. त्यानंतरच्या विद्यार्थीनीने दिवसाचा नवा शब्द सांगितला. त्यापासून इंग्रजी वाक्य तयार करायला सांगितले. त्या शब्दाचा विरूद्धार्थी शब्द विचारला. विद्यार्थीही तरबेज! एका शब्दावरून अनेक शब्द सांगत गेले. विद्यार्थ्यांची शब्द संपदा Vocabulary समृद्ध व्हावी हा त्यामागचा मुळ उद्देश. मग कोणाचे काय चुकले? उच्चारण चुकले की ग्रामर? अशी चिकित्सा करायला लावली. शब्दसंपदा समृद्ध करण्याचा छोटासा प्रयत्न, प्रयोग! पण नित्यनेमाने परिपाठाचा भाग म्हणून अंतर्भूत झाल्याने इतक्या कमी वेळात (2–3 वर्षात) सर्व विद्यार्थ्यांची शब्दसंपदा समृद्ध झालेली दिसली. अतिशय स्तुत्य उपक्रम, प्रयत्न तेवढेच प्रमाणिक! मग 9 तारखेनंतर जानेवारीत येणारी 14 तारीख कशासाठी प्रसिद्ध? मकर संक्रमण म्हणजे काय? मग इतर राशी कोणत्या? नक्षत्रे किती व कोणती? ग्रह किती? कोणते? मग जागतिक खगोल दिन केव्हा? या आणि अशा प्रष्नांची उत्तरे केवळ पोपटपंची नसून मुलांचे सामान्यज्ञान खरोखरच समृद्ध आहे याचा प्रत्यय पाहुण्यांना यावा म्हणून इतरही काही प्रश्न मुख्याध्यापकांनी विचारले. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, नुकतीच चार राज्यात पार पडलेली निवडणूक, नविन मुख्यमंत्री अशासारखे चालू घडामोडीवरील अनेक प्रश्न विचारल्यावर तीही माहिती विद्यार्थ्यांनी अचूक आणि तप्तरतेने सांगितली. मुख्याध्यापक, शिक्षकांची त्यामागची मेहनत आणि विद्यार्थ्यांची तयारी पाहून आश्चर्य आणि कौतुक वाटले.

नंतरच्या विद्यार्थीनीने सुविचार सांगितला. सुविचार इंग्रजीतून होता. "School is a temple of knowledge" मग Temple म्हणजे काय? मग हिंदूच्या प्रार्थनास्थळाला काय म्हणतात? देवळात आपण कशासाठी जातो? प्रार्थना करण्यासाठी. काय प्रार्थना करतो? सुखी ठेव म्हणतो. मग शाळा हे देवस्थान तर इथले गुरूजी देव! गुरूजींना देव का मानायचे? नवनविन ज्ञान मिळते, वाईट सवयी दूर होऊन चांगल्या सवयी लागतात. समाजातील वाईट गोष्टी कोणत्या? त्या कशा नाहीशा करायच्या? त्यातुनच पुढे सावित्रीबाई फुले, विनोबा, तुकडोजी महाराजांची सामाजिक कार्ये यांचा अंतर्भाव करून मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले. अन् विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे उत्तरे दिली. त्याच बरोबर ओघाने आलेली संत गाडगेबाबांची कथा! "खर्चु नको देवासाठी, पैसा शिक्षणाले लावा," सावित्रीबाईंनी केलेले स्त्री शिक्षणासाठीचे प्रयत्न, विद्यार्थ्यांचे आपल्या सभोवतालच्या समाजाचे असलेले भान, व्यसनाचे दुष्परिणाम, व्यसनमुक्तीसाठी विद्यार्थ्यांनी केलेले प्रयत्न, त्यांचे अनुभव झाडांनाही संवेदना असतात हा जगदीशचंद्र बोस यांनी दिलेला विचार, महात्मा गांधींचे आफ्रिकेतून परत येणे या सर्व विषयांवरील प्रश्नोत्तरांची शहानिशा परिपाठात झाली.

मुख्याध्यापकांसोबत चर्चा :– अशा या आगळ्यावेगळ्या शाळेतील नाविन्यपूर्ण परिपाठ पाहून, चेहऱ्यावरचे आश्चर्य अजून ओसरलेलेही नसतांना मुख्याध्यापकांनी चर्चेसाठी पाहुण्यांना वेळ दिला आहे हे कळताच सर्व Visitors तल्लीनतेने मुख्याध्यापकांचे बोलणे, निरनिराळ्या प्रश्नांना दिलेली उत्तरे काळजीपूर्वक ऐकू लागले. शाळेचे मुख्याध्यापक मुबारक अली सैय्यद सर प्रत्येक प्रश्नाचे अनुभवाधारित उत्तर देवू लागले. शारिरिक, मानसिक, भावनिक तसेच बौद्धिक संतुलनाचे अजब रसायन या मुख्याध्यापकांच्या व्यक्तिमत्वातून जाणवत होते. चर्चे दरम्यान कमीत कमी प्रश्न विचारून माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला.

1) सुरूवात कुठून, कशी झाली – प्रश्नाच्या उत्तरादाखल सरांनी थोडा पूर्वार्ध, पुर्वानुभव कथन केला. खराशीपूर्वी आधी 2–3 वर्षे त्यांनी एका शाळेत शिक्षकाची नोकरी केली. डोक्यातील नवनव्या कल्पना त्यांनी मुख्याध्यापकासमोर मांडल्या. पण नवे रक्त, आपल्यापेक्षा वरचढ ठरतेय हे पाहून वरिष्ठांनी त्यांना त्रास दयायला सुरूवात केली. त्यामुळे त्यांनी आपल्या बदलीसाठी प्रयत्न केले. खराशीचे मुख्याध्यापक नुकतेच निवृत्त झाल्याने ही आडगावातील दोन शिक्षकी शाळा त्यांच्या पदरात पडली. शाळेचे रूप, विद्यार्थी संख्या, जुन्या मुख्याध्यापकांची कारकीर्द त्यांची गावात पसरलेली माहिती, प्रतिष्ठा हे सगळे बघताक्षणीच लक्षात आले की इथे शुन्यापासून सुरूवात करावी लागेल, जुन्या, बुरसटलेल्या कृती, वृत्ती–विचारांचा झाडणीने जाळे काढुन स्वच्छ करावे तसे मुळापासून प्रयत्न करावे लागतील. त्याबरोबरच घरची जबाबदारीही वाढली होती. पत्नीसोबत एका चिमुकलीची जबाबदारी एक सक्षम पिता म्हणून आली होती. तीही आता लवकरच षाळेत जाण्याच्या वयाची होणार होती. आपल्या मुलीला खराशीच्याच शाळेत शिकवायचे. मग तिला जे जे शिक्षण देणे शक्य असेल, गरजेचे असेल ते ते सर्व शिक्षण दयायचे. मग तिच्याबरोबर गावातील आणखी मुले आली तर त्यांनाही तसेच शिकवायचे. या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. सुरूवातीला सहाय्यक शिक्षकांसोबत घरोघरी जावून प्रत्येक घरातील आई–वडिलांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. जुन्या 'मास्तर' ने काय केले होते किंवा नव्हते याचा पाढा ऐकावा लागला. त्या पालकांच्या गैरसमजुती पुसून त्यांच्या मुलांना शाळेत पाठविण्याविषयी कित्येकदा विनवण्या कराव्या लागल्या. शाळेचे, शिकवण्याचे, अभ्यासाचे महत्व पटवून देत असतांनाच सरकारी प्रयत्न व मदतीची माहिती दिली. परिणामी, महिन्याभरात विद्यार्थी संख्या वाढली. ती 10 वर्षात 150 पर्यंत गेली. आता अंगणवाडी ते इयत्ता चौथी प्रत्येक वर्गात 30 विद्यार्थी आहेत. शाळेत 150 पैकी 98 विद्यार्थी परगावचे व बाकी खराशीचे आहेत आणि दरवर्शी नवे प्रवेश फक्त अंगणवाडीचेच आणि आता पुढच्या 3–4 वर्षातील प्रवेषासाठी विद्यार्थी प्रतिक्षेत आहेत. आता गेल्या काही वर्षापासून अशी स्थिती आलीय की शाळेला सुट्टी म्हटले की विद्यार्थी रडतात, कासावीस होतात. रोज शाळेत न चुकता, आनंदाने आणि मुख्य म्हणजे वेळेपूर्वीच येतात. मी आल्यापासून शाळेत घंटा नाही. 9.30 चा शाळेला विद्यार्थी 9 वाजताच हजर होतात. शिकतांना हेही विद्यार्थी कधी चुकतात, नाही असे नाही. परंतु, शासन निर्णय व परिपत्रक संकलन पुस्तिकेत (पा.क्र. 78) वाचल्याप्रमाणे "मुलांचे मूल्यमापन करत असतांना, योग्य शब्द वापरून, त्यांना शिकण्यास प्रवृत्त करणे, शिकण्यासाठी मदत करणे असे असावे. त्यांच्या भावना दुखविणारे नसावे" याची जाणीव या शाळेतील शिक्षकांना आहे याची प्रचिती सरांच्या बोलण्यातून आली.

2) प्रमुख आकर्षण काय – रोज विद्यार्थ्यांशी नियमित संवाद साधणे, त्यांना नवनवे शिकण्यासाठी प्रवृत्त करणे, नवे शिकलेल्या गोष्टी, संकल्पनाची पुनरावृत्ती, सराव करणे, त्यांना अभ्यासात नवी माहिती शोधण्यात गुंतवणे, मोबाईल गुगल सर्च चा वापर करून नवी माहिती शोधणे, संकलित करणे, आपल्या सभोवती घडणाऱ्या दैनंदिन घटनांची दखल घेणे, त्यांचा आपल्याशी संबंध शोधणे, संकलित करणे, आपल्या सभोवती घडणाऱ्या दैनंदिन घटनाची दखल घेण, त्यांचा आपल्याशी संबंध शोधणे, आपल्यावर होणार परिणाम अनुभवणे, वाईट, अप्रिय घटनांची पुनरावृत्ती होवू नये म्हणून काय, कशी काळजी घेणे अशा तऱ्हेने दैनंदिन परिपाठाची आगळी वेगळी रचना करून प्रत्येक विद्यार्थ्याचा परिपाठात समावेश करणे, त्यांच्यावर जबाबदारी पेलण्याचे संस्कार करणे, त्यासाठी प्रेरित करणे या सर्वांचे फलित आपण सर्वांनी परिपाठात पाहिले. असेच त्यांच्या सहभागाचे स्वरूप आपण प्रत्येक वर्गातही पाहालच. उदाहरणा दाखल सांगतो काही दिवसांपूर्वी मला इयत्ता तिसरीला महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांचा अभ्यास शिकवायचा होता. वेळ फार कमी होता. म्हणून मी वर्गातल्या प्रत्येक विद्यार्थ्याला एकेक जिल्हा वाटून दिला. प्रत्येकाला पुस्तकातून, गुगल सर्चच्या मदतीने माहिती गोळा करायला सांगितले. ती त्यांना चर्चेतून एकमेकांशी शेअर करायला सांगितली. सर्वांच्या सहभागाने कमी वेळात अभ्यास पूर्ण झाला. तोही मिळालेल्या माहितीचा आधीच्या माहितीशी संबंध जोडून. सर्वांनाच सभोवतालचे ऐकणे, पाहणे, त्यातून शिकणे षक्य झाले.

खरोखरच अप्रतिम! अतुल्य उपक्रम! विद्यार्थ्यांना संचयनीद्वारे बँकेचे व्यवहार षिकविणे, त्यात सर्व विद्यार्थ्यांना संधी देणे, त्यांच्यात स्वच्छता, शिस्त, समाजभान सक्रमित करणे, शाळेबद्दल, विद्यार्थ्यांबद्दल, शिक्षकांबद्दल येथील वस्तूंबद्दल, समाजाबद्दल आपलेपणाची भावना निर्माण करणे हेही अशाच अतुल्य उपक्रमातून शक्य होवू शकते. ह्याच विद्यार्थ्यांना पुढे माध्यमिक शाळेत असेच अनुभव मिळत गेले, समृद्ध करणारे शिक्षण मिळत गेले तर नक्कीच यातून पुढल्या स्पर्धात्मक परिक्षांसाठी, निरनिराळ्या जबाबदारीच्या पदांसाठी सुजाण विद्याथी तयार होतील.

3) समाजाचा सहभाग कसा–आमचे खराशी गाव लहानसेच पण एखादा प्रोजेक्ट त्यांच्यापुढे मांडला. त्याच्या यशातून गावाला, समाजाला, विद्यार्थ्यांना पालकांना होणारा फायदा उधश्त केला, तर गावातले सगळेच सहभागी होतात. उदाहरण दयायचे झाले तर ह्या शाळेची इमारत फक्त दोन खोल्यांची होती. त्याही गळक्या, पडीत झालेल्या. शाळेसाठी खोल्या बांधण्यासाठी शासनाकडून थोडीफार आर्थिक

मदत मिळाली. पण ती पुरेशी नव्हती. मग गावकऱ्यापुढे हे आव्हान ठेवले. ज्याला जसे जमेल तसे, जितकी जमेल तितकी मदत प्रत्येकाने केली. दोनच्या तीन, तीनच्या चार, हळुहळु करत आता 4 वर्ग खोल्या, अंगणवाडीची वेगळी खोली, स्वयंपाकाची, सांस्कृतिक कार्यक्रमाला आणि रिसोर्स साठी अशा पुरेशा खोल्या बांधता आल्या. शाळेच्या संरक्षक भिती (कंपाऊंड वॉल) चेही तसेच! फक्त या सुरक्षित भिंतीची डिझाईन किल्ल्याच्या भितींसारखे वाटावे ही माझी कल्पना! पण खर्च मात्र नागरिकांच्या देणगीतून, सहभागातून शक्य झाला. नुसते इतकेच नाही, या नागरिकांचा, या विद्यार्थ्यांच्या पालकांचा उत्साह, सहभाग एवढा की, या पालकांसाठी प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या शुक्रवारी संध्याकाळी शाळा भरते. आपली मुले काय शिकतात? कसे शिकतात? याचे ज्ञान या पालकांना या शुक्रवारच्या शाळेतून मिळते. सगळे मिळून सर्व कामे करतात. या विद्यार्थ्यांनी तर आपल्या आई–वडिलांना, वडिलधाऱ्यांना सहया करायला शिकविले, व्यसनातून सोडविले.

4) आणखी शाळेची काही वैशिष्ट – विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त शिक्षण त्यांच्या मातृभाषेतून मिळावे; विद्यार्थ्यांना शिकविण्यापेक्षा त्यांना स्वतःहून शिकण्यास प्रवृत्त करावे ही जपान, फिनलॅन्डची पद्धती आहे. शाळेतील शिक्षक दीप स्तंभासारखे असतात. कुटूंबीयांनीही मुलांच्या शिक्षणाप्रती आपली जबाबदारी ओळखावी व स्वीकारावी. शाळा, विद्यार्थी, पालक, शिक्षक, समाज सर्वांनीच येणाऱ्या अडचणींना अडचणी न समजता प्रेरणा, आव्हान समजून कार्य केले तर ते नक्कीच यशस्वी होते. या विद्यार्थ्यांनी दररोज कमीत कमी एक तास तरी वाचन करणे अनिवार्य असते. ते ही विद्यार्थ्यांच्या पालकांद्वारे पाहणी (मॉनीटर) होते. शाळेतील असे हे विद्यार्थी घरी आपल्या पालकांसोबत इंग्रजी मधून संवाद करतात. नागपूर, चंद्रपूरच्या काही शाळांनी आमच्या अनुभवांचा, शाळेत राबवल्या जाणाऱ्या प्रकल्पाचा, कृतीचा चांगला उपयोग त्यांच्या शाळांमध्ये करून घेतला आहे.

5) पुढे काय – इयत्ता 4 थी पास झाल्यानंतर पुढे काय? अशाच प्रकारचे शिक्षण त्यांना मिळावे म्हणून काही प्रयत्न. माझी मुलगी खराशीच्या याच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतून पास झाली. पुढचे शिक्षण तिला याच गावातील शाळेत दयायचे हे ठरवून मी तिला शेजारच्या, जवळच्याच माध्यमिक शाळेत घातले. त्या शाळेतील मुख्याध्यापकांना आमच्या शाळेला भेट देण्याविषयीचे आमंत्रण दिले. शाळा भेटीत त्यांनी ज्या ज्या उल्लेखनीय, प्रशंसनीय गोष्टी अनुभवल्या, त्या सर्वांचा समावेश त्यांच्या माध्यमिक शाळेच्या परिपाठात करून तेथील विद्यार्थ्यामध्ये शिकण्याची आवड निर्माण केली. यंदाची 10 वी पास होणारी पहिलीच बॅच! त्यात 2 मुले मंडळाच्या निकालानुसार मेरिट मध्ये आली. माझी मुलगी 9 वीत आहे. पुढील वर्षी तीही मेरिट मध्ये 10 वी पास होईल असा मला विश्वास वाटतो. पुढे याच शाळेतील मुले आय.ए.एस., आय.पी.एस. सारख्या स्पर्धात्मक परिक्षांत उज्वल यश घेवून पास होतील, हे दिसले तर नवल वाटायला नको.

समारोप (शाळेचे मूल्यमापन) :– अनुकुल (Friendly) वातावरण शिकण्यासाठी पोषक ठरते. चाकोरी बाहेरील शिक्षणामुळे, विद्यार्थ्यांना रूचेल, पचेल असे शिक्षाण दिल्यामुळे शिकणे आनंददायी होते. याचा अनुभव प्रत्येक वर्ग भेटीत सर्वच अभ्यासगतांना आला. त्यांचे होणारे सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन, त्यांची वर्गातील शिस्त, स्वच्छता, स्वतःहून जबाबदारीने खोलीतील वस्तू पुसून, धूळ बसू न देता त्यांना योग्य तऱ्हेने हाताळीत, कशा वापरतात याचा प्रत्यक्ष अनुभव आला. विद्यार्थ्यांची जेवणाच्या सुटीतील शिस्त, स्वच्छता, स्वतःचे ताट धुवून ठेवण्याची जबाबदारी सर्वच काही प्रशंसनीय होते. एका आगळ्यावेगळ्या शाळेला भेट दिल्याचे, काही नविन करण्याजोग्या प्रयत्नांचे अनुभव अद्भूत होते. ज्ञानरचनावादाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकण्यास प्रेरित करण, स्वतः शिकण्याची संधी देणे, त्यातून शिकलेले संस्कार कधीच न मिटणे आणि तेथील विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये वृद्धिंगत झालेल्या गुणवत्तेची पाहणी सार्थ, यथार्थ आहे हे जाणवले.

खराशी सारख्या इतरही ठिकाणच्या शाळांची, तेथील विद्यार्थ्यांची अशी प्रगती होतांना पाहून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राचे स्वप्न लवकरच सत्यात उतरेल. सतत हसत खेळत चैतन्यपूर्ण वातावरणात शिकणारे विद्यार्थी चटकन व्यक्त होतील; त्यांना खूप आनंदित करतील यात काही शंकाच नाही.

असे असले तरी या शाळेतले सर्व विद्यार्थी खेळात सहभागी होतात काय? वरचेवर आजारी पडतात काय? शाळेला कोणत्या सेवाभावी संस्थेची मदत मिळते काय? मुख्याध्यापकाच्या अनुपस्थितीत सगळे असे घडते काय? हे आणि आणखी कितीतरी प्रष्न सखोल संशोधनाचा विषय ठरतील.

संदर्भ :

1) *प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र : महाराष्ट्र शासन : शासन निर्णय व परिपत्रक संकलन पुस्तिका (2016–17), जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संख्या, लोणी काळभोर, ता. हवेली, जिल्हा पुणे, (पष्क्र. 78)*
2) *प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम शासन निर्णय 22 जून, 2015*
3) *प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णय 16 सप्टेंबर, 2016*
4) *जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम 9 जानेवारी, 2017*
5) *प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम शासन निर्णय 17 जानेवारी, 2017*
6) *प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम शासन निर्णय 21 जून, 2017*
7) *प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम अहवाल डिसेंबर, 2018 अखेर*
8) *प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अध्ययन निष्पत्ती प्राथमिक स्तर– मार्गदर्शिका प्रथम आवृत्ती डिसेंबर, 2017*
9) *"प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र" क्रांतीकारी शैक्षणिक कार्यक्रम जीवन शिक्षण मासिक (जून जुलै, 2016)*
10) *मुलांचे शिक्षण : पालक व शासन, लेखक : प्रा. रमेश पानसे*
11) *प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र : विकास व अध्ययन – संजीव सोनवणे, निराली प्रकाशन पुणे, (2015)*
12) *स्पर्धात्मक कौशल्य– अरविंद चौधरी, प्रकाशक– प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव (2011)*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

मध्य आशियाचा इतिहासाबद्दल राहूल सांकृत्यायन यांनी केलेले इतिहास विश्लेषण

प्रा. डॉ. जगदीश घनशाम खरात
विभाग प्रमुख, इतिहास विभाग,
धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, जि. जळगांव

★★★

Abstract : महापंडित राहूल सांकृत्यायन यांचा जन्म 1 एप्रिल 1893 साली उत्तर प्रदेशातील पन्दहा, जिल्हा आजमगढ येथे झाला. त्यांचे मूळ नाव केदारनाथ पांडे असे होते. बौद्ध धर्म स्विकारल्यापासून त्यांनी राहूल सांकृत्यायन हे नाव धारण केले. सांकृत्यायन एक प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्व होते. त्यांनी जी विविध क्षेत्रामध्ये प्रगती केली याचा मुलाधार म्हणजे त्यांची इतिहा दृष्टी होती. सांकृत्यायन यांनी मध्य आशियाचा इतिहास, अकबर, ऋग्वैदिक आर्य, मानव समाज, वोल्गा ते गंगा, इस्लामधर्मचाी रूपरेशा, तिबेटमध्ये बौद्ध धर्म इल्पही एतिहासीक ग्रंथ आपणास त्यांच्या इतिहास दृष्टीची साक्ष देतात.

सांकृत्यायन यांनी मध्य आशियाचा इतिहास हा एक असाच महत्वपूर्ण ग्रंथ लिहीला आहे. त्यात ते म्हणतात की, मध्य आशियाचा आपल्या इतिहासाशी खुप जवळचा संबंध आहे. ग्रीकांनी सुद्धा भारताच्या काही भागावर राज्य केले, शक, कुशाण मध्य आशियातून आले. या शासकांचा आणि राज्यकर्त्यांचा व त्यांच्या जातींच्या इतिहासाचा एक भाग मध्य आशियात आहे. त्यामुळे मध्य आशियाच्या इतिहास आपण समजुन घ्यावयास हवा असे सांकृत्यायन यांनी स्पष्ट केले आहे.

Keyword : तुर्क, मोगल, मध्य आशिया, ताम्रयुग, पितळयुग, दासप्रथा, संरजामशाही, साम्यवादी क्रांती, खलीफा, सेल्जुक, मंगोल, चगताई, द्वंदात्मक इतिहास, झारशाही, बोनान, मिथ्रोडेटस.

Methodology : सदरच्या संशोधनात राहूल सांकृत्यायन यांच्या मध्य आशियाच्या इतिहासाबद्दल अभ्यास केला आहे. व्यष्टी अध्ययन पद्धतीतुन याविषयी मांडणी केली आहे. एकुणच सदरील संशोधनाकरिता आंतरविद्याशाखीय अर्थात एकीकृत संशोधन पद्धतीचाच वापर केला आहे. प्रस्तुत संशोधनाद्वारे मध्य आशियाच्या इतिहासावर सांकृत्यायन यांनी कसा प्रकाश टाकला आहे याची साधक–बाधक चर्चा केली आहे.

Introduction : महापंडीत राहूल सांकृत्यायन व्यक्तित्व व कृतीत्व दोन्ही दृष्टीने श्रेष्ठ व्यक्ती होते. त्यांचा जन्म 1 एप्रिल 1893 साली पंदहा, जिल्हा आजमगढ, उत्तरप्रदेश राज्यात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण उर्दु माध्यमातून झाले. इ.स. 1910 साली सांकृत्यायन संन्यस्त वृतीकडे आकृष्ट झाले. त्याचे मुळ नाव केदारनाथ पांडे असे होते. बौद्ध धर्म स्विकारल्यापासून त्यांनी राहूल सांकृत्यान हे नाव धारण केले व तेव्हापासून ते या नावाने परिचित आहेत. राहुल सांकत्यायन एक प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्व होते, त्यांनी जी विविध क्षेत्रांमध्ये प्रगति केली त्याचा मुलाधार म्हणजे त्यांची इतिहासदृष्टी होती. सांकृत्यायन बहुभाशिक असल्यामुळे त्यांच्या इतिहासदृष्टीला आणखी प्रखरता प्राप्त झाली. तसेच त्यांना जवळपास छत्तीस भाशांचे ज्ञान होते. त्यांना हे भाशा ज्ञान देश–विदेशातील एतिहासीक स्त्रोतांचे अभ्यासासाठी अत्यंत उपयोगी ठरले. मध्य आशियाचा इतिहास, अकबर, ऋग्वैदिक आर्य, मानव समाज, वोल्गा ते गंगा, इस्लाम धर्माची रूपरेखा, तिबेट मध्ये बौद्ध धर्म इत्यादी एतिहासीक ग्रंथ आपणास त्यांच्या इतिहास दृष्टीची साक्ष देतात. सांकृत्यायन भुतकाळाला उघड्या डोळ्याने पहाणे आणि त्याचे स्पष्ट चित्र आपल्या समोर उभे करणे हा त्यांचा स्वभाव होता. त्यांनी तिबेटहून आणलेल्या बहुमुल्य ग्रंथांचा अभ्यास करून बुद्ध धर्माचा इतिहास आपल्यासमोर उभा केला. तसेच पुरातत्वीक अभिलेख, विटा, नाणी इत्यादींचे सुक्ष्म अवलोकन करून इ.स. पुर्व हजारो वर्षांच्या भारत–आशियाच्या भव्य इतिहासाची इमारत उभी केली. मानव जातीचा इतिहास सुद्धा त्यांनी मांडण्याचा प्रयत्न केला.

सांकृत्यायन मध्य आशियाबद्दल टिप्पणी करतांनी म्हणतात की, आधुनिक एतिहासीक घटनांकडे पाहत असतांना त्या मागची इतिहासाबद्दलची पार्श्वभूमी देखील आपण पाहिली पाहिजे. या पद्धतीने विचार करत असतांना मला कळले की मध्य आशियाच्या इतिहासाचा आमच्या इतिहासाशी खुप घनिष्ठ संबंध आहे. आर्याप्रमाणेच ग्रीक लोकांनी सुद्धा भारताच्या काही भागावर राज्य केले. शक, कुशाण तेथूनच आले. एवढेच नव्हे तर हुण, तुर्क, मोगल सुद्धा मध्य आशियातून भारतात आले. या शासकांचा आणि राज्यकर्त्यांचा व त्यांच्या जातींच्या इतिहासाचा एक भाग मध्य आशियात आहे, जो आपण माहित केल्याशिवाय इतिहास समजून घेऊ शकणार नाही. त्यामुळेच मला मध्य आशियाचा इतिहास लिहीण्याची प्रेरणा मिळाली.

सांकृत्यायन मध्य आशियाच्या इतिहासात मानवी कार्याचा इतिहास आपल्यासमोर मांडतातच पण त्याच बरोबर मानवाचा उद्भव व विकास यावरदेखील प्रकाश टाकतात. ह्याच क्रमाने लोह युगापासून आदिमानव ते आजच्या मानवाचा विकास, वैज्ञानिक व पुरातात्वीक पुराव्यांच्या आधारे या ग्रंथात मांडलेला आहे. सांकृत्यायन ताम्रयुग व पितळयुगाबद्ल असे वक्तव्य करतात की, जगात विभिन्न देशामध्ये ताम्रयुग व पितळ युगामध्ये अंतर आहे. जसे की, मध्य आशियामध्ये

2500 ते 1500 इ.स. पूर्व पर्यंत ताम्रयुग होते आणि 1500 ते 600 इ. स.पुर्व पर्यंत पितळ युग होते. युरोपियन देशांमध्ये पितळ युग अधिक लवकर आले होते. याचे कारण सांगत असतांना ते म्हणतात की, काकेशष, चकोस्लोव्हाकिया, स्पेन इ. प्रदेशात टिन तसेच तांबे या धातुच्या खाणी आहेत. ताम्रयुगीन लोकांनी टिन हा धातु तांब्यासोबत मिसळल्यापासून त्यांना पितळ या नव्या धातुचा शोध लागला. कथील हा धातु मेसोपोटेमिया आणि इतर देशांत सहजपणे उपलब्ध नवहता म्हणून येथे जास्त वेळपर्यंत ताम्रयुग होते.

ताम्रयुगाचे विवेचन सांकृत्यायन यांनी वैज्ञानिक समाजवादी दृष्टीकोनाने केले आहे. त्यांच्या मते एकीकडे या युगाने उदयोग व व्यापारात भरभराट आणली तसेच शेती व पशुपालनामुळे लोकांकडे संपत्ती आली. पण त्यामुळे समाजात दास प्रथेला सुरूवात झाली. तसेच समाजात संरजामशाही प्रस्थापित झाली.

सांकृत्यायन यांचा उपरोक्त ग्रंथ मध्य आशियाचा इतिहास दोन खंडात आहे. त्यात प्रागैतिहासीत काळापासून ते रशियातील साम्यवादी क्रांती (इ.स. 1917–1929) पर्यंतच्या काळाचे विस्तश्त विवरण त्यांनी यात मांडले आहे. पहिल्या खंडात षक, हुण, तुर्क, ग्रीक, अरब, उमैया, अब्बासी (खलीफा), गजनवी, सेल्जुक, घोरी, ख्वारेज्मी, मंगोल, चिनी, मुस्लिम, चगताई, बौद्ध, रशियन तथा तैमुर इ. कित्येक वंश व जातींचा द्वंदात्मक इतिहास रेखांकित केलेला आहे. तर दुसऱ्या खंडात पुढीलप्रमाणे इतिहास कालखंड व त्यांची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक मांडणी केली आहे. ती पुढीलप्रमाणे–

1) चीनमध्ये मंगोल वंश (इ.स. 1200–1368)
2) रशियातील रूरिक वंष (इ.स. 911–1594)
3) चगताई, हुलाकू व तैमुर वंश
4) रशियाचा प्रसार (इ.स. 1598–1801)
5) रशियातील झारशाही (इ.स. 1801–1917)
6) रशियन साम्यवादी क्रांती (इ.स. 1917–1929)

ह्या सर्व गोष्टींचे / घटनांचे त्यांनी विस्तश्त विवेचन केले आहे. अशा प्रकारे सांकृत्यायन यांनी मध्य आशियाचा इतिहास या ग्रंथात मुलत राजकीय व आर्थिक दृष्टीकोन मांडत असतांना समयोचितपणे सामाजिक व सांस्कृतिक बाजुने सुद्धा लिखाण केल्याचे दिसते. सांकृत्यायन यांनी चीन, इराण ह्या देशांचा तत्कालीन इतिहास (इ.स. 910–1594) इथे मांडलेले आहे. कारण मध्य आशियाचे पुर्ण चित्र किंवा दृष्य चीन, ईराण आणि रशिया यांच्यातील परस्पर आंतरसंबंधातील संवादाचा परिणाम होय असे ते म्हणतात.ज्या इंडो–ग्रिक, शक तसेच हुण जमातींनी इ.स. पुर्व पहिल्या शतकात भारतीय इतिहासाला प्रभावित केले, ह्यांचा उगम, विकास आणि ह्या जमातींचा विभिन्न शाखा भारतात कशा पोहोचल्या याचे विस्तृत वर्णन केले आहे.

मध्य आशियातच चिनी भिंतीच्या एतिहासिकतेबद्दल ते म्हणतात की, चिमधील पहिला एतिहासीक राजवंश चिन याचा संस्थापक चिन–शी–होआंगती (225–206 इ.स.पुर्व) याने हुण आक्रमणापासून चिनचे संरक्षण करण्यासाठी चिनची भिंत बांधली आणि चिनमध्ये घुसलेल्या हुणांना उत्तरेकडे पळवून लावले." असा उपाय इतर राज्यकर्त्यांनी केला नाही असे इतिहासकार रामशरण शर्मा म्हणतात.

इ.स. पुर्व 176 साली चिनने हुणांना पळविल्यामुळे ते पश्चिमेकडे गेले. शक भारतात पण आले होते. त्यांच्याविषयी सांकृत्यायन म्हणतात की, 115 इ.स. पुर्व साली शकांच्या टोळ्या बलूचिस्तान व सिंध प्रांताकडे पळाल्या. येथे त्यांनी आपले षासन प्रस्थापित केले. शकांनी सिंधपासून सौराष्ट्र, अवंती व मथुरापर्यंत आपला राज्यविस्तार केला आणि त्यांनी क्षहरात वंशी आपला नेता मोग (77–58 इ.स.पुर्व) याच्या नेतृत्वाखाली इ.स. पुर्व 77 च्या आसपास गंधार पासून कपिशा (सध्या अफगणिस्तान पर्यंत आपले साम्राज्य नेले) मोग याने सिंध प्रांताच्या उत्तरेकडे कुच करून गंधार (तक्षशिला) जिंकून त्याला आपल्या राजधानीचे ठिकाण बनविले.

अधिकांश इतिहासकारांनी प्रथम 'शक' शासकाचे नाव 'मावेज' आहे असे मत मान्य केले आहे. महान पुरातत्वज्ञ मार्शल सुद्धा स्वीकार करतात की, प्रथम शक शासक 'मावेज' हाच होता. मावेज हाच मोग होय व तो इ.स. पुर्व 78 साली राज्य करत होता. सांकृत्यायन यांच्या मताची पुष्टी तक्षशिला येथे जो साम्रपट सापडला आहे त्याद्वारे होते.

शकांच्या बरोबरच पल्लवांचे सुद्धा त्यांनी विस्तृत वर्णन केले आहे. बहुतेक भारतीय इतिहासकार इराणच्या पार्थिव राजवंशापासून अपरिचित असल्यामुळे बोनान किंवा बोनानी यास पहिला पल्लव राजा मानतता. सांकृत्यायन म्हणतात की, "पल्लवांनी इराणवर 249 ते 226 इ.स. पुर्व पर्यंत राज्य केले. यांच्या एकूण शासकांची संख्या एकोणतीस होती. " ह्याचक्रमाने मांडणी करत ते सांगतात की बोनान किंवा बनाना सोळावा हा पार्शियन राजा मिथ्रदत्त प्रथम ह्याच्या काळात पार्शियनांनी परमोच्च विकास केला. बोनान याने इ.स. 7 ते इ.स. 16 पर्यंत राज्य केले."8 प्रो. झा. व श्रीमाळी सुद्धा बोनान ह्याच्याएवजी पल्लवांचा खरा संस्थापक मिथ्रोडेटस प्रथम किंवा मिथ्रदत्त ह्यास मानतात. त्यामुळे सांकृत्यायन यांनी मांडलेल्या वरील मांडणीची पुष्टी होते.

सांकृत्यायन पुढे भारतात कुशाण साम्राज्याची झालेली स्थापना, कुजुल कदफिसिज, विम कदफिसिज व कनिष्क यांच्या अधिन कुशाण साम्राज्याच्या प्रसारावर मध्य आशियाच्या इतिहासामध्ये प्रकाश टाकला आहे. सांस्कृतिक अंगाने सुद्धा कुशाण काळाचे त्यांनी वर्णन केले आहे. सांकृत्यायन म्हणतात, "कुशाणांच्या अगोदर ग्रीक लोकांनी कला व स्थापत्यास मोठे प्रोत्साहन दिले, परंतु ग्रीक कला तोपर्यंत एकरूप झाली नाही तो पर्यंत कनिष्कच्या शासन व्यवस्थेने तशाप्रकारे वाव दिला. गौतम बुद्धांची पहिली मुर्ती कनिष्काच्या काळातच बनविली गेली. ग्रीक कलेला भारतीय गांधार शैलीत परिवर्तीत करण्याचे काम सुद्धा कनिष्कानेच केले.

अशा प्रकारे सांकृत्यान यांनी शक, पल्लव, कुशाण इत्यादींविषयी मध्य आशियाच्या विशेष संदर्भात विस्तृत अशी माहिती विविध चिनी भाषेतील ग्रंथ, नाणी, इत्यादींच्या द्वारे आपल्यासमोर मांडणी केलेली आहे.

संदर्भ –

1. *सांकृत्यायन राहूल, जय यौधेय, किताब महल, अलाहाबाद, 19546, पृ*
2. *सांकृत्यायन राहूल, मध्य एशिया का इतिहास, खंड–2, बिहार राष्ट्रभाषा परिशद, पटना, 1957, पृ71.*
3. *सांकृत्यायन राहूल, जय यौधेय, पुर्वोक्त, पृ 8.*
4. *शर्मा रामशरण, प्राचीन भारत, एनसीईआरटी, दिल्ली, 1991, पृ. 144.*
5. *कित्ता, पृ 189.*
6. *पांडे विमलचन्द्र, प्राचीन भारत का राजनितीक एवं सांस्कृतिक इतिहास, सेंट्रल पब्लिशिंग, हाऊस, इलाहाबाद–1993, पृ 191.*
7. *सांकृत्यायन राहुल, जय यौधेय, पुर्वोक्त, पृ 191.*
8. *कित्ता, पृ 191.*
9. *झा एवंम श्रीमाली, प्राचीन भारत का इतिहास, दिल्ली विश्वविद्यालय प्रकाशन, दिल्ली, 2002, पृ 227.*
10. *सांकृत्यायन राहुल, जय यौधेय, पुर्वोक्त, पृ 203.*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

महात्मा फुले यांचे कृषी विषयक धोरण आणि सद्यस्थिती

डॉ .सुवर्णा भाऊसाहेब पाटील
सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग,
प्रतिष्ठान महाविद्यालय पैठण

डॉ मनिषा भगवानराव काळे
सहाय्यक प्राध्यापक, इंग्रजी विभाग
प्रतिष्ठान महाविद्यालय पैठण

★★★

गोषवारा – विद्येविना मती गेली ,मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली ,गतीविना वित्त गेले , वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले. प्राचीन काळापासून ते आजपर्यंत शेतकऱ्यांची स्थिती नेहमीच दयनीय राहिली आहे .महात्मा फुले यांच्या मते शेतकऱ्यांच्या अन्याय–अत्याचार दयनीय स्थिती साठी केवळ अशिक्षित पण हेच एक महत्त्वाचे कारण आहे. आणि हे वास्तव देखील आहे. येथील शेतकरी ,कष्टकरी ,शुद्र समाज हा नेहमीच आपल्या गुलामीत राहावा यासाठी भारतात नेहमीच भटब्राह्मणानी यशस्वी प्रयत्न केला व आजही ते वेगवेगळ्या माध्यमातून सर्व घटकातील समाजाला लुटत असताना दिसतो .इंग्रज भारतात येण्यापहिले देखील सर्व राजाकडे सरकारी कामात ब्राह्मणांचे प्राबल्य होते व इंग्रज भारतात आल्यावर देखील त्यांचे प्राबल्य राहिले कारण की युरोपियन अधिकारी ऐशारामी असल्याकारणाने त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे फार लक्ष दिले नाही. या सर्वांमुळे वेळोवेळी शेतकऱ्यांच्या अन्यायात भरच पडत गेलेली दिसते. तसेच आज जरी अनेक योजना शेतकऱ्यांसाठी राबविल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात त्या गरजू शेतकऱ्यांपर्यंत कितपत पोहोचतात हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. शेतकरी व शेती यांची एकूण सर्व स्थिती कशी आहे याविषयीचे विवेचन या शोधनिबंधात करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे

बीजशब्द – शेती, भट ब्राह्मण ,दयनीय स्थिती, शिक्षण

प्रस्तावना – भारत हा कृशीप्रधान देश आहे .भारतीय परंपरेत शेती हा भांडवल निर्मितीचा मोठा भाग आहे. आजही भारतातील 70 टक्के लोक षेतीवर अवलंबून आहे. देषाची अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून असल्यामुळे शेती जीवनाला महात्मा फुले यांनी मोठ्या प्रमाणात प्राधान्य दिलेले दिसते. आधुनिक महाराष्ट्राच्या विकासात महात्मा फुले यांचे नाव अग्रक्रमाने येत. शिक्षण ,कृशी राजकारण ,समाजकारण अर्थकारण, धर्म ,साहित्य अशा अनेक क्षेत्रात नवे विचार ,नव्या जाणिवा आणि नवी मूल्य रुजविण्याचे काम त्यांनी केले. समाज परिवर्तनासाठी त्यांनी रचनात्मक कार्याला महत्त्व दिले. पाण्याची नासाडी व जमिनीची धूप थांबवणे शेतमालाला योग्य भाव व शेतकऱ्यांस पूरक असे सरकारचे धोरण व व्यापार हे घटक शेतकऱ्यांच्या प्रगती साठी आवश्यक आहे. स्वातंत्र्योत्तर काळात तर महाराष्ट्रीयन समाजात समाज परिवर्तन होण्यासाठी महात्मा फुले यांचे विचार अत्यंत महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट होते.

महात्मा फुले यांच्या मते शेतकऱ्यांमध्ये कुणबी, माळी व धनगर असे तीन भेद आहे .जे लोक आपला उदरनिर्वाह शेतीवर करतात ते कुणबी होय. आपले शेतीचे काम सांभाळून बागायती करतात ते माळी व जे लोक शेतीबरोबर मेंढ्या, शेळ्यांचें कळप बाळगतात ते धनगर होय. पण या जातीचा आपापसात बेटी व्यवहार होत नसे1. महात्मा फुले म्हणतात की भटब्राह्मण हे शेतकऱ्यांना जन्माला येण्याच्या आधीच त्यांच्या आईला ज्यावेळेस ऋतू प्राप्त होतो तेव्हापासून तिच्या गर्भधारणादी संस्कारा पासून ते मरेपर्यंत कित्येक संस्कार व पूजेच्या माध्यमातून लुटला जातो .मेल्यावर देखील श्रद्धाच्या माध्यमातून सामान्यांची अडवणूक करण्याचा कार्यक्रम असतो. भटब्राह्मण हे उन्हाळ्यात पंखे , पावसाळ्यात छत्र्या तर हिवाळ्यात पांढऱ्या धाबळ्या घेतात .तसेच पूजाअर्चासाठी शेतकऱ्याकडून तांदूळ, नारळ, खारीक, सुपारी ,साखर ,फळफळावळ घेतात .तसेच ब्राह्मण भोजन व यथासांग दक्षिणा देखील घेतात3. भट ब्राह्मण हे त्या काळी वेगवेगळ्या पूजाअर्चाच्या माध्यमातून अज्ञानी शेतकऱ्यांची मोठी लूट करत असत. त्यामुळे शेतकऱ्यांची स्थिती दिवसेंदिवस जास्तच दयनीय होत गेलेली दिसते. यात पेशवे कालखंडात आणखीनच भर पडलेली दिसते. आज देखील शेतकरी व बहुजन समाज हा शिक्षण घेत असला तरी त्यामध्ये फार काही बदल झालेला दिसत नाही.

ज्यांना स्वतःची गुलामगिरी समजत नाही ते गुलामगिरीतून कसे मुक्त होणार असे महात्मा फुले म्हणतात. शेतकरी, शेतमजूर तसेच बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार हा सर्व शेतीशी संबंधित असलेला समूह म्हणजे कुणबी होय. कुलकर्णी हे शेतसाऱ्यामुळे शेती जीवनाशी निगडित होते. पौराहित्य करणारा ब्राह्मण कुणब्याचे विधी, व्रत,वैकल्यं सण ,समारंभाच्या माध्यमातून शोषण करत होते .शेतीशी संबंधित संपूर्ण समाजाला महात्मा फुले हे षूद्र ५ म्हणून संबोधतात. कुणबी शूद्रांची सामाजिक सांस्कृतिक व आर्थिक स्थिती अत्यंत दयनीय होती .पेशव्यांची तिजोरी त्यांच्या ऐशरामामुळे रिकामी झाली की जुलूम जबरदस्तीने शेतकऱ्यांकडून शेतसारा गोळा केला जात असे .दुष्काळात शेतकऱ्याने अधिकाऱ्यांनी सांगून शेतसारा दिला नाही तर त्यांच्या मुलांच्या अंगावर कढईतील उकळते तेल टाकले जाईल, ओणवे उभे करून चाबकाने फटके मारत ,वाकून धुरावर डोके धरून त्यांच्या कानात बंदुकीची दारू उडवीत. पेशवाईतील शेतकऱ्याच्या दैन्यावस्थेला तीन घटक जबाबदार होते.१) अवर्षणग्रस्तता २)पेशवाई ३) पौरोहित्य करणारे ब्राह्मण होय. पेशवाईतील शेतकरी हा धर्म ,जात बंधनामुळे अधिकच पिळला जात असे. या काळात शेती व्यवसाय निसर्गावर अवलंबून होता .काही तुरळक राज्य वगळता

इतर राज्यकर्ता वर्ग हा उदासीन असल्याने शेतकऱ्यांच्या शोषणात भरच पडलेली दिसते . छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात शेतकऱ्यांच्या भाजीच्या दठालाही हात लावण्याची सैनिकांना मुभा नव्हती. पण पेशवाईत जनता त्रस्त झाली होती. बाजीराव पेषव्याने शेतकऱ्यांना साऱ्यासाठी अनेक प्रकारच्या शिक्षा देऊन देशोधडीला लावले होते.

भारतातील संस्थाने हे भटब्राह्मणांच्या कारस्थानाला आळा घालतील असे वाटत नाही .कारण की ते ब्राह्मण कारभाराच्या ओंजळीने पाणी पिऊन दिवसा गोप्रदाने व रात्री प्रजोत्पादन करीत स्वस्त बसतात . अशा संस्थानीकाकडून शेतकरी शूद्र यांचे कल्याण होणे शक्य नाही असे महात्मा फुले म्हणतात. ब्राम्हणो मम दैवत हे वेड त्यांच्या डोक्यातून जात नाही तोपर्यंत शेतकऱ्यांचा विकास शक्य नाही. एकूणच येथील शेतकऱ्यांच्या स्थिती साठी येथील धार्मिक बाब मोठ्या प्रमाणात अडसर झालेली दिसते. इंग्रजांची सत्ता आल्याने अनेक राज्य समाप्त झाली त्यामुळे सैन्यात वेगवेगळे काम करणारे सैनिक हे बेकार झाली .या सर्वांचा बोजा शेतीवर पडला पण आधुनिक पद्धतीने शेती करण्याचा अभाव असल्याकारणाने शेती वरील उत्पन्नात फार काही वाढ झालेली दिसत नाही. महात्मा फुले हे आधुनिक शेतीचा आग्रह धरताना दिसतात. पण आधुनिक शेतीसाठी शेतकऱ्यांना सर्वात पहिले शिक्षण मिळाले पाहिजे. सरकाने लोकलफंड गोळा करून पैसा जमा केला पण अशा शाळेत शिकवणारा शिक्षक हा ब्राह्मण असल्याकारणाने तो शेतकऱ्यांच्या मुलास काय शिक्षण देणार हा प्रश्न निर्माण होता. त्यामुळे ते ठोंबे राहणार असे महात्मा फुले म्हणतात. व ते वास्तव देखील होते. तो शिक्षक स्वतः शेतकरी नसल्याने त्याला फार आस्था असण्याचं कारण नाही. जे लोक आपल्या मतलबी धर्माच्या बडीवारामुळे शेतकऱ्यांचे शोषण करतात ते काय शिक्षण देणार 10. म्हणून नंतर छत्रपती शाहू महाराज हे म्हणतात की ज्या गटाचे नेतृत्व त्याच गटातील व्यक्तीने करावे. प्राण्यामध्ये सुद्धा वाघाच्या गटाचे नेतृत्व वाघच करतो.तर शेळीच्या गटाचे नेतृत्व शेळीच करते.

उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी ही व्यवस्था भारतात केवळ नावाला दिसते. असे असते तर महात्मा फुले यांना शेतकऱ्यांवरील अन्याय अत्याचाराविरुद्ध वाचा फोडावी लागली नसती. आज तर हे वाक्य उलट झालेले दिसते उत्तम नोकरी ,मध्यम व्यापार व कनिष्ठ शेती. आज महाराष्ट्रात गरीब शेतकऱ्यांच्या मुलांना बायका देखील भेटत नाही. यावरून देखील आपल्याला हे स्पष्ट होते की आज देखील शेतकऱ्यांची दयनीय स्थिती आहे .परत मुलांना बायका मिळावा यासाठी शेतकरी समूह अनेक पूजाअर्चामध्ये गुंतलेला दिसतो .या सर्वांवरून हे स्पष्ट होते की भटब्राह्मणाचे प्राबल्य कमी झालेले नाही .आजच्या आधुनिक समाजात वैदिक पद्धतीने लग्न समारंभ करण्याचे खूळ निर्माण करून जनतेतकडून मोठ्या प्रमाणात दक्षिणा मिळवली जात आहे. विधीला लागणारा वेळ जास्त तर दक्षिना देखील जास्त ही वास्तविकता आहे.

महात्मा फुले यांनी बळीराजाचे मिथक महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर जातींना एक वेगळे सांस्कृतिक भान देण्यासाठी वापरले . बळीराजाचे राज्य हे शेतकऱ्यांचे राज्य ही बाब त्यांना मान्य होती म्हणूनच लोकशाही क्रांतीसाठी त्यांना हे आवश्यक वाटले. बळीचे राज्य हे लोकसत्ताक होते. बळीचे राज्य प्रस्थापित करणे म्हणजे शेतकऱ्यांचे व कामकऱ्यांचे आदर्श राज्य प्रस्थापित करणे होय .हे राज्य सर्वधर्म समभाव ,परस्परांच्या हक्काची जाणीव व सत्यवर्तन निर्माण करणाऱ्या लोकांचे राज्य होय. महाराष्ट्रात आज देखील स्त्रिया ओवाळतानी ईडा पिडा जावो ,बळीचे राज्य येवो श्असे म्हणतात .लोक मनात बळीराजा आज देखील घर करून असल्याचे यावरून स्पष्ट होते. महात्मा फुले गुलामगिरी ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात की ज्या ईश्वराने शुद्राद्री अतिशुद्रास व इतर लोकस आपण निर्माण केलेल्या सर्व सुष्टीतील वस्तूचा सारख्या रीतीने उपभोग घेण्याची मोकळीक दिली असून भटलोक त्यांचे नावाचे खोटे ग्रंथ बनवून त्याजमध्ये सर्वाचे हक्क रद्द करून आपण अग्रगण्य होऊन बसले ज्यां ईश्वर्याने ही सृष्टी निर्माण केली तो भेद करत नाही.तर तुम्ही आम्ही कोण. ग्रंथ निर्मिती मानवाने केली आहे त्यात चुका असणे सहाजिक आहे .ग्रंथ म्हणजे पूर्णसत्य मान्यतेची गरज नाही. शेतकऱ्याच्या आसूड मध्ये महात्मा फुले जलसिंचन याविषयी म्हणतात की त्याचप्रमाणे आमच्या दयाळू सरकारने एकंदर सर्व डोंगर टेकड्यामधील दऱ्याखोऱ्यांनी तलावतळी ,जितकी होतील तितकी सोयीसोयीने बांधून काढावीत .म्हणजे त्यांच्या खालच्या प्रदेशात ओढ्याखोड्यांनीं भर उन्हाळ्यांत पाणी बसल्यामुळे जागोजागी लहान–मोठी धरणे चालून एकंदर सर्व विहिरींस पाण्याचा पुरवठा होऊन शेतकऱ्यांसहीत सरकारचा फायदा होणार आहे . एकंदर सर्व शेतें धुपून त्यामध्ये खोंगळया पडू नयेत, म्हणून सरकारने शेतकऱ्यापासून पाणलोटाच्या बाजूने शेतांच्या बांधांनी वरचेवर ताली दुरुस्त ठेवाव्यात, आमचे दयाळू सरकारने आपल्या राज्यांतील एकंदर सर्व शेताच्या पाहण्या पाणाड्याकडून ज्या ज्या ठिकाणी दोनग्या मोटांचे वर पाण्याचे झरे सापडतील, असा अदमास निघेल ,त्या सर्व जागांच्या खुणा त्या त्या गावंच्या नकाशांनी नमूद करून केवळ सरकारच्या माहितीशिवाय पाण्याचा मार्ग दाखविणाऱ्या पाणडयासह विहिरी खोदून बांधून काढणाऱ्या शूद्र शेतकऱ्यास लहान मोठी बक्षिसे सरकारातून देण्याची वहिवाट घालावी शूद्र शेतकऱ्यांस लहानमोठी बक्षिसे सरकारांतून देण्याची वहिवाट घालावी. शेतीसाठी पाणी असणे हे अत्यंत महत्वाचे आहे .चांगल्या प्रकारे शेती करायची असेल तर महात्मा फुले यांच्या मते जलसिंचनाचे उपाय महत्त्वाचे दिसतात. आज देखील फुले यांनी सांगितलेला उपाययोजनेनुसार महाराष्ट्रात जलसिंचनाची जलयुक्त शिवारा सारखी अनेककामे सुरू आहे .यावरून महात्मा फुले यांची दूरदृष्टी लक्षात येते.

भारतात इंग्रजी सत्ता प्रस्थापित होताच हळूहळू सर्व संस्थाने खालसा केली . त्यामुळे त्या संस्थांनाशी निगडीत लोक शेतीकडे वळले . यामुळे शेतीवरील बोजा वाढला पण उत्पादन न वाढल्यामुळे दारिद्र्यात आणखीनच भर पडली. तसेच सर्वच जंगल संपत्ती इंग्रजांनी ताब्यात

घेऊन त्यात पर्वत, डोंगर ,टेकड्या ,दरीखोरी ,पडीत जमिनी, गायरान मिळून फॉरेस्ट खाते तयार केल्यामुळे जंगलावर ज्या लोकांचा उदरनिर्वाह चालत असे तो बंद झाला त्यांचा ही बोजा शेतीवर पडला. तसेच सरकार शेतकऱ्याकडून कर घेई मात्र त्या प्रमाणात सुविधा देत नसे. तसेच अनेक वस्तू इंग्लंड वरून भारतात येऊ लागल्यामुळे व त्या स्वस्तात विकल्या जात असल्यामुळे बेरोजगारीत आणखीनच भर पडलेली दिसते.

शेतकरी समाजाला तलाठ्याच्या, कुलकर्णीच्या जाचातून वाचवावं. शेतकऱ्याच्या पैशातून जमा होणारा फंड आर्यभटांना शिकवण्यासाठी वापरू नका. तो शेतकऱ्यांच्या मुलांसाठी वापरा. हे त्यावेळी महात्मा फुले यांनी सांगितले. शेतकरी वर्गाला या व्यवस्थेविरुद्ध सावध करत असताना त्यांनी शेतकरी वर्गातील अज्ञानावरही आक्रमकपणे कोरडे ओढलेले दिसते. आजही शेतकरी अनेक नवनवीन समस्येला सामोरे जात असल्याचं दिसते. आजही शेतकरी अनेक नवनवीन समस्येला सामोरे जात असल्याचं दिसते. आज देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहे जलसिंचनाचा अभाव, दुष्काळ व अवकाळी पाऊस यामुळे उत्पादन घटत आहे तर दुसरीकडे महागाई मोठ्या प्रमाणात वाढत आहे पण शेतकऱ्याच्या मालाला पाहिजे तो भाव मिळत नाही . कात्रीत सापडलेला हाताश शेतकरी आत्महत्या करतांनी दिसतो. सरकारने आत्महत्येची कारणे जाणून उपाययोजना करणे आवश्यक आहे तसेच सप्टेंबर २०२० मध्ये केंद्र सरकारने कृशी क्षेत्राशी संबंधित तीन कायदे मंजूर केले आहे. १) शेतकरी उत्पादने व्यापार व वाणिज्य कायदा. २) शेतकरी किंमत आश्वासन व कृशी सेवा करार कायदा. ३) अत्यावश्यक वस्तू कायदा. या कायद्यामुळे बाजार समित्या बंद होणार असल्याने शेतकऱ्याच्या मालाला हमीभाव मिळणार नाही. कंत्राटी शेतीमध्ये मोठमोठ्या कंपन्या शेतकऱ्या बरोबर करार करणार. यामध्ये शेतकऱ्याच्या मताला किती महत्त्व असणार हा एक प्रश्नच आहे. अशा अनेक तरतुदी या कायद्यात आहे . त्यामुळे या कायद्याला संपूर्ण भारत भर मोठा विरोध होताना दिसत आहे. भारतात शेतकरी हितासाठी आम्ही हा कायदा करत असल्याचे केंद्र सरकार म्हणत आहे .पण प्रत्यक्षात हा कायदा भांडवलदारांच्या हितासाठी दिसतो. शेतकरी कित्येक दिवसापासून कोरोना स्थितीत देखील आंदोलन करत आहे. पण सरकारला ह्या विषयी योग्य भूमिका घेत असल्याचे दिसत नाही.

महात्मा फुले यांनी श्रम करणारा शेतकरी हा आपल्या विचारांचा केंद्रबिंदू ठरलेला दिसतो .मध्यम व कनिष्ठ शेतकरी हा त्यांच्या चिंतनाचा प्रमुख आधार आहे. शेती सुधारणेच्या संदर्भात त्यांनी सुचवलेले उपाय वर्तमानातही चिंतनीय असल्याचे लक्षात येते. भारतीय समाजावर भटब्राह्मणांचे मोठ्या प्रमाणात प्राबल्य होते.त्यात भारतीय शेतकरी मोठ्या प्रमाणात पिळून निघालेला आपल्याला दिसतो. शेतकऱ्यांच्या अज्ञानामुळे त्यांची मोठ्या प्रमाणात दयनीय स्थिती निर्माण झाली. त्यामुळे महात्मा फुले यांनी शिक्षण आणि त्यातही स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाला एक नवीन दिशा दिलेली दिसते. दारिद्र्य व अज्ञानामुळे होणारे शोषण थांबविण्यासाठी शेतकऱ्यांना शिक्षित केले पाहिजे. ज्ञानाधारित शिक्षणाबरोबरच कृशी व व्यावसायिक शिक्षणावर भर दिला तर खऱ्या अर्थाने जनतेचा विकास होईल असे त्यांना वाटत होते आणि ते वास्तव देखील आहे आजच्या काळात देखील व्यावसायिक व कृषीविषयक शिक्षणाच्या माध्यमातून कृषिक्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती झालेली दिसते. या सर्वांच्या माध्यमातून महात्मा फुले यांनी कृशी प्रधान देशात शेती व शेतकऱ्यांची प्रगती हिच देषाची प्रगती असल्याचे मांडले आणि ते वास्तव देखील आहे. महात्मा फुले यांचे विचार हे आजही प्रासंगिक असल्याचे लक्षात येते. खऱ्या अर्थाने बहुजन समाजाला अन्याय अत्याचारातून बाहेर काढण्यासाठी महात्मा फुले यांनी अनमोल असे कार्य केल्याचे स्पष्ट होते. माणसाला माणसासारखं जगण्याचं बळच त्यांच्यामुळे मिळाले.

संदर्भसूची

१) *महात्मा फुले समग्र वाडरूमय , संपा धनंजय कीर ,डॉ.स.ग मालशे आणि य. दी. फडके, महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृती मंडळ मुंबई,२००६ ,पृ २६३.*

२) *उपरोक्त, पृ २६७.*

३) *उपरोक्त, पृ २६८.*

४) *महात्मा फुले शोधाच्या नव्या वाटा, संपा . हरी नरके ,मुंबई २००६, पृ.२१६–२१७.*

५) *महात्मा फुले यांचे शूद्रातिषूद्रविषयीचे विचार,सुलभा मुंडे, औरंगाबाद, २००० पृ २५–२६.*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

'लिंग शाळा आणि समाज' ह्या पेपरमधील प्रात्यक्षिक कार्यातून विकसित होणा–या मूल्यांचा अभ्यास.

प्राचार्या डॉ.पांढरे विद्युलता ज्ञा.
उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पंढरपूर

★★★

प्रस्तावना रू – 2015 मध्ये बी.एड्. अभ्यासक्रमाची NCTE व्दारे पुर्नरचना करण्यात आली. बी.एड्. अभ्यासक्रम हा दोन वर्षाचा करण्यात आला. ह्या दोन वर्षाच्या अभ्यासक्रमात काळाच्या गरजेनुसार नवीन विशयांचा समावेश करण्यात आला. त्यातीलच एक विषय लिंग, शाळा आणि समाज ह्या विषयातून लिंगविषमता नष्ट करुन लिंग समानतेकडे वाटचाल करण्यासंबंधी विविध घटकांचा समावेश करण्यात आला आहे. विविध स्त्री–पुरुष विषयक संकल्पना, समाजाची स्थिती, बदलाचे विविध घटक इ. आशयाचा समावेश पेपरमध्ये आहे. तात्विक भागाबरोबरच लिंग समानता रुजविण्यासाठी, विविध प्रात्यक्षिक कार्याचा समावेष केला आहे. ह्या प्रात्यक्षिक कार्यातून लिंग समानता रुजविणे हा प्रमुख उद्देष्य समोर ठेवून त्यावर आधारित बी.एड्. प्रशिक्षणार्थीस कार्य दिल्यास निश्चित त्यांच्या लिंग समानता रुजण्यास मदत होईल. हा दृष्टिकोन ठेवण्यात आला आहे. हाच दृश्टिकोन समोर ठेवून संषोधकाने एका प्रात्यक्षिकाची निवड केली आहे. त्यामध्ये विविध क्षेत्रातील आदर्श कार्य केलेल्या महिलांचा अभ्यास आणि सद्यास्थितीत आदर्श कार्य करणाऱ्या महिलांचा अभ्यास करण्यास प्रशिक्षणार्थीना प्रात्यक्षिक देण्यात आले. प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करताना त्यांच्यामध्ये कोणकोणते मूल्य विकसित झाली. याचा अभ्यास सदर संशोधनामध्ये संशोधकाने करण्याचे निश्चित केले आहे.

महिलांची विविध कार्य क्षेत्रे सामाजिक क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र, क्रिडा क्षेत्र, राजकीय क्षेत्र,सांस्कृतिक क्षेत्र

सामाजिक क्षेत्र – समाजात समाजसेवा तसेच विविध सामाजिक कार्य करुन महिलांनी आपला वेगळा ठसा उमटविला आहे. उदा. सिंधूताई सपकाळ

शैक्षणिक क्षेत्र – शिक्षणाच्या बळावर आज सर्वच शिक्षणक्षेत्रात महिलांनी आपला ठसा उमटविला आहे. आज दहावी, बारावीच्या निकालात मुली ह्या मुलांच्यापेक्षा जास्त गुण घेवून उत्तीर्ण होतात. अनेक उच्च पदावर महिला आज शिक्षणाव्दारे पोहचल्या आहेत.

उदा. सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ.मणालिनी फडणवीस, एस. एन.डी.टी. विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ.वसुधा कामत इ. उदाहरणे आपणास पहावयास मिळतात.

क्रिडा क्षेत्र – शिक्षणाबरोबरच देशात तसेच आंतरराष्ट्रीय स्तरांवर महिलांनी आपले उच्च स्थान प्राप्त केले आहे. विविध/सर्वच क्रिडा प्रकारात महिलांचा सहभाग आहे. उदा. सानिया मिर्झा.

राजकीय क्षेत्र – स्त्रियांच्या राजकीय सबलीकरणाच्या दृष्टीने 73 वी घटनादुरुस्ती खरोखर एक क्रांतिकारक पाऊल होते. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्त्रियांना 33ः आरक्षण प्राप्त झाले. सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेविका, नगराध्यक्ष, जिल्हा परिशद सदस्या व अध्यक्षा यासारख्या विविध पदांवर त्या विराजमान झाल्या आणि आपल्याकडील क्षमता सिध्द करुन दाखवित आहे.

उदा. देशाच्या प्रथम अर्थमंत्री निर्मला सीतारामन, अनेक खासदार, आमदार पदावर आज महिला विराजमान आहेत.

सामाजिक क्षेत्र – भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती असून समाजात स्त्रीला दुर्बल घटक असे स्थान दिले गेले. आज ह्यामध्ये बदल होण्यासाठी बालपणापासूनच कुटुंबात मुलगा आणि मुलगी यांना समानतेचे संस्कार करणे, मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे गरजेचे आहे. त्यासाठी समाजातील परंपरा, रुढीबध्दता, प्रथा यांना नष्ट करणे हे कार्य आज समाजातील काही कुटुंब करत असलेले आपणास दिसून येतात. त्यामुळे आज मुलींना चांगले शिक्षण देण्यात पालक जागरुक झाला आहे.

सांस्कृतिक क्षेत्र – विविध सांस्कृतिक क्षेत्रातही आज महिला आपणास आपल्या कलेच्या जोरावर नावलौकिक मिळवत असलेल्या दिसून येतात.

2 संशोधनाची गरज व महत्त्व –

1) लिंग, शाळा व समाज पेपरमधून प्रात्यक्षिक कार्यातून महिलांच्या विविध कार्याची ओळख.
2) महिलांच्या विविध कार्यक्षेत्रांची ओळख
3) समाजास स्त्री–पुरुष समानता प्रदान करण्यासाठी
4) बी.एड्. प्रशिक्षणार्थी मध्ये स्त्री सक्षमतेविषयी विविध मूल्य विकसित करण्यासाठी.

3. संशोधनाची उद्दिष्टये –

1) बी.एड्. प्रशिक्षणार्थीमध्ये 'लिंग, शाळा व समाज' पेपरमधील प्रात्यक्षिक कार्याची माहिती देवून त्यावर आधारित प्रात्यक्षिक

कार्य राबविणे.

2) बी.एड्. प्रशिक्षणार्थीवर 'लिंग, शाळा व समाज' पेपरमधील प्रात्यक्षिक कार्याच्या पुर्तीनंतर विकसित झालेल्या मूल्यांच्या संदर्भात अभ्यास करणे.

3) बी.एड्. प्रशिक्षणार्थीमध्ये 'लिंग, शाळा व समाज' पेपरमधील प्रात्यक्षिक कार्यपुर्तीचा अभ्यास करणे.

4. संशोधन व्याप्ती – बी.एड्. प्रशिक्षण घेणाऱ्या 40 प्रशिक्षणार्थींचा समावेश सदर संशोधनात करण्यात आला आहे.

5. संशोधन मर्यादा

1) प्रस्तुत संशोधन हे बी.एड्. प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थीपुरतेच मर्यादित आहे.

2) प्रस्तुत संशोधन हे उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय पंढरपूरमधील बी.एड्. प्रशिक्षणार्थीपुरते मर्यादित आहे.

3) प्रस्तुत संशोधन हे 'लिंग, शाळा व समाज' ह्या पेपरच्या प्रात्यक्षिक कार्यापुरते मर्यादित आहे.

संशोधन पध्दती व न्यादर्श – **संशोधन पध्दती** – प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक पध्दतीचा वापर केला आहे.

न्यादर्श – संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी 40 प्रशिक्षणार्थी गटाची निवड केली आहे.

संशोधन कार्यपध्दती – संशोधकाने प्रथम प्रात्यक्षिक कार्यासंबंधी प्रशिक्षणार्थींना संपूर्ण माहिती सांगितली. कार्य कसे करावे याबद्दल मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थीकडून समाजात उल्लेखनीय कार्य केलेल्या आणि कार्य करत असलेल्या महिलांची माहिती प्रशिक्षणार्थींनी संग्रहीत केली. त्यानंतर संशोधकानी महिलांविषयक काही निवडक मूल्यांची चेकलिस्ट यादी प्रशिक्षणार्थींना दिली. आपण केलेल्या प्रात्यक्षिक कार्यातून आपणांस कोणत्या मूल्यांची ओळख झाली, बोध झाला यासंबंधी चेकलिस्टमध्ये खुणा करण्सयास सांगितल्या. संकलित चेकलिस्ट वरुन त्याचे शेकडेवारीमध्ये विष्लेशण करण्यात आले. त्याव्दारे प्रात्यक्षिक कार्यातून प्रषिक्षणार्थीमध्ये महिलांविशयक विकसित झालेल्या मूल्यांचा अभ्यास करण्यात आला.

संकलित माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

संकलित माहितीचे वर्गीकरण करुन पुढीलप्रमाणे अर्थनिर्वचन करण्यात आले. 40 प्रशिक्षणार्थींव्दारे हे अर्थनिर्वचन पुढीलप्रमाणे खालील मूल्यांच्या आधारे प्रात्यक्षिक चेकलिस्ट व्दारे पडताळण्यास सांगितले.

1) प्रामाणिकपणा
2) खिलाडूवशत्ती
3) जिद्द
4) सहकार्य
5) त्याग
6) सकारात्मकवृत्ती
7) सामाजिकता
8) न्याय, समता

निष्कर्श –

1) प्रामाणिकपणा हे मूल्य 100टक्के प्रात्यक्षिक कार्यात दिसून येते, असे सर्व प्रशिक्षणार्थींनी स्पष्ट केले. प्रत्येक महिलेचे कार्य प्रामाणिकपणे केल्यामुळे ते विशिष्ट उंचीपर्यंत पोहचू शकल्या.

2) 'खिलाडूवृत्ती' हे मूल्य 30टक्के प्रात्यक्षिक कार्यात आलेले आहे. ज्या प्रशिक्षणार्थींनी खेळाडू महिलांचा अभ्यास केला आहे. अशा प्रात्यक्षिकात खिलाडूवृत्ती हे मूल्य दिसून आले.

3) जिद्द' हे मूल्य सर्व प्रात्यक्षिकांत दिसून येते म्हणजे 100टक्के प्रमाण असून 'त्याग' ह्या मूल्यांचे प्रमाणत 60टक्के प्रात्यक्षिकांमध्ये दिसून येतो.

4 सकारात्मक वृत्ती', 'सामाजिकता' ह्या मूल्यांचे प्रमाण ही सर्व प्रात्यक्षिकांत दिसून येते. त्याचे ही प्रमाण 100टक्के आहे.

समारोप – विभिन्न सामाजिक, राजकीय, शैक्षणिक कार्य करण्यासाठी महिलांनी विविध मूल्यांची जोपासना केलेली दिसून येते. मूल्यांच्याआधारे त्या आपल्या कार्याव्दारे यशस्वी झाल्या. समाजाला एक आदर्श घालून दिला. हा आदर्श सर्वांच्यासाठी एक प्रेरणा असून निश्चित ह्या महिलांच्या कार्याचा आढावा घेतल्यास अभ्यास केल्यास जीवनाला दिशा, बोध मिळण्यास मदत होते. विविध मूल्यांची रुजवणूक होण्यास प्रेरणा मिळते. म्हणून बी.एड्. प्रशिक्षणार्थींसाठी हे प्रात्यक्षिक अत्यंत उपयुक्त आहे.

संदर्भग्रंथ सूची –

1. *मरजे, पवार (2016) लिंगभाव, शाळा व समाज, प्रशांत पब्लिकेशन.*
2. *B-Ed- Curriculum and its frameworks 2018, Solapur*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

इंदिरा गांधी आणि नॅम
(1980–84 या कालखंडातील एक चिकित्सक अभ्यास)

प्रा. डॉ. भागवत वाघ,
इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग आणि पुरातत्वशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

★★★

प्रस्तावना – अलिप्ततावाद हा शब्दप्रयोग सर्वप्रथम पंडित नेहरुंनी १९५४ मध्ये कोलंबोतील एका भाषणात केला. (मी माझ्या एका लेखात अलिप्ततावाद ह्या शब्दालाच हा शब्द वापरत आहे. कारण अलिप्तातावाद म्हणजे अलिप्त न राहणे तर सत्ता गटाच्या राजकारणापासून दूर राहात नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांच्या हितासाठी विकसित राष्ट्रांसोबत वेळप्रसंगी भांडने सुद्धा होय). आंतरराष्ट्रीय क्षेत्रात लष्करी स्वरूपाच्या व गटातटाच्या राजकारणापासून अलिप्त राहणे म्हणजे असलग्नतावाद होय. होकारात्मक तटस्थता असा अलिप्ततेचा अर्थ लावता येईल. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू भारताच्या अलिप्ततावादी धोरणाचे स्पष्टीकरण करताना म्हणाले होते की कोणत्याही राष्ट्राचे अंकित म्हणून न राहता. आंम्ही एक स्वंतत्र राष्ट्र या नात्याने आंतरराष्ट्रीय परिषदामध्ये भाग घेऊ. आम्ही सत्तागटाच्या राजकारणापासून अलिप्त राहू इच्छितो. अमेरिका, रशिया या महासत्ताच्या गटामध्ये सामील न होता जागतिक व्यासपिठावर भारतास सन्मानाचे स्थान मिळविता येईल. असलग्नतावादाचे उद्‌गाते असे नेहरुंना संबोधले जाते. नेहरूंनी आपल्या आचरणातून असलग्नतावादाला आंतरराष्ट्रीय पातळीवर महत्त्वाचे स्थान प्राप्त करून दिले. विधायक क्रियाशील व निश्चित स्वरूपाचा नीतीप्रवाह म्हणून असग्नतावाद या धोरणास महत्त्व आहे.

उद्देश : –

१) असल्ग्नतावाद ही नुकत्याच स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांची संघटना होती.

२) प्रामुख्याने भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या संकल्पनेतून ती साकार झाली होती.

३) भारत प्रामुख्याने जगाचे नेतृत्व करत होता व अविकसित राष्ट्रांच्या साठी आर्थिक स्वावलंबत्व कसे प्राप्त करता येईल यासाठी प्रयत्न करत होता.

४) नेहरूंच्या कालखंडात या असल्ग्नतावाद धोरणाला महत्त्व होते. परंतु नेहरूंच्या नंतर ह्या धोरणाचे महत्व कमी झाले का ते तपासणे.

५) प्रामुख्याने इंदिरा गांधी यांचा नेहरूंच्या खालोखाल आंतरराष्ट्रीय प्रवास व दबदबा राहीला आहे.

६) इंदिरा गांधीनी ही सत्तागटाच्या राजकारणात असल्ग्नतावादी भूमिका कायम ठेवली.

७) इंदिरा गांधीच्या पहिल्या कालखंडावर. (१९६६–७७) संशोधन व लेख आहे. परंतु दुसर्या (१९८०–८४) ह्या कालखंडावर प्रामुख्याने संशोधन झालेले नाहीत. त्या निमित्ताने हा संशोधनपूर्ण लेख.

बेल्ग्रेड परिषदेला वीस वर्षे पूर्ण झाल्याबद्दल युगोस्लावियाचे वर्तमानपत्र बोर्बा यास १९ जानेवारी १९८१ रोजी इंदिरा गांधी यांनी संदेश पाठविला. त्यात त्या म्हणाल्या कि नॅम समुदायाच्या अंतर्गत असे देश होते. ज्यांनी आपली वसाहतवाद आणि परकीय अधिपत्यातून मुक्तता केली होती. नॅमची सदस्यसंख्या चार पटीने वाढली होती हा एक पुरावा होता की नॅमचे धोरण कित्ती समर्पक आणि सजीव होते. चळवळीने नेहमीच वसाहतवाद रंगभेद आणि साम्राज्यवादाचे अधिपत्य संपवण्यासाठी काम केले. भारत रंगभेद विरोधातील आफ्रिकन जनतेचा विजय आणि पॅलेस्टाइन जनतेच्या संघर्षाच्या सफलतेच्या प्रतीक्षेत होता. नॅमचे मुख्य सूत्र होते शांततापूर्ण सहजीवन. जर जगातील लोकांसाठी संपूर्ण विकास करायचा असेल तर अण्वस्त्र आणि युद्ध संपविणे आवश्यक होते.[1] परंतु आंतरराष्ट्रीय वातावरण बिघडत होते. जगाच्या वेगवेगळ्या भागात जागतिक सत्ताची शक्ती पसरली व शस्त्रास्त्र संघर्षात वाढ झाली. नॅमने नेहमीच आर्थिक सहकार्यावर जोर दिला. यासाठी अधिक कार्ये होणे जरुरीचे होते. ०९ फेब्रुवारी १९८१ रोजी दिल्ली येथे नॅम देशांच्या परराष्ट्र मंत्र्याची परिषद झाली. इंदिरा गांधीनी उद्‌घाटनपर भाषणात गांधीजीचे शब्द उध्वृत केले. "भारत अशा प्रत्येका पासून स्वंतत्र होऊ इच्छितो कि ज्याला आमच्या देशावर मालकी प्रस्थापित करण्याची इच्छा आहे. आम्हाला फक्त मालक बदलावयाचा नाही तर आमच्या भूमीवर आमची स्वतःची मालकी प्रस्थापित करावयाची आहे." त्या म्हणाल्या कि हे उदगार नॅमचे राजकीय तत्व होते या प्रकारची मुक्तता आणि शांतता स्वांतत्र्यासाठी नितांत गरजेची होती.[2] इंदिरा गांधी पुढे म्हणाल्या कि युरोपमध्ये शांतता होती, आशियात संकटे वाढत होती. लटीन अमेरिका आणि कॅरिबीयन क्षेत्रात नवीन दबाव काम करिता होते. आर्थिक धमक्या सुद्धा दिल्या जात होत्या. तसेच लष्करी शक्ती आणि अडयांना पुन्हा वाढविले जात होते. अणुयुद्धाचा धोका पाहता असल्ग्नतावादाची प्रासंगिकता आणि शांततेसाठी पुन्हा समर्पन यांची आवश्यकता होती. या परिषदेद्वारा महासत्ताच्या विरोधात आवाज उठवून युद्धाच्या भाषेचा त्याग, हिंदी महासागर आणि आशिया आफ्रिकेच्या वेगवेगळ्या भागात त्यांची उपस्थिती कमी करणे तसेच शांतता आणि समजूतदारपणा साठी चांगल्या मनाणे शोध सुरु करणे आवश्यक होते. त्या म्हणाल्या होत्या कि नॅम देषांना अफगानिस्तान संबधी दुरुख होते, पश्चिम आशियातील भांडणाचा जनतेवर तसेच नॅमवर

प्रभाव पडला होता. नॅमला आशा होती कि जागतिक सत्ता स्थानिक तणावाचे संघर्षात रुपांतर करणार नाहीत. शांतता आणि मानवजातीच्या भविश्याच्या कल्याणासाठी, युद्धात देश तसेच युद्धासाठी आतुर असनार्या देशांना त्यांनी आवाहन केले कि त्यांनी आपल्या जवानांना परत बोलवावे.

इंदिरा गांधी म्हणाल्या की हे अनुभव सिद्ध होते कि राजकीय अवडबंर आणि आर्थिक शोशण यांची निकटची साथ होती. राजकीय स्वातत्र्यांच्या सहाय्याने आर्थिक प्रगती संभाव होईल. नॅमच्या अंतर्गत राजकीय प्रगती बरोबरच आर्थिक पैलूंचे पण समान महत्त्व होते. अल्जियर्स, कोलम्बो आणि हॅवाना येथील परिषदेत आर्थिक घटकावर जोर दिला होता. त्यांचा आग्रह होता कि आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था मजबुतीसाठी जागतिक वार्तालाप सुरु करावा. विकसित आणि विकसनशील राष्ट्रातील अडथळे दुर करणे ही एक जबाबदारी होती. विकसनशील देशांची एकजूट महत्वाची होती.[३] इंदिरा गांधी म्हणाल्या कि नॅमच्या विरोधात सरंक्षणवादाचा प्रयोग होत असेल,दुर्बलांच्या विरोधात मजबूत राष्ट्रे पारंपारिक अस्त्रे वापरीत असतील, तर नॅम राष्ट्रांनी अंतर्गत व्यापाराचा विस्तार का करू नये? विकसित राष्ट्राकडून अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि अन्नधान्य सहाय्यासाठी दबावाचा प्रयोग होत असेल तर नॅम राष्ट्रांनी वित्तीय, तंत्रज्ञान आणि कृषिक्षेत्रात परस्परांच्या हितासाठी, सहकार्यासाठी व्यापक उपाय करणे आवश्यक होते. त्यांनी आवाहन केले होते कि नॅम राष्ट्रांच्या प्रत्येक बैठकीच्या वेळी जागतिक सत्ता संषय आणि विभाजनाचे बी पेरण्यासाठी कुटनीती आणि प्रचार यासाठी दुप्पट वेगाने सुरुवात करतात. दबावातून बाहेर पडण्यासाठी एकत्र येऊन सुद्धा मुल सिद्धांत आणि उद्देष्य यावर काम केले पाहिजे. नॅम राष्ट्रे शाब्दिक खेळीसाठी नाही तर नॅमचा प्रामाणिकपणा आणि प्रभाव यांचा पुर्नस्थापनेसाठी एकत्र आलो होतो. ११ फेब्रूवारी १९८१ रोजी इंदिरा गांधी म्हणाल्या कि अधिपत्याच्याविरुद्ध कठोर संघर्शासाठी नॅम राष्ट्रांनी परत एकदा कोणाच्या छत्रछायेखाली जावे का? नॅम राष्ट्रे सर्वासोबत मित्रता करू इच्छित होते. भारताचे हे धोरण होते कि ज्या ठिकाणी मित्रता होती तिला सदृढ करणे. ज्या ठिकाणी उदासीनता होती त्या ठिकाणी समजदारी आणि मनमिलाफ वाढविणे व षत्रुता असेल तर ती संपविणे.

युरोप आणि अमेरिका मोठ्या हुशारीने आशियायी भूमीकडे वळत होते. त्यांनी अटलांटिक महासागरलाच प्रदूषित केले नाही तर प्रशांत महासागर, हिंदी महासागर याकडे ते वळले होते. जागतिक सत्तातील संघर्ष जगाच्या वेगवेगळ्या भागात विषेशत पश्चिम, दक्षिण, आग्नेय आशियात लष्करी स्पर्धा, आण्विक शस्त्रास्त्रे बाळगणार्या देशांची वृद्धी, आर्थिक विकासासाठीची बेजबाबदारी आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात बेफिकिरीचे आचरण या सर्व कारणामुळे नॅमसमोर समस्या निर्माण झाल्या होत्या. चिंतेचा विषय हा होता की जगाच्या आर्थीक, सामाजिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर असंतुलन आणि असमानता तसेच लोकसंख्या वाढीचा दबाव आणि भौतिक, तांत्रिक साधनाच्या उपलब्धतेसंबधी सामंजस्यातील स्पष्टपणाचा अभाव. विश्वकल्याण तोपर्यंत कोरी कल्पना राहील जो पर्यंत विकसनषील देशांच्या आकांक्षा आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या अंतर्गत प्रतिबिंबित आणि आंतरराष्ट्रीय चर्चा परिणामात रुपांतरीत होणार नाही.

०३ सप्टेंबर १९८१ नॅम देशांच्या प्रेस एजन्सीला इंदिरा गांधी यांनी मुलाखत दिली, मुलाखतीत त्यांना प्रश्न विचारण्यात आला कि, कालौघात आंतरराष्ट्रीय प्राधान्यक्रम व वसाहतवाद आणि साम्राज्यवाद नष्ट करणे या ऐवजी राष्ट्रीय विकास साध्य करणे हा झाला होता. हे नवीन आवाहन नॅम चळवळ कशी पेलणार होती. त्या म्हणल्या नॅम चळवळ आशिया, आफ्रिका, आणि इतर क्षेत्रातील जनतेच्या साम्राज्याविरोधी संघर्शाच्या परराष्ट्र धोरणांची तार्किक अभिव्यक्ती होती. नामिबियाला स्वातंत्र्य मिळणे बाकी होते, दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णियांना अन्यायाचे बळी व्हावे लागत होते. विकसनशील राष्ट्रावर आर्थिक, राजकीय दबाव टाकला जात होता. अंतर्गत प्रश्नात हस्तक्षेप केला जात होता. येणार्या वर्षात नॅम चळवळ ही विकासाच्या आड येणार्या अडथळ्यावर लक्ष केन्द्रीत करणार होती.[९]

नॅमचे ७ वे संमेलन

नॅमचे ०७ संमेलन ७–११ मार्च १९८३ या कालावधीत दिल्ली येथे आयोजित करण्यात आले. या संमेलनात ९६ देशांनी भाग घेतला, २६ देषांचा सहभाग अतिथी आणि निरीक्षक म्हणून राहिला.

०७ मार्च १९८३ च्या सकाळी इंदिरा गांधी यांची एकमताने मुख्य व्यक्ती म्हणून निवड झाली. फिडेल कॅस्ट्रो यांनी त्यांचे नाव सुचविले आणि इथियोपिया, मलेशिया, सायप्रस, अर्जेन्टिना यांच्या प्रतिनिधींनी अनुमोदन दिले. पॅलेस्टाईन लिबरल ऑर्गनायझेषन (पी.एल.ओ) ने त्यांना पाठिंबा दिला. परिशदेमध्ये बहामा, बारबादोस आणि कोलंबिया हे नवीन सदस्य नॅम चळवळीमध्ये सामील झाले. ०७ व्या परिशदेमध्ये इंदिरा गांधी यांचे उद्घाटनपर भाशण झाले. भाषणात मुख्य भर निषस्त्रीकरण आणि अण्वस्त्र युद्धांचा मानवंशास्त्रासाठी धोका आणि नवी आर्थिक व्यवस्था हे होते. इराण– इराक संघर्षाला त्यांनी 'शोकांतिक युद्ध' म्हटले. त्याचबरोबर त्यांनी अफगाणिस्तानमधील परिस्थितीचा उल्लेख केला. नॅम चळवळीच्या प्रतिनिधींनी इशारा दिला कि जागतिक अर्थव्यवस्था कोसळण्याच्या परिस्थितीत होती आणि अण्वस्त्र युद्धाचा धोका अस्तित्वात होता. त्यांनी खेद व्यक्त केला जगाच्या विकासासाठी कोणतीही सुरक्षा राहिलेली नव्हती. आर्थिक परिस्थिती तुटलेली होती. नॅम चळवळ ही आंतरराष्ट्रीय आर्थीक संबधाच्या बांधणीसाठी उभी होती. त्यांची अशी इच्छा होती कि येणार्या अक्टांड व इतर परिषदामध्ये कोणती नीती स्वीकारावी याची रूपरेषा तयार करावी.

इंदिरा गांधी म्हणाल्या कि मंदीमुळे जगातील उत्पादनामध्ये १.२ टक्क्यांनी १९८१ मध्ये घट झाली आणि विकसित देशामध्ये ३० दशलक्ष अधिक, १० टक्क्यापेक्षा बेरोजगारीचे प्रमाण वाढले, गरीब देशामध्ये बेरोजगारीची परिस्थिती सतत भेडसावत राहिली. तेल उत्पादक विकसनशील देशामध्ये मोठ्या प्रमाणात मानवी समस्येमध्ये वाढ झाली. १९७९ सालापासून विकसनशील देशांच्या निर्यात मुल्यातील

तूट १०० बिलियन डॉलर एवढी झाली होती. व आंतरराष्ट्रीय कर्जाचे ओझे ६०० बिलियन डॉलर एवढे झाले होते हि पूर्वीपेक्षा दुप्पट होते. विकसनशील देशांना मिळणाऱ्या मध्यम मुदतीच्या व दिर्घ मुदतीच्या कर्जात १० बिलियन डॉलर एवढी कपात झाली होती. सवलतीच्या दरात मिळणाऱ्या मदतीत झपाट्याने घट झाली होती. (आय.डी.ए.) ला देण्यात येणाऱ्या निधीत कपात झाल्यामुळे कमी उत्पन्न देशांना जागतिक बँकेतून मिळणाऱ्या मदतीवर मर्यादा आल्या होत्या. मागील दोन वर्षात निर्यातीतून मिळणारे विकसनशील देशांचे उत्पन्न ४० बिलियन डॉलर ने घटले होते. निर्यात केल्या जाणार्या वस्तूच्या किमतींनी मागच्या ५० वर्षाच्या निच्चांक गाठला होता. आंतरराष्ट्रीय कर्जावरील व्याजाचे दर कधी नव्हे एवढे वाढले होते. विकसनशील देशांना त्यांच्या उत्पादित वस्तूंना कमी भाव मिळत होता व आयात केलेल्या औद्योगीक वस्तूंना जास्त किमत द्यावी लागत होती. इंदिरा गांधी म्हणाल्या कि ओटावा परिषदेमधील कॅनकून आणि व्हसार्य परिषदेमध्ये विकसित आणि विकसनशील राष्ट्रांत कोणत्याही प्रकारचा संवाद झाला नव्हता. फक्त उत्तरेकडील काही राष्ट्रामध्ये सामाजिक, आर्थिक विकासासासंबधी त्यांच्या स्वतःच्या इच्छेनुसार संवाद झाला. अपुरे आणि असमान व कालबाह्य झालेल्या आर्थीक आणि आंतरराष्ट्रीय नानेनिधीतून सर्वसमावेशक सुधारणेचा प्रश्न अषा परिषदेमधुन सोडविला पाहिजे. गरिबी घालविण्यासाठी निदान महत्वाचे होते. विधान हे आपल्या मुल गरजा भागविणारे होते. परंतु ते काही समस्या निर्माण करण्याकडे जात होते. प्रत्येक देशाला विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा आधार होता, परंतु तंत्रज्ञान वापर हा आपल्या अनुभवातून झाला पाहिजे. नॅम चळवळीने या विषयाकडे लक्ष दिले होते मागील काही वर्षात कृशी क्षेत्रात, बांधकाम, बिजवाणाच्या संशोधनात, सार्वजनिक, आरोग्य, तंत्रज्ञान, प्रशिक्षण, आणि काही ओद्योगिक क्षेत्रात चांगले सहकार्य राहिले होते. इंदिरा गांधी म्हणाल्या कि अद्याप ही वेगेवेगळ्या प्रकारचा हस्तक्षेप उघड आणि छुप्या रीतीने आशियायी, आफ्रिका, लॅटीन अमेरिका या ठिकाणी होत होता. जागतिक सत्तांचे हस्तक्षेप आणि आक्रमण हे न्यायीपणावर आणि नैतिक नव्हते पॅलेस्टाईन लोकांना पाठिंबा देण्याबाबतीत नॅम चळवळ एकदिलाची होती. इस्त्राईल निर्लज्जपणे आक्रमण करत होता पण अशा प्रकारे पॅलेस्टाईन लोकांचे रास्त हक्क कायमचे अडवून ठेवणे हे शक्य होणार नव्हते. दक्षिण आफ्रिका सुद्धा बेकायदेशिररित्या वागत होती. प्रिटोरिया सरकारने वंशवादाला संस्थात्मक स्वरूप दिले होते. आपले स्वतःचे लोक, नामिबियाचे लोक आणि शेजाऱ्याविरुद्ध केलेली आक्रमणे अपमानास्पद होती. सैनिकीकरण आणि अण्वस्त्रीकरण हे दिएगो गार्सिया वर आधारित होते. युनोने जाहीर केल्याप्रमाणे किनारपट्टीलगतचे क्षेत्र आणि भारतीय भूप्रदेश शांतता क्षेत्रात यायला पाहिजे. इंदिरा गांधीनी आवाहन केले कि अंतर्गत संबधांतून आणि युनोच्या सहकार्याने ३८ व्या आमसभेत एक आठवडा किंवा १० दिवस सगळ्यांनी एकत्र येऊन महत्वाच्या समस्यांवर चर्चा केल्यास ते फायद्याचे ठरेल. १९८५ हे वर्ष युनोच्या सबलीकरणासाठी महत्वाचे ठरावे जगातील शांतता हि निशस्त्रीकरणावर विसंबून होती. अण्वस्त्रधारी नसलेले सर्व देश शांततेसाठी एकत्र आले पाहिजेत. इंदिरा गांधीनी नॅम चळवळीच्या प्रमुख म्हणून १२ मार्च १९८३ रोजी पहिली पत्रकार परिषद घेतली. त्या म्हणाल्या कि नॅम चळवळीचे निर्णय प्रत्येक प्रश्नाची गुणवत्ता पाहून घेतलेले होते. कोणाच्या मैत्रीचा किंवा शत्रुत्वाचा विचार केलेला नव्हता. नॅम चळवळ रुळावर आलेली होती. व तिने आपल्या जुन्याच तत्त्वाचा व विचारांचा पुनरुच्चार केला होता. चळवळ कोणाच्याही बाजूला झुकलेली नव्हती. अफगाणीनिस्थानच्या प्रश्नावर जी आरडाओरड केली जात होती. त्यामुळे समस्येचे समाधान शोधण्यास मदत होणार नव्हती. अफगाणिस्तानमधील हस्तक्षेपाविषयी जे लोक आता बोलत होते. ते व्हियतनाममधील आक्रमणा विशयी कधी बोलले नव्हते. आपणास धोका आहे असे एखाद्या लहान देशाला वाटले असेल व त्याने परकीय सैनिकांना बोलावले असेल तर तो त्या देशाचा प्रश्न होता. इंदिरा गांधीना परकीय सैनिकांना बोलविणे किंवा परकीय हस्तक्षेप पसंत नव्हता. त्यांच्याबरोबर जगाच्या इतर भागातसुद्धा हस्तक्षेप होत होता व आशीयीकरण होत होते व निर्वाचित लोकांच्या जागी कळसूत्री सरकारे स्थापन केली जात होती याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. इंदिरा गांधीनी ३० महिने जुन्या इराण इराक संघर्षावर खेद व्यक्त केला इराण आणि इराक यांनी शांततापूर्ण साह्चार्याने प्रश्न निभवायला हवेत असे त्या म्हणाल्या. नॅम चळवळीच्या ७ व्या परिषदेत बाह्यनिरिक्षक रिचर्ड एल.जॅक्सन हे होते. ते परराष्ट्र सेवेत अधिकारी होते. ते नॅम चळवळीच्या अभ्यासाचे निरीक्षक म्हणून राहिलेले होते. सोमालियात अमेरिकेचे राजदूत म्हणून आणि नंतर युनोच्या यु.एस.मिशन चे ते राजकीय सल्लागार म्हणून राहिलेले होते. त्यांनी निष्चयपूर्वक सांगितले कि १९८३ च्या नॅम प्रस्तावामध्ये संधिग्ता होती.

इंदिरा गांधी यांनी युरोपियन राष्ट्रांना नॅमची तत्वे व वंशवाद विरोध या मुद्द्यांची नेहमी जाणीव करून दिली. आय.डी.ए. बाबतीत इंदिरा गांधीनी स्पष्ट केले की, निधी भारत स्वतसाठी मागत नव्हता. विकसनशील राष्ट्रासाठी मागत होता. औद्योगिक मंदीने प्रगत राष्ट्रे सुद्धा त्रस्त होती. यासाठी इंदिरा गांधीनी जागतिक नाणेनिधी, उद्योगधंद्यातील स्थिरता यावर भर दिला. कडून विकासात्मक नवीन धोरणाची अपेक्षा केली. फ्रान्सच्या भेटीत त्यांनी नाणे व्यवस्थेतील सुधारणावर भर दिला. अध्यक्ष मितराँ आर्थिक संबधातील सहकार्याबाबत अनुकुल होते.

साधन सूची

१) *रिलेव्हन्स ऑफ नॉन आलाइनड मुव्व्हेंट, १६ जानेवारी १९८१, सिलेक्टेड स्पीचेस अँड राइटींग्ट ऑफ इंदिरा गांधी, पब्लीकेशन, डिव्हिजन भारत सरकार, नवी दिल्ली,१९८५ खंड ४, पृ ५०३.*

२) *उपरोक्त पृ५०४.*

३) *नॉन अलाइनमेंट अँड फ्रीडम, ०६ फेब्रूवारी १९८१, सिलेक्टेड स्पीचेस अँड राइटींग्ट ऑफ इंदिरा गांधी, नवी दिल्ली,१९८५ खंड ४, पृ ५०५.*

४) *उपरोक्त.*

५) *उपरोक्त पृ*

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

रवींद्रनाथ टागोर : एक निसर्गाचा पुरस्कर्ता

डॉ. प्रकाश कांबळे
सहयोगी प्राध्यापक
श्रीमती सुशिलादेवी साळुंखे कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद.

★★★

परिचय – रवींद्रनाथ टागोर एक थोर विचारवंत, एक थोर शिक्षणतज्ज्ञ. निसर्गवादाची तत्त्वे शिक्षणाच्या माध्यमातून साकार करणारे एक तपस्वी, निसर्गवादाबरोबरच आदर्शवाद देखील मानणारा व सत्यम, शिवम, सुंदरम यांना आपल्या आयु यामध्ये सर्वोच्च स्थान देणारा महापुरुष अशी त्यांची वर्णने करता येतील. रवींद्रनाथांचा जन्म पश्चिम बंगालमध्ये कोलकाता हरात ६ मे १८६१ रोजी ब्राम्हण कुटुंबात झाला. आई ारदादेवी, वडील देवेन्द्रनाथ टागोर. यांचे घराणे संगीत, विदया, कला यासाठी संपूर्ण बंगालमध ये प्रसिध्द होते. घरी कशाची चणचण नाही, एकंदरीत सुखवस्तू कुटुंब. वडील देवेन्द्रनाथ देशभक्त, विदवान आणि धर्मप्रिय होते. घराणे सुशिक्षित, सुसंस्कृत व कलाप्रेमी होते. हा घराण्याचा वारसा रवींद्रनाथांना लाभला. ओरिएंटल सेमिनरी शाळेत प्राथमिक शिक्षणासाठी त्यांचे नाव दाखल केले. प्रथम त्यांना शिक्षणाविषयी आवड वाटली कारण घरातील वातावरणात कोंडवाडयाप्रमाणे अडकून पडण्यापेक्षा शाळेत गेलेले बरे म्हणून. शाळेत जाणे सुरु झाले तेव्हा असे अनुभवास आले की, शाळा ही घरापेक्षा जास्त कोंडवाडा वाटू लागली. त्यांच्या शिक्षकांनी त्यांना सांगितले की, तू कोठेही शिकायला जा, तुला असाच अनुभव येईल. आता रवींद्रनाथांचे मन उदास झाले. त्यांना जशी शाळा हवी होती, तशी मिळाली नाही. चार भिंतीच्या आत दिल्या जाणाऱ्या शिक्षणामध्ये ते रमले नाहीत. आपले मन, कान व डोळे उघडे ठेवून ते जीवनाचा कानमंत्र शिकले. पुस्तकांपेक्षा आपल्या परिसरामध्ये त्यांचे मन रमत असे. परिसराशी, निसर्गाशी तसेच विश्वाशी ते समरस होत असे.

सुरुवातीस प्राथमिक शिक्षणाचे धडे त्यांना स्वत:च्या घरीच गिरवावे लागले. संगीत, कला, इंग्रजी, चित्रकला, बंगाली या वेगवेगळया खाजगी शिक्षकांची नेमणूक करण्यात आली. त्यांनी वयाच्या आठव्या वर्षी पहिली कविता लिहिली. उच्च शिक्षण घेण्यासाठी ते आपल्या मोठया भावाबरोबर १८७८ साली इंग्लंडला गेले होते. तेथे त्यांनी ब्राइटन शाळेत प्रवेश घेतला होता. तिथेही त्यांचे मन रमले नाही. त्यांनी ती शाळा सोडली. दोन व ार्षांनीच म्हणजे १८८० साली ते भारतात परत आले. सबब त्यांना कोणत्याच प्रकारचे शिक्षण घेता आले नाही. १८८१ साली त्यांचा विचार बदलला. त्यांना कायदयाचे शिक्षण घेण्याची इच्छा झाली. पण तसे प्रत्यक्षात झाले नाही. त्यांनी कोलकात्याजवळ बोलपूर येथे शांतिनिकेतन नावाची शाळा स्थापन केली. आजचे विश्वभारती विदयापीठ म्हणजेच पूर्वीचे शांतिनिकेतन. राजकीय क्षेत्रातही त्यांनी काही काळ काम केले मात्र ते क्षेत्र त्यांना आवडले नाही. १९२० ते १९३० या दहा वर्षांमध्ये त्यांनी अनेक देशांत प्रवास केला. त्यांचे लग्न मृणालिनीदेवी यांच्याशी झाले. त्यांना दोन मुले झाली. एकाचे नाव रवींद्र आणि दुसऱ्याचे नाव शमिंद्र. ही मुले देखील त्यांच्या आश्रमामध्ये राहत असत. १९०२ साली मृणालिनीदेवींचा मृत्यू झाला त्यामुळे मुलांची सर्व जबाबदारी रवींद्रनाथांवर येऊन पडली. त्यावेळी त्यांना खूप क टातून जावे लागले. रवींद्रनाथांनी गितांजली हा काव्यसंग्रह लिहिला. गितांजलीचे इंग्रजी भाषांतर १९१२ साली लंडनमध्ये प्रसिध्द झाले आणि १९१३ साली त्यांना साहित्याचे नोबेल पारितोषिक बहाल करण्यात आले. त्यांची मराठीमध्ये अनुवादित झालेली बरीच पुस्तके आहेत. काबुलीवाला आणि इतर कथा, भानुसिंहाची पत्रावली, योगायोग, रवींद्रकल्पना अशी अनेक पुस्तके प्रसिध्द झालेली आहेत.

बोलपूर आश्रमाची स्थापना – बोलपूर रेल्वेस्थानकापासून पाच सहा मैल अंतरावर देवेन्द्रनाथ यांची शेती होती. सारा परिसर निसर्गाने नटलेला होता. यात्रेत जमिनीचे देवेन्द्रनाथांनी शांतिनिकेतन असे नामकरण केले. हे स्थळ त्यांना खूप आवडायचे. १९०१ साली रवींद्रनाथांनी तिथे एक शाळा सुरु केली. पुढे हे स्थळ त्यांचे ध्येय व स्वप्न बनले. शब्द आणि शांती, संस्कार आणि शांती, निसर्ग आणि शांती, संगीत आणि शांती, भक्ती आणि शांती यांचे समीकरणच नव्हे तर स्मारकच ठरले. इथेच रवींद्रनाथांना उदात्त, उदार भारतीय परंपरांचे आकलन झाले. वैष्विक मानवधर्माचा साक्षात्कार झाला. त्यांच्या प्रतिभेला पंख फुटले आणि भारताच्या भूत वर्तमानात भ्रमंती करत मानवतेचे सुरेख चित्र रेखाटण्यात ते तल्लीन झाले. इथेच गुरुदेवांच्या शिक्षणवि ायक विचारांना पालवी फुटली. शांतिनिकेतन येथील शिक्षणपध्दती ही रवींद्रनाथांच्या अभ्यासू, संशोधक आणि विशाल दृष्टिकोणाची देणगी होती. येथे आश्रम पध्दतीच्या शिक्षणाची सोय होती. या ठिकाणी प्राचीन गुरुकुल पध्दतीचा अवलंब करण्यात आला होता. शांतिनिकेतनला प्राचीन गुरुकुल पध्दतीचे अधिष्ठान म्हणून संबोधले जात होते. शांतिनिकेतन ही उदयानशाळा आहे. वर्ग खुल्या वातावरणात भरत होते. निसर्गमय वातावरणात मुले झाडाखाली बसून अध्ययन करत होती. विदयार्थी आश्रमातील वसतिगृहामध्ये राहून एकत्र जेवण घेत होती. बालकांना तेथे स्वावलंबनाचे व श्रमप्रति ठेचे आपोआप शिक्षण मिळत होते. संगीत, नाटय, नृत्य, साहित्य यांचा अभ्यास केला जात होता. सर्व शिक्षक हे आपापल्या कलेत निणात होते. सर्व शिक्षण मातृभा शेतून देण्याची व्यवस्था केलेली होती. येथे त्रिभाशा सुत्राचाही वापर केला जात होता. हिंदी रा ट्रभाशा म्हणून तर

इंग्रजी परकीय भाषा म्हणून शिकविली जात होती. येथे बागकाम, पुस्तक बांधणी, सुतारकाम इ. अनेक विषयांचे शिक्षण देण्याची सोय केलेली होती. कृतिदवारे शिक्षण यावरती विशेष भर दिलेला होता. येथे कृत्रिमतेला वाव नव्हता. स्वतंत्र वातावरणात बालक आणि शिक्षक अनुभव घेत होते. रवींद्रनाथांचे तत्त्वज्ञान म्हणजे आंतरराष्ट्रीय विश्वबंधुत्व आणि विश्वकुटुंबकत्व होय. या दोन्हींचा सुरेख संगम येथे पाहावयास मिळतो. या वसतिगृहात्मक शाळेत शिशु विभागात वयाच्या दहा वर्षापर्यंत, मध्य विभागात वयाच्या दहा ते पंधरा आणि आदय विभागात पंधरा वर्षानंतरच्या मुलांचा समावेश होता. शाळेचा प्रत्येक दिवस संगीताच्या मधुर सुराने उजाडत होता आणि सुरेल संगीतानेच मावळतही होता.

विश्वभारती विदयापीठाची स्थापना : विश्वभारती हे देशाच्या बौदिधक व आर्थिक जीवनाचे केंद्र व्हावे अशी टागोरांची इच्छा होती. विश्वभारती विदयापीठाची स्थापना ६ मे १९२२ रोजी केली गेली. सार्वत्रिक ज्ञान आणि जागतिक संस्कभती असा अर्थबोध विश्वभारती या शब्दावरुन होतो. शांतिनिकेतन आश्रमापासून विश्वभारती विदयापीठ उदयास आले. विदयापीठीय शिक्षणाबाबत टागोरांचे विचार वेगळे होते. या विदयापीठामध ये पौर्वात्य व पाश्चिमात्य संस्क तीचा उगम पाहावयास मिळतो. विश्वभारती हे आंतरराष्ट्रीय विदयापीठ म्हणून प्रसिध्द आहे. भारती म्हणजे संस्कृती. विश्वभारती या शब्दावरुन विश्वाच्या संस्कृतीची निर्मिती रवींद्रनाथांना करावयाची होती असे प्रतीत होते. **यत्र विश्व भवति एक नीडम्** हे विश्वभारती विदयापीठाचे बोधवाक्य होते. विश्व जेथे एकत्र येऊन मिळते असे ठिकाण असा या बोधवाक्याचा अर्थ होतो. येथे विभिन्न धर्माच्या राष्ट्रीयत्वाच्या शिक्षकांना तसेच विदयार्थ्यांना राहण्याची सोय होती. विश्वभारती विदयापीठाची उदिदष्टे पुढीलप्रमाणे होती –

- पौर्वात्य व पाश्चिमात्य संस्कृतीचा सुरेख संगम घडविणे.
- जागतिक शांतता प्रस्थापित करणे.
- ग्रामीण पुनर्रचनेसाठी संस्था स्थापित करणे.
- पौर्वात्य संस्कृतीचे दर्शन घडविणे.
- जग एक कुटुंब या भावनेचा विकास करणे.
- सत्याचा व साक्षात्काराचा ध्यास घेणे.
- मानवी मनाचा शोध घेणे.

विश्वभारती विदयापीठामध्ये गणवेशाची सक्ती होती. प्रार्थना, क्रीडांगण व उत्सवाच्या वेळी गणवेश वापरणे आवश्यक होते. परदेशी विदयार्थ्यांना भारतीय संस्कृती, कला आणि भारतीय विदयार्थ्यांना ज्ञान देण्यास इंग्रजी माध्यमाची सोय होती. मध्यवर्ती व प्रत्येक विभागाची स्वतंत्र ग्रंथालये होती. बौध्दिक विकास व अभ्यासक्रमातून सांस्क तिक विकास यावर भर होता. गुणवत्तेनुसार शियवक्त्या व फी माफीची सवलत उपलब्ध होती. नैसर्गिक परिसरात वसतिग हात्मक योजना व विदयार्थ्यांना भोजनाची व्यवस्था होती. परदेशी विदयार्थ्यांना त्यांचे राष्ट्रीय पोशाख वापरण्याची सूट होती.

श्रीनिकेतन संस्थेची स्थापना : ग्रामीण भागातील जनतेचा उध्दार केल्या शिवाय देशाचा उध्दार होणे शक्य नाही याची जाण रवींद्रनाथांना होती. भारत देश हा अनेक खेडयांनी मिळून बनलेला आहे. कोलकात्याजवळ सुरुल या गावी ६ फेब्रुवारी १९२२ रोजी श्रीनिकेतनची स्थापना रवींद्रनाथांनी केली. श्री चा अर्थ विकास किंवा कल्याण असा आहे. ही एक वैशिष्टयपूर्ण संस्था होती. ग्रामीण भागातील जनतेला शिक्षण देणे व तेथील नैसर्गिक साधन संपत्तीचा विकास करणे हे उदिदष्ट होते. त्यांची इच्छा होती की, खेडे हे कल्याण गृह व सौंदर्याचे गृह याचे केंद्र असावे. यात शिक्षण, चर्चा, कृषी विभाग, समाजकार्य विभाग, शिक्षणाचे कार्य चालत होते. ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या आर्थिक आणि सामाजिक आशयाच्या दृ टीने सोडविणे आणि त्यांच्या अशा आशयाच्या आधारावर कामाचा विस्तार करणे याचा समावेश होता. तिथे मुलांसाठी ग्रामीण माध्यमिक शाळा होती व तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाची सोय केलेली होती. ग्रामीण शाळेला शिक्षाशास्त्र असे नाव दिलेले होते.

शिक्षणाची उदिदष्टे :

१. बालकाचा शारीरिक विकास करणे – शिक्षणाचा प्रमुख उददेश बालकाचा शारीरिक विकास करणे हा होय.यासाठी बालकाला मोकळया वातावरणा मध्ये खेळण्यासाठी, बसण्या उठण्यासाठी, शिकण्यासाठी स्वातंत्र्य असावे. त्यावर कोणतेही दडपण नसावे.

२. बालकाचा मानसिक विकास करणे – शिक्षणाचा प्रमुख उददेश फक्त बालकाचा शारीरिक विकास करणे एवढाच नसून बालकाचा मानसिक विकास करणे हा देखील आहे. पुस्तकांपेक्षा प्रत्यक्ष जीवंत व्यक्तीना समजून घेणे म्हणजे शिक्षण होय. मानसिक विकास करण्यासाठी पुस्तक हे माध्यम योग्य नाही असे रवींद्रनाथांचे मत होते.

३. बालकाचा सर्वांगीण विकास करणे – शिक्षणाचा उददेश हा बालकाचा सर्वांगीण विकास करणे हा असला पाहिजे असे टागोरांना वाटे. हृदयाचा भावनेशी, डोक्याचा बौध्दिक विकासाशी आणि हाताचा ारीरिक विकासाशी संबंध आहे. व्यक्तीचा आध्यात्मिक विकास घडून येणेही आवश्यक आहे.

४. वातावरणाशी समन्वय साधणे – बालकाचे जीवनाशी समायोजन करण्यासाठी चांगल्या प्रकारच्या वातावरणाची गरज असते आणि याच विचारधारेतून ते शाळेमध्ये गेले नाहीत. शाळेत दिले जाणारे शिक्षण हे बालकास त्याच्या वातावरणाशी समन्वय साधत नाही. त्यामुळे त्यांनी स्थापन केलेल्या शांतिनिकेतन येथे निसर्गरम्य वातावरणात शिक्षण देण्याची व्यवस्था केलेली होती.

५. स्वयंशासनाचा विकास करणे – रवींद्रनाथांनी स्वयंशासन याला खूप महत्त्व दिले आहे. स्वयंशासनाचा विकास झाला पाहिजे असे

त्यांना वाटत होते. त्यांनी ब्रम्हचर्यावर विशेष भर दिला होता. ब्रम्हचर्यामुळे व्यक्ती जीवनातील मोठे ध्येय गाठू शकते असे त्यांचे मत होते. म्हणून व्यक्तीला संयम व स्वयंशासन प्रदान करणाऱ्या शिक्षण पध्दतीला त्यांनी अधिक महत्त्व दिले.

६. विश्वबंधुत्त्वाचा विकास करणे – जगातील सर्व प्राणीमात्र एकाच ईश्वराची लेकरे आहेत अशी रवींद्रनाथांची विचारसरणी होती. परस्परांमध्ये संघर्ष होऊ नये या मताचे ते होते. त्यामुळे संकुचित रा ट्रीयतेऐवजी विश्वबंधुत्त्वाची भावना त्यांनी श्रेष्ठ मानली. पूर्व आणि पश्चिम येथील सभ्यतेस संतुलित आणि त्यात समन्वय घडवून आणल्यास विश्व बंधुत्त्वाची भावना वाढीस लागते यावर त्यांचा विश्वास होता.

७. बालकांना स्वयंप्रकाशित होण्याची संधी देणे – भगवान गौतम बुध्दांनी म्हटले आहे की, स्वयंप्रकाशित व्हा. याच उददेशाने बालकांना तशी संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. बालकामध्ये एक क्रियाशील व अचेतन मन असते. बालकांना चांगल्या वातावरणाची अत्यंत गरज असते. त्यांना चित्रकला, हस्तकला, काव्य, संगीत इ. वि ायांचे ज्ञान देऊन त्यांना स्वयंप्रकाशित होण्याची संधी उपलब्ध करुन दिली गेली पाहिजे.

शिक्षकाची भूमिका : विदयार्थ्यांच्या जीवनामध्ये शिक्षकाची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची असते. रवींद्रनाथांच्या मते शिक्षकाची भूमिका ही मार्गदर्शकाची असली पाहिजे. शिक्षक हा अनुभवी, चारित्र्यसंपन्न, ज्ञानी व चिंतनशील असावा. शिक्षकाकडे सहानुभूती, समजूतदारपणा, कल्पकता, नाविन्यपूर्णता असली पाहिजे तरच बालकाचा विकास हा अत्यंत चांगल्या प्रकारे होऊ शकतो असे त्यांना वाटे. जिच्याजवळ प्रेमभावना नाही ती व्यक्ती शिक्षक होण्याच्या लायकीची नाही, असे रवींद्रनाथांचे मत होते. ज्याप्रमाणे एक दिवा दुसऱ्या दिव्यास प्रज्ज्वलीत करतो त्याप्रमाणे एक शिक्षक जोपर्यंत स्वत: ज्ञानार्जन करत नाही तोपर्यंत तो बालकास योग्य ज्ञान देऊ शकत नाही. शिक्षकाने बालकांशी समरस होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. रवींद्रनाथांनी जी वसतिगृहाची स्थापना केली होती ती त्यासाठीच. विदयार्थी आणि शिक्षक हे एकमेकांच्या सानिध्यात राहिले तर त्यांच्यामध्ये अधिक जवळीकता येईल व विदयार्थ्यांची शिक्षकांबददलची भिती कमी होईल. ज्या व्यक्तीचे बालपण हरवले आहे तो शिक्षक होणार नाही. शिक्षकाने आपले अध्ययन सोडून दिले नाही पाहिजे. सतत त्याने बालकाच्या बुध्दीला धारदार बनवले पाहिजे. मुलांना केवळ सत्याची माहिती देऊन चालणार नाही तर शिक्षकाने सत्याचरण केले पाहिजे म्हणजे त्यापासून विदयार्थी प्रेरणा घेतील असे रवींद्रनाथांचे मत होते.

समारोप : आज सारे जग बुध्दांच्या पुनर्जन्माची इच्छा करत आहे. बुध्दाने आपल्या प्रेम, दया, शांती, चांगुलपणा यांच्या साहयाने पृथ्वीच्या हृदयातील काळे डाग पुसून टाकावेत अशी रवींद्रनाथ बुध्दाला प्रार्थना करतात. रवींद्रनाथ टागोर हे एक थोर शिक्षणतज्ज्ञ, महान कवी आणि भविष्याचा वेध घेणारे द्रष्टे होते. त्यांनी मांडलेले शिक्षणविशयक विचार वास्तविक व यथार्थ जीवनाशी निगडीत होते. आधी केले आणि मग सांगितले या न्यायाने रवींद्रनाथांनी आपले कार्य केले. डॉ.मुखर्जींच्या मतानुसार रवींद्रनाथ टागोर हे आधुनिक भारतातील शैक्षणिक पुनरुत्तीन करणारे एक महान मसिहा होते.

संदर्भ :

१) *डॉ.के.यु.घोरमोडे, डॉ.कला घोरमोडे, शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य (२००६), नागपूर, विदया प्रकाशन.*

२) *प्राचार्य रा.तु.भगत, प्रा.आ.ल.माळी, थोर शिक्षणतज्ज्ञ, पुणे, गो.य. राणे प्रकाशन.*

३) *प्रा.ना.ग.पवार, शिक्षणक्षेत्रातील विचारवंत, पुणे, नुतन प्रकाशन.*

४) *डॉ.सहदेव चौगुले–शिंदे, पाथेय भाग १(२०१२), कोल्हापूर, रिया पब्लिकेशन.*

Knowledge Resonance

A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal

Subscription Information		
	Annual	**For 5 Years**
Individual	Rs. 1000/-	Rs. 3000/-
Institution	Rs. 1500/-	Rs. 5000/-

DD Should be drawn in favour of Principal, Dr. M.K. Umathe Arts, Science & Ramchandrarao Mokhare Commerce College, Nagupr.

SUBSCRIPTION FORM

I wish to subscribe "Knowledge Resonance - A half yearly National Research Journal for 1 year/ 2year/ life member.

A draft / cheque bearing No. _____ dated _____ for Rs. _____drawn in favour of "The Principal, Dr. M.K. Umathe College (Arts, Sci. & R. Mokhare Com. College,) Bhamti, Nagpur" is enclosed.

Subscription Details

1. Name : _____
2. Designation : _____
3. College / Institute : _____
   _____
4. Address : _____
   _____
   _____
5. Phone No. : _____
6. Email : _____
7. Journal to be sent to : _____
   _____

Published by
Research Journal Publication Committee
Dr. M. K. Umathe College
Bhamti, Ring Road, Nagpur-22 Phone No. 0712-2227062
E-mail: knowledgeresonancengp@gmail.com

2020
2021-22

ISSN 2394-5303

Issue-79, Vol-01, August 2021

Printing Area

Peer Reviewed International Multilingual Research Journal

Editor

Dr.Bapu G.Gholap

Harshwardhan Publication Pvt. Ltd.
VIDYAWARTA
www.vidyawarta.com
International Multilingual Research Journal

www.vidyawarta.com

Scanned with CamScanner

27) डॉ.आंबेडकरांचे भूमीहक्क आंदोलन
डॉ.संजय गायकवाड & सुनिल ताकतोडे, जि.हिंगोली ||122

28) नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन काळाची गरज
प्रा.डी. जी. कापुरे, जि. कोल्हापूर ||124

29) मनोबोध-एक प्रगट चिंतन
प्रा. मेधा गोसावी, बीड ||127

30) बंजारा समाजाची पारंपरिकतेकडून आधूनिकतेकडे वाटचाल एकसमाजशास्त्रीय अध्ययन
डॉ.टेंगसे सुनिता & प्रा.सुलोचना जाधव, किनवट ||129

31) स्वामी विवेकानंदाचे शैक्षणिक विचार
श्री. ज-हाड विजय बाबासाहेब ||132

32) मराठवाडयातील महिला डॉक्टरांच्या अर्थिक -एक दृष्टीकोन
प्रा.डॉ.प्रकर्ष सुभाषराव देशमुख, जि.लातूर ||134

33) संशोधनातील निरीक्षण पध्दतीचा अभ्यास (Observation Method)
प्रा. डॉ. टी.जी. सिराळ, जि. हिंगोली ||140

34) संयुक्त आणि विभक्त कुटुंबातील कुटुंबजीवन शिक्षणाच्या प्रभावाचा तुलनात्मक ...
वर्षा अंबादास संन्याशी & डॉ. बालाजी मुंडे, जालना ||145

35) पाणी आणि संबंधीत समस्या Water and Related Issues
प्राचार्य डॉ.शेख.एस.जे, जि. जळगाव ||148

36) बैंकिंग क्षेत्र में सुधार
मनोज कुमार गर्ग, श्रीगंगानगर ||151

37) हरीलाल 'मिलन' के काव्य साहित्य में राष्ट्रीय चेतना का उद्‌बोधन एवं स्वरूप
वन्दना शिवहरे, ग्वालियर (म.प्र.) ||154

38) आचार्य अभिनवगुप्त प्रतिपादित प्रमुख सिद्धान्त
चन्द्र किशोर, कानपुर नगर, उ०प्र० ||157

39) उच्चतर माध्यमिक विद्यालय में अध्ययनत् विद्यार्थियों के गणित चिंता पर एक ...
शत्रुघन भोई & रेणुका शर्मा, रायपुर (छ.ग.) ||160

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

Scanned with CamScanner

28

नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन काळाची गरज

प्रा.डी. जी. कापुरे
राजा शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय,
महागांव, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

****

प्रास्ताविक :—

प्राचीन काळापासून मानवाला अन्न, वस्त्र, निवारा या तीन गरजा कायम लागत आल्या आहेत. परंतू या गरजेसाठी मानवाने निर्सगात अनेक बदल केलेले दिसून येतात. परंतू या मुळे एकमेव जीवसृष्टी असलेला ग्रह म्हणजे पृथ्वी आणि या पृथ्वीवर असलेली नैसर्गिक साधन संपतीचे जतन नाही झाले तर फार मोठे नैसर्गिक संकट चालून येवू शकते त्यासाठी नैसर्गिक साधनसंपतीचे व्यवस्थापन व जतन करणे आवश्यक आहे. त्यासाठी विकसीत अशा मानव प्राण्यांने पुढाकार घेतला पाहीजे. मानवांनीच आपल्या प्रमुख गरजा पैकी काही गरजा जर कमी केल्या तर ते शक्य आहे. हवा, पाणी, डोंगर, दऱ्या, जंगल व जंगली जीव यांचा नैसर्गिक स्त्रोत ठेवून दुर्मिळातील दुर्मिळ अशा घटकाला संरक्षण दिले पाहीजे. उर्जास्त्रोत, वनसंपदा, वन्यप्राणी, नैसर्गिक जलसाठे, भूगर्भातील खनीजे, हवा प्रदुषणाला आळा, जलसंवर्धन, सागरी किनारपट्टीचे संरक्षण, पर्वतरांगांचे संरक्षण, प्रमुख नदयाचे संरक्षण व लोकसंख्या विषयक धोरण आदि बाबी लक्षात घेवून या सर्व नैसर्गिक संसाधनाचे संरक्षण अर्थात जतन केले पाहीजे हिच काळाची गरज आहे. ती थोडक्यात पुढील प्रमाणे सांगता येईल.

उर्जा संपदेचे जतन : काळाची गरज :—

उर्जानिर्मितीसाठी लाकुड, खनिजतेल, दगडी कोळसा, जलविद्यूत, अणुशक्ती, वारा, सागरी लाटा, सौर उष्णता, गॅस या घटकाचा वापर केला जातो यापैकी दगडी कोळसा, खनिजतेल, नैसर्गिक वायू हे एकदा वापरात आले की, संपुष्टात येणारे संसाधने आहेत. म्हणून यांचा वापर जपून केला पाहीजे. तर पवनउर्जा, सौरउर्जा, जलविद्यूत उर्जा, सागरी लाटापासून निर्मित उर्जा या उर्जा स्त्रोताचा वापर जास्तीत जास्त केला पाहीजे कारण की, या उर्जा पुर्ननिर्मित होऊ शकतात. परंतू जगात सर्वात जास्त वापर खनिजतेल, दगडी कोळसा व नैसर्गिक वायू या उर्जा संसाधनाचा वापर जास्त प्रमाणात होतो. कालमर्यादीत शंभर दोनशे वर्षात या उर्जास्त्रोताचे साठे संपले तर उर्जेचा मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो यामुळे पुर्ननिर्मित उर्जा स्त्रोतांचा वापर जादा केला पाहीजे किंवा त्यावर उपाययोजना केल्या पाहीजे तरच उदयाचा प्रकाश आपल्याला दिसेल म्हणून उर्जासंपदेचे जतन हिच काळाची गरज ठरते.

खनिज संसाधनाचा मर्यादित वापर काळाची गरज:—

नैसर्गिक साधन संपत्तीत खनिज संसाधन हे एक महत्वाचे साधन आहे. भूस्तरातील खडकाच्या रचनेत अनेक खनिजे सापडतात. त्यापैकी सोने, जस्त, लोह, मँगनीज, तांबे, पितळ, चांदी ही धातू खनिजे आहेत यामध्ये धातूचे प्रमाण जास्त असते तर ग्रॅफाईट, फ्लुओराईट, ॲमेटाईट, कॅल्साईट इ. अधातू खनिजे म्हणून ओळखली जातात हे सर्व खनिजे व याच्या व्यतिरिक्त बॉक्साईट, दगडी कोळसा, कथील, गंधक, मीठ, वाळू असे अनेक खनिजे मानव आपल्या दैनंदिन जीवनात करतो. वेगवेगळया मौल्यवान वस्तूमध्ये या खनिजांचा उपयोग होत असल्यामुळे मोठया प्रमाणात खाणकाम विविध देशात चालू आहे. महाराष्ट्रात चंद्रपूर जिल्हयात मोठया प्रमाणात दगडी कोळसाच्या खाणी निर्माण केल्या आहेत. कित्येक वर्षापासून खाणकाम चालू असल्यामुळे तेथील काही प्रदेश ओसाड झाला आहे. तेथे निर्मनुष्य वातावरण दिसून येते. तर आफ्रीका या देशात सोन्याच्या खाणी जास्त असल्यामुळे तेथे ही काही प्रदेशात अशीच अवस्था आहे. अती खाणकाम व खनिज संसाधनाचा जादा वापर या मुळे कधीकाळ बराच प्रदेश ओसाड होऊन तेथील जीवसश्टी संपुष्टात येईल व त्याचा विपरित परिणाम पर्यावरणावर होईल या साठी खनिज साधना विषयक जागतिक पातळीवर

Scanned with CamScanner

जनजागृती करून खनिज संसाधनाचा मर्यादित वापर हीच काळाची गरज ठरेल.

जलसंवर्धन काळाची गरज :—

पृथ्वीवर जवळजवळ ९३ टक्के भाग हा सागरी पाण्याचा आहे व ते पाणी क्षारयुक्त आहे. २ टक्के भाग हा ध्रुवीय प्रदेशातील तर केवळ ५ टक्के पाणी जमिनीवरील पाण्याच्या स्वरूपात आहे. त्यात केवळ ०.९ टक्के पाणी गोडे आहे. सजीवांना व वनस्पती तसेच कृषिक्षेत्रासाठी त्याचा उपयोग होतो. वाढत्या लोकसंख्येची गरज पाहता ते पाणी अपुरे पडते. एकूण जगाचा विचार करता एक अब्ज पन्नास कोटी लोकांना शुद्ध पाटील पिण्यास मिळत नाही. आखाती देशात तर मोठया प्रमाणात पाणी टंचाई असते. भारतात एकंदरीत पावसाचे केवळ दहा टक्के पाणी आडवले जाते. दुष्काळी भागात आता सुद्धा पाणी टंचाई मोठया प्रमाणात दिसून येते. यावर जलसंवर्धनासाठी शासन तथा जनतेमधूनसुद्धा पाणी अडवणे, पाणी जीरवणे यासाठी प्रयत्न झाले पाहीजे. शेती पुरक व्यवसाय व औद्योगिक कारखानदारी व पिण्याचे पाणी एकंदरीत सर्व बाबी पाण्यावर अवलंबून आहेत. जलसाक्षरता हिच काळाची गरज आहे भूगर्भातील पाणी साठयाचा अतीवापर केल्यामुळे पाणी प्रश्न कायम टिकून राहतो यासाठी पाणी गरजेपुरते वापरले पाहीजेत्र शेती व्यवसायात ठिबक, तुषार सिंचनाचा वापर करणे, कारखानदारीसाठी वापरात असलेले पाणी पुर्नस्वच्छ करून वापरणे, व सर्वसामान्य जनतेला पाण्याचे महत्व सांगणे आदि बाबी केल्यातर जलसंवर्धन काळाची गरज आहे असे लक्षात येईल.

मृदा संपदा जतन काळाची गरज :—

खडकाची झीज होवून त्याचे रूपांतर मृदा म्हणजे मातीत होते. या मातीवरच वनस्पती, सजीवप्राणी जीवन जगत असतात. पृथ्वीच्या एकूण भूभागापैकी भूमी ही केवळ २९ टक्के एवढी आहे. त्यावरच कृषि, मानवी वसाहती, जंगले, कारखाने असे अनेक घटक दिसून येतात. वाढत्या लोकसंख्येच्या अन्नाची गरज माती या महत्वाच्या नैसर्गिक घटकापासूनच भागवली जाते. मातीत उत्पादित अन्नघटक एकंदरीत जीवसृष्टीला जगवत असते. मातीचे पोषण करण्यासाठी कृषि उपजत प्रकारे ठेवली पाहीजे. शेती व्यवसाय करीत असताना तिची मशागत योग्य प्रमाणे केली पाहीजे जमीन पाणथळ होऊ नये म्हणून निचरा पद्धतीने शेती केली पाहीजे. रासायनिक खते किटक नाशके यांचे प्रमाण जास्त झाले तर ते शेतीला मारक आहे. अती प्रमाणात सुपीक जमिनीचा वापर झाला तर ती जमिन काही काळानंतर नापीक होवू शकते. रासायनिक खते, अती जलसिंचन या बाबीमुळे जमिनीतील सुपिकता नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. तरी सेंद्रीय खताचा वापर शेतजमिनीत जास्तीत जास्त प्रमाणात झाला तर तिची सुपिकता वाढू शकते. म्हणून उपजत मृदा निर्मिती हेच धोरण ठरवून मृदा संपदा जतन केली पाहीजे हिच काळाची गरज आहे.

वन संपदा जनत काळाची गरज :

वनस्पती जर नसती तर एकही जीव इतर ग्रहाप्रमाणे पृथ्वीवरसुद्धा नसता. प्राणवायू (ऑक्सीजन) ची निर्मिती करणारा व एकंदरीत पर्यावरणाचा सर्वात महत्वाचा घटक ही वनसंपदा आहे. हा नैसर्गिक घटक कार्बन डायऑक्साईड वायूचे शोषण करतो व प्राणवायू (ऑक्सीजन) बाहेर सोडतो. रात्रीच्या वेळी ही क्रिया अत्यंत वेगाने चालते. हे प्राणवायूचे चक्रच सजीव सश्ष्टीला टिकून ठेवते. या व्यतिरिक्त मानवी जीवनात वनस्पतीचे अनन्यसाधारण असे महत्व आहे. वनातून फळे, फुले, औषधे, फर्निचरसाठी लाकडे, गृहनिर्मितीसाठी लाकडे असे बरेच घटक ही नैसर्गिक संपदा मानवाला देवून जाते. पाण्याबरोबर जीवसृष्टीला वनस्पती पासून मिळणारा ऑक्सीजनचा साठा अत्यंत महत्वाचा आहे. हा ऑक्सीजनचा कारखानाकेवळ वनिकरणातूनच चालत असतो. लक्षावधी वनस्पती जपून ठेवणे यासाठी आता शासकिय पातळीवरसुद्धा जोरदार प्रयत्न केलेले दिसून येतात. त्याला सामाजिक स्तरावरसुद्धा सहकार्य लाभले पाहीजे तरच वनसंपदा जतन करता येईल व हिच खरी काळाची गरज आहे.

वन्यजीव किंवा प्राणी संवर्धन काळाची गरज:—

वनस्पती बरोबरच पर्यावरणाचा समतोलासाठी प्राणी, पक्षी हे घटकसुद्धा फार महत्वाचे आहेत. पक्षी व किटक वनस्पतींच्या परागकणांचे वहन करून वनस्पतीच्या लागवडीचा प्रसार करतात. आजघडीला

Scanned with CamScanner

जगात सर्वत्र होत असलेल्या जंगलतोडीमुळे प्राणी व पक्षी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. परंतू या प्राण्यांचा एकंदरीत उपयोग जीवसृष्टीला व पर्यावरणाला होत असतो. बैल, घोडे, उंट, खेचर, गाढव, हत्ती, रेडे, कुत्रा इ. प्राण्याचा उपयोग मानव वाहतुकीसाठी करतो, त्यापासून अनेक उपयोगी कर्म करून घेतो तर गाय, म्हैस, शेळी, मेंढी इ. प्राण्यापासून दूध व मांस या अन्नातील महत्वाची गरज भागते. तर सेंद्रीय शेतीला शेण, मलमुत्र उपयुक्त असते. वन्यजीवाच्या अस्तित्वामुळे पर्यावरणात समतोल टिकून राहतो. हरीण, ससा, वाघ, सिंह आदि वन्य जीवाचे महत्वसुद्धा पर्यावरणात अनन्यसाधारण आहे. एकंदरीत सर्व वन्यजीव किंवा प्राण्यामुळे अन्नसाखळी निर्माण झाली आहे या अन्नसाखळीतील एखादा घटक कमी झाला तर त्याचे विपरित परिणाम पर्यावरणात दिसून येतात. म्हणून नैसर्गिक साधन संपत्तीत वन्यजीव किंवा प्राणी, पक्षी संवर्धन ही एक महत्वाची काळाची गरज आहे असे दिसून येते.

निष्कर्ष :–

एकंदरीत ''नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन काळाची गरज'' या शोधनिबंधात पर्यावरण समातोलासाठी उर्जासंपदा, खनिजसंपदा, जलसंपदा यांचा जपून वापर करणे ही काळाची गरज आहेत्र असे स्पष्ट होते तर मृदा संपदा व तिची सुपिकता टिकवून ठेवणे गरजेचे आहे हे स्पष्ट केले आहे. तर वनसंपदा व वन्यजीव किंवा प्राणी संवर्धन यांचे रक्षण मानवाने केलेच पाहीजे. सूचक संधोधन करण्याचा प्रयत्न केला आहेतरी वरील सर्व नैसर्गिक संपदाचे संरक्षण नाही झालेतर एकंदरीत पर्यावरणाला व सजीवसृष्टीला विपरित परिणामाला सामोरे जावे लागेल असे दिसून येते. म्हणून ''नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन काळाची गरज'' आहे.

संदर्भसूची :–

१) Hugh Murray – The Encyclopedia of Geography, 1852.

२) वि. गो. भागवत – पर्यावरण–प्रदूषण आणि आपले आरोग्य, सुयोग प्रकाशन, पुणे, १९७३.

३) डॉ. दया शंकर त्रिपाठी – पर्यावरण अध्ययन, नरेंद्र जैन प्रकाशन, दिल्ली, २००५.

४) डॉ. सी. एस. लट्ट – वनस्पतींचे वर्गीकरण, लोकसत्ता, ४ जानेवारी २०१६ लेख.

५) भौतिकशास्त्र – विकिपीडीया, संगणक माहिती संकलन.

६) उर्जा भण्डारण – विकिपीडीया, संगणक माहिती संकलन.

७) एस.जी. मिश्रा, दिनेश मणी – मृदा प्रदूषण, प्रभात प्रकाशन, २००८, दिल्ली.

८) मारूती चितमपल्ली – जंगलाची दुनिया – साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, २००६.

९) मारूती चितमपल्ली – निसर्ग वाचन – पदमगंधा प्रकाशन, पुणे, २०००.

१०) मारूती चितमपल्ली – जंगलाच देण – साहित्य प्रकार केंद्र, नागपूर, १९८५.

११) पुंडलिक गवांदे – प्राण्यांच्या जगात – अमित प्रकाशन, पुणे.

❑❑❑

Scanned with CamScanner

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित

शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष अकरावे : अंक तिसावा । एप्रिल-मे-जून २०२२

महाराष्ट्र शासन आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार प्राप्त
श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस, कोल्हापूर संचलित

न्यू कॉलेज, कोल्हापूर

Reaccredited By NAAC Grade 'A+'

१९९० नंतरची मराठी कादंबरी

Scanned by CamScanner

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित

शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष अकरावे : अंक तिसावा

एप्रिल–मे–जून २०२२

१९९० नंतरची मराठी कादंबरी

• संपादक •

नंदकुमार मोरे

• संपादक मंडळ •

एकनाथ पाटील । शामसुंदर मिरजकर । गोमटेश्वर पाटील । मांतेश हिरेमठ

• अतिथी संपादक •

डॉ. व्ही. एम. पाटील

प्राचार्य, न्यू कॉलेज, कोल्हापूर

गुंडोपंत पाटील

मराठी विभाग प्रमुख, न्यू कॉलेज, कोल्हापूर

• अतिथी संपादक मंडळ •

अरुण शिंदे । दीपककुमार वळवी । सुजय पाटील । गोमटेश्वर पाटील । मांतेश हिरेमठ

• प्रकाशक •

प्रकाश दुकळे

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

द्वारा : 'शब्दगंध', प्लॉट नं. ३/ब, नृसिंह कॉलनी,

फुलेवाडी रिंगरोड, कोल्हापूर-४१६०१०

• मुद्रक •

भारती मुद्रणालय

८३२, ई वॉर्ड, शाहूपुरी ४थी गल्ली, कोल्हापूर. फोन नं.: ०२३१-२६५४३२९

मूल्य : ३००/-

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. प्रकाश दुकळे, यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी भारती मुद्रणालय, कोल्हापूर येथे छापून 'शब्दगंध', प्लॉट नं. ३/ब, नृसिंह कॉलनी, फुलेवाडी रिंगरोड, कोल्हापूर-४१६०१० येथे प्रकाशित केली. या पत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

Scanned by CamScanner

अंतरंग

	संपादकीय	..... २
१.	नव्वदोत्तरी मराठी आदिवासी कादंबरीतील भिल्ल जमातीचे संस्कृती चित्रण	प्रा. डॉ. कांचन नलवडे ७
२.	१९९० नंतरच्या कादंबरीतील लैंगिक जाणिवा	डॉ. वैजंयती जाधव-भोसले १२
३.	१९९० नंतरची मराठी विज्ञान कादंबरी	डॉ. गीता गवस-येर्लेकर १८
४.	आंबेडकरी विचार असणारी १९९० नंतरची मराठी कादंबरी	डॉ. विनोद कांबळे २३
५.	१९९० नंतरच्या मराठी कादंबरीचे बदलते स्वरूप	डॉ. अशोक सदाशिव तवर ३०
६.	१९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील पडझडीचे चित्रण.	प्रा. सौ. प्रेरणा एल. चव्हाण..... ३९
७.	१९९० नंतरची दलित कादंबरी	डॉ. प्रताप गायकवाड ४३
८.	जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी ग्रामीण कादंबरी	प्रा. मृदुला जयंत वाघमारे ४८
९.	१९९० नंतरच्या मराठी कादंबरीतील नैतिकता	डॉ. प्रकाश आप्पासो हुलेनवर ५३
१०.	आदिवासी कादंबरीतील व्यवसाय आणि भाषा	प्रा. डॉ. पांडुरंग ऐवळे ५८
११.	जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कादंबरी	प्रा. डॉ. नामदेव कृष्णा मोळे ६३
१२.	१९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील स्त्रीचित्रण	प्रियांका अशोक कुंभार ६८
१३.	'१९९० नंतरच्या कादंबरीचा आकृतीबंध'	प्रा. वैशाली श्रीकांत गुंजेकर ७१
१४.	नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीतील शोषणव्यवस्थेचे चित्रण	श्री. रघुनाथ आण्णा मुडळे ७८
१५.	जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कादंबरी	श्री. अशोक जनार्दन पाटील ८२
१६.	नव्वदोत्तरी कादंबरीतील माध्यमांतर	डॉ. अजित यल्लाप्पा कांबळे..... ८६
१७.	१९९० नंतरच्या मराठी आत्मकथनात्मक कादंबरीतील नांगरे पाटलांची विजिगीषू वृत्ती	प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात .. ९१
१८.	१९९० नंतरची मराठी कादंबरी आणि चित्रपट	डॉ. हेमंत नामदेव कुंभार ९७
१९.	१९९० नंतरची मराठीतील स्त्री लिखित - कादंबरी	प्रा. डॉ. स्वाती दीपक दामोदरे ...१०२
२०.	'नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीतील स्त्री जाणिवा'	प्रा. संगीता नामदेव खरात १०८
२१.	१९९० नंतरच्या मराठी कादंबरीतून येणारे धनगर समाजातील 'स्त्री'चित्रण	डॉ. संदीप भ. वाकडे १११
२२.	नव्वदोत्तरी मराठी कादंबरी आणि चित्रपट माध्यमांतर	प्रा. डॉ. सागर अशोक लटके ११७
२३.	जागतिकीकरणानंतरची कृषी जीवनाचा वेध घेणारी कादंबरी	प्रा. मोहन बाबुराव चव्हाण १२६
२४.	१९९० नंतरची महानगरीय कादंबरी	प्रा. डॉ. सुकुमार दादू आवळे १३१
२५.	धूळपावलं - राजकारणाने विदिर्ण समाजाचे चित्रण	प्रा. डॉ. विठ्ठल नामदेव रोटे.....१३७
२६.	नव्वदोत्तर कादंबरीतील ग्रामसंवेदना	प्रा. सुहास व्यंकटेश कुलकर्णी ...१४१
२७.	तसलिमा नासरीन यांच्या 'लज्जा' कादंबरीतील सामाजिक प्रश्न	प्रोफेसर डॉ.सुभाष वाघमारे.....१४६
२८.	महेंद्र कदम यांच्या तणस कादंबरीची स्त्रीवादी मीमांसा	प्रा. डॉ. सुवर्णा नामदेव पाटील ..१५२
२९.	नव्वदनंतरच्या स्त्री-लिखित मराठी कादंबरीतील नवे भान	सुस्मिता आनंदा खुटाळे.....१५६
३०.	नवदोत्तरी ग्रामीण कादंबरीतील ग्रामसंवेदनाच्या पडझडीचे चित्रण	श्रीमती सुरेखा बसाप्पा व्हसमने ..१६२
३१.	पीक आणि मराठी कादंबरी	डॉ. सुरेश बाळकृष्ण शिंदे.....१६६
३२.	'हिंदू' कादंबरीतील कृषी व स्त्रीजीवन चित्रण	डॉ. तातोबा बदामे.....१७३
३३.	नव्वदोत्तरी कादंबरीतील आधुनिक विचारांच्या स्त्रीव्यक्तिरेखा	शैला आनंदराव क्षीरसागर १७९

Scanned by CamScanner

१९९० नंतरची महानगरीय कादंबरी

प्रा. डॉ. सुकुमार दादू आवळे

राजा शिवछत्रपती कला, वाणिज्य महाविद्यालय, महागाव, ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर.

प्रस्तावना

गेल्या पन्नास वर्षात नगरांचे महानगरात रुपांतर होत गेले. वैज्ञानिक प्रगती, तंत्रज्ञान, औद्योगिक प्रगती आणि भांडवलधार्जिणी सरकारी धोरणे याला कारणीभूत ठरल्याचे दिसून येते. पर्यायाने शहरे, महानगरे वेगाने विकसित होत गेली. वेगवेगळ्या देश, विदेश, प्रदेशातील लोक रोजगार,उद्योग, व्यवसाय, नोकरी आदीसाठी शहर, महानगरे ही सहस्त्रमुखी महाकाय जीवंत वस्तू बनली. स्पर्धा, श्रमविभागणी, खंडितपणा या व इतर घटकांमुळे महानगरीय जीवनाची एक विशिष्टमहानगरीय जीवनशैली तयार झाली. व्यामिश्र सांस्कृतिक विश्व, खंडित, औपचारिक मानवी संबंध, गर्दी, गतिमानता, एकाकीपण, अर्थ व कामाला मिळालेले अवास्तव महत्त्व इत्यादी घटक महानगरीय जीवनात दिसून येतात. याचा परिणाम विशाल अशा महानगरीय गजबजलेल्या गर्दीत माणूस पुन्हा एकटा व एकाकीपणाकडे वाटचाल करताना दिसतो. आजच्या महानगरीय जीवनात प्रामुख्याने अतिउच्चवर्ग, उच्चवर्ग, मध्यमवर्ग व कष्टकरी सामान्य झोपडपट्टीवासीय असे मुख्य स्तर दिसून येतात. या महानगरातील एकूण स्तरांतील जगण्याचे वेगळेपण दिसून येते. याचे चित्रण अनेकविध आशयसूत्रांच्या रुपाने १९९० नंतरच्या महानगरीय कादंबरीत दिसून येते.

महानगरातील बदलत्या वास्तवाचे चित्रण करणाऱ्या काही वैशिष्ट्यपूर्ण महानगरीय कादंबऱ्यांची निर्मिती झालेली पहावयास मिळते. या महानगरीय कादंबऱ्यातून महानगरीय विविध समस्यांचे व जीवनजाणिवांचे चित्रण विविध आशयानुरुप आले आहे. १९९० नंतरची महानगरीय कादंबरी पूर्व अनुभव, संवेदना जमेस घेऊन ती आणखी जोरकसपणे महानगरीय जीवन चित्रणांचा आयाम द्विगुणीत करताना दिसते. यामध्ये १९९० पूर्व लेखन करणारे लेखकही पुढे लेखन करताना दिसतात. यामध्ये 'झिपऱ्या'(१९९०), शांता गोखले 'रीटा वेलिणकर'(१९९०), ह. मो. मराठे 'कलियुग'(१९९१), 'नरिमन पॉईन्टचा समुद्र'(२००१), श्री. ना. पेंडसे 'कामेरू'(१९९७), मधु मंगेश कर्णिक 'संधिकाल'(१९९९), बाबूराव बागूल 'कोंडी'(२०००), कविता महाजन 'भिन्न'(२००७), दिवाकर कांबळी 'गिरणगाव नाका'(२०१०) इत्यादी लेखकांनी पुढे लेखन करून १९९० नंतरच्या महानगरीय कादंबरीला बळकटीच आणल्याचे दिसून येते. या लेखकांबरोबरच संजीव खांडेकर 'अशांतपर्व'(१९९२), संजय जोशी 'नचिकेताचे उपाख्यान'(१९९६), रंगा मराठे 'महामार्ग'(१९९२), शंकर सखाराम 'बखर सदाशिव वाशीकरची'(२०१०), 'सुमेध वडावाला'(रिसबुड), 'तृष्णा'(२०००), 'संदर्भासहित स्पष्टीकरण'(२००६), 'देह जाओअथवा जाओ'(२०१२), रंगनाथ पठारे 'भर चौकातील अरण्यरूदन', जी. के. ऐनापूरे 'रिबोट'(२००८) इत्यादी लेखकांनी महानगरीय कादंबरीचे लेखन करून हा प्रवाह अधिक विस्तीर्ण केल्याचे दिसून येते.

संशोधनाची उद्दिष्ट्ये

१. मराठी साहित्यातील महानगरीय प्रवाहाचा शोध घेणे.

२. मराठी साहित्यातील महानगरीय कादंबरीची परंपरा शोध घेणे.

Scanned by CamScanner

३. १९९० च्या (निवडक) महानगरीय कादंबरीतील आशयसूत्रांचा शोध घेणे.
४. महानगरीय विविध समस्या व जीवनजाणिवाचां शोध घेणे.
५. महानगरातील बदलत्या वास्तवचित्रणाचा शोध घेणे.

संशोधन पद्धती

१९९० नंतरच्या महानगरीय कादंबरीचा अभ्यास करताना त्या लेखकाचे सामाजिक जीवन, व्यक्तिगत जीवन अभ्यास करणे, साहित्य आणि समाज यांचा संबंध जाणून घेणे. १९९० नंतर महानगरीय साहित्याचा अभ्यास करताना समाजशास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला आहे. त्याबरोबरच त्यांच्या साहित्यातील वाङ्मयमयीन विशेषांचाही शोध घेतला आहे.

महानगरातील एकाकीपणा/पोरकेपण/अनाथपण

'तृष्णा' (२०००) या कादंबरीमधून सुमेध वडावाला (रिसबुड) यांनी महानगरातील 'समलिंगी संभोगेच्छू' पुरुषांच्या मानसिकतेचा वेध घेऊन अतिशय संवेदनशील असा आशय विषय मांडला आहे. 'गे' पुरुषांना आयुष्याच्या शेवटी एक विलक्षण एकटेपणा जाणवतो. दुःखाने व्याकूळ झालेल्या 'गे' पुरुषांचे चित्रण या कादंबरीत येते. कादंबरीचे लेखन संवेदनशीलपणे आणि संयमाने झाल्याने अश्लिल व कामोत्तेजक वर्णन येत नाही.

झोपडपट्टीविषयक आशयसूत्रे

महानगरातील राहत्या जागेची भीषण समस्या आणि त्यातून निर्माण झालेल्या महाकाय झोपडपट्ट्या यामधून घडणाऱ्या अनेक अवैध गोष्टी, घटना, प्रसंग, तंटे-बखेडे, माणसांचे चित्र-विचित्र वागणे, बेतालपणा, बेफिकीरी, बकालपण, रोगट वातावरण, प्रचंड घाणीचे साम्राज्य, रोग पसरविणाऱ्या प्राण्यांचे साम्राज्य, अस्वच्छता, शिवराळ भाषा, दारिद्र्य, उपासमार, अवैध धंदे, दादागिरी, मारामारी, खून इत्यादींनी झोपडपट्टीचे जनजीवन बजबजपुरीने भरलेले असते. अशा नरकमय, जीवघेण्या वातावरणात जगणाऱ्या माणसांच्या जीवन जाणिवा झोपडपट्टीविषयक आशयसूत्रांनी युक्त १९९० नंतरच्या काही महानगरीय कादंबरीमध्ये प्रभावीपणे चित्रित झालेले दिसून येते. 'झिपऱ्या' (१९९०) अरुण साधु, 'कोंडी' (२०००) बाबुराव बागुल, 'भर चौकातील अरण्यरुदन' (२००८) रंगनाथ पठारे, 'बखर सदाशिव वाशिकरची' (२०१०) शंकर सखाराम यांनी लेखन केल्याचे दिसून येते.

अरुण साधू यांनी 'झिपऱ्या' कादंबरीमूधन बूट पॉलिश करणाऱ्या झोपडपट्टीतील एका मोठ्या वर्गातील मुलांचे शुद्ध नैतिकतेचे कष्टाचे जगणे चित्रित केले आहे. बाबूराव बागूल यांनी 'कोंडी' कादंबरीतून माटुंग्याच्या लेबर कॅम्प झोपडपट्टीवासियांचे वास्तवदर्शी चित्रण केले आहे. 'भर चौकातील अरण्यरुदन' या कादंबरीतून रंगनाथ पठारे यांनी महानगरीय दलित, झोपडपट्टीवासीय कष्टकरी वर्गाचे चित्रण समर्पकपणे केलेले दिसून येते. झोपडपट्टी वासियांच्या विदारक स्थितिचे चित्रण 'बखर सदाशिव वाशिकरची' या कादंबरीतून शंकर सखाराम चपखलपणे करताना दिसतात.

उद्योगजगतविषयक आशयसूत्रे

उद्योग विश्वातील आशयसूत्रे 'कलियुग' (१९९१), 'नरिमन पॉईंटचा समुद्र'(२००१) ह.मो. मराठे, 'अशांत पर्व' (१९९२) संजीव खांडेकर, 'महामार्ग' (१९९२) रंगा मराठे, 'रिबोट' (२००८) जी.के.ऐनापुरे इत्यादींच्या कादंबरीतून येताना दिसून येते.

'रिबोट' कादंबरी मुंबईच्या गिरणगावातील गिरणी कामगारांचे प्रश्न चित्रित करते. कामगार बेरोजगार होऊन त्यांचे दैनंदिन होणारे जीवघेणे हाल विदारकपणे जी.के. ऐनापुरे यांनी या चित्रित

ISSN No. 2319-6025

Scanned by CamScanner

केलेले दिसून येतात. कादंबरीतील डॉक्टरसारखे पात्र जमिनीच्या खरेदी-विक्रीच्या दलालीचे काम करतो. तो पाश्चात्य कंपन्यांना गिरणी मालकांना हाताशी धरून जमिनी विकायलालावतो. त्या गिरणीच्या जागेवर मोठाले टॉवर्स, मॉल्स उभारले जातात. हे पाहून हताश वायदेशी पांड्याच्या मनातील वादळ पुढील विधानातून व्यक्त होऊन कामगार जीवनाची विदारक स्थिती नजरेस आणताना दिसून येते. तो म्हणतो, ''गिरणगांव आहे पण गिरण्या कुठे आहेत? मग चिमणीतून येणारा धूर कसा दिसणार? पूर्वी गिरण्या होत्या ह्या गिरणीच्या पैशावर आमची कुटुंब जगली वाचली.खेड्यातून सुरु झालेला आमचा प्रवास हा मुंबईच्या वाट्याला लागला. समाधानानं टमटमला आणि आता मातीमोल झाला. हे मातीला मिसळणं मातीमोल होणं कुणाला दिसंलय?'' यावरुन तत्कालीन औद्योगिक धोरण व त्याचा गिरणी मालकांनी साधलेला स्वार्थ निदर्शनास येतो.

स्त्री विषयक आशयसूत्रे

महानगरीय वातावरण, नोकरी, व्यवसाय गृहिणी इत्यादी भूमिका बजावून स्त्रियांना विविध समस्यांना सामोरे जावे लागलेले दिसते. याचे १९९० नंतरच्या महानगरीय कादंबरीत चित्रण आलेले दिसून येते. 'रीटा वेलिणकर' (१९९०) शांता गोखले, 'भूमी' (२००४) आशा बगे, 'संदर्भासहीत स्पष्टीकरण' (२००६) सुमेध वडावाला (रिसबूड) इत्यादी महानगरीय कादंबरीत कमी अधिक प्रमाणात चित्रित झाल्याचे दिसून येते.

'भूमी' मधून स्त्रीजीवनाची फरफट आशा बगे चित्रित करतात.शांता गोखले यांनी 'रीटा वेलिणकर' या कादंबरीतून विवाह आणि विवाहबाह्य संबंधातून होरपळणाऱ्या स्त्रीमनाचे, पुरुषी दांभिकतेचे स्त्रीविषयक आशयसूत्रांनी प्रभावीपणे चित्रण केलेले दिसून येते. समाजातील अनिष्ठ रुढी-परंपरेला विरोध केल्यामुळे विविध समस्येला बळी गेलेल्या स्त्रीमनाचे चित्रण सुमेध वडावाला (रिसबुड) 'संदर्भासहित स्पष्टीकरण' या कादंबरीतून करताना दिसतात. एडस्च्या पार्श्वभूमीवर बदलत जाणाऱ्या स्त्रीचे भावविश्व 'भिन्न' या कादंबरीतून कविता महाजन साकारताना दिसतात.

सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक विषयक आशयसूत्रे

साहित्य हे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटना, प्रसंगाचा जणू ठेवाच असते. हा साहित्यरुपी ठेवा लेखक अनुभव संपन्नतेने कल्पकतेने विविध आशयातून मांडत असतो. कादंबरी वाङ्मयप्रकार याला अपवाद नाही.कादंबरीमध्ये तत्कालीन तसेच बदलत्या घटनांचे साद प्रतिसाद उमटत असतात. साहजिकच कादंबरीतील विविध आशयसूत्रांमधून मानवी जीवनाचा आलेख लेखक कलाकृतीतून समाजासमोर मांडत असतो. अशा सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक अंगांनी आशयसूत्रे ही १९९० नंतरच्या महानगरीय कादंबरीतून आलेली दिसतात. यामध्ये 'संधिकाल' (१९९९), 'देह जाओ अथवा जाओ' (२००५) सुमेध वडावाला (रिसबुड), 'तडजोड'(१९९२), 'मुखवटा'(१९९९) अरुण साधू, 'भर चौकातील अरण्यरुदन'(२००८) रंगनाथ पठारे 'बखर सदाशिव वाशीकरची'(२०१०), शंकर सखाराम इत्यादी कादंबरीकारांनी ही आशयसूत्रे रेखांकित केल्याचे दिसून येते.

स्वातंत्र्योत्तर काळातील एका सारस्वत कुटुंबाची तीन पिढ्यांची हकीगत 'संधिकाल' या कादंबरीतून कर्णिकांनी मांडली आहे. या कादंबरीविषयी म.द. हातकणंगलेकर म्हणतात, ''स्वातंत्र्य प्राप्तीनंतर महानगरातील राजकीय, सामाजिक, औद्योगिक, सांस्कृतिक घडामोडींना स्पर्श केला आहे... त्याचा विशाल पट आपल्यासमोर उलगडला आहे.'' मुंबईतील लुप्त होऊ पाहणाऱ्या चाळ संस्कृतीचे व तेथील मध्यमवर्गीय समाजजीवनाचे चित्रण 'देह जाओ अथवा जाओ' या कादंबरीतून

Scanned by CamScanner

सुमेध वडावाला (रिसबुड) यांनी केले आहे.

'भर चौकातील अरण्यरुदन' व 'न्यूज चॅनेल' चे प्रसंगपरत्वे चित्रण येताना दिसते. 'तडजोड' ही कादंबरी समकालीन राजकीय जीवनाचे वास्तव प्रतिबिंब टिपणारी एक प्रवाही राजकीय कादंबरी आहे. 'तडजोड' कादंबरीविषयी राजेंद्र वडमारे म्हणतात, ''बदलत्या आर्थिक, सामाजिक, राजकीय पर्यावरणाचे अनेक ताणेबाणे यातील सत्ताकारणाच्या केंद्राशी बांधलेले आहेत. 'बखर सदाशिव वाशीकरची' या कादंबरीच्या नायकाला मुंबईच्या उपनगरातील एका माध्यमिक शाळेत शिक्षक म्हणून काम करीत असताना त्याला जे महानगरीचे भीषण स्वरूप अनुभवास आले त्याचे शिक्षण विषयक अनुभवासह विविध आशयातून समकालीन संस्कृतीतील एकंदर मूल्यऱ्हासाचे चित्रण या कादंबरीतून शंकर सखाराम यांनी केले आहे.

अवैध धंदे, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, मारामारी विषयक आशयसूत्रे

महानगरात माणसे अनेक समस्यांशी झगडत जीवनाला सामोरी जात असतात. आपले जीवनमान सुधारले पाहिजे, उंचावले पाहिजे ही अभिलाषा प्रत्येकाचीच असते. यासाठी जगण्यासाठीची धावपळ, स्पर्धा सुरुच असते. त्याशिवाय वर्ग बदलाकरिता, श्रीमंतीसाठी, वर्चस्वासाठी जीवघेणी धडपड असते. याबरोबरच वैफल्य, बेरोजगारी, बकाल या समस्येतून बेजार झालेले युवकही दिसतात. या विविध कारणांनी महानगरातील माणसे अवैध धंदे, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, मारामारी, संघर्ष, खून इत्यादींना बळी पडलेली दिसून येतात. या अनुषंगाने प्रसंगपरत्वे कमी-अधिक प्रमाणात १९९० नंतरच्या महानगरीय कादंबरीत लेखन झालेले दिसून येते. त्यामध्ये 'भर चौकातील अरण्यरूदन'(२००८), रंगनाथ पठारे'बखर सदाशिव वाशीकरची'(२०१०), शंकर सखाराम 'कामेरू'(१९९७), श्री. ना. पेंडसे 'गिरणगांव नाका' (२०१०), दिवाकर कांबळी आदी लेखकांनी ही आशयसूत्रे चित्रित केलेली दिसून येतात.'कामेरु' या कादंबरीतून श्री.ना. पेंडसे यांनी गुळपेंडी आणि मुंबई अशा दुहेरी प्रकारच्या जीवन चित्रणातून अनैतिक संबंधाची गुंतागुत व अवैध धंद्याचे चित्रण केलेले दिसून येते. 'गिरगांव नाका' या कादंबरीतून विकास कोचरेकर या आईबापाचा पत्ता नसलेल्या आणि आजोबांनी सांभाळलेल्या युवकाला महानगरातून आलेले बकालपण दिवाकर कांबळी चित्रीत करतात.

मूल्यऱ्हास विषयक आशयसूत्रे

स्वातंत्र्योत्तर काळानंतर कमालीच्या वेगाने मूल्यऱ्हास होऊ लागला. १९९० नंतरच्या महानगरीय कादंबरीमध्ये काही कादंबरीकारांनी याची नोंद घेतल्याचे दिसून येते. त्यामध्ये 'संधिकाल' (१९९९) मधु मंगेश कर्णिक, 'नचिकेताचे उपाख्यान' (१९९६) संजय जोशी या कादंबरीकारांनी 'मूल्यऱ्हासाचे चित्रण' प्रभावीपणे केलेले दिसून येते.

कर्णिकांनी स्वातंत्र्योत्तर काळातील अगणित घटनांबरोबर महानगरातील मध्यमवर्गीयांचा वेगाने होणारा मूल्यऱ्हासही मांडला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जो मानवी मूल्यांचा ऱ्हास सुरु झाला, अनैतिकता हा जीवनमार्ग बनला, याप्रमाणे भारतीय नैतिक मूल्यांची जपणूक करणारा जो मध्यमवर्ग, त्या वर्गातील मूल्य व्यवस्थेवरचा विश्वास उद्ध्वस्त होऊ लागला. पर्यायाने त्यांची कुटुंबव्यवस्था कोलमडली. नातेसंबंधातील माणूसकी नष्ट होऊ लागली. चंगळवादाचे थैमान सुरु झाले.संस्कार संपन्न मध्यमवर्गीय तरुण पिढीला चैनविलासी आयुष्याची चटक लागली आणि तिचे मनःस्वास्थ्य हरपले. अशी काहीशी आशयसूत्रे 'नचिकेताचे उपाख्यान' या कादंबरीतून संजय जोशी यांनी चित्रित केलेली दिसून येतात.

ISSN No. 2319-6025

Scanned by CamScanner

निष्कर्ष :

१. १९९० नंतरच्या महानगरीय कादंबरीतून आशयसूत्रांचे विविध पदर उलघडलेले दिसतात
२. 'तृष्णा' कादंबरी 'गे' पुरुषांच्या मानसिकतेचा वेघ घेताना दिसते.
३. 'झिपऱ्या', 'कोंडी', 'भर चौकातील अरण्यरुदन', 'बखर सदाशिव वाशीकरची'या कादंबरीतून झोपडपट्टी विषयक आशयसूत्रे प्रभावीपणे चित्रित झालेले दिसून येते.
४. 'कलियुग', 'नरिमन पॉईंटचा समुद्र', 'अशांतपर्व', 'महामार्ग', 'रिबोट' या कादंबरीतून उद्योगविषयक आशयसूत्रे येताना दिसतात.
५. 'रीटा वेलिणकर', 'भूमी', 'संदर्भासहीत स्पष्टीकरण', 'भिन्न' या कादंबरीमधून स्त्रीविषयक आशयसूत्रे प्रभावीपणे आलेचे दिसून येते.
६. 'संधिकाल', 'देह जाओ अथवा जाओ', 'तडजोड', 'मुखवटा', 'भर चौकातील अरण्यरुदन', 'बखर सदाशिव वाशीकरची' या कांदबरीमधून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक आशयसूत्रे रेखांकित केल्याचे दिसून येते.
७. अवैध धंदे, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, मारामारी विषयक आशयसूत्रांची मांडणी, 'गिरणगाव नाका', 'कामेरु' इत्यादी कादंबरीतून झाल्याचे दिसून येते.
८. 'संधिकाल', 'नचिकेताचे उपाख्यान' या कादंबरीतून मूल्यऱ्हासाचे चित्रण प्रभावीपणे केलेचे दिसून येते.

समारोप

एकंदरीत १९९० नंतरच्या महानगरीय कादंबरीतून आशयसूत्राचे विविध पदर उलघडलेले दिसतात. महानगरातील समस्या व गतिमानतेमुळे येथील माणसाला गर्दी असूनही एकाकीपण येते. 'तृष्णा' मधून 'गे पुरुषांना' आयुष्याच्या शेवटी वाटणारा एकटेपणा सुमेध वडावाला (रिसबुड) चित्रित करतात. अरुण साधूंनी 'झिपऱ्या' या कादंबरीतून बुटपॉलिश करणाऱ्या झोपडपट्टीतील एका मोठ्या वर्गातील मुलांचे शुद्ध नैतिकतेचे, कष्टाचे जगणे यातून मूल्यात्मक दृष्टिकोन व्यक्त केला आहे. .'कोंडी' कादंबरीतून माटुंग्याच्या लेबर कँप झोपडपट्टीवासियांचे वास्तवदर्शी चित्रण बाबूराव बागूल यांनी केले आहे. .'भर चौकातील अरण्यरुदन' या कादंबरीतून दलित, झोपडपट्टीवासीय, कष्टकरी वर्गातील शोषणाचे चित्रण केले आहे.'बखर सदाशिव वाशीकरची' या कादंबरीतून शंकर सखाराम यांनी झोपडपट्टीचे विदारक स्थितीबरोबर इतरही स्तराचे चित्रण केले आहे.

ह.मो. मराठे यांनी 'कलियुग', 'नरिमन पॉईंटचा समुद्र' या कादंबरीतून उद्योगजगताचे चित्रण केले आहे. .'अशांतपर्व' या संजीव खांडेकर यांच्या कादंबरीतून संगणकाने निर्माण झालेला बेरोजगारीचा प्रश्न, राखीव जागा आणि सवर्णाच्या मनातील द्वेष, मत्सराची भावना, कामगार संघटनातील हेवेदावे, नव्याने निर्माण होणारे नेतृत्व, भ्रष्टाचार, मालक अधिकारी संबंध इ. चे चित्रण होताना दिसते.'महामार्ग' या रंगा मराठे यांचे कादंबरीतून कारखाना प्रशासनातील अंतर्गत गैरव्यवहार, व्यवस्थापनातील अंतर्गत डावपेच, हेवेदावे, सूडबुद्धी, भ्रष्ट व्यवहार इ. चे चित्रण केले.

'रीटा वेलिणकर' या कादंबरीतून विवाह आणि विवाहबाह्य संबंधातून होरपळणाऱ्या स्त्रियांचे चित्रण पुरुष दांभिकतेतून येते.'भूमी' मधून मैथिलीच्या रूपाने स्त्रीजीवनाची फरफट, स्त्रीजीवनविषयक आशयसूत्रांमधून मांडतात.'संदर्भासहित स्पष्टीकरण' या सुमेध वडावाला (रिसबुड) यांच्या कादंबरीतून समाजातील अनिष्ट रुढींना विरोध केल्याने अन्याय, अत्याचाराला बळी पडलेल्या स्त्रियांचे चित्रण

Scanned by CamScanner

येते.'भिन्न' कादंबरीतून कविता महाजन यांनी एडस्च्या पार्श्वभूमीवर बदलत जाणाऱ्या स्त्रीयांचे चित्रण केले आहे.

'संधिकाल' या कादंबरीतून मधु मंगेश कर्णिक यांनी स्वातंत्र्योत्तर काळातील विविध घटनांचा महानगरीय तपशिल या सामाजिक आशयांनी चित्रित केलेला दिसून येतो.सुमेध वडावाला (रिसबुड) यांनी मुंबईतील लुप्त होऊ पाहणाऱ्या चाळ संस्कृतीचे चित्रण 'देह जाओ अथवा जाओ' या कादंबरीतून केलेले दिसून येते. समकालीन राजकीय जीवनाचे बेगडी रूप 'तडजोड' या कादंबरीतून अरुण साधू साकारतात.'बखर सदाशिव वाशीकरची' या शंकर सखाराम यांच्या कादंबरीतून माध्यमिक शिक्षणातील अशैक्षणिक व अनिष्ठ प्रवृत्ती निदर्शनास आणलेल्या दिसून येतात.

'कामेरू' श्री. ना. पेंडसे, 'गिरणगांव नाका' दिवाकर कांबळी यांच्या कादंबरीतून अवैध धंदे व अनैतिक संबंधाची गुंतागुंत, महानगरातील बकाल जीवन ही आशयसूत्रे प्रभावीपणे आलेली दिसून येतात. महानगरातील मूल्यऱ्हासाचे चित्रण 'संधिकाल' मधु मंगेश कर्णिक, 'नचिकेताचे उपाख्यान' संजय जोशी यांच्या कादंबरीतून येते.एकूणच १९९० नंतरची महानगरीय कादंबरी अनेक आशयसूत्रे घेऊन जन्माला आल्या आहेत. त्यामुळे एकाच कादंबरीत प्रधान आशयसूत्रांची आणि उपआशयसूत्र यांची सरमिसळ झाली असल्याचे पहावयास मिळते.

संदर्भ ग्रंथ सूची

१. वडावाला, सुमेध (रिसबुड):'तृष्णा' डिंपल पब्लिकेशन, मुंबई, प्र. आ. २०००, प्रस्तावना.
२. ऐनापूरे जी. के.: 'रिबोट' शब्द पब्लिकेशन, मुंबई, प्र. आ. २००८, पृ. ७१.
३. केळुसकर, महेश (संपा.): मधु मंगेश कर्णिक 'सृष्टी आणि दृष्टी कोकण मराठी साहित्य परिषद', रत्नागिरी, प्र. आ. २०१०, पृ. ४१.
४. वडमारे राजेंद्र: 'अरूण साधू यांची कादंबरी', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र. आ. २००८, पृ. ११२.

ISSN No. 2319-6025

Scanned by CamScanner

ISSN- 2349-638x

Impact Factor 7.149

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

Peer Reviewed and Indexed Journal

Special Issue
Natural Resources and Sustainable Development

29th July 2021

Special Issue - 95

Chief Editor:

Mr. Pramod P. Tandale

Executive Editor

Dr. Arjun Rajage

Principal

Rajarshi Shahu Arts and Commerce College, Rukadi

Tal-Hatkanangale, Dist-Kolhapur (Maharashtra, India)

Co-Editor

Dr. V. B. Desai

Dr. A. S. Patil

Shri. A. A. Bulle

Dr. K. A. Shinde

Scanned with CamScanner

135.	प्रा.डॉ. संतोष तुकाराम कदम	शिक्षणातून सामाजिक परिवर्तन करणारा द्रष्टा शिक्षणतज्ञ : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे	518
136.	प्रा. डॉ. लक्ष्मी दादासो भोसले	देशभक्त रत्नाप्पा कुंभार यांचे स्वातंत्र्य चळवळीतील आणि सहकार चळवळीतील कार्य	522
137.	डॉ.श्वेता एन.दवे	जीवन पद्धति	526
138.	डॉ. गोदावरी आत्माराम गौरकर	चंद्रपूर जिल्हा: तालुकानिहाय लोकसंख्या घनतेचा अभ्यास	533
139.	केदार सुदामराव गरड	शाश्वत विकास आणि भारत	537
140.	प्रा. रमेश कचरु शिंदे	शाश्वत विकासासाठी शाश्वत शेतीची गरज	542
141.	हिना वर्मा	भारतीय गणतंत्र तथा पर्यावरण का यथार्थ : एक समीक्षा	545
142.	प्रा.विकास सुभाष वालकर	शाश्वत विकासामध्ये लोकशाहीवर प्रसारमाध्यमांचा पडणारा प्रभाव	548
143.	डॉ. सुरेश वि. सामाते	शाश्वत विकासची संकल्पना आणि अंमलबजाणी	551
144.	प्रा. डॉ. स म । फुलचंद शिराळे	जैवविविधता आ । शाश्वत वि स	555
145.	डॉ. सुखदेव एस. उंदरे	सतत विकास एवंम् जीवन के अस्तित्व कि निर्भरता	559
146.	प्रा. डी. जी. कापुरे	मानवी जीवनाचा ऐतिहासिक आढावा व पर्यावरण	562
147.	प्रा. डॉ. बिराजदार एस.एम.	पर्यावरण बदल आणि शेती उत्पादन	566
148.	डॉ. राजेंद्र ठाकर श्री. अनिल एम. वळवी	निसर्ग जाणीवा आणि आदिवासी साहित्य	569
149.	डॉ.सोमनाथ विष्णु काळे	भारतातील जलसिंचन व शेतीउत्पादकता : एक दृष्टीक्षेप	573
150.	डॉ. भगवान सुरेश मनाळ	नैसर्गिक संसाधने आणि शाश्वत विकासापुढील आव्हाने	577
151.	अशोकराव नारसिंगराव चिते	भारतातील कृषी विपणन व्यवस्था आणि नवीन कृषी कायदा 2020	582
152.	Telsang Hanamant Bhimrao	नैसर्गिक साधनांचे वर्गीकरण.यात्रा-उत्सव काळातील पर्यावरण पूरक संदेश	587
153.	डॉ.केरबा कांबळे	लातूर जिल्ह्यातील यात्रा केंद्राच्या मोजमाप करण्याच्या पध्दतीचा भौगोलिक अभ्यास	591
154.	प्रा. निलेश दशरथ राऊत	नैसर्गीक साधनसंपदा आणि शाश्वत विकास	592

Scanned with CamScanner

मानवी जीवनाचा ऐतिहासिक आढावा व पर्यावरण

प्रा. डी. जी. कापुरे
राजा शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय, महागांव,
ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

प्रास्ताविक :–

मानवी जीवनाचा उदय पहाता सर्वसाधारणपणे पाच कोटी वर्षापूर्वी आफ्रीका खंडात झालेला दिसून येतो, होमोहेबिलिस, कीनियापिथीकस, ऑस्ट्रेलोपिथीकस, होमोइरेक्टस, होमोसेपियन्स निएंडरथल, क्रोमग्नॉन ते आज पर्यंतचा आधुनिक मानव असे मानवी जीवनाचे टप्पे आपणास दिसून येतात. तेव्हापासून ते आजतागायत मानवाचा व पर्यावरणाचा संबंध जवळचा दिसून येतो. जर हया पृथ्वी ग्रहावर पर्यावरण नसते तर जीवसृष्टी नसती आणि आजचा पर्यावरणातील सर्वात महत्वाचा परंतू पर्यावरणपुरक जीवन जगत असताना पर्यावरणात हस्तेक्षेप करणारा मानव हा घटक सुद्धा नसता, मूळ आफ्रीका खंडात माकडी अवस्थेपासून निर्माण झालेला मणुष्य वातावरणीय बदलानुसार पुढे स्थलांतर करू लागला व पर्यावरणातील पोषक घटकांचा फायदा घेऊन तो आपले जीवन उत्क्रांत करू लागला निसर्गातील बहुतांश घटकासोबत त्याने आपल्या कुशाग्र बुद्धीमत्तेने वावरण्यास सुरूवात केली. खानपान व रहाणीमान याचे टप्पे हळुहळु उत्क्रांत होऊ लागले. उबदार व पोषक वातावरणात मानवाने राहाण्यास सुरूवात केली व नवअश्मयुगात अग्नीच्या शोधाने त्याचे जीवन प्रकाशमान झाले तर चाकाच्या शोधाने गतीमान झाले. अश्मयुगात हळुहळू टोळी ही संकल्पना अस्तित्वात आली तेव्हा तो गुफेमध्ये सुरक्षेच्या कारणास्तव राहू लागला. पुढे कंदमुळे, फळे हे त्याचे मुख्य अन्न झाले. मूळ मांसाहारी असलेला मानव पर्यावरण पुरक वातावरणात स्थिर झाला, मांसाहार शिकार, कंदमुळे, फळे ते धान्य असा त्याचा खानपाणाचा प्रवास सुरू झाला. कुशाग्र बुद्धीमत्तेमुळे संकृती समाज, धर्म या बाबी विकसीत होऊ लागल्या मानव स्थिर जीवन जगू लागला. तस तसे त्याचे व पर्यावरणाचे संबंध जवळीक झाले. एक काळ पर्यावरणात आपल अस्तित्व शोधणारा मनुष्य आता पर्यावरणात हस्तक्षेप करू लागला. पुढे मध्ययुगिन काळात मानवाचा हस्तक्षेप अल्प प्रमाणात दिसू लागला तर आताच्या आधुनिक काळात मानवी हस्तक्षेप मोठया प्रमाणात दिसून येत आहे. मानवी जीवनाचा ऐतिहासिक आढावा व पर्यावरण या प्रस्तुत शोध निबंधात त्याची थोडक्यात अचूक माहिती देण्याचा प्रयत्न पुढील प्रमाणे करण्यात आला आहे.

संशोधन पद्धती :–

मानवी जीवनाचा ऐतिहासिक आढावा व पर्यावरण या प्रस्तुत शोध निबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक ऐतिहासिक व शास्त्रशुद्ध आधुनिक संशोधन पद्धतीचा अवलंब केलेला आहे. मानव व पर्यावरणामधील संबंधासह मानवी जीवनाचा विकास या बाबींचा आढावा घेण्यात आलेला आहे. सूर्यापासून निर्माण झालेली जीवसृष्टी पुढे वाढत गेली व या जीवसृष्टीमध्ये सर्वात बुद्धीवान मनुष्य प्राणी असल्यामुळे त्याने जीवावरण, वातावरण, जलावरण अशा सर्वच क्षेत्रात हस्तक्षेप केलेला दिसून येतो. त्याच पर्यावरणातील मुख्य घटकावर परिणाम झालेला पहावयास मिळतो. मानव व पर्यावरणातील घटकाशी आलेला संबंध प्रस्तुत शोध निबंधात पुढील प्रमाणे विषद करता येईल.

शोध निबंधाचा हेतू :–

१) मानवाने आपली प्रगती साधत असताना शेती व्यवसाय केला त्यात पर्यावरणाचे महत्व विषद करणे.
२) मानवाचा ऐतिहासिक विकासामध्ये वनसंपदेला अनन्य साधारण असे महत्व आहे.
३) मानवी विकासात जलसंपदा अत्यंत महत्वाची आहे.
४) पर्यावरणातील मानव हा एक घटक आहे म्हणून पर्यावरण व मानव याचे महत्व विषद केलेले आहे.
५) जीवसृष्टी किंवा जीवावरण हा पर्यावरणातील एक महत्वाचा घटक आहे म्हणून मानव व पशुपक्षी यांचेसुद्धा पर्यावरणात महत्वाचे स्थान आहे.
६) नैसर्गिक साधन संपतीचा होणारा ऱ्हास पुढे मानवी अस्तित्व संपुष्टात आणील म्हणून मानवाने काळजी घेणे गरजेचे आहे.
७) मानवी अस्तित्व टिकून राहण्यासाठी पर्यावरणातील ढवळा ढवळ बंद झाली पाहिजे असे दिसून येते.

Scanned with CamScanner

उपरोक्त मुद्दया नुसार मानवी जीवनाचा ऐतिहासिक आढावा व पर्यावरण या शोध निबंधाचे हेतू स्पष्ट होताना दिसून येतात पुढील प्रमाणे प्रस्तुत शोध निबंधाची माहिती देता येईल.

मानव व पर्यावरण :—

सूर्यापासून पृथ्वीचे अस्तित्व निर्माण झाले सर्व प्रथम हायड्रोजन व ऑक्सीजन हे दोन वायू इतर ग्रहाच्या तुलनेत पृथ्वीवर मुबलक असल्यामुळे पाणी निर्माण झाले. हळू हळू कोटयावधी वर्षानंतर पाण्याच्या अस्तित्वात शेवाळ नामक वनस्पती निर्माण झाली. नंतर सागरी बुरशीजन्य घटकापासून अमिबा नावाचा एकपेशी प्राणी अस्तित्वात आला. कोटयावधी वर्षे त्याच्या शारीरिक पेशीय बदलामुळे वेगवेगळे जीव अस्तित्वात येवू लागले. जलचर, भूचर व उभयचर असे जीवसृष्टीचे घटक दिसून येवू लागले. यामध्ये पुढे मानवाचा विकास होवू लागला. सर्वप्रथम मानव हा प्राणी पाण्यातून आल्यामुळे आजही मानवी शरीरात पाण्याचे प्रमाण इतर घटकाच्या तुलनेत जादा असते म्हणून मानव हा पर्यावरणाचाच एक अविभाज्य घटक आहे. चार्लस डार्वीन यांनी आपल्या संशोधनात सुद्धा सर्वप्रथम जलचरापासून भूचर निर्माण झाले आणि यातूनच मानवाची शरीरिक ठेवण अस्तित्वात आली असे सांगितले आहे. होमोहेबिलिस, कीनियापिथीकस, ऑस्ट्रेलोपिथीकस, होमोइरेक्टस, होमोसेपियन्स निएंडरथल, क्रोमग्नॉन अशा मानवी अवस्था निर्माण झाल्या होत्या. आजचा आधुनिक माणुस क्रोमग्नॉन या वंशातील दिसून येतो. पाच कोटी वर्षे मानवाचे अस्तित्व पर्यावरणात निर्माण झाले. सर्वप्रथम मानवाने पर्यावरणातील पोषक घटकाचा अभ्यास करण्यात आपले कोटयावधी कालखंड घातला. हळुहळू पोषक वातावरण, पोषक जलावरण व पोषक भूआवरण यामध्ये तो आपले आयुष्य व्यतीत करू लागला. जस जसा काळ बदलत गेला तस तसा मणुष्य आपल्या गरजा बदलू लागला. आज आधुनिक काळात मानवाच्या असंख्य गरजामुळे पर्यावरणात मोठया प्रमाणात हस्तक्षेप दिसून येतो. पर्यावरण व मानव हा मुद्दा पहात असताना पर्यावरणातूनच मानवाची निर्मिती झाल्याचे दिसून येते.

मानव आणि कृषी व्यवसाय :—

मानव हा मुळात बुद्धिमान प्राणी असल्यामुळे त्याच्या कुशाग्र बुद्धीमत्तेला अनेक प्रश्न पडत असत. सर्व प्रथम मानव हा रानटी व भटके जीवन जगत होता. हळुहळू शिकार हाच त्याचा व्यवसाय असला तरी कधीकधी शिकार करणे जोखमिचे होऊ लागले. अशातच त्याला पर्यावरणातील माती हा पोषक घटक असून त्यामध्ये कंदमुळे, फळे, फूले, पाने हे खाऊ लागला. पुढे प्रागैऐतिहासिक काळात त्याला जल तेथे स्थल या उक्तीप्रमाणे शेतीचा शोध लागला. नवाश्म युगामध्ये त्यांनी जगातील नदयांच्या प्रदेशात शेती व्यवसायाला चालना दिली. भारतात सप्तसिंधूचा प्रदेश, गंगा नदीचा प्रदेश, दक्षिणेचा गोदावरी, महानदी व कावेरी आदि नदी परिसरात तो शेती करू लागला. वातावरणीय पोषकतेचा अभ्यास व शेती हा त्याला काळानुरूप होवू लागला. पर्यावरणातील एक महत्वाचा घटक म्हणून मानव हा पहिला प्राणी शेती व्यवसायात पडलेला दिसून येतो.

मानव आणि जलसंपदा :—

मानवी जीवनाचा ऐतिहासिक आढावा घेत असताना जलसंपदा हा पर्यावरणातील महत्वाचा घटक मानवी जीवनाला अत्यंत उपयुक्ततेचा आहे. पाणी हे जीवसृष्टीच्या संचालनासाठी महत्वाचा घटक आहे. मानवाने शेतीविषयक कार्यासाठी पाणी हा महत्वाचा घटक आहे असे ओळखुन आपला रहिवास नदीपरिसरात किंवा मोठया जलसाठयाच्या शेजारी अस्तित्वात आणला. नाईल, गंगा, मिसीसीपी, गोदावरी, ॲमेझॉन, यांगली, एनीस, व्होलगा आदि नदी परिसरात मानवी जीवन व प्रथम मानवी संस्कृती अस्तित्वात आली. गोडया पाण्याची जलसंपदा मानवाच्या व एकंदरीत जीवसृष्टीच्या काळानुरूप संचलनासाठी महत्वाची वाटते. जगात ०.९ टक्के एवढेच पाणी उपयुक्त आहे. पाऊस, पाणी या मुळेच मानवी जीवन समृद्ध व फुलून गेलेले दिसून येते. जलसंपदा ही मानवी जीवनात अत्यंत महत्वाची व अनन्य साधारण अशी पर्यावरणीय बाब दिसून येते असे स्पष्ट सांगता येईल.

मानव व वनसंपदा :—

पर्यावरणामध्ये वनसंपदा हा मानवासाठी असलेला अत्यंत उपयुक्त असा घटक आहेत्र वनसंपदेमुळे ऑक्सीजनची निर्मिती होते हे ऑक्सीजन एकंदरीत जीवसृष्टीला जीवंत ठेवण्याचे कार्य करते. वन संपदा या पर्यावरणातील महत्वाच्या घटकाचा मानवाने आपले जीवन समृद्ध करण्यासाठी मोठया प्रमाणात उपयोग केलेला दिसून येतो. औषधी व शेती विषयक औजारे, गृहउपयोगी वस्तू यासाठी वन संपदेचा उपयोग इतर

Scanned with CamScanner

प्राण्यापेक्षा मनुष्यप्राणी करत आलेला आहे. मानवी जीवनात पर्यावरणाबरोबर वनसंपदेच महत्व अनन्य साधारण आहे. वेगवेगळ्या पशुपक्षाबरोबर मानवाने या वनसंपदेमुळेच संवाद साधलेला दिसून येतो. वन संपदेमधून बाहेर निघालेले प्राणी हे पुढे माणसाळले व त्या प्राण्यांचा उपयोग मानवाने संरक्षण व शेती विषयक कामकाजासाठी, मांस भक्षणासाठी, दुधासाठी केलेला दिसून येतो. जंगलात राहीलेले हे वन्य जीव ठरले तरी त्यांचे महत्व इतर प्राण्यांना एकंदरीत अन्न साखळी व जीवसृष्टीचा गाडा टिकवून ठेवण्यात अनन्य साधारण आहे. वनसंपदा व मानव हा मुद्दा पहात असताना मानवी अस्तीत्व हे वनसंपदेवर अवलंबून आहे असे दिसून येते.

मानव व पशुपक्षी :–

पर्यावरणातील जीवावरण या घटकात मानवाबरोबर पशुपक्षी यांचे महत्व अनन्य साधारण आहे. जीवसृष्टी व पर्यावरणात समतोल राहण्यासाठी पशुपक्षी यांचे अस्तीत्व हे स्पष्ट दिसून येते. आधुनिक काळात मानवाने भ्रमणध्वनी व इंटरनेट, सॅटेलाईट अशी उपयुक्त उपकरणे शोधून काढले आहेत. मानव फोरजीतून फाईवजी मध्ये प्रवेश करीत आहे. यामुळे लहान व सुक्ष्म असे पक्षी भ्रमण लहरीला बळी ठरत आहेत. पुढे मोठे पक्षी बळी ठरण्याची शक्यता आहे. एकंदरीत जीवसृष्टीतील पक्षी हा घटक जर नाहीसा झाला तर पृथ्वी तलावर किटक राज्य येवू शकते. अगोदरच एकंदरीत जीवसृष्टीच्या ७५ टक्के घटक हा किटकांनी व्यापलेला आहे. त्यावर पक्षांचे नियंत्रण आहे. म्हणून किटक हे घटक नियंत्रणात आहेत त्याचप्रमाणे जीवसृष्टीतील जंगली हिंस्त्र मांसभक्षक व तृणभक्षक पशुपक्षी हे सुद्धा जंगलसंहिता गवत व इतर जंगली व गवताळ प्रदेश निर्माण करण्यासाठी उपयुक्त आहेत म्हणून मानवाने पर्यावरणाचा रक्षक म्हणून पुढे येवून पशुपक्षांचे संरक्षण केले पाहिजे. एकंदरीत पर्यावरणातील जीवावरण हा घटक जपला पाहिजे तरच मानवी अस्तीत्व पुढील अनंत काळासाठी टिकून राहीला नसता. पर्यावरणातील जीवावरण हा घटक नष्ट झाला म्हणजे मानवी अस्तीत्व आपोआप नष्ट होईल असे दिसून येते.

नैसर्गिक साधनसंपतीचा ऱ्हास व मानवी अस्तीत्व :–

पर्यावरणात केवळ मनुष्य असा प्राणी आहे जो नैसर्गिक साधन संपतीचा भोक्ता म्हणून ओळखला जातो. मानवाने आपले जीवन समृद्ध बनविण्यासाठी मोठया प्रमाणात पर्यावरणातील शिलावरण, जलावरण, जीवावरण, वातावरण अशा विविध घटकात हस्तक्षेप केलेला दिसून येतो. धातु संशोधन करत असताना मानवानी नवाश्मयुगात सर्व प्रथम तांबे या धातुचा शोध लावला. तांब्याच्या वस्तू प्राचीन काळात मोठया प्रमाणात वापर होवू लागला. तांबे, सोने, चांदी, ॲल्युमिनिअम, जस्त, शिसे अशा अनेक धातुंचा उपयोग मणुष्य करू लागला त्यासाठी नको ते डोंगर पोखरू लागला. खनिजे व खनिजजन्य पदार्थांचा वापरसुद्धा मानवी जीवनात वाढू लागला. त्यामुळे नैसर्गिक साधन संपतीचा ऱ्हास होताना दिसत आहे. जलसंपदा, वनसंपदा सर्वच क्षेत्रातील नैसर्गिक साधन संपती ऱ्हास पावताना दिसत आहे. तरी मानवाने वेळीच सावधान होवून नैसर्गिक साधन संपतीचा वापर कमी प्रमाणात केला, नैसर्गिक डोंगर, नदीचे प्रवाह, वनाचे क्षेत्र खाणकाम क्षेत्र या सर्व गोष्टी राखुन ठेवल्या तरच मानवी अस्तित्व कायम टिकून राहील असे दिसून येते.

पर्यावरण पुरक विकासाची गरज :–

प्राचीन काळापासुन आजतागायत मानवी विकास सरळ व चढत्या रेषेत दिसून येतो. तरी मानवाने आज आधुनिक काळात पर्यावरणात अनेक हस्तक्षेप केलेले दिसून येतात. नदी अडविणे, मोठे धरणे बांधणे, नैसर्गिक पाण्याचा प्रवाह आडविल्यामुळे पूरपरिस्थितीला मानव सामोरे जात आहेत. भूप्रदूषणात मानवाने पॉलीथीन पिशव्या व तत्सम वस्तूंची निर्मिती करून मोठया प्रमाणात भूप्रदूषण केले आहे. हे वेळीच रोखण्यासाठी नैसर्गिक वस्तूंचा पर्याय निवडला पाहिजे. पर्यावरणपुरक वस्तूंचा वापर जास्तीत जास्त मानवानी केला पाहिजे. नैसर्गिक शेती, नैसर्गिक जीवनशैली याचा स्विकार मानवाने केला पाहिजे. पर्यावरणपुरक विकासाची गरज आज मानवी जीवनात प्रामुख्याने भासते. पर्यावरण पुरक विकास झाला तरच या पृथ्वीचे नंदनवन व मानवी अस्तीत्व कायम टिकून राहील असे दिसून येते हे स्पष्ट सांगता येईल.

सारांश/निष्कर्ष :–

मानवी जीवनाचा ऐतिहासिक आढावा व पर्यावरण या संशोधनपर शोध निबंध मानवाचे व पर्यावरणाचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी मार्गदर्शक ठरतो. मानवाने आज साधलेली प्रगती कोटयावधी वर्षाच्या वाटचालीचा चढता व सरळ रेषेतील आलेख आहे. मानव आपले जीवन व्यतीत करताना शिकारी

Scanned with CamScanner

पासून ते शेतीपर्यंत त्यांनी वाटचाल केलेली दिसून येते. प्राचीन काळात वनवासी भटकत असताना त्याला लागलेला शेतीचा शोध, जलसंपदा, वनसंपदा, शेती व्यवसाय, साधन संपती, पशुपक्षी या सर्व पर्यावरणातील घटकांचा त्याने आपले जीवन समृद्ध करण्यासाठी योग्य वापर केलेला दिसून येतो. आज आधुनिक काळात मानवाने पर्यावरणाला पोषक अशा गोष्टी स्विकारण्यापेक्षा स्वत:चे जीवन समृद्ध व अल्हाददायक करण्याचे ठरविले आहे. तरी याबाबी मुळे पर्यावरणाचा ऱ्हास होताना दिसून येतो ही बाब पर्यावरणातून निर्माण झालेल्या मानवी लोकसंख्येच्या मयदिला अत्यंत घातक अशी दिसून येते. मानवाने पर्यावरणासाठी आपल्या परीने सर्वच नैसर्गिक घटक प्रदूषण विरहीत राहतील अशी काळजी घेतली पाहिजे. शेती व्यवसाय, पशु व पक्षी, जलसंपदेचे शुद्धीकरण, भूसंपदेचे शुद्धीकरण, वनसंपदेचे जतन करने ही अत्यंत काळाची गरज आहे. असे प्रस्तुत शोध निबंधातून दिसून येते सांगता येईल.

संदर्भसूची :–

१) भालचंद्र नेमाडे – मानवी भूगोल, संकेत प्रकाशन औरंगाबाद, १९९०
२) डॉ. सी. एस. लट्टू – वनस्पतींचे वर्गीकरण, लोकसत्ता, ४ जानेवारी २०१६ लेख.
३) डॉ. दया शंकर त्रिपाठी – पर्यावरण अध्ययन, नरेंद्र जैन प्रकाशन, दिल्ली, २००५.
४) उर्जा भण्डारण – विकिपीडीया, संगणक माहिती संकलन.
५) भौतिकशास्त्र – विकिपीडीया, संगणक माहिती संकलन.
६) मारूती चितमपल्ली – जंगलाची दुनिया – साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, २००६.
७) मारूती चितमपल्ली – निसर्ग वाचन – पदमगंधा प्रकाशन, पुणे, २०००.
८) मारूती चितमपल्ली – जंगलाच देण – साहित्य प्रकार केंद्र, नागपूर, १९८५.
९) पुंडलिक गवांदे – प्राण्यांच्या जगात – अमित प्रकाशन, पुणे.
१०) डॉ. शैलेश अवघ्र, प्रा. सिद्धार्थ बी. सोनवणे – पर्यावरण अभ्यास, अर्थव प्रकाश जळगांव.
११) ए.बी. सवदी – भूगोल पर्यावरण, निराली प्रकाशन, दिल्ली
१२) Michael Cook - A Brief History of the Human Race - Civilization Publisher, Newyork, 2003
१३) चंद्रशेखर भिडे – इनसाईड हिस्ट्री ऑफ हयुमन रेस, सीजीबी पब्लिकेशन कं. १९५६.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www.aiirjournal.com

Scanned with CamScanner

शोध पत्रों को प्रकाशित करने के लिए विधि मान्य आई.एस.एस.एन 2321-9645

विश्व स्नेह समाज

वर्ष 22, अंक 1, सितम्बर 2022

एक रचनात्मक क्रान्ति



मूल्य 100/-रू

इस अंक में.....

1– शुभकामना संदेश 02
2– अध्यक्ष की कलम से...-डॉ० शहाबुद्दीन नियाज़ मुहम्मद शेख 07
3– अपनी बात- घर से निकलते ही कुछ दूर चलते ही..... -गोकुलेश्वर कुमार द्विवेदी 08
4- संपादकीय-डॉ० भरत त्र्यंबक शेणकर 09

आलेख :

5- हिंदी एवं भारतीय भाषा-साहित्य में अन्तः सम्बन्ध - डॉ० सत्यभामा अडिल 11
6- हिंदी भाषा में व्याकरण संबंधी अशुद्धियाँ - डॉ० सीमा वर्मा 14
7- महाराष्ट्र-मराठी : चंदगडी प्रदेश बोली और संस्कृति का परिचय - डॉ० संजीवनी संदीप पाटिल 16
8- भारतीय भाषा लिपि और संस्कृति - डॉ० ओम प्रकाश त्रिपाठी 19
9- महाराष्ट्र की संस्कृति : डॉ० प्रतिभा जी येरेकार 22
10- छत्तीसगढ़ की लोक संस्कृति : डॉ० सरस्वती वर्मा 25
11- राष्ट्रलिपि : देवनागरी लिपि - प्रा. डॉ. मंगल कोंडीबा ससाणे 28
12- पूर्वोत्तर की लिपि विहीन बोलियों के लिए देवनागरी लिपि - डॉ० रिना रमेश सुरडकर 30
13– क्रांतदर्शी संत तुकाराम के काव्य की प्रासंगिकता - डॉ० भरत त्रयंबक शेणकर 32
14- देवनागरी लिपि का उद्भव और विकास - डॉ० रश्मि चौबे 35
15– भाषाओं में उभरती हुई नई प्रवृत्तियाँ - सौ० सुगंध हिंदुराव घरपणकर 40
16- राजस्थानी भाषा, लिपि एवं संस्कृति - प्रा. पूर्णिमा उमेश झेंडे 43
17– भारतीय भाषा, लिपि एवं संस्कृति - डॉ० मुक्ता कान्हा कौशिक 45
18- 'महादेवी की काव्य भाषा भावानुगामिनी : विरह-भाव के परिप्रेक्ष्य में' - ममता रेवापाटी 47
19- राष्ट्रीय एकता में देवनागरी लिपि की भूमिका - प्रा. ललिता घोडके 49
20- नागरी लिपि की वैज्ञानिकता - डॉ. प्रा. ऐनूर शब्बीर शेख 51
21- खान्देश का लोक साहित्य एवं लोक संस्कृति का परिचय - डॉ० रुपाली चौधरी 54
22- सिंधी भाषा व लिपि का उद्भव व विकास - प्रा० मधु मनोहरलाल भंभाणी 57
23- ब्रज की पीड़ा - संतोष शर्मा 'शान' 61
24- दक्षिण भारत द्वारा भारतीय संस्कृति का विकास - डॉ० आरती बोरकर 62
25- देवनागरी लिपि : एक आदर्श लिपि - मधुकर सखाराम शेटे 66
26– साहित्य और नैतिक मूल्य - डॉ० शरद भानुदास कोलते 68
27- संत दादू दयाल के काव्य में सामाजिक दृष्टि - प्रा. थोरात बबन किसन 71
28- महाराष्ट्र की लोककला - प्रा. रोहिणी बालचंद डावरे 74
29– आधुनिक मराठी साहित्य - डॉ० अशोक द्रोपद गायकवाड़ 78

भाषाओं में उभरती हुई नई प्रवृत्तियाँ

(विशेष संदर्भ-हिंदी भाषा)

"संस्कृत से प्राकृत एवं इसके भेद फिर अपभ्रंश में तत्सम शब्द से तद्भव शब्द बने और हिन्दी खड़ी बोली के रूप में देशज एवं विदेशी शब्दों के माध्यम से समृद्ध आज तक होती रही।"
आज हिन्दी प्रशासन, विधि, चिकित्सा, न्याय, शिक्षा, तकनीकी एवं और ऐसे अनेक क्षेत्रों में, पत्रकारिता में सशक्त माध्यम बन गयी है।

-सौ. सुगंधा हिंदुराव घरपणकर
एम्.ए., एम्.एड्., एम्.फिल्., पीएच.डी., अधिव्याख्याती- हिंदी विभाग, राजा शिवछत्रपती महाविद्यालय, महागांव, जि. कोल्हापूर, महाराष्ट्र
संपर्क : 9423269708.

संसार में लोगों के बीच संप्रेषण के लिए शब्द ही माध्यम होते हैं। अनेकानेक भाषाओं के शब्द भंडार इसके मूलाधार होते है; अमेरिका, यूरोप, एशिया, अफ्रिका, आस्ट्रेलिया जैसे महादेशों के विभिन्न देशों की भिन्न-भिन्न भाषाएँ है। भारत वर्ष एशिया महादेश का अति प्राचीन देश है जिसका पूर्व या शास्त्रीय नाम आर्यावर्त था।

इस आर्यावर्त की भाषा संस्कृत थी और इसके शब्द-भण्डार के अनेक कोश थे और अभी भी हैं। विश्वकोश, हलायुध कोश, अमरकोश, शब्द कल्पद्रुम एवं शब्दस्तोभमहानिधि आदि जैसे महाग्रंथ है। जिनके शब्दों के आधार पर जनसंचार होता था। "संस्कृत से प्राकृत एवं इसके भेद फिर अपभ्रंश में तत्सम शब्द से तद्भव शब्द बने और हिन्दी खड़ी बोली के रूप में देशज एवं विदेशी शब्दों के माध्यम से समृद्ध आज तक होती रही।"

साहित्यिक क्षेत्र की हिन्दी परिनिष्ठित होती है और जनसंचार की हिन्दी कुछ उससे हल्की एवं सहबोध्य होती है। आज हिन्दी प्रशासन, विधि, चिकित्सा, न्याय, शिक्षा, तकनीकी एवं और ऐसे अनेक क्षेत्रों में, पत्रकारिता में सशक्त माध्यम बन गयी है। "जीविकोपार्जन, व्यवसाय, खेलजगत आदि क्षेत्रों में इसका वर्चस्व देखा जा सकता है। सिनेमा, विज्ञापन, दूरदर्शन संसार पर हिन्दी छा गयी है।"[1] भारत में रेडियो पत्रकारिता का इतिहास भी लगभग 70 वर्ष पुराना है। आकाशवाणी की शुरुआत 1936 में 'All India' के नाम से हुई, तभी से यह लगातार कार्यरत है।

भूमंडलीकरण ने आर्थिक विकास के जो तीव्रगामी घोड़े पूरी दुनिया में दौड़ा दिए और इसके साथ उसने सूचना क्रांति का जो विस्फोट किया वह सब अंग्रेजी भाषा के माध्यम से ही हुआ। इंटरनेट और कम्प्युटर ने औद्योगिक विकास में जो महत्वपूर्ण भूमिका निभाई उनका माध्यम अंग्रेजी ही रहा। वैश्वीकरण जिस प्रकार मोनो कल्चर का विकास कर रहा है, भाषा की दृष्टि से भी उसी प्रकार समस्त विश्व को अंग्रेजीकरण की प्रक्रिया में ढाल रहा है।

इन सब बातों का विश्लेषण यदि भारतीय भाषाओं और विशेषतः हिंदी के संदर्भ में किया जाय तो यह बात बहुत तेजी से उभरकर आती है कि भारतीय भाषाओं का अंग्रेजीकरण इस वैश्विक प्रक्रिया में और भी तेजी से हो रहा है। हिंदी भाषा को ही आप लीजिए, तो यह स्पष्ट देखा जा सकता है कि आज उसका स्वरूप और प्रकृति द्रुत गति से परिवर्तन की प्रक्रिया में है। यहाँ हिंदी भाषा की सर्वप्रमुखता शक्ति को कोई नकार नहीं रहा है। बाजार और विज्ञापन की शक्तियों ने उसकी क्षमता और उपादेयता को पहचान कर अपने ही ढंग से उसका अनुकूलन प्रारंभ किया है और जिससे उसका चलित रूप और अधिक समृद्धतर रूप में विकसित हो रहा है। पंजाबी-हिंदी और अंग्रेजी का जो

हिंदी भाषा में ताल-मेल उपस्थित हो रहा है, वह उसके परिनिष्ठित स्वरूप के लिए जरूर चिंता का विषय है किन्तु बाजार उसका भरपूर उपभोग कर रहा है। हिंदी भाषा की इस शक्ति को पहचान कर अंग्रेजी समाचार पत्रों का विज्ञापन संसार और बहुराष्ट्रीय कंपनियों तथा अन्य बड़ी कंपनियों के विपणन विशेषज्ञ बाजार-विज्ञापन में हिंदी के प्रयोग को विशेष महत्व देते चले जा रहे है। इसलिए हिंदी भाषा आज बाजार की सर्वाधिक प्रिय भाषा बन गई है। रोमन में लिखी हिंदी के बिना अंग्रेजी समाचार पत्रों का भी काम नहीं चल पा रहा है –"AA GAYAA EK DUM ASLI INDIAN" या "KAR LO DUNIYA MUTTHI MEN" जैसे विज्ञापनों से समाचार पत्र भी भरे रहते है। एक खबर शीर्षक अंग्रेजी अख़बार में इस प्रकार है - NRI kaa Desi Dil कहने का तात्पर्य यह है कि इधर अधिकांश हिंदी समाचार पत्र जो चरित्र में समाचार पत्र कम, उत्पादन प्रोडक्ट अधिक बन गए है, वे देवनागरी में अंग्रेजी और स्थानीय भाषाओं का तड़का इस प्रकार लगा कर भाषा का एक अलग चलित रूप जबरदस्ती थोपते हुए, हिंदी का नया चरित्र गढ़ रहे है। जैसे : 'वांटेड, हैपिली मेरिड विद चंडीगढ़/लाइफ राउंड दी क्लार्क/वर्किंग मांम की लाइफ/कैरियर प्लस।'

कुछ समाचार-पत्र रोमन में अपने हिंदी शीर्षक देने में नहीं हिचक रहे है, जैसे - Dance with me, Filmi work, Good luck, Fashion Trade, Hellow Delhi आदि-आदि। पंजाबी-हिंदी भाषा का आपसी मिश्रण का हिंदी रूप इस उदाहरण से समझा जा सकता है- 'बूढ़े बाजू तो पक्के बाल, चलदे ने बड़ी शान नाल/ एना सौंखा नई वोटोरा नूं समझाना।'

भाषाई परिनिष्ठता, शुचिता का प्रश्न यहाँ बेमानी हो गया है। भाषाई शुद्धता की दीवारे तेजी से गिरती जा रही है। यह विचारणीय नहीं है कि बाजार की शक्तियों ने हिंदी को कितना उर्जावान और सक्षम-सशक्त किया है बल्कि चिंता का विषय यह है कि भूमंडलीकरण की इस प्रक्रिया ने जन भाषाओं और बोलियों को हाशिए पर डालकर उन्हें विलुप्ति की ओर अग्रसर किया है। प्रांतीय भाषाओं की भी स्थिति यही है, उनका अधिकाधिक अंग्रेजीकरण हो रहा है।

भाषा हमेशा से समय और परिस्थितियों के साथ बदलती रही है। ऐसा नहीं है कि 21वीं सदी में भाषा बदल रही है। हिंदी तब भी बदल रही थी 20वीं सदी आ रही थी। भाषा जो है वह निरंतर बदलती है और बदलता रहना उसका स्वभाव है उसकी नियति है उसकी प्रकृति है। 21वीं सदी की जो हिंदी भाषा है उसका और बाकी जो भाषा रही है उसके बीच का अंतर है वह है तकनीकी क्रांति का। तकनीकी क्रांति कोई आज की क्रांति नहीं है। 200 साल हो गए यह चल रही है पर वह जितनी तेजी से आज बदल रही है उतनी शायद पहले नहीं बदली थी। जो लोग कहते है कि भाषा का मानदंड बनाया जाय; मेरी समझ से वे गलत कह रहे हैं। इंटरनेट की भाषा अलग होगी और टी.वी. की भाषा अलग होगी, प्रिंट मीडिया की भाषा अलग होगी। दिक्कत तब आएगी जब कन्वार्जेस आएगा। रेडियो की भाषा अलग है और टी.वी. की भाषा बिलकुल अलग है। टी.वी. के पास विजुअल का एक बड़ा संसार होता है। विजुअल के सपोर्ट से चलते उनकी जो भाषा होगी वह बिल्कुल अलग ही होगी और वह आम जनता के बिल्कुल करीब होगी। अतः कहा जा सकता है कि हिंदी भाषा का समूचा स्वरूप, प्रावधान और प्रक्रिया तेजी से ग्लोबल हो रही है और इसके भौतिक और ऐतिहासिक कारण है। वह किसी षडयंत्र के तहत नहीं हो रही है। यह बहुत पहले से हो रही है। विज्ञापन मीडिया का अनिवार्य अंग है। सच तो यह है कि मीडिया के बहुत बड़े वर्ग की सांसे विज्ञापन की आक्सीजन से ही चलती है। इसलिए विज्ञापनों में प्रयोग की जाने वाली भाषा भी हिंदी के स्वरूप पर असर डालती है। विज्ञापनों में हिंदी की बढ़ती स्वीकार्यता का आलम यह है कि विज्ञापन लिखे या दिखाए तो अंग्रेजी में जाते है लेकिन वह भाषा आमफहम हिंदी होती है।

हिंदी भाषा हमेशा और हर रूप में अपने को बदलती रही है। इस बदलती परिस्थितियों में वह नई प्रवृत्तियों को भी धारण करती जाती है। आज हम देखते है कि भारत की विदेशी

नीति में हिंदी को एक ख़ास महत्व दिया जाने लगा है, यह हमारी भाषा के प्रति बदली हुई प्रवृत्तियों का नतीजा है। हिंदी की बदली प्रवृत्तियों का एहसास भारत सरकार को भी है। इसलिए 10 जनवरी सन् 2015 को विश्व हिंदी दिवस के अवसर पर आयोजित कार्यक्रम को संबोधित करते हुए, विदेश मंत्री सुषमा स्वराज ने विदेश नीति के मामले में अपनी भाषा नीति को स्पष्ट करते हुए, कहा था कि "जहाँ तक मेरी अपनी भाषा नीति का संबंध है, मैंने सभी अधिकारियों को कह रखा है कि जब भी द्विपक्षीय वार्ता के लिए कोई विदेशी अतिथि आएगा, अगर वह अंग्रेजी जानता है तो मैं अंग्रेजी में बात करूँगी क्योंकि मैं बोलूं, वो समझे, वो बोले और मैं समझूं। भाषांतरण की आवश्यकता नहीं पड़ेगी। लेकिन अगर कोई जपानी में बोलता है, चीनी में बोलता है, रूसी में बोलता है, स्पेनिश में बोलता है, जर्मन में बोलता है... तो मुझ पर यह बाध्यता मत कीजिए कि मैं अंग्रेजी में बात करूँ। फिर मैं भी हिंदी में बात करूँगी ताकि वह यह प्रभाव लेकर जाए कि भारत की भाषा हिंदी है, अंग्रेजी नहीं। और मैंने उसी दिन कहा कि इन हर भाषाओं में से हिंदी के भाषांतरणकार अगर नहीं उपलब्ध है तो तैयार करो।"

अगर हम हिंदी साहित्य को देखे तो आज के साहित्यकारों खास कर से उपन्यासकारों के उपन्यासों में कथ्य की व्यापकता, वैविध्य और शिल्प के नये रूपों ने उपन्यासों की भाषा को भी एक नई दीप्ति से मंडित किया है। नई पीढी के लेखकों ने भाषा को अपने परिवेश की नई नई चीजों, उपकरणों, संवेदनाओं से उपमान, बिम्ब आदि दे कर, इतना ताजा, साभिप्राय, अर्थ सक्षम और ऊर्जावान बना दिया है कि हिंदी भाषा एक दम से खिल उठी है। इसके कुछ उदाहरण इस प्रकार देखे जा सकते है कि "साहिल से बिदा लेकर उठी तो मन अदबदा सा प्रेशर कुकर हो गया था।" एक और उदाहरण है "नये मन चुप्पी कुछ चोट खा गया, लेकिन आयोडेक्स मलिए काम पे चलिए भाव से मैं आगे बढ़ गई।" इन औपन्यासिक अंशों को देखकर कहा जा सकता है कि भाषा की शुद्धता की कृत्रिम दीवारों को तोड़ती यह कथा भाषा अंग्रेजी से अंकुठ भाव से शब्द अपनाती है जिस अंकुठ भाव से हमारे दैनिक जीवन में उनका प्रयोग हो रहा है। आज हिंदी उपन्यास अपनी इसी भाषा की समृद्धी के बल पर वैश्विक स्तर पर प्रतिष्ठित है।

दर असल भाषा की ताकत होती क्या है? राजनीतिक तौर पर ही नहीं बल्कि सामाजिक तौर पर भी सरोकार और संवाद बनाने वाले माध्यमों के लिए अब यह क्यों जरूरी होता चला जा रहा है कि वह जनभाषा हिंदी का प्रयोग करें?

आज स्थिति यह है कि खबरों के केंद्र से लेकर न्यूज एंटरटेंमेंट चैनल, रेडियो, प्रिंट, फिल्म, नाटक से लेकर हर विधा में हिंदी भाषा ने अपने को कायम कर लिया है। आज अगर फैशन में रहना हो तो भी हिंदी चाहिए और वोट बटोरना हो तो भी हिंदी भाषा चाहिए। यह परिवर्तन हिंदी भाषा की ऊर्जा का प्रमाण है।

जिसमें विज्ञापनों की भूमिका महत्वपूर्ण है-जैसे इलेक्ट्रॉनिक माध्यम से प्रकाशित एवं प्रसारित होने वाले विज्ञापन-विज्ञापन वाटिका शैम्पू "इतने सिल्की, इतने नैचुरल बाल, वाटिका, हिना कंडिशनिंग से।"[13]
कुछ और उदाहरण : "इसको लगा डाला तो लाईफ झिंगालाला"

टाटा स्काय, टी.व्ही. विज्ञापन
"थंडा मतलब कोका कोला"
प्रोडक्ट विज्ञापन
"मुन्नी झंडू बाम हुइ डार्लिंग तेरे लिए" प्रोडक्ट विज्ञापन
"करारे कजरारे तेरे कारे-कारे नैना"
बंटी बबली फिल्म

अंत में भाषा के विस्तार के संदर्भ में मुझे कबीर जी की एक पंक्ति याद आती है-"संस्किरत है कूप जल भाखा बहता नीर"-कबीर!
अर्थात संस्कृत भाषा कुँए के जल के समान है और हमारी भाषा बहती हुई नदी के समान है
"वसुधैव कुटुंबकम्"

संदर्भ ग्रंथ :

1. चंद्रकुमार, 'जनसंचार माध्यमों में हिंदी'-पृष्ठ 40–41.
2. डॉ. रेशमा नदाफ, 'जनसंचार एवं पत्रकारिता"-पृष्ठ 60.
3. डॉ. रेशमा नदाफ 'इलेक्ट्रॉनिक मीडिया और हिन्दी'- पृष्ठ 90.
4. डॉ. रेशमा नदाफ 'इलेक्ट्रॉनिक मीडिया और हिन्दी' - पृष्ठ 92.

ISSN : 2349-638X
IMPACT FACTOR : 7.149

महाविद्यालय ग्रंथालय

Aayushi International
Interdisciplinary Research Journal
E-mail : aiirjpramod@gmail.com Website : www.aiirjournal.com
Peer Reviewed & Indexed Journal
Special issue No. 84

Dr. Babasaheb Ambedkar an Architect of India

Vol. V
Marathi

Chief Editor
Mr. PRAMOD TANDALE

Editor
Ms. MEGHAVEE G. MESHRAM
Mr. NARESH W. PATIL

mpact Factor – 7.149

ISSN-2349-638x

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

April - 2021

Theme of the Special Issue

Dr.Babasaheb Ambedkar : An Architect of India

Chief Editor

Pramod P. Tandale

Editor

Prof. Meghavee G. Meshram

Prof. Naresh W. Patil

IMPACT FACTOR

SJIF 7.149

For details Visit our website

www.aiirjournal.com

No part of this Special Issue shall be copied, reproduced or transmitted in any form or any means, such as Printed material, CD – DVD / Audio / Video Cassettes or Electronic / Mechanical, including photo, copying, recording or by any information storage and retrieval system, at any portal, website etc; Without prior permission.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638x
Special Issue No.84

Disclaimer

Research papers published in this Special Issue are the intellectual contribution done by the authors. Authors are solely responsible for their published work in this special Issue and the Editor of this special Issue are not responsible in any form.

Dr. Sunil Choudhary
Assistant Professor
Udaipur School of Social Work,
JRN Vidyapeeth University, Udaipur, Rajasthan

Prof. Bharati M. Lankeshwar
Assistant Professor
Akola, Maharashtra

Dr Nilima A. More
Assistant Professor
Govt. college Of Education Panvel Raigad
Mumbai University Mumbai, Maharashtra

Dr. Gautama Kathane
Assistant Professor
Economics Dept.
Government College Lanji, Balaghat, Madhya Pradesh

Dr. Manohar Kumbhare
HOD, Pali & Buddhism
Vasantrao Naik Govt. Institute of Arts and Social Science ,Nagpur
Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University, Nagpur, Maharashtra

Dr. Ram P. Savanekar
Assistant Professor,
Aniket College of Social Work, Wardha
Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University, Nagpur Maharashtra

Dr. Sandesh Wagh
Professor, Dept of Histoey
Chairman, Board of Studies History & Archeology
University of Mumbai, Maharashtra

Dr. Pramod Herode
Dr Babasaheb Ambedkar College of Law Aurangabad
Dr Babasaheb Ambedkar Marathwada University,
Aurangabad, Maharashtra

Editorial Board of this Special Issue No.84

राजा शिवछत्रपती महाविद्यालय
स्थापना १९८९
जि.कोल्हापूर.
महागांव, ता.गडहिंग्लज

Dr. Sangeeta Dongre
Assistant Professor Dept. of Zoology,
Government Vidarbha Institute of Science & Humanities
Amravati. Maharashtra . India.

Prof. Meghavee G. Meshram
Assistant Professor.
Dr Babasaheb Ambedkar College of Social Work. Morane { Nakane } Dhule
KBC North Maharashtra University Jalgaon Maharashtra

Prof .Chandrakant C.Kamble
Assistant Professor.,
Ismailsaheb Mulla. Law College,Satara
Shivaji University Kolhapur . Maharashtra

Prof. Naresh W. Patil
Assistant Professor.
Kumbhalkar College of Social Work. Wardha
Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University .
Nagpur. Maharashtra

Dr. Aparajita Dutta
Assistant Professor
Centre for Juridical Studies
Dibrugarh University Assam.

Dr. Shilparani S. Dongre
Assistant Professor in Law.
V. N. Patil Law College, Aurangabad.
Dr Babasaheb Ambedkar Marathwada University.
Aurangabad Maharashtra

Prof. Takshashila Jadhav
Assistant Professor
K.J Somaiya College of Education.
Somaiya Vidyavihar University. Mumbai. Maharashtra

Dr. Rajesh H. Bholte
HOD- Business Economics
Anjuman-i-Islam's Akpar Peerbhoy Collge of Commerce and Economics
Maulana Shaukat Ali Road, Mumbai., Maharashtra

Sr. No.	Name of the Author	Title of the Paper	Page No.
223	प्रा.संतोष विश्वनाथ यादव	डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जातीव्यवस्थे संबंधी चिकित्सक विचार	1049
224	प्रा. अर्जून वामणराव कांबळे	डॉ. बाबासाहेब आणि आजचा बौध्द समाज.एक दृष्टिकोण	1053
225	डॉ. अनिल म्हाळाप्पा गाडेकर	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समाजसुधारणा : एक समाजशास्त्रीय अभ्यास	1057
226	विकास गवई	पत्रकारिता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर	1062
227	डॉ. विनोद संभाजी सोनवणे	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार : एक चिकित्सक अभ्यास	1066
228	डॉ. मृदुला निळकंठ रायपुरे	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भाषावार प्रांतरचना	1070
229	डॉ. सीमा लालचंद गोलाईत	स्त्रीयांचे मानवाधिकार: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टिकोनातून	1073
230	डॉ. अनिता ए. सार्वे	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिलांसाठी कार्य	1078
231	डॉ. रागिणी मोटघरे	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय महिलांचे सक्षमीकरण	1082
232	डॉ. एम.के. कन्नाडे	कामगारांचे कैवारी : डॉ बाबासाहेब आंबेडकर	1085
233	डॉ. लक्ष्मीकांत चोपकर	डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कामगार चळवळ - एक दृष्टिकोन	1092
234	प्रा डॉ. के पी देशमुख	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीविषयक कार्य आणि भारतीय अर्थव्यवस्था	1099
235	प्रा.शशिकांत दिवाण भामरे	डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचे अध्ययन	1104

ग्रंथपाल
राजा शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय, महागांव.
ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीविषयक कार्य आणि भारतीय अर्थव्यवस्था

प्रा डॉ. के पी देशमुख
राजा शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविदयालय महागांव
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापुर

प्रस्तावना -

शेती हा मानवाच्या जिवनातील महत्वाचा व्यवसाय असून तो अत्यंत प्राचीन काळापासून केला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेतीकडे अत्यंत वास्तववादी व व्यवहारीक दृष्टीकोनातून बघायचे. शेती हे केवळ उदरनिर्वाहाचे साधन नसून, उदरनिर्वाहाबरोबरच रोजगार निर्मिती व कृषीप्रधान देशाच्या भांडवल निर्मितीचा महत्वपूर्ण स्त्रोत आहे असे त्यांचे मत होते. यामुळे शेतीला उद्योगाचा दर्जा देऊन शेती व उद्योग यांना समान पध्दतीने चालना द्यावी असे ते म्हणत. देशाचा विकास साधण्यासाठी ते आजही गरजेचे आहे याबाबत ते आग्रही होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतीचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी सातत्याने प्रयत्न केल्याचे दिसून येते. तत्कालीन राज्यकर्त्यांचा शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोन अत्यंत सापत्न होता, याचे चित्र आजही दिसून येते (उदा. उद्योगाकडून मोठया प्रमाणात कर्ज घेऊन ते बुडवले जाते, मात्र शेतकरी कर्जाबाबत बोलत असतांना शेतकरी कर्ज बुडवतो असा कांगावा केला जातो.) डॉ. आंबेडकर यांनी तत्कालीन शेती व शेतकऱ्यासमोरील असलेले प्रश्न सोडविण्यासाठी तसेच शेतीच्या दीर्घकालीन विकासासाठी त्या प्रश्नांची अत्यंत शास्त्रशुध्द मांडणी करुन ते सोडवण्याचे प्रयत्न केले असल्याचे दिसून येते. यामध्ये जमीन सुधारणा , सिंचन व पाणी, शेतकरी व कामगार चळवळी या संबंधी विचार, समुहशेतीबाबतचे विचार. याबाबत सविस्तर विवेचन व यांची सद्यःस्थितीत उपयुक्तता याबाबत विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

शोध निबंधाची उदिदृष्टये :-

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेतीविषयक विचाराचा अभ्यास करणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेतीविषयक विचारांची सद्यःस्थिती अभ्यासणे.

संशोधन पध्दती :-

शोध निबंध पूर्ण करण्यासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. ज्यामध्ये संदर्भ ग्रंथ, पुस्तके, साप्ताहिके, मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट यासारख्या प्रभावी साधनांचा आधार घेण्यात आला आहे. तसेच या शोध निबंधासाठी ऐतिहासिक, तुलनात्मक व विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषीविषयक विचार :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेती व शेतकऱ्याच्या दीर्घकालीन विकासासाठी व यातून देशाच्या विकासासाठी पूरक असे विचार मांडले आहेत.

जमीन सुधारणा विषयक विचार :-

शेती क्षेत्रातील शोषण कमी होऊन आर्थिक समता प्रस्थापित झाली तरच सामाजिक न्याय प्रस्तापित होईल म्हणून आर्थिक समतेसाठी त्यांनी शासनाचा हस्तक्षेप अपरिहार्य मानला. त्यासाठी त्यांनी सामुदायिक शेतीची संकल्पना मांडली.

महाविद्यालय,महागांव.
ता.गडहिंग्लज,जि.कोल्हापूर.

सामुदायिक शेती म्हणजे शेतीचे राष्ट्रीयीकरण - शासनाने शेतजमीनी ताब्यात घेऊन त्या विकसीत कराव्यात अशा शेतजमीनी शेतकऱ्यांना कांही अटीवर कसण्यासाठी द्याव्यात. यामुळे सामाजिक अन्याय व शोषण दूर होईल. शेती आदानांचा पुरवठा शासनामार्फत शेतकऱ्यांना योग्य किंमतीत केला जाईल. त्यामुळे शेतीतून उत्पादीत होणारे उत्पन्न हे सर्व शेतकऱ्यांना सारखेच मिळेल.

डॉ. आंबेडकरांचे सामुदायिक शेतीबाबतचे विचार अतिशयोक्ती वाटत असली तरी मोठया प्रमाणात असलेली आर्थिक विषमता, दारिद्रय , वाढत्या शेतकरी आत्महत्या, बेकारी यासारख्या समस्यांवर सामुदायिक शेती हा उपाय ठरु शकतो. आज भांडवलदाराकडून मोठया प्रमाणावर शेतजमिनीची खरेदी केली जात आहे. या जमिनीतील कांही शेतजमिनी उपजावू असून देखील पडीक ठेवल्या जातात. तर कांही शेतजमिनी या लोकांनी शेतकऱ्यांना बटाईने (५० - ५० टक्याने) कसलास दिल्या आहेत. ही शेती करतांना शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती व बाजारातील धोक्यांचा सामना करावा लागतो. येथे या बटाईदार शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे विमा संरक्षण मिळत नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत एखादेवेळी या शेतकऱ्यांना पोटापुरते जरी मुश्कीलीनेच हाती लागते. या परिस्थितीतून मुक्ततेसाठी सामुदायिक शेती हाच एकमेव पर्याय ठरतो.

देशाची वाढती लोकसंख्या व घटत जाणारे धारणक्षेत्र याचा आढावा घेतल्यास मागील ५० वर्षाच्या काळात सरासरी धारण क्षेत्र हे निम्यापेक्षा कमी झाले आहे. देशातील सीमांत व लहान शेतकऱ्यांचे प्रमाण एकूण शेतकऱ्यांच्या ८५टक्के इतके मोठे आहे. १९७०—७१ मध्ये जमीनीचे सरासरी धारणक्षेत्र २.३ हेक्टर इतके होते ते कमी होऊन २०१५ — २०१६ मध्ये १—०८ हेक्टर इतके झाले आहे. या प्रश्नावर डॉ.आंबेडकरांनी "स्मॉल होल्डिंग इन इंडिया ॲन्ड दिअर रेमीडीज " या शोधनिबंधात वाढती लोकसंख्या आणि औद्योगिकरणाची मंद गती याचा परिणाम शेतीवरील अवलंबित लोकसंख्येत वाढ याकारणामुळे शेतीचे तुकडीकरण होऊन धारणक्षेत्र लहान बनले आहे. यातून अकिफायतशिर धारणक्षेत्र बनून जमिनी पडीक बनल्या आहेत. यामुळे राष्ट्रीय कृषी उत्पादन घटले आहे व त्यातून दारिद्रय वाढले आहे. यावर उपाय सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात देशातील औद्योगिकरणाचा विकास करावा. यामुळे शेतीवर अवलंबून असलेल्या लोकसंख्येचा बोझा कमी होईल व उद्योगांचा ही विकास होईल. प्रा.लेव्हीस यांच्या प्रतिमानाच्या अगोदर बाबासाहेबांनी त्यापध्दतीचे मॉडल आपल्या विचारातून मांडले व ते भारतीय अर्थव्यवस्थेला तंतोतंत लागू होते. यातून शेतीतील कच्चा माल उद्योगाला मिळून उद्योगाचा ही चांगला विकास होईल व आधुनिक पध्दतीने शेती कसण्यास चालना मिळेल. यासाठी शासनाने प्रयत्न केल्यास शेती उत्पादन वाढून शेती विकसीत होईल.

शेतकरी संघटन विषयक कार्य :-

मुंबई इलाख्यातील कांही भागात "खोती" ही भूधारणा पध्दती प्रचलीत होती. या पध्दतीत शेत सारा गोळा करण्यासाठी शासनाने खोतांची नियुक्ती केली होती. यात जमिनीतील उत्पनाचा अर्धा भाग आणि वरकस जमिनीतील पिकांचा एक तृतिअंश भाग खोतांनी कुळाकडून वसूल करावा अशी ही पध्दती होती. याशिवाय शेतसारा वसूल करण्याचा अधिकार ही सरकारने त्यांनाच दिला . त्यामुळे शेतकऱ्यांचे परमोच्च शोषण करण्याचा परवानाच खोतांना मिळाला होता. येथे शेतकऱ्यांनी प्रचंड कष्ट करायचे आणि खोतांनी फुकटच खायचे अशी ही पध्दती होती. डॉ.बाबासाहेबांना ही पध्दती मान्य नव्हती. त्यामुळे त्यांनी या पध्दतीच्या विरोधात आवाज उठविला. शेतकऱ्यांना या विरोधात संघटीत आवाज उठविण्यासाठी प्रेरीत केले. त्याचा परिणाम म्हणून १८९३—९७ या कालखंडात शेतकऱ्यांनी खोती पध्दतीविरोधात आंदोलन उभे केले. बाबासाहेबांनी खोतांना 'आयत्या बिळात नागोबा' असे संबोधन दिले. हे खोती पध्दतीच्या विरोधातील आंदोलन म्हणजेच शेतकरी संघटनेची मुहूर्तमेढ होय. सन १९३७ मध्ये खोती पध्दतीने शेतकऱ्यांचे होणारे शोषण थांबवून शेतकरी हिताचे संरक्षण व्हावे यासंबंधी विधेयक डॉ.आंबेडकरांनी आणले. हे खोती अंताचे विधेयक म्हणजेच जमीन सुधारणांची व शेतकरी चळवळीच्या यशाची नांदी होय.

कोल्हापूर. ता. करवीर

डॉ. आंबेडकरांनी शेतकरी व कामगारांच्या हितासाठी मजूर पक्षाची स्थापना केली. पक्षाचा शेतकरी व कामगारांची कैफियत मांडणारा जाहिरनामा प्रसिध्द केला. पक्षाच्यावतीने १९३८मध्ये शेतकऱ्यांचा असेंब्लीवर मोर्चा काढला. त्यात शेतकऱ्यांच्या विविध मागण्या सादर करुन त्या तातडीने सोडविण्याची मागणी केली.

आजच्या भांडवलशाही अर्थव्यवस्था व जागतिकीकरणाच्या युगात शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अधिक बिकट बनत चालली आहे. त्यांचे चोहोबाजूने शोषण होत आहे. या स्पर्धेच्या युगात त्यांना आपले अस्तित्व टिकवावयाचे असेल तर बाबासाहेबांच्या स्वप्नातील शेतकरी संघटना व त्यांच्या शेतीविषयक विचारांची आवश्यकता आहे. आज देश पातळीवरील शेतीविषयक कांही कायदे व जागतिक परिस्थिती ही शेतकरी हिताला बाधा आणणारी आहे. याची पुर्नमांडणी करण्याची आवश्यकता आहे. तसेच सद्या येऊ घातलेले तीन शेती विधेयक -२०२०, कृषी उत्पन्न , व्यापार व वाणिज्य विधेयक, हमीभाव आणि शेती सेवा करार विधेयक आणि अत्यावश्यक वस्तू विधेयक, या विधेयकाबाबतही शेतकरी वर्गामध्ये भिती व संभ्रम अवस्था निर्माण झाली आहे. आजच्या शेतकऱ्यांची दैन्य अवस्था , वाढत्या शेतकरी आत्महत्या, दारिद्रय यामुळे शेतकऱ्यांचा सरकारवरील विश्वास उडाला असल्याचे दिसणे, सरकारने शेतकऱ्यांची बाजू विचारात घ्यावी यासाठी शेतकरी संघांत एकीची अत्यंत आवश्यकता आहे. त्यातून येणारे कायदे हे शेतकऱ्यांच्या फायदयाचा विचार करु लागतील. येथे डॉ. आंबेडकरांच्या विचारातील प्रबळ असा शेतकरी संघटनेची गरज असल्याचे दिसून येते. वरील कृषी विधेयक -२०२० ला शेतकऱ्यांचा विरोध असून देखील सरकार कायदयात बदल करायला तयार होत नाही. त्यामुळे हे कायदे शेतकऱ्यांच हिताचे होणार का भांडवलदारांच्या हिताचे होणार अशी शंका उपस्थित होते. त्यामुळे येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शेतकरी चळवळ व शेती विषयक विचारांची आज देशाला गरज असल्याचे दिसून येते.

सिंचन व पाणी विषयक कार्य :-

देशाच्या सर्वांगिण विकासात नदया, पाण्याचे नियोजन, पाण्याचा वापर आणि वीज निर्मिती याचे मोलाचे योगदान आहे हे बाबासाहेबांनी ओळखले होते. त्यांनी देशाचा दीर्घकालीन विकास डोळयासमोर ठेऊन उपलब्ध पाण्याचे नियोजन करण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्यप्राप्तीच्या पूर्वी देशात पाण्याची उपलब्धता व वापर याबाबत मतभिन्नता होती. नदयांचे पाणी व पूर ही एक गंभीर समस्या म्हणून पाण्याकडे पाहिले जायचे. त्यामुळे देशात पाण्याच्या नियोजनाबाबत कोणतीही संस्था कार्यरत नव्हती. पाणी हा विषय केवळ राज्य सरकारच्याच अखत्यारीत होता. त्यामुळे पाण्याच्या नियोजनाबाबत सर्व गोंधळच होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी याबाबत नियोजन करतांना सर्वप्रथम त्यांनी पाणी व्यवस्थापनाचा विषय राज्यघटनेच्या ५६व्या कलमवृत्ती सूचित अंतर्भूत केला. पाण्याच्या व्यवस्थापनासाठी केंद्रीय पातळीवर एखादी संस्था असावी यासाठी केंद्रीय विद्यूत व जलआयोगाची स्थापना सन १९४५ मध्ये केली. एकंदरीत देशातील पाण्याचे नियोजन करुन त्याचा वापर देशाच्या सर्वांगिण विकासासाठी करणेची जबाबदारीच डॉ. आंबेडकरांनी घेतलेली दिसून येते.

देशातील कांही भागात भरमसाठ पडणारा पाऊस, यातून निर्माण होणारे पुराचे संकट, यामुळे मोठयाप्रमाणात मनुष्य व वित्तीय हानी व्हायची. हे संकट दूर करण्यासाठी या नदयावर धरणांची निर्मिती करुन ते पाणी नंतरच्या काळात वापरण्यासाठीचे धोरण त्यांनी ठरविले. यासाठी नदी खोरे विकास प्राधिकरणाची स्थापना केली व या माध्यमातून नदी खोऱ्यांचा व धरणांचा विकास करुन त्या पाण्याचा वापर सिंचन, विद्यूतनिर्मिती, औद्योगिकरण, देशांतर्गत जलवाहतूक करण्याबाबतचे नियोजन आखले गेले. सन १९४४ ते १९४६ या कालखंडात त्यांनी दामोधर खोरे प्राधिकरण, सोननदी विकास प्राधिकरण, महानदी, कोसी,चंबळ तसेच दक्षिणेतील नदया प्राधिकरणाची स्थापना केली. सन १९४४मध्ये केंद्रीय जल आयोग तसेच पाटबंधारे व नौकानयन आयोगाची स्थापना केली. सन १९४३मध्ये विद्यूत निर्मितीला चालना देण्यासाठी केंद्रीय तांत्रिक मंडळाची स्थापना केली. राष्ट्रीय पॉवर ग्रीडची संकल्पना मांडली. देशभरातील पाण्याचे नियोजन करण्याचा एक प्लॅनच डॉ.

आंबेडकरांनी १९४२ ते १९४६ या अल्पकाळात केलेला दिसून येतो. शेती व्यवस्थापनासाठी पाणी आणि वीज हे मुख्य घटक आहेत. पाण्याशिवाय शेतीचा विकास अशक्य आहे. हे त्यांनी वेळोवेळी तत्कालीन सरकारच्या निदर्शनास आणून दिले.

आधुनिक भारताच्या निर्मितीसाठी मुलभूत घटकांच्या विकासाच्या दीर्घकालीन योजना त्यांनी विकसीत केल्या. विद्युतनिर्मिती क्षेत्रात जे यश आपल्याला आज दिसते त्याची पायाभरणी डॉ.आंबेडकरांनी केली होती. जास्त लोकसंख्येच्या देशात एकमेव शेती क्षेत्र हे मोठ्या रोजगाराला सामावू शकते. तसेच उत्पादीत शेतमालावर आधारीत उद्योगांची निर्मिती करुन औद्योगिकरणाला चालना देता येते. यातून शेती व उद्योग या दोन्ही क्षेत्रात रोजगाराच्या संधी निर्माण होतात. म्हणूनच त्यांनी कृषीविषयक धोरणाला विशेष महत्व दिले जात असल्याचे दिसून येते. आजची परिस्थिती पाहता शेतीक्षेत्रात निर्माण झालेले अरिष्टे, हवामानातील बदल, देशातील रोजगाराचे घटते प्रमाण, दारिद्रय, गुन्हेगारी या समस्यावर उपाय म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अनंत उपयोगी असल्याचे दिसतात. कारण शेतीतील सिंचनात वाढ करावी त्यासाठी रिव्हर लिंकींग योजना वॉटर ग्रीड योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी त्यातून सिंचन वाढेल. शासनाने कृषी धोरणाला प्राधान्य देवून शेती आधारीत उद्योगाला चालना दयावी. म्हणजेच शेतीला प्राध्यान्य देवून देशाचा विकास साधन्याचा प्रयत्न केल्यास मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल. त्यातून लोकांची खरेदी शक्ती वाढून औद्योगिक विकासाला चालना मिळेल व त्याचा परिणाम देशाचा सर्वांगिण विकास होईल.

संदर्भ :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आजच्या ७५ वर्षापूर्वी शेती व शेतकऱ्याविषयी मांडलेले विचार व केलेले कार्य हे आजही तेवढेच उपयोगी असलेले दिसतात. यामध्ये जमीन सुधारणा व जमिनीच्या पुर्नवाटपाविषयी विचार - कसणाऱ्याच्याच मालकीची जमिन असेल तर तो अत्यंत कष्टाने उत्पन्न काढतो. शेतकरी विरोधी खोती व जमीनदारी पध्दतीत शेतकऱ्यांचे शोषण होते व करुनही हाती काहींच लागत नसेल तर उत्पादन करण्याचा उत्साह राहात नाही. त्यामुळे खोती पध्दती नष्ट करुन सरकार कडील अतिरिक्त जमिनी भूमिहीनांना वाटप करणे यासंबंधी कार्य देशाच्या शेती व्यवस्थेवर दुरगामी परिणाम करणारे व शेती व शेतकऱ्यांच्या विकासाला अनुकूल ठरले. आजच्या घडीलाही जो शेतीत राबतो, कष्ट करतो त्यालाच त्याच्या उत्पन्नाचा मोबदला मिळाला पाहिजे.

कोणत्याही शोषीत घटकांचे शोषण होत असल्यास त्या घटकांचे शोषण रोजगारासाठी संघटन असले पाहिजे, असे डॉ.आंबेडकरांना वाटायचे. संघटनेचे महत्व त्यांनी जाणले होते. 'शिका संघटीत व्हा, संघर्ष करा' हे त्यांचे ब्रीद वाक्य होते. शेतकरी व कामगार वर्गाचे शोषण त्यांनी जवळून पाहिले होते.. या घटकांची शोषणापासून मुक्ती व्हावी म्हणून त्यांनी शेतकरी कामगारांच्या संघटनाची पायाभरणी केली. त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शेतकरी व कामगार पक्षाची स्थापना केली. जागतिकीकरणाच्या काळात शेतकरी व कामगार चळवळी मोडीत काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न चालू आहेत. त्यातून या संघटना/संघटना आज कमकूवत होऊन शेतकरी व कामगार वर्गाचे शोषण वाढले आहे. तेंव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची शेतकरी संघटना पुन्हा नव्याने निर्माण होणे गरजेचे आहे.

आधुनिक पध्दतीने शेती कसण्यासाठी पाण्याची आवश्यकता आहे. त्याशिवाय शेती करणे म्हणजे निसर्गासोबत जुगार आहे आणि जागतिक तापमान वाढीमुळे निसर्गाचे संतुलन मोठया प्रमाणात बिघडले आहे. अशा परिस्थितीत उत्पन्न वाढून शेती संपन्न व्हावी. त्यातून उद्योग व्यापार वाढावा, पाण्यापासून वीजनिर्मिती, नौकानयन करुन सार्वभौम विकास व्हावा याहेतूने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४२ ते १९४६ या काळात देशाच्या सिंचन धोरणाची मुहूर्तमेढ रोवली. त्या काळातील त्यांचे सिंचन विषयक कार्य देशाच्या आजपर्यंतच्या सिंचनाच्या विकासाला अत्यंत

उपयुक्त ठरले. यापुढे ही बाबासाहेबांच्या सिंचन विषयक यामध्ये वॉटर ग्रीड योजना, नदयाजोड योजना यासारख्या विचारांची गरज असल्याचे दिसून येते.

आजच्या घडीला भारताचे शेतीक्षेत्र अनेक पातळयावर संकटात सापडलेले दिसत आहे. ज्या समस्या स्वातंत्र्यापूर्वेळी शेतीक्षेत्रापुढे होत्या त्या आजही दिसतात. जागतिकीकरणानंतरच्या काळात तर शेती व्यवसायाकडे शासनाचे दुर्लक्ष व पर्यावरण असमतोल यामुळे शेती व्यवसाय नकोसा झाला आहे. शेतीला अनेक संकटाला सामोरे जावे लागत आहे. या समस्यांचा अभ्यास करताना डॉ.बाबासाहेबांचे शेतीविषयक विचार व कार्य आजही भारतीय शेतीला दिशादर्शक ठरतील हे नक्की...

उपाययोजना :-

जमीनीचे विषम वाटप, सिंचनाचे क्षेत्र कमी यामुळे सिंचनाखालील शेती असणारा शेतकरी , जमिनदार या वर्गालाच बँका कृषी कर्ज देण्यास प्राधान्य देत आहेत व अल्पभूधारक व कोरडवाहू शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे. शासकीय योजनांचा लाभ ही सिंचनाखालील बागायतदार शेतकरी मोठया प्रमाणात होत असल्याचे दिसतात. यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील नदया जोड प्रकल्प ग्रीड योजना यासारखे प्रकल्प राबवून देषातील सिंचनाचे क्षेत्र वाढवावे. जमीनदार व उद्योजकाकडील अतिरिक्त जमिनी शासनाने खरेदी करुन अन्य शेतकऱ्यांत वाटप कराव्यात. शेतकऱ्यांचे शोषण टाळण्यासाठी शासनाने शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारीत किंमती द्याव्यात.

संदर्भसूची :-

1) वाटचाल ,सामाजिक कल्याण व न्याय विभाग, म.रा.
2) Dr. B.R.Ambedkar , Small Holding in India and their remedies. Govt. of Maharashtra Publication , Dr. Babasaheb Ambedkar writings and speeches Vol.1 1989.
3) P.Ramaiah &Reddy , Dr.B.R.Ambedkar Economics Philosophy. Delta Publishing House, New Delhi1973.
4) अरविंद पोळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे लोकसख्या विषयक विचार , सूगावा प्रकाशन,पुणे १९८६
5) A.H.Ghongade, वर्तमानकाळात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा कृषीविषयक विचारांची उपयुक्तता,AIIRJ. VOL-V MAY- 2018.
6) Dr.B.R. Ambedkar writing and speeches Vol.10 Page 284-311.
7) शेतकरी मासिक एप्रिल–2017
8) लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचलनालय, म.रा. ऑक्टोंबर-२०१६.
9) डॉ.नरेंद्र जाधव, डॉ.आंबेडकरांचा आर्थिक दृष्टीकोन 'दैनिक देशदूत' मधील ६ डिसेंबर, २०१६ मधील लेख.
10) ए.एम.ठाकरे,डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि शेतकऱ्यांचे प्रश्न' 'Research Journy 'Journal December-2016.
11) Economic survey of India -2019-20.
12) लोकसत्ता, २७ सप्टेंबर, २०२०.

प्रा. कार्ये
राजा शिवछत्रपती महाविद्यालय, महागांव.
ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर.